# सूक्तिरत्नावली

# सूक्तिरत्नावली

## पंचदश यष्टि

श्रीगुलाबराव महाराज

—: प्रकाशक :—

वेदान्तकेसरी ना. पै. पंडित

किंमत ५ रुपये

-: मुद्रक :-
श्री. वि. गंधे,
एम्. ए., डी. पी. इ.
प्रदीप मुद्रणालय,
धनतोली, नागपूर.

-: प्रकाशक :-
वेदान्तकेसरी
ना. पै. पंडित
पाताळेश्वर रोड,
महाल, नागपूर.

सर्वाधिकार
सुरक्षित
पहिली आवृत्ति
आगष्ट १९५१.

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# अनुक्रमणिका


| | | पानें |
|---|---|---|
| १ | ईशावास्योपनिषद् - अपूर्ण .... | १—१५ |
| २ | ज्ञानेश्वरी निरूपण .... | १६—२५ |
| ३ | निगमांत सुभा .... | २६—३३ |
| ४ | ऐश्वर्यार्थदीपिका - अपूर्ण - .... | ३४—५२ |
| ५ | ब्रह्मसूत्र व्याख्या - अपूर्ण - .... | ५३—५६ |
| ६ | छंद प्रदीप .... | ५७—६५ |
| ७ | प्रमाद कल्लोळ ... | ६६—७३ |
| ८ | योगप्रभाव .... | ७४—१०० |
| ९ | हिरण्ययोग .... | १०१—११५ |
| १० | पतिव्रता चरितामृत .... | ११६—१३२ |
| ११ | षट्पदध्वनि - अपूर्ण - .... | १३३—१३७ |
| १२ | गोपिकापादपीयूष लहरी अपूर्ण .... | १३७—१४२ |
| १३ | वेदान्त निरूपण - अपूर्ण - .... | १४३—१४७ |
| १४ | गान सोपान - अपूर्ण - .... | १४८—२०४ |
| १५ | योगांगयमलक्षण - अपूर्ण - .... | २०५—२१० |
| १६ | दुर्मत हृदयभंजन - अपूर्ण - .... | २११—२१४ |
| १७ | सिद्धिसार - अपूर्ण - .... | २१५—२३४ |
| १८ | ईशावास्योपनिषद् - अपूर्ण - .... | २३५—२४० |
| | (भाषा विवरण-स्फूट) | |

| | | | पानें |
|---|---|---|---|
| १९ | वेदान्तप्रक्रियासमुच्चय | .... | २४१—२५१ |
| २० | वृत्तिक्षीरसागर | .... | २५२—२६१ |
| २१ | सुखपर्व — अपूर्ण — | .... | २६२—२८४ |
| २२ | सांख्य सूत्रावर कांहीं विचार अपूर्ण | | २८५—२९५ |
| २३ | एक निबंध — अपूर्ण — | .... | २९६—३०१ |
| २४ | बौद्ध निबंध — अपूर्ण — | .... | ३०२—३०८ |
| २५ | आत्मचरित्र | .... | ३०९—३२१ |
| २६ | नवीन भाषा—नावंग | .... | ३२२—३३८ |
| २७ | प्रश्नोत्तरे — अपूर्ण — | ... | ३३९—३४१ |
| २८ | श्री भाऊसाहेब खापरे यांस पाठविलेले पत्र | .... | ३४२—३५२ |
| २९ | ✓मानसायुर्वेद— लेखांक १ | ... | ३५३—३६० |
| ३० | ✓ ,, — लेखांक २ | .... | ३६१—३७० |

# दोनच शब्द!

श्रीगुलाबराव महाराजांच्या अप्रकाशित वाङ्मयाचा हा पंध-रावा भाग प्रसिद्ध करतांना आज आम्हाला मोठा आनंद होत आहे. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या चवदाव्या यष्टीप्रमाणेच याही भागांत आज-पर्यंत अप्रकाशित व अपूर्ण असलेले असे एकोणतीस ग्रंथ आलेले आहेत. त्यांत पहिले चवदा ग्रंथ पूर्णपणे ओवीबद्ध असून बाकीचे पंधरा गद्यग्रंथ आहेत. श्रीमहाराजांच्या इतर ग्रंथाप्रमाणेच वाच-कांना याही ग्रंथांतून विचारांना चालना देणारी भरपूर सामग्री मिळणार आहे व त्यांच्या सर्वंकष व सर्वव्यापी बुद्धीचा प्रत्यय येणार आहे. आमच्या प्रमाणेच वाचकांचाही मात्र एका बाबतींत विरस होण्याचा संभव आहे. आणि ती बाब म्हणजे सर्व ग्रंथ अपूर्ण आहेत ही होय. असो. ही बाब अशी आहे कीं या ठिकाणीं सर्वांचाच नाईलाज आहे.

सर्व गोष्टी सुगमतेने उपलब्ध असलेल्या अशा या आधुनिक काळांत ग्रंथ संपादन करण्याच्या दृष्टीने पुष्कळच न्यूनता असावी ही खरोखरच दुःखाची गोष्ट आहे व त्याबद्दल फारसे समर्थन करण्याच्या भानगडींत न पडता पहिल्यानेच आम्ही वाचकांची क्षमा मागून घेतो. मात्र एक दोन गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक आहे. श्रीमहाराजांना अंतर्धान पावून आज बरोबर ३६ वर्षे पूर्ण झालीत. त्या कालावधींत हे ग्रंथ प्रकाशित होण्याचा योगच येवूं शकला नाही. हस्तलिखितांचे काही लेखक कालवश झाल्यामुळे

संशयस्थळीं खुलासा करून घेणे संभवनीय नव्हते व आज ह्यांत असलेल्या लेखकांनाही आपणच पूर्वी लिहिलेला शब्द ओळखणे कठीण जावूं लागले. त्यांत पुन्हा कागद जीर्ण झाल्यामुळे पुष्कळ ठिकाणीं मोड पडून अक्षरें अस्पष्ट झालीत व हस्तलिखितें असून देखील तीं दुर्बोध होऊन बसलीत. इतक्याही आपत्तींतून मुद्रण-प्रति तयार करण्यात आल्या.

प्रदीप मुद्रणालयाचे व्यवस्थापक व मालक श्री. गंधे यांनी मुद्रण शक्य तितके चांगले होण्याकरिता आटोकाट श्रम घेतले याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. पण मुद्रयोजकांच्या अनभिज्ञते समोर त्यांना-ही हात टेकणे भाग पडले. ग्रंथाच्या शेवटी जोडलेल्या शुद्धिपत्रा-बद्दल मला वाटते इतके शब्द पुरे होतील! शुद्धिपत्र असतांनाही वर्णमात्रा विपर्यासाच्या अधून मधून चुका लुकलुकणे संभवनीय आहे. त्याबद्दल वाचकांनी उदारतेने आम्हाला क्षमा करावी एवढीच त्यांना प्रार्थना आहे.

**ना. पै. पंडित.**

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ

# ओवीबद्ध–ईशावास्योपनिषद्.

## प्रथम समास

ॐ नमोजी सद्गुरु । चहूं वाणी नकळे पारु । विश्वबोधार्थ साकारू । अविकारू रूप तुझे ॥१॥ तूं देवांचाहि देव । परब्रह्मींचा अनुभव । प्रेमपान्हा पाजावया ठेव । माउली तूं ॥२॥ माये तुझिया कृपाबळें । अवघे ब्रह्मांड उजळे । तुझ्या सेवेपाशीं फळे । मोक्षादि येती ॥३॥ जे तापले संसारतापीं । माये तुझिया पादप्रतापीं । गोष्पद करुनी भव बांधिती सोपी । भक्तिवाट ॥४॥ एवढा दृष्टीचा महिमा । इतर कोण जाणें गरिमा । जें कीं अनंतत्वाची सीमा । पूर्ण प्रेमा आकळिसी तूं ॥५॥ तूं सर्वभूतीं समान । जडमूढांही तारण । तुझें कृपें ईश्वर आपण । सृष्टिकर्ता ॥६॥ एवढी माये तुझी थोरी । तेथ काय वर्णिल ही वैखरी । परी तुझी कृपा खरी । वदे वाग्झरी शब्दरत्नें ॥७॥ ब्राह्मणीं पैठणीं केला वाद । तैं रेड्यामुखीं बोलविलें वेद । गर्वरहित ब्रह्मवृंद । करुनी बोध ठसविला ॥८॥ त्या रेड्याच्याहि पदरजा । वंदूनिया ही आत्मजा । हे तात टीका करावया सहजा । स्फूर्ती तूं कीं ॥९॥ ऐसिया वो तुझें पायीं । जीवभाव तनुमन डोई । अर्पिली आतां मज पाहि । ज्ञानेश्वर आई कृपाळे ॥१०॥ यजुर्वेदसंहितेंत । चाळीसावा विख्यात । ईशावास्याध्याय स्थित । टीका निश्चित करी त्याची ॥११॥ ईशावास्यादिक मंत्र । न सांगती कर्मतंत्र । अखंडैकरस ब्रह्म स्वतंत्र । तेथ त्यांचा समन्वय ॥१२॥ वेद कर्मांचे बोधक । नाहींत ब्रह्मप्रतिपादक । ऐसें म्हणती मीमांसक । असत्य मुखपाटव ॥१३॥ जे मायाअपेक्षे निर्गुण । आपुलिया गुणें सगुण । लीलानंतत्वे पूर्ण । त्यांचें लक्षण वेद वदती ॥१४॥ म्हणूनी वेदाच्या ठायीं । ब्रह्मसमन्वय पाही । आणि मीमांसका नाहीं । अवकाशांशही किंचित् ॥१५॥ असो आतां हे बोलणे । मंत्रार्थाते विवरणें । तो प्रथम मंत्र म्हणे । स्वयें होणे या रीती ॥१६॥

हरिःॐ ईशा वास्यमिदं सर्वं यत् किंच जगत्यां जगत् ॥
तेन त्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्य स्विद्धनम्

आतां तयाचा पदार्थ । अन्वयें बोलती समर्थ । निमित्त भावहा यथार्थ । न साधे की ॥१७॥ ( पदान्वयार्थ ) ॥ विश्वीं विश्व जें कांहीं । असे तें हें सर्वही । ईश्वरें व्यापोनी ठायीं । नाहींसें केले ॥१८॥ म्हणोनि तयाचा त्याग । करोनी पाळी श्रीरंग । कोणाचाहि वित्तसंग । अनर्थ लाग धरूं नको ॥१९॥

**भाष्यम्**–( यत् किंच जगत्यां जगत् इति ) जें कीं हें पांचभौतिक । स्थूलसूक्ष्मत्वें अनेक । एकींचि भासे सम्यक । कार्यरूप ॥२०॥ जें कीं सांख्याचिया प्रकृति । महदादि प्रकृति विकृति । आणि सोळा त्या केवळ विकृती । ब्रह्मांडस्थिति जयांची ॥२१॥ कां वेदांताच्या मायेआंत । आकाशादि पांच भूत । स्वगुणें नांदती समस्त । सविकारयुक्त स्थूलसूक्ष्में ॥२२॥ शब्दगुणें असे आकाश । स्पर्शगुणें वायू विशेष । रूपगुणें अग्निप्रकाश । जल नांदे रसगुणयोगें ॥२३॥ गंधगुणें असे मही । हें अपंचीकृत सर्वही । प्रकृतीनें त्रिगुणाहीं । करुनी विभागिले ॥२४॥ पांचांचिया सत्वगुणें । पंच ज्ञानेन्द्रिये होणें । समष्टि सत्वांशें अंतःकरणें । चारी झाली ॥२५॥ तैसेंची रजोगुणें एक एकांच्या । ठायीं जाहल्या कर्मेन्द्रियांच्या । समष्टिरजांशें प्राणाच्या । वृत्ति झाल्या ॥२६॥ तो एकचि स्थानभेदें । प्राणापानादि नाम लाधें । कैसे ते प्रसिद्धें । ऐके आतां ॥२७॥ हृदयीं वसे तो प्राण । गुदीं वसे तो अपान । कंठीं नाभीं उदान समान । सर्वांगीं व्यान व्यापकू ॥२८॥ निश्चय तो बुद्धि जाण । संशय ते होय मन । चित्त तेचि चिंतन । जिवा रूढपण अहंकारू ॥२९॥ हे वेदांताची संमती । आणि पूर्वील सांख्य प्रकृति । यांची समन्वयरीती । त्रिगुण प्राप्ति म्हणोनिया ॥३०॥ सत्व म्हणजे ज्ञेय

संस्कार ग्रहण । रज म्हणजे चांचल्यपण । तम जडमूढ अज्ञान । हेंचि त्रिगुण मायेचे ॥ ३१ ॥ यासचि सांख्य म्हणे प्रकृति । इतर जग ते हिच्या विकृति । म्हणोनि ही अविकृती । जगदपेक्षेनें ॥ ३२ ॥ तें ज्ञान आणि अज्ञान । दोनी मिळोनी विपरीत ज्ञान । चांचल्ययोगें जाण । वासना हें ॥ ३३ ॥ या वासनेची शांतस्थिती । त्यावरी आरूढ जीववृत्ती । तें मूल तूल प्राज्ञरीति । मुनि बोलती श्रुतिवेत्ते ॥ ३४ ॥ समष्टी तें मूल प्राज्ञ । मूलाज्ञानें अज्ञ । व्यष्टि ते तूलप्राज्ञ । तैसेचि जाणा ॥ ३५ ॥ याचि वासनेचे उत्थान । तैं हिरण्यगर्भ तैजस जाण ॥ मागील एकोन विंशति कला मिळोन । लिंगकारण दोघांसी ॥ ३६ ॥ येथें आरोपेंचि आली । ईश्वरानियंतृता भली । तिने प्रेरितही झाली । तमांशे पंचीकृत भूतें ॥ ३७ ॥ त्या भूतांपासोन । चतुर्दश भुवन । तेथ जगाचें अधिष्ठान । विचित्र झाले ॥ ३८ ॥ पंचीकृत भूतांचेनि मेळें । जाहली शरीरें स्थूलें । नानायोनी टवाळें । व्यष्टिरूपें ॥ ३९ ॥ आणि समष्टी ते विराट् । ऐसें जे झाले एकवट । त्यावरी चैतन्य आरूढ स्पष्ट । विश्व नांव पै त्याचें ॥ ४० ॥ शांत वासना कारण । तेथ आरूढ प्राज्ञ जाण । चंचल वासना लिंग देह पूर्ण । तेथ आरूढ तैजस ॥ ४१ ॥ हा समष्टीनें हिरण्यगर्भ । स्थूळीं आरूढ विश्व स्वयंभ । तो समष्टीनें सुप्रभ । वैश्वानर ॥ ४२ ॥ ऐसे विचित्र जग । तया आधार सवेग । चतुर्दश चांग । भुवनें विश्वीं ॥ ४३ ॥ ऐसें अनंत विश्व भलें । जे जीवा भोग्य झाले । निज कर्में आकारिलें । फलात्मक ॥ ४४ ॥ अनादि आरूढ वासनेवरी । तेव्हांचि कर्म जीवाचे शिरीं । मीपण मानोनि तयापरी । जीवही करी स्वतंत्र कर्में ॥ ४५ ॥ तिये सदसत्कर्में करितां । भोगकालीं परतंत्रता । पावूनिही मागुता । कर्मेचि करी ॥ ४६ ॥ ते व्यष्टीं वासना वाढे । मग न्यूनाधिक फळ जोडे । अथवा समष्टी होऊनि गाढे । भोग भोगी ॥ ४७ ॥ पुनः होय उत्थान । तैं व्यष्टी प्राप्त जाण । पुढती करी कर्मोपासन । तैं समष्टी

जोडे ॥ ४८ ॥ असो त्याहीमाजीं अनेक । स्वर्गादि फळें न्यूनाधिक । ते कर्मे करोनि निष्टंक । जीवूचि भोगी ॥ ४९ ॥ हें प्रमाणें घेईजे । मग मिथ्या म्हणोनी त्यागिजे । नित्य एक भोगिजे । सगुण श्रीहरी ॥ ५० ॥ ('इदं सर्वं') इन्द्रिययोगें ज्ञान । तें ज्ञेय प्रत्यक्ष जाण । आणि सुख दुःख आहेत म्हणुनी अनुमान । कर्माचें होय ॥ ५१ ॥ सृष्टीसी पाहिजे कर्ता । या व्याप्तियोगें ईशसत्ता । अनुमानप्रमाण हाता । स्वयें चढें ॥ ५२ ॥ परोक्ष स्वर्गादिकें फळें । आप्तवाक्याचेनि मेळें । देखताति डोळे । कर्मभोगी ॥ ५३ ॥ आणि सदृश वस्तूपमान । अर्थापत्ती संभावन । विचित्र व्हाया पृथक्ज्ञान । अनुपलब्धी एकी एका ॥ ५४ ॥ एवं हें षट्प्रमाणवादे । आणिक सर्व शब्दें । देशकाल वस्तु बोधें । निमित्त क्रिया फलाश्रय ॥ ५५ ॥ मनानें अचिंत्य म्हणोन । साक्षीनियामक हरि प्रेरण । नामरूपें संपूर्ण । मायागुण विस्तारिलें ॥ ५६ ॥ परि हे मृगजळ माया । डोळा दिसे मृगमानवाचिया । मृग पाणी म्हणोनि धांवया । मनुष्य न धांवे ॥ ५७ ॥ तैसे बद्धजीव मायावर्ती । मुक्तजीव मिथ्या म्हणती । परी दिसे दोघाही प्रती । व्यवहार न चुके ॥ ५८ ॥ चक्रवाकासी मृगजळ नसे । अवघी उष्णताचि दिसे । तैसे भगवद्भीया नसें । मायाजाळ ॥ ५९ ॥ परी तेजदृष्टीनें पाहतां । डोळियां अंतर्बाह्य एकता । असोनि सूर्याची सूर्यता । सर्वदांची ॥ ६० ॥ ('ईशावास्य') तैसें परमार्थदृष्टीं । चेतनजीव ईश सृष्टी । परी ईश्वरतेची गोष्टी । ईश्वराचि असें ॥ ६१ ॥ या चेतनज्ञातृत्वें पाहतां । ईश्वराचीच व्यापकता । अंतर्यामीस्वरूपता । अनंतगुणें ॥ ६२ ॥ या व्यापकतेमाजीं जग नसें । परी लीला ईक्षणमात्रें भासें । म्हणोनी अवघा असें । श्रीहरीचि ॥ ६३ ॥ 'यस्य भासा सर्वमिदं विभाति'। 'जगद्भासयतेऽखिलमिति' ज्याच्या ज्ञानें जगत्प्रतीती । 'तत्तेजोविद्धि मामकमिति' हरी म्हणें ॥ ६४ ॥ 'आत्मा वा इदमग्रे एक एव'। 'सर्वं खल्विदं ब्रह्मैव'। 'एकमेवाद्वितीयमेव'। 'वासुदेवः सर्वमिति'. ॥ ६५ ॥ एवं ईश्वरेंचि व्याप्त । सच्चिद्

दृष्टया हरी समस्त । तद्भक्तियोगें प्रतीत । आनंदाची ॥६६॥ ही तंव परमार्थदृष्टी । मायामृगजळें व्यवहारगोष्टी । हरिभासूस नसे परी जीव-नेत्रदृष्टी । बद्धमुक्तता आणी स्वयें ॥६७॥ त्याची कराव्या निवृत्ती । विरागयुक्त करावी भक्ती । हें बोलिले निश्चिती । पुढिले पदीं ॥६८॥ हें ईश्वरेंचि व्याप्त । परी ईश्वर नव्हती भूत । 'भूतभृन्नचभूतस्थो' निश्चित । 'ममात्मा भूतभावन' इति ॥६९॥

'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः'॥

गीता—अध्याय—९

पार्था हें जग वहिले । म्या अव्यक्तत्वें आच्छादिलें । व्यक्तरूप तें ठेविले । भक्तहृदयीं ॥७०॥ पाहे पां माझ्या ठायीं समस्तां । वापू असे भूता । परी भूतीं मज भगवंता । वसणें नाहीं ॥७१॥

"मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत्" ॥

श्रुति—श्वेताश्वतरोपनित् अध्याः ४

सांख्यवेदांत प्रतिपादिती । माया तेची प्रकृती । घनःश्याम अस्मत्पती । मायाश्रय ॥७२॥ त्याचे अवयव जे सगुण । त्यांनीं व्यापिले विश्व संपूर्ण । परी विश्व तो जगन्मोहन । नाहीं ना नोहे ॥७३॥ परी जीवा मायागुणें प्रतीती । परम बंधन विषयासक्ती । कांतासुतावित्तगोतीं । बुडाला तेणें ॥७४॥ तेथ वैराग्य उपरती । आणि निरपेक्ष हरिभक्ति । सांगावया श्रुति । पद-प्रसाद दे ॥७५॥ ('तेनत्यक्तेन') हें कांताकनकसुतगोत । अवघेचि दुःख देत । स्वयें वासना वाढवीत । फळ भोगवीत कर्माचें ॥७६॥ सुंदर पाहिजे कांता । तीही असावी पतिव्रता । जरी जारिणी होता । वैरिणी कीं ॥७७॥ असली पतिव्रता आणि सुंदर । तरी मग सहस्रपट

वाढे संसार । भोग भोगतां साचार । पुत्र चिंता उठे ॥७८॥ तेथ गर्भ राहतां । गर्भपतनाची चिंता । जरी गर्भ निस्तरला तत्वतां । तरी मग चिंता बाल्य दुःखांची ॥७९॥ बाल्यही गेले जरी निघोन । मग विद्येची चिंता गहन । विद्या येता चिंता दारुण । राहील कीं जाईल देशांतरा ॥८०॥ जरी मूर्ख तरी नाशे कीर्ति । जरी विद्यावंत राहिला ग्रहाप्रती तरी सुनेची चिंता चित्तीं । सुंदर युवतीसी लग्न व्हावे ॥८१॥ जरी जाहले लग्न । जरी मिळाली उत्तम सून । तरी पुत्राचे मन । पित्याकडे राहेना ॥८२॥ पुत्र नसला आज्ञाधारक । तरी बापा टाकूनी होय व्यतिरेक । जरी असला आज्ञाधारक । तरी त्याच्या सुखदुःखाचीच चिंता ॥८३॥ जरी कर्कशा भेटली सून । तरी सासुऱ्या न मिळे अन्न । तेणें किरकिर आरण । बहुतचि करी ॥८४॥ रावजीची तपीळ वृत्ति । ते गेली पुत्रसुनेहातीं । मग दिवस आणि राती । नयनीं येती अश्रुधारा ॥८५॥ कांताहीं न पाहे धड । लोक तोंडापुरते बोलती गोड । शरीरदुःखही अवघड । व्याधिजराभयचिंता ॥८६॥ इतुका होवोनि सोहळा । म्हणे म्यां नातू पाहावा डोळा । खाया न मिळतां अन्नगोळा । मग देशथाळा अन्न मिळवी ॥८७॥ धन मिळवितां श्रम थोर । तैसे धन रक्षिता अपार । व्यय होता विकल शरीर । प्राण साचार जाऊ पाहे ॥८८॥ एवं पुत्र दारा आणि धन । अवघे दुःखासि कारण । परी अविवेकी जाण । कांहीं न मानी ॥८९॥ दगडा ऐसे धन । त्यासाठीं टाकी जीवप्राण । रुधीरमांसपुतळी जाण । ती कांता मानून आलिंगी ॥९०॥ योनींत टाकलें मूत्र । पुढें त्याचेंच नांव पुत्र । चुंबन घे मानोनि पवित्र । लाज चित्ति नाणितां ॥९१॥ ऐसी अविवेकीयांची रीती । जरी घडता सत्संगती । सच्छास्त्रपुराणश्रवणें चित्ती । विवेक उपजे ॥९२॥ मग हा येवोनि विचार । बुडालो म्हणोनि हाहाःकार । करोनी त्यागी संसार । एकदाची ॥९३॥ जैसे इहलोकींचे भोग ।

तैसेंचि दुःखयुक्त स्वर्ग । येथ न्यूनकाल दुःखओघ । तेथ दुःखयोग बहुकाल ॥ ९४ ॥ म्हणूनी त्यागेंचि तृप्ति । ऐसिया अर्थी श्रुती । बोधी तियेप्रती । प्रमाण देती ॥ ९५ ॥

"न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः" ॥

पुत्रयोगें आणि धनें । तैसें आपुलिया कर्मगुणें । परं पद पावणें । न घडे कीं ॥ ९६ ॥ म्हणोनि त्याचा त्याग करणें । हेंचि उत्तम घेईजे मनें । यापरी विवेकें पाहणें । दुःखचि सकळ ॥ ९७ ॥ मग तयाचा करोनि त्याग । अनुतापें तापलें अंग । मनीं इच्छी सखा श्रीरंग । भेटेल केव्हां ॥ ९८ ॥ ('भुंजीथाः') ऐसी श्रीहरीची प्रीती । तेणें एकात्मता चित्तीं । मग समता सर्वभूतीं । संन्यासस्थिति या नांव ॥ ९९ ॥ 'अभयं सर्वभूतेभ्यो मत्तःस्वाहा'। ही श्रुती म्हणें मुख्य संन्यासधर्म हा । जेथ अधम मध्यम महान् । एकतात्रय ॥ १०० ॥ ऐसा अंतर्यामि व्यापक पूर्ण । हृदयीं साकार घनःशामवर्ण । या भक्तियोगें चरण । नित्य जोडती श्रीहरीचे ॥१०१॥ ज्ञानकर्म त्रिगुणात्मक । भक्ति त्रिगुणातीत निष्कळंक । गीतेमाजीं जगन्नायक । हेंचि वदले ॥१०२॥

'तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशकमनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ' ॥६॥
'रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।
तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥७॥
'तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत' ॥८॥

तेथ निर्मल गा सत्वगुण । प्रकाशयोगें निरामय ज्ञान ॥ तेणें मी मुक्त हें बंधन । सुखोर्मीचें ॥१०३॥ रज वाढवी विषयप्रीति । तृष्णासंगे फळासक्ती । कर्मयोगें जीवाप्रति । बांधिले तेणें ॥१०४॥ ते कर्म कामनेनें

निषिद्ध । होता आवरण प्रबद्ध । अज्ञानजन्यतमप्रवृद्ध । तें बांधी प्रमाद निद्रा आळसें ॥१०५॥ ऐसें ज्ञान कर्म त्रिगुणात्मक । उपक्रम करोनि सम्यक । पार्थों मद्भक्ति निष्कलंक । गुणातीत हरि वदती ॥१०६॥

'मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥'

म्हणोनी पार्थो माझी भक्ती । अव्यभिचारिणी जे करिती । ते तारोनी त्रिगुणाप्रती । मी ब्रह्म त्या मज होती प्राप्त ॥१०७॥ मज जाणोनि सेवा करितां । जाये तम अज्ञान आलस्यता । सकळ इंद्रियें मज अर्पितां । भोगेच्छा रज हारपे ॥१०८॥ माझ्या प्रेमानंदीं निमग्न । होता नुरे ज्ञानाभिमान । ऐसा गेला सत्वगुण । कार्यसहित ॥१०९॥ गुण जाता प्रकृति गेली । मग पुरुषताचि राहिली । सच्चिद्दृष्टी पूर्ण झाली । तोचि वहिली ब्रह्मप्राप्ती ॥११०॥ मग जो मी सगुण । भक्तियोगें आविर्भवन । होवोनि आनंदप्रदान । भक्तां करी ॥१११॥ ऐसा सच्चिदानंद । ब्रह्मत्व पावला शुद्ध । मद्गुणें आकर्षित सिद्ध । स्थिर व्हावा आनंद म्हणोनी भजे ॥११२॥ एवं ज्ञानिया विष्णुभक्ति । स्वयें सांगे श्रीपती । आतां मुमुक्षु जे होती । त्या हरिभक्ति श्रुति सांगे ॥ ११३ ॥

'यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ॥
तꣳ ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥'

ज्यानें ब्रह्मा करोनि उत्पन्न । तयां केले वेदप्रदान । तो आत्मबुद्धिप्रकाशक श्रीकृष्ण । मी मुमुक्षु चरण वंदी त्याचे ॥ ११४ ॥ आत्मा म्हणजे जीव । बुद्धि निश्चय शुद्ध भाव । या साक्षित्वें स्फूर्तिदाता जो देव । तो रक्षक माधव मत्कांत ॥ ११५ ॥ एवं श्रीहरिभक्ती करितां । जे

कारण कार्य जगद्भूतता । तेथ स्फुरे एकात्मता । संन्यास तत्वतां या नांव ॥ ११६ ॥ ऐसा परमहंस तो एक । संसारीं असोनी परिव्राजक । हें काय बोलणें जगन्नायक । संसारचि जाहला त्याचा ॥ ११७ ॥ ऐसिया निरपेक्ष भक्तां । उपरमलिया चित्ता । आपण करोनी समस्तां । तेचि सांगे ॥११८॥ ('कस्य स्विद्धनं मा गृधः') तरी कांतासुतगोतवित्त । जया माजीं पूर्ण अनर्थ । ते माझे नव्हे म्हणोनि हरिभक्त । स्वमना इच्छूं नको म्हणे ॥ ११९ ॥ अवघाचि व्यापिला जगज्जीवन । मग कोणाचें स्त्रीसुतधन । ऐसा स्थितप्रज्ञ तयाचें मन । न जाय विषयीं ॥ १२० ॥ आणि अभिलाषा कांहीं । जया उरलीच नाहीं । नित्य श्रीहरिपायीं । वाहिला जो ॥ १२१ ॥

**भागवतश्लोक संमतिः—**

> **न नाकपृष्ठं न च सार्वभौमं न पारमेष्ठ्यं न रसाधिपत्यम् ।**
> **न योगसिद्धिरपुनर्भवं वा वांच्छन्ति यत्पादरजःप्रपन्ना ॥ प्र**

जया हरीचे पायीं मस्तक । ठेविती ते नेच्छिती मोक्षसुख । मा योगसिद्धि स्वर्ग वरुणलोक । ब्रह्मलोक राज्य केविं घेती ॥१२२॥ 'न कंचन कामं कामयते' । ऐसी श्रुतिही साक्ष देते । एवं भक्तियोगें परमार्थे । हरिरूप जो ॥ १२३ ॥ तो हा मंत्रार्थ भला । श्री ज्ञानेश्वर-चरणीं अर्पिला । ओव्या गुंफोनि समर्पिला । जीवही पायीं ॥ १२४ ॥ या समासीं निरूपण । हरिभक्ति वैराग्य ज्ञान । प्रकाशोनि अवतरण । गुरुकृपेचे ॥ १२५ ॥ श्रीगुरु ज्ञानेश्वर माउली । जे पूर्ण कृपेची साउली । प्रेमें वंदोनि पाउलीं । टीका समर्पिली तच्चरणीं ॥ १२५ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वराचार्यकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे ईशावास्योपनिषद्भाष्ये प्रथममंत्रार्थीकायां श्रुतिसिद्धहरिभक्तिविषयविरक्ति-महात्म्यज्ञाननिरूपणं नाम प्रथमः समासः—

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥

## द्वितीय समास

जय जय वो माय । वंदितसो पाय । पान्हावली होय । निज भक्तां तूं ॥ १ ॥ माये तुझिया कृपागुणें । पूर्वसमास निरूपणें । वैराग्यज्ञान-पूर्वक करणें । श्रीहरिभक्ती ॥ २ ॥ तोचि अभिप्राय धरोनी पोटीं । सखे आतां निरूपणा उठी । आम्हा आपुलिया करी गोमटी । ज्ञानेश्वर माउलीये ॥ ३ ॥ पूर्वील अभिप्राय ऐकोनी । श्रोते अधीर झाले मनीं । म्हणें आम्ही या निरूपणीं । टिकावे कैसे ॥ ४ ॥ पुत्र दारा धन त्यागणें । यास देहीं मीपण पाहिजे उणें । आम्ही तो देहबुद्धिपणें । बांधलो दृढ ॥ ५ ॥ आम्हीं स्त्री न देखतां शयनीं । तरी मग स्वप्नीं आठवूनी । प्रवृत्त होतो मैथुनीं । वस्त्र भिजे रेतपतनें ॥ ६ ॥ हें म्हणती मुताचा सुत । तरी आमुचेही अंग होय मुत । मुका घ्यावया निश्चित । लाज कां वाटावी आम्हां ॥ ७ ॥ आम्हीच मेळविलें धन । तें म्हणती द्यावे टाकून । तरी यांच्या ऐसे कोरान्न । मागत कोठें फिरावे ॥ ८ ॥ होईल तेव्हां होवो प्राप्ती । परी कां सांडावी सद्यःस्थिती । न ऐकावी यांची उक्ती । सदनाप्रती चलावे ॥ ९ ॥ जीविण धीर नसे स्वप्नीं । ती स्त्री म्हणती द्या टाकोनी । तरी मस्तकीं काम चढोनी । जाऊं मरोनी क्षणांत ॥ १० ॥ तरी हातीं घेवोनी मरण । कां ऐकावे निरूपण । ऐशा विचारें अंतःकरण । श्रोतियांचे पोळले ॥११॥ तें पाहूनि वक्ता । कनवाळूपणें समस्तां । आश्वासूनि परमार्था । सरते करी ॥१२॥ कीं तान्हियां बाळका जननी । औषध पाजी गूळ दाउनी । तैसें कर्मयोगें हरिभजनीं । वक्ता श्रोतिया लावित ॥१३॥ मग म्हणें तुम्ही ऐका । धैर्य कांहीं सोडूं नका । जे करिता तेणेंचि सखा । भेटेल श्रीहरी ॥१४॥ सोपा सांगतो उपाय । जेणें जोडती हरिपाय । तरी व्यवहारेंचि होय । कार्यसिद्धि ॥१५॥ जे

ब्राह्मणभागें कथिलें। स्मृतिमध्यें विस्तारिले । कार्यापुरते पुराणीं घेतले । जे विभागा आले वर्णाश्रमा ॥१६॥ ऐसें ते कर्म । तेथ कृष्णार्पणता वर्म । हें जाणोनि मर्म । करिती ते मुक्त ॥१७॥ म्हणोनि ब्राह्मणादि वर्णी । ब्रह्मचर्यादि आश्रम गुणीं । जोंवरी सर्व भूत न होती चक्रपाणी । तोंवरीचि कर्म कीजे ॥१८॥ मग त्या योगेंचि होय ज्ञान । कळे सर्व भूत नारायण । मग कर्में जाती सुटोन । गुरूपदेशें ॥१९॥

३ ४ १ २ ७ ५ ६
**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतँ समाः ॥**
८ ९ १३ १२ १४ १६ १५ १७ ७
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥२॥**

## पदार्थ

तरी येथें कर्मेंचि करावी । शतायू जीविका धरावी । तेणें नरा न व्हावी । कर्मलिप्यता ॥२०॥ यांहूनि दुसरा कांहीं । उपाय सुलभ नाही । हें ऐकूनि श्रोतियांही । आनंद झाला ॥२१॥ **(भाष्यम्)** मग कर जोडूनि अवघे । म्हणती स्वामी न रहा उगे । आता आमुच्या हिताजोगे । सांगा तेचि ॥२२॥ आम्ही अत्यंत मूढ । संसारचि केला दृढ । तुम्हा सांडुनी घर खोपड । पहावया जात होतो ॥२३॥ परी तुम्हीं कृपावंत । ओढूनि आमचे चित्त । व्हावया ईश्वर प्राप्त । उपाय सोपा सांगू म्हणता ॥२४॥ तरी आम्ही सेवा न करितां कांहीं । आणि दुर्मती अंतरी असतांही । पूर्वापर शुद्धी नाही । कैसी ये ठायीं झाली कृपा ॥२५॥ असो ते तुमचे तुम्ही जाणा । आतां करावे निरूपणा । देवोनिया प्रसाददाना । काय वाङ्मना निववावें ॥२६॥ तुम्हीं जें सांगाल कांही। आमुची श्रद्धा असे त्या ठायीं। परी विचारकटकटीच्या पायीं । बांधू नका ॥२७॥ ऐसे श्रोतृवाक्य ऐकोनी । वक्ता विचारी आपुलें मनीं ॥ म्हणे या श्रद्धावंता लागोनी । कर्म सांगोनी मुक्त करावे ॥२८॥ मग म्हणे तुम्ही समस्त । जाहलाती श्रद्धावंत । तरी कर्मचि येथ । आचरावे ॥२९॥ परी तें नसावे सकाम ।

कामनायोगें दुःख परम । ययालागीं संभ्रम । प्रतिपादी श्रुती ॥ ३० ॥ ('इह कर्माणि कुर्वन्निति') येथ कर्में करावी । बळकट श्रद्धा धरावी । परी न आदरावी । कामना कांहीं ॥ ३१ ॥ तीं कर्में कोण किती । हे कळावया उपपत्ति । स्वयें आशंका प्रतिपादिती । पूर्वपक्षत्वें ॥ ३२ ॥ अहो तुम्ही सांगता कर्म । आणि पूर्व समासीं ज्ञान परम । तरी समुच्चय संभ्रम । वाटे आम्हां ॥ ३३ ॥ म्हणोनी ज्ञान आणि कर्म दोन्ही । पाहिजेत मोक्षा लागुनी । मग सुलभ उपाय या क्षणीं । होईल कैसा ॥३४॥ हा ऐकोनि आक्षेप । वक्ता करी प्रणयकोप ॥ म्हणे हा व्यर्थ जल्प । न चले कीं ॥ ३५ ॥ पाक करोनी अन्नसिद्धि । तेथही तृप्तीचीच अवधी । बाळक संतोषे दुग्धीं । तृप्तीगुणें ॥ ३६ ॥ एवं दुग्ध आणि पाक निष्पत्ती । या दोहींची अवधी तृप्ती । परी बाळासी प्रयत्नाविण प्राप्ती । दुग्धाचीच असे ॥ ३७ ॥ तैसें कर्म आणि ज्ञान । दोहींचें प्राप्य हरिभजन । म्हणोनी समुच्चय जाण । नसे कांही ॥ ३८ ॥ ज्ञानांत हरीस अर्पणे मी-पण । निष्काम कर्मीं तेंचि खूण । कर्में करावी कृष्णार्पण । आपुल्या सहित ॥ ३९ ॥ एवं दोहींचा एकचि ठावो । मग कां धरावा विरोध भावो । आणि दोन्ही पाहिजेत हा लाहो । कासया व्हावा ॥ ४० ॥ कोण्याहि एका मार्गीं निघावें । येऊनि हरिभक्तींत मिळावें । मग दोन्हीही टाकूनि द्यावें । कर्म ज्ञान ॥ ४१ ॥ अथवा लोकसंग्रहार्थ । देहा पुरतें केलें निश्चित । तरी ते समस्त । कृष्णार्पण ॥ ४२ ॥ एवं कर्म ज्ञान भक्तींचा कांहीं । समुच्चय सर्वथा नाही । म्हणोनी या समासीं सोप्या उपायीं । श्रद्धावंतें रिघावें ॥ ४३ ॥ ऐसा खंडोनी समुच्चय वाद । मग श्रोतिया करिती शिक्षाबद्ध । म्हणती व्हावया चित्त शुद्ध । कर्मेंचि करा ॥ ४४ ॥ नित्य नैमित्तिक काम्य निष्काम ॥ प्रायश्चित्त निषिद्ध परम । एकचि हें असोनी कर्म । षड्विध झाले ॥ ४५ ॥ 'अहरहः संध्या-मुपासीत' । हे श्रुति सांगे ते नित्य होत । आणि पितृ देव श्राद्धादि

समस्त । नैमित्तिक ॥ ४६ ॥ 'स्वर्गकामो यजेदिति' । ज्योतिष्टोमादिकांची प्राप्ती । ते काम्य गा श्रुति । ऐसी म्हणे ॥ ४७ ॥ 'कर्म च मे यज्ञेन कल्पन्तामिति' । हें निष्काम कर्म म्हणें श्रुति । 'तपस्तप्त्वा प्राकृतान्जहीति' । प्रायश्चित्त सांगे ॥ ४८ ॥ 'धर्मान्न प्रमदितव्यं' ऐसे । श्रुति निषिद्ध सांगतसे । हें एकचि परी विशेषे । षट्प्रकारे ॥ ४९ ॥ त्यांत निषिद्ध कर्म सर्वथा त्यागणें । विषयप्राप्त्यर्थ काम्य करणें । अवचट निषिद्ध घडलिया येणे । प्रायश्चित्त ॥ ५० ॥ मृत पितृ आणि जिवंत पुत्राप्रती । दोघाही व्हावया शुभ प्राप्ती । दर्शश्राद्धादि कृती । नैमित्तिक करणें ॥ ५१ ॥ देहीं वसती काम क्रोध । तेणें नित्य घडती अपराध । तोडावया ते बंध । स्नानसंध्यादि नित्यें करावी ॥५२॥ ऐसें हें पंचविध । जरी किंचित् कामना असेल अशुद्ध । तरी फळ देऊनि प्रबुद्ध । पतन करी कर्म हे ॥५३॥ ('एवं शतं समा: जिजीविषेत्' इति) म्हणोनी जे घडे कांहीं । तें अर्पावें हरिपायीं। आणि स्वर्गादिकीं कांहीं। कामना नको ॥५४॥ जैसे पक्षी विशेष होती । तया चालता मिळेल ते खाती । परी परिग्रहे न ठेविती । सांठवूनी ॥५५॥ किंवा चोर जे आणिती । ते तेव्हांचि गुप्त करिती । मनीं धरोनी बंधनभीती । बाहेर नाणिती दाखवाया ॥५६॥ तैसे येथ जे करावे। ते हरीस अर्पोनी सारावे। ऐसे अर्पितची राहावे। शतायूपणें ॥५७॥ पुत्राकडोनि हेचि करवावे। स्त्रियेसी साहाय्य करोनि घडवावे। तैसे शरीर वित्तहि उडवावे। हरीच्याच पायीं ॥५८॥ ऐसे अर्पितां श्रीहरिपायीं। मग सकळ निष्काम होती पाही । अवचट व्यवहारी घडल्याहि । निषिद्ध न लिंपे ॥५९॥ ('एवं त्वयि नरे इतः अन्यथा न अस्तीति') याप्रमाणें कर्म करितां । मी-पणा हरपे हरीस अर्पितां । मग तूं देव ही चित्ता । स्फूर्ती होय ॥६०॥ याहून तुज या मनुष्य देहीं । दुसरा सुलभ उपाय नाहीं । जेणें कर्म करोनिही । लिप्त न होसी ॥६१॥ तरी हा एकाचि उपाय । कर्मा आदी अंती पाय । श्रीहरींचें चिंतिता होय । अपायनाश ॥६२॥ म्हणोनि जे जे

करिसी । तें तें अर्पें श्रीहरीसी । मग सदसत् कांहीं असो तुजसी । न लागें ते ॥६३॥ गीतेमाजीं चक्रपाणी । पार्थस्नेहें गद्गदवाणी । आपुलें सामर्थ्य प्रगटवोनी । हेंचि वदले ॥६४॥

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ १ ॥**

अर्जुना नैमित्तिकें । तीर्थप्रासादादि अनेकें । याग ज्योतिष्टोमादिकें । सुवर्णादिदानें ॥६५॥ कृछ्रचांद्रायणादि व्रतें । पूजापाठ जपायुतें । क्षेत्रस्नानादि प्रायश्चित्तें । स्ववर्णाश्रमयुक्ते शुभाशुभें ॥६६॥ एवं करिसी जें कांहीं । ते समर्पी माझ्याठायीं । मग सहजाचि त्यागें येई । मजप्रती ॥६७॥

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥१॥**

ऐसे जे मज अर्पिले धर्म । त्या पासोनी उपरम । पावोनी एक परम । मीचि ध्यावा ॥ ६८ ॥ मग धर्मत्यागाची भीती । किंचित्‌ही न धरावी चित्तीं । सर्व पापापासोनि तुजप्रति । सोडवीन मी ॥ ६९ ॥ म्हणोनी न करी शोक । हा मत्प्रिय कांतोक्त श्लोक । ऐकोनी श्रुति सम्यक । अनुचारिणी झाली ॥७०॥ ('कर्म न लिप्यते') ऐसे वर्णाश्रमोक्त सारें । कर्म अर्पोनी हरिपदीं बारे । मग आपला आपण संसारे विमुक्त । झाला ॥७१॥ तो भोग न भोगतां गृहस्थ । त्याग न करितां संन्यस्त । होवोनी हरिपदीं संस्थ । पावला सकळ ॥७२॥ म्हणोनि ऐसियाच्या ठायी । कर्मकर्तृत्ववार्ताचि नाही । आणि हरिआज्ञेनें लोकार्थ केलेही । लिप्त न होती ॥७३॥ कांताधीन झालिया वनिता । मग पतिआज्ञाचि मान्य तत्वता । तदाज्ञेनें करितां । पतिव्रतापण न भंगे ॥७४॥ तैसा तो झाला कृष्णाधीन । किंबहुना प्रेम तोचि कृष्ण । मग कृष्णाज्ञेनें लौकिकाचरण । भक्तपण न मोडी ॥७५॥

एवं श्रीकृष्णाचि पति । तत्वर्दीच परम भक्ती । संसारी असूनी यती । आचार्य तो ॥७६॥ ऐसिया आचार्यपणाची दात्री । ज्ञानेश्वर आई जगद्धात्री । ओवियां गुंफोनी पदपात्रीं । वाहिल्या सकळ ॥७७॥ जीव सेवार्थे वाहुनी। सर्वदा प्रेमपान्हा पिऊनी । पुढील श्रोत्रावधानीं । निरूपणीं सावध ॥७८॥ सखे ज्ञानेश्वर माउली। करोनी कृपेचीं साउली। मम हृत्कर्णिकेंत पाउली । अचळ ठेवी जननीये ॥७९॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वराचार्य कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे यजुःसहितांतर्गत ईशावास्योपनिषद्भाष्ये समुच्चयवादखंडनपूर्वक कर्मार्पणरूपा हरिभक्तिकथनं नाम द्वितीयमंत्रटीकायां

द्वितीयःसमासः

**अपूर्ण**

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ज्ञानेश्वरी निरूपण

दोहा

**अलकावतिपतिपादुका चिंतुनि अमृतविहार ॥**
**गळा घालु लीलया सुखें मुक्तिमौक्तिकहार ॥**

ओवी

**'तयापासी पांडवा । मी हारपला गिंवसावा ।**
**जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥'**

(ज्ञानेश्वरी अध्याय ९ ओवी २०८)

समस्त श्रोते सावधान । पूर्व कथा–अनुसंधान । मायामय नारायण । भक्ताकारण सशरीरी ॥ १ ॥ श्रुति युक्ति आणि अनुभवें । शरीर घेतलें देवाधिदेवें । तें निरुपिलें आघवें । श्रोतृसमूहा कळे तेवीं ॥ २ ॥ आतां पूर्वपक्ष तो ऐसा । जो मायामय देह जगन्निवासा । परी नामस्मरणाचा ठसा । करणें लागे ॥ ३ ॥ तें नाम आकाशगत शब्द । किंवा नोहे प्रसिद्ध । हा पूर्वपक्ष विशद । निरसिला पाहिजे ॥ ४ ॥ मायामय हरीचें शरीर । आणि पंचभूत नाम घेणार । म्हणोनी नामही साचार । पांच भौतिक ॥ ५ ॥ ऐसे न म्हणावें कहीं । जो आपण बोलतो तिये ठायीं । तोन्हि शब्द लवलाहि । उलटोनि ये श्रवणीं ॥ ६ ॥ परि तो शब्द न

म्हणावा मुखगत । तैसे भगवंताचे नाम निश्चित । स्वयें सांगे भगवंत । आपल्या मुखें ।। ७ ।। म्हणोनि भगवंताचें शरीर । हें मायामय साचार । आणि अनभ्यस्त विवर्त प्रकार । तेथ आहे ।।८।। यालागीं भगवत् शरीर जैसे । भगवत् स्मरण ही जाण तैसे । किंबहुना विशेषे । दृष्टि पडे ।। ९ ।। म्हणोनि नामस्मरण । जे करिती रात्रंदिन । तेथें वसे नारायण । मिथ्या भाषण हे नव्हे ।। १० ।। परी मुखीं नाम अंतरीं काम । ऐसेनि न भेटे श्रीराम । आंत बाहेरीं आत्माराम । तरीच नाम स्मरलें कीं ।। ११ ।। आतां गुह्य जें कांहीं । तें भक्तीचें लवलाही । सांगावया ठायीं । अनुपायीं यावें ।।१२।। तरी आपुले जे का अंतःकरण । तें काढुनी सत्वांतून । स्थूलामाजी आणिता जाण । योग्य नोहे ।। १३ ।। जो प्रेम अंतरीं राहे । तेवढा व्यक्त करितां नये । हें बोळणेंचि लवलाहे । अन्यथा केवीं ।। १४ ।। मित्रमित्रांचा प्रेम । अंतःकरणीं संभ्रम । तेवढा व्यक्त करावया परम । शब्दचि नाहीं ।। १५ ।। कीं कामुकांचा काम । अंतरीं जेवढा असे संभ्रम । तेवढा बाहेरीं आगम । करताचि नये ।। १६ ।। कामुकांच्या अंतरीं । जेवढी राहे कामाची परी । तेवढी प्रकटवितां बाहेरी । तरी कोणी नारी पुरेना ।। १७ ।। तेवीं मित्रांचा जेवढा प्रेम । तो बाहेरी प्रकटवितां परम । तरी जगचि हें संभ्रम । जगपणा मोडे ।। १८ ।। एवं कोणतीही मनोवृत्ति । व्यक्त करतां नये निश्चितीं । ऐसी जंव जीवांची स्थिती । तंव हरिभाक्ति व्यक्तीं ये कैसी ।। १९ ।। येथ आशंका करिती कोणी । श्रीपरीक्षितीस सांगे शुक मुनी । ते संपूर्ण भक्ति व्यक्त करुनी । सांगितली किंवा नाहीं ।। २० ।। तरी ऐसें सर्वथा न म्हणावे । जैसे कोणी अन्न न भक्षितां स्वभावें । तें अन्नचि पुष्टि देत आघवें । ऐसें नाहीं ।। २१ ।। पूर्वींची असे पुष्टी । अन्नानें तेंचि वाढे शेवटी । परी ज्यास सर्वथा नाहीं पुष्टी । त्यांस पुष्टि अन्नें नये ।। २२ ।। तैसी परिक्षितीच्या अंतःकरणीं । जी भक्ति होती निर्वाणीं । तीचि शुकाचिया

वाणीं । प्रकट झाली ॥ २३ ॥ नातरी युवतींचे मधुर शब्द । पतित्वचि व्यक्त करिती सुबद्ध । तेवीं अंतःकरणीं असे तेचि विशद । व्यक्त होय ॥ २४ ॥ रसशास्त्राचें ऐसें मत । कीं वासना द्विविध निश्चित । इदानींतनी आणि प्राक्तनी विख्यात । रस उत्पन्न व्हावया ॥ २५ ॥ इदानींतनी वासना ज्यासी । रस उत्पन्न न होय त्यासी । परंतु काव्य आयकावयासी । आवडी जडे ॥ २६ ॥ जयासी प्राक्तनी वासना । तयासी तयाचा स्थायीभाव सिद्ध जाणा । विभावानुभाव व्यभिचारी गुणां । मिळतां प्रमाणा रस वाढे ॥२७॥ तो रस येवढा होय उत्पन्न । जे अष्ट भाव सात्विक संपन्न । तयाचे अंगी संपूर्ण । ठाकती येऊनी ॥२८॥ म्हणोनि जे जे असे अंतःकरणीं । तें तेंचि निघे याकारणीं । अधिकारी शिष्य असतां सद्गुणी । ब्रह्म होय ॥२९॥ नातरी नसतां अधिकारी । तरी क्षणोक्षणीं भरे विकारी । म्हणोनि अंतःकरणीं तेचि निर्धारी । निरूपणीं ठसे ॥३०॥ एवं अंतःकरणीं जेवढें कांहीं । तें शब्दें व्यक्तचि होत नाहीं । आतां अंतःकरणांतूनि लवलाही । जे व्यक्त होते ॥३१॥ तें अंतःकरणापरीस नीच भाग । अंतःकरणीं व्यक्त होय तो उच्च भाग । म्हणोनि भक्त ते प्रेमांग । प्रेमाचि इच्छिती ॥३२॥ दिसावा न दिसावा जगत्पति । हे तयाचे नाहीं जीवीं खंती । प्रेमभरें चित्तीं । भगवंताचि होती सप्रेमें ॥३३॥ परि देव आणि गुरु । येथ भक्तीचा हा प्रकारु । जो ऐकावा निर्धारु । निकापणें ॥३४॥ जागृतींत भगवंताचा वियोग । तेणें शोक असावा चांग । आणि स्वप्नामाजीं संयोग । ध्यानें होवावा ॥३५॥ संयोगें रात्रीं भगवत्सुख । अनुभवावे उत्तम देख । आणि जागृतीमाजीं निश्शंक । वियोगें सुख अनुभवावे ॥ ३६ ॥ हे देव भक्तीची परी । आतां गुरुभक्तीची थोरी । ते निकी कवणे परी । ऐकावी साच ॥ ३७ ॥ जागृतीमाजीं वेदांतज्ञान । जवळी असावे श्रीगुरुचरण । आणि स्वप्नीं वियोग संपूर्ण । प्रेमगुणें पाहावा ॥ ३८ ॥ स्वप्नीं गुरुवियोगाचे सुख । आणि भगवंत् संयोग

देख । तेणें संयोगीं वियोग सम्यक् । प्रेम वाढे ॥ ३९ ॥ आणि जागृतींत भगवद्वियोग । श्रीगुरुचरणांचा संयोग । तेणें दोन्ही पक्षीं लाग । आनंदाचा ॥ ४० ॥ भगवद्वियोगें कोमळ मन । आणि जवळीं असती गुरुचरण । यालागीं कोमळ मनेंकरून । श्रीगुरुचरण पूजों येती ॥४१॥ आतां स्वप्नीं भगवत्संयोग वाढे । तेणें गुरुपदीं विश्वास अधिक जडे । आणि गुरुवियोगें वाढे । गुरुभेटीची अभिलाषा ॥४२॥ एवं जागृत्स्वप्नीं श्रीगुरुदेव । दोन्ही स्थळीं समान भाव । जाहला पैं स्वभाव । भक्तिसुखाचा ॥४३॥ आतां राहिली जे सुषुप्ती । ते तंव जड अवस्था निश्चिती । अहं ब्रह्मास्मि होता स्थिती । सुषुप्ति कें घडे ? ॥४४॥ दिव्यापासोनि दिवा लाविला । आणि तो दिवा अंधारीं नेला । तरी अंधार तयाला । दिसेल कैंचा ॥४५॥ तेवीं जागृती जे सज्ञान । तेथचि शिकलों ब्रह्मज्ञान । आणि मग सुषुप्तींत नेतां ते ज्ञान । तरी सुषुप्तिगत अज्ञान केवीं राहे ? ॥४६॥ म्हणोनि गुरुसंयोगें जागृतीं । वेदांतश्रवणाची ख्याति । आणि स्वप्नीं संयोगीं श्रीपती । रास निश्चिती आवडे ॥४७॥ जैसी कन्या सासुरीं जाय । तेथ माहेराची वाट पाहे । आणि ऋतुस्नात जालिया माहेरीं जाय । तंव आठवण होय पतीची ॥४८॥ तेवीं जागृतींत सद्गुरुचरण । आणि वियोगें आठवे श्रीकृष्ण । माहेर सासर दोन्ही जाण । विस्मरती ना ॥४९॥ स्वप्नीं श्रीकृष्णीं भेटी । तेथ श्रीगुरु माय आठवे पोटीं । जें नाना वियोगाच्या कोटी । साहवती ना ॥५०॥ आणि काव्यचमत्कारें पाहतां । याचा हाचि अर्थ तत्वता । जे श्रीकृष्ण स्वप्नरूपचि सर्वथा । गुरु तो जागृतीं ॥५१॥ कारण ईश्वर आणि जीव । तेथें जो भेदभाव । तो सकलही सावेव । स्वप्नमय ॥५२॥ आणि श्रीगुरुकृपामूर्ति । ब्रह्म होऊनि ब्रह्म करिती । यालागीं जागृतीं । तेचि एक ॥५३॥ असो हा काव्यचमत्कार । गुरु देव भक्तीचा प्रकार । निरूपणीं साचार । बोलिला तो यथार्थ ॥५४॥ आतां जागृतीमाजीं वेदांत श्रवण । आणि तेचि भृकुटीमाजीं जाण । जे श्रीगुरुशब्द आपण । आठवती

तेथ ॥५५॥ द्विदलीं जी श्रीगुरुमूर्ती । ती बाहेरी येऊनियां निश्चितीं । उपदेश करी प्रत्येकाप्रती । जैसी तैसी ॥५६॥ नाना सत्पुरुष जे होती । ते जे शिष्यांतें उपदेशिती । त्या प्रत्येकाची द्विदलींची मूर्ती । हृदयीं येउनी उपदेश करी ॥५७॥ जैसी जयाची गुरुभक्ति । तैसीचि त्याच्या द्विदलींची मूर्ती । साधु शरीरीं शिरोनि निश्चिती । उपदेश तयाप्रति करितसे ॥५८॥ ना तरी जयाची भक्ति जैसी । तैसाचि तया हृषीकेशी । तेवींचि येथीचि विशेषी । परी होय ॥५९॥ श्रीगुरु द्विदलींहुनि निघे । आणि साधु शरीरीं शिरूं लागे । तैं शिष्या अधिकार चौरंगे । उत्तम होती ॥६०॥ एवं हा जीवसत्पुरुषगत प्रकार । आतां जो सत्पुरुष जाहला निर्धार । तो सकल समष्टि साचार । गुरुचि होय ॥६१॥ ज्याच्या ज्याच्या द्विदलांत । वसती स्वयें सद्गुरुनाथ । ते ईश्वरसत्पुरुषाहुनि निश्चित । भिन्न न होती ॥६२॥ म्हणोनि शिरणें न शिरणें कांही । तया श्रीगुरुतें नाहीं । जैसी प्रक्रिया लवलाही । जया उचित तेंचि कळवी ॥६३॥ पिंडीं हृदयांत अवतरे भगवंत । आणि ब्रह्मांडीं द्विदलीं श्रीगुरुनाथ । हें अनुभवाची निश्चित । खूण आहे ॥६४॥ या अनुभवदृष्टीं पाहतां । श्रीगुरुचि देवा वरौता । म्हणोनि तूं पार्था । तेंचि करी ॥६५॥ गुरुहिमालयापासुनी । वर निघे नाम मंदाकिनी । तैंचि ते सकल दोषा हानी । करोनि टाकी॥६६॥ म्हणोनि ऐसें जें नाम । रात्रंदिवस परम । घेती हे भगवन् हे पुरुषोत्तम । ठेवोनि प्रेम अंतरी ॥६७॥ तयापाशीं पाहतां । मी सांपडेन तत्वतां । हें बोलणें तरी वृथा । परी मी तोचि तो ॥६८॥ जो आपुलें हृदयीं आत्मा हारपे । अविद्येचिया लोपें । तो आत्मा सपडपें । सांपडे वचनें तयांच्या ॥६९॥ म्हणोनि मी हारपला गिवसावा । येरव्ही तोचि तो पांडवा । या श्रीगुरुवचन ठेवा । अर्थू केला ॥७०॥ या ओवीचा यथार्थ । जो कीं बोलिला आहे अर्थ । तो श्रीज्ञानेश्वर समर्थ । न्यून पूर्ण करोत पां ॥७१॥

श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदुनि पाउली । ओवी कुसुममाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥७२॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
स्वाचरणनिरूपणन्नाम

श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु.

श्री ज्ञानेश्वर माऊली समर्थ

# ज्ञानेश्वरी निरूपण

**ती कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।**
**जिया विश्वबीजाचिया कोंभा । साऊली केली ।।**
**(ज्ञानेश्वरी अध्याय ६ ओवी २७२)**

आतां सकल योगाधारु । जो शक्तिधरित्रीचा मेरु । जो योग-मंदिरमंदारु । गोपीकुचदुर्गविहारु हरी ।।१।। जो भुजग-हारहृदय-रत्न । जो फलीभूत निष्कंचनयत्न । जो धैर्यशीलाचा प्रयत्न । श्रीभगवंत ।।२।। जो राधिकाहृदयपद्मभृंग । सकल सोडोनि उमारंग । जेथ रंगवी अंतरंग । भक्तजनभवभंग जो ।।३।। जो वैकुंठविहारी करुणाकरु । जो वेदवेत्ता प्राचीन गुरु । जो भक्तप्रतिपालन दुर्जनहरु । विश्वाकारु यन्माया ।।४।। तो सच्चिदानंद नारायण । पाहोनि अर्जुनाचें अंतःकरण । योगरहस्य उघडोन । नेटकें भाषण आरंभी ।।५।। सकल योगाचिया शक्ती । पार्था जेथ एकवटती । जियेतें ब्रह्मवेत्ते वेदांती । स्तवनें बोलती शुद्ध बुद्धि ।।६।। मांत्रिक बोलती अलौकिक शक्ति । जन्मसिद्ध अलोट बुद्धि म्हणती । जी प्रणवाची जन्मदाती । कुंडलिनी म्हणती योगी तिये ।।७।। कुंडलाकार जिचे शयन । यालागीं कुंडलिनी अभिधान । कुंडल म्हणजे वर्तुळ पूर्ण । प्रणवाकार सिद्ध तो ।।८।। प्रणवाची आद्य रेखा । तो कुंडलाकार वीरेशा । तेवीं कुंडलिनीच्या दशा । जाण विशेषा आदिपुरुषीं ।।९।। प्राणप्रतिष्ठा करिता

मूर्ती । जैसे देव आविर्भवती । कीं शून्य दाखवावया निश्चितीं । बिंदु उपाधि करणें पडे ॥१०॥ कीं रूप दाखवावया जाण । पदार्थाचा आकार पूर्ण । उपाधि होय संपूर्ण । जया परी ॥११॥ कां शब्द जरी व्यक्त होवावा । तरी मुख उपाधि लागावा । उपाधिवांचोनि आघवा । शक्ति समुदायो व्यक्त नव्हे ॥१२॥ कीं अग्नि जरी व्यक्त करणें । तरी इंधनाची उपाधि घेणें । त्यावीण एवढा तेवढा म्हणणें । अग्नीसी न लगे ॥१३॥ तैसी हृदयाची सत्व शक्ति । तें सूक्ष्म असें निश्चितीं । ती आणावया अभिव्यक्ति । एक नाडीची आकृति घेतली ॥१४॥ कंदावरी कुंडलाकार । नाडीचा असे आकार । तोचि तेथ करुनि ध्यान प्रकार । शक्ति साचार व्यक्त करिती ॥१५॥ जैसे काष्ट तव आधीं श्वेत । परी अग्निसंगे होत आरक्त । तेवीं नाडीच पैं तें निश्चित । ध्यानसंगें कनकमय ॥१६॥ जी नाडीमय होती पूर्वींची । ती ध्यानें जाहली सुवर्णाची । सत्वगुणें चैतन्याची । अभिव्यक्ति ही ॥१७॥ सूर्यकांता माजी जाण । प्रतिबिंबे अदितिनंदन । तेवीं नाडीच सत्वमय होता जाण । श्रीपरमात्मा प्रति-बिंबे ॥१८॥

पद

**सुंदर कनकसमान । अंबा । सुंदर कनकसमान ॥ धृ ॥**
**योगी सांडुनि विषय कचाटें । ध्याती गत अभिमान । अंबा सुंदर॥**
**प्रणव जपूनि निज अंतरीं । मिळविति प्राणापान । अंबा । सुंदर ॥** प्रमाण
**माया कुंडलिनी ही नांवें । केवळ शब्द प्रणाम । अंबा, सुंदर ॥३॥**
**ज्ञानेश्वरगुरुचरणप्रसादें । कीजे अमृतपान । अंबा । सुंदर ॥ ४ ॥**

दोहा

**हृदय-कमल अति पावुनी जपती सोहं नाम ।**
**वश करोनी निज शक्तितें पावति दाक्षिण वाम ॥१॥**

## ओव्या

एवं आदि पुरुषाची माया । जिच्या योगें धनंजया । तो अवतार घेवोनिया । जन उद्धरी ॥१९॥ आतां पौराणिक मतें । जे पृथिवी शेषावरी वसते । आणि पाहतां ज्योतिषमतें । पृथिवी उभी आकाशीं ॥२०॥ पृथिवीस धर्ता सहस्रफणीं । ऐसें बोलिलें असे पुराणीं । आणि सिद्धांत शिरोमणी । नान्याधार म्हणुनि सांगे ॥२१॥ येथ दोघांचा समन्वय । म्हणाल कोण्या रीति होय । तरी ऐका तेही सोय । निश्चितपणें ॥२२॥ कटीस्थानीं असे धरणी । कंदस्थानीं कुंडलिनी । ती जेवीं कां सहस्र फणी । तेवींच असे ॥२३॥ म्हणोनि शेषावरी धरणी । ऐसें बोलिलें पुराणीं । किंवा उपपत्ति व्याख्यानीं । दुसरीही असे ॥२४॥ व्यष्टि पृथ्वीचा शेष कुंडलिनी । समष्टि पृथिवीचा सहस्रफणी । ती ही जाणिजे कुंडलिनी । महाशक्ति ॥२५॥ व्यष्टि देहांत कुंडलिनी सर्पिणी । विराट देहांत कुंडलिनी सहस्रफणी । एवं गुप्तरुपें ज्ञान पुराणीं । दृश्य ज्ञान सिद्धांत शिरोमणी बोलला ॥२६॥ ऐशी ती कुंडलिनी विश्वजननी । विश्व बीजाचिया कडसणी । विश्ववृक्षउभारणी । निकी करी ॥२७॥ परी विश्ववृक्ष हा अफाट । फळानूनि अमृताचा पाट । पुढलें अध्यायीं अचाट । तोचि रस ॥ २८ ॥ चतुर श्रोते सावधान । हें कुंडलिनीवर्णन । ज्योतिष आणि पुराण । समन्वयिलें ॥२९॥ येथ योगाच्या गुप्त शक्ती । तयाची कैसी ऐका रीति । दृष्टांतीं लावोनिया मति । कार्य निश्चितीं साधिजे ॥३०॥ पाणी आकाशाचिया येवढें करणें । तरी तयाचे बाष्प होणें । आणि पाणीयाचा संकोच करणें । तरी तुहीन होणें तयाचे ॥३१॥ तेवीं ब्रह्माकाशीं विचरणें । तरी कुंडलिनीसही सूक्ष्म करणें । आणि कुंडलिनीपासोनि सिद्धि घेणें । तरी येणें सृष्टि आंत ॥३२॥ पावावया ब्रह्मस्थानीं । मध्यस्त ही कुंडलिनी । आतां प्रक्रिया कवणे गुणीं । तें

सावध सज्जनीं परिसिजे पुढें ॥३३॥ श्रीज्ञानेश्वर जनक जननी । ओविया पुष्पांची माळा गुंफोनी । साष्टांग नमस्कार करोनी । वाहिली चरणीं सप्रेमें ॥३४॥

हरिःॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भावार्थदीपिका प्रकाशे पुराणजोतिषसमन्वयपूर्वकसर्वेषां योगीनांमरहस्यतया कुंडलिनीवर्णनन्नाम अध्यायः समाप्तमगमत् ।

ओंव्या

एवं आदि पुरुषाची माया । जिच्या योगें धनंजया । तो अवतार घेवोनिया । जन उद्धरी ॥१९॥ आतां पौराणिक मतें । जे पृथिवी शेषावरी वसते । आणि पाहतां ज्योतिषमतें । पृथिवी उभी आकाशीं ॥२०॥ पृथिवीस धर्ता सहस्रफणीं । ऐसें बोलिलें असे पुराणीं । आणि सिद्धांत शिरोमणी । नान्याधार म्हणुनि सांगे ॥२१॥ येथ दोघांचा समन्वय । म्हणाल कोण्या रीति होय । तरी ऐका तेही सोय । निश्चितपणें ॥२२॥ कटीस्थानीं असे धरणी । कंदस्थानीं कुंडलिनी । ती जेवीं कां सहस्र फणी । तेवींच असे ॥२३॥ म्हणोनि शेषावरी धरणी । ऐसें बोलिलें पुराणीं । किंवा उपपत्ति व्याख्यानीं । दुसरीही असे ॥२४॥ व्यष्टि पृथ्वीचा शेष कुंडलिनी । समष्टि पृथिवीचा सहस्रफणी । ती ही जाणिजे कुंडलिनी । महाशक्ति ॥२५॥ व्यष्टि देहांत कुंडलिनी सर्पिणी । विराट देहांत कुंडलिनी सहस्रफणी । एवं गुप्तरूपें ज्ञान पुराणीं । दृश्य ज्ञान सिद्धांत शिरोमणी बोलला ॥२६॥ ऐशी ती कुंडलिनी विश्वजननी । विश्व बीजाचिया कडसणी । विश्ववृक्षउभारणी । निकी करी ॥२७॥ परी विश्ववृक्ष हा अफाटु । फळानि अमृताचा पाटु । पुढें अध्यायीं अचाटु । तोचि रस ॥ २८ ॥ चतुर श्रोते सावधान । हें कुंडलिनीवर्णन । ज्योतिष आणि पुराण । समन्वयिलें ॥२९॥ येथ योगाच्या गुप्त शक्ती । तयाची कैसी ऐका रीति । दृष्टांतीं लावोनिया मति । कार्य निश्चितीं साधिजे ॥३०॥ पाणी आकाशाचिया येवढें करणें । तरी तयाचें बाष्प होणें । आणि पाणीयाचा संकोच करणें । तरी तुहीन होणें तयाचें ॥३१॥ तेवीं ब्रह्माकाशीं विचरणें । तरी कुंडलिनीसही सूक्ष्म करणें । आणि कुंडलिनीपासोनि सिद्धि घेणें । तरी येणें सृष्टि आंत ॥३२॥ पाताळया ब्रह्मस्थानीं । मध्यस्त ही कुंडलिनी । आतां प्रक्रिया कवणें गुणीं । तें

सावध सज्जनीं परिसिजे पुढें ॥३३॥ श्रीज्ञानेश्वर जनक जननी । ओविया पुष्पांची माळा गुंफोनी । साष्टांग नमस्कार करोनी । वाहिली चरणीं सप्रेमें ॥३४॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भावार्थदीपिका प्रकाशे पुराणजोतिषसमन्वयपूर्वकसर्वेषां योगीनांमरहस्यतया कुंडालिनीवर्णनन्नाम अध्यायः समाप्तमगमत् ।

# अथ निगमांतसुभा प्रारभ्यते

मंगल

यद्वस्तुतः सच्चिदकापकारी । भक्त्यर्थमेवावयवीव भूतम् ।
ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे । बिभ्राजते तन्मुनयो विशंति ॥१॥
मृदुलपादसरोरुह साजिरे । स्मरतसा भव हा सहसा जिरे ॥
नमुनि तें श्रमिशांतसुभाव दे । करुणया निगमांतसुभा वदे ॥२॥

सूत्र १— द्रु. वि.

नागवि जो विषयभोग भिकारि या । गमतसे मज तो अधिकारिया ॥
करुनि साधन चारहि सत्वरें । कळल ब्रह्म कसें मनिं हें स्मरें ॥३॥

सूत्र. २

जगदुत्पत्तिस्थितिलय ज्यापासुनि तोचि ब्रह्म इच्छि मना ॥
मी ऐसे मानुनि त्या सांडी हा देहभाव अति चिमणा ॥४॥

सूत्र ३, ४, ५

ऋग्वेदादि विचित्रें शास्त्रें तेथुनि तयाप्रती वदती ।
तात्पर्यार्थी पाहातां भगवन्महिमा सदाचि साव‍डती ॥५॥
सांगुनि निज सिद्धान्ता परगत वादा समीक्षणीं करणें ।
श्रुति कथि परमेशेच्छा जगहेतू तें जडें कसें करणें ॥६॥

अभंग

अग्निचिया संगे जलांत उष्णता । गौणेच्छा तत्वता जडीं तैसी ॥ ऐसेही मानणें वेदां असंमत । आत्मा शब्दस्थित म्हणोनिया ॥२॥ आत्म निष्ठ तया मोक्ष सांगे श्रुति ॥ जडाच्या निश्चिती त्याग योग्य ॥३॥ सत्ता शब्दें तरी प्रकृति ग्रहण । हेंही अप्रमाण बोलणें कीं ॥४॥ जडीं न संभवे चेतनाचा लय ॥ सुषुप्तींत होय लीन जीव ॥५॥ एक कळलिया सकळहि कळे । प्रतिज्ञाही चळे वेद करी ॥६॥ प्रधान जाणणें ब्रह्मही जाणणें । ऐसे दोनपणें विरुद्ध हें ॥७॥ स्थूलारुंधतीच्यान्यायें नये हाता ॥ मुख्यात्मा हेतुता याचिलागीं ॥८॥ सर्व जो कां जाणें सर्वज्ञत्व त्याचें । ज्ञानमय ज्याचें अनुष्ठान ॥९ ॥ म्हणोनीया एक चेतन कारण । जड अप्रमाण प्रकृत्यादि ॥१०॥ जीवही चेतन परी तो अल्पज्ञ । यास्तव कारण ईश्वरची ॥११॥ म्हणोनिया सर्व ब्रह्मचि कारण । सर्वत्र प्रमाण वेदांतीं हें ॥१२॥ सप्रेमें भजतां ज्ञानेश्वरपाय ॥ कळें समन्वय श्रुतिसिद्ध ॥१३॥

## अधि (६) सूत्र- १२ ते १९

### अभंग

आनंदाचे डोहीं आनंद तरंग । आनंदाचि अंग आनंदाचें ॥१॥

तुकाराम

परमात्मा एक आनंदमय । ऐसेंचि प्रमाणबाहुल्य होय । तवं वैय्याकरणी म्हणती स्वयें । विकारार्थी प्रत्यय मयट् ऐसा ॥१॥ परी हें बोलणेंचि वृथा । पाहतां "वायुमय गमन" या वाक्यार्था ॥ मयट् प्रत्यय प्रचुरता । सुचावितुं आहे ॥२॥ म्हणोनि आनंदप्रचुर । एक साक्षात्परमेश्वर । सकळांसी आनंद निर्धार । तोचि दाता ॥३॥ 'मामेव ये प्रपद्यंते । सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते' । एवं ब्रह्मानंदें होते । अत्यंत सुख ॥४॥

म्हणोनीं आनंदहेतु । ओळखी एक ब्रह्म हें तूं । ' सत्यज्ञानानंतानंदमात्रैक-रसमूर्तयः' एवं भागवतश्लोकार्थु ॥ निजपें ऐसा ॥५॥ जीवाचिया ठायीं । सुखदुःखभोक्तृता पाही । म्हणोनी तो नाहीं ॥ आनंदघन ॥६॥ 'योगी विगतकल्मषः अत्यंतं सुखमश्नुते' । या श्लोकीं भगवंतें । जीव प्रापक ब्रह्मसुख प्राप्य पुरतें । सांगितले ॥७॥ म्हणोनी जंव अविद्या व्यवहार । तंव वेगळे आहाती जीवेश्वर । आनंदमय करुणाकर । परमात्मा एक ॥८॥ पांचा कोशा आंतू । आनंदमय कोश ऐसी ही मातू । परी तो आनंदमय-शब्दाचा अर्थु । नव्हे येथ ॥९॥ आनंदमयकोशउपासना । करुनी मुक्ति मिळेल जना । कोठें ऐसिया वचना । देखिलेचि नाहीं ॥१०॥ आनंदमय परमेश्वर । उपासिता जीव होय तदाकार । म्हणोनी कोशविषयक साचार । निमाले बोल ॥११॥ शुद्ध ब्रह्माचिया घरीं । इच्छा जाहली कुमारी । ऐसें रामदासादि कवीश्वरीं । बोलियले आधीं ॥१२॥ म्हणोनी जगत्कारणयशाची । करंडी एक परमात्माचि । येथ जडप्रकृतिसाह्याची । अपेक्षा नाहीं ॥१३॥ सुखें ब्रह्मसंस्पर्श झालिया । अत्यंत सुख मिळे तया । माझिया ज्ञानें धनंजया । मीचि होईजे ॥१४॥ एवं जीवाचा ऐक्य भावो । आपुल्यांत बोले ईश्वररावो । चेतन जीवाचा जडीं ऐक्य भावो । असंभूत ॥१५॥

## अधि ७ २०, सूत्र २१

हृदयस्था रिघिजे शरण । इत्यादि वाक्यें करून । जीवाचि अंतर्यामी म्हणून । बोलनू एक ॥१॥ परी सर्व भूतांचिया हृदयीं । अर्जुना एक ईश्वर राही । या स्पष्ट वाक्यें करूनि लवलाही । हृदयस्थ तो परमात्मा ॥२॥ हृदयांत सूर्य नारायण । या स्वरोदयवाक्यावरून । हृदयस्थ सूर्यचि ईश्वर म्हणून । म्हणतील कोणी ॥३॥ परंतु तैसें नाहीं । राहावया सर्वांचिया हृदयीं । सूर्याप्रती सामर्थ्य नाहीं । नियम्य म्हणोनी ॥४॥ आदित्यांत जे तेज । तें माझें अर्जुना सहज । एवं ईश्वर आणि सूर्याचा तुज । कळो दे

भेद ॥५॥ म्हणोनी हृदयस्थ । परमात्माचि प्रकाशत । सर्वांतर्यामित्वादि समस्त । त्याचेचि धर्म ॥६॥

चूर्णिका:— जीवाचेठायीं । सर्वनियंतृत्वादिधर्मांची उपपत्ति नाही ।
अर्जुना या देहीं । पर पुरुष एक पाही । तयातें म्हणती परमात्मा ॥

अधि. ८ सूत्र २२

कर्कटीचिया प्रश्नावरुन । बोलती राव आणि प्रधान । सकळा माजीं भरेल पूर्ण । आकाश तें ॥१॥ तें नव्हे लौकिकाकाश । लक्षणावरोनी विशेष । एक परमात्मा पुरुष । उमजो लागे ॥२॥ त्या चिदाकाशाच्या ठायीं । जगजन्मस्थितिलय पाही । होती रामा शद्वीं इहीं । ब्रह्मचि बोधिले ॥३॥

अधि. ९ सूत्र– २३

मीचि सकळांचा प्राण । या वाक्यें करोन । परमेश्वरचि आपण । प्राणरूप जगा ॥१॥ प्राणचि चालवी सकळा जगा । प्राणचि नेत विलयांगा । इत्यादि ब्रह्मलिंगा । प्राण आश्रय म्हणोनी चित् ॥२॥

अधि. १० सूत्र. २४ ते २७

ज्योति चमकली चमकली । काय सांगू तिची बोली ॥१॥
जनाबाई

ज्योतिसरूपकु ब्रह्महि जानहुं ॥ सूर्यादिक कछु अन्य न मानहुं ॥
निगममो मिलत पाद अभिधाना ॥ तातें सत्व प्रधान न माना ॥१॥
एक पाद इस पुरुषका विश्वन्यास सब होय ॥
अमृत तीन पाद पुनी प्रकाश निश्चित जोय ॥२॥

गद्य

अहो ! हें पादत्रय गायत्री छंदांचे सांगितले आहेत. सर्व जग हे गायत्रीरूप आहे म्हणून. असें म्हणशील तर म्हणूं नको. कारण गायत्रीच्या

योगानें ब्रह्माचीच उपासना सांगितली आहे. सूर्यादि शुद्ध मंडलाच्या ठिकाणीं झालेल्या ब्रह्माच्या अभिव्यक्तीवर मनसंयम करण्यास पुष्कळ वाक्यांत सांगितलें आहे; तद्वत् गायत्री–अभिव्यक्त ब्रह्माचेच ठिकाणीं मनसंयम सांगितला असल्यामुळें पूर्वोक्त पादत्रय ब्रह्माचेच सांगितले आहेत.

ओव्या

भूत पृथिवी शरीर हृदय ॥ ऐसे गायत्रीपदचतुष्टय ॥ ते ब्रह्माचेचि ठायीं संभाव्य ॥ केवल छंदमात्रीं न होती ॥१॥ गद्य "त्रिपादस्याऽमृतं दिवि" या वाक्यांत पादत्रयब्रह्माचे ब्रह्मांडांत व्यापकत्व सांगितलें, आणि "यदतः परो दिवो ज्योतिर्दीप्यते" ॥ या वाक्यांत ब्रह्मांडाच्या वर ज्योतिःस्वरूप ब्रह्माचे स्थान सांगितले. म्हणजे पहिल्या वाक्यांत "द्यु" शब्दाच्या सप्तमीनें आधारत्व सांगितलें, आणि दुसऱ्या वाक्यांत पंचमीमुळें मर्यादा सांगीतली. एवं उपदेश निरनिराळ्या प्रकारचा असल्यामुळें वाक्य विरोध प्राप्त झाला आहे; असें म्हणणेंच संभवणार नाहीं, कारण ज्या प्रमाणें एखाद्या झाडाच्या शेंड्यावर पक्षी बसला, म्हणजे 'वृक्षाग्रीं पक्षी आहे' किंवा "वृक्षाग्राहून वर पक्षी आहे" या प्रमाणें सप्तम्यंत आणि पंचम्यंत दोन्ही वाक्यांचा प्रयोग एकाच ठिकाणीं करतां येतो, तद्वत् येथेंही ब्रह्मांड व्यापक असून, उर्वरित सर्व एक ब्रह्मच आहे, हें सांगण्यासाठीं "द्यु" शब्दाचा सप्तम्यंत व पंचम्यंत प्रयोग केला असल्यामुळें, दोही वाक्यांचा विरोध नाहीं.

अधि ११ ओव्या सूत्र २८–३१

मी प्रज्ञात्मा प्राण । अजरामर आनंदघन । ऐसे प्रतर्दनासी पाकशासन । आत्मपुराण द्वितीयाध्यायीं वदले ॥१॥ तेथ जो प्राण शब्द । तो 'प्राणवायु'चि प्रसिद्ध । ऐसें न म्हणावें विशद । परमात्मा केला ॥२॥ अजरामर आनंदघन । इत्यादि ब्रह्मलक्षण । तें परमात्मींच उपपन्न ।

वायूंत नव्हे ॥३॥ येथ पूर्वपक्ष पुन्हा । 'इंद्रें आपुली उपासना । सांगितली म्हणून जाणा । इंद्रशरीर उपास्य ॥४॥ परी हें बोलणें वृथा । अजरामरत्वादि सर्वथा । ब्रह्मलक्षण सिद्ध यथार्थो । शरीरार्थी नये तें ॥५॥ हो कां देवांचेही शरीर । परी कदापि नोहे अजरामर । "देव अमर आणि निर्जर" । हीं अर्थवाद वाक्यें ॥६॥ प्रज्ञात्मा आनंदघन । इत्यादि कथनेंकरून । इंद्रें बोलिलें अध्यात्मज्ञान । बाहुल्यें करोनी ॥७॥ म्हणोनी इंद्रशरीरस्थित । आणि सर्वांचिया हृदयस्थ । तो एक परमात्माचि येथ । उपास्य कीं ॥ ८ ॥

ओव्या

येथ ऐसें म्हणती कोणी । कीं विश्वरूपादि मारिले म्हणोनी । इंद्र तो केवळ देहाभिमानी । आत्मज्ञानी गुरु योग्य नोहे ॥१॥ परी हेही बोल । कुरंगतरंग ऐसे फोल । ज्ञान होतांचि केवळ । उपदेशयोग्यता ॥२॥ जैसे वामदेवाप्रती । गर्भीचि मिळे संविती । मी सूर्य जाहलो, मी मनु जाहलो ऐसी उक्ती । बोलिली तेणें ॥३॥ तेवीं मी ब्रह्म इत्यादिक । शास्त्रें पाहोनिया देख ॥ भगवान् इंद्रही उपदेशक । योग्याचि झाला ॥४॥ म्हणोनि बोधिलें ज्ञान । अध्यात्म लिंगीं संपूर्ण । प्राण प्रज्ञात्मा आनंद घन । परमात्माचि तो ॥५॥

गद्य

" जी प्रज्ञा तोच प्राण. प्राण ह्या शरीरामध्यें राहतो. प्राण प्रज्ञेसह शरीरामध्यें राहतो. प्रज्ञा व प्राण मरणसमयीं दोघेहि शरीराला सोडून जातात. " या उपदेशावरुन देवताशरीर जरी उपास्य नसलें, तरी जीव किंवा मुख्यप्राणलक्षणामुळें प्राणवायूच उपास्य आहे, हें प्रतिपादन सम्यक् नाहीं. कारण प्राण-उपासना, जीव उपासना आणि ब्रह्म-उपासना अशा तीन उपासना मानणें भाग पडेल. एका वाक्यांत ह्या तीन उपासना मानणें

बरोबर नाहीं. उपक्रम आणि उपसंहार यांच्या योगानेंहि इंद्रानें एकच उपासना सांगितली असें दिसते. "मला तूं जाण" ह्या वाक्यानें उपक्रम करून "मी प्राण आहे, प्रज्ञात्मा आनंदघन आहे" या वाक्यांनीं उपसंहार केला असल्यामुळें, आपल्या ठिकाणीं ब्रह्मलक्षणपूर्वक असलेला जो परमात्मा, त्याचें "प्राण" शब्दानें कथन करून, कौशितक्युपनिषदांत ही एकच उपासना सांगितली म्हणून प्राणशब्दवाच्य ब्रह्म आहे, जीव किंवा प्राण वायु नाहीं हें सिद्ध झालें. अथवा ब्रह्माचीच तीन प्रकारानें उपासना सांगितली आहे, असाही त्या वाक्याचा अर्थ करतां येतो, कारण प्राण हा अमृत आहे, प्रज्ञा ही सर्व भूताला आश्रय आहे, प्रज्ञा प्राण एकच आहेत इत्यादि वाक्यावरून, प्राणधर्मउपहित किंवा स्वधर्म-उपहित, जे ब्रह्म, त्याचीच एक स्थूलारुंधतीन्यायानें तीन प्रकारें उपासना सांगितली म्हणून, ब्रह्मच एक उपास्य आहे. "तूं बोलणाऱ्याला जाणण्याची इच्छा कर" या वाक्यांत वागादींच्याश्रय जीवाचेही लक्षण सांपडते. मुख्य प्राणाचें लक्षण सांगितलेंच आहे.

एवं हें प्रकरण । कुसुम करुनि पूजिले ज्ञानेश्वरचरण ।
आतां अवधान देऊनि पूर्ण ॥ द्वितीय प्रकरण ऐकोत श्रोते ॥१॥

हरिः ॐ तत्सत् श्रीनिगमांतसुभायां स्पष्टलिंगकवाक्यबोधसमन्वयं नाम प्रथमं प्रकरणं संपूर्णम्। श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

## द्वितीय प्रकरण— पाद दुसरा

स्पष्ट वाक्यावरील संशय । निवारोनि समन्वय । ब्रह्मपर केला आहे । पूर्व प्रकरणीं ॥१॥ येर जीव आणि प्रधान । ते वाळिले कारण-

त्वाहून । एक ब्रह्माचे जगत्कारण । दाखविले ॥२॥ सर्वज्ञत्व नित्यत्वादिक ॥ अथवा ब्रह्मधर्म आणिक । तेही सांगितले सम्यक् । ऐसे झाले ॥३॥ आतां अस्पष्ट वाक्यांचा । संशय वारोनि साचा । ब्रह्मपर समन्वयाचा । सिद्धांत कीजे ॥४॥ द्वितीय तृतीय पाद । याचि विषयीं प्रसिद्ध । तरी तें विशद । ऐकोत श्रोते ॥५॥ अस्पष्ट वाक्यें ब्रह्मपर । किंवा तयांचें अर्थांतर । ऐसा संशयप्रकार । वारिला पाहिजे ॥६॥ मनोमय प्राण-उपासना । श्रुतींत आहे ऐसे जाणा । आणि मनोमयत्वादि गुणा । जीवाचि योग्य ॥७॥ परब्रह्माचिया ठायीं । मनाचा संबंधु नाहीं । शरीरामाजीं अणुही । जीवाचि एक ॥८॥ म्हणोनी मनोमयत्वादि गुणीं । उपास्यत्वें बोलिला प्राणी । एवं पूर्वपक्षवाणी । असंगत ॥९॥ जेथें अणुत्व बोलिले । तेथचि ज्येष्ठत्व कथिले । म्हणोनी तें एकस्थानीं जाहलें । विरुद्ध कैसे ? ॥१०॥ तरी येथ ऐसा अर्थ । ज्येष्ठ निरुपाधिक ब्रह्म यथार्थ । तोचि उपाधिगत उपासनार्थ । अणु बोलिलें ॥११॥ व्यापकाचें अशक्य ध्यान । यालागीं ब्रह्म अणुप्रमाण । 'अणोरणीयान्समनुस्मरेद्यः' । भगवद्वचनही ॥१२॥ सर्व भूतांचिया हृदयीं । ईश आहे तूं त्यास ध्यायी । तत्प्रसादें लवलाहीं । पावसी शांती ॥१३॥

**सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ॥**
**सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥**

जया सर्वत्र हात पाय । सर्वत्र नेत्रमुखही होय । इत्यादि स्थानीं स्वयें । सर्वोपदेश ॥१४॥ माझ्या मध्यें सर्व भूतें । हें व्यापकत्व सांगितलें भगवंतें । आणि अणोरणीयान् स्मरावयातें । सांगितलें ॥१५॥

—⁕⁕०⁕⁕—

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ॥ ऐश्वर्यार्थदीपिका ॥

## अथ ज्ञानेश्वरीपदपल्लवनाम्नी ऐश्वर्यार्थ— श्री दीपिका संज्ञका ईश्वरगीता टीका प्रारभ्यते ॥

ॐ नमो देवाधिदेवा । भक्तवत्सला करुणार्णवा । ज्ञानेश्वरा ब्रह्मस्वभावा । सोऽहंभावा सच्चित्सुखा ॥ १ ॥ जय जय दीनबंधु सर्वेश्वरा । जय हृदयतिमिरभास्करा । अक्षय अविट निर्विकारा । मोक्षविहारा मोक्षपते ॥२॥ कैवल्येंदिरेशा नवका । जय सच्छिष्यसंसृतिसिंधुनवका । एकत्र करूनिया नवका । सर्वासवका विहारका ॥ ३ ॥ जय श्रुतिसमन्वय साधका । जय भेदसंभ्रांतिबाधका । जय ब्रह्माकारवृत्तिसंवादका । साक्षिबोधका स्वयंरूपा ॥ ४ ॥ जयाऽविद्याकार्यकृततंद्रा । जयाऽऽनंदपीयूषचंद्रा । जय जिज्ञासुश्रेयसुभद्रा । जगन्मौनमुद्राऽऽलंदीपते ॥ ५ ॥ जय साधनवन-श्रृंगारवसंता । जय जयाऽमलाधिष्ठानवसुमंता । जयाऽविद्यापातितसुत कारुण्यवंता । जनिमरणहंता सुखाब्धे ॥ ६ ॥ जय जयेंद्राणीतीरावलीलासिया । जय त्वंतमवारक सुलासिया । जय निजजनहृदब्जनिवासिया । निःसंग शुद्धा ॥ ७ ॥ जय सच्छिष्यविघ्नापाकर गणेशा । जयावृत्तिद्वयरजनीदिनेशा । जय सत्यसंकल्प श्रुतिसंनिवेशा । महंतवेशा महानुभवा ॥ ८ ॥ जय मंत्र-ब्राह्मणनिगमशरीरा । जय मन्वादिस्मरणावयव सुधीरा । जयपुराणमाणि-

भूषण रत्नश्रृंगारा। कविकौतुककरा जनक जननी ॥९॥ जय न्यायनीती-परशांकुशधा। वेदांतमोदकमहारससुधा। जय स्वसुतसभरपयोधर दुधा। संशयमुधाछेदका ॥१०॥ जय पाखंडखंडप्रचंडदंना। जय निज बाळककल्याणचिंता। जय प्रणवमयोपनिषदर्थमंता। ऽध्यक्ष भगवंता प्रेममया ॥११॥ तूं निजजनवाणीनिवासी शारदा। जय संकटपतित सपूरवारि.ा। जय निजसंवेद्यसमंतभूरिदा। वृंदारकवृंदादिवंद्य गुरो ॥१२॥ जय जयाऽविद्याहारक विद्यादायिनी। जय स्वाधीनजनकल्याणभाविनी। जयाऽगाणि.ान्याथावगुणोपसाहिनी। ज्ञानेश्वर जननी कृपाळें ॥१३॥ जय निगमाविद्यातरुप्ररोहबीजा। जय गतसकलमातिजननीजा। जय संकल्पाऽविज्ञानापरोक्षसहजा। ब्रह्मसुखओजा सद्गुरो ॥१४॥ जय जीवन्मनजनविवेकधारका। जय मृतमनसज्जनसाधनसारका। जय सूज्ञसर्वज्ञ प्रेमकारका। ज्ञानेश्वरसंज्ञका श्रीगुरोजी ॥१५॥ जय शून्यारविंदभवांड संख्येकांका। जय गतसुतेश्रयाधिकारशंका। जयोपतिष्ठिताप्रियबालकांका। निष्कलंका श्रीमद्गुरो ॥१६॥ जय चिन्मयप्रकाशसदोदयसूर्या। जया ऽघटनापटुशिक्षणचर्या। जय निर्जनपदनिवासी स्वार्या। ज्ञानेश्वराचार्या मायबापा ॥१७॥ जयाऽनंतसंताविभूतिविस्तारा। जय ध्वस्तमोह महावाक्यार्थ प्रस्तारा। जय मद्वाक्चतुष्कऋगनिस्तारा। नृपत्वसोपस्कारा जनक जननी ॥१८॥ जयाभौतिकतनु सान सुंदरा। जय कूटस्थभूधैर्यमंदरा। मुक्तयोग्यानंदगिरिकंदरा। वाहिली कंधरा पायीं तुमच्या ॥१९॥ जयार्त चातककारुण्यघना। जय कालत्रयराहिता चिद्घना। जय प्रीत्यर्थाऽन्वयज्ञान सगुणा। जयागुणागुणगणविनिवर्तका ॥२०॥ जय भारतनवनीतमधुरकारा जय संकल्पकर्तर्य्यविकारा। जय सुतव्रतबंधार्थ पितृत्वसंस्कारा। कन्या प्रियकरा मातृमूर्ते ॥२१॥ ज्ञानेश्वरोच्छिष्ठ जगत्त्रय। हें वचन फलवन्मातिमय। गाऊ त्रिवार जयजयजय। स्मरोनी पाय ज्ञानेश्वर आई ॥२२॥ लाडिवाळपणें ही तुमची कन्या। भवत्पदप्रसादभून्मातिमान्या। सेवूनि भवद्वक्त्रोच्छिष्ट

धान्या । ज्ञानवचनपर्जन्या वर्षु इच्छि ॥२३॥ भवान् श्रीगुरु हरिहरात्मक । म्हणोनि वचनें तेंहि एक । तेथ विष्णुवचनें विस्तृत निष्टंक ॥ संस्कृत प्राकृती ॥२४॥ परी शिवरूपें भवद्वचन । तें केवळ भाषा गिर्वाण । अरुपवाणी अनुमोदन । प्राकृतपण व्यावें वाटे ॥२५॥ विष्णुरूपें वचन भगवद्गीता । ती संस्कृतसम आपण विस्तारिली ताता । शिवरूपें वचन ईश्वरगीता । तीं प्राकृत आतां विस्तराल कीं ॥२६॥ परी प्रिय कन्येची बोबडी सेवा । स्वीकारा ज्ञानेश्वरगुरुदेवा । ऐश्वर्यार्थदीपिका ठेवा । प्राकृत वाहावा चरणीं वाटे ॥२७॥ या स्तवना सरिसें ध्यान । करीतां श्रीगुरु देती पसायदान । कीं तव मुखें टीका मी वदेन । एवं वदोन बैसलें हृदयीं ॥२८॥ ज्ञानरूपें चित्तीं ऐक्य चिद्घन । भक्तिरूपें हृदयीं आणि सभोंवती सगुण । व्यतिरेकान्वयें भक्तिज्ञान । एक करून चरण वंदिले पुन: ॥२९॥ भूम्याप्लवसमयीं कूर्म । होवोनि केलें रक्षणकर्म । तथा स्वजनरक्षण धर्म । सगुणत्वें वर्म श्रीगुरूचें ॥३०॥ कां कूर्मावतारीं एक अघटित । दृष्टीनें पाहतां प्रेमयुक्त । स्वपुत्र होताती तृप्त । तैसें सद्गुरुनाथ शिष्य पोषिती ॥३१॥ सकळसंत देवसमाविष्ट । ज्ञानेश्वर मूर्ती एक वरिष्ट । आम्हां मातृपितृगुरुत्वें स्पष्ट । कूर्मसम इष्ट तुष्टपुष्टिदा ॥३२॥ एवं कूर्मप्रेममयगुरु पुरातन । म्हणोनी गुरुपर कूर्मपुराण । तेथ शिष्यशिवद शिवत्वें वचन । ती ईश्वरगीता पूर्णैश्वर्यरूपा ॥३३॥ तया ऐश्वर्यार्थाची दीपिका । ओवाळावया श्रीगुरुनायका । निर्धूमाग्नीनें निष्कळंका । आरंभुनी देखा उजळली ॥३४॥ तेथ आख्यायिकेची रीती । गीतारूप ब्रह्मविद्यास्तुति । आणि गुरुशिष्यसंवादप्रीती । अखंडानंद प्राप्तिदर्शक ३५॥ तिया आनंदाचिया उकळीं । तोचि एक आकळी । जो हृदयांतूनि पडरिकळी । काढोनि टाकी ॥३६॥ एवंविधगुणसंपन्न । साधनचतुष्टय आंगीं पूर्ण । यज्ञांतीं सकळ ऋषि मिळोन । नैमिषारण्यीं प्रश्न करीते झाले ॥३७॥ तया प्रश्नोत्तरीं । कूर्मपुराण कथिलें बहुपरी । तथापि आत्मज्ञान अविकारी । राहिलें एक ॥३८॥ तें पुसावयासी आदरू । मुनींचिया मनीं प्रश्नसंभारू । व्यक्त करिती करूनी विचारू । इये श्लोकीं ॥३९॥

ऋषयउचुः

भवता कथितः सम्यक् सर्गः स्वायंभुवस्ततः।
ब्रह्मांडस्यास्य विस्तारो मन्वंतरविनिश्चयः ॥१॥

मग प्रश्न आदरिती ऐसा। पूर्व स्मृतीचा घेवोनि ठसा। अध्यात्मानुभव आवैसा। पुसती प्रेमे ॥४०॥ कां श्रवण केलियाचे मनन निदिध्यासन। उत्तम प्रकारें केलियाविण। सद्गुरु न सांगती आपण। पुढील विवेक ॥४१॥ हा मनीं आणोनि भाव। ध्यावया अध्यात्मानुभव। पूर्व स्मृती घेवोनि सावेव। ब्रह्मज्ञानी पाव, पुसती मुनी ॥४२॥ जो सकल प्रमाणामाजी वरिष्ठ। ज्याचेनी मुमुक्ष ब्रह्मनिष्ठ। तो वेदाचि एक स्पष्ट। प्रमाण येथ ॥४३॥ तयाचिया बृहदारण्यीं। सृष्ट्युत्पत्तिमिषे करूनि। मनुशतरूपा कारणी। घेतली बीजें ॥४४॥ तो स्वायंभुव सर्ग। जेथुनि विस्तारला विश्वसंघ। जो ऐकता घडे स्वर्ग। तो काथिला अव्यंग आपण ॥४५॥ मग तया स्वायंभुवसर्गाआंतु। जो ब्रह्मांडवटविस्तार अगणितु। घेवोनी कालवस्तु। निवसीत आथी ॥४६॥ तो आणि सर्गांतरीं। मनु करूनिया पुढारी। पितृपुत्रसत्तेचे परी। मन्वंतर जे ॥४७॥ तयाचाहि निश्चयो दृढ। तो सांगितला करोनि कोड। तेथ अभिप्राव गूढ। काथिला कांहीं ॥४८॥

तत्रेश्वरेश्वरो देवो वर्णिभिर्धर्मतत्परैः
ज्ञानयोगरतैर्नित्यमाराध्यः कथितस्त्वया ॥२॥

भृगुवल्ल्युनुरोधे। युक्त्यनुभव निजबोधें। परमेश्वरे प्रसिद्धे। निर्मिलें हें ॥४९॥ आणि तेणेंचि हें राहे। पुढतीं तेथ इया जाणें आहे॥ म्हणोनि ईश्वर कारण पाहे। विश्वासी या ॥५०॥ महाराज पराशरपुत्र। प्रकटोनि ब्रह्मसूत्र। बोलिलें ईश्वर एक स्वतंत्र। कारण विश्वा ॥५१॥ सर्वज्ञ आणि सर्वशक्ती। वाक्यशेष तत् ब्रह्मेति। ही श्री मदाचार्यचरणोक्ती। निर्णायक

॥५२॥ तरी धर्मजिज्ञासे आंतू । धर्म परोक्ष पदार्थु । म्हणोनी श्रुतिलिंग-वाक्यादिसंघातू ! प्रमाणरूप ॥५३॥ तैसे इया ब्रह्ममीमांसा । नाहीं केवल शद्बठसा । श्रुतिमूलकानुमान सहसा । अनुभव आपैसा प्रमाण ॥४५॥ परी इतुकाची भेद । जें कांहीं बोलिला वेद । तयाचा अनुमाने समन्वय शुद्ध । साधावा परी बाध न करावा ॥५५॥ म्हणोनि श्रुत्येकगोचरपणा । सर्ववेदान्तप्रत्ययचोदना । समन्वयें सांगती चेतन कारणा । सिद्धांतू हा ॥५६॥ तरी सत्य चित् कारण श्रुत्युक्त । राहिला जो जड कारणसंघात । तो अनुमानें खंडोनि समस्त । श्रौत सिद्धांत दृढ कीजे ॥५७॥ एवं श्रुतितन्मूलकानुमान । घेवोनि सिद्ध केलें ईश्वर कारण । तयाचे तटस्थ आणि स्वरूप लक्षण । सांगितलें ॥५८॥ कादाचित्कत्वे सति व्यावर्तकत्वम् । इदं तटस्थलक्षणत्वम् । नित्यत्वे सति व्यावर्तकत्वम् । स्वरूपलक्षणमित्थमपि ॥५९॥ जगत्सर्गस्थित्यंतकारण । हें ईश्वराचें तटस्थ लक्षण । सत्यज्ञानानंदादि संपूर्ण । स्वरूप लक्षण बोलिजे ॥६०॥ ऐसा द्विलक्षण ईश्वर । सर्व व्यापक परम पवित्र । होवोनि वर्णाश्रमधर्मतत्पर । अर्चिजे प्रेमे ॥६१॥ मग तया धर्में चित्तशुद्धि । जालिया उपास्ती स्थिर बुद्धी । ज्ञानयोगें मोक्षसिद्धि । सहज होय ॥६२॥ म्हणोनि धर्मज्ञानतत्पर । होवोनी नित्य पूजावा ईश्वर । हेंहीं आपण करोनी विस्तार । सांगितलें ॥६३॥

**तत्वं चाशेषसंसारदुःखनाशमनुत्तमम्**
**ज्ञानं ब्रह्मकविषयं येन पश्येम तत्परम् ॥३॥**

तरी मुमुक्षुभावें आम्हीं । टाकोनी समस्त विषयोर्मी । पुसतो ते सांगावें तुम्ही । कृपा करोनी दयाळा ॥६४॥ ईश्वराचें स्वरूप लक्षण । त्यासी लक्ष्यांशे एक होवोन । आम्हीं पाहूं ऐसें जें परम ज्ञान । तें कृपा करून सांगावें ॥६५॥ आध्यात्मिक आधिभौतिक । तिसरें तें अधिदैविक । शरीर मनोजन्य आध्यात्मिक । आधिभौतिक भूतजन्य ॥६६॥ आधिदैविक

देवताकृति । एवं दुःखत्रिविधस्थिती । आणि सुख जें कांहीं संसाररीती । विवेकदृष्टी तेंहि दुःख ॥६७॥ या सकल दुःखांचे कारण । अनादि भावरूप अज्ञान । तें नाशे ज्ञानेंकरून । कार्यसहित ॥६८॥ ऐसें जें ज्ञान ब्रह्मविषयक । जेथ जीवेश्वर होती एक । तें अनुभवा येईल तेवीं सम्यक् । सांगावे जी ॥६९॥ तुमचें ज्ञान संप्रदायिक । म्हणोनि पुसावया वाटतो हरिख । येर शास्त्रशद्ववटवट सकळिक । संप्रदायावांचूनी ॥७०॥ गुरुपरंपरा शुद्धवाटा । ज्ञान तें परब्रह्म पाउठा । तयाचिया शुद्ध चोहाटा । बैसला तुम्हीं ॥७१॥

**त्वं हि नारायणः साक्षात् कृष्णद्वैपायनात् प्रभो ॥**
**अवाप्ताखिलविज्ञानस्त्वां प्रच्छामहे पुनः ॥४॥**

जे साक्षात् श्रीनारायण । भगवान् द्वैपायन । सूता तूं तेथोनी पावलासी ज्ञान । म्हणोनि नारायण तूंहिं स्वयें ॥७२॥ दीपानें दुसरा दीप लावितां । कवणा न म्हणवे न्यून पूर्णता । दोही दीपीं प्रभासाम्यता । तेवीं नारायणता तुम्हां दोघां ॥७३॥ तरी श्रीव्यासापासोन । जें तूं लाधलासी ज्ञान । त्याविषयीं आम्हीं करितो प्रश्न । पुढतीं संपूर्ण सांगावें ॥७४॥

**श्रुत्वा मुनीनां तद्वाक्यं कृष्णद्वैपायनं प्रभुं ॥**
**सूतः पौराणिकःस्मृत्वा भाषितुं ह्युपचक्रमे ॥५॥**

ज्यांत जिज्ञासाभावरचना । ऐसिया मुनिवृंदवचना । ऐकतां ब्रह्मानुभव सूचना । जाहली मानी ॥७५॥ संप्रदायाविण कहीं । सत्शिष्या बोध होणें नाहीं । म्हणवुनि शहाणें लवलाही । संप्रदाय स्मरताती ॥७६॥ या लोकींची विघ्नें सकळ । वारी सद्गुरु कृपाळ । आणि परलोकींची विघ्नें प्रबळ । गुरुसंप्रदाय निवारिता ॥७७॥ न धरिता संप्रदाय वाट । ब्रह्मज्ञान करिता प्रगट । तरी गूज घेऊनी चावट । होती बहु ॥७८॥ अथवा रायाचे कुळीचा मान । सत्य तोंवरी राखिती प्रजाजन । तेवीं महत्संप्रदायमान ।

सकळ देवता राखिती ॥७९॥ असोनि संप्रदायानुसृत । नीतिमंत आणि सेवी संत । तरी तयासी भगवंत । क्षण एक नाविसंबे ॥८०॥ आणि न करिता गुरुचें स्मरण । दुसरिया प्रति देता ज्ञान । तरी मी ज्ञानी हा अभिमान । सहजचि वाटे ॥८१॥ ऐसे हेतु अनंत । आणि सहज गुरुप्रेमपंथ । जाणुनिया कृपावंत । सद्गुरु स्मरावा ॥८२॥ गुरुभक्तिवांचूनि पुरता । आदर नुपजे विवेकावरुता । म्हणोनि जाणतेनी सर्वथा । भजिजे गुरु ॥८३॥ तेणोंचि होये कृतकार्य । मिळे ब्रह्मबोधस्थैर्य । साधकालागीं वैराग्य धैर्य । सद्गुरुस्मरणें ॥८४॥ कां रत्नांची प्रभा फाके । तैं रत्नासीच मोल निके । कीं देऊळ देव पाषाणीं एके । भज्यभजकत्वें जेवीं ॥८५॥ तेवीं सच्चिदानंद गोमटी । आत्मसिद्धि देवूनि भेटी । तिचे आत्मसिद्धीवरी उठी । सद्गुरुभजन ॥८६॥ कीं माये एवढी कन्या होता । परी मनी आवडे माता । माहेरासाठीं तत्वतां । झुरतू राहे ॥८७॥ तेवीं शिष्य जाहलिया सद्गुरु एवढा । न सुटे गुरुचरणभाव रोकडा । ज्ञानाभिमान व्हाया थोकडा । हाचि मार्ग ॥८८॥ येणें येणें विचारें । सूतचित्त प्रेमभरें । द्वैपायनचरण सुकुमारें । स्मरता झाला ॥८९॥ पुराणांचा अधिकार । जिहीं दिधला साचार । जेणें ज्ञान पुसती द्विजवर । एवं पात्र जाहला ॥९०॥ तिया सत्यवतीनंदना । भवदाहशमनचंदना । जनभवदुःखकरुणाक्रंदना । आठवी प्रेमें ॥९१॥ स्मरणगामी जे सात । त्यांत सत्यवतीसुत । म्हणोनि स्मरतांचि हृदयांत । प्रकटले कीरु ॥९२॥ हृदयीं प्रकटता श्रीगुरुराय । पळती दुःख शोक भय । मग सहज वरदान अभय । सांपडे करी ॥९३॥ येणें विधी अभयवर । सहज लाहुनि शुद्ध अंतर । सर्वेंद्रियाश्रीं जुंपोनि शरीर । न्याया सत्पथावर सूत झाला ॥९४॥ कीं सूतपणाचा कलंक । झाडिला होवोनि पौराणिक । व्याससूतत्वें सार्थक । सूत नाम देखा याचिसाठीं ॥९५॥ जिहीं वेदांचे उपबृंहण । ते पढला इतिहास पुराण । म्हणोनि करावया भाषण । योग्य जाहला ॥९६॥ सूता पुराणाधिकृती ।

ऐसा निश्चय सांगे स्मृती । म्हणोनि पौराणिक सस्कृती । विशेषें तया ॥९७॥ तरी वेद विरुद्ध नाहीं । आणि सहज मोक्षहि पाही । ऐसे पुराणगत कांहीं । आरुरी बोले ॥९८॥

**तथास्मिन्नन्तरे व्यासः कृष्णद्वैपायनः स्वयम् ॥**
**आजगाम मुनिश्रेष्ठा यत्र सत्रं समासते ॥६॥**

परी मी बोध करिता । ही चित्तीं नाहीं अहंता । म्हणोनि बोल निघता निघता । गुरूचि स्मरे ॥९९॥ सद्गुरु स्मरतां ध्यानीं । स्तब्ध होवूं पाहे वाणी । बोलावया प्रवचनीं । धैर्य नोहे ॥१००॥ गुरुचरणाची आस । तेणें विसरला अधिकारास । हे जाणोनि हृदयींचे व्यास । प्रगटले बाहेरी ॥१०१॥ गुरु आणि शिष्यपणा । कलोनि एका स्थाना । द्यावया आलिंगना । उदित मुनी ॥१०२॥ निजशिष्याचे पूर्णपणें । आपणा तृप्त वाटणें । हें मातापुत्रापरी जाणें । श्रीगुरु एक ॥१०३॥ शिष्यवचनाची आवडी मोठी । कौतुकें श्रावया श्रवण संपुटी । जणूं प्रगटली गोमटी । व्यासमूर्ती ॥१०४॥ कां सूताचें निज ध्यान । आणि मुनींचें दिव्य नयन । एक संघ जाहला म्हणोन । दृश्य श्रीगुरु ॥१०५॥ यज्ञ भूमी परम पवित्र । जेणें राचिले ब्रह्मसूत्र । तो सुमती सत्यवतीपुत्र । देखिला तेथ ॥१०६॥

**तं दृष्ट्वा वेदविद्वांसं कालमेघसमद्युतिम् ॥**
**व्यासं कमलपत्राक्षं प्रणेमुर्द्विजपुंगवाः ॥६७॥**

निगमैकरसाकारू । तो यत्सूत्रप्रत्युपकारू । जो अवतरला शार्ङ्गधरू । निगममथना ॥१०७॥ भवजलमय मायासृष्टी । तेथ लिप्त नाहीं यत्दृष्टी । जेवीं पंकजपर्णपृष्टीं । जीवनालेपू ॥१०८॥ चातकीं पाहतां घन । होती परमानंदघन । तेवीं कांती पाहोनी सुजन । स्वानंदजीवन वांछिती ॥१०९॥ एवं अपनेतृपुत्रचिंता । कृष्णद्वैपायन भगवंता । पाहोनी विगत कर्त्रेऽहंता । नमिती मुनी ॥११०॥ गुरु स्मरतांचि प्रकटला । येणें

मुनिमना भाव घटला । कीं मुमुक्षु पाहिजे लगटला । संप्रदायीं ॥१११॥ श्रीगुरूचें सत्व शरीर । भरी सत्शिष्यहृदय अंतर । श्रीगुरु नाहीत ऐसा विचार । शिष्यमनीं कदा न ये ॥११२॥ म्हणोनि सूताभिधान । अत्र विलोकित्यस्मन्नयन । आतां पूर्ण सोमचयन । करूनि चरण वंदावे ॥११३॥ ऐसे आणोनिया मानसीं । प्रणाम करिती सद्भावेसी । हृदयीं मूर्ती रेखिली जैसी । बाहेरी तैसी देखिली ॥११४॥ तदा किंचित् विस्मय पोटीं । तो जिरवोनिया शेवटीं । सूतकायभूंथी गोमटी । प्रणमना उठी अति प्रेमें ॥११५॥

पपात दंडवत् भूमौ दृष्ट्वासौ लोमहर्षणः ॥
प्रदक्षिणीकृत्य गुरुं प्रांजलिः पार्श्वगोऽभवत् ॥८॥

पाहोनि सद्गुरु स्वानंदवर्षण । अंतर्बाह्य पावला हर्षण । अन्वर्थ नाम लोमहर्षण । म्हणोनि ज्याचें ॥११६॥ यत्कुर्वे मायाऽरक्षीणा । तिया प्रभूतें प्रदक्षिणा । करूनि द्यावया गुरुदक्षिणा । दंडवत् प्रणामी ॥११७॥ कां वृक्षाहुनि सुटतां । शाखा होय भूश्रिता । तेवीं सोडितां अहंकृता । दंडवत्ता कायेसी ॥११८॥ गर्वरहित काया । सांडोनी सकल उपाया । आश्रयी द्वैपायनपाया । पादुकावत् ॥११९॥ जाहला निर्गताभिमान । म्हणोनि लब्धपार्श्वस्थान । मग मुनि भावप्रवेशाविष्ट होवून । बद्धपाणी विनवितु ॥१२०॥ सूतद्वारा मुनीची भावना । आलिंगूं धावे पराशरनंदना । कीं स्पर्शोनि निगममयतनुचंदना । तापकंदना करील ॥१२१॥ तेवींचि विनवी सूत । कीं व्यासही जया म्हणे सूत । जिया गुरुवचना मुनिगणपूत । अभिप्राय ॥१२२॥

पृष्ट्वास्तेऽनामयं विप्राः शौनकाद्या महामुनिम् ॥
समासृत्यासनं तस्मै तद्योग्यं समकल्पयन् ॥९॥

कां नमी जेथ माय । तेथ पुत्राचा दंडवत होय । तेवीं सूतमानसाभिप्राय ।

प्रशंसिती द्विज ॥१२३॥ मग सूतांचिया सरिसे । सकल विनविती आपैसे । कुशल प्रश्नादि विशेषें । झालियावरी ॥१२४॥ महामुनी म्हणजे ब्रह्मनिष्ठ । आणि जयाचें नाशिलें दुःख दुष्ट । भगवद्भक्तांमाजी वरिष्ठ । ज्ञानीयोगी ॥१२५॥ एवं ब्रह्मज्ञानें ब्रह्ममय । आणि भक्तियोगाद्भावनामय । तेथ ऐसिया आसन होय । योग्य कवण ॥१२६॥ एक हृदय वेगळें करुनी । बाहेरी बैसवावया आसनीं । योग्य नोहे मुनी । द्वैपायनू हा ॥१२७॥ कीं सुवर्णाची पेटी करुनी । देहांतील प्राण काढुनी । तींत ठेविता निरोधुनी । लाभ काय ? ॥१२८॥ तेवीं हृदयांत गुरु आई । काढूनि बैसविजे कवणें ठायीं । यासि द्यावया लवलाही । आसन काय कल्पिजे ? ॥१२९॥ ऐसिया विचारें सूता सहित । व्याकुल जाहलें मुनींचे चित्त । तों आठवलें उचित । करणें जें ॥१३०॥ आणि धन । कीजे श्रीगुरूस समर्पण । म्हणोनि अविरोधीपण । बाह्यासना ॥१३१॥ अंतरीचें अर्पिलें मन । बाह्य समर्पिलें धन । मध्यापेक्षीं तनु गहन । तेही सेवार्थ समर्पिली ॥१३२॥ म्हणोनि जे जे अंतर्बाह्य । ते अवघा श्रीगुरुठाय ॥ येणें बोधे योग्य होय । ऐसें आसन देती ॥१३३॥ मग तें सनकादि समस्त । जयांची भवाशा समस्त । प्रणमोनिया स्थित । बद्धांजुली ॥१३४॥

**अथैनानब्रवीद्वाक्यं पराशरसुतः प्रभुः ॥**
**कच्चिन्न हानिस्तपसः स्वाध्यायस्य श्रुतस्य च ॥१०॥**

बाळाते बोलतां नये म्हणून । व्याकुलत्वादि चिन्हावरून । माय जाणें आपण । लागली भूक ॥१३५॥ तेवीं सनकादि मौनि । पाहोनिया महामुनी । मनोगत जिज्ञासा जाणोनी । बुझावी बोले ॥१३६॥ मग परम मंगलांमाजीं मंगल । तैसे मधुर आणि प्रेमळ । निर्केपण विशाळ । जया माजीं ॥१३७॥ ऐसें उत्तम वचनेंकरुन । पुसतां जाहला कृपाघन । श्री पराशर नंदन । द्वैपायन जो ॥१३८॥ अहो ! आपुलें तप । चालिलें आहे साक्षेप ॥

चालिले

स्वाध्याय आणि श्रुतदीप । जैसा तैसा ।।१३९।। येथ तप शब्देंकरून । पुसिले योग्य आहे कीं वर्णे । यदाश्रित कर्में करून । चित्तशुद्धि घडे ।।१४०।। आणि स्वाध्याय शब्दावसरीं । पुसिली जपोपासना परी । जवें विक्षेपाची उजरी । सहज नाशे ।।१४१।। श्रुत या शब्दें करून । पुसिलें विवेकादि चारी साधन । जो श्रवणार्थी निपुण । विवेकी तोचि म्हणोनिया ।।१४२।। एव तिहींची जरी व्यवस्था । चालिली असेल तत्वता । तरी ज्ञान व्हावया सर्वथा।वेळ नाहीं हा अभिप्रायो ।।१४३।। एवं पुसतां महामुनी। ते सकळही झाले मौनी । कीं उत्तर ये स्थानीं । देयावें काय ।।१४४।। म्हणावें कीं योग्य चालिली व्यवस्था । तरी साधन गर्व घडेल सर्वथा । आणि नाहीं म्हणावी तव वृथा । होईल भाव ।।१४५।। ऐसा चितीं करिती विचार । तें सूत जाणोनि समग्र । मुनिहृदयींचे सार । प्रश्न बोले ।।१४६।। कीं तिया प्रश्नावरून । सहजाचि कळेल मुनिकारण । कीं हें साधनसंपन्न । पूर्ण असती ।।१४७।।

सूतोवाचः—ततश्च सूतः स्वगुरुं प्रणम्याह महामुनिम् ।
ज्ञानं तत् ब्रह्मविषयं मुनीनां वक्तुमर्हसि ।।११।।

मग तो महाराज सूत । सद्गुरूतें दंडवत । प्रणाम करोनि विनवीत । बद्धांजुळी ।।१४८।। जें ब्रह्मविषयकज्ञान । जें परम गुह्य सनातन । तें सांगावयासी या कारण । तुम्हीचि योग्य गुरुनाथा ।।१४९।।

इमे हि मुनयः शांतास्तपसा धर्मतत्पराः ।।
शुश्रूषा जायते चैषां वक्तुमर्हसि तत्वतः ।।१२।।

आणि हे मुनी धर्मतत्पर । येणें शब्दें वर्णाश्रम व्यवस्था सुंदर । तापस उपासनापर । मुनीश्वर हे ।।१५०।। तैसे शांत म्हणजे साधनसंपन्न । तुमचिया सेवे अति निपुण । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आपण । म्हणोनी महाराजा

॥१५१॥ याचिलागीं ऐसिया। उपनिषदर्थोऽधिकारिया। ब्रह्मज्ञान सांगावया। आपण योग्य ॥१५२॥ आणि ते ही निःसंशय। जया ज्ञाने ब्रह्मनिश्चय। मननादिकाविण होय। श्रवणेंचि एके ॥१५३॥ ऐसे शुद्ध ब्रह्मज्ञान। एतेषां उपरी कृपा करोन। सांगावया योग्य आपण। म्हणोनि विनविले ॥१५४॥

**ज्ञानं विमुक्तिदं दिव्यं यन्मे साक्षात् त्वयोदितम् ॥**
**मुनीनां व्याहृतं पूर्वं विष्णुना कूर्मरूपिणा ॥१३॥**

आणि अज्ञानें बंधप्राप्ती। तयाची ज्ञानाविण नाहीं मुक्ती। म्हणोनी ब्रह्मज्ञानचि निश्चिती। मुक्तिप्रद सकळां ॥१५५॥ ऐसें उत्तम ब्रह्मज्ञान। पूर्वी मातें निरूपण। कृपया केलें आपण। अंगीकारोनी ॥१५६॥ मी प्रतिलोमज वर्ण। आणि हें तव तापस ब्राह्मण। म्हणूनि हें मजहून। कृपापात्र ॥१५७॥ येरव्हीं गुरो आपणांठायीं। सान थोराची ही मातु नाहीं। हें मज स्वीकारिता क्षणीं लवलाही। कळों आले ॥१५८॥ सकळ गुरुंचा गुरु। जो परमात्मा ईश्वरू। तेणें कूर्मरूपें निर्धारू। बोलिला जो ॥१५९॥ तो गुह्य न ठेवोनि मातें। उपदेशूनि केलें पुरते। तरी तेचि मुनिजनातें। उपदेशावें

**श्रुत्वा सूतस्य वचनं मुनिः सत्यवतीसुतः ॥**
**प्रणम्य शिरसा रुद्रं वचः प्राह सुखावहम् ॥१४॥**

॥१६०॥ स्वशिष्यही ब्रह्मनिष्ठ। आणि मुनीतें वर्णी स्पष्ट। म्हणोनि कृपा करोनी उत्कृष्ट। सांडिली शंका ॥१६१॥ स्वशिष्य झालिया ब्रह्मसंपन्न। गुरु मानी आपणा समान। यालागीं सूतवचना देऊनी मान। डोलवी मुनी ॥१६२॥ मग सत्यवतीप्रज्ञागर्भ। जे सगुण ब्रह्म स्वयंभ। ते व्यासमुनी सुप्रभ। ध्यानस्थ जाहले ॥१६३॥ विष्णुनें सांगितलें ज्ञान। तें प्रकाशा नये शिवकृपेवीण। की शिवें सांगितलें सूत्रभूतज्ञान। तें विष्णुकृपेवीण सांपडेना ॥१६४॥ ज्ञानं महेश्वरादिच्छेदिति। शिव ज्ञानाश्रय सांगे स्मृति। आणि उमापति रमापती। भिन्न न होती सर्वथा ॥१६५॥ सकळ विद्येचे

मूळपीठ। गुरुत्वें आदिनाथाचि स्पष्ट। आदि नारायणही प्रगट। तेणेंचि माने ॥१६६॥ हें दोन्ही मिळोनी ईश्वर। कारण ब्रह्म परिकर। भक्तालागीं साचार। दोन्हीही सत्वरूप ॥१६७॥ तमोगुणाश्रय शंकर। सत्वगुणाश्रय रमावर। हा सृष्टीकार्याचा विचार। भक्तां नाहीं ॥१६८॥ तेचि महाभारतीं। निरूपिलें यथा निगुती। जेथ उमापति रमापती। अभेदरूप ॥१६९॥

संमति श्लोकः–"रुद्रो नारायणश्चैवेत्येकं सत्वं द्विधा कृतम्।
लोके चरति कौंतेय व्यक्तिस्थं सर्वकर्मसु"॥

कारणनिष्ठ शुद्धसत्व। तदेवेशमूर्ति तत्व। ब्रह्मत्व शिवत्व विष्णुत्व। घेऊनि व्यक्तित्व विचरे लोकीं ॥१७०॥ एक गंगामूळ एक गंगास्थान। एक फणिशायी एक फणिभूषण। एक रमापति एक उमारमण। एक पक्षिवाहन एक पशुपती ॥१७१॥ एकाचे करीं सुदर्शन। एकाचे करीं सुनाभ गहन। एक श्याम एक गौरवर्ण। प्रकाशसंपन्न दोन्ही हे ॥१७२॥ शंकर चरणा जयाची रति। नाही त्या न घडे मम भक्ती। एवं बोलिले नारदाप्रती। तुलसीकृतीं भगवत ॥१७३॥ जैसें ब्रह्मज्ञान अभेद गूढ। तैसाचि भक्तींत अभेद दृढ। होवावा म्हणोनी प्रौढ। शिवविष्णु भजती ॥१७४॥ वरी रुद्रकृपासंपन्न। विष्णूनें पूर्वी सांगितलें ज्ञान। तेंचि उजळावे रुद्रकृपेंकरोन। म्हणोनि नमन करी मुनी ॥१७५॥ तो सकरुण विरुपाक्ष। मुनीनें ध्यानी आणोनि प्रत्यक्ष। प्रेमें वंदोनि अपरोक्ष। अद्वैत साक्ष बोलत ॥१७६॥ कां जयाचिया तृतीय नयनीं। धरिला यज्ञहिता वन्ही। आणि तिमिरापहरणीं। मस्तकीं शशी ॥१७७॥ कर्माकर्मापहारिणी। जी जटे माजीं मंदाकिनी। तेवीं सत्वतनू शुभ्रवर्णी। शोभला जो ॥१७८॥ एवं सर्वांगीं कर्पूरधवळा। परी कंठाचि एकू निळा। जें कंठीं गोविंद माळा। धरिली म्हणोनि ॥१७९॥ कां भक्तांची एवढी आवडी। कीं मेलिया प्रेता न सांडी। म्हणोनि चिताभस्म मांडी। अंगालागीं ॥१८०॥ उमा निजपितृ गांवां। जाऊनि यज्ञकुंडी जीवा। होमोनि वामांकीचिया दैवा। पात्र जाहली ॥१८१॥ एरव्हीं आधीच ती शक्ती। वरी तपाचिया युक्तीं। वश केले

दायक मुक्ती। परब्रह्म जे ॥१८२॥ हिमापासूनि तंव जाह्नवी। परी तपें उष्णाहूनि तापिन्नली। म्हणोनि अमूर्ति आकारा आणिली। आपुलेनि बळें ॥१८३॥ ऐसिया उमेसहित भगवंतू। जो भक्तहृदयसिद्धांतू। जो संहारक परि कृतांतू। सख्य न करी ॥१८४॥ ऐसिया वंदोनि रुद्रा। आणि आश्वासोनि द्विजेंद्रा। ब्रह्माद्वैतप्रेमझरा। आरंभी बोलो ॥१८५॥

व्यासउवाचः—वक्ष्ये देवो महादेवः पृष्टो योगीश्वरैः पुरा ॥
सनत्कुमारप्रमुखैः स्वयं यत् समभाषत ॥१५॥

मग तो ऐसे म्हणें। जयाचिया हृदयींचे नाणें। हरीहरमय प्रमाणें। जाणतसे जे ॥१८६॥ हें असो ज्याचिया ध्यानें। योग साध्य होणें। हें योगाचार्यीं बोलणें। सूत्रें केले ॥१८७॥ सूत्रः—"वीतरागविषयं वा चित्तम्"। आणि ब्रह्मसूत्रा आतौती। आधिकारिकांचिये पंक्तीं। जया बैसवूनी श्रुती। ठाकली राहे ॥१८८॥ जे अंगे कीर योगी। परी लोकोपकारालागी। ब्रह्मनिष्ठही परी विभागी। शिष्यत्वाच्या ॥१८९॥

सनत्कुमारः सनकस्तथैवच सनंदनः ॥
अंगिरारुद्रसहितो भृगुः परमधर्मवित् ॥१६॥
कणादः कपिलो गर्गों वामदेवो महामुनिः ॥
शुक्रो वसिष्ठो भगवान् सर्वे संयतमानसाः ॥१७॥
परस्परं विचार्य्यन्ते संशयाविष्टचेतसः ॥
तप्तवन्तस्तपो घोरं पुण्ये बदरिकाश्रमे ॥१८॥
अपश्यन्स्ते महायोगमृषिं धर्मसुतं मुनिम् ॥
नारायणमनाद्यन्तं नरेण सहितं तदा ॥१९॥
संस्तूय विविधैः स्तोत्रैः सर्ववेदसमुद्भवैः ॥
प्रणेमुर्भक्तिसंयुक्ता योगिनो योगवित्तमम् ॥२०॥

ते सनक सनंदन सनत्कुमार। अंगिरा भृगु धर्मतत्पर। तैसे परम विचारा

कर। कणाद कपिल गर्ग ॥१९०॥ आणि वेदामाजीं मुक्ती। जयाची प्रशंसिली निगुती। तो वामदेवो महामती। आणि शुकही तैसा ॥१९१॥ आपुलिया ब्रह्मज्ञानीं। जो विष्णुसही शिष्यत्वा आणी। तो भगवान् वसिष्ठ मुनी। नियमयुक्त ॥१९२॥ एवं सकलही यती। सकाळांचियाही चित्तीं। विषय भावाची आर्ती। कदां नोहे ॥१९३॥ ऐसिया पूर्ण योगेश्वरा। कृपावंत होवोनि पुरा। जे बोलोनिया उदारा। साच केले ॥१९४॥ ते शंकराचे बोल। श्रुतिमय सखोल। तुम्हांसी सांगेन सकळ। द्वैपायन म्हणे ॥१९५॥ तरी इतुकिया मुनी। भेटी व्हावया शूलपाणी। गाथा आदि कारणीं। बोलिजे एक ॥१९६॥ हे सकळही नियतचित्त। ब्रह्मनिष्ठही विख्यात। परी निवडावया श्रुत्यर्थ। विचारिते झाले ॥१९७॥ म्हणोनि नाना संशय। आपुल्या चित्तीं घेवूनि स्वयें। लीळया शिष्यत्व उपायें। संपादिलें ॥१९८॥ मग तिया बदरिकाश्रमीं। जाऊनि सकळ उर्मी। तपाचिया संभ्रमीं। स्थितीमंत जो ॥१९९॥ आणि धर्माचि जयाचें कारण। एरव्हीं ब्रह्ममय अंतःकरण। ऐसा नर सहित नारायण। देखिला सकळीं ॥२००॥ मग गर्व दुरी टाकिलें। आणि बद्धांजुली ठाकले। लीळा बालैव थोकले। आवडीवशें ॥२०१॥ मग ब्रह्माचा प्रथमांकुरू। जो वाणिरूपें ज्ञानसागरू। तया वेदाचा स्तोत्राकारू। अवतार आणिला ॥२०२॥ एवं जाहलिया स्तवन। साष्टांगें करिती नमन। जें वाचे पडेल मौन। म्हणोनिया ॥२०३॥ आणि तया नमस्कारा माजीं। चित्तही भक्ति साम्राज्यीं। जे पाय देवोनी स्वाराज्यीं। निष्काम झाले ॥२०४॥ ऐसें सकल योगीश्वर। तो योगविद्वरिष्ठ करुणाकर। नारायण साक्षात् शार्ङ्गधर। नमिती तयातें आवडीं ॥२०५॥

विज्ञाय वांच्छितं तेषां भगवानपि सर्ववित् ॥
प्राह गंभीरया वाचा किमर्थं तप्यते तपः ॥२१॥

मग सर्ववेतृत्वपणें । साक्षी होऊनि वासनें । मुनीचिया जाणूनि म्हणे । गंभीरवाणीं ॥२०६॥ तरी जे प्रणवाचें जिव्हार । ऐसें वचन गंभीर । येणें मिषें निर्धार । आश्वासनाचा ॥२०७॥ तुम्ही सकळ विवेकी भूप । कायिसया-साठीं तपता तप । ऐसी भगवद्वाणी साटोप । ऐकूनि मुनी बोलती ॥२०८॥ कां पाप जावया सरिसा । वेळू ये जैं आपैसा । तैं गंगेचा जैसा । आठवू होय ॥२०९॥ कां मरणाची फेरी । चुकवावया निर्धारीं । अमृताची झारी । अवचिता दिसे ॥२१०॥ नातरी निवटावया जनमारू । पुढां देखिजे अश्विनीकुमारु । तेवीं कैवल्यसूचक गुरू । ब्रह्मनिष्ठ देखिला ॥२११॥ कीं पोटा येईल भगवंत । म्हणोनि वसिष्ठ पुरोहित । नातरी पुत्रचिह्न सूचित । ऋष्यशृंगागमन ॥२१२॥ कां आधीं युधिष्ठिराची । सिद्धि मिळवावयाची । म्हणूनि सूचना विदुराची । पातली जैसी ॥२१३॥ नातरी वसुदेवमोचन । होवावयाचें चिन्ह । देवकीचें वायन । घेतलें देवें ॥२१४॥ तेवीं सद्गुरूचें दर्शन । हें कैवल्या परम चिन्ह । कीं फळा आधीं सुमन । तैसे आश्वासन श्रीगुरूचें ॥२१५॥ हें जाणोनि आपुलें चित्तीं । मग हर्षाविष्ट बोलती । तया विश्वात्मयाप्रति । आतितर विनयें ॥२१६॥

**अब्रुवन् हृष्टमनसो विश्वात्मानं सनातनम् ॥**
**साक्षान्नारायणं देवमागतं सिद्धिसूचकम् ॥२२॥**

म्हणती आम्ही सकळ । ब्रह्मवादी केवळ । परी श्रुतिनिर्णयीं प्रबळ । संशयाविष्ट ॥२१७॥ नातरी आपुलिया मतीं । शुकें जाणोनि संविती । मग संशय होऊनि पितयाप्रती । पुशिली तेचि ॥२१८॥ परी तेणें कथितांही संशयो न जाय । म्हणोनि जनका शरण होय । ऐसें ऐकिलें स्वयें । बृहद्वासिष्ठीं ॥२१९॥ एवं ब्रह्म जाणालियाही वरी । कदाचित् संशयाची उजरी । हें विद्यारण्यमुनीश्वरीं । अंगिकारिलें ॥२२०॥

संमति श्लोकः–"ग्रंथिभेदेऽपि संभाव्या इच्छा प्रारब्धदोषतः ॥
बुध्वापि पापबाहुल्यादसंतोषोयथा तव" (चित्रदीप) ॥२६३॥

म्हणोनि ब्रह्मज्ञानानंतर । न सोडिजे सत्संगाधार । आणि श्रुत्यर्थविचार । न सांडिजे ॥२२१॥ तरी आपुलिया दर्शनें । पाप गेले हे मानूं मनें । आतां संशयाचें फेडणें । समर्थें कीजे ॥२२२॥ कां बालक होय जाणतां । परी प्रेमें न्यून नोहे माता । तेवीं आम्हां समस्तां । जनकजननी तुम्ही ॥२२३॥

वयं संशयमापन्नाः सर्वे वै ब्रह्मवादिनः ॥
भवंतमेव शरणं प्रपन्नाः पुरुषोत्तमम् ॥२३॥
त्वं वेत्सि परमं गुह्यं सर्वं तु भगवान् ऋषिः ॥
नारायणं स्वयं साक्षात् पुराणोऽव्यक्त पूरुषः ॥२॥
नह्यन्यो विद्यते वेत्ता त्वामृते परमेश्वरम् ॥
स त्वमस्माकमबलं संशयं छेत्तुमर्हसि ॥२५॥

आणि तूं पुराणपुरुष । तूं अव्यक्त हृषीकेश । भक्तार्थ तापस वेष । धरिला दिसे ॥२२४॥ परम गुह्य जें ज्ञान । तें तुझें तूंचि जाणसी संपूर्ण ॥ तरी हें सकळांचें भाषण । उपसाहिजोजी ॥२२५॥ आणि तूं शरण तूं गति । म्हणोनी आम्हांप्रति । सांभाळोनि संशयानिवृत्ति । करिजे देवा ॥२२६॥ एरव्हीं तरी सूर्यपण । कवण अधिष्ठी सूर्यावीण । कीं औषधीचा गुण । वैद्यावीण कवण जाणें ॥२२७॥ नातरी बाप्रेमाची कळा । कवण जाणें मायवेगळा । कीं परमामृतरसगोळा । रसनेवीण कवण जाणें ॥२२८॥ कां निकें जे आपुलेपण । कवण जाणें आपणावीण । तेवीं त्वदुक्त श्रुति-ज्ञान । तुजवीण कवण जाणता ॥२२९॥ ऐसें मुळींचेंचि पाहे । वरी हें शरीरही धरिलें आहे । अतः संशयछेत्ता नोहे । भवंतं विना ॥२३०॥

किंकारणमिदं कृत्स्नं कोऽनुसंसरते सदा ॥
कश्चिदात्मास्यच का मुक्तिः संसारः किन्निमित्तकः ॥२६॥

तरी श्वेताश्वतरश्रुती । आधिष्ठूनि मति । ऐकिजे श्रौत रीति । प्रश्नांचिया

॥२३१॥ तरी हें विचित्र जग । पेलले आहे सैंध । तयातें कारण संग । कोणता देवा ॥२३२॥ येथ सामान्य तरी जाणो । परी विशेष सर्वथा नेणो । जें कांहीं तरी कारणो । या जगा म्हणोनिया ॥२३३॥ ( कारणो=कारण असले पाहिजे असा अर्थ). हां हो जी कारणाविणें । कार्या केंही न देखणें । काई भोजनाविणें । तृप्ती आहे ॥२३४॥ कां नालिंगुनिया प्रमदा । पुत्रोत्सवसंपदा । कवणें गृहीं विशदा । जाहली आहे ॥२३५॥ म्हणोनी साच हें ऐसें । या कारण तंव असे । परी विशेष कैसे । तें नेणो सकळ ॥२३६॥ आणि कोणत्याहि कारणाभावें । कार्य हें जरी साधावे । तरी प्रतियोगीज्ञानाविण नोहे । कारणाभावासिद्धी ॥२३७॥ आणि कार्य भावपण । तरी प्रागभावा पाहिजे अधिष्ठान । किंवा कार्यप्रागभावनाशेंकरून । कार्यप्रतियोगिता उमटे ॥२३८॥ तैसा कार्यप्रध्वंसाभाव । तो सादि अनंत स्वयमेवो । म्हणोनि कार्योत्पत्ति ठाव । तेथोनि न घडे ॥२३९॥ आतां अन्योन्याभावें करुनी । कार्यसिद्धी मानितां क्षणीं । कोण्याहि वस्तूपासूनी । कांहींहीं उपजावे ॥२४०॥ नाकापासोनि निघावा मंचक । नदीपासोनि निघावा रंचक । आणि वाळुकेपासोनि अज्ञानवंचक । हातां यावा ॥२४१॥ हें काय बोलणें अशुद्ध । मुखापासूनि होवावे गुद । जरी अन्योन्याभावें प्रसिद्ध । कार्यसिद्धि ॥२४२॥ आणि अत्यंताभावें जरी । कार्यसिद्धीची परी । अत्यंताभावाची तरी । सुलभता आहे ॥२४३॥ म्हणोनि सर्वत्र सर्व कार्योत्पत्ति । सर्वदाची होवावी निश्चिती । विरोधविचार चित्तीं । न येतांही ॥२४४॥ माता पिता नंदन सून । तमः प्रकाश जननमरण । निश्चय संशय प्रमाणाप्रमाण । एकत्र संपूर्ण उपजावे ॥२४५॥ एवं अभावे करून । कांहींच नाहीं उत्पन्न । हे कळलें परि तेंचि कारण । विशेषें कैसे ॥२४६॥ तैसा येथ दुःखसागरीं । सदा कवण फिरे संसारी । आपण म्हणावा तरी । स्वदुःखचाड कवणा नव्हे ॥२४७॥ जरी दुःखदाता ईश्वरू । तरी तो निर्दय विषम थोरू । कर्म फिरवे तरी ते निर्धारू ।

जड आहे ॥२४८॥ तैसे काळस्वभावादिक। जड फिरवूं न शकती देख। एवं हाही एक। संशयो आहे ॥२४९॥ तेवीं यज्ञाने कैवल्य खरा। ऐसा श्रुतींचा डांगोरा। तो आत्माही विशद करा। कृपा करोनी ॥२५०॥ आणि सकळ सुखामाजीं पुढारी। ज्ञानिये झेंप घालिती जीवरी। ते भक्तिमातृदत्ता नोवरी। मुक्ती कोणती? ॥२५१॥ तैसा सकळ भयाचा सागरु। जो सकळ दुःखाचा महामेरू। जो त्रिविधतापांचा डगरू। कीं महामगरू निर्दयतेचा ॥२५२॥ जो विषमाचें घर। जो विकारांचा बिढार। जो काळाचे सासुर। हुंडा घ्यावया ॥२५३॥ तो संसार दुःखयुक्त। उद्भवला कवण निमित्त। हें सकळ कृपा करोनी यथार्थ। निरूपिजे स्वामी ॥२५४॥

कः संसारपतीशानः को वा सर्वं प्रपश्यति ॥
किं तत्परतरं ब्रह्म सर्वं नो वक्तुमर्हसि ॥२७॥

ऐसियाहि दुःखयुक्ता। कर्ता हर्ता आणि पाळिता। आहे म्हणोनि वार्ता। सर्वप्रसिद्ध ॥२५५॥ तरी तो संसारपती। ईश्वर आहे कवण रीती। आणि याचा साक्षी निश्चिती। कवण आहे ॥२५६॥ नातरी हें आघवें आपण। उत्तर घाल ब्रह्म म्हणोन। तरी तेचि ब्रह्म कवण। केंवीं जाणिजे ॥२५७॥ एवं हें आमुचे समस्त। संशय वसती असत। येणें आम्ही अस्त। पावूं पाहतो ॥२५८॥ तरी जैसे असेल तैसे। सांगावया आपैसे। आम्हां आपणाहूनि सरिसे। आन ते नोहे ॥२५९॥

॥ श्रीमत् ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

(अपूर्ण)

॥ श्रीमत् सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ब्रह्मसूत्रव्याख्या

**श्रीबादरायणं नत्वा शंकराचार्यमीश्वरम् ।**
**मया ब्रह्मसूत्रव्याख्या बालबोधाय तन्यते ॥१॥**

ॐ नमोजी सद्गुरु । तूं शिष्यचकोरा अमृतकरू। तुझेनि हा भव पारू । साविया घडे ॥१॥ योग सांख्य वेदांत । या तरुवरा तूं वसंत। सख्या षड्रिपू होती शांत । तुझेनि कृपें ॥२॥ अविद्येचिया उल्हासी। चैतन्य आले बंधनासी। तयाच्या धांवे सगुणासी । सगुणेसी आलासि देवा ॥३॥ कीं तुझेनि बळें सकळ । हाता चढे मोक्षफळ। मरे पुंजाळले प्रबळ । मायादंव ॥४॥ माये तुझिया दृष्टीपुढें। थोर सान हें न सांपडे। कैवल्य यश हाता चढे। भलतियांच्या ॥५॥ अवो तूं भक्ता अभयदात्री। विश्वपरम हितकर्त्री। तरी ब्रह्ममीमांसा पात्रीं। वैसवी माते ॥६॥ सखे ज्ञानेश्वर माऊली। मातेंचि तूं पान्हावली। तरी ब्रह्मरसा उवायिली। पात्रें भरी ॥७॥ गणेश आणि सरस्वती। ती कृपा तुमचीच महामती। तरी विघ्ने वारूनि कृपामूर्ती। द्यावी स्फूर्ती ग्रंथातें॥८॥ असो आतां प्रसंग नागर। जो स्वानंदसुधारत्नाकर। तो ऐकिजोत चतुर। अवधान दाते ॥९॥ युष्मत्-अस्मत्-प्रत्ययगोचर। विरुद्ध जेवीं प्रकाश अंधार। ते विषय विषयी परस्पर। अध्यासिले ॥१०॥ तेथ एका संसर्गिला। एका स्वरूपें उवायिला।

ऐसा अन्योन्य संबंधिला। अध्यासू हा ॥११॥ हाचि तादात्म्य प्रसंगू। चिदात्म्याऽविद्यासंगू। यत्रस्थ लावे लागू। विस्मरणाचा ॥१२॥ असदात्मान्यथा आख्याती। घेवूनिया पूर्वस्मृति। लाहे अवभासाकृति। समानत्वें ॥१३॥ तिया अयुक्तीनें अनिर्वाच्य। अनादिसांताऽनिर्वाच्य। तन्निवृत्ति आहाच। पाहिजे याते ॥१४॥ म्हणोनि इया मीमांसा अवतारू। सूत्ररूपें सगुणाकारू। बाळत्वींही कृपा शंकरू। भाष्याकारू तरुगळा ॥१५॥ तोंचि पाहुनि प्रमेय। बोळावा गुरुप्रसादप्रत्यय। याळागीं उल्हासू स्वयें। आदरिला ॥१६॥ तरी आतां कृपायोगू। संतावधाने घडे संगू। हें कें त्वरित पांगू। फिटे तमाचा ॥१७॥ हा हो उपनिषदांचा। अर्थु मथुनिया साचा। सपुरु व्यासबुद्धीचा। थांबला जेथ ॥१८॥ करुनि ब्रह्मसूत्राचें मीस। अवतरले वाङ्मय व्यास। तरी तत्पदीं श्लेष। करूं चला ॥१९॥ मार्ग काढावया आधीं। अवधान द्यावे संतबुद्धी। अर्थ ज्ञानेश्वरकृपें संधी। होता चढें ॥२०॥ तरी तें सकळ व्यापक। प्रथम सूत्र अनुबंधात्मक। सावध होऊनियां सकळिक। परिसा आतां ॥२१॥

**ॐ अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥१॥**

**पदच्छेद**—अथ अतः ब्रह्मजिज्ञासा। तरी अथ शब्दानंतर्यार्थक। अतः शब्द हेतुदर्शक। ब्रह्मशब्द चिद्वाचक। नित्यशुद्धाचा ॥२२॥ ज्ञापद ज्ञानमात्र। सापद इच्छामात्र। म्हणोनि अर्थ स्वतंत्र। ब्रह्मजिज्ञासा ॥२३॥ तरी श्रुत्यनुरोधें। कर्मफल अनित्य लाधे। म्हणोनि ब्रह्मजिज्ञासानुवादें। कर्तव्य असे ॥२४॥

**श्रुतिः**–"न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानुशुः"॥१॥

**श्रुत्यर्थः**– हो राजसे यागादिकें। उपाये पशुहिंसकें। तेथे अपवर्ग मोटके। नास्तिक्य पावे ॥२५॥ म्हणोनी एकया त्यागे। अमृतत्व होता लागे। इया श्रुतिमार्गे। कर्म निषेधू ॥२६॥ कर्मनिषेधें कर्मफल। अनित्य जाहलिया सकळ। नित्यानित्यविवेक प्रबळ। करणें लागे ॥२७॥ हें छांदोग्य उपनिषदीं। सनत्कुमार नारदानुवादी। तिया श्रुति प्रमाणवादी। घेपणें पडे ॥२८॥

श्रुतिः-" **यो वै भूमा तदमृतंमथ यदल्पं तन्मर्त्यम्** ॥२॥"

**श्रुत्यर्थः**- भूमा म्हणजे पूर्ण। तेंचि नित्य अमर जाण। आणि जे अनित्य अपूर्ण। मृत्युरूप तें ॥२९॥ इत्यादि श्रुति पाहतां। लाहे नित्यानित्यविवेकता। मग इहपरभोगीं विरक्तता। श्रुत्यनुरोधें आणावी ॥३०॥

श्रुतिः-" **तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यचितो- लोकः क्षीयत इति** " ॥३॥

**श्रुत्यर्थः**- कीं हा लोक कर्में पावला। कर्म सरितां जेवीं लोपला। तेवींच हा पुण्य लोकू जाहला। क्षया पात्र ॥३१॥ इत्यादि श्रुतिचेनि बोधें। इहपर भोग त्याज्य नुमुधें। दोष विचारें चित्त निरोधें। प्राप्तता ये त्या ॥३२॥ आतां शमादिषट्कसंपत्ति। शम दम श्रद्धातितिक्षोपरति। समाधान इयाही श्रुति। साम्रता दे ॥३३॥

श्रुतिः-**शांतो दांत उपरतस्तितिक्षुः** ॥४॥

**श्रुत्यर्थः**- योगें यमद्वारें स्वभावरोध। नियमद्वारें इंद्रियरोध। करणें हाचि शुद्ध। शमदमभाव ॥३४॥ कामक्रोधादि अंतर्विकार। ते रोधणें तो शम। आणि बाह्येंद्रिया विषयी थार। न देणें हा दम असे ॥३५॥ स्वयेंचि इंद्रिय विषया न घेती। या नांव बोलिजे उपरति। आणि द्वंद्वसहनशक्ति। ती तितिक्षा ॥३६॥ ऋषि गुरु वेदांतीं। ज्याचिया विश्वासा अत्यंति। ती श्रद्धा चित्तार्जवस्थिति। समाधान कीं ॥३७॥ ऐसिया परी मुमुक्षा। श्रुति दे स्वयें शिक्षा। तयाचिया अर्थप्रत्यक्षा। पाहिजे केले ॥३८॥

**श्रुतिः-यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति ॥५॥ सोऽश्नुते सर्वान्कामान्सह ॥६॥**

**श्रुत्यर्थः**- जे पूर्ण तेचि गा सुख। अल्प तेथे असे दुःख। साधक त्यागोनि तें दुःख। पूर्णकाम सुख पावतसे ॥३९॥ या दो श्रुतींचेनियोगें। मुमुक्षत्व करी लागे। ही चारी साधनें अंगे। साधिली जेणें ॥४०॥ तयांनीं

ब्रह्मजिज्ञासा । करणें अध्याहारू ऐसा । श्रुत्यनुरोधे आपैसा । घेणेचि लागे ॥४१॥ तरी बृहदारण्यकीं । मैत्रेयीते याज्ञवल्क्यीं । बोधिलेसे एकाकी । विधिवाक्यत्वे ॥४२॥

**श्रुतिः–आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यो निदिध्यासितव्य इति ॥७॥** **श्रुत्यर्थः**– अरे मैत्रयी परमात्मा । श्रवण दर्शन मननोपमा । आणोनि ध्यानी तदात्मा । होवोनी लीजे ॥४३॥ एवं श्रुत्याधारे । साधन चतुष्टयाचेनि परे । ब्रह्मज्ञान-इच्छा बारे । करणें लागे ॥४४॥ इया अधिकरणें निरूपण । ब्रह्मजिज्ञासा कर्तव्य पूर्ण । बोलिलें तें किंलक्षण । शिष्यप्रश्नादरी ॥४५॥ तरी तें तटस्थ । बोलावया अनुगत । आक्षेपापवाद संगत । द्वितियाधिकरण प्रारंभू ॥४६॥ इति ॥१॥

( अपूर्ण )

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली प्रसन्न ॥

# छंदप्रदीप

### श्लोक

आळंदिवल्लभपदा प्रणमोनि भावे ।
जीवास आवडि म्हणूनच नव्यभावे ॥
केले न कोणि करुनी श्रम तेचि आतां ।
छंदप्रदीप रचितो सुखदायि गाता ॥

### गीति

काव्ये करिती त्यांचा विटाळ आम्हां नको अशी वाणी ॥
तुकाराम वदले परि तात म्हणति काव्य चांगले वाणी ॥१॥
दोघामध्यें मजला तातवचन मान्य आदिचें होय ॥
तुकारामकृतनिंदा भक्तिरहित काव्य त्यावरी जाय ॥२॥
काव्यें श्रमजन्यें तीं गौण होति जरि महामत्यपेक्षें ॥
तरि हरिरस वर्णाया श्रम करणेंही न येचि समुपेक्षें ॥
ध्वनिवांचुनि चट कविता तरि त्यालाही उपेक्षिती सुकवी ॥
यास्तव कृष्णगुणातें गाता होतोच काजवाहि रवी ॥४॥

### श्लोक

" भूतावेशनिवेशिताशय इव श्लोकं करोत्याशु यः ॥
श्लाघंते कविरभ्दुतोयमिति तं मिथ्या जना विस्मिताः ॥

द्वित्राण्येव पुरः पदानि रचयन् पश्चात्समालोचयन् ॥
दूरं यः कवितां निनीषति कविः कामीव सः स्तूयताम्" ॥५॥

**अभंग**

पूर्व स्मृतीचा या सांगतो भावार्थ ॥ उगा नका अर्थ द्वेषू कांहीं ॥१॥
मनीं होय भूत लागल्या सारिखा ॥ रचूं लागे श्लोका वातवेडा ॥२॥
मिथ्या लोक बोले तया कवि धन्य ॥ परि न तो मान्य रसाविण ॥३॥
एक दोन पदें रचोनिया आधीं ॥ पुढें रस शोधी प्रेमभरें ॥४॥
कामिनीच्या संगे कामियासी सुख ॥ त्याहुनि अधिक रस न या ॥५॥
सर्वांत वरिष्ठ कृष्ण भक्ति प्रेमा । श्रमेंहि गरिमा पावेचि तो ॥६॥
स्तवावया पाय तो एक सुंदर ॥ विठ्ठलकुमारबाळा म्हणे ॥७॥

**ओव्या**

" वाचे बरवे कवित्व । कवित्वीं बरवे रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व । स्पर्शू जैसा " ॥१॥ ऐसे तातवचन । भगवद्गुणास्तव श्रमही करोन । कवित्वीं विसरेल देहभान । तरी होय महाकवी पूर्ण प्रसादे पुढें ॥२॥ येथें वर्जावा अहंकार । अहंकारें प्रसादही न मानी ईश्वर । मुखें बोलोनी निरहंकार । पोटीं गर्व तेही मिथ्या ॥३॥ हरिप्रेमवेडे होवावे । मग सुचेल तंव कवित्वश्रम करावे । अथवा कवित्वश्रमें उपासन करावे । तरी फळ पावे ॥४॥

**श्लोक**

" तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन् प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।
नामान्यनंतस्य यशोंकितानि यत् श्रुण्वंति गायंति गृणंति साधवः॥ ६॥

**भावार्थ अभंग**

सांगतो रहस्य याहि वचनाचे । हरीच्या गुणाचे गान जेथे ॥१॥
अशुद्धहि काव्य ते आवडे संता । इतर कविता फोल सारी ॥२॥

हरीसाठीं केलें वाया जाती श्रम । तरी जप धर्म तोही व्यर्थ ॥३॥
जरी मुनिसम न स्फुरेचि वार्ता । श्रमें तरी कथा करावीच ॥४॥
श्रमाचेहि फळ तेचि पुढें होय । मुनींचाही होय हाचि मार्ग ॥५॥
म्हणोनि आळंदीवल्लभ वंदाया । न धरी हृदया लज्जा कांहीं ॥६॥

### श्लोक

गीतें न होती कधि वर्णवृत्तें । तीं सर्वदा मात्रिक सर्व वृत्तें ॥
ऱ्हस्वाक्षरी एकचि मातृका ती । दीर्घाक्षरींच्या परि दोन होती ॥१॥
तीन प्लुताच्या जरी मातृकाही । छंदांत त्यांचा उपयोग नाहीं ॥
प्रस्तार गीती करिता म्हणाव्या । याहोनि आना श्रमजा गणाव्या ॥२॥
चार मात्रा अशा होती प्लुतऱ्हस्वनिदर्शनें ।
प्लुत दीर्घ निदेशानें पांच मात्राहि बोलती ॥३॥
प्लुत प्लुत निदेशानें मात्रा होती सदा सहा ।
प्लुत प्लुत ऱ्हस्व वर्णे सात मात्रा असे पहा ॥४॥

### मिश्री

चाषपाक्षि उच्चारी ती मात्रा बोलिजेचि अवांकिडे ॥
तालास काळ त्यांचे सूज्ञांनीं कल्पिलेति तीन फुडे ॥५॥
अवसानहि ऱ्हस्वसमचि येता द्रुत काल बोलिजे तो कीं ॥
द्विगुणें मध्य म्हणावा त्रिगुणें तोची विलंब होतो कीं ॥६॥

### वसंत-तिलक

ताळीं मिळे तरि पुरे न लगेऽन्यवृत्त । हे बोलती मजाशि ते गमाति प्रमत्त ॥
येणें वृथा सुजयदेवज काव्य होते । आचार्यसूक्त तासि चर्पटपंजरी ते ॥१॥
ज्या चालिनें चालत इंद्रवज्रा । त्या चालिनें जाय उपेंद्रवज्रा ॥
तैसीच चाले उपजाति तेही । कां भेद यांचा तरि छंदगेहीं ॥१॥

## गीति छंद

गांधर्व छंद होती सम विषम समासमे असे त्रिविध ॥
समयमकाक्षरगुरुलघु विषम समासमहि मात्रि मिश्रविधे ॥१॥
बहुधा नियम असे हा अपवादे येति ते पुढें सांगू ॥
सम पूर्णांक विभागे विषमाचा ये अपूर्णचि विभागू ॥२॥
गुरुलघुविन्यासानें ध्रुवपद अंतर पूर्वोत्तरहि दले ॥
कधि सम कधि विषमहि परि ताल धरिति ते समासमे सगळे ॥३॥
वृत्तें बहुविध भेदें करिता त्यजिजे न ताल रागाला ॥
सामान्य शास्त्र सुचवी स्वगति त्रिशिष्टाधिकृति विभागाला ॥४॥
अच सकलहि शुभ असती हल मंगल अशुभ दग्ध भेदानें ॥
त्रिविध असें हे सांगू जे कथिले पूर्वि छंद सिद्धानें ॥५॥
कवर्गी चतुष्का चवर्गी त्रिकाला । डकारा दकारा धकारा नकारा ॥
यकारा शकारा सकारा धकारा । शुभें व्यंजनें जाणणें वृत्तकारा ॥१॥
कवर्गात ङला चवर्गी झगाला । टकारा ठकारा ढकारा णकारा ॥
तकारा थकारा पवर्गा वराला । षकारा हकारा अशुभांत घाला ॥२॥
झकारा हकारा रकारा भकारा । पकारा तशी दग्ध संज्ञा विचारा ॥

### श्लोक

**कवित्वामधें आधि हे कै न यावे । शुभें वापरी दीर्घ वा देवनांवें ॥**
**तकारास कोणी शुभीं ठेवताती । अशुभीं घधाना प्रती गोविताती ॥१॥**
**खकाराप्रती बोलती दग्धवाणी । तरी देवनांवे शुभे सर्व मानी ॥**

### गीति

वर्ण मातृका गण हे दूषित जे वर्णिले बहु ग्रंथी ॥
देवनाव घटित तरी न करिति ते कधिहि विघ्न कविपंथी ॥६॥
अशुभ दग्ध दोषाते भगवन्नामचि अखंड परिहारी ॥

अघहर हरिहरनांवें गर्जुनि हे वेद सांगती चारी ॥७॥
विराम यति समजावे यमकें ही तशि पुढोंचि गानांत ॥
विशेष वाटल बहुते ये ना जे बालकानुमानांत ॥८॥
विसर्गसंयोगानुस्वारें पूर्वील वर्ण गुरु होती ॥
यत्यंती पादान्तीं अवयव लघु गुरु विकल्पता होती ॥९॥
भाषेमध्यें लघु गुरु होति विकल्पें अ इ उ ऋ ऌ हे पांच ॥
आ लघु कोरिती कोणी परि ए ऐं ओ औ न होति लघु साच ॥१०॥
माझे मत कीं अशुमही पडल्या अक्षर चुकोनि पद्यांत ॥
दोष हरी हरिनामचि असल्या कवितेंत आदि मध्यान्त ॥११॥
धृवपद अंतर चालन अंगे ही तीन येति गानांत ॥
धृवपद म्हणजे येणें गाता गाता पुन्हा ठिकाणांत ॥१२॥
अंतर तें धृवदापेक्षां ज्या अधउर्ध्वता विवक्षेनें ॥
चालन म्हणती त्या जे अंतरि सम उठत गान शिक्षेनें ॥१३॥
चालन रहिताचि गीते प्राकृत संस्कृत सुराग तालांत ॥
असति बहुत तरि चालन वृद्धी भाषा कवित्व कालांत ॥१४॥
अक्षर मात्रा भेदें गान छंद बोलती द्विधा सुकवी ॥
अभंग अक्षर वृत्तें पदमात्रावृत्त जे न गति चुकवी ॥१५॥

## अभंग

प्रथम अभंग बावीस अक्षरीं । बारावे अक्षरी यमक ये ॥१॥
तैसेचि यमक अठराव्या वरी । पुढें येती चारी अक्षरें ती ॥२॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । वागवी पांगुळा पायावीण ॥३॥
उदाहरण हे ओळखावे याचे । आळंदीश्वराचे गुण गाया ॥४॥
अभंग रीति दुसरी । चरण आठ अक्षरीं ॥१॥ अंती यमक सुंदर ।
राग ताल मनोहर ॥२॥ ब्रह्म सगुण निर्गुण । तुका आरंभी कीर्तन ॥३॥
उदाहरण हे याचे । आळंदीश गाया साचे ॥४॥

अभंग तिसरा । आधी पद षडक्षरा ॥१॥ दुसरें ते अष्ट। यमक पदांन्ती स्पष्ट ॥२॥ तुका म्हणे छंदे ॥ मन मोहिले गोविंदे ॥३॥ उदाहरण हे॥ आळंदीश गाया पाहे ॥४॥

अहो चवथा अभंग । पादीं अंग पंधरा ॥१॥ यमक आठव्यावरी । बारावरी दुसरे ॥२॥ संत दर्शनी हा लाभ । पद्मनाभ जोडिला ॥३॥ बरें उदाहरण हे । गाता लाहे ज्ञानेशू ॥४॥

अभंग पांचवा । अवयवा तेरांचा ॥१॥ सहावीं यमक । दुजे एक दहावीं ॥२॥ न पाहता पाया। गेलो वाया सर्वस्वें ॥३॥ आळंदी वल्लभें। राही उभे माउली ॥४॥

सहावीया त्या अभंगी । वर्ण एकतीस अंगी । आठा आठानें प्रसंगी । येती तीन यमकें ॥१॥ आज देखिली पंढरी । नाचताती वारकरी । भार पताकाचे करीं । भीमातीरीं आनंदू ॥२॥ अभंगाची पदें चार । असती हाचि निर्धार । अंती मुद्रा राहे सार। पद्यकार नांवाची ॥३॥ नियम हा उलंघोनी । पूर्वी न्यूनाधिक वर्णी । झाले आर्ष प्रयोगानीं । ते तो मान्य सर्वथा ॥४॥ परी आम्हांसम जीवे । येणें नियमें चालावे । स्वामी आळंदीश गावे । तारी नावें सकळां ॥५॥

अहो सातवा अभंग । घनाक्षरी नाम चांग । प्रतिचरण प्रसंग। एकतीस अक्षरीं ॥१॥ आठ आठावरी जाण । तीन यमकें समान । चवथें यमक मान । चरणांन्त अक्षरीं ।।२॥ अहो कैकेयी हे काय । हे उदाहरण होय । पाही जावोनिया सोय । पद्य खोटी कीं खरी ॥३॥ आळंदीश दीनानाथ । गातां शिरीं कृपाहात । ठेवोनिया बळें नेत । भवपार सत्वरीं ॥४॥

## गीती

न्यूनाधीक अभंगी होती ते अर्धगद्द असें माना ॥
क्षमा दोष करी हरी तो लक्षा त्यजुनि करा सुगुण गाना ॥१६॥

साखी गीत विभेदें मात्रा पदवृत्त ही द्विधा वसते ॥
पुराण नवीन भेदें साखी वृत्तहि पुनः द्विधा वसते ॥१७॥

## साखी

पहिली साखी दोन पदाची अठ्ठाविस मात्रानीं ।
पादपूर्ण यमक अंति गद्वय ज्ञानराज गुणगानीं ॥१॥

नव साखी अंतरांत ऐशिच ध्रुवपद दोन दलाचे । पूर्वदळीं दशमात्रा उत्तरा चवदा घटित सुसाचे । एक गुरु अंती । अथवा दोहिची न खंती ॥१॥ अलकावति वल्लभ करुणाघन गाता नवनव छंदे । हृदय विषयवश मुरडुनि झडकरी डोले ब्रह्मानंदे । एक गुरु अंती ॥

## गीति

मात्रा सुटती तेथे प्लुतमात्रा तीन येति उपयोगी ॥
संगीत शास्त्र सांगे येणे ये गीत ताल समरंगीं ॥ (उत्तमरंगांत)
लघु गुरु जेथे जैसे तेथे तैसेचि ओळखुनि चाला ।
मात्रा मात्र लक्षुनी भलते म्हणताचि चूक ये ताला ॥१८॥

## तेताला

त्रिभिस्तालैरेककालस्त्रितालोऽयं प्रकीर्तितः ।
चतुर्भिश्च चतुर्भिश्च मात्राभिस्ताल उच्यते ॥१॥
एवं ताल त्रयांते स्यात् कालो मात्राचतुष्टयः ॥
मात्राभेदेऽवसानेन कुर्यान्मात्राप्रपूरणम् ॥२॥
शमोऽस्य द्वितीये ताले प्रथमायामुदाहृतः ॥
जातयोऽन्यत्र वक्ष्यामः—

## गझल

तालद्वयैककालात्मा गझलो रागिभाषितः ॥
सप्तमात्रामयो मात्राद्वयमाद्ये प्रकीर्तितम् ॥१॥

मात्राद्वयं द्वितीये तु काले मात्रात्रयं पुनः ॥
एषा चतुस्रजातिः स्यात् गज्जलस्यापि वादने ॥२॥

## दर्दुर (दादरा)

एक तालैक कालात्मा दर्दुरश्च प्रकीर्तितः ॥
षण्मात्रात्मा त्रिभिस्तालैस्त्रिभिःकालैश्च कीर्त्यते ॥१॥

## चतुस्ताल

चतुस्तालः शमारंभो द्विमात्रः शम उच्यते ॥
पश्चात्कालो द्विमात्रः स्यात् ततश्चाद्यतालकः ॥१॥
द्विमात्रोऽपि स विज्ञेयो तथा कालोप्यनंतरः ॥
द्विमात्रः स च विज्ञेयो द्वितीयस्तदनंतरः ॥२॥
द्विमात्रः सोऽपि विज्ञेयो तृतीय स्तदनंतरः ॥
द्विमात्रः सोऽपि विज्ञेयश्चतुर्थस्तदनंतरः ॥३॥
चतुर्थोहि शमः प्रोक्तो यस्मादारभ्यते गतिः ॥
मात्रागणनकाठिण्यं यदि चेत् बालबोधने ॥४॥
मध्ये वाथ विलंबे वा ं द्रो तु गागितं भजे
पश्चादभ्याससामर्थ्यात् द्दते संजायते गतिः ॥५॥
तेन मात्रासुछंदेन न भ्रमितव्यं कदापिच

अत्र प्रथम पंचम नवम एकादशेषु तालानुसारेण करतालिकां विदद्यात् । प्रथमेके बलेन तालिकां दद्यात् शमत्वात् । इतरेषु तालेषु साधारणेन तालिका दद्यात् । तदितरासु मात्रासु गतिप्रदर्शकं वादयेत् । तृतीयसप्तमयोः दक्षिणभोग हस्तक्षेपं कुर्यात् कालप्रदर्शनाय । एवमेवं हस्ताभ्यासपाटवा नुग्रहणेन सर्वत्र तासु तासु गतिषु अनुसंधेयम् ॥

## दीपचंदी–आर्या

तालत्रयं चतुर्भिस्त्रिभिश्चतुर्भिस्त्रिभिस्तथा कालः ॥
मात्राचतुर्दशयुता ज्ञेयेयं दीपचंद्रिका सद्भिः ॥१॥

मनीं। अनुभवाचेनि अनुगुणीं । ओळखोनिया ॥१२॥ उसापासोनि साखर निघे । ते खातयासीचि गोड लागे । एरव्ही उसाचिया अंगे । अनुभवू काय ॥१३॥ तैसी मज नाहीं अनुभववृत्ति । परी सद्गुरुकृपा माझी भारती । ब्रह्मानंदें सज्जनाप्रती । अनुभवेंचि डोलवील ॥१४॥ जें मृदुतर अंतःकरणीं । जयांचा प्रेम नारायणीं । जें निष्काम झालें मुळींपासुनी । ते या श्रवणीं अधिकारी ॥१५॥ सत्संगावीण जो जो क्षण । जाय तो तो सूतकासमान । ऐसें जयाचें अंतःकरण । ते या श्रवणीं अधिकारी ॥१६॥ विवेकाचेनि बळें । उघडती बुद्धीचे डोळे । कामक्रोधापासूनि सोंवळे। ते या श्रवणीं अधिकारी ॥१७॥ दंभावाचूनि यज्ञ दान । धर्म करिती कामनेवीण । वेदावरी विश्वास गहन । ते या श्रवणीं अधिकारी ॥१८॥ पुत्र दारा आणि धन । मंदीर वाटिका माळा चंदन । जयासी वाटे वमनासमान । ते या श्रवणीं अधिकारी ॥१९॥ स्वर्ग वैकुंठ कैलास । जेथ भोगाचा हव्यास । ते विष्ठेसमान वाटती जयास । ते या श्रवणीं अधिकारी ॥२०॥ मन इंद्रियें धरोनी हातीं । स्वधर्मानुष्ठान करिती । अत्यन्त विश्वास गुरुवेदान्तीं । ते या श्रवणीं अधिकारी ॥२१॥ वासना असती अनंत । म्हणोनि अभ्यासीं काळ लागत। परी कर्तव्य न चुकावें निश्चित । ऐसें समाधानचित्त ते अधिकारी या श्रवणीं ॥२२॥ मृत्युलोकीं सुखाची काहणी । नायको कोणाचिया श्रवणीं । मोहे लोक कवळिलें मनीं। विसरोनी परब्रह्म ॥२३॥ बाळपणीं मोह माता पितयाचा । यौवनपणीं मोह स्त्रियेचा । वृद्धपणीं मोह पुत्राचा। तव यमाचा पडे घाला ॥२४॥ एवं मोहे कवळिलें विश्व । आपुलेंचि ह्मणती परस्व । तेणें अविवेक बळेंचि श्व- । योनी पावती ॥२५॥ हे परमेश्वर या मोहांतुनी। कोण मज सोडवील कृपादानी। ऐसी तळमळ अंतःकरणीं । निर्जलमीनसम ज्यांच्या ॥२६॥ तें अधिकाराचें मूळ आगर । त्यांचे साठींच शास्त्रावतार । यावांचुनी जो समुदाय इतर । तो श्रवणीं निःशेष वर्जावा ॥२७॥ ऐसें ऐकतां

वचन । श्रोते क्षोभती आपण । ह्मणती पूर्वापर ग्रंथ न पाहुन । व्यर्थ निरूपण कां करावे ॥२८॥ अहो तुम्ही तंव येथ । अधिकारी बोलिला विवेकी विरक्त । आणि अपर वैराग्य तव सूत्रभाष्यांत । उपदेशिलें आहे ॥२९॥ अज्ञात असलियावीण । उपदेश निष्प्रयोजन । या लागीं अवैराग्य संपन्न । अधिकारी आह्मी ह्मणो ॥३०॥ वक्ता म्हणे हें न होय । अधिकारी याचा वैराग्यठाय । अनुवादती आचार्य । सूत्रभाष्यांत ॥३१॥ जे क्षिप्त मूढ भूमिकेवरुती । तयासी अधिकार नाहीं कल्पांतीं । जे कीं विक्षिप्त भूमिकेवरुती । तयास अधिकार समयवशें ॥३२॥ विक्षिप्त भूमिका योगगंधिनी । यास्तव कदाचित् समयगुणीं । वैराग्याचें अंकुर मनीं । उमटती नवे ॥३३॥ तया सिंचावया जीवन । सूत्रभाष्यांत अपरवैराग्यवचन । एरव्हीं अधिकारी विरक्तावीण । नाहीं नाहीं आण श्रीगुरूची ॥३४॥ एवं साधनचतुष्टयसंपन्न अधिकारी । प्रतिपाद्य प्रतिपादकादि संबंध परी । विषय योग जीव हरी । एक करणें प्रयोजन ॥३५॥ एक करावया जीवेश्वर । अद्वैतवेदान्तज्ञणत्कार । तेथ योग खटाटोप विचार । नको ऐसे ह्मणती इतर जन ॥३६॥ परी नवल वाटे माझिया मनीं । वेदान्तें ब्रह्मपीयूष पिवूनी । सुखें विचरती विषयवनीं । आणि योग मात्र निंदिती ॥३७॥ सदनीं उपनिषदाची पेटी । गुंफा बांधल्या एकांतासाठीं । शिष्य मिळविण्याची आटाआटी । योग पोटीं निंदिती ॥३८॥ बळेंचि सोडोनि पुत्रदारा । गुंफेंत पाळिती पाखरा । वेदांताचा ओरबारा । योगाधारा निंदिती ॥३९॥ समाधि म्हणजे निद्रा पूर्ण । मुक्ति म्हणजे यथेष्टाचरण । वेदान्त म्हणजे शाब्दिक पठण । योगानिधान निंदिती ॥४०॥ असो ऐसीयांचे सर्वे । आम्हा बोलणें न वाटे बरवें । ज्ञानें मुक्त झालियाही अभिभवें । योगेचि प्रारब्ध ॥४१॥ यद्यपि प्रारब्ध क्षीण । सर्वथा नोहे भोगावीण । परी पुरुष असतां योगसंपन्न । भोगदुःख भासेना ॥४२॥ अथवा शरीरें नाना करोनी । प्रारब्ध भोगावें एकयाचि क्षणीं । किंवा दुःख साहावें बळें

करोनी । हेंही योगफळ ॥४३॥ किंवा ब्रह्माकारवृत्ति । अखंड राहणें ही योगस्थिती । किंवा तीव्र प्रारब्ध न जिंके निश्चिती । तरी मृदु मध्य प्रारब्ध जय योगें ॥४४॥ अथवा योगबळें करून । होये दैवाचें भविष्यज्ञान । तेणें आधींपासोनि मन । करणें समान शिकता ये ॥४५॥ गोपीचंदा प्रसन्न होउनी कानिफा । धातुपुतळे जाळोनि निवटिलें शापा । आणिक एक सोपा । इतिहास आहे ॥४६॥ एका ब्राह्मणकन्येचें दैव थोर । होतें कीं भोगावा महार । तिचिया बापें ते समग्र । जामाता कथिले ज्योतिषान्वयें ॥४७॥ असो दुर्विपाक दिवस आला । समर्थी मलविसर्गा चालिली बाला । तें जाणोनि चांडालवेश घेतला । जामातेंचि ॥४८॥ आधींच जावोनि शौचकूपांत । चांडाळवेशीं वाट पाहत । तंव कान्ता आली तेथ । चांडाळवेश देखिला ॥४९॥ कामें भरोनि झोंबली कंठीं । भोगोनि समाधान पावली पोटीं । चांडाळवेशीं ब्राह्मण शेवटीं । निघोनि गेला गृहातें ॥५०॥ इकडे पश्चात्तापेंकरून । ब्राह्मणी जाहली लज्जायमान । घरीं नयेचि म्हणोन । हाका मारी पति तिचा ॥५१॥ ते म्हणे माझें फुटकें कपाळ । मिया भोगिला चांडाळ । ब्राह्मण म्हणे वेश धरूनी सकळ । मीचि आलो पैं होतो ॥५२॥ लिहिलें होतें तुझ्या दैवीं । कीं तूं चांडाळें भोगावी । जाणोनि ते घटिका बरवी । वेष मियाचि घेतला ॥५३॥ तेव्हां ते संतुष्ट होउनी । भावें लागली पतिचरणीं । एक चोर एक दिवस स्वर्गी जाउनी । पुण्य न भोगितां जिंकिले यमा ॥५४॥ कथासरित्सागरीं ही कथा । बळीनें हरशब्दास्तव स्वर्ग मिळवितां । दान देवोनि जिंकिलें प्रेतनाथा । स्कंधपुराणीं कथा हे ॥५५॥ देवयानीनें कचासी । शाप दिधला निश्चयेसी । कीं संजीवनी मंत्र न फळे तुजसी । तरी तो अन्यासि सांगोनि फळविला तेणें ॥५६॥ गंगाशाप शिखंडीसी । परी तो झोंबला अर्ध शरीरासी । अर्ध शरीरें तपें तियेसी । भीष्ममृत्युवर मिळाला ॥५७॥ एवं महाभारतीं कथा दोन । अहल्या राजपत्नी इंद्र ब्राह्मण । ऋषीनें शापिले

तथापि मन । नाहीं ढळले तयांचे ॥५८॥ अंबरीषाचा शाप आघवा । देवें दवडिला बरवा । रुक्मिणीस शापवाणी वृथा सर्वा । असे पुराणीं ही कथा ॥५९॥ शाप झोंबलें प्रमत्तासी । दैव प्रमत्ता धरोनि ओढी केशीं । शाप हटावला नाहीं मनासी । हटावला वर ॥६०॥ ह्मणोनि वराचि फळला कुंदर्दंतादिकांतें । ही कथा वासिष्ठीं निर्वाण प्रकरणीं वसते । होणारासारिखी बुद्धि होते । अयुक्तांची ॥६१॥ योगी जे असती । ते होणार जाणोनि उपाय करिती । इतुकेंही करोनि होणार निश्चिती । झालें जरी ॥६२॥ तरी मग तयासी । पाप न लिंपे निश्चयेसी । करोनी योगासारख्या प्रयत्नासी । जरी दैव भोगासी आतळे ॥६३॥ तरी हातीं होते ते केले । ऐसे यमासी बोलावया तोंड वहिले । म्हणोनीच नाहीं लिंपिलें । योगिया पाप ॥६४॥ योग वा भगवत्भक्ति । सकळ पापाची होय शान्ती । बोलिला जाय येणेंही रीती । प्रारब्धविजयू ॥६५॥ संचित असतां होय क्षय । प्रारब्ध भोग-क्षणींच प्रबल होय । भोगीं समता अभ्यासने स्वयें । हाही शास्त्रीय प्रयत्नची ॥६६॥ यालागीं योगेंकरून । प्रारब्धदुःखाभिभव पूर्ण । वेदान्तींही सन्मान । होय योगाचा ॥६७॥ राजयोगीं ज्ञानावर्तन । हठयोगीं-प्राणायामासन । या दोहींचा अभ्यास करावा म्हणोन । वदले दयाघन ब्रह्मर्षि ॥६८॥ कूर्मपुराणीं ईश्वरगीता । तेथही निरूपिलें या अर्था । तोही श्लोक प्रमाण तत्वतां । ऐकावा श्रोते सावचित्त ॥६९॥ "योगात्संजायते ज्ञानं ज्ञानात् योगः प्रवर्तते । योगज्ञानाभियुक्तस्य प्रसीदति महेश्वरः" ( कूर्म-पुराण ) वृत्तिनिरोधे उमटे ज्ञान । साच निरोध नोहे ज्ञानावीण । सत्य मानितां संसारा कारण । पुनर्व्युत्थान वृत्तीचे ॥७०॥ याचिलागीं उत्तम मार्ग । ब्रह्मज्ञान आणि भक्तियोग । समुच्चयें अभ्यासिता चांग । सगुण निर्गुण श्रीरंग हृदयीं ठाके ॥७१॥ आणि मार्कंडेय पुराणीं । श्री दत्तात्रेय पाहीं अलर्कविनवणी । कीं ज्ञान मी आपुल्या कृपें करोनी । पावलों परी निर्वाणीं योगइच्छा ॥७२॥ सकल प्रमाणाची आई । ती गर्जोनि

सांगे लवलाही । श्वेताश्वतरोपनिषत्ठायीं । ज्ञानप्रवाहीं शिष्य पोशी ॥७३॥ एवं योगोपयोगू सिद्धासी । आणि ब्रह्माकारवृत्ति करावयासी । चित्त निरोधें साधकासी । उपयोग सर्वथा योगाचा ॥७४॥ सांख्याचे पंचवीस तत्व ग्रहण । आत्मयाचें नानापण । ईश्वर आहे याहूनि भिन्न । याचेंचि खंडण शारीरक सूत्रीं ॥७५॥ अथवा टीकाकारांचें खंडण । सूत्रकार्य तव सम्मत पूर्ण । हेंही मी सुचवीन । योगप्रभावीं या ॥७६॥ यम नियम आसन प्राणयमन । प्रत्याहार धारणा ध्यान । समाधी संयम निर्बीज ज्ञान । यांचे नाहीं खंडण ब्रह्मसूत्रीं ॥७७॥ तंव श्रोते म्हणती अहो ऐका । योगातेंचि प्रशंसू नका । जप तप तीर्थाटणादि कां । व्यर्थ म्हणतां ॥७८॥ वक्ता म्हणे तैसे नाहीं । जपतपतीर्थादींच्या ठायीं । योगावांचोनी सिद्धीचि नाहीं । हे स्पष्ट मी म्हणे ॥७९॥ योग म्हणजे चित्तनिरोध । तोही असे द्विविध । कर्तृसंपाद्य भावना विशद । आणि वस्तुसंपाद्य भावनाजन्य ॥८०॥ आपुलिया प्रयत्नें करून । प्राणादिकांचे निरोधन । तयातें म्हणती मुनीजन । कर्तृतंत्र योगू ॥८१॥ सत्वान्न भक्षणें गंगास्नानें । विश्वेश्वरादि दर्शनें कां संतवंदने । जे सात्विकता घेइजे मनें । तो वस्तुतंत्र योगू ॥८२॥ कर्त्याची भावना विरुद्ध नसतां । तैं गंगास्नानादि फळ मिळे तत्वतां । कर्त्याची भावना विरोधी असतां । तैं वस्तुतंत्र योगफळ अति काळें ॥८३॥ केवळ सात्विक आहार करून । जरी होतील योगसंपन्न तरी पशु खाती नुसुधें तृण । तिहीं सहज निर्वाण पावावें ॥८४॥ मीन करिती गंगास्नान । तांदुळ होती शिवसंलग्न । इहीं वस्तुबळें करून । पावावें स्थान अगम्य ॥८५॥ हें असो कर्तृभावना आणि वस्तु सत्व । दोन्ही मिळतां प्रगटे परतत्व । केवळ वस्तुसत्व । उपयोगी न पडे ॥८६॥ तैसी केवळ कर्त्याची भावना । उपयोगा नये सात्विकवस्तुविना । शौचकुपांत बैसोनि प्राण संयमना । करितां समाधि केविं साधे ॥८७॥ कीं बळेंचि भक्षोनि मांसान्न । बळेंचि करोनि सुरापान

बळेंचि सेवोनि असज्जन । योगसंपन्न कोण झाला ॥८८॥ यास्तव सात्विक वस्तु सात्विक कर्ता । मिळोनि चालावे योगपंथा । सात्विक वस्तु दुर्मिळ असतां । तरी कर्ताचि सात्विक होवावा ॥८९॥ सात्विक वस्तुवांचुनि । सात्विक कर्ता शनैः जाईल निघुनी । सात्विक कर्त्यांवाचुनी । सात्विक वस्तु निरूपयोगी ॥९०॥ पुरुष परमात्मा गुणातीत । सत्व तव गुण यथार्थ । तोहि राहे प्रकृती आंत । प्रकृती जड ॥९१॥ यालागीं जड चेतनाचा । जंववरी अविवेक साचा । तोंवरी सात्विक जडाचा । आश्रय करोनी रोधाव्या वृत्ती ॥९२॥ मग वृत्ति निरोधें योग संपत्ती । योगबळें विवेक-ख्याति । विवेकबळें दुःख निवृत्ती । ऐसें वदती आचार्य ॥९३॥ यालागीं गायत्र्यादि सात्विक शब्द । तेथहि योगाचा असे प्रसिद्ध । तपांतही योग सिद्ध । इंद्रियादि निरोधें ॥९४॥ साहूनिया शीतउष्ण । पर्वकाळीं करावें स्नान । येथही योगापासून । धैर्य आणावें लागते ॥९५॥ चित्ताचे संवेग तीन पवित्र । मृदु मध्य आणि अधिमात्र । केवळ निश्चय नम्र । संवेग म्हणावा ॥९६॥ इतर सुटोनी अवधान । चित्त एकीकडे सावधान । याचेचि नांव जाण । मध्य संवेगू ॥९७॥ तें अवधान मध्यें न तुटता । समाधी पर्यंत लाभू तत्वतां । तीव्र संवेग वार्ता । बोलिजे याते ॥९८॥ कर्तृश्रद्धेनें मृदु संवेग । आभासे होय मध्य संवेग । दृढभूमी होतां तीव्रसंवेग । सहज पावे ॥९९॥ नामसंगादि भगवन् मूर्ती । तेथ श्रद्धेनेंचि दोन संवेग होती । तीव्रसंवेग लाधलिया भक्ति । सहज सांपडे ॥१००॥ हेही भक्ति हो कां गौणी । मग परा भक्तीते कवण मानी । असो प्रस्तुत योगावाचुनि । कवण्याही स्थानीं सिद्धि नाहीं ॥१०१॥ ती योगमुद्रा सर्वमान्या । वदली पंतजलीब्रह्मकन्या । ती माधुर्यरूपें धन्या । प्रकटे मम हृदयीं ॥१०२॥ मग आळंदीचे नाथ । श्री ज्ञानेश्वर कृपावंत । चुकलें आम्हांत अनंत । नाहीं येथ संशय ॥१०३॥ सकळ सुखा अधिष्ठान । श्रीज्ञानेश्वर सद्गुरुचरण । तेथ ही कविता समर्पण । केली सकर्तृक सद्भावें ॥१०४॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे योगप्रभावे उपोद्घातनिरूपणन्नाम प्रथमो विक्रमः ।

॥ श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

-✂✂०✂✂-

श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ

# द्वितीय विक्रम

जय जय सद्गुरु विश्वजीवना । जय जय सद्गुरु पतितपावना । जय जय सद्गुरु मनमोहना । आळंदीपते ॥१॥ जय जय सद्गुरु अविचला । जय जय सद्गुरु अविकळा । जय जय सद्गुरु नादबिंदुकला । ज्योतिज्वालाविरहिता ॥२॥ पवन झनत्कारीं पन्नास । मातृका बैसल्या आसपास । स्वतंत्र दोहींचा विलास । या सर्वांस अगम्य तूं ॥३॥ त्रिकूट श्रीहाट कोल्हाट । औटपीठ पुण्याद्रिभ्रमरकपाट । सहस्रदळ ब्रह्मरंध्रपीठ । अवघे कचाट तव माया ॥४॥ नवल तुझिया कृपेची स्थिती । मायाचि दावी आवृत्ती निवृत्ति । बैसली युधिष्ठिराचे पंक्तीं । जावोनिया ॥५॥ जे जीव बुडवाया रची अपाया । ते तव कृपाभेणें दावी उपाया । यालागीं दीनआश्रयात्वया । अळंदीराया पाय तुझे ॥६॥ तूं कुरंगिणी मी पाडस । तूं सुरभी मी वत्स । तूं माय मी स्तन्यपिपास । लेंकरूं तुझे ॥७॥ तूं बंधू मी बहिणी । तुम्ही प्रिय मी कामिनी । तुम्हा आम्हा एकपणीं । ठाव निर्वाणीं तुमचे कुशीं ॥८॥ हा योगाचा निष्कर्षु । येर निरूपणाचा हर्षु । तो प्रदत्ताचित्तविमर्षु । शमवावया ॥९॥ पाहूनि ऐसा अतिसो । हृदयीं जननी म्हणे हें असो । स्तुतीं हो कीं व्याख्यान पैसो । दोन्हीही माझे ॥१०॥ तूं नाचाणिया निमित्त पुतळी । मग लीनपणा कासया रळी ।

याप्रसादें प्रियपायातळीं । सुचिली दिठी ॥११॥ आतां काय बोलिले योगाचार्य । ते परिसोत चातुर्यवर्य । जयाच्या ज्ञानमात्रें तूर्य । अज्ञान सकार्य निवारी ॥१२॥

## अथ योगानुशासनम्

टीका:– ॐकार आणि अथशद्ब । हे ब्रह्मोच्चारणांचे मंगळ प्रसिद्ध । अथशद्बार्थे आरंभ विशद । किंवा अधिकारानंतर्य ॥१३॥ दुःख-जिहासा सकळांप्रति । दृष्टोपायें नाहीं सुखप्राप्ति । दुःखभरित स्वर्गसंपत्ती । नोहे विवेकख्याति चंचल चित्ता ॥१४॥ यालागीं योगारंभ सफळ । जीव शिवाच्या व्हावया मेळ । कीं समाधिलाभ निखळ । ये अर्थीं युज् धातु ॥१५॥ श्वेताश्वतर नादबिंदु । योगशिखा ब्रह्मबिंदु । अमृतबिंदु ध्यान-बिंदु । योग विशद् बोलिती ॥१६॥ नानापुराणीं नाना मतीं । योग बोलिला नाना रीतीं । आणि हिरण्यगर्भ निजस्मृती । योग सांगती विस्तरें ॥१७॥ तो आघवाचि पयोनिधी । मथोनिया कृपाब्धी । सुधाकवळ शिष्यबुद्धि । देती सद्गुरु पतंजली ॥१८॥ म्हणोनि योगानुशासन । हा सूत्रार्थ निष्पन्न । आतां योगाचें लक्षण । सावधान ऐकावें ॥१९॥ कलि-युगाचेनि बळें । जन करिती योगाचे चाळे । नानामतीं नाना रळे । बोलिजा योगू ॥२०॥ माय पुरवी सकळ कामना । परी तेचि अधिष्ठिलिया मैथुना । तरी अवाधिया अधर्मपणा । एकवटू होय ॥२१॥ तैसें चाळता योगग्रंथीं । निःशेष अपवर्ग चढे हातीं । परी तोचि योग योजितां अन्यग्रंथीं । तरी दुःखप्राप्तिदायक ॥२२॥ जयासी नाहीं विषयविरक्ति । तेणें चुकोनि न जावें योगपंथीं । उद्याचें मरण अंगावरुती । आजचि ये अविरक्ता ॥२३॥ अत्यशुद्ध अंतःकरणीं । जो जो भाव उठे मनीं । तो तत्काळ तया योनी-। माजीं पडे ॥२४॥ जडभरत हरिणीचे पोटीं । पावला हे भागवतीं गोष्टी । शुक्र लागला अप्सरेपाठीं । हे योगवासिष्ठीं निरूपिलें ॥२५॥ आमाजीर्णामाजी भूक । लागलिया जेवणें जैसे मारक । तैसे

अल्पशुद्ध चित्तासी भोगसुख । कोटीकल्प दुःख दावी ॥२६॥ कां पांडुरोगें अंग सुटलें । ते तयाचेचि नांव खुंटलें । तैसे अल्पशुद्ध चित्तासी दोष वाढले । तरी ते जडले प्रलयान्त ॥२७॥ अहो अन्य क्षेत्रीं पाप करिता । तें काशीस्नानें जाय सर्वथा । परी काशीक्षेत्रीं पाप करिता । दृढ वज्रता प्रलेप् ॥२८॥ तैसे चंचल चित्तांत येती भोग । परी त्यांचा नोहे तीव्र वेग । अल्पशुद्ध चित्तात वाढतां भोग । तीव्र संवेग सहज होय ॥२९॥ कां मळलिया वस्त्रावरी । रंग न दिसेचि झडकरी । तोचि निर्मळ वस्त्रावरी । वस्त्र झांकोनि आपण दिसे ॥३०॥ तैसे मळिन अंतःकरणा । तत्काळ जन्म न देती वासना । त्या अल्पशुद्ध चित्तीं उमटतां जाणा । नेती तत्क्षणा तिये योनीं ॥३१॥ मळिन चित्तासी क्रोध येता । तो आला तैसा होय वृथा । अल्पशुद्ध चित्तासी क्रोध येता । तो क्रोधासरिसा जाय सर्पयोनीं ॥३२॥ कां डोळियाच्या बाहुलीवरी । मळिन चित्त कार्य न करी । तेथ दुर्जन जैं एकाग्र करी । तैं दृष्टी होय अन्य जना ॥३३॥ अहो उत्तम अन्नाचें अजीर्ण । कवणातें नाणी मरण । तैसे कामबुद्धीं योगाचरण । ते नरकीं पतन याच जन्मीं ॥३४॥ ज्योतीवरी नयन लावुनी । तेथचि एकाग्र चित्त करोनी । वश करिता येती कामिनी वामतंत्रीं प्रक्रिया हे ॥३५॥ विषय भोगोनि स्वेच्छावशें । शिवांबु घेता मुक्तींत बैसे । हे कापालिकांचें मत ऐसे । योगाचिवरी ॥३६॥ मैथुनाचें भोगोनि सुख । ब्रह्मचारी दिसावें देख । याळागीं निष्कंटक । अभ्यासावी वज्रोली ॥३७॥ करावया राजवशीकरण । कुबडी घेऊनि स्वरसाधन । हेंही योगाचें लक्षण । म्हणती इतर ॥३८॥ सन्मुख जे राजदंत । तेथ जिव्हां लावूनि थुंका पीत । हेंही योगाचे लक्षण यथार्थ । म्हणती कोणी ॥३९॥ कोंडोनि दीपाचें तेज । चित्र पाहणें म्हणती निज । ऐसेनी संप्रदाय सहज । वाढविती नाना ॥४०॥ एक सूर्याची छाया ॥ पाहती कंठीं धरूनियां । शिवदर्शन म्हणती वाया । अंतःशिव सांडूनि ॥४१॥

एक हालवूनि हात । पराविया वश करित । कां रश्मी रश्मीमाजीं मिळवीत कालबिलियांचें मत ऐसे ॥४२॥ असो विषयविरक्तीविण । जे जे कांहीं मुद्रा आसन । ते आघवेचि अकारण । जेवीं दावी विंदान कोल्हाटी ॥४३॥ रोगी काय न करिती निराहार । श्वास काय न कोंडिती पोहणार । रूखड काय एकाग्र । दृष्टी न करिती ॥४४॥ बक काय न निरोधिती चित्त । हे आघवेचि काय पावले मोक्षपंथ । जंव वैराग्य नोहे विवेकासहित । तंव योग म्हणजे इंद्रजालचि ॥४५॥ याळार्गीं योगाचें लक्षण । आचार्य वदती आपण । करोनी सर्व व्यावर्तन । ते सावधान ऐकिजे श्रोतीं ॥४६॥ "योगश्चित्तवृत्तिनिरोधः" समाधीं साधन विभूतीं । दुःखनिवृत्ति परमानंदप्राप्ति । एवं विभाग संपत्ति । शास्त्रीं इये ॥४७॥ जयाचें चित्त समाधान । निवृत्त पापप्रवृत्तिहून । ते समाधिपादोक्त योगाकारण । अधिकारी पूर्ण जाणावें ॥४८॥ जे विक्षिप्त भूमिकेवरुता । सुटूं इच्छिती परी सुटों न शकती । साधनपादांत तयाप्रति । बोलिले उपाय ॥४९॥ योगाच्या सिद्धि अवान्तर । विभूतिपादीं त्यांचा विस्तर । कैवल्यपादीं विचार । मुख्य अपवर्गाचा ॥५०॥ येथे श्रोते म्हणती । समाधिपादांतही विकल्प रीति । बोलिली आहे उपाय संपत्ती । कोणासाठीं एवढी ॥५१॥ समाधिपादाचा आधिकारी । तुम्ही तव निश्चित केला ये अवसरीं । एक उपायाचि तरी । निश्चित कां न बोलिला ॥५२॥ याचें ऐकावें समाधान । वक्ता म्हणे सावध श्रवण । जरी असद्वृत्ति गेल्या चित्तांतून । तरी सद्वासना अनंत असती ॥५३॥ सद्वासनाबळें चंचल चित्त । तेणेंही क्लेश होती अनंत । आत्मज्ञान यथार्थ । होवों न शके ॥५४॥ जैसे तिखट खाणें सुटले । आणि मधुररसीं चित्त लोटलें । तरी ते रोगाते वहिलें । कारण होय ॥५५॥ तैसे रजतमलोपीं सत्व वाढे । तेथाचि जरी चंचलता जोडे । तरी जडभरतासमान फुडे । दुःख निवाडे सुटेना ॥५६॥ अहो ज्यांचें नांव उत्तम वृत्ति । त्याचि झणी बाह्य होती । तरी त्या निश्चयें

दुःख देती। साधकाप्रती अनिवार ॥५७॥ भूतदया जडभरता। तेचि बाध-
रागें झाली ममता। यालागी अतिभय/शुद्धचित्ता/उठता बहुतही ॥५८॥ परी
असद्वृत्ती ज्यासी नाही। तया क्रमानिर्बंधू नसे कही। रुचेल त्या उपायीं।
शेषशायी भजावा तेणें ॥५९॥ जंव रोगग्रस्त शरीर। क्रमें औषध सेवावें
तोंवर। रोग विमुक्ति झालिया साचार। मग घ्यावें अन्न रुचिकर
पुष्टिसाठीं ॥६०॥ तैसी जोंवरी सपाप चंचल वृत्ती। जोंवरी आहे
अतिबद्ध स्थिति। तोंवरी क्रियायोगोक्ति। साधनपादोक्ति अनुसरावें
॥६१॥ निषेध आघवे गाळावे। विहित आघवें पाळावें। क्रमानेंचि
चालावें। अभ्यासपंथीं ॥६२॥ रुचो कीं न रुचो आपणासी। जो मार्ग
असेल गुरुशास्त्रापाशी। तोचि आणावा अभ्यासी। धर्म्य म्हणोनि ॥६३॥
हेंचि साधनपादींची रीति। अभ्यासक्रमू कनिष्ठाप्रति। जे उत्तम अधिकारी
विरक्त चित्ती॥ तिहीं उपाय शोधावा यथा रुची ॥६४॥ निरोगी असतां
अरुचिकर। भक्षणें तेंचि व्याधिकर। रोगी असतां रुचिकर। भक्षणें
मरणदायक ॥६५॥ तैसे संसारीं ज्याचें चित्त। तो यथारुची करील पर-
मार्थ। तरी काळाचा आघात। आजचि लागला तयाते ॥६६॥ जो
विषयभोग पाहोनि निवटला। तो जरी रुचिविरुद्ध उपायीं प्रवर्तला। तरी
तोही जाण सांपडला। यमाचे करीं ॥६७॥ तेवीं कनिष्ठ अधिकारी। क्रिया-
योगेंचि जाती परतीरी। जे उत्तम अधिकारी। ते पावती परतीरी यथारुचियोगें
॥६८॥ यालागीं साधनपादांत साचा॥ एकचि क्रमू बोलिला
योगाचा। आश्रय करूनि अधिकारी रुचीचा। बहूपायवाचा समाधिपादीं
॥६९॥ एवंविधचि उपाय। ऐका जे बोलिले हृदयप्रिय। जयांचे दास्य
ऐश्वर्य। अनिच्छा करी ॥७०॥ "आरुरुक्षो······शमःकारणमुच्यते।
(गीता अ० ६ श्लो० ३) कर्म म्हणजे साधनपादोक्त। तें
क्रमेंचि बोलिलें आरुरुक्षूप्रत। शम म्हणजे समाधिपादोक्त। तो यथारुचि
विहित योगारुढा ॥७१॥ भलते ठायीं साधोनि संधी। जो हाता आणी

सुखावधी । तोचि भलत्या उपायें समाधि । करी हे समाधिपादीं विवक्षित ॥७२॥ तया उत्तमाधिकारिया । जें उपाय बोलिले पादीं इया । भाष्या-नुसारें तया । बोलूं उघड करोनी ॥७३॥ सद्गुरूक्ती आणि योगशास्त्र । माझा स्वानुभव आणि वेदान्त पवित्र । येणें अनुरोधें योगविचार । आरंभिला श्रीगुरुकृपें ॥७४॥ तेथ निर्णय पीयूष रसाळ । आशंका मंथा तुढाळ । घालोनि योगाब्धि विशाळ । मंथो पाहती ॥७५॥ नाहो सांख्याचें पंचवीस । येथ सव्विसावा परेश । परंतु विकल्पु तत्प्रणिधानास । दिधला कां ॥७६॥ "ईश्वर प्रणिधानाद्वा" यासूत्रीं । ईशा बैसाविलें विकल्पपात्रीं । इतर योग पूर्वतंत्री । घेवूनिया ॥७७॥ मुख्य तत्वासी करणें गौण । ह्याचेंचि नांव प्रतिज्ञाखंडण । म्हणोनी पंतजली वाटती आम्हाकारण । प्रमादशील ॥७८॥ तैं वक्ता म्हणे हें नाहीं । प्रमाद प्रच्छकांचे हृदयीं । सद्गुरुवीण लवलाही । शास्त्र श्रवणें बैसला ॥७९॥ ग्रंथ न पाहतां पूर्वापर । न करितां रहस्य विचार । अनुभवी श्रीगुरुचा चरणाधार । नसतां शास्त्र महाभ्रमू ॥८०॥ सद्गुरुवीण शास्त्रप्रवृत्ति । जेवी वैद्यावांचुनी भेषजस्थिती । हे असो समाधानोक्ति । सावध चित्तीं परिसावी ॥८१॥ द्विविध परेशप्रणिधान । आत्माभिन्न आणि आत्मभिन्न । निर्गुण प्रणिधान आत्माभिन्न । आणि आत्मभिन्न सगुणपूजा ॥८२॥ निर्गुणाचें अदृश्यत्वादि गुण । ते कल्पिता आत्मभिन्न । तरी त्याचेंचि नांव शून्यवर्णन । हे भगवत्पूज्यचरण बोलिलें ॥८३॥ श्रुति सांगे ब्रह्म अशरीर । तें आत्मभिन्न पहावें तो जड अंबर । आत्मभिन्न पाहतां साचार । साक्षित्व मिळे ॥८४॥ पुढें उकळलिया केळी । अभाव वोगरी करतळी । सृष्टि उकलालिया स्वभिन्न मेळी । तरी शून्यरळी सुगतमुक्ति ॥८५॥ परमेश्वरातें वर्णिता । द्विविध उल्लसिली श्रुति माता । निषेध आणि विहिता । वाक्या घेवुनी ॥८६॥ तेथ नेति नेति इत्यादि वचनें । प्रवर्तूं न शकती आत्मभिन्नें । "सर्वगंधः सर्वरसः" इत्यादि वचनें । आत्मभिन्नें प्रवर्तात ॥८७॥ सर्वांचाही निषेध करिता । निषेधक नये

निषेधिता । हे संमत आहे पर मता । नैय्यायिकाही ॥८८॥ ( येथें न्यायसूत्र घेणें ) यास्तव निषेधमुखश्रुतिवर्णन । तें स्वभिन्न मुखें घडोका ॥८९॥ आत्माभिन्न परेशग्रहण । तेथ अकर्तृत्वादिगुण । म्हणजे कर्तृत्वादिकाचें कारण । झाला अभिमान सहजचि ॥९०॥ तो अभिमान निजप्रवृत्ति । द्वैत वाढवी नाना रीती । बैसोनि वासनेच्या रथीं । कर्मानुमती हिंडतु ॥९१॥ तो आपुलिया प्रयत्नावीण । कदापि नोहे सुखसंपन्न । जो स्वयेंचि बद्ध तया कारण । मुक्त आन करों न शके ॥९२॥ ह्मणोनि निजप्रयत्नें करून । आत्माभिन्न परेश प्रणिधान । प्रथम मुख्य योग सांगून । स्वभिन्नेश प्रणिधान विकल्पें वदले ॥९३॥ चितिशक्ती अपरिणामिनी । ऐसी भाष्यकारांची वाणी । आणि "तदाद्रष्टुस्वरूपे अवस्थानं" म्हणोनी । बोलिलें मुनी निजसूत्रीं ॥९४॥ भाष्याचें तात्पर्य ऐसें । कीं पुरुष आधींच मुक्त असे । तो बांधला वाटे चित्तवशें । ते निरोधिता विशेषें मुक्तत्व प्रगटे ॥९५॥ आणि सूत्रकारांचें तात्पर्य पूर्ण । कीं चित्त निरुद्ध होतां संपूर्ण । आत्मयाचें उपाधिभिन्न । होय अवस्थान निजस्वरुपीं ॥९६॥ म्हणजे स्वरुपाहूनि कहीं । अन्यत्र मुक्ति असे कांहीं । हे हृदयांतूनि सम्मत नाहीं । सूत्र भाष्यकारा ॥९७॥ तव श्रोते म्हणती अहो ऐका । होचि एक प्रसारू नका । ज्ञानें मोक्षाचा आवांका । वेदान्त वदे ॥९८॥ रज्जुज्ञानें सर्प नाशे । तेवी जीवन्मुक्त अज्ञानभ्रंशे । तेथ ज्ञानाचि एक पुरे उमसे । विरोधविसे कासया ॥९९॥ तें वक्ता म्हणे ऐका । अध्यासनिवृति द्विविध देखा । परप्रकाशसापेक्षिका । आणि स्वनिरीक्षणसापेक्ष ॥१००॥ जेथ रज्जूवरी सर्पभ्रांती । तेथ रज्जूज्ञान दीपाचे हातीं । हे पर प्रकाशसापेक्षिक अध्यासनिवृत्ति । निश्चयें श्रोतीं अवधारिजे ॥१०१॥ सूर्यप्रकाशांत शुक्तिकेवर । जेथ भासे रजत प्रकार । तेथ निरखूनि पाहिल्यावीण साचार । अध्यास निवृत्ति मिळेना ॥१०२॥ तेवीं चंचलमनपवनकल्लोळें । विज्ञानदीप क्षण क्षण मावळे । तेथ अज्ञान निवृत्तीचें सोहळे । वाचीक डोहळे विषयार्थ ॥१०३॥ यालागीं चित्ताचें स्थैर्य-

करण। याचोंचि नांव निरीक्षण। तेथ स्थीर होय ब्रह्मज्ञान। हा अभिप्राय पूर्ण सूत्र भाष्याचा ॥१०४॥ म्हणोनि निजात्मेश्वराराधन। हें करणे लागे प्रयत्नें करून। याचिलागीं योगसाधन। प्रथम बोलिलें सूत्रभाष्यीं ॥१०५॥ परी विरक्तही असोनी। अधीर दीन अंतःकरणीं। तो आत्मभिन्न परेश मानोनी॥ प्रणिधान करी तैं योग पावे ॥१०६॥ जया निजकरें नये भोजन॥ तो तृप्त नोहे मायेनें पाजल्यावीण॥ तेवीं मुमुक्षू भिकारी महाकृपण॥ तो भगवत् कृपेवीण तृप्त नोहे ॥१०७॥ किंवा प्रथम स्वयत्नें योगसाधन। जरी न घदते करुणाघन। तरी ऐसें वाटतें जीवाकारण। कीं ईश्वरें येवून तारावें आम्हा ॥१०८॥ उपायासी जरी विकल्पता। तरी फळीं आहे परमसाम्यता। याळागीं ईश्वराराधना गौणता। शंकता नये ॥१०९॥ रोगी बैसो न शके उठोनी। तरी जीवन पाजावें आन कोणी। येणें काय तृष्णा हरणीं। न्यूनता घडे ॥११०॥ तैसा निजप्रयत्नीं जो असमर्थ। निर्गुणीं न प्रवेशे ज्याचे चित्त। तयासी " वा शब्दें विकल्पित "। ईश्वराराधन बोलिलें मुनी ॥१११॥ विभूतिपादीं भाष्यकार। ईश्वरप्रसादमहिमा थोर। बोलिले कीं जितोत्तर-। भूमीयोग प्रसादेंची ॥११२॥ येणेंही प्रमाणें प्रणिधान। येथ नाहीं बोलिलें गौण। किंवा प्रथमचि सांगते ईश्वरप्रणिधान तरी योगलक्षणचि कळतेना ॥११३॥ योगशास्त्र म्हणजे योगकथन। अर्थात् आधीं पाहिजे योगलक्षण। लक्षण न कळे सामग्रीवीण। आणि सामग्री स्वयत्नें अभ्यापू ॥११४॥ पाकसिद्धि कळवायाप्रति। सांगणें लागे येणें रीती। कीं ऐकोनि प्रयत्न करिता निश्चिती। अन्न स्वहस्तीं निर्मो शके ॥११५॥ परी जो न इच्छी अन्न निर्माण। तो अन्यकरवीं करी भोजन। तैसे क्रियाशास्त्रें सांगतां जाण। स्वप्रयत्न बोलिला आधी ॥११६॥ परी आपुली जाणुनी असमर्थता। जो लाहो न शके समाधीतृप्तता। तेणें कृपाकुशल भगवंत माता। स्तन्यपानार्थ आश्रयावी ॥११७॥ एवं ईश्वर प्रणिधान वैकल्पिक। त्याचें रहस्य बोलिलों सकाळिक। पुढे ही सुचवीन देख।

परी योग सम्यक् ऐकिजे आतां ॥११८॥ युज् समाधावितीं । स्वयें योग भाष्यकृदुक्ति । यालागीं समाधिसंप्राप्ति । योग बोलिजे ॥११९॥ पैं आपुलिया चित्ता । असती पांच अवस्था । मूढा क्षिप्ता विक्षिप्ता । एकाग्रता आणि निरुद्धता ॥१२०॥ तमोगुणेंकरून । चित्त सदा निद्रापन्न । जागाळियाही जाण । आळसचि घे ॥१२१॥ निद्रेंतूनि उठतां । चित्तासी आत्मा स्फुरता । तरी ते निद्रा उपयोगी योगार्था । हे सर्वथा पुढें सांगू ॥१२२॥ परी निद्रेमाजी घोरतु । उठलिया आळसें चुरमुरतू । प्रसंग आलिया बावरतू । अळर्क जैसा ॥१२३॥ अगा तमाचिया ठायीं । निजूनि उठलाही । तरी संस्कारेंचि स्त्री की आई । सर्वथा न देखे ॥१२४॥ वृत्ति आलिया भलती । विचार भिऊनी पुरती । ते मूढावस्था गा निश्चितीं । चित्ताची बोलिजे ॥१२५॥ तिर्यग्योनींतील प्राणिया । अवस्था स्वभावेंचि तया । आणि फुकट विश्रामिया । मानवाही मिळे ॥१२६॥ स्त्रीनें दळण कांडण करुनि । आपणास घालावें आणोनि । ऐसिया मूर्खांचिया मनीं । मूढावस्था आवेशू ॥१२७॥ वर्णाश्रम कर्म करितां होय । तैं हे मूढावस्था जाय । आतां बोलिजे स्वयें । क्षिप्तावस्था ॥१२८॥ तिर्यग्योनींतील प्राणियांचे मन । बहुधा याची अवस्थे आंदण । आणि स्थावरादिकांचें मन । होय आंदण मूढावस्थे ॥१२९॥ परी मानवाचे चित्त । रजोगुणें अखंड क्षिप्त । नानाविषयीं चंचळ होत । घडी एक शान्त न राहे ॥१३०॥ हो कां अविद्वान् कीं विद्वान् । मन मांडे खाय क्षण क्षण । घडींत श्रृंगार वीर करुण । घडीघडी ॥१३१॥ जैसी कुलालचाकीं माशी । तैसें फिरणें आवडे ज्यासी । घडी एक बैसतां उदासी । आकळे चित्त ॥१३२॥ शांतीचें स्थान सुंदर । तेचि जया कारागार । एकान्त तो नरक थोर । येचि जन्मीं जया वाटे ॥१३३॥ झणझण वाद्यांचे घाटे । आणि लांकुड लोखंडी खनखनाटे । ऐसे बाहेरी गोमटे । चित्त जयाचे ॥१३४॥ घरीं येता स्वभावें । तरी एके लेकुरें रडावें । एके अंगावरी मुतावें । एके फोडावे जलभांडे ॥१३५॥ रात्रीं निजताही जाण । तरी पाहिजे

कुतरीयाचे मुंकण । एवं वाहिली जेणें आण । विश्रांति न घ्यावी म्हणोनी ॥१३६॥ तयाचे मानस बोलिजे क्षिप्त । तोही वर्णधर्मासी अधिकारी निश्चित । या दोन्हीही अवस्थांत । योग गंधही नसे ॥१३७॥ मूढ आणि क्षिप्त जे होतीं । तया उपदेशें वा दंडें निश्चिती । धर्मक्रिया यथा शक्ति । करवाव्या कीं ॥१३८॥ नवल लोकांची मनोगती । तामसाते सात्विक म्हणती । नपुंसक महाशक्ति । ब्रह्मचारी तो ॥१३९॥ तोंडावरी बैसलिया माशी । करें उडवितां नये ज्यासी । तया नांव बोलती तापसी । मूर्ख मानसी लोक कैसे ॥१४०॥ धन्य या लोकांचें ऋषीश्वर । जयासी बाळपणापासूनि मरणावर । पाहिजे ग्रास चारणार । ना तरी घोरत पडती सुखें ॥१४१॥ जयांची शुद्धता एवढी स्पष्ट । शेंबुड मुखीं जातां म्हणती मीठ । ढोन पडती तेथ अचाट । मरती मुंग्या ॥१४२॥ जयासी न्यावया भोजनाकारण । जिता लागती चौघेजण । धान्य कणगींत ठेवावें नेवोन । तैसें जेवण जयांचें ॥१४३॥ एवं सर्वथा परतंत्र मूर्ख । तया तापसी म्हणती लोक । तेंथ योगाचें सुख । अल्पही न मिळे ॥१४४॥ यद्यपि प्रारब्धें करून । ज्ञानीहि करिती ऐसें बर्तन । तरी तयापासून । नाहीं, जनाकारण उपयोगू ॥१४५॥ म्हणोनि शिष्य शिकवावे जरी । तरी वागावें साधकापरी । यालागी क्षिप्त मूढ भूमीवरी । योग न सांपडे ॥१४६॥ आतां भूमिका जी विक्षिप्त । जेथ केव्हां केव्हां स्थिर चित्त । देवादिकांचे स्वभाव संमतकर हे अवस्था ॥१४७॥ येथ योग तंव मिळे । परी प्रयत्न न उजळे । यालागी हे सगळे । चाळेचि बोलिजे ॥१४८॥ अहो आभाळाची छाया । ते काय निववील सर्वदा काया । तरी प्रयत्नेंवीण योग वाया । जरी सांपडला स्वभावें ॥१४९॥ यद्यपि भगवद्भक्ति । प्रयत्नेंविण समाधी दाती । तथापि क्षीणता निश्चीति । न राहे तेथ ॥१५०॥ आयते मिळाले मंदीर । तरी कवण म्हणे ना ते सुंदर । परी स्वभावें छाया करी अभ्र । आणि क्षणें वितळें ते ॥१५१॥ तैसी भगवद्भक्ति स्वभावबळें । मेळवी अक्षय समाधि मेळे । आणि विक्षिप्त

भूयोग स्वभाव बळें। क्षणेक चावळे आंधळिया ॥१५२॥ अनिच्छेनें योग होय। अनिच्छेनें तयाचा लय। याचेचि नांव होय। विक्षिप्त भूमि ॥१५३॥

अभंग

घडींत नारद घडींत कुतरा। ओळखावा खरा विक्षिप्त तो ॥१॥
घडींत ब्राह्मण घडींत चांडाळ। विक्षिप्त केवळ मानव तो ॥२॥
घडींत महेंद्र घडींत भिकारी। तोचि अधिकारी विक्षेपासी ॥३॥
घडींत सच्छिष्य घडींत कातर। घडींत उदार कृपणही ॥४॥
घडीमाजी साधु घडीमाजी भोंदु। आज ब्रह्मानंदू उद्या दुःखी ॥५॥
तोचि विक्षेपाच्या सांपडला हातीं। ज्ञानेश्वर चित्तीं नावडे ज्या ॥६॥
धरूं नये कदा यांचा भरंवसा। जरी संता ऐसा दिसला तो ॥१॥
देऊं धांवे प्राण धर्माचिया साठीं। क्षणोंचि उलटी क्रिया ज्याची ॥२॥
ब्रह्मही होवोनि संसारी सांपडे। ऐसे चळे कुडे मन ज्याचे ॥३॥
सनत्कुमाराहूनिया थोर त्याग। घडींमाजी भोग जारासम ॥४॥
जन्मकोटी तया न सांपडेचि योग। श्रीआळंदीरंग न जाणता ॥५॥

एवं चित्ताच्या भूमि तीन। आतां चवथीचे एकाग्रताभिधान। तेही ऐकावे सावधान। समाधान पावावया ॥१५४॥ यम नियम आसन। प्राणायाम प्रत्याहरण। धारणा आणि ध्यान। या अभ्यासें चित्त वश ॥१५५॥ तें गा एकाग्र होय। योगी सांगेल तेथें राहे। हा स्वभावजयाचि होय। योगियांचा ॥१५६॥ अनिष्ट आलिया प्राप्त भोग। तेथ समता अभ्यासणें चांग। मग एकाग्रता प्रतिबंध व्यंग। दैव करूं न शके ॥१५७॥ प्रयत्न प्रारब्धाचा झगडा। आला योगी चित्ता पुढा। तेथ मृदु प्रारब्धाचा पराजय उघडा। आणि तीव्र प्रारब्धांत सहाणें ॥१५८॥ ऐसे युद्ध करितां अचाट। अंतःसार होय बळकट। स्वभाव विजय होय नीट योगीयाचा ॥१५९॥ स्वभाव विजयावांचुनी। वर शापादिके करूनी। प्राप्त झालिया उच्च नीच स्थानी। पाडी कुबुद्धी सुबुद्धी तारी ॥१६०॥ येचि विषयीं कथा

दोन । तिया सांगतों अनुक्रमें करुन । श्रोते परिसावे सावधान । समाधान व्हावया ॥१६१॥ श्रीमन्महाभारतीं शांतीपर्वणीं । राजधर्मी एकशेसोळा सतरा अध्यायस्थानीं । कथा बोलिली कीं एक मुनी । होता विजनीं तपोनिष्ठ ॥१६२॥ तयाच्या विश्वासें करून । क्रुर श्वापदेंही प्रीतिसंपन्न । एक येऊनिया श्वान । प्रीति करी तयावरी ॥१६३॥ तंव द्वीपी म्हणजे तरस । तो खावया आला कुतऱ्यास । तेणें विनवितां ऋषीस । केलें तरस तयातें ॥१६४॥ एवं जो जो शत्रु खावया येत। तत्तद्रूप ऋषि कुतरिया देत । व्याघ्र गज सिंहादि होवोनि त्वरित । शरभही झाला ऋषिकृपें ॥१६५॥ परी कुत्तरस्वभावें करूनी । मग आलें तयाचे मनीं । की मुनी भक्षावा मारोनी । ते जाणोनि मुनीनें श्वान केला ॥१६६॥ ज्यावरी विश्वासें करुनी । प्रेम करीत होते व्याघ्रादि प्राणी । तो कुतराचि उलटोनी । अविश्वासी जाहला कां ? ॥१६७॥ तयाचें हेंचि कारण । अयत्न रिकामें असतां मन । मुनीच्या विश्वासें करुन ।अभिभवून शांत होय ॥१६८॥ सयत्न क्रूर श्वमानस । तेणें जाहला अविश्वास । नाहीं केला अभ्यास । नम्रतादिकांचा ॥१६९॥ अभ्यास न करितां सद्गुणांचा । प्रसादही भयंकर होय साचा । जेवीं इंद्रपदाहूनि नहुषाचा। पात जाहला ॥१७०॥ चित्रकेतूसी उमेचा शाप । तो दैत्य जन्म पावला साक्षेप । वृत्र जाहला परी ब्रह्मसंकल्प। सुटला नाहीं तयाचा ॥१७१॥ नाना शक्ति नाना सिद्धि । एकाग्रतेच्या विरोधी । यालागीं गुरुकृपा प्रयत्नसिद्धी । हेंचि एक पाहिजे ॥१७२॥ जयाते दृढ वर जाहला । तेणें चिरकाल तपोभ्यास केला । म्हणोनि संकल्प शुद्ध जाहला । वरें तयाचा ॥१७३॥ पापियासी आशीर्वाद । फळती परी करिती अंध । तपियासी शाप प्रसिद्ध । कांहींच दुःख न देती ॥१७४॥ कुंददंताख्यानावरून । योगवासिष्ठीं हेंचि निरूपण । एकाग्रतेसाठीं प्रयत्न । दृढत्वें करून करावा ॥१७५॥ वैराग्यबळें जिंकावें विषय । अभ्यासबळें मन स्थिर होय । येथ अदृष्टप्रारब्ध स्वयें । विघ्नें

आणी ॥१७६॥ तरी तीव्र तें निवारावें सोसुनी । मंद निवारावें प्रयत्नें करुनी । पापभोग नारायण स्मरोनी । परिहरावें ॥१७७॥ झणी तीव्र प्रारब्धाचिया बळें । मातृमैथुनादि योगिया उगळे । परी मरणासी न भीतां तेचि वेळे । प्रायश्चित्त घेयावें ॥१७८॥ किंवा लोकांचें तुच्छकरण । हें याचि जन्मीं पापांचें क्षालन । मानूनि समता अभ्यासन । सुंदर जाण करावी ॥१७९॥ कदर्यू पूर्वींचा महादोषी । पुढें तो जाहला संन्यासी । तेव्हां लोक छळिती तयासी । पूर्वील पाप आठवूनी ॥१८०॥ कोणी आंगावरी थुंकिती । कोणी तयाच्या अन्नांत मुतती । तो कांहींच न बोले यती । प्रारब्ध भोग समजुनी ॥१८१॥ श्रीमद्भागवतीं एकादश स्कंद । तेविसावे अध्यायीं हे कथा विशद । वरी एकनाथटीका सुप्रसिद्ध । शांतीचें माहेर वाचावी ॥१८२॥ जया लोकसंग्रहाची चाड । तेही सोडावी उघड । अथवा प्रारब्ध पाप न करवी सुगड । तोंवरी लोकसंग्रह करावा ॥१८३॥ लावोनी दांतासी दांत । पिळोनी हातानें हात । बळें निरोधिताही चित्त । घडवी प्रारब्धें पाप जरी ॥१८४॥ तैंचि साधकें आघवा । लोक-संग्रह सोडावा । देह त्यजावा वा जोडावा । वन्य तपो मार्ग ॥१८५॥ हाही एक सुंदर । उपाय आहे परिकर । यास्तव चित्त करावया एकाग्र । भिऊं नये सर्वथा ॥१८६॥ जीवीं धरिला परमात्मा । मग यत्न करावा फळसीमा । मरण प्रसंग आलिया यमा । भिऊंचि नये ॥१८७॥ सोमकाचा गुरु नरकीं पडला । यास्तव सोमक गुरुसाठीं नरकांत राहीला । हा महाभारतीं वनपर्वीं बोलिला । इतिहास सुंदर ॥१८८॥ शूळ सोसेपर्यंत राजाचें भय । नरक सोसेपर्यंत यमाचें भय । दोन्ही सोसिलिया ही उपाय । दोघांचाही हारपे ॥१८९॥ परी हाचि एक निश्चय करितां । अस निश्चय कां करावा वृथा । म्हणोनि परमेश्वरा समर्था । घेयावें हृदयीं ॥१९०॥ पूर्व दुर्दैवें करून । परिस्थिती आलिया भिन्न । तरी योगासाठीं करावा प्रयत्न । मृदु दारुण भलताही ॥१९१॥ व्यवहारांत ऐसी स्मृती । कीं मृदु अथवा

दारुण कर्मे निश्चिती । दीनता सांडोनि पुढती । आलिया शक्ती करावा धर्मू ॥१९२॥ एवं व्यवहाराची ही कथा । तेथ योगाविषयीं विचार करणें वृथा । होईल तो उपाय सर्वथा । करावा कीरू ॥१९३॥ कर्णे लोभें करुन । विद्या संपादिली परशुरामापासून । क्षत्रिय संस्कार न होऊन । वेद विद्या फळली तया ॥१९४॥ परशुरामाचा शाप । तो मरणसमयींचि पावला प्रकोप । इतर वेळीं साटोप । ब्रह्मास्त्र फळलें तयातें ॥१९५॥ योग न होय सद्गुरुवीण । हे वाक्य अत्यंत प्रमाण । परी आळसिया कारण । सद्गुरु येऊन केविं भेटे ? ॥१९६॥ सद्गुरु कोणीचि जगांत नाहीं । ऐसें आधींचि धरुनि हृदयीं । सर्वदा होती नारीशायी । तयासी सद्गुरु केविं भेटे ? ॥१९७॥ जयासी जीवीं लागली तळमळ । तया स्वप्नींहि ज्ञान होय केवळ । तुकारामासी करुणाशीळ । बाबा चैतन्य भेटले ॥१९८॥ एक स्वप्नावरीच विश्वास ठेविती । जागृतमाधु बळें उलंघिती । अहंता वाढली तयांच्या चित्तीं । म्हणोनि स्वप्नीं न भेटती आचार्य ॥१९९॥ अहंता नसावी कांहीं । तळमळ असावी हृदयीं । मग गुरु भेटे भलतेठायीं । येथ नाहीं संशयो ॥२००॥ शूद्रें ब्राह्मणकर्म मात्र पाहोन । तैसेंचि करोनि आचरण । तो राजजन्म पावला हे कथन । महाभारतीं ॥२०१॥ परी जातां आड पंथीं । शतसहस्रपट पाहिजे शक्ती । तैसा निश्चय पाहिजे चित्तीं । भलत्या पंथीं जावया ॥२०२॥ निश्चय अल्पही असतां । फळ हळु हळु सन्मार्गीं जातां । म्हणोनि वेद मार्ग सर्वथा । उलंघु नयेचि ॥२०३॥ आपत्काळ आलिया दुर्दैवें । तेणें सर्व कांहीं करावें । परी आपणा उद्धरावें । कोण्याहि मिषें ॥२०४॥ माझियाकडे पहावें स्वतंत्र । मी शूद्र जाती आंधळे नेत्र । परी लहानपणापासोनि शिवशार्ङ्गधर । मृदु भजला ॥२०५॥ प्रेमळ मित्र शिष्यत्वें जोडोनि । ग्रंथवाचनें ऊह चालवोनि । संस्कृत व्याकरण ज्ञान नसोनि । घेतलें कळोनी कार्यापुरतें ॥२०६॥ पूर्वजन्म परमेश्वरकृपा । तेणें ऊह्भाव मिळाला सोपा । अहेतुकदया रतिवरबापा । अत्यंत साजे

॥२०७॥ गुरुमंत्र बहु घेतले । तिहीं वेदमार्गापासूनि निराळे केले । ऐसे मज वाटले । म्हणोनि धरलें आळंदीश्वरा ॥२०८॥ जेणें आळंदीश्वरमार्ग दाविला । तेणेंहीं एकवेळ तद्भाव निंदिला । म्हणोनि तोहि ओलांडिला । मिया गुरू ॥२०९॥ एवढेंही करुनी । द्वेष नाहीं अंतःकरणीं । तिहीं मज घेतां प्रेमें करुनी । तरी मी सेवीन तयातें ॥२१०॥ परी विरोधें न चलें ठायें ठाव । इया तळमळे आळंदीराव । मज मांडिये घेवोनि निज नांव । मंत्र स्वयमेव उपदेशिला ॥२११॥ पापी अपूनिहीं तातें । मज अंगिकारिलें पुरतें । आतां जो बुडाला म्हणेल मातें । तयाची जिव्हा सुखें झडो ॥२१२॥ माझी कथा सांगावया कारण । कीं भगवत्सहाय्यपूर्वक प्रयत्नें अवघें निष्पन्न । म्हणोनि चित्तीं उत्साह धरोन । योगाभ्यासन करावें ॥२१३॥ माझी शूद्राची ही गती । नसतां चढलो एवढीया सत्पथीं तेथ पुण्यवर्ण जे ब्राह्मणादि होती । त्याविषयीं काय वदावें ॥२१४॥ गुरुपासोन कीं ग्रंथ वाचोन । योगीं प्रयत्न करावा झटोन । परी एक रहस्य निर्वाण । येथ तें ध्यानीं आणिजे ॥२१५॥ गुरुपासूनि विद्या घेतां । तरी स्वयेंचि जळूं लागे अहंता । आणि शास्त्र वाचूनि विद्या घेतां । तरी निरहंता अभ्यासावी लागे ॥२१६॥ कूपखनन्यायें करून । न मिळे वैदिक ब्रह्मज्ञान । ऐसें अप्पया दीक्षितवचन । तें वेदमर्यादापाळनरूप॥२१७॥ वेद पुराण भाषांतरीं । ज्ञान होय समानाक्षरी । सूतसंहितेंत निर्द्धारी । वचनें ऐसी ॥२१८॥ ईश्वरातें आश्रयावें । भाषाक्षरांचे आग्रह सोडावे । ज्ञानबल तेथूनि मिळवावे । भलत्या वर्णीं ॥२१९॥ एवं सकळ वर्ण योगाधिकारी येथ योगशास्त्र स्मृतीही बरी । श्रोतीं ऐकावी सुंदरी । श्रवणीं तेही ॥२२०॥ आणि हृदयाचार्य चरण । सांगती आम्हां सदाचरण । कीं सुटलिया उदरंभरण । योगानुसंधान मिळे तुम्हां ॥२२१॥

"कीं योग्यतेवीण नाहीं । ऐसें हन आहे कांहीं । तेथ श्रीकृष्ण म्हणती काई । धनुर्धरा ॥३३८॥ हें काज कीर निर्वाण । परी आणीकही

जें कांहीं साधारण । तेंही अधिकाराचे वोडवेवीण । काय सिद्धी जाय ॥३३९॥ पैं योग्यता जे म्हणिजे । ते प्राप्तीचि अधीन जाणिजे । कां जे योग्य होउनि कीजे । तें आरंभिलें फळे ॥३४०॥ तरी तैसी येथ कांहीं । साविथाचि केणी नाहीं । आणि योग्यतेची काई । खाणी असे ॥३४१॥ नावेक विरक्त । जाहला देहधर्मी नियत । तरी तोचि नव्हे व्यवस्थित । अधिकारिया? ॥३४२॥ येतुलालिये आयणीमाजी एवढें । योग्यपण तुतेंही जोडे । ऐसें प्रसंगें सांकडें । फेडिलें तयाचें" ॥३४३॥

ज्ञानेश्वरी अध्याय ६

आपणा आहे कीं नाहीं योग्यता । ही शुभकर्मींही न करावी चिंता । दुर्गतीस जाये कल्याण करिता । हें सर्वथा घडेना ॥२२२॥ परी जे अभ्यास जेणें मानें । करावें लागती ज्या ज्या वृत्तीनें । ते ते करावें तेणेंचि माने । नातरी कल्याणीं अकल्याण ॥२२३॥ शालिग्रामासि तनु अर्पण । हें तव साचचि कल्याण । परी देह अर्पिला म्हणोनि निजले पाय ठेवून । तरी ते अकल्याण चुकेना ॥२२४॥ जंव झालें नाहीं ब्रह्मज्ञान । तंव साधकें करावें शास्त्रानुसंधान । बुद्धीचे नियोगें करून । भलत्या पथी जाऊं नये ॥२२५॥ मी वाचूनि घेतों ग्रंथ । आणि बुद्धि योजना सांगतो त्यांत । एवं विद्येनें विद्यादान होत । परस्पर गुरुदक्षिणा ॥२२६॥ ऐसेंचि दुर्दैवें लोटितां करावें । परी शुभ कर्मातें न दवडावे । एवं सांगितलें प्रस्तावें । आतां एकाग्र लक्षण ऐका ॥२२७॥ धातु कांच माती । पार्थीव कीर होती । परी पृथिव्यवस्थाविशेषें परिणमती । भिन्नदर्शनें ॥२२८॥ मातींत कांहीं न दिसेचि । धातूंत छाया दिसे मुखाची । कांचामाजीं पैलीची । वस्तु दिसे ॥२२९॥ तैसें एक हें चित्त । प्रकृतिकार्य यथार्थ । परी कारणगुणें विशिष्ट होत । नांव पावत तें तैसें ॥२३०॥ चित्त स्वभावें करून । जरी सात्विक गुणें उत्पन्न । तरी रजस्तमीं उपमर्दन । होय तयाचें ॥२३१॥ कांच

पार्थिव तेजें जाहला । तो जरी मातीमाजीं बुडविला । तरी प्रतिबंध करी दर्शनाला । तैसी अवस्था चित्ताची ॥२३२॥ क्षिप्त चित्त दैत्यदानवाचें । मूढ चित्त राक्षसपिशाचांचें । विक्षिप्त चित्त तें देवांचें । ऐसें भोजादिकांचें मत आहे ॥२३३॥ परी अदृष्टजन्य स्वभावें । तेथ निरोध जो संभवे । तया योगशब्दें बोलावें । नलगे कांहीं ॥२३४॥ क्षिप्त भूमींत सत्वाचा । मूढ भूमींत रजाचा । विक्षिप्त भूमींत अल्परजस्तमाचा । निरोध जो होय ॥२३५॥ तो या योगशब्देंकरुन । न सांगवेंचि जाण । क्लेशोच्छेदक नाहीं म्हणोन । ही भाष्यकारसंमति ॥२३६॥ तवं श्रोते म्हणती येथ । योगातें शंसितां व्यर्थ । स्वयें बोलिले भगवंत । कीं भूतें अनुसरत प्रकृतीतें ॥२३७॥ तेथ निग्रहाचें न चले बळ । मग योग कायसा प्रबळ । वक्ता म्हणे विवेचनशीळ । बुद्धी असों द्या ॥२३८॥ पुढील श्लोकीं देवरायें । बोलिलें कीं रागद्वेषा दवडिजे स्वयें । यालागीं प्रकृतिवश जें स्वयें । तयांचा निग्रह न चाले ॥२३९॥ "म्हणोनि इंद्रियें एकें । जाणतोनि पुरुखें । लाळावीना कौतुकें । आदि करोनी" — ज्ञानेश्वरी अध्याय ३ ओवी २०२

इत्यादि श्रौतवचनीं । योगाचीच उभावणी । आतां प्रकृतीवश होती ज्ञानी । ते कर्तव्यशून्य म्हणोनियां ॥२४०॥ प्रकृतीवश होती अज्ञानी । तया विवेक न कळे म्हणोनि । मुमुक्षु प्रयत्न करिती निर्वाणी । मिळवाया ब्रह्म ॥२४१॥ म्हणोनि यमनियमादि प्रसिद्धें । केलिया रजस्तमनिरोधें । चित्तसत्व स्वभावसिद्धें । एकाग्र म्हणिजे ॥२४२॥ देहादि विषय तमोगुण । वैराग्यें चित्त काढावें त्यापासोन । प्राण इंद्रियादि रजोगुण । चित्त त्यापासोन काढावें ॥२४३॥ एवं विवेक वैराग्य अभ्यासें । चित्तसत्व स्वभावें पैसे । या नांव एकाग्र ऐसें । बोलती मुनी ॥२४४॥ भगवद्भक्तांचें एकाग्र चित्त । योगियाचें निरुद्ध चित्त । एवं भाष्यविरुद्ध अर्थ । नारायणतीर्थ बोलिला ॥ २४५॥ थोर भगवद्भक्तिहून । योग वाटला यया कारण । परी परम प्रीतीचा जाण । अनुभव नाहीं म्हणोनी ॥२४६॥ मोक्षवस्तु

स्वभावें मिळे। म्हणोनीच ब्रम्हज्ञानें तो उजळे। आत्मप्रेमही सोवळें। सुखदायक ॥२४७॥ यालागीं जीव तुच्छ प्रेमवर्जनी। भगवद्भक्ती मिळे स्थानी। तिये भक्ती करोनी। परापर वैराग्य ॥२४८॥ अपर वैराग्य विषयावितृष्णा। तें दोषदर्शनें होय जाणा। परवैराग्यें गुणवितृष्णा। तें योगेंचि पैं होतू असे ॥२४९॥ पुरुषाचे अनंतत्व। प्रकृत्यादिकाचें सत्यत्व। आणि विवेकख्याती निरोधावी हें तत्व। योगाचें आहे ॥२५०॥ परी निरोधलिया विवेकख्याती। व्युत्थानीं फावूं शके पुढती। मिया येथवर भोगिली समाधीस्थिती। हे व्युत्थानीं अनुमान सांगती नारायण ॥२५१॥ तेंचि भगवत्प्रेमीं निरुद्ध। चित्त जहालिया प्रसिद्ध। विवेक तुच्छ वाटे सुबुद्ध। अनुभवु हा ॥२५२॥ म्हणोनि नारायणतीर्थ स्वविरुद्ध। बोलिले हे यथार्थ। असो एकालंबनी चित्त। ते एकाग्र बोलिजे ॥२५३॥ कांहीं तांत्रिकांच्या मती। प्रयत्ने नसतां योग साधिती। नसतिया भूमी अंगावरुती। आणूनि घेती मूर्ख ते ॥२५४॥ कोणी एकाग्र करूनी मन बळेंचि होती निद्रापन्न। तेथ विक्षेपें देखती स्वप्न। सिद्धी म्हणती तयातें ॥२५५॥ आफू गांजा आणि सुरा। तितुका यांचा योगही खरा। जे स्वाभाविक मूढ भूमि प्रकारा। यत्नें आणिती ॥२५६॥ म्हणोनि रजस्तम निरोधुनि। चित्त सत्वपरिणाम ध्यानीं। एकाग्रता तया लागुनी। बोलिजे बापा ॥२५७॥ हा संप्रज्ञात योग। आतां सकळ वृत्तींचा निरोध चांग। तया नांव बोलिजे योग। असंप्रज्ञातु ॥२५८॥ दग्धपटसंस्कारासमान। चित्त राहे निरुद्ध होऊन। कासयाचेंही ज्ञान। न होय तेथ ॥२५९॥ म्हणोनी असंप्रज्ञात म्हणती तया। चित्त स्वकारणी पावे लया। तैं पुरुष जाणे आपुलिया। स्वस्थळातें ॥२६०॥ चित्ताचा कारणीं लय। या नांव वेदान्तीं सुषुप्ती होय। ऐसी शंका स्वयें। कोणी न करावी ॥२६१॥ तमो बाहुल्य उपादान। जरी अविद्या जगत्कारण। तथापि सत्व परिणामां-तःकरण। हे संमत आहे सकळातें ॥२६२॥ भूतसत्वपरिणाम चित्त वेदांतीं।

प्रकृतिसत्वपरिणाम सांख्य म्हणती । भूतें ही सूक्ष्मतया प्रकृती । प्रकृती स्थूलतया भूतें ॥२६३॥ म्हणोनि अविरोधू बरवा । स्वकारणीं चित्त लय तो सत्वीं आघवा । सुषुप्तींत तमांत लय होवावा । तो उपमर्दरूप ॥२६४॥ म्हणोनि स्वभावें करून । प्राणी जैं होती निद्रासंपन्न । तैं कारण तमोंशीं लीन । चित्त हें होय ॥२६५॥ आणि समाधि करोनी चित्ताचा । लय जेव्हां होय साचा । तैं कारण सत्वांशीं तयाचा । मूळ ठावची ॥२६६॥ सत्व तमीं लीन जाहलें । तरी तें म्हणावें अभिभविलें । यालागीं समाधींत वाहिलें । सत्वकारणीं लीन चित्त ॥२६७॥ परी भगवत्प्रेमामाजीं पाहतां । चित्ता एवढी ये लीनता । आणि अनुभवें सुषुप्तिता । सांपडेही ना ॥२६८॥ अनुभवें समाधि सुषुप्ती । इया भिन्न कवणेपरी होती । हें दावितां नये वादियाप्रती । अनुभवेवीण ॥२६९॥ परी प्रेमीं निरोध होय कैसा । तो वादियाही कळे सहसा । म्हणोनी सुषुप्ति वळसा समाधी नव्हे ॥२७०॥ चिंता असे जयासी । बाहेरील कांहीं न कळे तयासी । आणि निद्राही ते दिवसीं । न लागेची ॥२७१॥ एवं हर्ष जयासी होय । तो ताटस्थ्यें विसरे बाहेरील सोय । आणि निद्रा न मिळे स्वयें । तया ते दिवशीं ॥२७२॥ एवं स्वाभाविक क्षणेक समाधी । त्रिपुरारहस्यीं जयाची प्रसिद्धी । तेही होती विरोधी । सुषुप्तीच्या ॥२७३॥ मग जो स्थिर समाधी चित्तनिरोध । तया निद्रा म्हणे तो अप्रबुद्ध । प्रेमींही हें विशद । फावलें होय ॥२७४॥ जीवात्मपरमात्मयाचा । ऐक्य भाव तो योग साचा । याज्ञवल्क्यसंहितेचा । अभिप्रायू आहे ॥२७५॥

**"संयोगो योग इत्युक्तो जीवात्मपरमात्मनोः"॥**

तो वृत्तिनिरोधेंचि साधे । भगवद्भक्तींत अहं विरोधें । सर्वार्थ-विषयप्राप्ति योग हें बोधें । लिंग पुराण ॥२७६॥ तो काम्य योग गा म्हणावा । भगवत्परता योग निष्काम गणावा । जेथ सकळ दुःखनाश आघवा । भगवंत बोलती ॥२७७॥

"योगिनामेव सर्वेषां मद्गतनांतरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः" ॥
भगवद्गीता अध्याय ५ श्लोक ४७

काम्ययोगी निष्कामयोगी । कर्मयोगी सांख्ययोगी । विवेकी अपर पर विरागी । भक्तियोगी यांत श्रेष्ठ ॥२७८॥ एका प्रेमाचियासाठीं । विषयापासोनि जीवांत पोटी । तुच्छ वाटती तत्व कोटी । भजे नेहटी आनंदें ॥२७९॥ व्युत्थानीं दास्य संप्रज्ञातीं आलिंगन । असंप्रज्ञातीं एकीभवन । साक्षात्कारें प्रेमैकतान । तो युक्ततम मान्य भगवंता ॥२८०॥ अभ्यासें निरोध तमोगुणाचा । वैराग्यें निरोध सत्वगुणाचा । एवं चित्तनिरोध साचा । समाधिरूप ॥२८१॥ यद्यपि अविद्यातमोरूपें आवरण । तें नाशे वेदांतज्ञानें करुन । तथापि तमोवस्था विशेष जाण । क्रिया निर्वाण नाशक तया ॥२८२॥ नाहीं तरी उठवाया झोपेंतून । नित्य लागेल उपनिषत्पठन । मूढादि भूमि अविद्यावस्थाविशेष म्हणून । अभ्यासें निरोधे तयांचा ॥२८३॥ रोध होय रजस्तमाचा । व्युत्थानीं उपयोग कीजें सत्वाचा । हा मी गेचक व्यापाराचा । सिद्धांत बोलिलों अन्यग्रंथीं ॥२८४॥ तोही उपयोगी चंचळा । परी वैराग्यें सत्वनिरोध निश्चळा । एवं योग बोलिला सगळा । लक्षणें करुनी ॥२८५॥ साधनपादीं अंगसमाधी । भावनामात्रें तयाची प्रसिद्धी । भाव्य साक्षात्कार सिद्धी । ज्यांत तो अंगी संप्रज्ञातु ॥२८६॥ असंप्रज्ञातु सर्व निरोधें । प्रेमें या परवैराग्य बोधें होय ऐसे द्विविधें । योगलक्षणें ॥२८७॥ एवं योग जो बोलिला । तो पाहिजे श्रीगुरुरायें अनुमोदिला । जिहीं ग्रंथवाचनें मज हात दिधला । तद्ऋण फेडो भगवंतची ॥२८८॥ एवं द्वया योगविज्ञाना । बोलिले आळंदीवल्लभ करुणा । जयाचिया नामस्मरणा- । माजीं योग पायीं पडे ॥२८९॥ पुढिलिये विक्रमीं पुरुषस्थिति लक्षण । श्रोते परिसोत सावधान । ज्ञानेश्वर करुणानिधान । चिंतूनि हृदयीं ॥२९०॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे योगप्रभावे योगानुशासन योगलक्षण निरुपणंनाम द्वितीयो विक्रमः

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# हिरण्ययोगः प्रारभ्यते

## गीति

श्रीमदलंदिपातिचरणकमलयुगलगंध सेवितोऽस्मि सदा ॥
शिशुमति वृद्ध्यै सुलभं परफलदं हैमयोगमाशंसे ॥१॥

## श्लोक

श्रुतिस्मृति पुराणैश्चेदादिष्टो हृदये हरिः ॥
वाक्यस्तुल्या स नो लभ्यस्ततोंतर्युक्तिमाश्रयेत् ॥२॥
चेतसो मध्यसंवेगात् स्वप्नं वासिष्ठभाषितम् ॥
तदालंबनतो योगः सूत्रभाष्यकृतां मतम् ॥३॥
जीवेन निर्मितं स्वप्नं वेदान्त इति गीयते ॥
किंतु तत्राजशक्तिर्हि नाचार्यैः सर्वथा हता ॥४॥
स्वप्नो बहुविधं किन्तु गुणभेदात् त्रिधैव तत् ॥
स्वप्नेन सत्वजन्येन वृत्तिरोधः प्रजायते ॥५॥
मैत्र्यादिभावनायुक्तः स्वचित्तस्य प्रसादतः ॥
सत्वस्य मध्यसंवेगात् योगित्वं लभतेऽचिरात् ॥६॥
लक्ष्मीशं पार्वतीशं चैवानध्यस्तविवर्तकम् ॥
स्वप्ने लब्ध्वा ऽर्त्रिवेगात्तदैक्यमनुभूयताम् ॥७॥
तीव्र

# टीका

## प्रथमा मुद्रिका

**श्रीमदलंदिपतिचरणकमलयुगलगंध सेवितोऽस्मि सदा ।**
**शिशुमति वृद्धचै सुलभं परफलदं हैमयोगमाशंसे ।।१।।**

ॐ नमः श्री आचार्या ।। भक्तवत्सल गुरुवर्या । श्रीज्ञानेश्वरा प्रज्ञा-सूर्या ।। अगम्यचर्या शिवशिवा ।।१।। जय जय कैवल्य लक्ष्मीवल्लभा ।। जय जय सदानंदसुप्रभा । महात्मया महात्मसुलभा । मायारहिता माय-बापा ।।२।। जय जय पूर्णनगरभूपाळा ।। तूं न रक्त गौर काळा ।। करुणया स्वदासमहाकाळा । हरोनि देसी निजपदातें ।।३।। वाणी मनातें अगोचर । तुझें महात्म्य अतिथोर ।। नेति नेति म्हणोनि समग्र ।। श्रुति राहिली तटस्थ ।।४।। ऐसा तूं निष्कलंक निर्गुण ।। महावाक्याचा लक्ष्यार्थ पूर्ण । त्या तुझे मिळवोनी सुकुमार चरण । भक्तजन होती नित्य-मुक्त ।।५।। गुरुवांचोनि कवणिया ठायीं । निगमफळातें रसू नाहीं । जडशद्धा चेतवूनि सद्गुरू आई । शिष्यहृदयीं उजेड करी ।।६।। दीप लाविता दीपाहून । जरी नसे किंचित्न्यून । पहिल्याचें पहिलेपण । न जाय तरी ।।७।। तैसें गुरुत्व शिष्या देवुनी । तुझें गुरुत्व तुझियाचि स्थानीं । हें विस्मयाची कहाणी । वाढवी भक्ति ।।८।। मनोभ्रमर अतिचंचळ । परी तवपदगंधें अति निश्चल । श्रम न करितांही केवळ । प्राप्त करी ।।९।। सेवोनि तवपदनखशशिकान्ति । अनंत जाहले विमुक्तस्वंती[१] । आब्रह्मजीवा मोक्ष प्राप्ती । तवपदविनंती वाढवी ।।१०।। मियांही त्वद्दत्त भाग्यें करून । करोनि तवपदामोदावघ्राण । पावलो तें समाधान । वाणी मना कानडे ।।११।। तेंचि वारंवार स्मरोनी चित्तीं । चित्तशिशु बोधावया प्रति । सांगता निरूपिजेल सुलभ युक्ति । महती फलदा सदा जे ।।१२।। जैसें गोड औषधें रोग जाय । तैसें सुलभ आणि महत्फल होय । तो हा

टीप १ निष्काळजी

साजिरा उपाय। सुचवो माय सद्गुरु ॥१३॥ या योगाश्रयकांचना। आणोनि भूषणपणा। श्रीगुरु ज्ञानेश्वरचरणा। लेवव्रूं प्रेमें ॥१४॥ श्रीज्ञानेश्वर माय माउली। सद्भावें वंदोनी तत्पाउली। ओवी गुंफोनि अर्पिली। माळा चरणीं ॥१५॥ हरिःॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे हिरण्ययोगे श्रीगुरुस्तवनं नाम प्रथममुद्रिका ✓

श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ

## द्वितीया मुद्रिका

श्रुतिस्मृति पुराणैश्चेदादिष्टो हृदये हरिः।
बाह्यःस्तुत्या स नो लभ्यस्ततोऽतर्युक्तिमाश्रयेत्॥

ओव्याः— जय जय सद्गुरु करुणाघना। जय जय सद्गुरु जगन्मोहना। जय जय सद्गुरु कर्ममोचना। ज्ञानेश्वरा मायबापा ॥१॥ जय जय सद्गुरु विगतमाया। जय जय सद्गुरु सुखालया। जय जय सद्गुरु प्राणप्रिया। आळंदीपते ॥२॥ जय जय सद्गुरु निर्गतग्रंथ। पुढें कृपेनें चालवी ग्रंथ। मम माथां ठेवोनि हस्त। हृदयीं राही अक्षय ॥३॥ मना ऐके सावधान। तुझ्या जवळींच नारायण। श्रुति स्मृति आणि पुराण। सांगती ऐसे ॥४॥ दहरविद्येमाजीं श्रुती। हृदयीं नारायण बोधिती। तैसीच जाग्रत्श्रुति। प्रमाण आहे ॥५॥ "यो विज्ञाने तिष्ठन् विज्ञानमंतर्यमयति"। ऐशा स्पष्ट सौषुप्तश्रुती। कीं हृदयींच राहे जगत्पती। जगदात्मा जो ॥६॥ 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति'। 'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारते'ति। ऐसीया जाग्रत्श्रुती। साक्षात् भगवंतचि बोलिले ॥७॥ 'स्वकीये हृदये ध्यायेदित्यादि स्मृती। 'हृत्पुंण्डरीकमध्ये' इत्यादि पुराणोक्ती। हृदयीं आहे जगत्पती। ऐसेचि सांगती सर्वदा ॥८॥ हृदयीं असतां गोविंद। दुरी दाखविती अप्रबुद्ध। घरीचें द्रव्य सोडोनि सिद्ध। भिक्षा मागती परद्वारीं ॥९॥ कीं हातीचा परिस टाकोनियां। साधू जावें

धातुक्रिया । तैसें हृदयस्थ यादवराया । जन समस्त चुकलेती ॥१०॥ "मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलो संसारपूरु" । ऐसा तातवचनाधारु । असतां भवीं पडावे कां ॥११॥ हृदयींचें लोपोनि बाहेरी धुंडावें । ते देवासी नावडे स्वभावें । जैसे निजपुत्रें भिकारी व्हावें । हें नावडे श्रीमंता ॥१२॥ कीं गृहीं असतां आपुला धनी । परावा देखे द्वाड कामिनी । ते नावडे भर्तृमनीं । तिजलागोनी अव्हेरी ॥१३॥ कीं कल्पवृक्ष आंगणीं लागला । तो हिवर म्हणोनि अव्हेरिला । तरी दरिद्र जन्मवरी तयाला । न सोडी जैसे ॥१४॥ कीं साध्वी सांडोनी निज जननी । दुग्धार्थ धुंडावी वंध्या शुनी । तैसा हृदयींचा सोडोनि चक्रपाणी । बाहेर धुंडणें अनुचित ॥१५॥ वैकुंठीं कैलासीं क्षीरसागरीं । धुंडतां न भेटे पूतनारी । हे श्रीदेवनाथही निर्धारी । बोलिले आधी ॥१६॥

## पद

राम न जाने नर जिया तो क्या जी । ॥ध्रु०॥ हत्ती घोडे माल खजीना और मुलुख सर किया तो क्या जी ॥१॥ गंगा गोमति रेवा तापी और बनारस न्हाया तो क्या जी ॥२॥ गोकुल मथुरा मधुबन द्वारका और अजुध्या कर आया तो क्या जी ॥३॥ बेद पुरानकि चर्चा घनेरी और शास्त्र पढ आया तो क्या जी ॥४॥ जरहि जौहर महाल बनाया खाशी स्तिर्या संग सोया तो क्या जी ॥५॥ आत्मग्यानकी खबर न जानी और बानी बक दिया तो क्या जी ॥६॥ देवनाथ प्रभु आत्मा गोविंद इस नयनन नहि छाया तो क्या जी ॥७॥

म्हणोनी बाह्यस्तुतियोगें करून । ओरडतां न भेटे भगवान । यालागीं आपुले अंतःकरण । शोधावें आधीं ॥१८॥ मृदुसंवेगें सत्वांतःकरणीं । भावें प्रकटवावा कैवल्यदानी । तोचि मध्यसंवेगें पाहोनि स्वप्नीं । तीव्र योगें हृद्भुवनीं योगी व्हावें ॥१९॥ हें निरूपण रसाळ गोमटे ।

आम्रिम मुद्रिका झणझणाटे । श्रवणद्वारें हृदयरेठें । नेवोत सज्जन गुरुकुरें ॥२०॥ श्रीज्ञानेश्वर जनक जननी । कवितामाळ वाहिली चरणीं । आतां आपुलेंसे करोनि । करवी दास्य ॥२१॥ हिरण्ययोगे दूरतरपरमेश्वरस्तुतिवैयर्थ्यनिदर्शनपूर्वकं हृदयगतपरमेश्वरोपास्तिप्रवृत्तिवर्णनन्नाम द्वितीया मुद्रिका।

॥श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

## तृतीया मुद्रिका

**वेतसो मध्यसंवेगात् स्वप्नं वासिष्ठभाषितम् ।**
**तदालंबनतो योगः सूत्रभाष्यकृतां मतम् ॥**

जय जय सद्गुरु करुणासिंधो । जय जय सद्गुरु आर्तबंधो । तुझिये कृपे भव न बाधो । कवण्याही जीवा ॥१॥ मना हृदयींचा भगवंत । वृत्तिव्याप्तीनें प्रकट होत । जरी फलव्याप्ति तेथ । न चले तरी ॥२॥ उपास्तीं अथवा भक्तीं । प्रकटे आनंदसाकारमूर्ती । ज्ञानपूर्व होय उपास्ति । ज्ञानोत्तर भक्ति जाणिजे ॥३॥ म्हणवोनी आनंदसाकार । जरी पाहणें हृद्गत शार्ङ्गधर । तरी वृत्ति तदाकार । अखंड असो देइजे ॥४॥ तिया वृत्तीचा मृदुसंवेग जेव्हां । शुद्धानुविद्धानंद मिळे तेव्हां । तदाकारवृत्तिमध्यसंवेग जेव्हां । स्वप्नीं तेव्हां श्रीकृष्ण भेटे ॥५॥ मध्यसंवेगें होय स्वप्न । हें वासिष्ठीं बहु ठायीं कथन । योगसूत्रभाष्यकारवचन । कीं योग घडे स्वप्नावलंबे ॥६॥ "स्वप्ननिद्राज्ञानालंबनं वेति" । आहे पतंजलीची उक्ती । याचिया भाष्यांत व्यास म्हणती । कीं स्वप्नज्ञानावलंबनें किंवा निद्राज्ञानालंबनें चित्त स्थिर होय ॥७॥ या भाष्यावरी टीका दोन । विज्ञानभिक्षुकृत आणि वाचस्पतिकृत जाण । दोन्हीही सांगती भिन्न । परी अभिन्न उपयोगीं ॥८॥ जाग्रत् स्वप्नासम मिथ्या पहावें । ऐसें भिक्षु बोलिलें बरवें । आणि स्वप्नीं शिव विष्णु दिसतां ते ध्यावे । वाचस्पति म्हणती ॥९॥ परी दोघांच्याही वचनांचा समन्वय होय गाचा । मनोमध्यसंवेगीं स्वप्नाचा । भाव आहे ॥१०॥

"स्वप्नो विकल्पाः" (शिवसूत्र उन्मेष १ सूत्र ९) म्हणोन । स्वसूत्रीं बोलिलें उमारमण । आणि "हृदये चित्तसंघट्टात् दृश्यस्वापदर्शनम्" (शिव सूत्र उन्मेष १ सूत्र १५) इति वचन । तेंचि बोलिलें ॥११॥ या दोहीं-तील पहिले मध्यसंवेगपर । आणि द्वितीय जें सूत्र । तें स्वप्नसम जगदनृत बोधनपर । यालागीं द्वितीयचि विवेचूं ॥१२॥ स्वप्न नानाविध होत । त्याचें मुख्य दोन भेद करोनि येथ । समन्वय यथार्थ । होतसे ॥१३॥ यथार्थ आणि अपार्थ । ऐसें स्वप्न द्विविध भासत । जैसोचि तैसे घडे ते यथार्थ । न घडे ते अपार्थ कीं ॥१४॥ अपार्थ स्वप्न मिथ्या जाण । जगत् पहावे तत्समान । एवं विज्ञानभिक्षुवचन । सुसंगत झालें ॥१५॥ आणि शिवकृ-ष्णाची साकार मूर्ती । ते यथार्थ स्वप्नीं दिसे निश्चिती । हाचि अर्थ वाच-स्पती । योग्य बोलिले ॥१६॥ जगत् स्वप्नतुच्छदृष्ट्या पहावें । आणि ग्राह्यदृष्ट्या हरीस यथार्थस्वप्नीं ध्यावें ॥ एवं दोन्नासही मानावे ॥ प्रमाणभूत ॥१७॥ मलिनसात्विकचित्तसंघट्टण । तेव्हां दिसे विश्व अपार्थ स्वप्न । आणि शुद्धसात्विक चित्तसंघट्टण । तेव्हां यथार्थ स्वप्न शिवकृष्णरूपें ॥१८॥ वस्तु असोनि त्यागावया कारण । पहावें कीं स्वप्नासमान । हें भिक्षूनें वचन । जगदपार्थस्वप्नाविषयींचि घटे ॥१९॥ स्वप्नीं दिसे तें सत्य पूर्ण । मुनीनी भजावें आवडी करून । हें वाचस्पतिमिश्रवचन । यथार्थवैष्णवस्वप्नाविषयीं ॥२०॥ म्हणोनि शुद्ध मलिन सत्वचित्त । संघट्टता यथार्थ अपार्थ । स्वप्नें होती एवं येथ । शिवसूत्रसमन्वय ॥२१॥ पुढें हाही विषय एके स्थानीं । साच येईल निरूपणीं । अधुना हेचि धरावें मनीं । कीं स्वप्नावलंबनीं योग साधे ॥२२॥ हृदयीचा हृदयींच नारायण । प्रकट करावा स्वप्नयोगेंकरून । आणीकही एक जाण । रहस्य येथ ॥२३॥ असमाहित चित्तासी । साधनपादोक्त प्रक्रिया त्यासी । आणि समाहित चित्तासी । समाधिपादोक्त योग असे ॥२४॥ स्वप्नज्ञानालंबन । ही प्रक्रिया समाधि-पादीं आहे म्हणून । उत्तम योगामाजी गणन । होय इचें ॥२५॥ आतां स्वप्न

कोण करित । येच विषयीं निर्णय यथार्थ । अग्रिम मुद्रिका वाट पहात । उहापोह कराया ॥२६॥ श्रीज्ञानेश्वर जनक जननी । कविता अर्पोनी तिचिये चरणीं । आवडी तन्नाम धरोनि वाणी । झालें मी साजणी सुखरूप ॥२७॥

हरिः ॐ तत्सत्श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे हिरण्ययोगे सोपपत्तिकहिरण्ययोगप्रामाण्यवर्णनन्नाम तृतीया मुद्रिका ॥३॥

श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ

## चतुर्थी मुद्रिका

**जीवेन निर्मितं स्वप्नं वेदान्त इति गीयते ।**
**किन्तु तत्राजशक्तिर्हि नाचार्यैः सर्वथा हता ॥४॥**

जय जय सद्गुरो करुणाघना । जय जय सद्गुरो मनमोहना । जय जय सद्गुरो कल्याणनिधाना । आळंदीपते ॥१॥ मागां बोलिलें निरूपण । कीं यथार्थस्वप्नें फळप्रमाण । त्याविषयीं सच्छिष्य आपण । करी प्रश्न आवडी ॥२॥ भगवन् स्वप्नीं नाना काम । जीव निर्मी भोगार्थ परम । रथ नसोनिही संभ्रम । रथघोडे पंथाचा ॥३॥ एवं जीवची स्वप्न निर्मिता । म्हणुनी स्वप्नास आहे मिथ्यता । ऐसा शारीरकभाष्याशय तत्वतां । तयाचें सत्यफळ केवीं ॥४॥ आणि सूचकस्वप्नाचें सत्यफळ । तथापि सूचक स्त्रीदर्शनादि मिथ्या केवळ । ऐसेंही बोलिलें दयाळ । शंकराचार्य शारीरकभाष्यीं ॥५॥ याही वरोनी पाहतां । स्वप्नांतील मूर्तीस नाहीं सत्यता । तुकारामाची स्वप्नगुरुभेटी अवलोकितां । हाचि अभिप्राय सांपडे ॥६॥ गुरु भेटलियावरी तूप मागती । तेव्हां विसर पडला मजप्रती । हें तुकाराम बोलती । अभंगींच ॥७॥ ऐसा ऐकोनियां शिष्यप्रश्न । सद्गुरु बोलती कृपाघन तूं वेदांताश्रयें करून । बोलतासी तें अति सत्य ॥८॥ परी पूर्वापर न विचारितां । बोलणें ते होय वृथा । तरी वेदान्तसमन्वयो आतां । श्रवण

करी ॥९॥ मागील अध्यायीं यथार्थ अपार्थ । ऐसें द्विविध स्वप्न बोलिलें निश्चित । परंतु तिसरें अन्यार्थ । स्वप्न आहे ॥१०॥ काम्य कर्माचें करितां अनुष्ठान । स्वप्नीं होतां स्त्रीदर्शन । तेव्हां समृद्धि संपूर्ण । त्या कर्माची ओळखावी ॥११॥ ऐसी बोलिली आहे श्रुति । येथ सूचक अन्यार्थ स्वप्न निश्चिती । आणि यथार्थ स्वप्नाची स्थिती । वेगळी आहे ॥१२॥ स्वप्नीं जीवाचि कर्ता । हें भाष्य नाहीं अन्यथा । परी त्या भाष्यांत ईश्वराधिष्ठानता । आचार्य बोलिले तें ऐके ॥१३॥ 'न चास्माभिः स्वप्नेऽपि प्राज्ञव्यवहारः । प्रतिषिध्यते तस्य सर्वेश्वरत्वात् सर्वास्ववस्थास्वधिष्ठातृत्वोपपत्तेः । या भाष्याचा अर्थ पाहतां । स्वप्नीं ईश्वराते अधिष्ठानता । येणें व्यवहारिक जीवा स्वप्नाधिष्ठानता । बोलती तत्पक्ष समूळ मिथ्या ॥१४॥ स्वप्नीं जीव कर्ता पूर्ण । तो स्वप्नप्रपंच निर्मी आपण । परी भगवन्मूर्ति दर्शन । जीव निर्मू शकेना ॥१५॥ परमात्मा सर्वेश्वर । तो जागृतीमाजीं घे अवतार । मग तया स्वप्नीं घ्यावया अवतार । कष्ट काय पडती हो ॥१६॥ शरीरांतर ईश्वर चेतन । तेंचि स्वप्नाचें अधिष्ठान । याळागीं हृदयस्थ परमात्मा आपण । अनध्यस्तविवर्तदेहें स्वप्नीं प्रगटे ॥१७॥ ईश्वरदेह निर्मावया । सामर्थ्य नाहीं जीवा यया । म्हणाल पुराण श्रवण करोनिया । निर्मिला ईश्वरदेह ॥१८॥ तरी त्या देहांतील चैतन्य पूर्ण । ते निर्मू न शके जीव आपण । तें ईश्वर चैतन्य म्हणतां जाण । तरी ईश्वर-निर्मितचि देह तो ॥१९॥ पुराणोक्त गुणांच्या ध्यानेंकरून । जागृतींत प्रगटे देव सगुण । तोचि मध्य संबेंधें करून । प्रगटे स्वप्नीं ॥२०॥ मंत्रौषधि आणि देवता । त्या अल्पात्मका म्हणोनि सर्वथा । सर्वावस्थाऽधिष्ठातृता । पावों न शकती ॥२१॥ याळागीं मंत्रौषधिदेवताऽनुग्रहही । स्वप्नें सत्य अर्थ सुचविती पाहीं । परी स्वप्न दाखविती लवलाहीं । मिथ्याचि ते ॥२२॥ तैसा नोहे नारायण । सर्वावस्थांचे अधिष्ठान । याळागीं तदाकार स्वप्नापन्न । सत्याचि तो ॥२३॥ सदृशाही स्वप्न दिसोनी । मिथ्या होती म्हणोनी । भगवदाकार जो दिसे

स्वप्नीं । तो मिथ्या न म्हणावा ॥२४॥ उखेनें अनिरुद्ध स्वप्नीं देखिला आणि जागृतींत चित्रीं ओळखिला । परी हें अनिरुद्धाला । ठाऊकचि नाहीं ॥२५॥ उमावरदानें स्वप्न देखिलें । म्हणवोनी चित्रांत उखेनें ओळखिलें । तैसे अनिरुद्धा नाहीं जाहलें । यालागीं सूचक ते मिथ्या ॥२६॥ परी योगाचिया बळें करून । परस्वप्न परिचय होय म्हणोन । येथ इतिहास पुराण । साक्ष देती ॥२७॥ स्वप्नीं विश्वामित्रा कारण । हरिश्चंद्रें केलें सर्वस्व दान । तें जागृतींत विश्वामित्र म्हणे आपण । अरे त्वां सर्वस्व दिधलें मज ॥२८॥ एवं मियां स्वप्न दाविलें । हें विश्वामित्रें जाणितलें । मग सर्वसाक्षी ईश्वरें जें स्वप्न दाविलें । तें तो कां न जाणील ॥२९॥ म्हणोनी देवदत्त जो देखिला स्वप्नीं । जागृतींत पुसतां तयालागोनी । उत्तर न दे यास्तव स्वप्नीं । मिथ्या दृष्ट हें ब्रह्मविद्याभरणीं बोलिलें ॥३०॥ ते येथें बाधक अनुमान । सर्वथा प्राप्त नव्हे जाण । एका भक्तास "विवेकसिंधू" स्वप्नांत दिला देवान । तो जागृतींत प्रत्यक्ष झाला हे कथा महिपत्युक्त ॥३१॥ स्वप्नीं ग्रंथ देखिला । आणि कोणी उसा आणोनि ठेविला । ऐसी कल्पना करावयाला । अवकाश नाहीं ॥३२॥ एकेचि देहें गोविंदू । स्वप्नजागृतींत करूं शके बोधू । जागृतींत आठवे स्वप्नींचा गुरुशब्दू । हें शतश्लोकींत बोलिलें आचार्यें ॥३३॥ येथ अन्यार्थकता नसोन । मंत्रशब्दान्वय समान । यालागीं मिथ्यासूचकस्वप्न- । सम गुरुमंत्र स्वप्न न म्हणवे ॥३४॥ तुकारामाच्या अभंगीं तत्वतां । त्वां संशय काढिला होता । तरी तो अभंग प्रमाण आतां । ऐके आवीं ॥३५॥

## अभंग

सद्गुरुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥२॥
भोजना मागती तूप पाव शेर । पाडिला विसर स्वप्नामाजीं ॥३॥
कांहीं कळे उपजला अंतराय । म्हणोनियां काय त्वरा झाली ॥४॥

राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण मालिकेची ॥५॥
बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्णहरी ॥६॥
माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥७॥

द्रष्टा तव चेतन एक । तयाचीच अवस्था स्वप्न देख । हें तृतियाध्याय द्वितीयपाद भाष्यारंभीं सम्यक् । बोलिले आचार्य ॥३६॥ यालागीं स्वप्नद्रष्टा भिन्न । ऐसें कल्पणें अप्रमाण । स्वप्नीं दृश्यप्रपंचदर्शन । समूळ मिथ्या ॥३७॥ घृतादि द्रव्य मिथ्या समग्र । तद्विषयक स्वप्नांत पडिला विसर । तितुका अंश मिथ्या । तरी सद्गुरु आणि तदनुग्रह साचार । सत्यांश हा तुकारामाभिप्रायो ॥३८॥ मिथ्या स्वप्नीं गुरुहरिहरदर्शन । विश्वासें भजावें सत्य म्हणून । हें अभंगाचें रहस्य जाण । स्पष्ट तूतें सांगितलें ॥३९॥

असत्या सत्यासी मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमत ॥१॥
मानियला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥२॥

याही तुकारामोक्तीचा अभिप्राव । चित्तेंचि निवडावा सत्यासत्य ठाव । ध्यानें भगवान् गुरूराव । स्वप्नीं भेटे तेथ विश्वास ठेवावा ॥४०॥ भगवन्मूर्ती सद्गुरुमूर्ति । कोण्याही अवस्थेंत भेटतां निश्चिती । मिथ्या न म्हणावी ऐसी उक्ती । तुलसीदासांचीही ॥४१॥ "रूप कहै न सके श्रुति शेषा । सो न जाने स्वप्नेहु जिन देशा" (तुलसीदास)। मीराबाईचेंही वचन । स्वप्नीं भगवत्संबंध घडलिया जाण । सत्य मानावा प्रमाण । ये विषयीं आहे ॥४२॥

माई माको स्वप्नेमे परन्यो गोपाल ॥धृ॥
राती पीली चुनरी पहिरी ॥ मेहदीपान रसाल ॥१॥
कांई औरकी भरों भावरो ॥ म्हांको जग जंजाल ॥२॥
मीराप्रभु गिरिधरन लालसों ॥ करी सगाई हाल ॥३॥ (मीराबाई)

स्वप्नीं परब्रह्मदर्शन । मिथ्या नाहीं म्हणोन । कृतकृत्य होय येविषयीं प्रमाण । कर्णामृतांतील ऐके ॥४३॥

वेणीमूले विरचितघनश्यामपिच्छावचूडो ।
विद्युल्लेखावलयित इव स्निग्धपीतांबरेण ॥
मामालिंगन् मरकतमणिस्तंभगंभीरबाहुः ।
स्वप्नेदृष्टस्तरुणतुलसीभूषणो नीलमेघः ॥६॥ कर्णामृत

स्वप्नीं आज्ञा मिळतां । तैसे आचरावे या विषयीं । संतवचनांचा आधार पाहतां । सांपडे बहू ॥४४॥

अभंग

नामदेवें केले स्वप्नामाजीं जागे । सवे पांडुरंगें येवोनियां ॥१॥
सांगितले काम करावे कवित्व । वाउगें निमित्त बोलों नको ॥२॥
माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनी केले सावधान ॥३॥
प्रमाणांची संख्या सांगे शतकोटी । उरले ते शेवटीं लावी तुका ॥४॥

प्रत्याभिज्ञा मतीं । शिवसूत्रावरी क्षेम राजवृत्ती । विमर्षिणी जियेतें म्हणती । तींत स्वप्न प्रामाण्याविषयीं कथा एक ॥४५॥

'इह कश्चित् शक्तिपातवशोन्मिषन्माहेश्वरभक्त्यतिशयात् अनंगीकृताधरदर्शनस्य नागबोध्यादिसिद्धादेशनः शिवाराधनपरः पारमेश्वरनानायोगिनीसिद्धसत्संप्रदायपवित्रितहृदयः श्रीमहादेवगिरौ महामाहेश्वरः श्रीमान्वसुगुप्तनामा गुरुरभवत् । कदाचिच्च असौ "द्वैतदर्शनाधिवासितप्राये जीवलोके रहस्यसंप्रदायो मा विच्छेदि" इत्याशयतः अनुजिघृक्षापरेण परम शिवेन स्वप्ने अनुगृह्य उन्मिषितप्रातिभः कृतः यथा "अत्र महीभृति महति शीलात्तले रहस्यम् अस्ति तत् अधिगम्य अनुग्रहयोग्येषु प्रकाशय" इति । प्रबुध्दश्च असौ अन्विष्यन् तां महतीं शिलां करस्पर्शनमात्रपरिवर्तनतः संवादीकृतस्वप्नां प्रत्यक्षीकृत्य, इमानि शिवोपनिषत्संग्रहरूपाणि

शिवसूत्राणि ततः समाससाद । एतानि च सम्यक् अधिगम्य भट्ट श्रीकल्ल टाद्येषु सच्छिष्येषु प्रकाशितवान्" । (शिवसूत्र विमर्शिनी उपोद्घात)

### भावार्थ

पूर्वी शिवाराधन तत्पर । होते वसुगुप्तनामें आचार्य थोर । सदा राहती चिंतातुर । कीं संप्रदाय मोडतील द्वैतवादी ॥४६॥ तयांचा कळवळा जाणोनि । स्वप्नामाजीं येवोनी । अनुग्रह करी शूलपाणी । गुह्य सांगोनी काहीं एक ॥४७॥ अरे ! या मोठ्या शिळेच्या खालते । परम रहस्य आहे, तें । प्रकटोनिया स्वशिष्यातें । दाखवी बापा ॥४८॥ अनंतर आचार्य वसुगुप्त । जाहालिया जागृत । शिळा काढोनिया पाहत । तों शिवसूत्रें सांपडली ॥४९॥ तींचि सांगोनी शिष्याप्रती । शिवाज्ञा पाळिली निगुती । एवं स्वप्नीं देखतां भगवन्मूर्ति । मिथ्या सर्वथा म्हणो नये ॥५०॥ सृष्टिदृष्टिवादियांर्थ वहिला । एव्हढा उहापोह केला । दृष्टिसृष्टिवादांत आशं- केला । अवकाशाचि नाहीं ॥५१॥ स्वप्न आणि जागृती । वैलक्षण्य नाहीं कवणिये रीति । हे योगवासिष्ठांत वसिष्ठ सांगती । गौडपाद वदती मांडुक्य- कारिकेंत ॥५२॥ मांडुक्यभाष्यीं आणि बृहदारण्यकभाष्यांत बोलिले भगवत्पूज्य पादसमर्थ । बृहदारण्यकवार्तिकांत सुरेश्वरही बोलिले ॥ ५३ ॥ म्हणोनी जागृ तींत जो ईश्वरावतार । स्वप्नीं देखिल्या तो तैसाचि साचार । जागृत्स्वप्न दोहोंचे अधिष्ठान निर्धार । एक महावाक्यलक्ष्य सर्वसाक्षी ॥ ५४ ॥ तरी ईश्वरावतार भिन्न । इतर बाधे जागृत्स्वप्न । आणि भगवच्छरीर सुंदर पूर्ण । जागृतींस्वप्नीं सत्य प्रगटोनी सम फल दे ॥ ५५ ॥ यालागीं ध्यान कारितां न करितां । स्वप्नीं देखिलिया भगवंता । न मानोनि अन्यथा । तेथचि चित्त स्थापावें ॥ ५६ ॥ या निरूपणबळें कोणी । जागृद्गुरु संत उपेक्षुनी । पाहूं जातील स्वप्नीं । तरी पावतील पतन निश्चयें ॥ ५७ ॥ मिळालिया सद्गुरु संत । कवणियाही अवस्थेंत । उपेक्षूं नये मानोनी अनृत

हा भावार्थ निरूपणाचा ॥५८॥ सत्तात्रयवादाभिप्रायेंकरून । मध्यसंवेगें स्वप्नीं भगवद्दर्शन । सत्ताद्वयवादी स्वप्नजाग्रत्समान । त्यांत स्वाप्निक भगवद्दर्शनही तीव्रसंवेगू ॥५९॥ स्वप्नींही श्रीकृष्ण भोगितां । देवा दाक्षिण-नायकता । अंगिकारिली सर्वथा । उज्ज्वलनीलमणिकारें ॥६०॥ आणि प्राचीनही प्रमाण । रामरक्षास्तोत्रीं जाण । बुधकौशिकगोत्रिकऋषी आपण । बोलिले स्वयें ॥६१॥ "आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः । तथा लिखितवान् प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः" शिवे रामरक्षा स्वप्नीं । सांगितली तैसीच धरोनी । प्रातःकाळीं जाग्रत होवोनी । बुधकौशिकऋषींनी लिहिली ॥६२॥ आणि श्रीमच्छंकराचार्यवचन । तेंही ऐकावे प्रमाण । कीं गुरुमंत्र आणि ईश्वरानुग्रह पूर्ण । स्वप्नीं तो जाण सत्य होय ॥६३॥ "स्वप्नेप्याचार्यमंत्रः श्रवणपरिचितः सत्यमेति प्रबोधे । स्वाप्नादीशप्रसादादभिलषित-फलं सत्यतां प्रातरेति" । अर्थ लिहीलाचि आहे आतां । एवं विधीचिया मानसावस्था । सत्य सांगे ऋग्वेदसंहिता । तया मंत्रा बहुता तेथेचि पहावे ॥६४॥ बृहदारण्यकोपनिषदि । स्वप्न इहपर लोकांची संधी । भाष्यवार्तिककार प्रबंधीं । ऐसेचि लिहीती ॥६५॥ बाळपणीं जे स्वप्न पडें । ते पूर्वजन्मीचे रोकडे । वृध्दपणीं जे स्वप्न पडे । पुढील जन्माचें ॥६६॥ तरुण-पणी येथीलची । दृढत्वें स्वप्न पडे हेचि । मिश्रसात्विका याची । जन्मसाधनीं उपयोगिता ॥६७॥ राजस तामस जे होती । ते स्वयें आपणाचि चळती । शुध्दसात्विक पावती । भलतीया रीति पैलपारु ॥६८॥ अल्पसात्विका अल्प सिध्दि । स्वप्नींही होती हे असिध्दी । व्यवहारिक इहपर लोकाची संधी प्रातिभासिक कैसा ॥६९॥ आतां सम सत्तेची संधी सम । दृष्टिसृष्टीवादीं नोहे विषम । सृष्टिदृष्टीं बृहदारण्यक परम । सभाष्य लावावा ईश्वराविषयीं ॥७०॥ आणि शारीरभाष्यांतील मिथ्या स्वप्नवादू । तो संसार-विषयींचा अनुवादू । एवं वेदान्तसिध्दू संकेत घेणें ॥७१॥ स्वप्नीं शिक-लिया बुध्दि । बहुत कार्ये विश्रामधीं । परी अभ्यास सिध्दी । येथही पाहिजे ॥७२॥ शिथिलांगासनध्यानें । कां निद्रावलंबनें येती जे कां

स्वप्नें । त्यांत प्रथम उत्तम । मध्यमान्य ॥७३॥ तेथ बाह्यकुंभक-सहायें । अधिदैविक लाहे । आणि स्वतंत्रा होये । स्वप्नेंचि एकें ॥७४॥ तो मृदु तंव नित्याचि ये अनुभवा । अभ्यासे मिळे तीव्रठेवा । आतां सद्गुरुवचनविश्वास बरवा । तरी तो तीव्राचि करी ॥७५॥ वचनमात्रें तीव्रता । जोडे उत्तमाधिकारिया सर्वथा । ते स्वप्नाभ्यासें साक्षात्कारता । सहजाचि लाहे ॥७६॥ प्रथमवचनजन्य मृदुवेग न मोडिजे । मध्यवेगीं कळवळी जोडिजे । तीव्रवेग तंव निफजे । येणेंचि मात्र ॥७७॥ शकुनाशकुनफल अदृष्ट । परी उपास्यफळज्ञान ध्यानदृष्ट । यालागीं हा स्पष्ट । अभ्यासूचि कीजे ॥७८॥ साधिलिया अंतःकुंभक । स्वप्ने कळती आध्यात्मिक । परी ईश्वर सर्वत्र एक । अध्यात्म अधिदैव तोचि म्हणुनी ॥७९॥ यालागीं तो शरण करावा । इतराश्रयो न धरावा । उत्तरोत्तर जागृतींत हरावा । पूर्व पूर्व स्वप्नें कुडा भावो ॥८०॥ संस्कार होता अधीन । तरी स्वप्नेंचि कळोनी घेयावे मी देहभिन्न । बृहदारण्यकीं वेदान्तीं मुख्य स्थान । याचिकारण दिधले स्वप्ना ॥८१॥ आत्मयाची नित्यानुमेयता । येणें परिहरोनी मिळे अपरोक्षता । जगन्मिथ्या प्रत्यक्षता । येणेंचि साधे ॥८२॥ स्वप्नदृष्टान्तता ऐसी । जे न्यून नाहीं कवणिया अंशीं । तुळेना इतर दृष्टान्ताशीं । सिद्धान्ताशी ऐक्याचि पावे ॥८३॥ जेथ जीव अधिष्ठान । बोलिले ते मुख्यजीवाभिप्रायेंकरून । तेथ स्वप्नाधार नारायण । ऐसे घडे ॥८४॥ सामान्य स्वरूप आधार । विशेष अधिष्ठान सुंदर । हे बोलिले समग्र । सर्वज्ञात्माचार्य ॥८५॥ एवं कवणेहीपरी । योग उमटे स्वप्नकुसरी । जगीं न भेटे हळहळल्यावरी । तरी ते येथ मिळवावे ॥८६॥ मृदुसंवेगीं शोक करुणा । ते स्वप्नीं चढे शृंगारपणा । एवं संयोगीं वियोगक्षालना । अनादराविणा सुलभ पक्ष हा ॥८७॥ आतां कुंभक बहुकाळ । न होय जरी केवळ । तरी अंतःकुंभकीं डळमळ । मृदुसंवेगाचीही ॥८८॥ बाह्यकुंभकफळीं । निघोनि गेलिया विश्वास माळी । मृदुसंवेगीं

धरोनी आळी । उलट न यावे कांहीं काळ ॥८९॥ पवन आलिया उलटोनी । मना विच्छेदावे मृदुपणीं । अधिक संवेग प्राप्तस्थानीं । होईल तितुका असो द्यावा ॥९०॥ येथ शिथिलांगासनध्यान । उपयोगी ये बहुता-कारण । माझा अनुभव जगाकारण । इतुका तो सांगितला ॥९१॥ बोलतां नये पुढील गोष्टी । जे तातादिकांची आदिष्टी । ती ठेवोनी हृदयसंपुष्टीं । जगदनुभवयोग्य गोष्टी वदो ॥९२॥ येथ म्हणेल कवणी । कीं जन्म संवेग कां न दिसे स्वप्नीं । तरी तो अदृष्ट विशेष म्हणोनी । प्रत्यया नये ॥९३॥ ध्यान दृष्ट विशेष म्हणोनी उपास्य । प्रत्यया ये अविनाश्य । आणि दृष्टिसृष्टिवादीं तंव जगल्लास्य । स्वप्नाचि हे ॥९४॥ स्वजन्म गूढ कां बाळा । तैसी स्वप्नींही प्रबळा । अदृष्टीं तेही घडे एकवेळा । हे अन्यत्र बोलिले ॥९५॥ आत्मवाक्यें जन्मला इया । अहंकारा मिळावया । स्वप्नीं तरी काया । सांकडे आहे ॥९६॥ वैद्यकज्योतिषादौ रोगादि स्वप्न । ते अदृष्टाविषयीं अर्थापादन । वेदान्तीं तव उपास्यस्वप्न । जाणावे पूर्ण यथार्थ ॥९७॥ आणिक अनंत कथा असती । जाहलीया होतील होती । परी ग्रंथवि-स्तारभयें बोलिलो संक्षिप्ती । येथ निजानुभूति अवलंबावी ॥९८॥ एवं वेदान्ताश्रयेंकरून । योगफळ दे स्वप्नज्ञानावलंबन । पुढें सांख्याश्रयेंकरून । हेंचि निरूपण ऐकिजे श्रोती ॥९९॥ श्रीज्ञानेश्वर जगज्जननी । सर्व समर्पोनी तियेचे चरणीं । एकाग्र तन्नामस्मरणीं होवोनिया राहूं सकळ ॥१००॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे हिरण्य-योगे बव्हीभिरुपपत्तिभिः स्वप्ने हृदयस्थभगवदनुग्रहः सत्यो भवतीत्युपपादनं नाम चतुर्थी मुद्रिका ॥

॥ श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥ ✓

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# पतिव्रता चरितामृत

## अध्याय १ ला

ॐ नमः श्रीआचार्या । सच्चिदानंदा गुरुवर्या । अतीत्य वर्तसी कारणकार्या । अनुग्रहचर्या आर्तबंधो ॥१॥ तूं सकलांचें जीवन । तूं पुण्यवंतांचें पुण्य पूर्ण । तूं ब्रह्मयाचा ब्रह्मा आपण ॥ विष्णूचा विष्णु शिवाचा शिव ॥२॥ तूं नयनाचा नयन । तूं श्रवणाचा श्रवण । तूं रसनेचें रसन । घ्राणाचे घ्राण मायबापा ॥३॥ तूं मनाचें मन । तूं बुध्दीचें बोधन । तूं चित्ताचें चेतवन । जीवाचें जीवपण तुजमाजी ॥४॥ तूं धर्मिष्ठांचा धर्म । कर्मनिष्ठां तूं कर्म । भक्ती तूं भक्तां प्रेम । ज्ञानियांचें ब्रह्म तूंचि की ॥५॥ तूं अनाथांची माउली । तूं भवताप पोळलियां साउली । हृदयीं धरितां तुझी पाउली । वहुत निमालीं समुदायें ॥६॥ तूं सकल दोषांसी खंडण । तूं षडरीदुर्जनां दंडण । तूं मुक्तिसुखाचें मंडण । प्रीतिस्पंदन भक्तांचें ॥७॥ देहाचें मातापिता । एकाचि जन्मीं पोषिती तत्वतां । अनंत जन्मींचा माता पिता । सद्‌गुरुदाता ब्रह्मसुख ॥८॥ सद्‌गुरूचेनि कृपाबळें । ब्रह्मरूपें ब्रह्माण्ड उजळे । तान्हिया बाळाचें पाळी लळे । कृपाळे ज्ञानेश्वर जननी ॥९॥ जगदुत्पत्तिचें ज्ञान । जेव्हां तूं देसी करून । तेव्हां दृष्टिसृष्टिवादें जाण । विधातापण तुज कडे ॥१०॥ शिष्याचें विघ्न करूनि दुरी । तूं पाळण

करिसी कृपाभरीं । तेव्हां कमलावर पूतनारी । श्रीगुरू निर्धारी तूंचि तूं ॥११॥ तूं माथां ठेविसी कृपाकर । तेव्हां जगदधिष्ठानज्ञानें साचार । मिथ्या जगाचा उपसंहार । करिसी तैं पार्वतीवरही तूं ॥१२॥ जो जैसें भजन करीत । देव तैसेंचि तया भजत । सद्गुरु भजन न करितां पावत । अहेतुक दयालु म्हणोनियां ॥१३॥ ईश्वराची वाणी वेद । जरी सद्गुरु कृपा नाहीं शुध्द । तरी वेदांतही दिसे भेद । कदापि गोविंद कृपा न करी ॥१४॥ गुरु आणि देव । दोही ठायीं समान भाव । म्हणती ते मूढमती सावेव । देवाहूनि गुरुराव वरिष्ठ कीं ॥१५॥ देव अज्ञानाचा पुतळा । गुरु अज्ञान जाळीं ज्ञानज्वाळा । देवाचिये ठायीं भेदकळा । गुरू अभेद डोळा दाखवी ॥१६॥ देवाचें करिता स्मरण । तरी भेदबुद्धि न जाये मनांतून । सद्गुरु भेटतां कृपानिधान । जन विजन देवरूप ॥१७॥ देवाचें करावया भजन । ध्यावे लागती काष्ठपाषाण । सद्गुरुचें करितां स्मरण । प्रत्यक्ष येऊन भेटतसे ॥१८॥ देवाचें भजनीं कर्मगोवा । सद्गुरु भजनीं नैष्कर्म्यठेवा । मरण न चुके भजतां देवा । गुरुभजनें अमृतमेवा सांपडत ॥१९॥ देवाचें करितां भजन । देव दाखवी सद्गुरुचरण । एवं हरि भजनाचें फळ जाण । श्रीगुरुचरण कळलें कीं ॥ २० ॥ परब्रह्म चापपाणी । तो वसिष्ठपायीं घाली लोळणी । जगन्माता दाक्षायणी । शूलपाणीस शरण गेली ॥२१॥ नारद हरिभक्त करुणाकर । त्याचेंही ध्येय सनत्कुमार । छांदोग्य श्रुति साचार । साक्षी ये विषयीं ॥२२॥ सोळासहस्त्र भोगूनि नारी । जो अखंड ब्रह्मचारी । तोही सांदीपनचरणावरी । लोटांगण घाली प्रेमवशें ॥२३॥ देवाचि कृपें मुक्ती । आह्मां न लगे सद्गुरु-युक्ती । ऐसें म्हणे तो मूढमती । नर्क त्याप्रति चुकेना ॥२४॥ आपुलें पापपुण्यकरण । भोगणें लागे आपणाकारण । एकवेळ पाहता श्रीगुरुचरण । तरी पापपुण्यनिवारण सहजची ॥२५॥ पुण्यकर्में स्वर्गप्राप्ति । पापकर्में अधोगति । पापपुण्या वेगळी स्थिति । गुरुकृपा निश्चिती या नांव ॥२६॥

ब्रह्मानंद जें निर्गुण । तें जयाचे कृपें होय सगुण । तो सगुण निर्गुणातीन प्रेमसंपन्न । श्रीगुरु आपण कृपाळू ॥२७॥ पुत्रासी गुरु मातापिता । पतीस गुरु मानी पतिव्रता । सच्छिष्यासी जो कर ठेवी माथां । तो सद्गुरुदाता कृपाळू ॥२८॥ अलकावातिपति परमदयाळा । वारूनियां मम भवभयाला । देवोनि अक्षय अभयाला । रहस्य बोला प्रेमळ ॥२९॥ तूं गणेश विघ्नहर्ता । तूं बुद्धिदा सरस्वती माता । तूं सद्गुरू कृपावंता । विभूतिमंता संत मूर्ते ॥३०॥ जय इंद्राणीतीरनिवासा । जयभक्तमानसराजहंसा । जय गीता-तत्त्वार्थाऽवभासा । चिद्विलासाऽलंदीपते ॥३१॥ जय उमामहेश्वरआदि-नाथा । जय करुणामय मत्स्येंद्रनाथा । जयाऽर्तबंधो गोरक्षनाथा । गहिनीनाथा कृपार्णवा ॥३२॥ जय जय नाथ निवृत्ति । जय जय ज्ञानेश्वर चिद्वृत्ति । जय जय सोपानदेव कृपास्फूर्ति । जय मोक्ष पद्धति मुक्ताजननी ॥३३॥ इतुकेहि मिळूनि देव । एक माझा ज्ञानदेव । चित्तीं धरूनि सद्भाव । दंडवत स्वयमेवो चरणीं असो ॥३४॥ पतिव्रता चरित्रें नाना । जे ऐकतांच क्षणीं मना । इंद्रियें पावूनि दमना । पापें शमना पावती ॥३५॥ संतांचीं चरित्रें अति गोड । पतिव्रता चरित्रें तैसींच रूढ । पतिव्रता-चरित्रें गातां उघड । ब्रह्मगूढ प्रकाशे ॥३६॥ उतरावया पृथ्वीचा भार । समर्थ महीं इंद्र चंद्र । जैं पतिव्रतेचा होय अवतार । तैं भगवदवतार प्रगट होय ॥३७॥ दुष्ट दानव दैत्य तत्वतां । ते नाटोपती विष्णु उमाकांता । घरींचिया स्त्रिया पतिव्रता । होत्या म्हणूनि ॥३८॥ पतिव्रतेचें तपबळें । ब्रह्मा विष्णु शिव जाहलीं बाळें । तिन्ही लोक धाक प्रबळें । पतिव्रता बळें वश होत ॥३९॥ पतिव्रतेच्या शापासाठीं । जळाल्या ब्रह्मांडाच्या कोटी । वर देतां पतिव्रता गोमटी । तरी कल्पकोटी चिरजीवी ॥४०॥ अनसूया अरुंधती । कौसल्या सीता सती । लीला चुडाला कृष्णा यशुमती । देवकी सती समर्था ॥४१॥ आणिकही पतिव्रता । नाना असती तत्वतां । जितुकी स्फूर्ति येईल चित्ता । तितुकियांच्या चरितामृता सेविजे ॥४२॥ पीतां पतिव्रताचरितामृत । त्या पुढें तुच्छ वाटे अमृत । यास्तव सावध श्रोते

संत । बोबडावचनार्थ परिसावा ॥४३॥ मी नेणें काव्य व्युत्पत्ति । मज न कळे शास्त्रयुक्ति । ज्ञानेश्वरकृपा अघटित स्फूर्ति । हृदयीं गुरुमूर्ति स्मरुनि वदें ॥४४॥ आतां सकळही करुनी कृपा । मज मार्ग दाखवावा सोपा । जेणें सहज मायबापा । पतिव्रता प्रतापा वर्णूं शके ॥४५॥ श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेची वंदूनि पाउली । ही ओवीकुसुममाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥४६॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओंवीछंदबद्धे
सद्गुरुगणेशसरस्वतीसंतस्तवनपूर्वक पतिव्रता–
चरितोपक्रमवर्णनन्नाम प्रथमोध्याय:

॥ श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## अध्याय २ रा

ॐ नमो जय श्रीगुरो । प्रणतकाम कल्पतरो । तूझिया स्मरणें भव हरो । सकळांसहित आमुचा ॥१॥ भागीरथी आणि इंद्राणी । ह्या दोन्ही तुमचे चरणीं । विष्णुरूपा गंगा चरणीं । इंद्राणी चरणीं गुरुरूपी ॥२॥ म्हणोनि गंगेंद्रणी संगम । तोची सद्गुरु प्रेमोद्गम । ज्ञान गंगा आणि भक्ति इंद्राणी परम । सुसंगम जाहला ॥३॥ आतां तिया सुसंगमीं । जे सुस्नात जाहले त्यागूनि उर्मी । ते मिळाले पुरुषोत्तमीं । परब्रह्मीं अविनाशी ॥४॥ पूर्वाध्यायीं निरूपण । केलें चरित्रोपक्रमण । आतां पतिव्रतेची कीर्ति पतिहून । विशेष कैसी ॥५॥ स्त्रियेच्या भजनें पुरुष बुडती । परी पतीच्या भजनें स्त्रिया तरती । म्हणोनि पतीहूनि श्रेष्ठ कीर्त्ति । पतिव्रताख्याति मज वाटे ॥६॥ एथ प्रसंगें वाद आला । तोही पाहिजे समीक्षिला । जे बोलताती बोला । स्त्रीस्वातंत्र्य द्यावे म्हणुनि ॥७॥ पुरुषासी स्वातंत्र्य पूर्ण । स्त्रियासी स्वातंत्र्य तैसेचि जाण । परी हें मिथ्याचि बोलणं । जे स्त्रियां परतंत्रपण

उपेगा नये ॥८॥ यासी वादी बोलती नाना युक्ती । परी येणें नष्ट होवो पाहे भक्ती । आणि व्यवहारसिद्धीसाठीं जी प्रीति । तीही राहूं न शके ॥९॥ स्त्रियेतें स्वातंत्र्य देता । तरी लज्जा नष्ट होय तत्वतां । मग अष्टगुणी काम वृद्धिता । सहज पावे ॥१०॥ या लागीं स्वतंत्र युवती । कल्पांती होवों न शकती ।असी या खंडणमंडणयुक्ती । परी यथार्थ स्थिति ऐकावी ॥११॥ धर्म अर्थ काम मोक्ष । हे चार पुरुषार्थ साक्ष । त्यामाजी आप आपणा मोक्ष । दुसरिया नाहीं ॥१२॥ धर्म अर्थ आणि काम । येथ धर्मपत्नीसह संभ्रम । स्वातंत्र्यपारतंत्र्यसंगम । सांगू येथें॥१३॥

श्रुतिः—"**धर्मेच अर्थे च कामे च नातिचरामि इतिवरः**" । धर्मअर्थकामांच्या ठायीं । त्वां न सोडावी स्त्री सर्वदाही । ऐसिया वचनीं लवलाहीं। वरोत्तर ।विवाहांत ॥१४॥ धर्म अर्थ आणि कामीं । कदापि हीस न त्यागीं मी । एवं वरही वचनानुगामी । सहज होय ॥१५॥ एवं निश्चिती असे श्रुति। आतां ऐकाव्या स्मृति । "**न स्त्री स्वातंत्र्यमर्हति**"। ऐसी उक्ति मनूची ॥१६॥ स्मृतिः-—"नार्यस्तु यत्र पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः" (मनु, अ० ७-४२) । जेथ पूजिल्या जाती युवती । तेथ वास कीजे दैवती । एवं दोन्हीही स्मृति । विरोधि भासतीं परस्पर ॥१७॥ पहिली स्मृति स्त्रीस्वातंत्र्य निषेधित । दुसरी स्मृति विधी मांगत। म्हणोनि विरोध भासत् । स्मृतींचा जरी ॥१८॥ तथापि धर्माच्या ठायीं । स्त्री सर्वदा परतंत्र पाहीं । दासी होऊनिया राही । तरीच धर्मफळ मिळे ॥१९॥ जो जो धर्म करी पुरुष । स्त्रियेनें अनकूल असावें तयास । जैसी दासी निज स्वामीस । अनुकूल राहे ॥२०॥ धर्माच्या ठायीं दासी भार्या । जैसी अत्री तें अनसूया । कीं सत्यवाहना तया । सावित्री जेवीं ॥२१॥ एवं धर्माच्या ठायीं दासी कामिनी । अर्थाच्या ठायीं ती मैत्रिणी । जैसे पांडव निघतां वनीं । याज्ञसेनी अनुकूल ॥२२॥ अर्थपुरुषार्थ साधिता । समान साधावा तत्वतां । धर्म पुरुषार्थ साधितां ।बहु पुरुषार्थ पुरुषाकडे ॥२३॥ धर्मपुरुषार्थाचा

अधिकार । पुरुषाकडे येतो साचार । स्त्रियेने दास्यत्व करुनि निर्धार । मिळवावें पुण्य ॥२४॥ आणि अर्थपुरुषार्थाच्या ठायीं । स्त्रीपुरुष अधिकार समान पाहीं । मित्रां सारिखे दोघांही । वागावें सुखें ॥२५॥ एकाचें इष्ट एकीं करावें । तेथें हें तें मग न गणावें । एवं अर्थ पुरुषार्थ साधावें-दोघीं समान राहोनी ॥२६॥ आणि काम पुरुषार्थाच्या ठायीं । स्त्रियेतें अधिकार वरिष्ठ पाहीं । दास्यत्व ये लवलाहीं । पुरुषाकडे ॥२७॥ जैसे द्रौपदीचे पाय धर्म चुरीत । कीं राधेचे पाय हरी वंदित । । तें काम पुरुषार्थस्थित । यथापरिस्थित ऐकावी ॥२८॥ कामपुरुषार्थें करून । स्त्रियेचाचि करावा मान । ये विषयीं जयदेववचन । प्रमाण आहे ॥२९॥

प्रतीक

**स्मरगरलखंडणं मम शिरसि मंडनं देहि पदपल्लवमुदारम्**

( श्री गीतगोविन्दम् दशम सर्गः श्लोक ७. )

भावार्थ

" प्रिये मन्मथ विष अतिदुस्तर । तेणें शरिरीं उठे विकार । ते तूं कृपा करुनि निर्धार । नष्ट करीं ॥३०॥ तुझी पाउलें अति सुंदर । मी धरुनि शिरावर । जे मज रोगिया होती उदार । वैद्या सारिखे ॥३१॥ एवं जयदेवाचें वचन । काम पुरुषार्थीं स्त्रियेतें मान । आणिकही एक कवी प्रमाण ॥ बोलिला ऐसा ॥३२॥

प्रतीक

**राधे त्वमधिकधन्या हरिरपि दुस्तरभवाब्धितारोऽपि ।**
**मग्ना सुरतसमुद्रे तव कुचकुंभावलंबनं कुरुते ॥१॥**

भावार्थः—श्रीकृष्णाहूनि मान्य । राधे तूंचि परम धन्य । कारण सुरतसमुद्रीं असतां मग्न । तोही तव कुचकुंभाश्रयीं ॥३३॥ काम समयीं रघुपति । सीतेस मान देत नाना रीति । आणि पुरूरवा नृपति । मान दे उर्वशीप्रती तैसा ॥३४॥ शंतनु मान गंगेप्रती । देतां होय तैसेच रीति । चुडाला राणीचे वचनाप्रति । शिखिध्वज नृपति मान देता ॥३५॥ असो

बहुत दृष्टांत । हाच अनुभव यथार्थ । साधितां धर्मपुरुषार्थ । दासी होआवें स्त्रियेनें ॥३६॥ अर्थपुरुषार्थी मैत्रिणी । कामपुरुषार्थी स्वामिनी । एवं ऐसिया स्मृति दोन्ही । बोलताती ॥३७॥ प्रथम स्मृतीचा अर्थ । जाणावा धर्म पुरुषार्थ । आणि दुसरिया स्मृतीचा अर्थ । काम पुरुषार्थ जाणावा ॥३८॥ तिसरीही एक स्मृति । आहे निकी ऐसिया रीति । **भोज्येषु माता शयनेषु भार्या** इत्यादि स्थिति । बोलली आहे ॥३९॥ भोजनाचे समयीं जननी । शयनाचे समयीं कामिनी । कार्याचे ठायीं मैत्रिणी । आज्ञा प्रमाणीं दासीसम ॥४०॥ धर्मानुकूल परममती । ऐशा सद्गुणी जेथ युवती । निकया पूजिलिया जाती । कुल उद्धार स्थिती त्या ठाया ॥४१॥ एवं धर्मपुरुषार्थी स्त्री परतंत्र । आणि काम पुरुषार्थी स्त्री स्वतंत्र । आणि पतिसेवा पवित्र । धर्म स्त्रियेचा ॥४२॥ एवं पुरुष पुरुषार्थ आचरितां । हे झाली स्त्रियेची व्यवस्था । परी स्त्रीचा पुरुषार्थ तत्वतां । एक पतिव्रताधर्म ॥४३॥ म्हणोनि पुरुष धर्मानुकूल आहे । आणि आपुला पतिव्रताधर्मही आचरत राहे । ती स्त्री कुलस्त्रियांहूनि धन्य पाहे । निकी लवलाहें निरूपिली ॥४४॥ इये अध्यायीं निरूपण । विपरीत स्त्रीस्वातंत्र्यवाद खंडण । स्मृतिविरोध परिहरोन । गार्हस्थ्यव्यवस्था स्थापिली ॥४५॥ स्त्रीपुरुषांचें कर्तव्यकर्म । संक्षेपें निरूपिलें परम । पुढील पतिव्रताचरितोपक्रम । येणेंही साधे ॥४६॥ झालिया शंका समाधान । पुढें चरित्रें करावीत श्रवण । ज्या ज्या पतिव्रता पुरातन । आणि नवीन जाहलिया ॥४७॥ त्या सकळांचा चरित्र समुदाय । येथ निरूपणीं योजिला होय । प्रथमसुखबोधा रचिला उपाय । कुलस्त्रियांच्या ॥४८॥ पुरुषही वाचोन । एकपत्नीव्रत आचरतील पूर्ण । ऐसी आशा करोन । आरंभिला ग्रंथ ॥४९॥ पुढें उत्तर उमाचरित । जे सकल जगन्माता शोभत । तें मातृचरित्र ऐकूनि यथार्थ । पुनीत होवोत सुजन श्रोते ॥५०॥ श्रीज्ञानेश्वर चरण । दृढभावें हृदयीं धरून । अध्याय केला समर्पण । मालिका रूपें ॥५१॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे, ओवी छंदबद्धे, पतिव्रताचरितामृते, विपरीतस्त्रीस्वातंत्र्यवाद खंडणपूर्वकगृहस्थाश्रमव्यवस्थावर्णनन्नाम द्वितीयोध्यायः

**श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु**

श्रीज्ञानेश्वर माउलीसमर्थ

## अध्याय ३ रा

नमो माझिया कुळदेवता । भक्तवत्सला उमाकांता ।। श्रीज्ञानेश्वररूपें भगवंता । कृपा केली भजवरी ।।१।। तरी आतां तेचि रूप । हृदयीं राहो हा संकल्प ।। सिद्धि न्यावया मायबाप । समर्थ तुम्ही ।। २।। म्हणोनि हैमवती सहित । वंदिलें करावया स्वहित । योगी जाणती जे गुणरहित । ते गुणसहित भक्तवशें ।।३।। तें उमाचरित सुंदर । पुढें वदवावें सविस्तर । जय जय उमा पिनाकधर । करुणानिधे ।।४।। जय त्रिनयन शशिशेखरा । जयाशीव मुकुंद प्रियशंकरा ।। जय निज मंगलकरा । गंगाधरा सिश्वरते ।।५।। ऐसी करितांचि स्तुति । हृदयीं प्रगटली शंभुमूर्ति ।। सह ज्ञानेश्वरैक्य स्थिती । पाहोनिया ।।६।। तें सुंदरपण डोळां पाहतां । बोलावया उमाचरिता ।। स्फूर्तिप्रवाहें तत्वतां । हृदयाब्धीं भरे ।।७।। तंव श्रोते करिती प्रश्न । उमाचरित्र आम्ही करूं श्रवण ।। परी आशंकित जाहलें मन । पुसणें आहे कांही एक ।।८।। तेथ वक्त्याचें अनुमोदन । पाहोनि श्रोते वदती आपण ।। पातिव्रत्यीं सामर्थ्य गहन । काय म्हणोन सांगावें ।।९।। आणि पातिव्रत्याचें फळ । तेंहि सांगावें सकळ । पुरुषतपाहूनिही केवळ । श्रेष्ठ असे काय म्हणोनी ।। १०।। कौषिकब्राह्मणाच्या तपाहून । पातिव्रत्याचें श्रेष्ठपण ।। हें वनपर्वी निरूपण । ऐकिलें आम्ही ।।११।। तरी ही आशंका फेडावी । ऐसी उक्ति ऐकूनि बरवी । वक्त्यातें ज्ञानरवी । उजळला वाटे ।।१२।। म्हणे तुम्ही धन्य सज्जन । तुमचेनि वक्त्या वक्तेपण । तुम्हां ऐसे जोडलिया निधान । तरी मग न्यून काय असे ।।१३।। तुम्ही विवेकसागर । तुम्ही चातुर्य वैरागर । वैराग्याचें आगर । थोर तुम्ही ।।१४।।

### संमति ओवी

**अहो चंद्रकांत द्रवतां कीरु होये । परी तें हातवटी चंद्रींचि आहे तैसा वक्ता तो वक्ता नोहे ।। श्रोतेनिवीण ।। (ज्ञानेश्वरी अ-९- ओ २९)**

१ पाठभेद--हें ऐकिले निरुपण । महाभारतारण्यपर्वी

म्हणोनि तुमची बुद्धि । प्रशंसिता विचारनिधि ॥ तरी प्रशंसनयोगी । समाधि लागो पाहे ॥१५॥ असो स्मरोनि अलंदिपति । उत्तर विवेकें यथामति । काढोनि घ्यावे निश्चिती । आपलें आपण ॥१६॥ पुरुष तप करी जेव्हां । कांहीं संकल्प असे तेव्हां । "ममात्मनःफलप्राप्त्यर्थ" म्हणोनि भावा । करणें पडे ॥१७॥ "स्वर्गकामो यजेदिति । ऐसी ही आड ये श्रुति । एवढा दुर्यत्न स्त्रियां प्रति । न घडे कदा ॥१८॥ स्त्रियांचा पातिव्रत्यीं श्रम । तो त्यांना वाटे आपुला धर्म । म्हणोनि तयांचें तें कर्म । सहज होय ॥१९॥ मायबापग्रहाहोनी । शिक्षणाच्या योगें करोनी । स्त्रियां-च्या येत आंगवळणी । पातिव्रत्य तें ॥२०॥ अंगवळणीं पडतां धर्म । तरी तो सहज हीं लागे निष्काम । जेथ सायासाचें कर्म । तेंचि सकाम होवों लागे ॥२१॥ जैसें प्रातःकाळीं उठावें । हें बहु लोकांसी कळें स्वभावें । परी तत्फलाकडे धांवे । न घेती कोणी ॥२२॥ कीं जयाचा गोड बोलणें स्वभाव । तो तत्फल न इच्छी सावेव । कीं नदीचा चाले प्रवाह । परी फल कांहीं नेणे ते ॥२३॥ कीं वृक्ष करी परोपकार । परी फळ किडाळ नेणे समग्र । कीं जग निववितो जलधर । फळावीण ॥२४॥ तैसें जें कर्म पडे अंगवळणीं । त्याचें फळ नेच्छी कोणी । ते सहजचि काय मन वाणी । घडोनि येत ॥२५। । सायास जेथ कांहीं । तेथ मी कर्ता ही बुद्धि पाहीं । वारंवार ये लवलाहीं । प्रत्ययासी ॥२६॥ आणि सहज कर्म जें होत । तें झालें तैसें कोणीकडे जात । त्याची आठवणही राहात । नाहीं केव्हां ॥२७॥ जैसे मार्गी चालतां । चहूं कडे पाहती तत्वतां । परी जे सुंदर वाटे सर्वथा । त्याचीच आठवण ये ॥२८॥ एरव्ही पाहणें तें सहज । तेवीं या कर्मा माजी गुज । जें अंगवळणीं पडे सहज । कर्म तें बा ॥२९॥ म्यां आज इतुकें कर्म केलें । हें नाठवे कांहीं केलें आणि जें कर्म संकल्पें आरंभिलें । त्याची स्मृति ये वेळोवेळे ॥३०॥ वेळोवेळीं आठवण । कीं

मी हें कर्म करीं आपण । म्हणवोनि कर्तृबुद्धि दारुण । दृढ होय ॥३१॥ तपादिकांसि पाहतां । आरंभ असे तत्वतां । तेथ संकल्प येत असे माथां । कर्तृबुद्धि ॥३२॥ तप करुनि सोडणें कर्तृत्वमती । यास नित्यकर्महूनि शतगुण सायास लागती । नित्य कर्म सहज रीति । निष्काम होय ॥३३॥ तें स्त्रियांच्या ठायीं । पातिव्रत्य सहज पाहीं । आणि पतिचि लवलाहीं । ईश्वर मानिती ॥३४॥ ईश्वर होय जगत्कर्ता । पति उदरीं गर्भदाता । या अनुभवें तत्वतां । पतिवरि ईश्वरता दृढ होय ॥३५॥ जन्मदाता मातापिता । तोही उपयोगी न पडे सर्वथा । परावा असोनि पति उपयोगिता । येणें ईश्वरता दृढ होय ॥३६॥ प्रत्यक्ष जो उत्पन्न कर्ता । त्या पितया वरि न चले सत्ता । रुसवा पतीवरी सर्वथा । येणें ईश्वरता दृढ होय ॥३७॥ सात पाऊलें चालतां । पतिसख्य कळे तत्वता । पाणिग्रहणें पति सांभाळिता । येणें ईश्वरता दृढ होय ॥३८॥ सावित्री रमा हिमाद्रिसुता । अरुंधति अनसूया माता । यांचे इतिहास भावें ऐकितां । पतिवरी ईश्वरता दृढ होय ॥३९॥ कीं त्यागितां पतीतें सहज । जारपणें वाढेल रज । या पापाच्या भयें सहज । दृढ होय ईश्वरता ॥४०॥ पतिव्रतेनें पतिसेवा केली । ते कामना धरोनि केली । ऐसी ग्वाही नाहीं देखिली । पुराणीं कोठें ॥४१॥ पुत्रकामना धरून । पतिसेवा केली याचें उदाहरण । ऋषिपत्न्यांविषयीं जाण । आहे जरी ॥४२॥ तरि पुत्र जो होत । तो पतिसह आपल्या उपयोगी पडत । केवळ आपुलिया भोगासाठीं निश्चित । कामना नसे पतिव्रतांची ॥४३॥ किंचित् कामना जरी । त्यांतहि पतीचें हित तरी । केवळ पतिव्रता ती निर्विकारी । निष्काम सेवा करी सहज ॥४४॥ तपादिकांच्या ठायीं । निष्कामता सायासें येई । आणि पातिव्रत्याच्या ठायीं । निष्कामता सहज असे ॥४५॥ सकाम तपाचीं उदाहरणें । बहुत देती निगम पुराणें । सकाम पातिव्रत्याचीं उदाहरणें । क्वचित् सांपडती ॥४६॥ जो जों करी कामपूर्ती । तेथ जीवाची सहज प्रीति । पतीनें स्त्रियांची काम पूर्ति । म्हणूनहि प्रीति सहज होय ॥४७॥

याचिकारणें करून । पतिव्रतांचे शुद्ध मन । शीघ्र होय न करितां साधन वेदोक्तही ॥४८॥ याचि अभिप्रायें करूनि । वराहमिहिरांनीं स्तविल्या कामिनी । नाहीं स्तविल्या जारिणी । कुटिलमति ॥४९॥ तो बृहत्संहितेंत अध्यावो । इच्छा तरी वाचोनि पाहावो । तात्पर्य पतिव्रता स्वयमेवो । स्वधर्मनिष्ठ निष्काम ॥५०॥ येथें शंका येईल कोणा । कीं पति तो मनुष्य जाणा । मग पातिव्रतेस जीवोपासना । घडेल सहज ॥५१॥ जीवोपासना तंव कहीं । श्रुतींत बोलिली नाहीं । ईश्वरोपासना लवलाहीं । बोलिली सकळ ॥५२॥ "**सर्वत्र प्रसिद्धोपदेशादिति**"। "**विवक्षित गुणोपपत्तेश्च**" निश्चिती । "**अनुपपत्तेस्तु न शारीर**" इति ईशाप्रति उपास्यता ॥५३॥ एवं ब्रह्मसूत्राभिप्रावो । तरी तो पतिव्रतेसि केविं फळ भावो । कारण पति स्वयें जीवो । आहे म्हणूनि ॥५४॥ तरी याचें उत्तर। जैसे शालिग्रामावर । विष्णुबुद्धि करिती विप्र । पूजिती भावें ॥५५॥ तें विष्णु म्हणूनि पूजिता । शिलादिकधर्म न येती चित्तां । तैसी पतिगुणदोष पतिव्रता । सर्वथा न पाहे ॥५६॥ मूर्त्यादि शिलाभिशुद्धि । तेथ जरी होय भगवद्बुद्धि । पतींतें त्याहूनि चेतनसिद्धी । तेथ ब्रह्मबुद्धि कां न होय ॥५७॥ गुरुपासनेकरोन । शिष्यातें जैसा ईश्वर प्रसन्न । पत्युपासनेकरोन । स्त्रियातें तैसा ॥५८॥ आणि सहज निष्काम उपासना । म्हणोनि शीघ्र हरीतें करुणा । येवोनि पतिव्रता मना । शुद्ध करी तो ॥५९॥ कर्म उपासना भिन्न । हे पुरुषातें करणें पडे गहन । आणि पातिव्रत्याचि कर्म पूर्ण । पातिव्रत्य उपासना स्त्रियां ॥६०॥ एवं कर्म उपासना । दोहीं ठायीं अद्वैत वासना । होय म्हणोनि सहज मना । मलविक्षेप सोडिती ॥६१॥ दोन्ही दोष सहज जाती । तेणें शुद्धता आणि एकाग्रता चित्तीं । येवोनि सुखाच्या शिरा वरुती । श्रेष्ठ ती होय ॥६२॥ एक मात्र उरे ज्ञान । तें तो नोहे श्रवणादिविण । परी केवळ पातिव्रत्यें करून । ब्रह्मलोक फळ मिळे ॥६३॥ तेथ तियेतें मिळे पति । सेवा करी निष्काम रीती । म्हणोनि शेवटीं सत्त्व

चित्तीं । वाढोनि ज्ञान अवश्य होय ॥६४॥ एवं येथ किंवा ब्रह्मलोकांत । ज्ञान पातिव्रत्यांकित । म्हणोनि पतिहूनि विख्यात । कीर्ति पतिव्रतेची ॥६५॥ आधीं उमा मग महेश्वर । आधीं लक्ष्मी मग नारायणोच्चार । आधीं सीता मग रामचंद्र । आधीं राधा मग कृष्ण ॥६६॥ अत्रिहूनि तत्वतां । अनसूया कीर्ति श्रुत बहुतां । लोकांमाजी मातापिता । ऐसेंचि म्हणती ॥६७॥ आधीं पुरुष मग उच्चारी प्रकृति । तरी तो होय मातृघाती । ऐसें निरूपण ब्रह्मवैवर्तीं । केलें आहे ॥६८॥

श्लोकः-आदौ पुरुषमुच्चार्य पश्चात्प्रकृतिमुच्चरेत् । सभवेन्मातृघातीच ।

"विष्णुपति नमस्तुभ्यं" इत्यादि वचन । समासान्तपद म्हणोन ।

अन्यपदार्थाचा मुख्यपण । सहज आलें ॥६९॥ पुरुष यज्ञ करी जेव्हां । पशु मांस घाली तेव्हां । आणि पतिसहगमन स्त्री करी जेव्हां । तेव्हां स्वदेह ही समर्पी ॥७०॥ एवं यज्ञकर्माहून । पतिव्रतेचें धैर्य गहन । येणें तपेंहि नारायण । तुष्टे सहज ॥७१॥ असो आतां नाना रीती । आशंका घेतली होती श्रोतीं । त्याचें उत्तर यथामति । दिधलें आहे ॥७२॥ पथ उणें पुरें कांहीं । तें योग्यसें करा चतुर सर्वही । मी तों स्वयें ज्ञानेश्वर-पायीं । कविता अर्पोनि तटस्थ ॥७३॥ ज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदोनि पाउलीं । माये पतिव्रतायशखोली । उघडीं कृपें ॥७४॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे, ओवी छंदबद्धे, पतिव्रताचरितामृते, अर्थवादरहितवस्तुतयैव पातिव्रत्यस्य सम्यक् सामर्थ्यवर्णनं नाम तृतीयोध्यायः ।

श्रीकृष्णार्पणमस्तु

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

## अध्याय ४ था

। जय जय हिमगिरीनंदिनीवरा । जय भक्तमानसचकोरचंद्रा । जय रतिकांततातहृदयविहारा । काशीविश्वेश्वरा विश्वपते ॥१॥ जय त्रिशूलकर त्रिपुरहरा । जय त्रिनेत्र त्रिपथगाधरा । जय त्रिमात्रत्रिलोकेश्वरा । कर्पूरगौरा त्रिगुणरहिता ॥२॥ जय चक्रचालका चक्रधरप्रिया । भवविलासहा, कैलासविलासिया । जय भक्तकाम प्रपूरणोल्हासिया । कामनातीता कामदहना ॥३॥ जय जय निराकार लिंगात्मका । जय भक्तमनोहर सगुण शालिंका । जय गणेशतात गौरिवामांका फणिभ्राडर ग्रैवेइका पशुपते ॥४॥ जय विभूति चर्चन विभूतिप्रिया । जय भवानीवरा भवऽभया । जय भवभयहरा भव हृदयहृत्या । कारणकार्यनियामका ॥५॥ जय पंचवक्त्र द्विपंचकरा । जय द्विपंचशतवक्त्रभूषणधरा । जय प्रपंचाश्रय प्रपंचहरा । पंचबाणदहना पंचम ब्रह्म ॥६॥ जय जगद्‌गुरु करुणामूर्ते । जय निगमवर्णित अतर्क्यकीर्ते । जय गुणगणमंडित भवानीपते । पुढें ग्रंथातें चालविता तूं ॥७॥ मागील अध्यायीं निरूपण । पातिव्रत्य सामर्थ्य पूर्ण । आतां श्रोते सावधान । होउनी अवधान असों द्या ॥८ आज सकळ तीर्थें आलीं घरा कीं उदय जाहला अमृतकरा । पतिव्रता चारितसुधासुंदरा । सुजीवितवरा वरों आली ॥९॥ आजि मंगळा मंगळ भेटले । आजि सुखाचें पारणें फिटलें । आजि काळाचें संबंध तूटलें । अमृत प्रकटलें पातिव्रताचरित ॥१०। ज्या स्वयें पतिव्रता होती । त्या दुजिया तैसिया करिती । जेवीं ईश्वरावतार गुरु । मग ब्रह्म करिती मुमुक्ष जीवा ॥११॥ जीव अधिकारी साधनगुणें प्रकटलीं । तेवीं पातिव्रता व्हावया हीं साधनें । श्रीनारदमुनीतें नारायणें । निरूपिलीं ॥१२॥

**संमति श्लोकः—** **क्षणो नास्तिरहोनास्ति नास्ति प्रार्थयिता जनः ॥**
**तेन नारद नारीणां पातिव्रत्यं हि जायते ॥१॥**

पति सह सर्वदा धर्माचरण । पत्यर्थास्तव गृहकार्यकरण । सासू श्वशुरादि वृद्धसेवन । ती जीवनसुखार्थ ॥१३॥ रजनीं पति सुखदानी शयनीं । जरी कामास्तव पति म्हणे स्वामिनी । तरी अहंकार वाढेल म्हणुनी । अनुत्सेकिनी स्वामिनित्वीं ॥१४॥ एवं पति सेवेवीण । न जाये सर्वथा क्षण । पतिचरणध्यानाविण । हृदयीं मन मोकळें नव्हे ॥१५॥ परम तप तो प्रियकांत । म्हणोनि पतिवीण त्यजिला एकांत । सासू श्वसुरसेवया लोकांत । उपेक्षिला ॥ १६॥ जें लोकजात अनंत कोटी । तें पतिवीर्य विरूढलें पोटीं । म्हणूनि पुत्रशाला गोमटी । विश्व जाहलें ॥१७॥ येणें सकळावरी आज्ञा । सकळ ही म्हणती जननी प्राज्ञा । कवणाचीही करावया संज्ञा । प्रज्ञा न चले ॥१८॥ जगा रक्षी जेवीं जननी । या लागीं विनवणी न मानी । यास्तव नारदा निश्चयें करूनि । पतिव्रता कामिनी होताती ॥१९॥ ईश्वरापासूनि सकल वेद । सकळ विद्या ज्ञानभेद । शिवा पासूनि प्रसिद्ध । प्रगटले ॥२०॥ तेवी पातिव्रत्य धर्म । सर्वही उमेपासूनि परम । हा महाभारतीं सप्रेम । प्रसंगू आहे. ॥२१॥ स्वयें पतिव्रतामाजी वरिष्ठ । हिमकन्या परमश्रेष्ठ । तिचें चरित्र सुविस्पष्ट । सादर श्रोतीं परिसिजे ॥२२॥ ही ईश्वररूपा ईश्वरशक्ति । परी वाढवाया पातिव्रत्याप्रति । दक्ष गृहीं महासती । झाली अवतरली स्वेच्छावशें ॥२३॥ अहो धर्मार्थ कांहीं । परमेश्वराचे ठायीं । निके कांहीं नाही । श्रुति म्हणे ॥२४॥ परी बाळाचें मुखीं द्यावया ग्रास । बाप जेवूनि दावी सावकाश ॥ तेवी धर्मी लोक लावावयास । ईश्वरास धर्म आचरणें ॥२५॥

## संमति श्लोक

**"न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥२२॥ (भ. गी. अ. ३ रा)**
**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।**
**मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः" ॥२३॥ (भ. गी. अ. ३ रा)**

भगवंत म्हणे मज। नाहीं कर्माऽकर्माचें काज। परी मी आपुलें सहज। कर्म न सांडीं ॥२६॥ मी जरी सोडिला धर्म। तरी मजवरी लोकआचरण परम। यालागीं करितील अधर्म। अवघेचि लोक ॥२७॥ लोक न बुडावे यथास्थिती महापुरुषही धर्म करिती। तेवीं उमा भगवती। पतिव्रतास्थिती वर्तत ॥२८॥ पुरुषाकारमूर्त्यवछिन्नचैतन्य शिव पिता। वनिताकारमूर्त्यवछिन्नचैतन्य उमा माता। 'जो प्रियूचि प्राणेश्वरी' हे ताता। संमति आहे ॥२९॥ यालागीं उमाचि मदनदहन। कीं शंकरचि उमा आपण। येथ जे पाहती भिन्न। ते पडती जन महानरकीं ॥३०॥ जैसें शिवपुराणीं शिव ब्रह्म। कीं भागवतीं विष्णु ब्रह्म। तैसें देविभागवतीं ब्रह्म। उमाही आहे ॥३१॥ एकाचि नदींतूनि जैसी। अंजुळी घेती आर्ते ऐसी। तेवीं एकाच ईश्वराचि आपैसी। जया जें आवडे तैसी उपास्ति करिती ॥३२॥ शिव विष्णू सूर्य गणेश उमा। हीं नांवें एकाचि ब्रह्मा। परी लोक तरावे म्हणोनि धर्मा। आचरोनि दावी माय ॥३३॥ तिचें चरित्र अति सुंदर। ऐकतांचि मनोहर। सावध होवोनि श्रोते चतुर। करुनी एकांतर ऐकावें ॥३४॥ कल्पाकल्पांची भिन्न रीती। भिन्न नांवें भिन्न जगतीं॥ सारिखी असतां प्रकृति। विकृति भिन्न पावे ॥३५॥ दश इंद्रिय पांच भूत। सर्व कल्पीं समान दिसत। अकरावें बारावें इंद्रिय येथ। कवणे कल्पीं न सांपडे ॥३६॥ परि मातीचें घट जैसे होती। तैसे ताम्राचें ही घट करिती। एवं भेद पावे शरीरादि विकृति। मायावशें ॥३७॥ एकादे कल्पीं शिव पहिले उत्पन्न। होवोनि निर्मी ब्रह्मा आणि नारायण। एखादे कल्पीं विष्णू प्रथम होवोन। विधि आणि उमारमण निर्मी ॥३८॥ एखादे कल्पीं प्रथम उपजे विधाता। मग तो निर्मी उमाकान्त रमाकान्ता। असो ही सृष्टिव्यवस्था। परी शिव विष्णु भक्तां समान उपास्य ॥३९॥ मनूशतरूपेपासून। सृष्टीचें जैसें आविष्करण। तैसें दक्षप्रजापतिपासून। सृष्टिआविष्करण जाहलें ॥४०॥ या दक्षप्रजापतीचे मंदिरीं। प्रसूता पतिव्रतेचे उदरीं॥ जन्मली माता

उमा सुंदरी । हृदयमंदिरीं ध्यात शिवा ॥४१॥ विषकंठ बैसे स्मशानीं । सर्प गळां त्रिशूलपाणी । ऐसे दोष मनीं नाणीं । शिव चरणीं मति वेधली ॥४२॥ शरीरजन्म मायबापाचा । परी मनोभाव शंकराचा । जन्मा पासूनि साचा । उमटला ॥४३॥ एक शिव वेगळा करून । इतर पुरुष पुत्रासमान । ऐसी पहिलेच पासोन । वेगसंपन्न वृत्ति झाली ॥४४॥ मी ब्रह्म सच्चिदानंदघन । हे न विसरतां आठवण । आधिकारिक दक्षाचे उदरीं अवतरण । धर्मस्थापनाकारण जाहलें ॥४५॥ मायबाप आधिकारिक । कन्या तव ब्रह्म सम्यक । शिव गुरु ब्रह्म ब्रह्मदर्शक । ऐसें चतुष्क अति योग्य ॥४६॥ येथ आशंका करिती कोणी । जन्म न ये कर्मावांचूनि । कर्में पापपुण्याची खाणी । सुखदुःख शिराणी बोलिली ॥४७॥ पुण्याचें फळ होय सुख । पापाचें फळ महादुःख । कर्मावांचोनि निष्टंक । शरीर सर्वथा मिळेना ॥४८॥ जन्म होय कर्माधीन । तरी मुक्ताही होईल बंधन । उमा स्वतः ब्रह्म असोन । कर्माविण जन्मग्रहण कैसे ॥४९॥ तरी ये विषयीं समाधान ऐकावें होवोनि सावधान । समुद्रीं तरंग उठतां आपण । पाणीपण न मोडे ॥५०॥ तेवीं न विसरूनी आपुली स्थिती । जीवारोपित ईश्वरत्व संमती । अनध्यस्तविवर्त प्रतीती । झाली पार्वती जगन्माता ॥५१॥ मीठ समुद्रीं जातां । तरी मार्ग कांहींच नुरे तत्वतां । नदी समुद्रीं मिळोनि जातां । ओघ पाहतां मागे उरे ॥५२॥ तया ओघें सकळांची । तृषा हरण होय साची । तैसी मुक्त आणि अवतारांची । स्थिति सुखाची ओळखिजे ॥५३॥ विदेही मुक्त जे होती । तयांचें कांहींच नुरे निश्चितीं । अवतार ब्रह्मचि असती । परी शरीरें दिसती दीनोद्धारा ॥५४॥

"झालेंनि जगें मी झांके । तरी जगत्वें कोण फांके ॥
किळेवरी माणिके । लोपिजे काई" (ज्ञाने. अ. १४ ओ. १२४)

। एवं तात वचन प्रमाण । ब्रह्मवेगळें न होवोन । जगदुद्धारा कारण । उमा आपण अवतरली ॥५५॥ पहिलें अधर्मी असावें । आणि

मग धर्मनिष्ठ होवावें । हें जीवकर्म स्वभावें । अवतार कृत्य नव्हे ॥५६॥ तैसी नोहे भगवती । आधींहूनि निष्ठा धर्मावरुती । अंतरीं आठवी पशु-पति । विधि श्रीपती वंद्य जो ॥५७॥ कीं पाहतां कवणेहि वेळीं । मी नाहीं शिवाहुनि निराळी । या अभिप्रायें दक्षबाळी । चिंती चंद्रमौळी आदि-हुनी ॥५८॥ कीं ब्रह्मरूपें होती शिवी । ते तैसीच असूनि दहरीं देवी । योगेऽपि वियोगोपलालना व्हावी । म्हणोनि देवी शिव चिंती ॥५९॥ कीं माधुर्यभक्तीचें शुद्धपण । स्थापाया अलंकारभजन । करी संवेग वाढवून । कैलासरमण आठवितां ॥६०॥ अथवा भावी आपुल्या मनीं । मी जन्में होईन शरीराभिमानी । या लागीं ब्रह्म न विसरावें म्हणोनी । शूलपाणि आठवित ॥६१॥ धर्में अथवा ज्ञानें पाहतां । जीवा मार्ग दाखवितां । आवडीनें पिनाकहस्ता । श्री अनंता आठवी ॥६२॥ ना तरी स्त्री शूद्रस-मान । श्रुति पुरुषासचि सांगे ज्ञान । यास्तव स्त्रियांवरी कृपानिष्ठ होवोन । भुजगभूषणा आठवित ॥६३॥ अथवा नको ह्या कल्पना । वृत्ति आप-णचि आपणा । ब्रह्म असोनी ब्रह्मपणा । नंदीवाहना मिळों जाती ॥६४॥

# षट्पदध्वनि

**श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता ।**
**पतिः कृष्णो राधिकाद्या भागिन्यो गोपिका मम ॥**
**पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।**
**प्रणम्यसम्यक् वक्ष्यामि टीकां च षट्पदध्वनीम् ॥१॥**

जय जय सद्गुरु ज्ञानेश्वरा । सच्चिदानंदा करुणाकरा ।
भक्तवत्सला निर्विकारा । स्वानंदसमुद्रा विश्वपते ॥१॥
जाहालिया परिपूर्ण ज्ञान । भक्ति वाढवी उत्तम गुण ।
हे प्रथमार्येमाजी आपण । भगवत्पूज्यचरण बोलती ॥२॥

**आर्या**

**अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम् ।**
**भूतदयां विस्तारय तारय संसारसागरतः ॥१॥**

झालियावरी ब्रह्मज्ञान । जीवन्मुक्तिसुखाकारण । व्युत्थानीं पाहिजेत उत्तम गुण । विनयादिक ॥३॥ तत्वज्ञान मनोनाश । वासनाक्षय हे तीनहि विशेष । यांचा करिता दृढाभ्यास । जीवन्मुक्ति हातीं मिळे ॥४॥ परी ज्ञानियांचे टायीं । शब्दास्वादेंकरोनि लवलाही । जे सदेहब्रह्मज्ञानाहंकृति कांहीं । उमटो लागे ॥५॥ तिये नांव रसास्वाद । ती तीव्र जाहालिया विद्यामद । संज्ञा पावे प्रसिद्ध । विद्यारण्योक्त ॥६॥ साधुसंग अति उत्तम । परी ज्ञानगर्वी तेथ न धरती प्रेम । यास्तव करावा प्राणायाम । हें विद्यारण्य बोलिले ॥७॥ परी साधुसंगाविण ।

प्राणायामीं श्रम दारुण । यालागीं विद्यामद ओळखून । बळेंचि तया लोटिजे ॥८॥ प्राणायामें विद्यामद । जरी जाहला निरुद्ध । तथापि क्षय व्हावया विशद । पाहिजे वृत्ति तद्विरोधी ॥९॥ अविद्येच्याचि क्षयें करोन । विद्यामदादि कार्यवृत्ति क्षीण । होती परी यावद्विदेहमोचन । राहती स्थायी प्रारब्धें ॥१०॥ देह असतां जीवन्मुक्ति । व्हावी म्हणोनी विद्यामदादि वृत्ति । क्षीण कराया विरुद्ध वृत्ति । भगवत्साधुस्तुति सदुपायू ॥११॥ **मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंते** । ऐसें नृसिंहतापनीयभाष्यांत आचार्य बोलिलें ते । येथ स्तोत्ररूपें प्रकटते । जीवन्मुक्तिबोधार्थ ॥१२॥ ते विद्यामदविरोधी वृत्ति । उत्पन्न करावया आचार्यभारती । संतसमद्भिभगवत्स्तुति । आरंभीत आदरें ॥१३॥ जाहालिया ब्रह्मप्राप्ति । देयावया आपुली भक्ति । समर्थ एक विश्वपति । हें आचार्योक्ति अनुवादी ॥१४॥ नवल अविनयाची स्थिति । जाहालिया ज्ञानप्राप्ति । पुढती ध्यानाचिया हातीं । सांपडावे लागे ॥१५॥ "नवल अहंकाराची गोठी । विशेषे न लागे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी" (भावार्थदीपिका. अ. १३ ओवी ८२) हें जें हृदयसौभाग्यकरवचन । दुस्तर सांगे ज्ञानाभिमान । तो निवटावया सांगती ध्यान । विद्यारण्य ॥१६॥ परी ध्यानें निवटावा कैसा । हें न घडेचि सहसा । ध्यानाभिमानचि आपैसा । होऊं पावे ॥१७॥ तयाची करावया निवृत्ति । अवश्य पाहिजे भगवद्भक्ति । अथवा भक्तअभिमानचि निवृत्ति । करी तयाची ॥१८॥ ज्ञानगर्वें देहाहंता जोडे । भक्तिरसगद्गदें ज्ञानाभिमान मोडे । या अनुभवा जाणती फुडे । संतमहंत ॥१९॥ अथवा ज्ञानगर्व आहे । तरी आसुरस्वभाव होये । इतक्यावरी ज्ञान उज्ज्वल राहे । तरी विदेहमुक्ति मिळे ॥२०॥ परी तयाचिया करोन । न होय संप्रदायसंरक्षण । तेणें धर्मसंस्थापन । नव्हे कदा ॥२१॥ परी अविनयाचें मुख्य करणें । बळें वाचाक्रमण वाढाविणें । प्रारब्ध भोगिताहि नम्र न होणें । महात्मया पुढें ॥२२॥ ऐसा तो अविनय विखार । दंश करिता प्राणहर । त्यासी

१ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे वाक्य

दवडावया दूर । गरुडेश्वर स्मरावा ॥२३॥ जेणें कालिया मर्दिला । तोचि नाशील अविनय फणीला । ऐसा आशय धरूनि वाहिला । प्रार्थिती आनंदें ॥२४॥ जो व्यापक सकळाभूतीं । अंतर्यामी जयाते म्हणती । तयाचीच आघवी स्फूर्ति । यालागीं अभिमति[1] आघवी मिथ्या ॥२५॥ ब्रह्मज्ञान झालिये वेळे । रसास्वाद आपण उपळे । तेणें अविनय ओंगळे । ज्ञानगर्वे पावतू ॥२६॥ 'एरव्ही थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जगा धाकुटें होइजे । तरी जवळीक माझी'– (भावार्थ दीपिका अ. ९ ओ. ३७८) श्रीगुरुमुखश्रुति । निःशेषोच्छेदीत ज्ञानाभिमती । जंव जंव वाढे अविनति । तंव तंव वाग्गण चुकेना ॥२७॥ महाकारणाभिमान[2] । जैं लिंगीं धांवे[3] अनुगुण । तोच विश्रांणें उमटोन । रसास्वादत्व पावे ॥२८॥ आपणा सांपडलो म्हणता । तरी हारपणीया भ्रमा सत्यता । आपण आपणा हारपतां । हांसणें कीरू ॥२९॥ तेवीं अज्ञानाचिया स्मृतीं । ज्ञानाचें महत्व वाटे चित्तीं । तेणें वाऊगी ज्ञानाभिमती । सदा अविनति वाढवी ॥३०॥ तो अविनय जावया । केलियाही नाना उपाया । एका वृंदावन-वल्लभपाया । वांचुनी ओफळ सकळही ॥३१॥ रोगिया जैं वैद्यत्वाभिमान चढे । तैं जवळिचेंचि औषध विष रोकडे । मग दुसरा वैद्य पाहणे पडे । हितालागीं आपुलिया ॥३२॥ तेंवि अद्वैतज्ञानापाठीं । जैं अभिमान उपजे पोटीं । तैं पृथगिवानंदमूर्ति गोमटी । भजलियाविण ब्रह्मकोटी हाता नये ॥३३॥ साक्षित्वें इदंतावृत्तीपुढें । जैं आत्मज्ञान वेगळे पडे । तैं तदाकारवृत्यभावें अहंता जोडे । वाक्यबळेंचि ॥३४॥ "तैसे बोल वाचाबळें । झकविजती प्रतीतीचे डोळे" । इत्यादि आगममेळे । शिकविती हें ॥३५॥ वाक्यबळें उपजे ज्ञान । अर्थाकारवृत्तित्वें करोन । तेथ व्यष्टिशब्दानुविद्धपण[4] । तैं ओढवे विघ्न ज्ञानाहंता ॥३६॥ यद्यपि निदिध्यासनाचिये अवधि[5] । होय

---

१ अहंकार २ ज्ञानाहंकार ३ लिंगशरीरांत ४ मी ब्रह्म आहे असा आपल्याकरताब्रह्मबोध घेणें ५ परिपाकाने

शब्दानुविद्ध समाधि । तदपि तेथ न भासे उपाधी । त्रिपुटीचा ॥३७॥ रसास्वाद सत्रिपुटिक । ज्ञानगर्व उपजवी अचूक । यालागीं पृथगिवेदंतावृत्यवच्छेदक । जया चित्सुखा ॥३८॥ साक्षी अहंतावृत्यवच्छिन्न । आभास जाहला वाक्योपलब्ध देहाभिन्न । तैं विद्यासंप्राप्तपृथगिवेदंतावच्छिन्न । अंतर्यामी परमात्मा ॥३९॥ तेथ तैलधारासमवृत्ति । ठेविलिया अहंतातरंग विरती ऐसें अभिप्रायें आचार्य म्हणती । " अविनयमपनय विष्णो " ऐसे ॥४०॥ प्रथम उठलिया ज्ञानाहंता । तरी दुःखाची न चुके वार्ता । वासना नेवोनी नानापथा । जन्म मरण भोगवी ॥४१॥ तंव शिष्य म्हणे श्रीगुरुराया । माझी निरसावी शंकामाया । अमुख्य अहंकार ब्रह्मज्ञानिया । प्रारब्धवशें म्हणती वेदान्ती ॥४२॥ आणि ज्ञानाभिमान जरी बाधक । तरी नित्य समाधीचेचि पाहिजे सुख । प्रश्न ऐकोनी हृदयनायक । संतोषला तो ॥४३॥ म्हणे ज्ञानाभिमानाच्या ठायीं । मुख्याचि अहंता ओळखे तूंहि । अमुख्य अहंतेचा नाहीं । लेशही तेथ ॥४४॥ ब्रह्मत्वें विश्वाहंकारग्रहण । या नांव ज्ञानाहंकार पूर्ण । आणि अमुख्याहंकाराचें तंव लक्षण । अदृढपण नामरूपा ॥४५॥ नामरूपाची दृढ प्रतीति । जेणें रागद्वेषोपपत्ति । आणि नामरूपत्वें ब्रह्माभिमति । विश्वाहंकाराची ॥४६॥ विश्व जैं होय फोफांवला । तैं तैजस प्राज्ञ केवि निमाला । यालागीं ज्ञानीमिषें विरूढला । अज्ञानीचि तो ॥४७॥ मग अज्ञानियाहूनि थोर । तयाचे वाढती विकार । या अभिप्रायें आचार्य । म्हणती शार्ङ्गधर "दमय मन :" ऐसे ॥४८॥ विश्वाहंकारपूर्वक । ज्ञान घेतलिया देख । मोक्ष हारपे येथ कें विशेख । परी ध्यानहि निष्कलंक घडेना ॥४९॥ ध्यानाच्या अभ्यासें । ध्याता जैं का न उमसे । परी येथ तंव विपरीत दिसे । ध्याताचि उमसे ध्येय गिळितु ॥५०॥ वासनांचें मुख्य लक्षण । त्वंपदवाच्य आश्रवून । तयांचें होय वर्धन । तत्पदवाच्य आश्रयें गळती ॥५१॥ वाक्याची लक्षणा हारपता । ब्रह्मतादात्म्य होय शक्यार्थी । तेधवा ज्ञानीविश्वाहंता । नये टाळिता कोट्युपायें

॥५२॥ वासना रोधिता सालंबनें । काळें योगिया कष्ट तेणें । त्याचि तत्पदनिष्ठा समर्पणें । क्षय पावती ॥५३॥ ज्ञानें क्षय पावलिया कारण । नव वासना न होती उत्पन्न । उद्भूत वासनायोगें करून । निरुद्ध होती ॥५४॥ भोगें करून सुखदुःख क्षीण । परी प्रारब्धोपष्टब्धलेशाविद्याजन्य रजोगुण । तेणें रागद्वेषावभासन । तें न होय क्षीण । भगवद्भक्तीविणें ॥५५॥ येणें आशयें आचार्य प्रार्थिती । मन माझें दमवी श्रीपति । ज्ञानानंतर मनोनाशाभ्यासस्थिति । करिता कर्तृत्ववृत्ति आंगीं बाणे ॥५६॥ प्राप्तिरक्षाया अभ्यास करिता । तरी आनंद न वाटेचि तत्वता । तोचि प्राप्तिबळें अभ्यास घडतां । तरी आनंद सर्वथा वाढतू ॥५७॥ ज्ञानप्राप्तीनें आनंद होय । तोचि अभ्यासें मृदुता लाहे । यालागीं मनोनाशाभ्यास होय । गौणानंददायक ज्ञानानंतर ॥५८॥

अपूर्ण

# गोपिकापादपीयूषलहरी

श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥
पंचायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।
गोपिकापादपीयूषलहरीं वच्मि सुंदराम् ॥

पद

जय जय व्रजरमणी । स्मरतां ज्यांच्या चरणपंकजा मायानदी त्रिमणी॥१॥
निखिल निगमवचनीं । वेचुनी आपुले अंग केले श्रमयत्तनुरचनीं ॥२॥
जो सुंदर भुवनीं । तो सोडुनि निज पदा खेळतो ज्यांच्या ॥ई भुवनीं ॥३
ज्ञानेश्वर कन्या । यच्चरणांबुज पूजुनि झाली नंदतनयमान्या ॥४॥

ओव्याः—नमो नमो गोपबाळा । जयांचिया प्रेमउमाळा । ब्रह्मसागराहि अळुमाळा । अपूर्ण वाटे मजलागीं ॥१॥ गोपिका बद्ध मुमुक्षु कीं मुक्त । कीं त्या भक्त कीं भगवंत । याचा निर्णय करिता यथार्थ । मौन वेदान्त स्वयें धरी ॥२॥ दही चोरिता चक्रपाणी । त्या यशोदे देती गाऱ्हाणी । म्हणोनी ऐसिया क्षणीं । बद्ध वाटती गोपबाळा ॥३॥ घडी घडी कृष्णप्राप्तीचा उपाय । उद्धवासी पुसिला होय । येणें गोपींचा समुदाय । मुमुक्षुगण वाटतो ॥४॥ 'न खलु गोपिकानंदनो भवानिति' । 'अखिलदेहिनामंतरात्मदृगि' या उक्ति । गोपीबाळा मुक्त भासती । ब्रह्मसंवितिपुरःसर ॥५॥ उल्लंघोनी धर्म सकळ । एक आश्रयिला घननीळ । यास्तव गोपीबाळा प्रेमळ । भक्त वाटती मजलागीं ॥६॥ परी बद्ध मुमुक्षु मुक्त भक्त । गोपिकांचें ठायीं कल्पना व्यर्थ । तेचि उपपादन समस्त । तातदत्तस्फूर्ति करील ॥७॥ क्षण न पाहतां प्राणनाथा । कासाविस होती चित्ता । यालागीं लटिकी तयांची बद्धता । बद्ध म्हणता जिव्हा झडे ॥८॥ आधीं भोगोनी रासप्रतीति । मग कृष्णप्राप्ति उपाय उद्धवा पुसती । यालागीं मुमुक्षु गोपिका नव्हती । कैंचि मुक्त्यनंतर मुमुक्षुता ॥९॥ शुक असोनी महामुनी । गोपिकांस आदरें नमन करूनी । यास्तव त्या न होती विषयी कामिनी । विषयी म्हणे ती वाणी वृथा ॥१०॥ आतां गोपिका जरी मुक्त । तरी मुक्त्यनुभव वळगोनी पुढें चालविलें गीत । यालागीं त्या ज्ञानीभक्त । प्रेमपदार्थ परिपूर्ण ॥११॥ म्हणवोनी गोपिका म्हणाव्या भक्त । परी कृष्णरूप होवोनी आपसांत । रास खेळल्या यथार्थ । श्रीभागवतीं कथा ही ॥१२॥ स्वामीचें समजूनि वाहान । गरुडावरी न बैसे तुकाराम । गोपी स्वयें कृष्ण होवोन । आपआपण क्रीडल्या ॥१३॥ यालागीं त्या न होती भक्त । आतां गोपिकांस म्हणावें भगवंत । किंवा भक्तिसाधनाचें यथार्थ । कांहीं न केलें गोपींनीं ॥१४॥ आधीं कर्म उपासना आणि ज्ञान । हे भक्तीचें साधन पूर्ण । गोपींनीं कर्म सोडिलें पति त्यागोन । कर्मसमुच्चयाविण

न घडे उपासना ॥१५॥ द्विजाति संस्कारावांचोनि कही । धर्मासी तो अधिकार नाहीं । तो तयासी नव्हता पाही । 'नासां द्विजातिसंस्कारो' ही उक्ति सांगे ॥१६॥ श्रवण आधीं केलियाविण । सर्वथा न प्रगटे ज्ञान । गोपिकांसी नव्हते श्रवण । 'न निवासो गुरावपि' ही उक्ति सांगे ॥१७॥ जेवढी प्रीति यज्ञपत्नींची । तैसीच प्रीति गोपपत्नींची । याळागीं हे उक्ति साची । दोन्हीकडे समानचि ॥१८॥ सकळ साधनें विवर्जून । क्रीडल्या ब्रह्मानंदीं पूर्ण । याळागीं ब्रह्मानंदस्वरूप आपण । भक्तवन्निधान आपणचि ॥१९॥ परी गोपिकासी भगवंतहि म्हणता । लाज वाटे माझिये चित्ता । जे भगवानचि तियांचा उपकार तत्वतां । मी फेडो न शके म्हणत स्वयें ॥२०॥ साधनांचा उपकार । भगवंतासी होय फार । गोपी तंव निःसाधन समग्र । जारभावें हरिसी भजती ॥२१॥ म्हणाल कामबळें मिनल्या युवती । परी तरल्या हे सामर्थ्य भगवंतीं । तरी सोडोनिया सकळ श्रुति । मग पाशुपतपंथें । ज्ञान कां न मिळे ॥२२॥ वेदहि निर्मिला भगवंते । पाशुपतहि जाहले तयाचेनि हातें । मग वेदमार्गाविण पाशुपत पंथें । ज्ञान निश्चित कां न मिळे ॥२३॥ वेद सोडोनी जातां तंत्रपंथीं । तरी तयासी पतन मुनी रडती । गोपिका सोडुनी वैदिक पति । श्रीकृष्ण भजती त्या वंदिती मुनी ॥२४॥ याळागीं न जातां योग्य पंथीं । तारणसामर्थ्य नाहीं भगवंतीं । गोपिका स्वबळेंचि न जावोनी स्वपथीं । तरल्या हें अति आश्चर्य ॥२५॥ वेदमार्ग सोडोन । कोणीच न जावे म्हणोन । इतर तंत्रांची निंदा आपण । बादरायण करिती सूत्रीं ॥२६॥ तेचि गोपिकांची स्तुति । स्वयें करिती भागवतीं । शंकराचार्यहि न निंदिती गोपिकामार्गास कोठेंहि ॥२७॥ यास्तव भगवंताहूनि श्रेष्ठ । गोविंद मी मानी वरिष्ठ । साधनांचा उपकार नसतां प्रतिष्ठ । उपकार मानी हरी ज्यांचा ॥२८॥ 'न पारयेऽहं निरवद्यसंयुजां स्वसाधुकृत्यं विबुधायुषापि वः। या मां भजन् दुर्जरगेहशृंखलाः संवृश्च्य तद्वः प्रतियातु साधुना'-भागवत स्कंध १० अ. ३२ श्लो. २२. या श्लोकीं आधीं क्रियापद । संबोधनाविण ठेविलें प्रसिद्ध । तयाचें कारण कीं गोविंद । जाहला मुग्ध संबोधनीं ॥२९॥ यासी मी

संबोधूं कवणे रीती । आणि प्रिया म्हणता लाज वाटे चित्तीं । त्या मज एकट्यास प्रिय म्हणती । मी प्रिया म्हणतां बहुपत्नित्व मजकडे ॥३०॥ त्या सकाळांचा प्रिय मी एक । मज तंव प्रिया असती अनेक । यालागीं विचारितां सम्यक् । श्रेष्ठ त्याचि मजहूनि ॥३१॥ यास्तव न करितां संबोधन । क्रियापदार्थे बोलिले भगवान । कीं तुमचा उपकार फेडावया कारण । सामर्थ्य नाहीं ममांगीं ॥३२॥ ईश्वराहूनि जीव वरिष्ठ । नाहीं हें वेदान्त वदे स्पष्ट । परी तुमची तृप्ति सुप्रतिष्ठ । माझे सामर्थ्य न्यून करी ॥३३॥ यालागीं जीव न व्हा तुम्ही । न व्हा शेखी विश्वस्वामी । कारण ईश्वर जो मी । त्या मज सामर्थ्य नाहीं प्रत्युपकारीं ॥३४॥ ब्रह्म म्हणावे तुम्हासी । तरी ब्रह्मपृथगिव राहोनी झकटता मजसी । शेखीं न विसरतां आत्मयासी । प्रेमभक्तीसी आश्रय तुम्ही ॥३६॥ धर्मसाध्य पतीचें कुळ । प्रीतिसंपन्न मातृकुळ । ते दोन्ही सोडोनी तात्काळ । जाहाल्याती प्रेमळ मजसाठीं ॥३६॥ जरी तुम्ही राहत्या पतिव्रता । तरी मी मिळालो असतो सर्वथा । निष्काम धर्मे मज मिळविता । कष्ट न होते तुम्हाते ॥३७॥ परी तो धर्महि सोडोनी पूर्ण । मज मिळविले बळें करोन । मी न मिळे धर्माविण । ही माझी प्रतिज्ञा बुडाविली तुम्ही ॥३८॥ धार्मिकासी मी मिळतो जैसा । तुम्हासी मी मिळालो तैसा । परी तुमचा प्रेमठसा । त्याहूनि दिसे विशेष ॥३९॥ तुम्ही असोनी कामिनी । सपत्नि हेवा न धरूनी । मज एकट्यासाचि प्रिय मानुनी । रजनींत वनीं हिंडता ॥४०॥ तुम्हास किंचित् अभिमान होता । मिया सोडिले तत्वता । मज देवपणाचा अभिमान तत्वता । परी तुम्ही पूजिता अझुनी ॥४१॥ तुम्हास मी सर्वस्व एक । माझें चित्त स्पर्शी अनेक । यास्तव अद्वैतें तुम्ही सम्यक । द्वैत भासे मजलागीं ॥४२॥ तुम्ही स्वयथार्थरूपें करूनी । मज विनटल्या अवघ्या जणी । मी तंव मायारूपें करूनी । तुम्हासवे लिगटतो ॥४३॥ एवं तुमचिया डोळा देखता । मी मायेने रमवितो तुम्हा तत्वता । परी तुम्ही तो भाव मनीं न धरता ।

मा
आइया मायेसह मानता प्रेममय ॥४४॥ यालागीं तुमचा उपकार कहीं । शपथ मजकडोनी फिटणार नाहीं । ............ । .......... ॥४५॥ जयाचें नांव मोक्ष । जो मुनि जाणती अपरोक्ष । ............ ।............॥४६॥ तरी निश्चय कीं माझियापाशीं । सामर्थ्य नाहीं तुम्हा द्यावयासी । ............ । ............॥४७॥ परी भक्तिबळें भक्त । न वांछिती पुत्रादि समस्त । ............ । ......... ॥४८॥ तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध जे करूं फळ नोहे । ............ । ............॥४९॥ एवं भोग किंवा मोक्ष । तुमचिया उपकारा नव्हे साक्ष । ............ । ............ ॥५०॥ गर्गादिकांच्या वचनें करुन । मायेसी कळले मी भगवान । ............ ।............॥५१॥ यालागीं यशोदेहून । मी तुमचा प्रेम मानी गहन । ............ । ............॥५२॥ म्हणोनी आतां तुमच्या तुम्ही । क्रीडावया परम प्रेमीं । ............ । ............ ॥५३॥ एवं भगवंताच्या वचनें करून । गोपी वरिष्ठ होती भगवंताहून । ...................... । ....... .............॥५४॥ उपबृंहणाविण श्रुति । अर्थांतरपर योजिता येती । तरी कर्णामृतकारांची उक्ति । या उक्तीस उपबृंहण ॥५५॥ या शेखरे श्रुतिगिरां हृदि योगभाजां पादांबुजे च सुलभा व्रजसुंदरीणाम् । सा कापि सर्व जगतामभिरामसीमा कामाय नो भवतु गोपकिशोरमूर्तिः (कृष्णकर्णामृत. द्वितीय शतक श्लो. १७) जे मूर्ति ईशावास्याचा ईश्वर । जे ब्रह्म सांगे तलवकार । जे कठप्रश्नाचें गुह्य समग्र । मुंडकाचे पूर्ण पर जे ॥५६॥ जो मांडुक्योक्त पाद चवथा । जे तैत्तिरीयाची ब्रह्मानंदकथा । ऐतरेय सांगे एकचि आत्मा होता । ती मूर्ति तत्वता सांवळी हे ॥५७॥ जे छांदोग्य सांगे सत्य भूम । जे बृहदारण्यक बोले अक्षर परम । जे शारीरसूत्रसमन्वयधाम । गीतामृताचे निधान जो ॥५८॥ जे भाष्यविवरणादौ निर्गुण प्रगट । जे भक्तहृत्कमलीं सगुण स्पष्ट ।

ते परब्रह्म लोळे निकट । गोपीपादपद्माच्या ॥५९॥ कोणी म्हणेल कीं तान्हेपणीं । यशोदा पायावरी न्हाणी । तो या श्लोकीं चक्रपाणी । वर्णिला परी ऐसे नाहीं ॥६०॥ "व्रजसुंदरीणां" या बहुवचनें करून । गोपी-चरणींच लोळे श्रीकृष्ण । बाल्यदशाव्यावर्तना कारण । "किशोरमूर्ति" पद या श्लोकीं ॥६१॥ इतर अर्थ स्पष्ट अत्यंत । तो संस्कृतवेत्ते जाणती समस्त । मज पाणिनीय नाहीं अवगत । यास्तव अल्प पदार्थ दाखविला ॥६२॥ तात्पर्य गोपी भक्त कीं भगवंत । हा निर्णय करिता शब्द कुंठित । अनिर्वाच्य प्रेम जो यथार्थ । त्याची मूर्ति गोपिका ॥६३॥ अनिर्वचनीय प्रेमा आणि आनंद । यामाजीं अल्पाहि नाहीं भेद । परी व्यावहारिक कांहीं शब्द । अल्प कळावया बोलती ॥६४॥ एक ब्रह्म दोन भाग । गोपी आणि श्रीरंग । सव्य वाम एकचि अंग । तैसे चांग अद्वैत हे ॥६५॥ 'प्रियूचि प्राणेश्वरी' । ही तातोक्ति प्रमाण यावरी । एकमेकाविण निर्धारीं । एकमेक न राहती ॥६६॥ एवं श्रीकृ-ष्णाची गोपीपरता । येथ दाविली यथार्थता । आता गोपींची कृष्णपरता । पुढें यथार्थता बोलिजेल ॥६७॥ एक आंगा पर आंग । हाचि सर्व प्रेम चांग । यांतील गुह्य अंतरंग । अबोल प्रेमें अनुभवावे ॥६८॥ श्रीज्ञानेश्वर माझी जननी । तियेवें पयःपान करूनी । पुष्टि न सावरे म्हणोनी । प्रगटवी वाणी अमृतलहरी ॥६९॥ ग्रंथकर्ता आळंदीपति । माझी निमित्तत्वाची अहंकृति । आघवी उपसंहरोनी कृपामूर्ति । स्वचरणप्रीति मज देवो ॥७०॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरप्रसादोद्भूतायां नाना-
छंदबद्धायां गोपीचरणपियूषलहर्यां ईश्वरापेक्षया
गोपीमहत्वनिर्णयोन्नाम प्रथमो विलासः

अपूर्ण

श्रीज्ञानेश्वरमाऊलीसमर्थ

# वेदान्तनिरूपण

श्रीमज्ज्ञानेश्वरं नत्वा सद्गुरुं करुणार्णवम् ॥
बालानां सुखबोधाय मधुरं किंचिदुच्यते ॥१॥

ओवी—श्रीज्ञानेश्वर सद्गुरु । ईश्वर करुणाकरु । नमोनी ज्ञानरस मधुरु । बालबोधार्थ वदतसो ॥१॥

फक्किका—अथ ब्रह्म माया ईश्वरः जीवः मायाब्रह्मणो योगः जीवेश्वरयोर्भेदः एतेऽनादि षट् पदार्थाः

अखंडैकरसं शुद्धं व्योमातीतं निरंजनम् ॥
कर्तृभोक्तत्रादिहीनं तत् सत्सुखं ब्रह्म उच्यते ॥२॥
ब्रह्मतत्वं समाच्छाद्य जगद्भासयति वृथा ॥
जडा गुणमयी मिथ्या मायाऽस्ति ब्रह्मसतया ॥३॥

सा च गुणसाम्या प्रकृतिरभिधीयते । तत्र यस्मिन्नंशे सत्वगुणः रजस्तमोभ्यां नाभिभूयते तस्मिन्नहंकाराकारेण प्रतिबिंबितं चित् ईश्वर इत्युच्यते । यस्मिन्नंशेऽसौ सत्वगुणः रजस्तमोभ्यामाभिभूयते तस्मिन्नंशेऽहंकाराकारेण प्रातिबिंबितं चित् जीव इत्युच्यते । ईश्वरः सर्वज्ञः जीवोऽल्पज्ञः । ईश्वरो नित्यमुक्तः जीवो ज्ञानांत ( यावज्ज्ञानं ) बद्धः । नाहमीश्वरः सृष्टि कर्तृत्वाद्यसामर्थ्यादित्ययं जीवेश्वरभेदः । सूर्योष्णतायां यथा मृगजलं

नास्ति तदपि प्रतीतिकाले तस्य संबंधो दृश्यते। यथा नोष्णतां विना मृगजलं कुत्रापि प्रतिभाति तद्वन्मायाया भानमपि चैतन्यात् पृथक् न विद्यते। सोऽयं मायाब्रह्मसंबंधः। इत्येते षट् अनादिपदार्थाः। एषामनादित्वं कणतुषन्यायेनावगंतव्यम्। तुषकणयोर्मध्ये कस्य प्रागणुत्वमिति न ज्ञायते तद्वदेषामपि पदार्थानां मध्ये कोऽयमादिः कोऽयमंतयः इति न ज्ञायते। तेनैतत् पदार्थषट्कमनादि। यदेतत् समष्टिव्यष्टितया जीवस्य कारणशरीरम्।

इति प्रथमाऽन्हिकम्

ओवीबद्धानुवाद

ओव्या—ब्रह्म माया जीव ईश्वर। आणि जीवेश्वरभिन्नता प्रकार। अविद्या आणि तिचा संबंध ब्रह्मावर। हे अनादि साचार पदार्थ सहा ॥१॥ आहे भासे आणि आवडे। ते ब्रह्म म्हणावे उघडे। तया ब्रह्मास झांकोनी जग भासवी पुढे। ती माया म्हणिजे ॥२॥ सत्वरजस्तमोगुण। हे तिन्ही जियेंत समान। म्हणोनी सांख्य आपण। प्रकृति म्हणती ॥३॥ जैसी पृथ्वीवरी पहाता। चिक्कण ढिसर भेदें तत्वता। मृत्तिकेची द्विविधता। तैसी तत्वता मायेंत ॥४॥ जेथ सत्वगुणाप्रती। रजस्तम न दाबती। त्यामध्ये प्रतिबिंबित चिती। ईश्वर म्हणीजे ॥५॥ आणि रजस्तम दाबोनी। टाकिती सत्वगुणा लागूनी। चैतन्य प्रतिबिंब उमटे त्या स्थानीं। तो जीव म्हणावा ॥६॥ जीवासी थोडें कळे। ईश्वरासी सर्व कळे। जीवासी जन्ममरण आगळे। ईश्वर जन्ममरणरहित ॥७॥ जीव सदा बांधला। ईश्वर सदा मोकळा। मज सृष्टि निर्मावयाला। सामर्थ्य नाहीं ॥८॥ ऐशा युक्ति अनुभवावरून। जीवेश्वर असती भिन्न। जैसे मृगजल सूर्यावांचून। न सांपडे ॥९॥ तैसी ही माया। न सांपडे ब्रह्मावांचुनिया। म्हणोनी संबंध वाया। आहे म्हणावा लागतो ॥१०॥ एवं हे सहा पदार्थ। अनादिच समस्त। उपजले हे नाहीं कळत। म्हणोनिया ॥११॥ कोंडा धान्यावरी। उत्पन्न झाला कवण्या अवसरी। हें न कळेचि निर्धारीं। तैसे पदार्थ सहा हे ॥१२॥

इतिप्रथमाऽन्हिकम्

यदा माया चेतनसान्निध्याद् गुणवैषम्यमाप्नोति तदा कार्यरूपिणी भवति। तत्र प्रथमं कार्यमाकाशम्। आकाशाद्वायुः। वायोरग्निः। अग्नेरापः। अद्भ्यः पृथिवी। एतानि भूतानि मायायास्त्रैगुण्यात् त्रिगुणात्मकानि। तत्राकाशस्य सत्वांशाच्छ्रोत्रमिंद्रियं भवति। वायोः सत्वांशात्त्वक्। तेजसः सत्वांशाच्चक्षुः। अपां सत्वांशाद्रसनम्। भूमेः सत्वांशात् घ्राणम्। शब्दैकगुणमाकाशम्। शब्दस्पर्शगुणो मरुत्। शब्दस्पर्शरूपगुणैस्त्रिगुणं तेज उच्यते। शब्दस्पर्शरूपरसगुणैरापश्चतुर्गुणाः। शब्दस्पर्शरूपरसगंधैः पंचगुणा मही। अतः श्रोत्रं भवेदत्र चेंद्रियं शब्दग्राहकम्। त्वक् स्पर्शग्राहकं ज्ञेयं चक्षुः स्याद्रूपग्राहकम्। रसग्राहकं रसनं घ्राणं तद्गंधग्राहकम्। अनुग्रहादेवतानां शक्तिस्तेषां तु विद्यते। एतेषामाकाशादीनां समष्टिसत्वांशादंतःकरणमुपजायते। तच्च द्विविधम्। मनोरूपं बुद्धिरूपं चेति भेदात्। तत्र संशयात्मकं मनः निश्चयात्मिका बुद्धिः। पुनराकाशरजोंशात् वाक्। वायुरजोंशात् पाणी। अग्नेरजोंशात् पादौ। अपां रजोंशात् पायु। पृथिव्या रजोंशादुपस्थम्। एतानि पंचकर्मेंद्रियाणि। तेभ्यः समष्टिरजोंशेभ्यः प्राणोऽभवत्। स चैकः। स्थानवृत्तिभेदात् संज्ञापंचकमाप्तवान्। तत्र

हृदि प्राणो गुदेऽपानो समानो नाभिमंडले।
उदानः कंठदेशे तु व्यानः सर्वशरीरगः॥

एतत् ज्ञानेंद्रियपंचकं कर्मेंद्रियपंचकं प्राणपंचकं मनो बुद्धिश्चेतानि सप्तदशतत्वानि मिलित्वा लिंगशरीरं भवति। तदेवाविद्याकामकर्मभिः सहितं पुर्यष्टकमित्युच्यते। यः पूर्वकारणशरीरं प्रत्यहमिति मन्यमानोऽसौ प्राज्ञः। इमं लिंगशरीरं प्रत्यहमिति मन्यते तदा तैजसो भवति। अंतःकरणस्य सात्विकरूपतेजस्त्वादवशिष्टभूतानां ये तमोंशास्तेभ्यः पंचीकरणेन स्थूलभूतानि। तद्यथा

**एकैकं भागमादाय प्रत्येकं विभजेद्विधा**
**एकैकं भागमादाय चतुर्धा विभजेत्पुनः**

एकस्य भूतस्याऽर्धेऽपरेषां भूतानामष्टमांशान् संयोज्य पंचीकरणं भवति । यथा आकाशतमोंशोऽर्धके वायोस्तमोंशोऽष्टमस्तेजसोऽष्टमोऽभसोऽष्टमः पृथिव्या अष्टमः मिलित्वा स्थूलमाकाशं भवति। एवं वाय्वादौ विज्ञेयम्। तत्र कर्मसंस्कारबीजावच्छेदका जीवाः पृथिव्युत्पन्नमन्नं प्रविश्य पुरुषं विवेश शुक्ररूपेण स्त्रीगर्भे पुरुषाकारोपाधिं संगृण्हंति। केचिच्च कर्मसंस्कृता अयोनिसंभवा देवाकारा भवंति। केचिच्च योनिसंभवा देवाकाराः। केचिच्च संशोकजा जंतवः। केचिच्च उद्भिज्जा वृक्षाः। अन्येंऽडजाः पक्षिणः। एते सर्वे कर्मसंस्कारबीजभूता स्थूलशरीरं समापन्नाः पूर्वतैजसाः पंचीकृतशरीरमहामिति मन्यंते तदा विश्वसंज्ञामुपलभंते। कर्मणा च देवतिर्यक्नरादियोनिषु भ्रमंति।

इति द्वितीयान्हिकम्

ओवीबद्धानुवाद

ओव्या—जी त्रिगुणसाम्यावस्था। ती ब्रह्मसन्निधान असतां। साम्यभाव टाकूनि तत्वता। न्यूनाधिकता प्राप्त होय ॥१॥ मग जगद्रूप कार्य। अवघे तिजपासूनी होय। त्यांत पहिले कार्य। आकाश म्हणिजे ॥२॥ आकाशापासोनी झाला पवन। पवनापासोनी तेज उत्पन्न। तेजापासोनी जीवन। जीवनापासोनी कुंभिनी ॥३॥ माया आधीं त्रिगुणात्मक। म्हणोनी हीं पंचभूतेहि त्रिगुणात्मक। आकाश सत्वांशापासूनी देख। श्रोत्र इंद्रिय निपजले ॥४॥ वायूच्या सत्वांशापासून। त्वगिंद्रिय झाले उत्पन्न। तेजाच्या सत्वांशापासून। नेत्र इंद्रिय ॥५॥ आपाच्या सत्वांशापासून जाणा। इंद्रिय उत्पन्न झाले रसना। पृथिवीच्या सत्वांशापासोनि प्राणा। उत्पत्ति झाली ॥६॥ श्रोत्र इंद्रिय राहे कानीं। शब्द ऐके तेथूनी। त्वचा इंद्रिय सर्व शरीर व्यापुनी। स्पर्श घेत ॥७॥ काळिमा बाहुलीवरी। नेत्रेंद्रिय वस्ती

करी । रूपाचे ग्रहण करी । तेजांश म्हणोनी ॥८॥ रसना जिभेच्या अग्रीं राहे । रस ग्रहण करीत आहे । ते आपांश म्हणावे स्वये । याचिलागी ॥९॥ नासाग्रीं राहोनी घ्राण । गंध करी ग्रहण । पृथ्वीचा अंश म्हणोन । म्हणावे तया ॥१०॥ जो जो ज्याचा अंश इंद्रिय । तें तें तयाचा ग्रहण करी विषय । असो या भूताचा सत्वांशसमुदाय । मिळोनी झाले अंतःकरण ॥११॥ तें वृत्तिभेदें करून । द्विविध अंतःकरण । संशयात्मक मन । बुद्धि म्हणावी निश्चयात्मक ॥१२॥

अपूर्ण

श्री ज्ञानेश्वरमाउलीसमर्थ

# गानसोपान

## प्रथम विलास

### आर्या

आलंदीश्वरमेकं सद्‌गुरु मानंददं सदा वन्दे ॥
व्यासजैमिनीन्यायाद् व्यंकटराजं ततः परं वन्दे ॥१॥
परमेश्वरपरिनिष्ठान् भाविभूताग्रतनगुरूंश्च नुमः ॥
नत्वा च सहायानपि वक्ष्ये व्यवहार्यगानसोपानम् ॥२॥

टीका

श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यं नत्वात्मानंदविग्रहम् ॥
ग्रंथेऽस्मिन् बालबोधाय स्वीये वृत्तिर्विधीयते ॥

निर्विघ्नतया ग्रंथसमाप्त्यर्थं स्वेष्टदेवतानमस्काररूपं मंगलमाचरति। आलंदीश्वरमिति अलं पूर्णं दीपयति इति अलंदि। अलं ददातीति वा। प्रथमेऽर्थे पृषोदरादिवत् पलोपः। तस्यापीश्वरं विशेषचैतन्यमित्यर्थः। एकं स्वजातीयविजातीयस्वगतभेदरहितं "एकमेवाद्वितीयमिति" श्रुतेः। सद्‌गुरुं सर्वदा शिष्यहृदये वर्तमानं गुरुमाचार्यम्। आनंददं मंगलप्रदं विघ्ननिवारकं सदा त्रिषु कालेषु तैलधारावदविच्छिन्नया वृत्त्या नमामि

प्रह्वी भवामीत्यर्थ :। ततः तस्मादनंतरम् परमधुना स्थूलब्रह्माण्डे समीपे विद्यमानं व्यंकटराजं भाषायां व्यंकटरावं वन्दे नमस्कारमात्रं करोमि। ननु न च भवंतं गुरुमिति मन्यते ततस्तंप्रति भवन्नमनं तस्यानर्थायैव भवेत्। नैवं साधु कृतं येन स्वार्थापेक्षया परार्थं हन्यते। तथाचागमः "नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्ष एक" इत्यादि। उच्यते। व्यास जैमिनिन्यायादिति। अयं न्यायो मया नूतनोऽवतारितः। यथाच भगवता जैमिनिना स्वीये सूत्रे स्वगुरोर्बादरायणस्य मतं प्रामाण्येनोपन्यस्तं तथा व्यासेनाऽपि ब्रह्मसूत्रे स्वशिष्य मतं प्रामाण्येनोपन्यस्तं "साक्षादप्यविरोधं जैमिनिरि" त्यादौ। नमस्कृतश्च भगवत्पूज्यपादचरणैः स्वशिष्यः पद्मपादः नृसिंहावेशनिवेशसमये। तस्मान्मधुविद्योक्तपरमेश्वरस्य जडचेतनद्वारेण सर्वोपकारकत्वात् सर्वमेव गुरुरूपं जगदिति मत्वा कृतघ्नतानिवृत्तये नमनमुचितमेव। अन्यथा परमात्मानं विना गुरुत्वाभिमानेन नरकपातात्। ननु व्यंकट राजादिभ्योऽल्पाविद्यैव संपादिता भवता न तु पूर्णा। ततो नात्रापि तेषां नमनं योग्यमिति चेदसत्। "एकमप्यक्षरं यस्त्वि" ति न्यायेनाल्पप्रदातर्यपि परमात्मानि नमस्कारयोग्यत्वात् ॥२॥ एवं परमार्थाचार्यं शास्त्रविनियोगगुरुं च नत्वा यावज्जीवित परमात्मोपधान् शिक्षकान् गुरून्नमस्करोति परमेश्वरपरिनिष्ठानिति। भूतान् लक्ष्मणभट्टादीन् भाविना भविष्यद्व्यवहारोपदेशकान् बहुप्रासंगिकान् अद्यतनान् सद्यःपाठकान् वाचकांश्च श्रीनिवासदत्तात्रयनारायणादीन् गुरून् अल्पविद्यया बहुविद्यया उपकारकान्। परमेश्वरे परिनिष्ठा येषां ते परमेश्वरपरिनिष्ठाः। मां नयनहीन इति ज्ञात्वा कृपया परमेश्वर एव तान्निमित्तीकृत्य सामग्र्या मामुपदिशतीत्यर्थोऽनेन सूचितः। अन्यथा बहुषु नयनहीनेषु ब्रह्मणवाचकादिसामग्रिः कथं न दृश्यते। एतावत्स्वरूपान् गुरून्नुमः। अग्रिमसांप्रदायिकाशीष्यैःसह नमामि। तेन बहुवचने नमस्कुर्मः इत्यर्थः। तद्वत्सहायानपि स्वगुणेन सहायान् लेखकादीन् हरिभाऊनानाप्रभृतींश्च नत्वा प्रणम्य व्यवाहार्य व्यवहारार्हे अस्मिन्कलौ पंचसहस्त्रमितेऽब्दे विद्यमानं यद्गानं तत्सो-

* भविष्यद्व्यवहारोप देशकान्

पानं वक्ष्ये वच्मि । कस्मै प्रयोजनाय तूर्णसमारोहायेतिभावः । नच शिष्टकृतनम-स्कारोऽनर्थायैव भवेदिति कल्पनीयम् । समयनिर्बंधेन सर्वत्र मानार्हत्वात् ॥२॥

ओव्याः— ॐ नमः सद्‍गुरु । भक्तवत्सलकरुणाकरु । सच्चिदानंद निर्विकारु । आळंदीवरू परमात्मा ॥१॥ तुझिये कृपेचिये विश्वासे । साधका इच्छित विखो उल्हासे । म्हणवुनी तुज विश्वेशे । आधीं नमन ॥२॥ आणि-कही जे जे कोणी । तुज समावेशे पोषिती म्हणोनी । तया नमन तुझेनी । समावेशे ॥३॥ कां मेघाचिया भरवसां । नदी पूर फावे आपैसा । तो समावे विशेषा । मेघुचि होय ॥४॥ यद्यपि परमार्थकोटीं । गुरुसमावेश नोहे ईश्वर-पोटीं । साक्षात् वृत्ति परिपाटी । म्हणोनिया ॥५॥ तथापि तैसी व्यवहृति । न होयेचि कल्पान्ति । भावना आणि संवित्ति । घेणें पडे म्हणोनी ॥६॥ भावनेचा उगमू । संवित्तिते संगमू । तै समावेश सांगे निगमू । प्रतिकेश्वरीं ॥७॥ एवं जे जे निमित्त जया । उपयोगी होईल अपैसया । ते ते तुझिया पाया । अनुनय कीजे ॥८॥ म्हणोनि मंगलाचरणे । संगीत ग्रंथीं येणें । माते रिझोनिया रिझविणें । माझिया मना ॥९॥ एऱ्हवी तरी आई । मधुविद्येच्या ठायीं । उपकार्योपकारकता नाही । तुजवीण आना ॥१०॥ ते भोज्य भोक्ता आणि भोजन । सर्व मधु हे तंत्र प्रमाण । तरी काय व्यवहारी अन्न । कीजे वर्ज्य ॥११॥ तेवीं सकल व्यवहारू । मधुविद्यान्याय समावेश थारू । तुझिये पायीं हा निर्धारु । जाहला माझा ॥१२॥ व्याससूत्रीं जैमिनिसूत्र प्रमाण । प्रसंगीं शंकराचार्य पद्मपादचरण । वंदिती हेंहि उपपन्न । दिग्विजयीं आहे ॥१३॥ एरवी तरी शिष्य गुरु । परमार्थावधि नुसुधा व्यवहारू । तेथ भावनें करितां नमस्कारू । कवण बाधू ॥१४॥ म्हणोनि शिष्य जे परमार्थी । स्वये आपणा जे म्हणविती । तेही माझ्या वृत्ती । तूंचि हो कां ॥१५॥ शिष्य शिष्यांचिये ठायीं । गुरुत्वें तयांचा प्रत्ययो नाही । तरी ते परमार्थ सोयी । येर दंभू ॥१६॥ आतां गुरुनें करितां नमन । शिष्यातें चढे अभिमान । तरी येथें परब्रह्म उणेपण । काय ये पां ॥१७॥ उपकारकातें न नमितां ।

तरी उणे येवो पाहे धर्मा श्रोता। आणि ग्रंथकर्तेया नास्तिकता। भ्रांति घडे ॥१८॥ म्हणवोनी भूत भावी वर्तमान। जे का निमित्त व्यवहाराकारण। तया सकळांतें नमन। साष्टांग माझे ॥१९॥ एरवी मी हे जाणे। माझे आंधळीये लोचनें। परी मजाचे उल्हासा आणणें। काज हें तुझे ॥२०॥ तुवांचि केले म्हणोनि। मी खंती न मानी मनीं। परी तियाते नमनीं। कां न तोषवूं ॥२१॥ आंधळे हातेरु माजले। ऐसे करणें कें होय भले। आतां तुझें हे करणें वाहिले। साच मी नेणें ॥२२॥ काय माते दूर करावे। म्हणोनि विप्र दिधले सेवे। किंवा धर्म स्थापोनि मज तारावे। ऐसें तव मनीं ॥२३॥ निर्णय नोहे दोहींचा। म्हणोनि मौनेचि साचा। भोग भोगुनि प्रारब्धाचा। आठवितो तुज ॥२४॥ हृदय आपुले उघडोनी। निवेदिले तुझिये चरणीं। आतां विनवित स्वत्सदाविस्मरणीं। न टाकी माते ॥२५॥ दुर्बळे मागतां भिक्षा। तरी तेथ नोहे परान्न शिक्षा। तैसी मजही अपेक्षा। जाहली आहे ॥२६॥ चक्षुरादि इंद्रिये दुर्बळे। तेणें पारतंत्र्यें अवघे अडकले। वरी स्वानुकूल न होता बोले। दुरुत्तरहि ॥२७॥ दुर्बळस्वाभावोचि ऐसा। तोंडाविण नेणे आपैसा। परी प्रसंगीं उत्तीर्णोशा। नमनाचि करी ॥२८॥ येणेहि अनुमोदे। मज नमन करणें विशदे। म्हणोनिया वंदे। व्यंकटराज आदि ते ॥२९॥ तैसे लक्ष्मणभट्टादि भूत गुरु। आणि नामदेवादि अग्र-गुरु। व्यवहारकार्ये पडलोचे म्हणुनि भावी गुरू। तेहि वंदूं ॥३०॥ परंतु अंतर्यामी जननी। ग्रंथनिर्माण मत्करौनी। करविशि हे निर्वाणीं। प्रार्थना तूतें ॥३१॥ यद्यपि तुझिया प्रेमाच्या ठायीं। संगीताची अपेक्षा नाहीं। तरी तुझ्यास्तव संगीतश्रम करणें लवलाहि। येणें काय प्रेम तुटे ॥३२॥ आपुलियां भोगास्तव श्रम। तो मी म्हणे विषयकाम। एरवी भगवद्भक्तिस्तव करितां श्रम। तरी तो प्रेम कवण न म्हणे ॥३३॥ घरीं तिखट मीठ योग्य जेवावे। आणि देवा समीप येऊनी पुष्प न वाहतां रडावे। तरी हे दुर्दैव आघवे। प्रेमाचेची ॥३४॥ प्रेमीं हारपती वृत्ति। खुंटो पाहे प्राणाची गति।

तैं अपेक्षा नाही देवाप्रती । कासयाचिही ॥३५॥ परी जंव शरीराचें पोसणें । तंव देवासी उपचारें कां न पुसणें । म्हणोनिया अर्चन कीर्तनें । अर्जिजे तुज ॥३६॥ आतां अर्चनाच्या ठायीं । मज नयनहीना सामर्थ्य नाहीं । वाग्यज्ञ करूं तंव तोही । शूद्रत्वास्तव घडेना ॥३७॥ म्हणवुनी नाट्यशास्त्रीं भरतमुनि । शूद्रा संगीताधिकार बोलिले वाणी । तरी तेणें तुझिये चरणीं । विनटाया यत्न करूं ॥३८॥

गीतं वाद्यं च नृत्यं च त्रयं संगीतमेव वा ।
मार्गीदेशी विभेदेन गीतं द्वेधा व्यवस्थितम् ॥३॥

टीका-- गीतं पुरुषमुखनिसृष्टनादजनितम् । वाद्यं जडपदार्थनिष्ठ नादजनितम् । नृत्यं पुरुषस्त्रीपदन्यासजनितं मात्रावधारणम् । एतत् त्रयं मिलित्वा संगीतमुच्यते सद्भिः । एकैकं तु अवगीतमित्यर्थः । वेति विकल्पस्तु क्वचित्क्वचित् केवलं वाद्यमपि दुष्कालतंदुलतुषन्यायेन जनान् रंजयतीति तदापि संगीतमित्यर्थः । दुष्कालतंदुलन्यायो मया रचितः । स यथा दुष्काले क्षुधातुराणां तंदुलानुपलंभे तत्तुषभक्षणमपि पियूषमिव भाति । तुष शब्देनात्रांतस्त्वगुच्यते । तत्राद्यं गीतं विभजते । मार्गी देशीति । श्रुति मार्गानिश्रम् । मार्गः श्रुतिः सामवेदः आश्रयो यस्य तत् । देशी लोकरुचितो भिन्नभात्रजातम् । द्वेधा द्विप्रकारम् ॥३॥

सामवेदात्समुत्कृष्य लोकमंगलकारणम् ॥
रुद्राजकादिभिर्गीतं तन्मार्गाख्यमिहोच्यते ॥४॥

टीकाः— सामवेदात्समुत्कृष्य गांधर्ववेदमुत्पाद्य रुद्रः शंकरः अजः विष्णुः कः ब्रह्मा आदि शब्देन नारदभरतादयो ज्ञेयाः । तैर्यद्गीतं तन्मार्गीत्युच्यते ॥५॥

तच्छूद्रार्थं नाट्यवेदे वैधमेव तथापि तत् ।
काललोकरुचेर्भेदात्प्रच्छन्नं योगवत्पुनः ॥५॥

टीकाः— यदपि नाट्यवेदः स्त्रीशूद्राणां देय इति भरतवचनात् मार्गीसंगीतमपि शूद्रार्थमेव तथापि वैधं विधिना प्राप्तमेव तत् । न तु रागप्राप्तम् मंगऋमंगऋादिदर्शनात् । तत्सर्वं भारतीये नाट्यशास्त्रेऽन्वेषणीयम् । तत् " स कालेनेह महता योगो नष्टः परंतपे "त्यादिवत् कलिप्रभावेन लोकरुचे-भेदेन रागवृद्धिमात्रेण प्रच्छन्नं गौप्यतां यातं न तु सर्वथा नष्टम् । भारतीय नाट्यशास्त्रं संगीतरत्नाकरादौ शिष्यमाणत्वादित्यर्थः ॥५॥

ओव्याः— मार्ग गीत जरी । शूद्रासाठीं नाट्यशास्त्रीं । भरत बोलिले ते तरी । विधिमात्राचि ॥३९॥ रागमात्र कांहीं । तेथें कवणा आधिकार नाहीं । म्हणोनि लोकरुचिभेदें लवलाही । लुप्तप्राय ते झाले ॥४०॥ संगीतरत्ना-करादि ग्रंथीं । जरी तयाची अनुवृत्ति । तथापि देशी संगीत निश्चिती । तेथहि अधिक ॥४१॥

**दीपरागाद्दीपसिद्धिर्मेघात्पानीयवर्षणम् ।**
**इत्यादि मार्गिसंगीतप्रभावोत्थं न चान्यजम् ॥६॥**

ओव्याः— दीपरागें लागे दिवा । मेघरागें पर्जन्य यावा । हा सर्व खेळ बरवा । मार्गसंगीताचा ॥४२॥ मार्गसंगीतें पुरुषासी । अदृष्ट उत्पन्न होय विशेषी । तेणेंचि मेघरागासरसी । जलवृष्टि होय ॥४३

**मंत्रवन्मार्गसंगीतमलौकिकफलप्रदम् ।**
**किंत्वसत्ववृतां लोके विधिबद्धे रुचिर्न हि ॥७॥**

टीका — मार्गी संगीतं मंत्रवेद्वदवदलौकिकफलप्रदं वैधत्वात् । तथा न देशी रागमात्रजनितत्वात् ॥७॥

ओव्या— एवं मार्ग संगीत । वेदाप्रमाणें अतिनियत । परी लोकांची रुचि अघटित । विधि तयासी आवडेना ॥४४॥

**ततो देशी द्वितीयं हि गीतमुत्पन्नमेव च ॥**
**तदपीशप्रेमयुक्तं सामतुल्यं न संशयः ॥८॥**

टीका— तर्हि देशी किमर्थमुत्पन्नम् । लोकरुच्यर्थमिति वदामः । यथा वीणाङ्गनादौ लोकमनरंजनं स्फुटं दृश्यते तथा नोदात्तानुदात्तस्वरितादिभिस्तृतीयादिस्वनगीते वेदे। वैधं मार्गसंगीतमपि किंचिद्रागप्रतिबंधात् लोकेन परित्यक्तम् । ततो देशीगीतमुत्पन्नमित्यर्थः । तर्हि देशी गीतं नित्यमनर्थायैव स्यात् । लौकिकत्वादितिचेन्न । नहि लौकिकं कर्म सर्वमनर्थायैव भवति भोजनादावतिप्रसक्तेः । लौकिकमपि कर्म भगवति समर्पितं भक्तिरूपमेव भवति । "यत्करोषि यदश्नासि यज्जुहोसि ददासि यत् । यत्तपस्यासि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्" इत्यादि भगवदुक्तेः । अत्र च अशनादिकं लौकिकं स्पष्टम् तद्वद्देशीसंगीतमपि भगवदर्थं चेत्सामतुल्यमेव भवेत् । तुळसीदास सुरदासादिषु तथैव दृष्टत्वात् । " स्तवैरुच्चावचैः स्तोत्रैः संस्कृतैः प्राकृतैरपि " इत्यादि एकादशस्कंधोक्तेश्च ॥८॥

ओव्या— म्हणवोनि लोकरुचीभेदे । देशी गीत उपजले अनुवादे । परी तेथहि गाइल्या ईश्वरछंदे । सामतुल्य तेहि होय ॥४५॥ यद्यपि देशी संगीत ईश्वरेंचि निर्मिले । तथापि जिवेच्छेनें रंजनक्रम केले । महात्मेच्छा ते कळिमार्गे जाहले । हे पुढेंचि भलें निरोपूं ॥४६॥ जैसें शालिग्रामाचे ठायीं । शिळीहि ठाकूरहि मुक्तिदायी । जाहले ऐसी कथा ही । भक्तचरित्रीं ॥४७॥ तैसें देशी संगीते । गातां कृपा कीजे भगवंते । एथ प्रमाणहि पुरते । बोलूं प्रसंगें ॥४८॥ बृहद्देशीग्रंथीं मातंग मुनि । देशीलक्षण बोलिले वाणीं । तेंचि येथें प्रमाणीं । घेवों आधीं ॥४९॥

**अबलाबालगोपालैः क्षितिपालैर्निजेच्छया**
**गीयते याऽनुरागेण स्वदेशे देशिरुच्यते ॥९॥**

टीकाः– मातंगमुनिसंमतिमुद्धृत्य देशी लक्षयति । बृहद्देश्यामित्यादिना । पुरुषभिन्नो धर्मः नास्ति यासां ताः अबलाः नार्य इत्यर्थः । बाला वयसा कंठमधुरा न तु मूर्खाः । गोपालाः इत्युपलक्षणं तेषां विद्यभावात् । रागमात्रमेव गीतं तद्देशीत्युच्यते ।

ओव्या

स्त्रिया बाळ गवळी राजे । हे अनुरागें जे गाती सहजे । तया नाव बोलिजे । देशी गीत ऐसे ॥५०॥ अनुरागें येणें पदें । बोलिलें ऐसें बोधे । कीं बाळास मारितां जे रडे विरडे । तें संगीत नोहे ॥५१॥ आनंदांत येवोनी । बाळे आरोळ्या मारिती अनुदिनीं । त्यावरी अतिव्याप्ति न व्हावी म्हणुनी । 'गीयते' हें पद घातलें ॥५२॥ अनुराग आणि काहींसे बद्ध । हे देशी संगीत बोलिजे निबद्ध । बाळ स्त्रियांचें प्रमाण विशद । याया हें कारण ॥५३॥ कीं स्त्रिया बाळ आणि साधु । यांना कौटिल्यावांचूनि घडे अलौकिक संबंधु । म्हणवोनी याचा गीतानंदु । स्वाभाविकाचि ॥५४॥ आणि जे जे स्वाभाविक आहे । तेथ जीवकृति असलियाहि पाहे । तथापि ईश्वरस्फूर्तीचा राहे । वरचढपणा ॥५५॥ स्त्रिया बाल साधुजन । हे सहज बोलतां सत्य होय भाषण । ऐसें बृहत्संहितेंत वराहमिहिर आपण । शकुनाध्यायीं बोलिलें ॥५६॥ क्षितिपाळ शब्दाचें रहस्य ऐसें । कीं रायासी गोड वाटावयास आपैसे । कांहीं कौशल्य करावे लागतसे । गायकासी ॥५७॥ म्हणोनी कौशल्य जितुकें अधिक । तितुकें गीत होय रंजक । येणें निबंधन देख । येईल देशीसी ॥५८॥ 'निजेच्छया' आणि 'अनुरागेण' । हीं श्लोकामध्यें पदें दोन । त्याचें स्वारस्य कीं निजेच्छया होय आरोळीकरण । परी तें गीत नोहे ॥५९॥ श्वान सूकरांच्या उक्ती । आपल्या इच्छेनें काढितां येती । आणि गर्दभस्वरहि निश्चिती । निघो शकती स्वमुखें ॥६०॥ म्हणोनि तें काय संगीत । यालागी 'अनुरागेण' हें पद सार्थ । इच्छा असोनि गाणें सार्थ । या नांव संगीत की ॥६१॥ आतां आपुल्या इच्छेनें ओरडतां । दुसरियासि न रुचे तत्वतां । यालागीं अनुराग पदार्था सार्थकता आली ॥६२॥ 'अनुरागेण' हेचि पद असते । आणि 'निजेच्छया' हें पद नसतें । तरी रडणेंहि संगीत होते । अनुराग असते म्हणुनी ॥६३॥ वस्तूच्या अनुरागावांचुनी कांहीं । रडणें सवर्था घडत नाहीं । परी इच्छेनें

रडावे ऐसे कांहीं । कोणा न वाटे ॥६४॥ म्हणोनी इच्छा आणि अनुरागें । गाणें तया संगीत प्रसंगे । बोलिले आहे मातंगें । संगीताचार्यें ॥६५॥ देशीच्या ठायीं । रंजकत्वाचे गीतत्व पाही । म्हणोनी रूढि शास्त्रविरोधी असताहि । रूढि अंगीकरावी हें कल्लिनाथ म्हणे ॥६६॥ शास्त्रांत जें केलें देशीलक्षण । त्यासी विरुद्ध राग होतां जाण । तरी रूढीचाचि बहुप्रमाण । अंगीकार कीजे ॥६७॥ रूढींत विवाद असतां । तरी शास्त्रीय देशी लक्षण घेयावे हातां । रत्नकराची प्रमाणता । घेती येथ ॥६८॥

तथाह पुंडरीकविठ्ठलः सद्रागचंद्रोदये प्रथमप्रसादे

" लक्ष्यप्रधानं खलु शास्त्रमेतन्निःशंकदेवोऽपि तदेव वष्टि ।

यल्लक्ष्मलक्ष्यप्रतिबंधकं स्यात्तदन्यथा नेयमिति ब्रुवाणः ॥१०॥

श्लोकः– लक्ष्यप्रधान अवघेचि सुगीत देशी ।

शास्त्रीं मिळे न तैं लक्ष्यसमाश्रयेसी

चाला असेचि म्हटले गुरु शार्ङ्गदेवे ।

यालागिं दोषी म्हणतां न मनीं श्रमावे ॥

ओव्या– ' यद्वा लक्ष्यप्रधानानि ' । हा श्लोक घेतला ग्रंथकारांनीं । तो साचचि परी पूर्वापर पाहोनी । देशी संगीत बांधावे हे निघे ॥६९॥ ते पूर्वी श्लोक घेऊन । संदर्भ सांगू कल्लिनाथटीकेवरून । तेही ऐकोत सावधान । श्रोते सज्जन संगीतवेत्ते ॥७०॥ हे वाद्याध्यायीं बंगालरागकरण । घेऊनी चालले निरूपण । येथें प्रसंगे करून । सार्वत्रिक लक्ष्यलक्षणविरोधपरिहार दाविला ॥७१॥ त्यांतील सार्वत्रिक सामान्य सकळ । तुम्हांसी सांगू वचनें निर्मळ । बंगालरागापुरते विशेष जाळ । गौण करोनि ॥७२॥

" किन्नरीवादकाः प्रायः स्थायिनं पंचमं स्वरम् ।

रागे कुर्वन्ति बंगाले तदज्ञानविजृंभितम् ॥३३१॥

किन्नरीवादका इत्यादि तेषां लक्षणपरिज्ञानाभावात्तत्कृतं लक्ष्यं न प्रामाणिकमित्यर्थः ” ॥३३१॥

गीति

किन्नरिवादक अवघे स्थायी पंचमाचि गाति बंगालीं ।
शास्त्र न जाणति म्हणुनी त्या मूर्खांची दिसोचि कंगाली ॥१॥
लक्षण म्हणजे शास्त्रा लक्ष्यरुढि तद्विरुद्ध मान नव्हे ।
कल्लिनाथ हे म्हणतो टीकेमध्येहि याच पद्यसवे ॥२॥
या वरूनीच उमटतो कीं देशी गीतहीं शास्त्रबद्ध ।
असता अधिक चांगलें मानित आले परंपरा वृद्ध ॥३॥
“ ग्रहो हि मध्यमो रागस्यास्य शास्त्रे प्रकीर्तितः ” ॥३३२॥

गीति

बंगालरागशास्त्रीं मध्यमवादीस्वरूप वर्णियला ।
अदृष्टजनक म्हणुनी सुरागिणीनीं अखंड पर्णियला ॥४॥
परंतु विकल्प सांगे शार्ङ्गदेव लक्ष्यलक्षणविभेदीं ।
तो श्लोक ऐकुनीया श्रोते साधोत गीत अविरोधी ॥५॥

“ यद्वा लक्ष्यप्रधानानि शास्त्राण्येतानि मन्वते ॥
तस्माल्लक्ष्यविरुद्धं यत्तच्छास्त्रं नेयमन्यथा ” ॥३३३॥

टीका—“ यद्वा लक्ष्येति । एतानि शास्त्राणि देशीविषयाणीत्यर्थः । लक्ष्यप्रधानानि लक्ष्यमेव प्रधानं येषां तानि । मन्वत आचार्या इति शेषः । तस्मात्कारणाल्लक्ष्यविरुद्धं यत्तु शास्त्रं बंगालरागादेर्मध्यमग्रहत्वाद्यभिधायकं तच्छास्त्रम् । अन्यथा नेयमिति । यथा लक्ष्यविरोधि न भवति तथा व्याख्येयमित्यर्थः” ॥३३३॥

गीति

अथवा रूढ्यनुरोधे देशी शास्त्रें समस्त लावावीं ।
कल्लिनाथ येथ म्हणे उपलक्षण आदि क्लृप्ति गोवावी ॥६॥

पूर्वाचार्यसंमती ऐसी यास्तव करा नेव विचारा ।
रक्त्यनुरोधें बांधा देशीगीता नवें विचारा ॥७॥
अग्रीमश्लोकपदें घेउनि सामान्य पद्य जुळवूनि ।
शब्द तेचि परि टीका घेतो पूर्व अंश मिळवूनी ॥८॥

[ टीप–पुढील श्लोकांतील अवश्य नसलेली पदें सोडून सामान्य सर्वत्र लागतील व श्लोकाला जुळतील अशी घेतलेली आहेत. उलट पालट केली तरी शब्द तेच ठेविले आहेत. या शब्दावरील टीकेचे अंश मात्र जसेच्या तसेंच घेतले आहेत. त्यांत बदल केला नाहीं. ]

मध्यमादिपदं ज्ञेयं पंचमाद्युपलक्षणम् ॥३३४॥
मध्यमादिग्रहे यद्वा नियमाद्दृष्टकल्पना ॥

टीका

"तस्मादस्य बंगालस्य देशीरागत्वादत्र लक्षणे ग्रहत्वेन मध्यमस्य वचनं लक्ष्यप्रसिद्धपंचमोपलक्षणमिति लक्ष्यस्य प्राधान्यत्तद्विरोधिलक्षणं तदनुसारेण नेतव्यमिति मंतव्यम्। पक्षांतरेण विरोधं परिहर्तुमाह–यद्वेति। मध्यमादिग्रहे बंगालादीनां लक्ष्यप्रसिद्धपंचमादिग्रहत्वपरिहारेण शास्त्रोक्त–मध्यमादिग्रहत्वोक्तत्वे नियमाद्दृष्टकल्पना कार्या। रक्तिलाभ एव दृष्टफलम्। तत्तु यथातथा वा भवत्येव। स्थानस्यैकत्वादित्यानियमे प्रसक्ते शास्त्रेण नियमो विधीयते। तेन नियमेनादृष्टं फलं कल्प्यते। तस्मान्नियमानुष्ठानेऽभ्यधिकम-दृष्टं फलं भवति। यथा प्राङ्मुखत्वेन भोजने। तथा बंगालस्यास्य मध्यम-ग्रहेऽभ्यधिकमदृष्टं फलमिति भावः"।

गीति

शास्त्रीं मध्यमवादी बंगालीं पंचमास उपलक्षी ।
ऐसा अर्थ करावा कल्लिनाथ म्हणति रूढिच्या पक्षीं ॥९॥

(टीप–१. नव–नाहीं, २. विचारा–उल्लंघन, ३. नव–नवीन, ४. विचारा–विचारानें.)

समाधान दुसरें कीं देशी बंगाल राग तरि शास्त्रीं ।
मध्यमवादी सांगुनि बैसविला नियम पुण्यप्रदपात्रीं ॥१०॥
रक्ति दृष्टफल साधो कथमपि परि नियम पुण्यफल साधो ।
कीं विषयानंदांतहि लोका परमात्मसौख्यफल साधो ॥११॥
बंगाल देशि असुनी शास्त्रीं पुण्यार्थ तोहि नियमीला ।
म्हणुनि देशि गीतमयू सुजनबद्ध कलित मार्ग कामियला ॥१२॥
सूतसंहितेमाजीं मनुष्य कल्पितहि धर्म मुनि वदला ।
श्रुतिहुनि गौण तदपि जन अभावि फल होति करुनि त्या बदला ॥१३॥
मार्गहि रंजक आहे परि तेथें पुण्य हें विशेष घडे ।
म्हणुनी किंचित रक्ति न कळे तरि संवय बांधणेचि पडे ॥१४॥
मधुर कर्कशहि नादु वाटाया संवय साधणेंचि खरें ।
परि त्यांत पुण्य नाहीं ना नूतन वाटते मनास बरें ॥१५॥
देशी गीतामाजीं आवडिला पाहणेंचि मुख्य असे ।
परि ते कीर्तनि अर्पुनि कलिमाजीं साधु मार्ग होत असे ॥१६॥
मनुष्य कल्पित धर्मासम केवल हा नव्हेचि कलिमार्ग ।
विषय नियमिला म्हणुनीं विधिनें साधूक्ति देईल स्वर्ग ॥१७॥
उभय पक्ष प्राप्ततें पुण्यास्तव एक पक्ष हो घेणें ।
नियम यथाते म्हणती देशी गीतांत हाचि विधि जाणें ॥१८॥
अलकावतिवल्लभगुरुनाम जपुनि देशिनियम मी करते ।
तत्सामर्थ्यें हरिगुण गाउनि हृदयें व्रजेश्वरा वरिते ॥१९॥
स्मृतिशास्त्रादौ दिधली अनुक्त वदण्या बुधा अनुज्ञा हो ।
यास्तव माझें करणें हास्यास्पद हें सुखें असुज्ञा हो ॥२०॥

" सर्वत्र परिहारोऽयं लक्ष्ये लक्ष्माविरोधिनी ।
देशीरागेषु निर्णीतः शार्ङ्गदेवेन सूरिणा " ॥३४१॥

टीका

" रागांगभाषांगक्रियांगोपांगरागा देशीरागा इति प्रागुक्ताः तेष्वयं विरोधपरिहारो निर्णीत इति । अनेन शुद्ध साधारितादिषु ग्रामरागादिषु मार्गरागेषु लक्षणस्यैव प्राधान्यात्तदनुसरेण लक्ष्यस्योन्नियत्वाद्विरोध एव न प्रासः । तत्र कुतस्तत्परिहार इत्यभिप्रायो वेदितव्यः" ।

आर्या

हा विरोध परिहारू उमजा सर्वत्र देशि विषयांत ।
मार्गी लक्षण मुख्यत्वि न लगे म्हणुनी म्हणे कल्लिनाथ ॥२१॥
येथें बहुप्रकारें आणिक कांहीं रहस्य बोलियले ।
तें स्वप्रकरणीं सांगूं ऐकुनि अनुमोदनीं सु डोलियले ॥२२॥

श्लोक

इथें तत्व कीं मार्ग वा लक्ष्य देशी । घडे तेवढे आणिजे लक्ष्यवेशीं ॥
नव्हे तें तरी लक्ष्य हे साधुवाणी । कलौ मार्ग कीजे हरीशप्रगानीं ॥१॥
स्वयें आवडे फार तें देवराया । समर्पे तरी तोहि हो दे वरा या ।
हृदीं राहुनी मी हरीतो श्रमातें । त्वरें अर्पितो मुक्तिच्या आश्रमातें ॥२॥

ग्रंथगं लक्ष्यगं भावि भेदात् त्रिविधमुच्यते ।
संगीतं ग्रंथगं मार्ग देशी लक्ष्मभिदा द्विधा ॥१॥

ओव्या–संगीताचें प्रकार तीन । पहिला सांगितला ग्रंथातून । दुसरा प्रकार वर्तमान । गाती जो गायक ॥७३॥ पहिल्याते ग्रंथग म्हणती । दुसऱ्यातें लक्ष्यग म्हणती । भावी प्रकार निश्चिती । तिसरा तो ॥७४॥ ग्रंथग संगीत दोन प्रकार । मार्ग संगीत अति सुंदर । देशी संगीत नियम-दृष्टार्थबद्ध परिकर । आचार्यीं लक्षणीं बांधले तें दुसरें ॥७५॥

लक्ष्यगं सर्वथा देशी द्वेधा तदपि कीर्तितम् ।
निबद्धमनिबद्धं च निबद्धं गुरुतः श्रुतम् ॥२॥

टीपः—सु=सजन

लक्ष्य संगीत चाले वर्तमान । ते सर्वथा देशीचि जाण । तयाचेहि प्रकार दोन । बद्ध अबद्ध भेदानें ॥७६॥ सुंदर गायकमुखें शिकले । तें निबद्ध बोलिले । कांहीं शास्त्रीय लक्षणहि आले । सोयीसाठीं ज्यामाजीं ॥७७॥ जैसें पांच स्वरावांचुनी । राग नव्हे हा नियम धरुनी । तीन स्वराच्या रागा लागुनी । आधुनिक मूर्खेहि निषेधिती ॥७८॥ ते मूर्खांचे परी योग्याचे आहे । गुरु शब्दार्थ सज्जनार्थ वाहे । ज्यांच्यानें लक्ष्य संगीत होय । कलीं सुमार्गरूप ॥७९॥ परी आधुनिक लक्ष्यसंगीत कुग्रंथीं । माझ्या लक्ष्यसंगीत शब्दाची करूं नये व्याप्ति । तेणें मूर्खें ऋषिप्रति । गालीप्रदान केलें म्हणुनी ॥८०॥ आगंतुक ब्राह्मण्यातें । साधु निंदिले येणें प्रमत्तें । पुढें चालवावे आपुल्या ग्रंथातें । म्हणुनी नाम लोपविलें ॥८१॥ शब्दीं पाणिनीचेहि नियम । येणें मोडिले करुनि अधर्म । राग निरूपिले तेहि निरागम । अपूर्णरूपें ॥८२॥ असो निंदका निंदणें । श्वानासवें काय भुकणें । आता पुढलिये अवधानें । आश्रायेजे ॥८३॥

रागच्छायासमायुक्तमनिबद्धमिहोच्यते ॥

अधुना बालगोपालैर्गीयते यद्यथारुचि ॥३॥

रागच्छायायुक्त । तेचि अनिबद्ध म्हणावे लक्ष्यसंगीत । जैसे मुलेबाळे गाती समस्त । इच्छेनें आतां ॥८४॥ अधुना पदाचे स्वारस्य ऐसे । कीं पूर्वीहि अबलाबालगीत देशी संगीत असे । परी ते नियमोनी सरिसे । शुद्ध केले आचार्यांनीं ॥८५॥ ते अल्पापभ्रंशित परी स्वरनियमबद्ध । आतां लक्ष्यसंगीत जाहले निबद्ध । आतां जे असंस्कृत गाती अशुद्ध । अबला बाल गोपाल ॥८६॥ ते गा अबद्ध बोलिजे । भगवद्गुणीं अवघेचि साजे । लक्ष्य रागच्छाया कैसी अनुरजे । हे मस्कृत गाथ्यांत पहावे ॥८७॥ छाया ओळखणें अति कठीण । म्हणुनी प्रमाद होती गहन । परी तया गौणपीठ मानोन । उपसाहिजे ॥८८॥ प्रमाद तो परिहरावा । अबद्धांत मान न धरावा । सकळीं मिळोनी आदरावा । कीर्तनाश्रयो ॥८९॥ —

अबद्धं संस्कृतं सद्भिर्निबद्धं सुखदं भवेत् ।
रागनामविभेदेन कलिमार्गभवं हि तत् ॥४॥

अनिबद्ध छाया घेऊनी । तयाते संकीर्ण रागनाम देऊनी । निबद्ध करतां साधुवाणीं । तरी कलिमार्गीं जागा मिळे तया ॥९०॥

मार्गलक्ष्मान्वितं वापि निबद्धं वातिरंजकम् ॥
भावि स्यादनया बुद्ध्या यैराचार्यैः कृतः श्रमः ॥५॥
तदुक्तं तु भवेद्भावि अर्धलोकानुसारतः ॥
नो सर्वथा लोकगीतं भिन्नं वैकारिकं वृथा ॥६॥

आतां मार्गसंगीत किंवा लक्षण देशी संगीत । अथवा अतिरंजक लक्ष्य-संगीत । पुढील पिढींनीं प्रचारांत । आणावें म्हणुनी ॥९१॥ जे आचार्य श्रम करिती । भावि संगीत बोलिजे तद्दर्शित पथीं । अर्ध लोकरुचिअनुसारी निश्चितीं । आणि अर्ध स्वयोजनानुसारी ॥९२॥ सर्वथा लोकरुचीस मान देतां । तरी प्रसंगीं श्वान भुंकणेहि येऊं पाहे संगीता । म्हणोनी भावीची यथार्थता । गणावी मदुक्त ॥९३॥ ( चूर्णिका ) याचें मदुक्त उदाहरण । कीं अवरोहीं वादितः विवादीचें अल्पग्रहण । नोहे रागहानिकर संपूर्ण । तैसे अवरोही विवादीग्रहण । अस्से संवादीवरून । केलियाहि घडो शके ॥९४॥ कल्याणीं शुद्धमध्यमगांधारसंपुटी । लक्ष्य संगीतीं चाले गोठी । तैसी कोमलनिषादधैवतसंपुटी । चतुर्थ संवादी म्हणोनी घेता येतो पुढे ॥९५॥ परी तें लक्षण आज नाहीं । ना बोलिले मागें ही । ऐशिया सूचना निवती कांहीं । त्या भाविसंगीतहैतुक ॥९६॥ त्याहि मी निरूपीन स्थळीं स्थळीं । परी विशेष सांगेन लक्ष्यमेळीं । आणि लक्षणसंगीत नव्हाळी । बहुस्थळीं सांगेन ॥९७॥ मार्ग संगीत मात्र कांहीं । या ग्रंथीं सांगणार नाहीं । ते गांधर्वसंहिता ग्रंथीं लवलाही । निरुपीन मी ॥९८॥ तेथें प्राचीनग्रंथाक्षेपकांचा । सत्कारहि करीन साचा । येथें लक्षणदेशी वा लक्ष्यसंगीताचा । विशेष प्रकार बोलिजेल ॥९९॥ आतां मार्गदेशीलक्षणीं

आणि लक्ष्यीं । नियम जे येती समान पक्षीं । ते येथहि अपेक्षी । निरूपीन मी ॥१००॥ मार्गसंगीत अपूर्व विधीनें । अदृष्टप्रद होय वेदवचनें । देशीसंगीत नियमविधीनें । साधुवचनें पुण्यप्रद होय ॥१०१॥ जैसा ह्मैसा-ब्रह्मज्ञान । उपयोगी विषयी जनाकारण । तेवीं विषय भगवत्समर्पण । तें साधे कीर्तन लक्ष्यसंगीतें ॥१०२॥ अपूर्वविधि शब्दमात्रे फळे । नियमविधि आचरणें फळे । इतर भगवच्छ्रद्धामात्रें फळें । नातरी ओहळे महानरकीं ॥१०३॥ एवं संगीतरहस्यरीती । जाणुनी प्रवर्तावे लक्ष्य संगीतीं । मिरा-मल्हारादि कृति । ओळखोनि ॥१०४॥ आतां लक्ष्य वर्तमान । लक्ष्य म्हणजे शास्त्रोक्त भाषण । त्याशीं विरोध पडतां जाण । तरी लक्ष्यानुसारी शास्त्रार्थ करावा ॥१०५॥ येविषयीं आणिकहि कल्लिनाथ । रत्नाकराच्या टीकेंत । म्हणती ते प्रमाण येथ । घेऊं आधीं ॥१०६॥

श्रीरागलक्षणें—समशेषस्वरमिति । समाः शेषाः स्वरा यस्मिन् स तथोक्तः । अत्र स्वल्पपञ्चममिति पञ्चमस्याल्पत्वविधानात्तदितरेषां स्वराणां बहुत्वे साम्यं विधीयते । यत्र स यस्याल्पत्वं विधायेतरेषां समत्वविधानं तत्र तदपेक्षया बहुत्वसाम्यमेव । यत्र बहुत्व विधानादितरेषां समत्वविधिस्तत्रात्पत्वं साम्यं वेति विवेक्तव्यम् । एतेषु देशीरागेषु यत्र तारमन्द्रयोरुभयोरेकस्य वाऽवधिर्नोच्यते तत्र कामचारो द्रष्टव्यः । इदानीमधुनाप्रसिद्ध-रागाङ्गादीनां लक्ष्ये प्रतीतानां लक्षणविरोधानां परिहारार्थमुद्यमः क्रियते । तत्र विरोधोद्भावनाप्रकारस्तावद् ग्रामद्वयाज्जात्यादिपरम्परयोत्पन्नानामेतेषां रागाणां मध्यमस्थषड्जमध्यमस्थानयोरेव तत्तन्मूर्छनारम्भपक्षाश्रयणं शास्त्र-विहिते सम्भवत्यपि मध्यमग्रामोत्पन्नानां मध्यमादितोडीप्रभृतीनां च मध्यम मध्यमारम्भं विहाय मध्यमषड्जस्थान एवाऽऽरम्भो लक्ष्यलक्षणविरुद्धः । तथा ग्रहस्वरायत्तोत्तरस्वरसाधारणानामभावश्च चित्र ( त्रिच ) तुःश्रुतिकत्वेन ग्रामद्वयभेदकस्य पञ्चमस्यालोप्यत्वेन प्रयुज्यमानस्यापि सर्वरागेष्वेकरूपता ।

क्रियाङ्गरामक्रियायां मध्यमस्य पञ्चमश्रुतिद्वयाक्रमणं नट्टदेवक्रीप्रभृतिपुष्ट्र-षभधैवतयोरन्तरकाकल्यादिमश्रुतिद्वयाक्रमणेन प्रत्येकं पञ्चश्रुतिता च शास्त्रविहिता (?) श्रीरागे गान्धारनिषादयोर्मध्यमषड्जादिमैकैकश्रुत्या श्रवणेन ( क्रमणेन ? ) त्रिश्रुतित्वे शास्त्रविहितेऽपि षड्जमध्यमयोरशास्त्र-विहितात्रिश्रुतित्वकरणेन कैशिकयोरवैशसम् । तत्रापि ऋषभधैवतयोर्गान्धार-निषादादिमश्रुत्याक्रमणेन प्रत्येकं चतुःश्रुतित्वं वा शास्त्रविहितम् । आन्धाल्या लक्षणे पञ्चमस्य ग्रहांशत्वोक्त्या तथैव प्रस्तारे लिखितेऽपि लक्ष्ये मध्यमग्रहां-शत्वेन प्रयोगः। तथा कर्णाटगौडस्य लक्षणे षड्जग्रहांशत्वोक्तौ लक्ष्ये निषादग्रहांशत्वं ग्रामरागेषु हिन्दोलस्य लक्षणे त्यक्तत्वेनोक्तरिपत्यागेन प्रयोगः। षाडवौडुवेष्वपि रागेषु क्वचिल्लोप्यस्वरप्रयोगः क्वापिजन्यजनकयोर्मेलनभेदो रसादिविनियोगानियमश्चेति लक्ष्यलक्षणयोर्बहुधा विरोधाः । एकेषुणा राम इवाभिधालानेकोत्तरणैव बहून् विरोधान् । श्रीकल्लिनाथः परिहर्तुकामो ब्रूते मतङ्गादिरहस्यवेदी ॥ देशीत्वादेतेषामानियमो न दोषायेति । देशीत्वं च तत्तद्देशजनमनोरञ्जनैकफलत्वेन कामचार प्रवर्तितम् । यथोक्तं देशीलक्षण-ग्रन्थादौ देशे देशे जनानां यादिति । तथा चाऽऽहाऽऽञ्जनेयः ।–

येषां श्रुतिस्वरग्रामजात्यादिनियमो न हि ।

नानादेशगतिच्छाया देशीरागास्तु ते स्मृताः ॥ इति॥

एवं वाद्यनृत्तयोरपि कामचारप्रवर्तितयोर्देशीत्वमवगन्तव्यम् । नियमे तु सति तेषां गीतादीनां मार्गत्वमेव । यो मार्गित इत्यादिनोक्तत्वात् ॥१६१॥

कल्लिनाथटीका–संगीतरत्नाकर रागविवेकाध्याय द्वितीयप्रकरण श्लोक १६१.

कोठें षड्जग्रह कोठें निषादग्रहत्व । कोठें रागाचे अजनकत्व । इत्यादि विरोध सर्व । लक्ष्य लक्षणेसी ॥१०७॥ तेथें लक्ष्याचेचि करावें ग्रहण । देशी संगीतीं नियम नसतां जाण । दोष न होय संपूर्ण । निश्चयो हा ॥१०८॥ कामाचारप्रवृत्तित्व । म्हणोनी संगीता देशित्व । एवं वाद्यनृत्यादि सर्व । तैसेचि जाहले ॥१०९॥ हनुमंताचे मत । स्वयें सांगे कल्लिनाथ ।

तोही श्लोक उध्दृतटीका वाक्यांत । आलाचि आहे ॥११०॥ ज्या रागाच्या ठायीं । श्रुति स्वर ग्राम जाति कांहीं । नियम बांधलेला नाहीं । केवळ छाया मात्र रागांची ॥१११॥ नाना देशीं भिन्न भिन्न । देशी रागतया अभिधान । म्हणोनी कित्येकांच बोलण । कीं श्रुति ग्राम जाति ओळखाव्या कैशा ॥११२॥ तयांचे स्पष्ट निरूपण नाहीं । या लागी रत्नाकरादि व्यर्थ सर्वहि । तरी मी म्हणें तुम्हासी कांहीं । प्रयोजन नाहीं तयाचे ॥११३॥ देशी संगीताशीं याचा । नियमचि नाहीं साचा । या लागीं देशी विचारे-चि तयाचा । विचार कीजे ॥११४॥ श्रुतिजनित स्वर । आणि स्वर-समुह ग्राम सुंदर । ग्रामाश्रित मूर्च्छना प्रकार । जाति ते श्रुत्याश्रित ॥११५॥ इत्यादि श्रुतिस्वरग्रामक्रमाची । नियतता जेथ नाही साची । केवळ स्वरा-वलंबिता जयाचि । ते देशी संगीत ॥११६॥ स्वरहि नसतां । तरी हारपेल देशीसंगीतता । म्हणोनीचि कल्लिनाथ तत्वतां । बोलिले पुनः ॥११७॥ "देशशब्देन तत्रत्या जना लक्ष्यंते । तैर्यैच्छक्रियमाणायां गीतादि क्रियायामाचार्यैकृता संज्ञा" । लोकरंजक देशी खरे । परी लोक तंव अज्ञानी पुरे । यालागीं लोकरुचिअनुसारे । आचार्य नियम करिती ते देशी संगीत ॥११८॥ "स्वरगतरागविवेकयोर्जात्याद्यन्तरभाषान्तं यदुक्तं तद्गं-धर्वमित्यर्थः" (अ. १ श्लो. ४) गांधर्वमार्गः गानं तु देशीत्यवगंतव्यम् । (श्लो. १) स्वरगतशब्दें स्वराते । वेगळे करोनी जात्यादि अंतर भाषान्त रागाते । गांधर्व म्हटले कल्लीनाथें । आणि गान ते स्वरयुक्त देशी ॥११९॥ गांधर्व ते अपौरुषेय । गान ते वाग्गेयकाररचित स्वयें । हेंहि निरूपूं सोय । प्रसंगें पुढें ॥१२०॥ जे बहु विस्तारे । वैयक्तिक कलहे विखुरे । तयाते सुबद्ध करिती खरे । शहाणे महात्मे ॥१२१॥ जे जे बहुलोकीं समाजीं रूढे । तेथ नियतता अवश्य घडे । बहु लोकासी जे आवडे । तेथ नियम कांहीं तरी ॥१२२॥ बहूपयोगित्वचि साचे । नियमाधीनत्व तयांचे । जैसे आवडतिया शिरस्त्राणादिकांचे । कारण राजाज्ञानुकरण ॥१२३॥

म्हणोनी वेळोवेळीं आचार्य । जे नियम बांधिती स्वयें । ते आपणा येती हा होय । मनोग्रह ॥१२४॥ तेणें मनोग्रहें कौशल्य वाढे । एवं समाजीं विद्या जोडे । ऐसेचि बोलिजे फुडे । संगीत देशी ॥१२५॥

आलापादिनिबद्धो यः स च मार्गः प्रकीर्तितः ।
आलापादिविहीनस्तु स च देशी प्रकीर्तितः ॥१०॥
देशी मार्गी नियमे स्यादिति वाक्यमसंमतम् ॥११॥

टिका—आलापादिनिबद्धः श्रुत्यादि निष्ठया क्रियमाणः । विहीनो यथारुचि स्वरमिश्रणविषये इति विवेकः । तेन सोमनाथोक्त तुरुष्क तोड्यादीनामपि ग्रहणमुचितमेव । तुरुष्काः यवन विशेषाः जैमिन्युक्त पिकने-मादिशब्दग्रहणवत् तुरुष्कगीतग्रहणमपि नानर्थाय भवेत् । किंतु तस्मिन्नपि रसवर्धनापेक्षा वर्तत एव । यत्तु रागविबोधटीकाकारः देशी अपि नियमेन मार्गी भवतीति वदति तत्प्रभावादर्शनादसदिति बोध्यम् ॥११॥

यद्यपि ऐसी आहे स्मृति । कीं आलापादि निबद्ध मार्ग म्हणती । अनि-बद्धता देशी संगीतीं । बोलिली आहे ॥१२६॥ परंतु या स्मृतीचा आशय पाही । अदृष्टजनक आलापादि बंधन देशी संगीतीं नाहीं । परी दृष्टफल जनक आलापादि बंधन लवलाही । आहेचि आहे ॥१२७॥ आलाप न म्हणता आक्षिप्तिका म्हणेल । तरी तो प्रायश्चित्ती न होईल । परी करणें तयाचे न शोभेल । रुचिदृष्टीं ॥१२८॥ म्हणोनि मार्ग संगीताचा । अवश्य तितुका उपयोग साचा । करुनि देशी संगीताचा । विस्तार कीजे ॥१२९॥ ते तैसेचि येथें बोलेन । सर्वथा आनियम मोडोन । मार्ग-समत्व करीन ॥ संगीता यया ॥१३०॥ अवतार होवोनि कोणी । मार्ग संगीत उद्धार करील त्याच्या चरणीं । आम्ही लागूं परी तोंवरी चक्रपाणी । देशी संगीतें आळवूं ॥१३१॥ हें माझें करणें । पूर्वाचार्य अनुगुणें । भक्त-चरित्रीं पाहणें । कथा ऐसी ॥१३२॥ एका भक्तानें केदार गहाण । ठेविला तो नारायणें आणला सोडोन । आणिकहि देशी संगीत कारण । कैसे ते

ऐका ॥१३३॥ मल्हार आणि सुगराई मिळोनी । रामदासी मल्हार जाहला जनीं । हे देशी राग म्हणोनी । कोण न म्हणे ॥१३४॥ परी येणें आळवितां भगवंत । प्रसन्न झाला करुणावंत । आतां सुरमल्हारहि देशीराग मिश्रित । ऐसाचि आहे ॥१३५॥ मल्हार आणि सिंदुरा मिळून । सूरदास मल्हार होय उत्पन्न । परी महापुरुषीं गायिला म्हणोन । मार्गसम भगवान् येणें तोषे ॥१३६॥ मल्हार आणि अडाणा । मिळोनी मीरामल्हार जाणा । येथहि असोनी देशीपणा । परी नारायणा प्रिय झाला ॥१३७॥ म्हणोनी येथ ऐसे कीजे । मार्ग दोन विध ओळखिजे । कृतादि मार्ग आणि कलि मार्ग बोलिजे । नांव तयांचे ॥१३८॥

स्तवैरुच्चावचैस्तोत्रैः पौराणैः प्राकृतैरपि ।
स्तुत्वा प्रसीद भगवन्निति वंदेत दंडवत् ॥
(भागवत स्कंध ११ अ. २७ श्लोक. ४५)

हा भागवत श्लोक । येथें प्राकृत गीतहि देख । कलींत सत्पुरुषीं योजिजे सम्यक । म्हणोनी जाहले कलिमार्ग ते ॥१३९॥ तैसे देशीहि संगीत जरी । मीरारामदासादिसाधुवरीं । बांधले म्हणोनि निर्धारीं । तेहि कलिमार्गीसंगीत होईल ॥१४०॥ यालागीं तैसेचि मार्ग स्वयें । मी बांधीन संप्रदाये । येथ अनार्य राग आचविये । उपेक्षिलिया जातील ॥१४१॥ ज्या राग तालांची । संस्कृत नांवे असतील साची । त्यास त्यास छाया मानुनी आर्य प्राचीन रागांची । वर्णीन मी ॥१४२॥ सुघराईसारखे अनार्य राग । जे रामदासादि महापुरुषीं घेतले चांग । ते समर्थश्वानन्यायें अव्यंग । अंगीकारीन मी ॥१४३॥ भविष्यपुराणीं दानसेन । तोचि लोकीं तानसेन । तानपद संस्कृत जाण । सेन ही पदवी संस्कृतचि ॥१४४॥ म्हणोनी तयाचें संगीत । तेहि मी घेईन यथार्थ । तानसेनासी यवनजात । श्रेष्ठ म्हणोनी मिया म्हणत होते ॥१४५॥ भविष्यपुराणीं त्यातें । आणि आहे वर्णिले अकबरातें । म्हणोनी तत्कृतरागातें । प्रासंगिक प्रमाण मानीन मी ॥१४६॥

कानडा मल्हार मिळोनी । तानसेन मल्हार मी म्हणी । जयाते बोलिले यवनीं । मिया मल्हार ऐसे ॥१४७॥ आतां उमापतीचे मत । आणि रागविबोधोक्त । प्रमाणदेऊनि येथ । समाधान करूं ॥१४८॥

" मयैव पंचभिर्वक्त्रैः स्रष्टाः पूर्वं कुतूहलात् ।
अतः संभूय शुद्धास्ते षट्त्रिंशत्संख्ययोदिताः ।
एतेषां छायया जाता छायालगसमाह्वयाः ।
असंख्यकास्तु ते तेषु शतमेकोत्तरं क्रमात् ॥
शुद्धं तु शिवरूपेण शक्तिरूपेण सालगम् ।
द्वयोर्मिश्रं तु संकीर्णमतस्ते त्रिविधा मताः ॥

औमापत्य ग्रंथीं । स्वयें बोलिले उमापति । कीं मी कौतुकें गातां निश्चिती । पांचमुखें छत्तीस राग म्हटले ॥१४९॥ ते गा जाणिजे शुद्ध । मार्गी रागहि हे प्रसिद्ध । याचाचि विस्तार विशद । ब्रह्मदेवे केला हो ॥१५०॥ म्हणोनी ते मार्गी संगीत । आतां छायालग राग ते असंख्यात । जे दुसरियाची एका रागांत । छाया मिळोन पैं होती ॥१५१॥ तेहि राग अनंत असती । शुद्ध आणि छायालग मिळोनी पुढती । तिसरे जे होती । ते संकीर्ण ॥१५२॥ शुद्ध ते मार्गी जाण । देशी छायालग संकीर्ण । म्हणोनी अनंतपण । आहे तया ॥१५३॥ शुद्ध ते शिवापासोनी झाले । छायालग शक्तीपासोनी जन्मले । आणि संकीर्ण ते उपजले । दोघापासोनी ॥१५४॥ येणें प्रमाणें पाहतां । मार्गी संगीतासम देशीसंगीतासहि अनादिता । जैसे भाषा संस्कृता आणि प्राकृता ईश्वर प्रणीतता । शिक्षाग्रंथीं ॥१५५॥"संस्कृतं प्राकृतं चापि स्वयं प्रोक्ते स्वयंभुवेति" । जैसी बोलिली आहे उक्ती । तैसीच ओळखावी संगति । मार्गी देशी दोनी अनादि ॥१५६॥ ईश्वरप्रणीत नसेल । तरी कोणास बांधता कैसे येईल । प्राकृत भाषा जाहली दुर्बळ । म्हणुनी काय वर्ण वेगळे ॥१५७॥ कोणत्याहि भाषेआंत । वर्ण समानाचे समस्त । जरी ते उच्चारिती विकृत । तरी स्वाभाविक तोचि साच ॥१५८॥

आणि विकृतांतहि पाहतां । स्वाभाविकाची छाया तत्वतां । तैसीच जाणावी व्यवस्था । संगीताची ॥१५९॥ जरी आतां बारा स्वर । वेगळे जाहले समग्र । तरी श्रुतिस्वरूप आणि स्वरछाया निर्धार । लोपिली नाहीं ॥१६०॥ संस्कृत भाषेंत जैसे । नियमावांचोनि बोलणेंचि नसे । मार्गीसंगीतांत तैसे । नियमाविण गाणें नाहीं ॥१६१॥ प्राकृत भाषा ही देवेंचि केली । परी अपभ्रंशे बोलतां बोली । दोषी नाहीं गणितली । विकृतता आली तयाच्या ॥१६२॥ तैसे छायालग संकीर्ण । देशी संगीत जरी ईश्वरापासोन । तरी त्यांत रंजकत्वा कारण । निश्चये जाण लोकसत्ता ॥१६३॥ माती ईश्वरें निर्मिली । ते यज्ञवेदी आणि घटाच्या उपयोगी आली । परी यज्ञवेदीच शास्त्रें नियमिली । घटादिक नाहींत ॥१६४॥ तैसे श्रुति स्वरादि समस्त । साव आहाती भगवत्प्रणीत । कर्मबद्ध जीव उच्चारासहि असमर्थ । म्हणोनिया ॥१६५॥ जरी जीवप्रणीत सर्वथा असते । तरी कुत्रे गाढवहि सुंदर गाते । मनुष्यांनचि घडे तेथें । यालागीं भगवत्संकल्प ॥१६६॥ कलींत महात्म्यानेंहि जे स्वर । मानिले ते कलीमार्गी जाहले साचार । त्यांत जे ग्रंथगत किंवा महात्मगत प्रकार । ते शुद्ध बोलिजेती ॥१६७॥ त्यांतहि मिसळोनी एक एक । छायालग संकीर्ण होती देख । याचिसाठीं मूळ पीठ गौणपीठ सुरेख । काढिले मियां ॥१६८॥ कलीमार्गी शुद्धराग तो मूळपीठ । रागाची छाया ज्यांत चाले ते गौणपीठ । अभंगादि भजन नीट । हे ओळखोनी करावे ॥१६९॥ छायालग परमेश्वरेंचि निर्मिले । म्हणोनी तदुपहित चैतन्य देवता जाहले । तरी त्यासी जीवें ढवळिले । तरी देवताविग्रहो तितुके होती ॥१७०॥ जैसी जीवाच्या इच्छेनुसारें । निर्माण होती जितुकीं घरें । वास्तुदेवताचीं आकारें । तितुके होती ॥१७१॥ तैसे ढवळमिश्ररागे । तितके चैतन्यविग्रह होती चांगे । जैसे शालिग्रामास होणे लागे । भावप्रसंगे शिलपिलें ॥१७२॥ चत्वारिंशच्छतराग निरुपणीं । देशीरागासहि देवता सांगितल्या म्हणोनि । उपपत्ति हे मी मानी । धर्मान्वयें ॥१७३॥ धर्मावरी

जयाचा कांहीं । अशुद्धवीर्यास्तव विश्वास नाहीं । तया कुटिलांचे आम्हांस काई । करणें लागे ॥१७४॥ आतां देशीराग नियमावा कैसा । तो सोमनाथ सांगे आपैसा । ती आर्या प्रमाण घेऊनी सहसा । तो नियम सांगूं ॥१७५॥

"यद्यपि देशीरागा देशे देशेऽन्यवेलाख्याः ॥५॥

पूर्णौडवखाडवता स्वंशन्यासग्रहेषु चानियताः

तदपि ग्रहादि पूर्णत्वादि च बहुमतजमनुसृत्य ॥६॥

मेले प्रसंगत इहोद्दिष्टानां लक्षणं ससंक्षेपम्"॥ (रागविबोधविवेक ४)

सोमनाथ म्हणे जरी । देशी संगीत नानापरी । श्रुतिस्वरग्रहन्यासांश विचारी । नियमिले नाहीं ॥१७६॥ तथापि जे कार्य अति विखुरले । ते मग समाजे जाय बांधिले । तैसे आचार्यीं नियम केले । बहूपयोगी संगीताचे ॥१७७॥ ते मी पाहोनी वर्णीन । ययाचा अभिप्राय पूर्ण । कीं धर्मत्रिविध आपण । दिसे जैसा ॥१७८॥ वेदधर्म जनपदधर्म । तैसा एक ग्रामधर्म । त्या सकळातेहि मान परम । एकैकाविरोधे असे ॥१७९॥ मुख्य तो धर्म वैदिक । पुढें दुर्बल एकाहूनि एक । परी ते गृह्यसूत्रीं सम्यक । आश्वलायनें मानिले अदृष्टहेतु ॥१८०॥ "अथोचावचान् जनपदधर्मान् ग्रामधर्मांश्च तान् विवाहे प्रतीयात्" इति । आहेचि सूत्रपदोक्ति । म्हणुनी लौकिक कर्महि ईश्वराप्रती । अर्पितां होय धर्मचि ॥१८१॥ तेणेंमाने देशीसंगीत । बहूपयोगें धर्म्यचि होत । येणेंहि गातां भगवंत । तरी सामतुल्य ते ॥१८२॥ जेव्हां अवतार होईल । तेव्हां मार्ग संगीत उद्धरेल । परी तोंवरी नंद बाळ । देशी संगीतें कां न रिझवावा ॥१८३॥ किंवा आमुचिया दैवें । अवतारा-वांचुनि मार्ग संगीत कळे स्वभावे । तथापि ते कळे तोंवरी जीवे । कां न मनमोहन रिझवावा ॥१८४॥

निद्राप्रातीरोगनाशादिर्देशीगीततः क्वचित् ।

सर्वस्तन्मानसैकाग्र्यात् हरिभक्तिबलाद्दुत ॥१२॥

हरिभक्तिबलाच्छक्तं देशी मार्गीसमं भवेत् ।
गीतगोविंदतो यस्मात्पद्मावति मृतोत्थिता ॥१३॥
न तथापि स्वरूपेण देशी मार्गीत्वमेति हि ।
न लावणी महाराष्ट्री क्वापि नारदगीर्भवेत् ॥१४॥

टीका—ननु देशी अपि गीतं नियमे सति मार्गी भवति बालानां देशीगीतेनैव निद्राप्राप्तिदर्शनात् क्वचिद्रोगनाशदर्शनाचेति । तत्सर्वं मानसैकाग्र्यजं फलम् । सत्वोत्पत्तौ प्रकृतिर्न विधिमपेक्षते तस्याः गुणसंक्रमणस्वभावादिति सांख्यसिध्दान्ताभ्युपगमे तथैकाग्र्यसंभवात् । हरिभक्तिबलेन तु देशीगीतमपि सामर्थ्येन प्रभावेन मार्गीगीतसमं भवेत् । नहि महाराष्ट्र भाषा प्रसिध्दं लावणीवृत्तं नारदतुंबरुगानयोग्यं कदापि भवतीत्याशयः । हरिभक्त्या देशीगीतेऽपि सामर्थ्यं मार्गीसममिति । कुत्र दृष्टमत आह । जयदेवेन स्वकृतगीतगोविंदगानेन मृता पद्मावती उत्थापितेति भक्तविजयादावन्वेषणीयम् ॥

ओव्या

आतां देशी संगीतहि फलप्रद । हे येथूनि निरोपू शुद्ध सज्जनी होवोनि सावध । कीर्तनार्थ ऐकावे ॥१८५॥ देशी संगीत माते । सप्राज्ञ दिले भगवंते । परी स्नेहें निमित्तता येथे । नामदेव–व्यंकटरावादींची ॥१८६॥ प्रथम गुरु सार्धैक मास । द्वितीये शिकविले पक्षविशेष । आतां मी विशेष न मानी अन्य गायकास । ते द्वेषिती धर्मास म्हणोनिया ॥१८७॥ यालागीं धरीच्या घरीं । माहितीं मिळवित यथास्वरीं । त्यांत नामदेव गुरु प्रशंसा करी । माझिया रागोद्धाराची ॥१८८॥ इर्ष्येनें गातां लवकरी यावे । म्हणोनी व्यंकटराव प्रांजळ न बोले स्वभावे । एरवीं मजवरी प्रेम बरवे । आहेचि तयाचे ॥१८९॥ आतां इतर जे गायक । ते स्वभावें परिवर्तक । षाडवादि मेल कल्पक । उपक्षिले ॥१९०॥ यद्यपि मजजवळील दोषासहि । संगीतशास्त्र येतच्चि नाहीं । तथापि ते मज फणीशाई । पूर्वीची दाता ॥१९१॥

परी साग्र केले पक्ष मास । म्हणोनी नमिले दोघांस । कीं वाखाणिल्यावांचून विशेष । साग्रकर्तृऋण न फिटेचि ॥१९२॥ आतां ऐकावे फल । माय निजवी पाळणां बाळ । स्वर गाये अतिकोमळ । निजनिज बाळा म्हणोनी ॥१९३॥ ते मार्गीसंगीत नोहे । हे तंव प्रसिद्ध आहे । स्त्रिया गाती लवलाहे । पाहतोचि आपण ॥१९४॥ परी त्या मायेच्या देशी संगीतें । सुख निद्रा मिळे बाळाते ।

देशिना मातृगीतेन बालो हर्षं प्रपद्यते ।
देशिना व्याधगीतेन मृगोऽप्यर्पयतीत्यसून् ॥१५॥
देशिनैव प्रगीतेन द्वेषं सर्पोऽपि मुंचति ।
वृंदावने मुकुंदेन मुरलीवादनं कृतम् ॥१६॥
क्वचिन्मार्गी क्वचिद्देशी गोपालत्वादितीर्यते ।
ततोऽत्र बहुलत्वेन देशी सम्यक् निरूप्यते ॥१७॥

टीका— देशीसंगीतस्य कंठमाधुर्यादिजन्यानपि प्रभावानाह । मानसमैकाग्र्यमपि कंठमाधुर्यजन्यम् । शिष्टाद्रुतत्वमप्याह । वृंदावन इत्यादिना । क्वचित् रासमंडले अलौकिकत्वान्मार्गी । क्वचिद्गोचारणसमयादौ सर्वजनप्रत्यक्षत्वात् देशी अपि । कथमेतत् । भगवतो गोपालत्वात् । अबलाबाल गोपालै रित्यादिमातंगोक्तिः स्मर्तव्या । तस्मादत्र बाहुल्येन देश्येव मया निरूप्यते । अधुना व्यवहार्यत्वात् ।

ओव्या

किंवा गीत ऐकोनि हर्षाते । पावेचि बाळ ॥१९५॥ निद्राप्राप्ति रोगनाश । हे देशी संगीतेंहि होय विशेष । भगवद्भक्तियुक्त एकाग्र मानस । स्वरावरीं जैं होय ॥१९६॥ जयदेवाचार्ये गीतगोविंद गावोनी । उठविली पद्मावती आपुली रमणी । त्यांत देशी रागाची उभवणी । आहेचि कीरू ॥१९७॥ गुर्जरी वसंत देस वराळी । गौड मालवादि सकळीं । देशीरागरूपें मिसळी । पावले आथी ॥१९८॥ तेणें देशीरागेंकरून । परतोनी

आला पद्मावतीप्राण । म्हणोनी देशी संगीतेंहि नारायण । रिझतु असे भक्तिमंता ॥१९९॥ यद्यपि भक्तीसी कांहीं । कशाचीही अपेक्षा नाहीं । तथापि गीतिगोविंदादि नवाई । पाहातो आपण ॥२००॥ आणि फावे तेणें कौशल्यें । पूजितां देवराव भले । मीरा मल्हारादिक निर्माण झाले । येणेंचि मानें ॥२०१॥ दासबोधांत रामदास आपण । सांगती कीं कीर्तनी असावे तानमान । येणेंहि प्रमाणें देशी गान । आळविता नारायण सामतुल्य ॥२०२॥ अहो देशीगीतहि स्वाभाविक । व्याध काय जाणे मार्ग संगीत सुरेख । परी देशीगीतें हरणें सकळिक । लुब्ध होवोनि असूंहि त्यजिती ॥२०३॥ पुंगी शिंगीचे गीत ऐकुनी । द्वेष सोडोनी नाचे फणी । आतां दैवी प्रमाणी । तेहि सांगू ॥२०४॥ छायालग मिश्रसंगीत । जंव आहेचि शिवशक्ति प्रणीत । तरी तेणें आळवितां भगवंत । तें सामतुल्य कां न होय ॥२०५॥ आणि विषयी जे होती । ते गीत तंव न सोडिती । मग तेणेंचि गीते आळविता रमापति । कवण अपराधू ॥२०६॥ शिव दुर्गा नारद तुंबर । सरस्वती आणि हनुमंतादि मुनिवर । संगीतरत समग्र । मार्गी आणि देशीहि गाती ॥२०७॥ मुरली बाजवी वनमाळी । युवती मोही गोकुळीं । मार्ग देशी मिसळी । गावोनिया ॥२०८॥

स्मृतौ गीतनिषेधस्तु भक्तिहीनपरो भवेत् ।
देशिनापि समाधिः स्याज्जयदेवादिवाक्यतः ॥१८॥

स्मृतौ यो गीतनिषेधः स तु भक्तिरहितगीत विषय एव ज्ञेयः । " आचारहीनं व पुनंति वेदा " इत्यादि वेदनिषेधवत् जयदेवादिवाक्यात् देशिनापि गीतेन समाधिर्भवेत् । देशवराडीरागे इत्यादिना स्पष्टं देशीगीतं जयदेवस्य.

ओव्या—स्मृतींत गीतनिषेध । तो भक्तिहीनगीताचा बोलिजे प्रसिद्ध । राग चुकलिया अनर्थ सिद्ध । तुकाराम जे सांगती ॥२०९॥ तो मार्गीसंगीताचा नियम । आणि प्रेमाविण जे देशीगानकर्म । ते निषेधिती

तुकाराम । भक्तिहीन गीत ॥२१०॥ एरवी टाळवीणामृदंगे । गुण गात्रे म्हणती तुकारामहि प्रसंगे । ते पहावे अभंगें । गाथ्यांत शोधुनी ॥२११॥

क्वणयंतामुभौ वीणां गायेतामिति च श्रुतिः ॥

देशीगीते प्रमाणान्युक्त्वा मार्गगीते श्रुतिप्रमाणमाह । क्वणयंतामिति । " क्वणयंतामुभौ वीणां गायेतामिति " श्रुति । प्रमाण आहे मार्गसंगीतीं । तैशीच याज्ञवल्क्य स्मृति । प्रमाण आहे ॥२१२॥

वीणावादनतत्वज्ञः स्वरजातिविशारदः ॥१९॥
तालज्ञश्चाप्रयासेन मोक्षमार्गं नियच्छति ॥
इत्यादीनि प्रमाणानि मार्गगीते स्फूटान्यथ ॥२०॥

तत्रैव याज्ञवल्क्यस्मृतिप्रमाणमाह । विणावादनतत्वज्ञ इति । एतानि हरिभक्तियुते देशीगीते प्रमाणानि भवंति । समाधिफलजनकहेतुत्वात् । मोक्षमार्गजनकहेतुत्वाचेति रहस्यम् ।

वीणा वाजविण्याचे तत्व जाणे । श्रुति जाति ओळखी प्रमाणें । ताळकलालयगाणें । जाणे तो पात्रे मोक्षमार्गी ॥२१३॥ रागार्णवकाराचें मत । तेंहि ऐकावे सावचित्त । कीं गीतेंचि भगवंत । सहज मिळे ॥२१४॥

यथा नयति कैलासं नगं गानसरस्वती ॥
तथा नयति कैलासं न गंगा न सरस्वती ॥

गानविद्या सुलभरीति । जैसी पाववी कैलास पर्वतीं । तैसी गंगा किंवा सरस्वती । न पाववी म्हणती हें अर्थवादे ॥२१५॥ येणें गानें कैलास मिळे यथार्थ । परी गंगागौणत्व अर्थवाद समस्त । आणिकहि श्लोक प्रमाणार्थ । ऐकावा श्रोतीं ॥२१६॥

गीतज्ञो यदि गीतेन नाप्नोति परमां गतिम् ॥
शिवस्यानुचरो भूत्वा सह तेनैव मोदते ॥

गाणें न पात्रे मोक्ष जरी । वृत्ति वावरे भलत्यापरी । तरी तो मेलियावरी । शिवदूत होवोनि शिवासह खेळे ॥२१७॥ इत्यादि सकळ महिमा ।

मार्गसंगीताची गरिमा । देशी संगीत महात्मा । जरी बांधी ॥२१८॥ तरी तो कलिमार्ग होय । तो हेचि फळ दे संप्रदाय । यावत्कलियुग सदुपाय । गायनाचा हा ॥२१९॥

नारदादेरगम्यत्वं गीते प्रोक्तं पुराणके ॥
तदीश्वरवरिष्ठत्वहेतवे नत्व निंदने ॥२१॥
चांडाळगानतस्तुष्टो देवो पौराणवाक्यतः ।
संगीतं देश्यपि प्रोक्तं कृष्णभाक्तिमयं शुचिः ॥२२॥

टीका— यत्तु नारदादीनामपि न्यूनत्वं पुराणे दृश्यते तदीश्वरस्य गानवत्तुः स्तुत्यर्थं नतु नारदनिंदार्थमिति बोध्यम् । एवं स्वर भ्रंशेनानर्थो भवतीति तुकारामवचनमपि तत्परैव । चांडाळगानतो भगवान् तुष्टः इति पुराणेतिहासदर्शनात् हरिभक्तियुतस्य देशीगीतस्यापि महात्म्यं मार्गसममिति न संशय: । सकाम मार्गगीतापेक्षया तु देशी गीतं निष्काम भगवत्प्रेमयुतं ततोऽप्यधिकम् । वैदिक सकाम कर्मापेक्षया हरिप्रेम युतान्दोलनादि लौकिक कर्माधिक्यवत् ।

ओव्या- कोणी ऐसेंहि म्हणती । कीं मार्ग गीतहि अपभ्रष्टचि निश्चिती । गीत शुद्ध न म्हणता ये नारदाप्रती । पुराणांतरी कथा हे ॥२२०॥ परी ईश्वर वरिष्ठ सर्वांत । इतर नाही तेवढा समर्थ । ऐसा अर्थवाद घेऊन प्रवृत्त । जाहली हे कथा ॥२२१॥ एक्या रायानें माझ्या राज्यांत । गाणें म्हणू नये ऐसी घातली शपथ । केवळ वेदचि म्हणावे समस्त । ऐसी आज्ञा ॥२२२॥ तो राव दुर्गतीस गेला । एक चांडाल गानें तरला । तेथ देशी संगीतासीच आला । महिमा बरा ॥२२३॥ (कथा वराह पुराणांत पाहणें) ऐसी पुराणांतरी कथा। कोणी म्हणेल कीं पूर्व देशी आणि हे देशी वेगळे तत्वता । यास उत्तर कीं देशीची अनंतता । सर्व ग्रंथा पाहिलेचि मान्य ॥२२४॥

देशी गीतमपि द्वेधा प्रागर्वाचीन भेदतः॥
प्राग्गीतं संस्कृतं तस्य प्रणालिर्नाद्य दृश्यते ॥२३॥
अर्वाचीनं प्राकृतं स्यात् संकीर्णं बहुदेशजम् ॥
गृहीतं सुरदासाद्यैरतस्तादिह चोच्यते ॥२४॥
तुकारामकृतेपेक्षा मार्गगीते हि संभवेत् ॥
देशिगीते भक्तिहीने न रामप्रेमसंयुते ॥२५॥
बहुधा प्राकृतं देशी संस्कृतं चापि वै क्वचित् ॥
प्राकृतं च पुनर्द्वेधा आर्यभूयश्च यावनम् ॥२६॥
यावनंच पुनर्द्वेधा राजसं तामसं तथा ॥
आद्यं पारशिकाद्युक्तं गुरुंडाद्युक्तमंतिमम् ॥२७॥
प्रायो देशी क्वचिन्मार्गी क्वचित् पारशिकं ह्यपि ॥
भाषासंस्कृतभेदेन गद्यपद्यविभेदतः ॥२८॥
बालानां सुखबोधाय गुरोरादेशनादपि ॥
ज्ञाननाथं गुरुं नत्वा वक्ष्यतेऽत्र यथामति ॥२९॥

–टीका–

देशी गीतं विभजते देशीत्यादिना । संस्कृतं संगीतं रत्नाकरादौ निबद्धम् । तस्य प्रणालिरद्य सम्यक्तया न दृश्यते । क्वचित् क्वचित्तु दृश्यते । अर्वाचीनं तु भाषानिबद्धं मारुविलावलरागादि । तत्तु सुरसागरादौ स्फुटं दृश्यते । यत्तु तुकारामेण स्वरत्यागात् रागस्यानर्थकरत्वमुक्त तन्मार्गगीतपरम् यथेंद्रशत्रुः स्वरितोपराधादिति वाक्यात् । स्वरसहायकवर्णार्थो काम्यकर्ममंत्रे समासादावेव ज्ञेयः । न तु सर्वत्रोपनिषदादौ । ब्राह्मणेषु स्वरादर्शनात् । आचार्यैरपि हुंफडादिवत् नोपानिषदा इत्युक्तत्वात् । यत्तु विभत्सवचनेन गीतनिंदा कृता सा भक्तिहीनदेशीगीतपरा । देशीगीतं बहुधा प्राकृतं क्वचित् संस्कृतमप्यधुना चर्पटपंजरीगंगालहर्यादौ गानदर्शनात् । प्राकृतं गीतमपि द्वेधा । आर्यभूयः भूयस्त्वेनार्यपरिपाटिमिश्रं केदारछायानटादि । यावनं

पारशिकादिकं गजलकादि इति विभागः । यावनं विभजते । गीतमित्यु-पलक्षणमात्रम् । तेन वाद्यनर्तनयोरपि ग्रहणमित्यर्थः । अत्रास्मिन् ग्रंथे कश्चिन्मार्गः वक्ष्यते । प्रायोदेशी आर्यभूय इत्यर्थः । क्वचित् पारशिकमपि हरिभजने उपयुक्तम् । पारशिकं गौरंडादेरप्युपलक्षणम् । तदपि त्यागवि-वेकार्थं वक्ष्यत एव । केनविधिना भाषासंस्कृतमिश्रणेन । मार्गो आर्यभूयो देशीच संस्कृतेन वक्ष्यते । पारशिकादिकं च भाषया वक्ष्यते । कक्षपुत्र्य-दितंत्रवत् भाषासंकरो गुणायैव भवेदित्याशयः । कस्मै प्रयोजनाय बाला-नामनधीतगानशास्त्राणां बोधाय व्युत्पत्तये । गुरोः पूर्वोक्तस्यादेशात् । ज्ञाननाथं सर्वसद्गुरुसमुच्चयं आलंदिवल्लभं नत्वेति । प्रकरणसमाप्तिपरं नमस्काररूपं मंगलम् ।

ओव्या– आतां देशीगीताचे प्रकार दोन । प्राचीन आणि अर्वाचीन । संस्कृत ग्रंथीं लिहिले प्राचीन । अर्वाचीन व्यवहारीं ॥२२५॥ संस्कृत ग्रंथासी संलग्न । जितुका व्यवहार जुळेल पूर्ण । तितुका संपूर्ण घेऊन । अर्वाचीन संगीत सांगेन येथें ॥२२६॥ क्वचित् प्राचीनहि सांगीन । अत्यंत प्राचीन विरुद्ध अर्वाचीन उपेक्षीन । जे राजस तामस म्हणोन । यावन गुरुंड ॥२२७॥ तुरुष्कतोड्यादि संस्कृतगृहीत । तैसे मीहि घेईन किंचित । जरी सांगितले आहे यथार्थ । कीं लक्ष्यानुसार शास्त्र लावावें ॥२२८॥ तरी राव लोकांचे करतां रंजन । लक्ष्यानुसारी करावे ग्रंथनिरूपण । आणि देवाचे करता प्रशंसन । कलीमार्ग व्हावया ग्रंथानुसार लक्ष्यगान करावे ॥२२९॥ संपूर्ण न मिळतां । तरी मिळेल तितुकेचि घ्यावे तत्वता । सार वेचुनी घेता । दोषु न घडे ॥२३०॥ मार्ग देशी मान्य वचन । विशेष भेद नसतां जाण । लक्ष्यगीतोपयोगी लक्षण । ग्रंथांतून कां न घ्यावे ॥२३१॥ गुरुंडयवनतांबुलोच्छिष्ट । भक्षोनी ब्राह्मण्य मागती स्पष्ट । ऐसें कांहीं क्रिया-नष्ट । निषेधिती ग्रंथाते ॥२३२॥ धर्मावरी विश्वास नाहीं । तया ब्राह्मण्य मिळेल कायी । अनार्यस्तुति ऋषिनिंदा कहीं । होईल काय गायत्री

॥२३३॥ क्वचित् संस्कृत क्वचित् प्राकृत । त्या गावया पाराशिकादि समस्त । निरूपीन मी येथ । गद्यपद्यभाषाप्रबंधे ॥२३४॥ सद्गुरु माझा ज्ञानराजा । जो त्रिभुवनीं सुख दे सहजा । तया कृपावंत महाराजा । नमन केले ॥२३५॥ माझी वेडी वाकडी गीतें । प्रीति पावोत ज्ञाननाथातें । ज्ञानराज माउली या नामातें । सदा संगीतें गायी मना ॥२३६॥ ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे संस्कृतप्राकृतान्विते गानसोपाने संगीतरंगोत्सवे गानप्रशंसादिनिरूपणं नाम प्रथमो विलासः

—०—

# द्वितीय विलास

आलंदिवल्लभं वंदे सच्चिदानंदविग्रहम् ।
प्रवक्ष्ये बालबोधाय श्रुतिस्वरविवेचनम् ॥१॥

ग्रंथनिर्विघ्नसमाप्त्यर्थं मंगलमाचरति । आलंदीति । तथाच रत्नाकरे प्रथमाध्याये द्वितीयप्रकरणे ॥

"चैतन्यं सर्वभूतानां विवृतं जगदात्मना ।
नादब्रह्म तदानंदमद्वितीयमुपास्महे ॥

ओव्या— जे सर्व भूतांच्या ठायीं । आत्माख्या चेतना ही । ते जगद्रूपें दृश्य लवलाहीं । विवर्त झाले ॥१॥ ते सच्चिद्रूपें जग नादरूपें आनंद चांग । जे नादामाजींचि अव्यंग । वृत्तिलय म्हणोनी ॥२॥ हठयोगप्रदीपिकेंत नाथ । आणि योगतारावलींत भगवत्पूज्यपादसमर्थ । वृत्तिलय सांगती समस्त । नादानुसंधानें ॥३॥ कोणी स्फोट यास नाद म्हणती । तयाची आकाशगुणरूपें विवृति । कोणी कदंबगोलकन्यायें नादोत्पत्ति । म्हणती तेथ विवृति । वायुरूपें ॥४॥ परी व्याकरणन्यायभेदें । वेदान्त सारिखाचि बोधे । आता नादशब्दे —। सी भेदू घडे ॥५॥ "वर्णा एव शब्दा" इति । भगवान् उपवर्षाचार्य म्हणती । अकुचटतपापि निश्चिती ।

वर्णमाला ॥६॥ वर्णाच्या ठायीं। अनित्यता कदा नाहीं। यावन्माया स्थायी। वर्ण सकळ ॥७॥ हे वेदान्ताचें मत। परी उदात्त अनुदात्त स्वरित। आणि षड्जादि समस्त। भेद ध्वनीचे ॥८॥ म्हणोनी ध्वनि आणि वर्ण। असती भिन्न भिन्न। याचा ब्रह्मसूत्रशांकरभाष्यांत संक्षेप पूर्ण। मियां लिहिले विस्तरण सुरतरूमाजीं ॥९॥ परी वर्णाचा येथ कांहीं। विशिष्ट संबंध नाहीं। तथापि संगीताच्या ठायीं। हें ऐसें घडे ॥१०॥

वेदान्तमर्थः सर्वेषां काव्याद्रसविभावना ॥
छंदात्तु तालत्वालित्यं स्वराद्हृदयरंजनम् ॥२॥
एतत्सर्वं हि संगीते भक्तिसौख्यप्रदं भवेत् ॥
रागतालरसो मोक्ष इति तेषां प्रयोजनम् ॥३॥

छंदशास्त्रांतील मात्रारचना। जेणें प्रबंध ताल मिळे अनुमाना। काव्यशास्त्रांतील रसभावना। आणि अर्थ वेदान्त भक्तिशास्त्रीं ॥११॥ तेथ स्वरें हृदय आकर्षिजे। छंदतालें पुनः पुनः तेथचि स्थापिजे। रसें द्रवत्व आणिजे। अर्थें मिळिजे भगवंतीं ॥१२॥ एवं संगीतशास्त्रीं। चतुष्टयाची एकतंत्रीं। भगवत्कीर्तन स्वतंत्रीं। एकता पावे ॥१३॥ तो वेदान्त येथचि निरूपिला। पुढेंहि स्थळीं स्थळीं जाईल बोलिला। प्रबंध-निरूपणीं बोलेन वहिला। छंद समुदावो ॥१४॥ राग सांगता सांगेन रस। परी स्वर आधीं निरूपिजेल यास। मूळ सकळ स्वरास। नाद हा एकू ॥१५॥ तया नादाचिया उपास्ती। मणिप्रभान्यायें ब्रह्मप्राप्ती। ऐसी कल्लिनाथाची उक्ति। रत्नाकरटिकेंत ॥१६॥ एवं निर्गुणपरब्रह्म नादोपासन। तें अनाहत नादाचें खेळण। आतां आहतनादें सगुणोपासन। तेंहि बोलिले रत्नाकरीं ॥१७॥

"नादोपासनया देवा ब्रह्मविष्णुमहेश्वराः ॥
भवन्त्युपासिता नूनं यस्मादेते तदात्मकाः" ॥२॥ (अ. १ प्र. ३)

आतां नादाच्याचि उपासनें। ब्रह्माविष्णुउमारमणें। देव उपासिल्या जाती सगुणें। ते प्रणवनादरूप म्हणोनी ॥१८॥ आहत नादाची अनुच्चार्य मात्रा।

तेहि होय निर्गुणतंत्रा । मार्गदेशीसंगीतीं नादमुद्रा । समानाचि आहे ॥१९॥

"नकारं प्राणनामानं दकारमनलं विदुः ॥
जातः प्राणाग्निसंयोगात्तेन नादोऽभिधीयते" ॥६॥ (अ. १ प्र.) ३

नकारवाच्य प्राण । दकारवाच्य अग्नि जाण । दोघांच्या संयोगें जाहला म्हणून । नाद बोलिजे तयाते ॥२०॥ यद्यपि शब्दगुण आकाशाचा । तरी तो तन्मात्ररूप साचा । अनाहत किंवा बाह्यांत जयाचा । समभाव होय ॥२१॥ परी प्राणाग्निसंयोगनिमित्त । आकाशाधिकरणक आहत । नाद उत्पन्न होय हा येथ । समन्वयो ॥२२॥

नादः सर्वपदार्थेषु पिंडस्थस्तु प्रधानकः ॥
पिंडोत्पत्तिर्विस्तरेण शार्ङ्गदेवेन वर्णिता ॥७॥
तत्रैवान्वेषणीया सा वेदान्ते वाथ योगके ॥
न ग्रंथविस्तरेभीरुरत्र संवर्णयाम्यहम् ॥

सर्व पदार्थांचे ठायीं । नाद असे हा निश्चयो पाहीं । नादाधीनाचि लवलाही । अवघे जग ॥२३॥ परी जड पदार्थें वाद्यादि घटे । तथापि मुख्य नाद तो । पिंडीं थाटे । आघवे गीतादि घटे । पिंडींची म्हणोनी ॥२४॥ परी पिंडाची उत्पत्ति । सविस्तर बोलिली संगीतरत्नाकरग्रंथीं । ते यामयां नाहीं निरूपिली ये प्रांतीं । ग्रंथविस्तार भयें ॥२५॥ तथाच शिक्षायाम्:—

आत्माबुद्ध्या समेत्यार्थान्मनो युंक्ते विवक्षया ॥
मनः कायाग्निमाहन्ति स प्रेरयति मारुतम् ॥
मारुतस्तूरसि चरन् मंद्रं जनयते स्वरम् ।

टीका—यथा परमात्मनो नादोत्पत्तिः पुरा प्रोक्ता तथा जीवात्मनोऽपि पिंडविषये आह आत्मेति । स्पष्टमन्यत् ।—

आत्मध्यानं तया नादो मनो विलयकारणे
आत्मध्यानादपि श्रेष्ठं नादं नादविदो विदुः ॥

ओव्या—अध्यात्मध्यान आणि नाद। ही मनोलयाचीं कारणें प्रसिद्ध। अध्यात्मध्यानाहूनि नाद। श्रेष्ठ म्हणती नादवेत्ते ॥२६॥ नादवेत्ते येणें नांवें। वेदान्ताचें मत हे नोहे। परी समन्वय फावे। श्रेष्ठत्व सुलभ म्हणोनी ॥२७॥

आहतोऽनाहतश्चेति द्विधा नादो निगद्यते।
सोऽयं प्रकाशते पिंडे इति रत्नाकरे स्फुटम् ॥

या श्लोकाचे तीन चरण। रत्नाकरांतील श्लोकाचे जाण। अनाहत आहत हे दोन। नाद पिंडीं प्रकाशती ॥२८॥ शरिरीं जो स्वाभाविक। नादे चाले तो अनाहत सुरेख। आणि वचनगीतादिसमयीं जो मुखादिस्थानद्योतक। तो आहत बोलिजे ॥२९॥ केवळसूक्ष्मप्राणनिर्घोषे। अनाहत नाद उपजतु असे। तातहि बोलती ऐसे। भावार्थदीपिकेंत ॥३०॥ स्थूलशरीरमारुतें। नाद उपजे आहते। गीत वचनादि संज्ञेते। पावोनिया ॥३१॥ प्रणवाची अर्धमात्रा। अनाहत बोलिजे तिये पवित्रा। आणि अकारादि तीन मात्रा। आहत नादें उपजती ॥३२॥ सर्वांपरीस श्रेष्ठ ज्ञान। ते न साधतां करावे ध्यान। एवं निर्गुणज्ञानध्यान। भेद पावे ॥३३॥ परंतु ध्यानहि दुस्तर। म्हणोनी अनाहत नाद ऐकणें सुकर। गुरूपदिष्टयोगप्रकार। जाणता कळे ॥३४॥ परी अनाहत नादाच्या ठायीं। रंजकता सर्वथा नाहीं। म्हणोनी गीतादि-आहत नाद श्रेष्ठ पाही। रत्नाकरीं श्लोक ऐसे ॥३५॥

ध्यानमेकाग्रचित्तैकसाध्यं न सुकरं नृणाम्।
तस्मादत्र सुखोपायं श्रीमन्नादमनाहतम् ॥
गुरूपदिष्टमार्गेण मुनयःसमुपासते।
सोऽपि रक्तिविहीनत्वान्न मनोरंजको नृणाम् ॥
तस्मादाहतनादस्य श्रुत्यादिद्वारतोऽखिलम्।
गेयं वितन्वतो लोकरंजनं भवभंजनम् ॥१६७॥ प्र. २ अ. १.

ओव्या– भावार्थ आतांचि बोलिला। कांहीं पाहिजे सांगितला। येथ अनाहत नाहीं बोलिला। रंजक श्लोकीं ॥३६॥ हंसनादाद्युपनिषदीं।

दशनादांची प्रसिद्धि । कोटी अजपाजप झालिया सिद्धि । सांगितली आहे ॥३७॥ त्यांत सातवा वेणुनाद । तो रंजक हे तंव प्रसिद्ध । तथापि दहावा मेघनाद । आत्मदर्शनकारण बोलिला ॥३८॥ नव नादाचा परित्याग करून । मेघ नादीं ठेवावे मन । ऐसें तेथेचि सांगितलें म्हणून । रंजक नाद तो नव्हे ॥३९॥ यद्यपि रंजक तो नाहीं । तथापि भयंकरहि नव्हे कांहीं । शांतरसे लवलाही । उदासीनप्रद ॥४०॥ तो अदृष्टें स्थिर करी मना । जैसा वीरा उल्हाटयंत्रनाद आवडे जाणा । तैसा अभ्यासें योगी जना । हा मेघनादू आवडे ॥४१॥ परी अभ्यासाविण रंजक । अज्ञानाहि सुखदायक । आहतनाद गीतसंज्ञक । श्रुतिस्वरादिरूपजो ॥४२॥ आहतनादें नामस्मरण । सगुणध्यानसहित गायन । देशी तथापि कारण । होय मुक्तीते ॥४३॥ आहत नादाहि द्विविध । रंजकारंजक हे तयाचे भेद । उल्हाटयंत्रादिकांचे नाद । अरंजक बोलिजती ॥४४॥ वीणा मृदंग ताल ध्वनी । घागुरयाची नाचणी । रंजक वाटे जनीं । ठाउके सकळां ॥४५॥ आतां आहत रंजक नादाच्या ठायीं । श्रुतिस्वर हे दोन विभेद पाहीं । यद्यपि प्रत्यभिज्ञाशास्त्रीं स्पंदनेंहि । नाद भेद होती अनंत ॥४६॥ "कंपनात्" येणें सूत्रें । परमात्मा प्राणतंत्रे । नादभेदहि विचित्रे । सांगितले आधी ॥४७॥ म्हणोनी नादाचे भेद पाहीं । रंजक होतील हा नियम नाहीं । यालागीं रंजक तेवढेहि सोयी । वेंचोनि घेतले आचार्योनीं ॥४८॥ म्हणोनी रंजकनादोत्पादक त्या श्रुती । आणि स्वतः जे रंजन करिती । ते स्वर गा म्हणिजेती । शास्त्रव्याख्या हे ॥४९॥ येथ कवणाचें ऐसें मत । रंजकत्व हे अभ्यासाधीन समस्त । तरी ते नास्तिक निश्चित । चुकती झाले ॥५०॥ रंजकत्व अभ्यासाधीन । तरी बालक कां दचके कटीण ऐकून । धुत् धुत् गजाकारण । काय म्हणून आवडे ॥५१॥ कांहीं नादविशिष्टभेदें । मृगसर्पही होती स्तब्धे । आणिक मधुर कठोर शब्दें । प्रसंगीहि होती ॥५२॥ समाजांत गर्दभ श्वान । काय न भुंकती निशिदिन । तरी तयांचा शब्द

रंजक म्हणोन । कोणी घेतला अभ्यासें ॥५३॥ सनयादिकांचे नाद । गोड कां वाटती प्रसिद्ध । श्वानाचा गोड नाहीं नाद । म्हणोनी शिक्षण कोणी दीधले ॥५४॥ जयाचा मृदु आणि मधुर शब्द । तयासी येतां क्रोध । तरी विकट होय तो शब्द । गोड न वाटे ॥५५॥ जयाचा आवाज घोगरा । तो क्रोधींचि दिसे साजरा । विनंति करता श्रोत्रा । परम कटु भासे ॥५६॥ म्हणोनी स्वाभाविक नाद । गणीतें होती नियमबद्ध । तथापि रंजकत्व त्यांत विशद । करणें लागे ॥५७॥ तरी तया नादाचे । सूक्ष्मादि भेद रत्नाकरें सांगितले साचे । तथापि श्रुतिस्वराचे । प्रयोजन येथें ॥५८॥ त्यांतहि देशीसंगीतीं जाण । विशेषें स्वरांचेचि प्रयोजन । तेचि आतां सप्रमाण । सांगू येथें ॥५९॥

नादोऽति सूक्ष्मः सूक्ष्मश्च पुष्टोऽपुष्टश्च कृत्रिमः ॥
इति पंचाभिधां धत्ते पंचस्थानस्थितः क्रमात् ॥ अ १ प्र. ३ श्लो ५

टीका—नाभ्यादिस्थानेष्वाविर्भूतस्य नादस्य क्रमेण व्यपदेशभेदमाह । स्पष्टमेतत् ।

ओव्या—कदंबगोलकन्यायें ध्वन्युत्पत्ति । मानिलीया नियतसंस्थान गणिती । नादांत सांपडे परी तेथ निश्चिती । रंजकत्व मिळेना ॥६०॥ मंत्रशास्त्र आणि गीतशास्त्र । हे दोन्ही बोलिजती नादतंत्र । त्यांत रंजकारंजक प्रकार । नसोनी विशिष्ट परिणामकारक मंत्रु ॥६१॥ पाणी मृदु हात जाय एवढे । परी बळें करी लोहाचे चुराडे । तैसा ध्वनि जरी पातळ पडे । तरी विशेष परिणामें कार्यकारी ॥६२॥ मंत्रात्मकचि दैवते । हें मेरुतंत्रीं बोलिलें उमानाथें । मंत्रोच्चारादृष्टे भेटती दैवते । हाहि पक्ष कवणाचा ॥६३॥ परी मंत्रशास्त्र कांहीं । येथें आम्हा सांगणें नाहीं । तयाचा विचार सर्वही । सुरतरूमाजीं पहावा ॥६४॥ सूक्ष्मादि नादाचें स्वरूप । तेथ श्रुतित्व नुमटे अमुप । नाडी भेद नाही म्हणोनि भिन्नकल्प । श्रुतींचा नोहे ॥६५॥

यालागीं व्यवहारीं तीन । नादाचे भेद घेऊन । श्रुतिस्वराचे निरूपण । तेथेंचि घडे ॥६६॥

तथाच कल्लिनाथः-प्राणनामानं प्राणेति नाम यस्यासौ प्राणनामा तम् । एतेन मंत्रशास्त्रानुसारतो बीजाक्षराणां तत्तद्देवताताद्रूप्यायत्याऽत्र नकारदकारौ प्राणाग्नीइत्युक्तं भवति । विदुर्मांत्रिका इतिशेषः । जातो-विदितोऽभिव्यक्त इति यावत् । उक्तपंचविधनादस्याप्याविशेषेण गीतोपयोगित्वे प्राप्ते हृत्कंठमूर्धस्थानेष्वेव श्रुतिपदनाडीसद्भावात्तत्रत्यस्यैव नादत्रयस्य गीतोपयोगित्वम्। नामान्तराणि स्वरूपभेदो वा। (अ. १ प्र. ३ श्लोक ६ टीका)

हृदय कंठादिस्थानीं । गीतोपयोगी नाद ये प्रमाणी । यद्यपि मंत्रोच्चारणीं मुखहि पडे ॥६७॥ तथापि विशेष रंजकत्वाकडे । मंत्रशास्त्रीं दृष्टी ना पडे। गानशास्त्रीं रोकडे । पाहिजे रंजकत्व ॥६८॥ रंजक आणि मंत्रभरित । ते जाणावे मार्ग संगीत। केवळ रंजक मंत्ररहित। देशीसंगीत म्हणावे॥६९॥ तथापि देशी संगीताच्या ठायीं । भगवद्भावनादीविशेषें मंत्रसमता राही । आतां गीतोपयोगी नाद तोही । त्रिविधबोलिला शार्ङ्गदेवें ॥७०॥ तथा च संगीतरत्नाकरेः—

व्यवहारे त्वसौ त्रेधा हृदि मंद्रोऽभिधीयते ।
कंठे मध्यो मूर्ध्नि तारो द्विगुणश्चोत्तरोत्तरः ॥७॥

टीकाः-व्यवहारेत्विति । व्यवह्रियत इति व्यवहारो तस्मिन् । तुपक्षंव्यावर्तयति । नाभ्यास्वस्थानयोर्नैवमित्यर्थः । द्विगुणश्चोत्तरोत्तर इति । उत्तरोत्तरो मंद्रादुत्तरो मध्यो मध्यादुत्तरस्तार इति यावत् । द्विगुणः गुण उच्चारणप्रयत्नः द्वौगुणौ यस्येति द्विगुणः अयमर्थः । मंद्रस्थानस्थितात् षड्जादिव्यपदेशवतो नादान्मध्यस्थानस्थितः स एव षड्जादिव्यपदेशवान् । ततो द्विगुणप्रयत्नसाध्यत्वाद्द्विगुण इति । पूर्वस्थानस्थितात्क्रमेणाऽऽरोहे सत्यष्टमस्वर इति यावत् । अत्रासाविति । नामसाम्यानिर्देशेऽपि व्यवहारा

नुप्रयोगात्स्वररूपनादाद् द्वैगुण्यं विवक्षितम् । श्रुतिरूपनादाविवक्षायां तु त्रयोविंशः

ओव्या—दश एकादश पंचदश । अनाहत आहत विशेष । परमार्थी अशेष । नाद भेद होती ॥७१॥ तरी व्यवहारीं तयाचे । तीनाचि प्रकार साचे । मंद्र मध्यम तार वाचे । म्हणती मुनी ॥७२॥ हृदयीं निवे तो मंद्रस्वर । कंठीं निघे तो मध्यम स्वर । मूर्ध्नि निघे तो तार स्वर । आणि मुख सकळांचे अभिव्यंजक ॥७३॥ पाणिनीशिक्षेंत वर्णस्थानें सांगतां । म्हटले आहे कीं " उरःकंठशिरस्तथा " । येणेंहि हृदयापासून मंद्रोत्पन्नता । सिद्ध जाहली ॥७४॥ यद्यपि वर्ण नित्य म्हणोन । ध्वनीहूनि तो आहे भिन्न । अकरादि वर्ण स्वर जाण । षड्जादि ते ध्वनि स्वर ॥७५॥ अकारादि वर्ण स्वरांचा । ककारादि वर्ण व्यंजनांचा । पदामाजीं उपयोग साचा । आणि ध्वनीचा उपयोग गीतांत ॥७६॥ नादापासोनी वर्ण शुद्ध । वर्णापासोनी पद । ऐसे जरी रत्नाकरादी प्रसिद्ध । तरी उपवर्शविरोध न साहूं आम्ही ॥७७॥ अथवा ध्वनिसंयुक्तवाणीविषयीं । रत्नाकरादि बोलिले पाही । उक्तगतिचिंतनन्यायें हाहि । विरोध परिहारू ॥७८॥ उक्तस्य गतिश्चिंतनीय इतिन्यायः सज्जनोक्तस्येति नियमः, दुर्जनोक्तं तु परिहरणीयमेव । वायुप्रेरणादि प्रयत्न । होय द्विगुण द्विगुण । म्हणजे मंद्रस्थानांतील षड्जापासोन । द्विगुणप्रयत्नें मध्य षड्ज उपजे ॥७९॥ मांद्रर्षभादिकापासोनी । मध्यर्षभादि येणेंचि मानी । मध्य सप्तकाहूनि द्विगुणी । तारसप्तक प्रयत्नें पावे ॥८०॥ मांद्रसप्तकाहून चतुर्गुण । तैसे विकृतत्व पावे त्रिगुण । एवं एकादि विषमगुण । ओळखावे ॥८१॥ दीर्घ ऱ्हस्व प्लुतादिक । स्वरांचे भेद हे कालिक । उदात्त अनुदात्त स्वरितादिक । स्वरांचे भेद श्रुतिजन्य ॥८२॥ उदात्त षड्जस्वर ऐसा । वेदसाचि वरी अंक आपैसा । परी तेथ विवादी ठसा । उपजूं नये ॥८३॥

म्हणोनी कथाणिया स्वरा । उदात्त अनुदात्त बोलिजे पुरा । षड्ज अनुगत करूनी मात्रा । उदात्ताची व्याप्ती हें पुढें सांगूं ॥८४॥ परी आधीं श्रुति । निरूपी यथा निगुती । तियाची मार्गसंगीतीं । विशेषोपयोगू ॥८५॥ देशी संगीतीं विशेष कांहीं । श्रुतीचा सत्य उपयोग नाहीं । हे हनुमन्मतान्वयें सर्वही । पूर्व विलासीं बोलिले मियां ॥८६॥ आणि विष्णुधर्मोत्तरपुराणीं । स्वर सातचि सांगितलें श्रुतिवांचोनी । तथापि मार्ग अनुगमावा लक्ष्याध्वनीं । सांगू म्हणूनी श्रुति येथ ॥८७॥ यद्यपि श्रुतींचा कांहीं । देशी संगीतीं विशेषु नाहीं । मार्ग संगीताच्या ठायीं । वैधस्वरास्तव श्रुतिमहिमा ॥८८॥ तथापि देशीसंगीतोपयोगी । प्राचीन प्रमाण पाहिजे जगीं । म्हणोनी ते संगीतरंगीं । आश्रवू येथ ॥८९॥ ऋषींचा मतभेद सांपडे । तरी घेयावा जो आपणा आवडे । यद्यपि वेदोक्तचि बरवा घडे । धर्मांत धेणें ॥९०॥ जैसे सांख्यपतंजली सोडावे । आणि वेदसाधक म्हणोनी व्यासवचनचि जोडावे । परी श्रौत वेदान्तासाठींच बरवें । निरूपिले हें ॥९१॥ ब्रह्मसूत्रींच स्मार्तगति । दाक्षिणायनमृता धूममार्गरीति । सांगितली तेथ ते स्थिति । खंडिली नाहीं सूत्रभाष्यकारीं ॥९२॥ तैसें दृष्टफलप्रधान देशी संगीत । रंजक म्हणोनी येथ । आवडेल त्या ऋषीचें मत । घेतां येईल आपणातें ॥९३॥ तरी श्रुतीविषयीं ऋषींचीं मतें । मतंगें बोलिली समस्ते । ती रत्नाकरटीकेंत कल्लिनाथें । सांगितलीं आहाती ॥९४॥ ते टीका दाखवुनी आधीं । मग निवडूं मत संवादी । श्रोतीं सावधान बुद्धि । ठेवुनी असावे ॥९५॥ येथ लक्ष्यसंगीतकारें । आगळिक केली तोंडाभरें । कीं ते अनार्य-वीर्यानुकारें । दिसतु आहे ॥९६॥ तयाचे म्हणणें ऐसे जनीं । तंतुदैर्घ्यादिकें करूनी । पूर्वाचार्यीं श्रुति मोजुनी । दाविल्या नाहींत कीं ॥९७॥ तरी विमानादिक जे पुराणीं । वर्णिले आहेत मुनीनीं । तयाचे लक्षण दिधले नाही म्हणोनी । तेहि अप्रमाण होतील ॥९८॥ आणि लक्ष्यसंगीतांत तरी । कोठें योग्य आहे रागाची कुसरी । प्रमाद झाले नानापरी । तरी ते जनीं

कां सहावे ॥९९॥ अनुक्त व्यवस्था कराया कारण । आम्हा ग्रंथेंचि आज्ञापिले म्हणून । कोणी आतां दाखवितां श्रुति मोजून । तरी काय चुके ॥१००॥ लक्ष्यसंगीतकाराचा डाव । कीं आपुले लपवुनी नांव । ग्रंथांचें प्रामाण्य अपूर्व । चालवे हा आहे ॥१०१॥ परी ऋषींस शिव्या दिधल्या जेणें । तयाचे कोण मानेल बोलणें । जो आपल्या बापास जारिणीचा म्हणे । तो काय शुद्ध होईल ॥१०२॥ वंशस्थें पितृकुल नांवा चढविजे । तरीच त्या कुळीचे म्हणिजे । स्वपितया शिव्या देउनी स्वकीर्ति वाणीजे । हें तो अशुद्धबीजफळ ॥१०३॥ हा म्हणे ऋषींनीं ऐकूनि लिहिले । तरी लक्ष्यसंगीत काय गर्भांतूनि काढिले । सकळ रीति मोडुनि आपलेसे केले । तरी ते कोण मानी ॥१०४॥ जयाची अति प्रसिद्धि असते । ते लिहित नाहींत ग्रंथकर्ते । म्हणोनिच श्रुतिमान येथें । अतिप्रसंगें लिहिले नाहीं ॥१०५॥ वैद्यकग्रंथीं पाकशास्त्र आहे । तेथ तरी कर्तृयुक्ति बोलिली पाहे । आणि या गुरुंडदग्धमातृवरा तरी लाहे । गुरुंडीं मार्जी सर्व लेख कोठें ॥१०६॥ लक्ष्यसंगीतकाराचे म्हणणें । श्रद्धा ठेवो नये सकळाकारणें । परी आपुल्या स्वरावरी तेणें । श्रद्धा ठेवाया सांगितली ॥१०७॥ लक्ष्य संगीतकाराची जिभली । इतिहास सांगत नाहींत म्हणुनी प्राचीननिंदे धावली । परी स्वनाम भायबापें लपविली । काय म्हणुनी कळेना ॥१०८॥ पुढें तयाचें खंडन । स्थळीं स्थळीं येईल म्हणोन । आतांचि सर्व शिव्या देऊन । संपवित नाही ॥१०९॥ श्रुति म्हणजे श्रवण योग्य नादु । परी तो गीतोपयोगी असावा सिध्दु । श्रवणयोग्य उल्हाटयंत्रनादु । परी गीतोपयोगी नव्हे ॥११०॥ म्हणवोनी माझे श्रुतीचे लक्षण । ऐसें मनीं धरोत सज्जन । कीं गीतोपयोगीस्वरस्वरूपयोग्यतावच्छिन्न नाद श्रुति म्हणोन । वाखाणिजे ॥१११॥ उल्हाटयंत्रनादाचें ठायीं । स्वरस्वरूप योग्यता नाहीं । एवंश्रुतिस्वरभेदपक्षीं पाही । विषयो ऐसा ॥११२॥ आतां श्रुतिस्वर भिन्न । तैसे तें अभिन्न । ऐसे पक्ष दोन । असतीं जगीं ॥११३॥

परी येथ माझिया मनीं । श्रुतिस्वराभिन्नपक्ष समंजस देशी संगीतीं । श्रुतिस्वरभिन्नपक्षमार्गसंगीतीं । विशेष होय ॥११४॥ म्हणवोनी आधीं श्रुतिविषयीं मतें । सांगूं मतंगमुनिदर्शितें । जीं निरुपिली काल्लिनाथें । रत्नाकरटीकेमाजीं ॥११५॥ मग त्यांतूनि जे योग्य मत । जेणें पोखेळ देशी संगीत । तें सांगू यथार्थ । मतंगमतान्वयें ॥११६॥

"एवं कृते तास्तन्त्र्योऽधराधरास्तीव्रा उच्चोच्चध्वनयो भवन्ति । यथा शरीरे श्रुतय उत्तरोत्तरोच्चा उत्पद्यन्ते तथा वीणायामधरोच्चाउत्पद्यन्त इति स्वारस्यम् । तज्जस्तासुतन्त्रीष्वाहत्योत्पन्नो नादः श्रुतिरिति मतः । अत्र श्रुतिशब्द निरुक्तिपूर्वकं श्रुत्येकत्वादिविषयविकल्पे मतङ्गो मतभेदानदर्शयत् । तद्यथा--

'श्रवणार्थस्य धातोः क्तिप्रत्यये च सुसंश्रिते ।
श्रुतिशब्दः प्रसाध्योऽयं शब्दज्ञैः कर्मसाधनैः' ॥

श्रूयन्त इति श्रुतयः । सा चैकाऽनेका वा एकैवश्रुतिरिति । तद्यथातत्रादौ तावदिहाऽऽकाशपवनसंयोगात्पुरुषप्रयत्नप्रेरितो ध्वनिर्नाभिरूर्ध्वमाकाशदेशमाक्रामतधू (मन्धूः?) मवत्सोपानपदावस्थानं पवनेच्छयाऽऽरोहन्नन्तर्भूतपूरण प्रत्ययार्थतया चतुःश्रुत्यादिभेदभिन्नः प्रतिभासत इति मामकीयं मतम् । चतुर्थ (?) श्रुत्यादिभेद भिन्न इत्यर्थः । अन्ये तु पुनर्द्विप्रकारांश्रुतिं मन्यन्ते । कथं स्वरान्तर्विभागान् । तथा चाह विश्वावसुः—

'श्रवणेन्द्रियग्राह्यत्वाद् ध्वनिरेव श्रुतिर्भवेत् ।
सा चैका द्विविधा ज्ञेया स्वरान्तरविभागतः ॥
नियतश्रुतिसंस्थानाद्गीयते सप्तगीतिषु ।
तस्मात्स्वरगता ज्ञेयाः श्रुतयः श्रुतिवेदिभिः' ॥
शुद्धस्वररूपेत्यर्थः ।

'अन्तरस्वरवर्तिन्यो ह्यन्तरश्रुतयो मताः'।
विकृतस्वररूपेत्यर्थः। प्रयोगबहुत्वापेक्षया श्रुतय इति बहुवचननिर्देशः।

'एतासामपि वैस्वर्यं क्रियाकालविभागतः'

केचित्स्थानत्रये योगात् त्रिविधां श्रुतिं मन्वते। अन्ये त्विन्द्रियवैगुण्यात् त्रिविधां श्रुतिं मन्यन्ते। इन्द्रियवैगुण्यं च त्रिविधम्। सहजं दोषजमभिघातजं चेति। अत्रेन्द्रियं मनः। तत्र सत्वगुणयुक्तं सहजम्। रजस्तमोयुक्तं दोषजम्। आम्लादिरसोपहतमभिघातजमित्यर्थः। अपरे तु वातपित्तकफसंनिपातभेदभिन्नां चतुर्विधां श्रुतिं प्रतिपेदिरे। तथा चाह तुम्बरुः—

'उच्चैस्तरो ध्वनी रूक्षो विज्ञेयो वातजो बुधैः।
गम्भीरो घनलीनस्तु ज्ञेयोऽसौ पित्तजो बुधैः॥
स्निग्धश्च सुकुमारश्च मधुरः कफजो ध्वनिः।
त्रयाणां गुणसंयुक्तो विज्ञेयः संनिपातजः'॥

एते तु शब्दभेदत्वेन वक्ष्यन्ते। अपरे तु वेणादयो मुनयो नवविधां श्रुतिं मन्यन्ते। तथा हि—

'द्विश्रुतिस्त्रिश्रुतिश्चैव चतुःश्रुतिक एव च।
स्वरप्रयोगः कर्तव्यो वंशच्छिद्रगतो बुधैः'॥
भरतेनाप्युक्तम—

'द्विकत्रिकश्चतुष्कास्तु ज्ञेया वंशगताः स्वराः।
कम्पमानार्धमुक्ताश्च व्यक्तमुक्ताङ्गुलिस्वराः॥'

इति तावन्मया प्रोक्ताः समीच्य श्रुतयो नव इति॥ एतानि षण्मतानि स्वरश्रुत्योरभेदमङ्गीकृत्य प्रवर्तितानीति मन्तव्यम्। तानि त्वभिव्यङ्ग्याभिव्यञ्जकत्वाभ्यां साक्षाद्भिन्नरूपायाः (पयोः) स्वरश्रुत्योर्भेदापह्नवान्न

समीचीनानि । अत्र केचिन्मीमांसाधिमांसलितधियो धीरा द्वाविंशतिं श्रुतीर्मन्यन्ते । केचन पुनः षट्षष्टिभेदभिन्नाः श्रुतय इति वदन्ति । अन्ये पुनरानन्त्यं वर्णयन्ति श्रुतीनाम् । तथा चाह कोहलः—

'द्वाविंशतिं केचिदुदाहरन्ति श्रुतीः श्रुतिज्ञानविचारदक्षाः

षट्षष्टिभिन्नाः खलु केचिदासामानन्त्यमेव प्रतिपादयन्ति' इति ।

तत्र- 'आनन्त्यं हि श्रुतीनां च सूचयन्ति विपश्चितः ।
यथा ध्वनिविशेषाणाममानं गगनोदरे ॥
उत्तालपवनोद्वेल्लज्जलराशिसमुद्भवाः ।
इयत्तयः प्रतिपद्यन्ते न तरङ्गपरम्पराः' ॥

इति श्रुतीनामानन्त्यं दर्शितमिति । अस्मिन् पक्षे रणनानुरणनात्मकयोः श्रुतिस्वरयोर्भेदाङ्गीकारेऽप्यनुरणनरूपाणामपि ध्वनीनां श्रुतित्वमभिप्रायोभयेषामपि वीचीतरङ्गन्यायेनोत्पद्यमानानां तेषामतिसूक्ष्मभागकल्पनया प्रतिध्वन्यवयवभूतध्वनिबहुत्वविवक्षयाऽऽनन्त्यं दर्शितम् । तदनुपपन्नमिति मन्तव्यम् । यद्यपि श्रवणयोग्यस्य ध्वनेरिन्द्रियग्राह्यत्वाक्षिप्तसावयवत्वेन त्रसरेणुवदवयवाः सन्तु तथापि तेषां श्रोत्रप्रत्यक्षमूलेनानुमानेनार्थापत्त्या वान्यतरेणैव त्रसरेणुगतपरमाणुवद्गम्यतया श्रोत्रग्राह्यत्वाभावात् । स्वतः स्वराभिव्यक्तिहेतुत्वाभावेनाश्रुतित्वादिति । द्वाविंशति श्रुतिपक्षे षट्षष्टिश्रुतिपक्षे च यद्यपि श्रुतिस्वरयोर्भेदाङ्गीकारः समान एव तथापि द्वाविंशतिश्रुतिपक्षे द्वाविंशतिः श्रुतय एव मन्द्रस्थाः स्थानान्तरयोरपि द्विगुणाद्विगुणत्वेनाऽऽवर्त्यन्त इति । षट्षष्टिश्रुतिपक्षे तु तावत्य एव श्रुतयः स्थानत्रयेऽप्यनावृत्ताः परस्परं भिन्ना इति च वैषम्यम् । तत्रानावृत्तिपक्षस्वीकारे षड्जादीनामपि स्वराणामावृत्त्यभावान्मध्यतारस्थाश्चतुर्दशस्वराः पृथग्व्यपदेशभाजो भवेयुः । नैव तथा व्यवहारः । अत एव मतङ्गादिदर्शितेषु नवसु पक्षेषु द्वाविंशति श्रुतिपक्षमेव रणनानुरणनात्मना साक्षादनुभूयमानश्रुतिस्वरभेदानपह्नवेनाऽऽवृत्त्या

समानामेव स्वराणां गुणभिन्नानां व्यवहारोपयोगित्वसिद्धेश्च सारतमं निश्चित्य निःशंको वीणयोर्निदर्शितानां तासां द्वाविंशति श्रुतीनां मध्ये चतुर्थीप्रभृतिषु शास्त्रानुसारेण पूर्वोत्तरावधिप्रदर्शनपूर्वकं षड्जादिसप्तस्वरस्थापनं विदधाति वीणाद्वय इत्यादिना। चतुःश्रुतिरिति। स्वाभिव्यक्तिकरणत्वेन चतस्रः श्रुतयो यस्येति स तथोक्तः। एवं त्रिश्रुतिरित्यादौ द्रष्टव्यम् ॥१३-१६॥"

(संगीतरत्नाकर स्वराध्याय श्लोक १३-१६ वरील कल्लिनाथ टीका).

येथ पूर्वमीमांसामतें। श्रुति म्हणती निरपेक्षोपरवाते। आणि तैसे वेदांते। श्रुति म्हणती ॥११७॥ तिया दोन्ही श्रुतींच्या ठायीं। अतिव्याप्ति न व्हावी कांहीं। म्हणोनी गांधर्व परिभाषा हीं। श्रुति सांगूं ॥११८॥ श्रु धातूचा अर्थ ऐकणें। तया 'क्ति' प्रत्यय लावोनी नामकरणें। म्हणोनी ऐकू ये जो श्रवण। तो नाद श्रुति म्हणिजे ॥११९॥ यद्यपि वीचितरंगन्यायें। शब्द स्वभावें अवयवी होये। शब्दाचे परमाणु उपाये। अनुमितौ येती ॥१२०॥ तथापि प्रत्यक्षश्रवणयोग्यता। नाहीं शब्दावयवभूता। म्हणोनी अवयवानंता। न म्हणिजे श्रुति ॥१२१॥ ऐसेहि एक म्हणती। आतां श्रवणयोग्य या पदाची रीती। श्रुतिकटुत्वनादीं अति व्याप्ति। निवारितु ॥१२२॥ उल्हाटयंत्रादिकांचे नाद। ते श्रुतिकटु बोलिजती प्रसिद्ध। ते श्रवणासी अयोग्य म्हणोनी श्रुतिशब्द। वाचक नोहे तयाचा ॥१२३॥ यालागीं गीतस्वरस्वरूपयोग्यतावच्छिन्न। आम्ही जें केलें श्रुतीचें लक्षण। ते मतंगमतासहि जाण। विरोधी नाहीं ॥१२४॥ असो एवं साधोनी व्युत्पत्ति। व्याकरणें साधिला शब्द श्रुति। येणेंचि लक्षणनिरुक्ति। झाली आली ॥१२५॥ शब्दलक्षणाच्या ठायीं। निरुक्तीवांचूनि मार्ग नाहीं। आतां सप्रकारहि। निरूपण सांगूं ॥१२६॥ ती श्रुति एक कीं अनेक। ऐसा संदेह स्वाभाविक। दोन्ही पक्षीं नैष्ठिक। दिसती मतें ॥१२७॥ दृष्टि-सृष्टिवादें पाहतां। भासे तो नोहे अन्यथा। म्हणवोनी ब्रह्मावांचोनी इतर

पदार्थी । उचित मतभेदु ॥१२८॥ निद्राकल्पित स्वप्नाचें ठायीं । रज्जु देखिलिया कहीं । विवाद माजला तियेठायीं । आपसांतचि ॥१२९॥ एक म्हणती हा द्विखंड । एक म्हणती एक खंड । एक म्हणती अनेक खंड । रज्जु असे हा ॥१३०॥ जैसे स्वप्न तैसा बाद । तितुके रज्जूचे भेदाभेद । मायाकल्पित पदार्थ अशुद्ध । नानामतें नाना होती ॥१३१॥ कोणी मृगजलासी म्हणें समुद्र । कोणी म्हणे गंगेचा पूर । कोणी म्हणे मेघडंबर । परी तिघेही भ्रांतिष्ठ ॥१३२॥ तिघामध्यें उत्तम कोण । हें सिद्ध करणें व्यर्थ प्रयत्न । तिघेही भ्रांतिवश म्हणोन । जे बोलती ते बोलोत सुखें ॥१३३॥ तैसें परब्रह्म न जाणतां । मायामार्गी चावळता । अनेक आभास होती वृथा । मग मतभिन्नता त्यावरी ॥१३४॥ एक जगाचें अनंत भाग । करोनी परमाणु म्हणे चांग । जगाचे एक जगाचे दोन भाग । करोनी प्रकृति पुरुष सांगे ॥१३५॥ जगाचे पांच भाग करोनी एक । भूतवाद सांगे नास्तिक । एवं आपुलाले मतें समस्त । विभाग सांगती अज्ञाने ॥१४०॥ तैसे शब्द एक कीं अनेक । मतभेदहि भ्रमद्योतक । परब्रह्माविणें सकळिक । भ्रांतिबद्ध ॥१४१॥ म्हणोनी एक चांगला एक खोटा । ऐसें म्हणो नये चोहटा । भलत्या मार्गे ईश्वर वाटा । मता आणिजे ॥१४२॥ याचि वेदान्त-ज्ञानेंकरुनी । परमता साहत होते मुनि । जैसें भांडण जुंपता स्वप्नीं । मरण जनन दोन्ही मिथ्या ॥१४३॥ कां भानुमतीचा खेळ । व्याघ्र भांडोनी मरती सकळ । तेथ कौतुक वाटे केवळ । देखतियाते ॥१४४॥ तैसे एक अथवा अनेक । विश्व साक्षिभास्य सकळिक । या लागीं मतभेद सुरेख । भूषणचि आहे ॥१४५॥ आतां तिया मतभेतांतून । साधका उचित तो घ्यावा निवडुन । जेणें उगे राहे शिशूचें रोदन । तो मिथ्या उपाय रचावा ॥१४६॥ म्हणवोनी श्रुतिसिद्ध मुनी । मतभेद सांगती प्रसंगेंकरूनी । त्यांत आपुले मत प्रथमस्थानीं । मतंगमुनी वर्णितु ॥१४७॥ एकाचि असे श्रुति । नाभी पासोनी आकाशवायुसंगतीं । जो नादउत्पन्न होय निश्चिती । तो श्रुति

म्हणावा ॥१४८॥ तो सर्वथा एकचि आहे । परी चार श्रुति तीन श्रुति ऐसा भास मात्र होय । हा माझा स्वपक्ष होय । मतंग म्हणे ॥१४९॥ इया मतंग मुनींच्या मता । मीहि मान्य करी सर्वथा । एक नादचि अनेकावस्था । पावतु असे ॥१५०॥ म्हणोनी लक्ष्यसंगीतकारें मूर्खें । आपुलिया शिष्याच्या हस्तकें । प्रश्न करविला आपणा विशेखे । सर्वज्ञ मानोनी ॥१५१॥ कीं षड्ज स्वराची उत्पत्ति । प्रथम श्रुतीच्या ठायीं निश्चिती । हा प्रकार ऋषीप्रती । ठाउक होता कीं नाहीं ॥१५२॥ तरी हा उद्धट प्रश्न । एक श्रुतिचि जेथ प्रमाण । तेथ श्रुति आणि स्वर अभिन्न । सहजचि झाले ॥१५३॥ मग प्रथम श्रुतीवरी षड्ज म्हणतां । तरी बाध काय येतो चित्ता । परी या लक्ष्यसंगीतकारा तत्वता । मीचि विचारिते ॥१५४॥ श्रुतिगण तूतें मान्य नाहीं । मग प्रथम श्रुति तरी कल्पिली कायी । उगाचि वाक्‌दंभ करोनी लवलाही । सर्वज्ञता कां दाविली ॥१५५॥ चतुःश्रुत्यादि भेद । एकाचि श्रुतीचे होती प्रसिद्ध । करता येती विशद । आपुलाल्या मत्यन्वयें ॥१५६॥ परी ते आघवे औपाधिक । त्याची उदाहरणें कांहीं एक । सांगू गा निष्कलंक । उमजे जेणें ॥१५७॥ वायुनिमित्तक खगुण शब्द । तरी तो बोलिजे एकाचि नाद । कोणी नाडी उपाधि घेऊनि विशद । बावीस श्रुति त्यास म्हणती ॥१५८॥ कोणी शब्दाची प्रकृति-विकृति । उपाधि घेऊनिया निश्चिती । दोनचि सांगती श्रुति । निज मताने ॥१५९॥ कोणी त्रिदोष उपाधि घेवोन । चार श्रुति सांगती आपण । ऐसेचि मतें ओळखून । घेयावे सज्जनीं ॥१६०॥ म्हणोनि हा एकश्रुतिवाद । देशी संगीतीं उपयोगी शुद्ध । बारा स्वर बारा श्रुति प्रसिद्ध । याचा आभास म्हणता दोष न ये ॥१६१॥ आतां कांहीं ऋषी पुढती । दोन श्रुति मानिती । तयांचें मतहि यथामती । अनुवादूं ऐका ॥१६२॥

"श्रवणेंद्रियग्राह्यत्वात् ध्वनिरेव श्रुतिर्भवेत्" ।

तेथ विश्वावसु गंधर्वाचार्य । जे बोलिले तें प्रमाण होय । श्रवणेंद्रियकरोनी

ग्राह्य । ती श्रुति म्हणावी ॥१६३॥ ते एकचि परी द्विधा भासे । मूळीं " साचैका " हें पद असे । या वरूनि ऐसे दिसे । कीं मूळ मतंगमत प्रमाण येथ ॥१६४॥ मतंगमताची एक श्रुति । घेवोनि प्रकार सांगितले विश्वावसुमतीं । स्वर आणि अंतर श्रुति । ऐसे दोन ॥१६५॥ शुद्ध स्वर म्हणजे स्वरश्रुति । विकृतस्वर म्हणजे अंतर श्रुति । येणेंचि गाइल्या जाती । गीति सप्त ॥१६६॥ बहुप्रयोग करणें म्हणोन । मूळीं घातले आहे बहुवचन । परी मुख्यत: श्रुति दोन । स्वरांतर स्वरूपें ॥१६७॥ येथ एक उपजे विवाद । कोणते स्वर विकृत कोणते स्वर शुद्ध । दाक्षिणोत्तर आर्यरीतिभेद । दिसतु आहे ॥१६८॥ षड्ज पंचम दोन्ही । दोहींकडे सारख्या स्थानीं । शुद्ध म्हणती निर्वाणीं । दोघेहि तया ॥१६९॥ तैसा कोमल मध्यम । दोन्हीकडे सारखा शुद्ध म । आतां दक्षिणेकडे जो शुद्ध रि परम । तो उत्तरेकडचा कोमल ऋषभ ॥१७०॥ दक्षिणेकडे जो शुद्ध धैवत । तो उत्तरेकडचा कोमल धैवत । दाक्षिणेकडे साधारण गांधार ख्यात । कोमल गांधार तो उत्तरेचा ॥१७१॥ दाक्षिणेकडे अंतर गांधार । तो उत्तरेचा तीव्र गांधार । दक्षिणेचा कैशिकी निषाद सुंदर । तो कोमल निषाद उत्तरेचा ॥१७२॥ दक्षिणेचा काकली निषाद । तो उत्तरेचा तीव्र निषाद । सानुनासिक उच्चारता विषद । काकली म्हणिजे ॥१७३॥ दक्षिणेकडे कांहीं ग्रंथांत । वराळी मध्यम म्हटले निश्चित । तिकडेचि कांहीं ग्रंथांत । मृदु पंचम म्हटले असे ॥१७४॥ उत्तरेस यातें निश्चिती । तीव्र मध्यम ऐसे म्हणती । प्रतिमध्यमहि म्हणती । कांहीं दक्षिणेकडील ग्रंथ ॥१७५॥

रागविबोध

यद्यपि देशीरागा देशे देशेऽन्यवेलाख्याः ॥५॥
पूर्णौडवखाडवता स्वंशन्यासग्रहेषु चानियताः ।
तदपि ग्रहादिपूर्णत्वादि च बहुमतजमनुसृत्य ॥६॥
मेळे प्रसंगत इहोद्दिष्टानां लक्षणं ससंक्षेपम् ।
तेषां पूर्वं वक्ष्यामि गानवेलामभायुक्तम् ॥७॥

स्वरमेलकलानिधि

ननु रत्नाकरे शार्ङ्गदेवेन विकृताः स्वराः ।
द्वादशोक्ताः कथं तेतु सप्तैव कथितास्त्वया ॥
सत्यं लक्षणतो भेदो द्वादशानामपीष्यते ।
शुद्धेभ्यस्तत्र भेदस्तु सप्तानामेव लक्षितः ॥
आधारश्रुतिसंत्यागात् ध्वनिभेदः प्रकीर्तितः ।
पंचानां परिशिष्टानां स्वराणां विकृतात्मनाम् ॥
पूर्वस्वरश्रुतिग्राहाद्वा पूर्वश्रुतिवर्जनात् ।
अतिलक्षणतो भेदे पूर्वोक्तस्वरसंहतेः ॥
आधारश्रुतिनिष्ठत्वाल्लक्ष्यभेदो न विद्यते ।

उत्तरेकडील शुद्ध ऋषभ । तया दक्षिणेकडे शुद्ध गांधार म्हणती स्वयंभ । शुद्ध धैवत उत्तरेकडे सुशोभ । दक्षिणेकडे शुद्ध निषाद तो ॥१७६॥ आतां चतुर्दंडीप्रकाशिकादि ग्रंथांतून । विशेष संज्ञा सांगूं कथन । उत्तरेकडे जो शुद्ध रि पूर्ण । तो चतुर्दंडीप्रकाशिका ग्रंथीं पंच-श्रुतिक म्हटला ॥१७७॥ उत्तरेकडे जो शुद्ध धैवत । तो पंच श्रुतिक धैवत । चतुर्दंडीप्रकाशिका ग्रंथांत । दक्षिणेकडे म्हटला आहे ॥१७८॥ पुनरुक्ति जरी जाहली । तरी ग्रंथगतस्वरसंख्या पाहिजे निरूपिली । याजागीं रत्नाकराची बोली । सांगू आधीं ॥१७९॥ शुद्ध षड्ज सगळीकडे । समानाचि दिसे पाहतां फुडे । रत्नाकरांताहि रोकडे । अच्युत षड्ज दुसरें हें नांव ॥१८०॥ कोमल ऋषभ षड्जामधीं । कोमलतर कोमलतम ऋषभाची मांदी । रत्नाकरीं चिन्ह भेदी । दर्शविली आहे ॥१८१॥ उत्तरेकडचा कोमल ऋषभ । जो दक्षिणेकडे शुद्ध ऋषभ । रत्नाकरांत विकृत ऋषभ । हेंहि नांव तयाते ॥१८२॥ उत्तरेचा शुद्ध ऋषभ । रत्नाकरांत शुद्ध गांधार स्वयंभ । आतां उत्तरेचा कोमल गांधार सुशोभ । तो साधारण गांधार रत्नाकराचा ॥१८३॥ उत्तरेच्या शुद्ध ऋषभ कोमल

ऋषभामधीं । दृढ कोमल ऋषभाची मांदी । रत्नाकरीं चिन्हभेदीं । निरूपिली आहे ॥१८४॥ आतां उत्तरेचा तीव्र गांधार । तो रत्नाकरोक्त अंतर गांधार । दक्षिण पंडितमुखें समग्र । प्रमा ये याची ॥१८५॥ तीव्र गांधाराचे वरती । शुद्ध मध्यमाच्या खालती । च्युत मध्यम स्वर निश्चिती । एक नांदे ॥१८६॥ तो आतां कोणी गात नाहीं । परी गातां येईल लवलाही । प्रचार केलिया ठायीं । सुखाचि पडे ॥१८७॥ जों उत्तरेकडे शुद्ध मध्यम । आणि आतांचि ज्या म्हणती कोमल मध्यम । तया रत्नाकरांत शुद्ध मध्यम । आणि अच्युत मध्यमहि म्हटले ॥१८८॥ आतां उत्तरेकडे जो तीव्र मध्यम । तया रत्नाकरांत विकृत पंचम । आणि कैशिक पंचम । म्हटले आहे ॥१८९॥ आतां उत्तरेचा जो शुद्ध पंचम । तो रत्नाकराचा शुद्ध पंचम । कोमल धैवत उत्तरेचा परम । रत्नाकराचा शुद्ध आणि विकृत धैवत तो ॥१९०॥ शुद्ध पंचम आणि कोमल धैवताचे-मधीं । कोमलतर कोमलतम धैवताची मांदी । रत्नाकरीं चिन्हभेदीं । दर्शविली मात्र ॥१९१॥ उत्तरेचा शुद्ध धैवत । तया निषाद म्हणती रत्नाकरांत । कोमल धैवत आणि शुद्ध धैवत मध्यें दृढ कोमल धैवत । एक आहे ॥१९२॥ तो रत्नाकरीं चिन्हिला । परी अद्यापि न जाय गायिला । रत्नाकरोक्त बहु विकृत चिन्हित स्वरांचा झाला । प्रकार ऐसाचि ॥१९३॥ उत्तरेकडे जो कोमल निषाद । रत्नाकरांत तो कैशिक निषाद । उत्तरेकडे तीव्र निषाद । काकली निषाद रत्नाकरीं ॥१९४॥ काकली निषादाच्या-वरुती । शुद्ध षड्जाचे खालती । च्युत षड्ज एक म्हणती । रत्नाकरकार ॥१९५॥ यद्यपि रत्नाकराचे विकृत स्वर । बारा असती मनरिकर । सात शुद्ध मिळोनी साचार । एकोणीस होती ॥१९६॥ तथापि याचे समाधान । स्वरमेलकलानिधींत सांगितले रामामात्यानें । तेचि श्लोक प्रमाण । घेऊं येथे ॥१९७॥

ननु रत्नाकरे शार्ङ्गदेवेन विकृताः स्वराः
द्वादशोक्ताः कथं ते। सत्यैव कथितास्त्वया
( स्वरमेलकलानिधि पान ११ )

एवं रत्नाकराचा स्वरनिर्णय । सांगितला हा होय । आतां स्वरसंज्ञानिर्णय । कलानिधीचा पैं सांगूं ॥१९८॥ उत्तरेकडे शुध्द षड्ज । कलानिधीचा तो शुध्द षड्ज । उत्तरेचा कोमल ऋषभ सज्ज । शुद्ध ऋषभ कलानिधीचा ॥१९९॥ उत्तरेकडचा शुद्ध ऋषभ । उत्तरेसचि जया म्हणती तीव्र ऋषभ । शुद्ध गांधार आणि पंचश्रुतिक ऋषभ । कलानिधींत म्हटलें तया ॥२००॥ उत्तरेचा कोमल गांधार । तया षड्श्रुतिक ऋषभ आणि साधारण गांधार । ही दोन नावें सुंदर । स्वर मेलकलानिधीमाजीं ॥२०१॥ उत्तरेचा शुद्ध गांधार । जया उत्तरीयाचि म्हणती तीव्र गांधार । कलानिधींत अंतर गांधार । म्हटलें तया ॥२०२॥ कोमल मध्यम आणि तीव्र गांधार । यामध्यें एक विकृत स्वर । आतां गात नाहींत ऐसा च्युत मध्यम गांधार । कलानिधींत बोलिला ॥२०३॥ उत्तरेचा शुद्ध मध्यम । जया उत्तरीयाचि म्हणती कोमल मध्यम । तो कलानिधिकारें शुद्ध मध्यम । म्हणोनी म्हटला ॥२०४॥ आतां उत्तरेचा तीव्र मध्यम । तो कलानिधींतील च्युत पंचम मध्यम । उत्तरेचा शुध्द पंचम । कलानिधींत तेचि नांव ॥२०५॥ उत्तरेचा कोमल धैवत । तोचि कलानिधीचा शुद्ध धैवत । उत्तरीय म्हणती ज्या शुद्ध अथवा तीव्र धैवत । तया कलानिधीकार पंचश्रुतिक धैवत आणि शुद्ध निषाद म्हणे ॥२०६॥ उत्तरेचा कोमल निषाद । तोचि कलानिधीचा कैशिक निषाद । आणि षट्श्रुतिक ध । कलानिधिकार म्हणे ॥२०७॥ उत्तरीय म्हणती शुद्ध निषाद किंवा तीव्र निषाद । कलानिधीचा तो काकली निषाद । शुद्ध षड्ज आणि काकली निषाद । या दोहोंमध्यें च्युत षड्ज निषाद स्वरकलानिधीचा ॥२०८॥ एवं कलानिधीच्या स्वरसंज्ञा समस्त । सांगितल्या यथार्थ । ज्या रत्नाकरासी अनुगत । भासतु

आहाती ॥२०९॥ आतां सोमनाथें रागविबोधांत । ज्या स्वरसंज्ञा सांगितल्या स्वानुगत । त्याही ऐकोत समस्त । सज्जन श्रोते ॥२१०॥ रागविबोध आणि उत्तरेकडे । शुद्ध षड्ज संज्ञा सारखी पडे । कोमल ऋषभ जो उत्तरेकडे । शुद्ध ऋषभ तो रागविबोधीं ॥२११॥ उत्तरेकडचा शुद्ध ऋषभ । तो रागविबोधीं तीव्रतर ऋषभ । शुद्ध गांधारहि यथा लाभ । सोमनाथ म्हणे ॥२१२॥ उत्तरेच्या तीव्र कोमल ऋषभांत । एक तीव्र ऋषभ सांगे सोमनाथ । तो कोणीच नाहीं गात । आतां येवेळीं ॥२१३॥ उत्तरेचा कोमल गांधार । तो रागविबोधीचा तीव्रतम ऋषभ आणि साधारण गांधार । उत्तरेस म्हणती ज्या तीव्र किंवा शुद्ध गांधार । तो आंतर गांधार रागविबोधीचा ॥२१४॥ उत्तरेचा शुद्ध वा कोमल मध्यम । रागविबोधीं तोचि शुद्ध मध्यम । शुद्ध मध्यम आणि आंतर गांधारांत मृदुमध्यम । सोमनाथ सांगे परी तो कोणी न गाती ॥२१५॥ शुद्ध मध्यमासी । तीव्रतम गांधारहि सोमनाथ म्हणे समयेसी । उत्तरेकडील तीव्र मध्यमासी । मृदुपंचम सोमनाथ म्हणे ॥२१६॥ मृदु पंचम आणि शुद्ध मध्यम । या दोहोंमध्यें सोमनाथाचा तीव्रतम मध्यम । आहे परी प्रचार परम । नाहीं तयाचा येकाळीं ॥२१७॥ उत्तरेकडे शुद्ध पंचम । रागविबोधीं तो शुद्ध पंचम । उत्तरेचा कोमल धैवत परम । शुद्ध धैवत तो रागविबोधीं ॥२१८॥ उत्तरेचा शुद्ध धैवत वा तीव्र धैवत । तो सोमनाथाचा तीव्रतर धैवत । उत्तरेच्या कोमल शुद्ध धैवतामध्यें तीव्र धैवत । सांगितला परी आज कोणी न गाती ॥२१९॥ उत्तरेच्या शुद्ध वा तीव्र धैवताते । रागविबोधांत शुद्ध निषादहि म्हटलें सोमनाथें । उत्तरेच्या कोमल निषादांते । कैशिक निषाद आणि तीव्रतम धैवत नामें रागविबोधीं ॥२२०॥ उत्तरेचा शुद्ध वा तीव्र निषाद । तो रागविबोधीं काकली निषाद । शुद्ध षड्ज आणि काकली निषाद । यामध्यें मृदुषड्ज म्हणे परी कोणी न गाये ॥२२१॥ आतां पुंडरिकविठ्ठलविराचित ।

सद्रागचंद्रोदय आणि रागमाला ग्रंथ । मृदुनें लघुशब्द त्यांत । विशेष बोलिला आहे ॥२२२॥ षड्ज मध्यम पंचम । सद्रागचंद्रोदयीं उत्तरेच्या सम । उत्तरेचे कोमल ऋषभ धैवत परम । ते सद्रागचंद्रोदयीं शुद्ध रि ध ॥२२३॥ उत्तरेचें शुद्ध ऋषभ धैवत । ते चंद्रोदयकाराचे शुद्ध गांधार शुद्ध निषाद ख्यात । उत्तरेचे तीव्र गांधारा चंद्रोदयांत । लघु म हे बोलिले ॥२२४॥ उत्तरेच्या तीव्र निषादाते । रागचंद्रोदयकरें लघु सा बोलिजे ते । उत्तरेच्या कोमल गांधार कोमल निषादातें । साधारण गांधार कैशिक निषाद तो म्हणे ॥२२५॥ हा पुंडलिकविठ्ठल चंद्रोदयकार । त्रिश्रुतिक नि त्रिश्रुतिक गांधार । ऐसेंहि म्हणे साचार । कोमल ग नी ते ॥२२६॥ उत्तरेचा तीव्र मध्यम । तो पुंडलिकविठ्ठलाचा लघुपंचम । चतुःश्रुतिक रि ध परम । श्रीरागीं सांगे पुंडरिक ॥२२७॥ उत्तरेच्या रि ध मानें । पंचम-श्रुतिकप्रमाणे । जरी पुंडरिकाचे रि ध उणें । एक श्रुति भासती ॥२२८॥ तरी दक्षिणेकडे लक्ष्यसंगितीं । उत्तर रि ध समान चतुःश्रुतिक रि ध गाती । दक्षिणेउत्तरेचीं पाहतां संगती । प्रायो बाराचि असती विणेवरी स्वर॥२२९॥ आतां अहोबलकृत पारिजातोक्त । स्वर संज्ञा सांगू निश्चित । उत्तरेचा शुद्ध षड्ज प्रख्यात । पारिजातांत शुद्ध षड्ज तो ॥२३०॥ शुद्ध षड्जाच्या वरती । कोमल ऋषभाच्या खाली । पूर्व ऋषभ पारिजाती । वर्णिला आहे ॥२३१॥ उत्तरेचा कोमल ऋषभ । तोचि पारिजातीं कोमल ऋषभ । उत्तरेचा तीव्र वा शुद्ध ऋषभ । पारिजातीं शुद्ध रिषभ वा पूर्व गांधार तो ॥२३२॥ पूर्व गांधाराच्या वरती । उत्तरेकडील कोमल गांधाराचे खालती । तीव्र रिषभ कोमलगांधार पारिजातीं । वर्णिला आहे ॥२३३॥ उत्तरेकडील कोमल गांधार । तो पारिजाती शुद्ध गांधार । आणि तीव्रतर रिषभ साचार । संज्ञा तया ॥२३४॥ उत्तरेकडील तीव्र वा शुद्ध गांधार । पारिजातीं तो तीव्र गांधार । उत्तरेकडील शुद्ध मध्यम सुंदर । पारिजातांत शुद्ध मध्यम तो ॥२३५॥ शुद्ध मध्यमाच्या खालती । तीव्र गांधाराच्या वरती । तीव्रतर

गांधार आणि तीव्रतम गांधार पारिजातीं । हे दोन स्वर बोलिले ॥२३६॥ उत्तरेच्या शुद्ध मध्यमावरुती । अतितीव्रतम गांधारहि म्हटले पारिजातीं । उत्तरेच्या तीव्र मध्यमा प्रती । तीव्रतम मध्यम अहोबल म्हणे ॥२३७॥ उत्तरेच्या शुद्ध मध्यमावरुती । आणि अहोबलाच्या तीव्रतर मध्यमाखालती । एक तीव्र मध्यम मध्यमावरुती । आणि अहोबलाच्या तीव्रतर मध्यमाखालती । एक तीव्र मध्यम पारिजातीं । बोलिला आहे ॥२३८॥ तीव्रतर मध्यमाच्या वरुती । आणि शुध्य पंचमाच्या खालती । तीव्रतम मध्यम पारिजातीं । अहोबल सांगे ॥२३९॥ उत्तरेकडील शुद्ध पंचम । तोचि पारिजाताचा शुद्ध पंचम । तयाच्यावरी परम । पूर्व धैवत असे ॥२४०॥ त्यावरी उत्तरेचा कोमल धैवत । तो पारिजाताचाहि कोमल धैवत । उत्तरेचा शुद्ध धैवत । पारिजातीं शुद्ध धैवत आणि पूर्व निषाद तो ॥ २४१ ॥ उत्तरेचा कोमल निषाद । तो पारिजाताचा शुद्ध निषाद । किंवा तीव्रतर धैवत । अहोबल म्हणे ॥२४२॥ अहोबलाच्या शुद्ध निषादाखालती । आणि पूर्व निषादाच्या वरती । कोमल निषाद किंवा तीव्र धैवत पारिजातीं । सांगितला आहे ॥२४३॥ उत्तरेचा शुद्ध वा तीव्र निषाद । तो अहोबलाचा तीव्र निषाद । यावरी तीव्रतर तीव्रतम निषाद । हे दोन स्वर अहोबल सांगे षड्जातळीं ॥२४४॥ एवं स्वरसंज्ञा नाना रीति । स्वरस्थानें मानिली बहुती । परी अधुना लक्ष्यसंगीतीं । बाराचि गाती वाजविती सर्वांकडे ॥२४५॥ नाममात्र भेद । रीतीचाहि किंचित् भेद । ग्रंथीं विकृति प्रसिद्ध । उच्चोच्च करणें ॥२४६॥ आणि लक्ष्यसंगीतीं । .........।.........। म्हणोनी शुद्धस्थिति ते एक जाहली ॥२४७॥ अद्यापि संगीत दक्षिणेकडे । ग्रंथगतचि बहुधा उघडे । लक्षण विरोध उत्तरेकडे । जाहला आहे ॥२४८॥ परी तोहि ग्रंथानुरोधें समन्वयें । रंजकत्वें समान होय । भविष्य पुराणोक्त दानसेनादि कविकार्य । अन्यथा नोहे सर्वथा ॥२४९॥ एवं बारावा आणिक स्वर । एका श्रुतिचोचे प्रकार ।

किंवा शुद्ध अथवा अंतर । मिळोनी दोन श्रुतीचे ते ॥२५०॥ मतंग मुनीचा एक श्रुति वाद । तो लक्ष्यसंगीतास्तव उत्तम प्रसिद्ध । मुनीमुनींत असता विरोध । योग्य तो वेचून आपण घ्यावा ॥२५१॥ वेदाधारी मुनिवचन । तेथ तेचि घ्यावे वेचून । वेद जेथ आहे उदासीन । ऐसे मुनिवचन विरोधी जरी ॥२५२॥ तरी युक्तीसी परवडे । आणि लक्ष्य न मोडे । ऐसे वचन फुडे । वेचोनी घ्यावे ॥२५३॥ आतां तया एकाचि श्रुतीचा । मुख्य स्वर आंतरस्वर विभाग साचा । केलिया विश्वावसूचा । द्वय श्रुतिवाद मिळे ॥२५४॥ एक श्रुतिवादी मतंग मुनि । म्हणती चतुःश्रुत्यादि भेदे भासे म्हणुनी । द्वादश स्वर द्वादश श्रुतिस्थानीं । घेतां लक्ष्यसंगीतप्रमाणीं दोष नये ॥२५५॥ आतां हृदय कंठ आणि मूर्धनी । इया स्थानभेदें करूनी । श्रुति मानिती तिन्ही । कोणी वेत्ते ॥२५६॥ तिया सप्तकगणजातिविवक्षा । करूं येती पैं साच परीक्षा । जे तीन सप्तकें स्वरशिक्षा । जाहली आहे ॥२५७॥ यालागीं कोमल तीव्र आदि भेद । विकृत बोलिजती प्रसिद्ध । तो श्रुतिद्वयवाद । निरूपिला मागा ॥२५८॥ रागमाला ग्रंथीं । स्वराध्यायीं पुंडरिकोक्ति । तोचि श्लोक प्रमाणार्थी । सांगूं येथ ॥२५९॥

न्यूनाधिकैकगतिका मंद्रतारस्वरा यदि ।
न रागहानिकाः सर्वे स्पष्टता मध्यसप्तके ॥

स्वरांचे कोमल तीव्रादि विकार । धरूनिया मुख्य स्वर । वर्ज्यावर्ज्यादिभेदें विचित्र । राग होती पैं ॥२६०॥ स्वरा उदात्त अनुदात्त करणें । म्हणजे उच्च नीच म्हणणें । कोमल तीव्र होणें । येणेंचि लागे ॥२६१॥ वैदिकोदात्तादि संज्ञा भिन्न । हे लौकिकोदात्तादिसंज्ञाकरण । संगीतसौकर्यालागून । ओळखावे ॥२६२॥ मांद्र किंवा तार सप्तकीं । स्वर लागतां न्यूनाधिकीं । तरी रागहानि विशेखी । होऊं न पावे ॥२६३॥ यद्यपि

कुशलाचिया लोचनीं । चुकलिया देखे अनुसंधानी । तरी नोहे रागहानि । विशेषे करोनी पंडित म्हणती ॥२६४॥ मध्यसप्तकीं मात्र स्पष्टता । रागतालाची विशेषता । म्हणवोनी तेथे न्यूनाधिक स्वर होता । रागहानि निश्चये ॥२६५॥ मध्यसप्तक स्वाभाविक । तेथ शक्तिनाश नोहे सम्यक । म्हणवूनि बुद्धिकौशल न दाखवितां देख । आळसाचि घडे ॥२६६॥ तार आणि मांद्र सप्तकाचे ठायीं । शक्तिव्यय अधिक होय पाहीं । यालागीं तेथ चुकलियाहि । रागहानि न मानिती साधु ॥२६७॥ म्हणवोनी राग-प्रबंध स्थायी आघवा । मध्यसप्तकामाजीं गावा । अंतरा विशेषे म्हणावा । तार सप्तकीं ॥२६८॥ आभोग मेलापक । इत्यादि गीतावयव अनेक । तयाचे करण सम्यक । लक्ष्यसंगीतीं आज नाहीं ॥२६९॥ परि हा प्रपंच समस्त । प्रबंध प्रकरणीं सांगू यथार्थ । स्वरशिक्षा मात्र येथ । निरूपिजेल ॥२७०॥ विशेष लक्ष्यमतें । मांद्र पंचमापासूनि मध्यनिषादावधि ते । स्थायी स्वरूप गाणें होते । प्रबंधाचे ॥२७१॥ मध्य पंचमापासोनी तार पंचमावधि । गावी पैं अंतऱ्याची मांदी । शक्ति असलिया इतर स्वरसंधि । कौशल्य मात्र दाखविणें ॥२७२॥ आतां रुद्रविणेवरी अणुमांद्र सप्तक । आणि तार तार सप्तक । स्थापिता ये परी ते सम्यक । पुरुषकंठीं न निघेचि ॥२७३॥ म्हणवोनी द्वाविंश श्रुति निरोधु पावे । परी योग-शास्त्रान्वयें ठावे । त्रिसप्तकीं पुरुषा फावे । स्वरसमुदावो ॥२७४॥ अति तिखट नादीं नाहीं रक्ति । ऐसी रागविबोधीं उक्ति । कुशल तरी आवडेल तो नादभेद निश्चिती । घ्यावा हे रागविबोधचि म्हणे ॥२७५॥ परी शिक्षणाचिया ठायीं । नैपुण्यप्रपंच योग्य नाहीं । यालागीं मांद्र पंचमादि मध्यनिषादान्त स्थायी । सुखें गावा ॥२७६॥ मध्य पंचमतस्तारपंचमान्त । अंतरा म्हणणें शोभिवंत । आतां त्रिश्रुतिवादीमत । सांगती येथ औपाधिक ॥२७७॥ इंद्रियप्राकृतविकृत भेदे । त्रिश्रुतित्व घेईजे नादें । सहज दोषज

अभिघातज इया शब्दें । भेदू तियांचा ॥२७८॥ सहज म्हणजे सत्वगुणयुक्त । स्वाभाविक स्वर कंठगत । रजस्तमोगुणयुक्त तो दोषज म्हणिजे ॥२७९॥ अतिरससेवनें वातादिकोपे । अभिघातज शब्दु आरोपे । श्रम न करतां सशक्त सोपे । तेणे अभिघातज शब्दु होय ॥२८०॥ शिवहरिपूजनें करोनी । जयाचा कंठ मधुर स्थानीं । सामान्य शब्द ऐकताहि क्षणीं । आकर्षण होय चित्ताचें ॥२८१॥ तो सहज म्हणावा सत्वगुणयुक्त । आतां विकारें रजस्तमोयुक्त । कामक्रोधें करुनी निश्चित । उगाचि शब्द कापे ॥२८२॥ स्वरावरी न करतां एकाग्र मन । आवडी चापल्यें करून । राग न दाखवुनी द्रुत तान । घेणें तो रजोगुणमय शब्दु ॥२८३॥ अंतऱ्यामाजीं स्थायीचे स्वरूप । दाखविणें हा तमोगुणारोप । स्वस्थ मन नसतांहि सपडप । नाना शद्ब निघती ऐसे ॥२८४॥ तेणेंहि नाश पावे रक्ति । आणिक एक पैं प्रतीति । जे रजस्तमोगुणाचिया हातीं । सांपडे शब्द ॥२८५॥ द्रुत प्रबंध गाणें जया । विलंब गाणें न साधे तया । ताना घेती विपायी या । राजसचि तो ॥२८६॥ तैसा अधम रागाच्या आरंभीं । माडादि स्थायी करी विलंबीं । तेणें तामस प्रलंबीं । आळसचि दिसे ॥२८७॥ उत्तममध्यमाधमरागनिरूपण । राग प्रकरणीं बोलिजेल पूर्ण । एवं दोषज श्रुतिनिरूपण । त्यागार्थ बोलिले ॥२८८॥ आतां पूर्वक्रमें करुनी । विकृतदेही जो निर्वाणी । तो गानाधिकारविवर्जित म्हणुनी । वाळिला पाहिजे ॥२८९॥ तथापि मध्य सप्तकीं फुडा । तयाहि स्थायी कळे रोकडा । एरवीं अभिघात जो पुढा । जाहला आहे ॥२९०॥ वातपित्तश्लेष्मवशें । स्वर सोडी प्रकृतिदशे । तो स्वरभंग चिकित्साविशेषें । शुद्धता लाहे ॥२९१॥ स्वरभंगचिकित्साविस्तर । निरुपी आयुर्वेदशास्त्र । त्यांतील उपयोगी तंत्र । सांगिजेल पुढें ॥२९२॥ परी शक्तिबाह्य श्रम करिती । तेहि अभिघातीं सांपडती । कौशल्य दावावया पाहती । मग करिती

रागहानि ॥२९३॥ लेकुरें आणि नारी । मांद्रसप्तकीं श्रम करितां निर्धारी। कंठनाश होय तरी । अभिघातज शब्दें ॥२९४॥ तैसा वृद्ध अशक्त किंवा रोगी । तार सप्तकीं गाय प्रसंगीं । तेणेंहि आभिघातज वैगुण्य आंगीं । तोहि पावे ॥२९५॥ म्हणवुनी बाळ वा स्त्रियांचा । अंतरा सम्यक उमटे साचा । तरुण आणि वृद्धांचा । स्थायीचि उमटे ॥२९६॥ तथापि स्थायीमाजीं. राग । दाखविणें कौशल्य चांग । येथ शार्ङ्गदेव रत्नाकर प्रसंग । संमत दावी ॥२९७॥

अपूर्ण

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# योगांगयमलक्षण

(१) अहिंसा, (२) सत्य (३) अचौर्य (४) आर्जव (५) क्षमा (६) धृति (७) शौच (८) ब्रह्मचर्य (९) मिताहार (१०) दीनजनांवर दया या दहा गोष्टींस यम म्हणतात.

आतां पृथक् सांगतो. पहिले अहिंसालक्षण.

**अहिंसा**—कायेनें, वाचेनें अथवा मनानें जो कधींहि दुसऱ्यास पीडा देत नाहीं व सर्वांवर प्रेमदृष्टि ठेवतो त्यास अहिंसा म्हणतात. ही साधली म्हणजे सर्प व्याघ्रादि प्राणि क्रूर होत नाहींत. म्हणून कायेनें कोणास त्रास देऊं नये. वाईट शब्दानें केव्हांहि कोणास दुखवूं नये, व मनानें कोणत्याहि सजीवनिर्जीव प्राण्याविषयीं नुकसान चिंतूं नये.

**सत्य**—प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिलेले किंवा पंडित जनानीं सांगितलेले तेंच बोलावे. दुसरे मलतेच कांहीं बोलूं नये. त्यांत दोन भेद आहेत. सत्य जें बोलावें तें सर्वांस प्रिय असावें. जें कोणास अप्रिय असेल व ज्यानें कोणाचें मन दुःखेल असें सत्य देखील बोलूं नये. कदाचित् बोलले तर दुसऱ्याचें मन दुखल्यामुळें हिंसा घडते. मग अहिंसा कोठें राहिली. म्हणून प्रिय जें असेल तेंच बोलावें. अप्रिय जें आहे तें सत्यहि बोलूं नये. तसेंच प्रिय जरी असले तरी खोटें बोलूं नये. असा रगड प्रसंग आलाच तर निघून जावें अथवा अंगावर चपेटे सोसून मौन धरावे. हाहि सनातन धर्म आहे असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. हा सत्य धर्म पूर्ण साधला म्हणजे वाचा सिद्धि होते. न साधल्यास नाश होतो.

**अचौर्य**— कायेनें, वाचेनें व मनानें सर्वशा परद्रव्याचा त्याग करणें याला अचौर्य म्हणतात. म्हणजे कायेनें कोणाचे द्रव्य बळेंच हरण

करूं नये. वाचेनें कोणालाहि मागूं नये, व मनानें तें उत्तम आहे म्हणून तें मिळालें पाहिजे असें चिंतूं नये. परंतु द्रव्य जें म्हटलें तें पैशासच म्हटलें असें नाहीं. तर मातीच्या भांड्यापासून तर सुवर्णापर्यंत जे कांहीं सामान तें द्रव्यच आहे. या सर्वांचाच कायावाचामनानें त्याग करावा. हा अचौर्यधर्म पूर्ण साधला म्हणजे पृथ्वीतील निधानें रात्रीं फिरावयास निघालीं म्हणजे दृष्टीस पडतात व त्यांतील कित्येक शरण येऊं पाहतात. परंतु योगियानें तेथें दृष्टि देऊं नये व कदाचित् दृष्टि दिली तर मागचे व पुढचे सर्व सुकृत नाश पावून योगसिद्धिहि होत नाहीं.

**आर्जव**— कायावाचामनानें नित्य श्रीगुरुसेवा करून योग विचारावा. त्यांत कांहीं सिद्धि दिसो कीं न दिसो. परंतु अभ्यास सोडूं नये. सिद्धीची तातडी झाली तर वासना वाढल्यामुळें जन्ममरण भोगावे लागतात व योगसिद्धि होत नाहीं. तुकाराम महाराज एके ठिकाणीं म्हणतात. "तुका म्हणे नाहीं चालत तातडी। प्राप्त काळ घडी आल्याविण" असें असतांहि साधकानें अभ्यास सोडूं नये.

**क्षमा**— कोणी प्रिय बोलो अथवा अप्रिय बोलो, दंड मारो अथवा मान करो, चंदन लावो अथवा नर्क टाको परंतु तें सहन करून घ्यावें. इतकेंच नव्हे तर मनानें देखील त्याचें नुकसान चिंतूं नये. वरवर सहन केलें आणि मनानें नुकसान चिंतिलें तर पूर्वीं सांगितलेल्या अहिंसेचा भंग होईल. आणि योगसिद्धि होणार नाहीं. या साठीं मनानें देखील त्याचें वाईट चिंतूं नये. ही क्षमा पूर्ण साधली म्हणजे त्रिभुवनांत कोणी शत्रु राहत नाहीं. मृत्यु लोकांतील व्याघ्र सर्प मनुष्यादि शत्रु वश होतात. स्वर्गींतील यम, काल देवादि शत्रु वश होतात. पातालांतील भूतप्रेतवेताळादि शत्रु वश होतात. परंतु या सिद्धींत गुंतूं नये. गुंतले असता ते पुनः बदलून नाश करितात. न गुंतले असतां शरण येतात. क्षमा ही निर्बलाचें बल होय आणि बलवंतास त्रिभुवनावर छाप ठेवणारें मोठें भूषण होय.

**धृति**—मागें जी लक्षणें सांगितलीं त्यांत जें दुःख आहे तें सर्व सहन करून न घाबरतां मोठ्या धैर्यानें अभ्यासाचा एक एक पाय पुढें टाकणें याला धृति म्हणतात. ही पूर्ण साधली म्हणजे योगी एकाच जन्मांत योगाची पूर्णता करण्यास महासमर्थ होतो. न साधली तर योग्याला मागचें पुढचें कांहींच साधन होत नाहीं. मग योगसिद्धि कोठली होणार.

**शौचः**—शौच या शब्दाचा अर्थ शुद्धता आहे. ती शुद्धता दोन प्रकारची आहे. बाह्य शुद्धता व आंतर शुद्धता. त्यांत मातीनें आणि पाण्यानें अथवा भस्मानें जी देहाची शुद्धि ती बाह्य शुद्धि होय. आणि मनांतील सर्व कृत्रिम भाव काढून टाकणें व वाईट वासनेचा त्याग करणें ही आतंर शुद्धि होय. ही साधली म्हणजे योगी पातकापासून मुक्त होतो.

**ब्रह्मचर्यः**—कायेनें, वाचेनें व मनानें जागृति, स्वप्न, सुषुप्ति इत्यादि सर्व अवस्थेमध्यें सर्वच मैथुनाचा त्याग करणें याला ब्रह्मचर्य म्हणतात. मैथुन आठ प्रकारचें आहे. स्त्रीच्या स्वरूपाचा विचार करणें, पूर्वी पाहिलेल्या स्त्रीची आठवण करणें, तिचेंच नांव मुखानें घेणें, लोकाजवळ कीर्ति सांगणे, स्त्रीस पाहून गालांतले गालांत हंसणें व हावभाव दाखविणें, एकांतीं नेऊन गोष्टी सांगणें, मनामध्यें स्त्रीभोगाची इच्छा करणें, भोग केलाच पाहिजे असा निश्चय करणें, आणि प्रत्यक्ष जाऊन स्त्रीसंभोग करणें. ह्या आठहि प्रकारच्या मैथुनाचा त्याग करणें याचें नांव ब्रह्मचर्य. म्हणून ब्रह्मचारी पुरुषानें स्त्रीपासून दूर असावें. त्याशीं भाषण देखील करूं नये, आणि करावयाचा प्रसंग आला तर माय, बहिण कन्या असें मानून करावें. स्वस्त्रीभोग एक महिन्याच्या नियमानें करावा. हें ब्रह्मचर्य साधलें म्हणजे सर्व मुनी येऊन आशीर्वाद देतात व योगाभ्यास सांगतात. ब्रह्मचर्या-सारखें तप नाहीं.

**मिताहार**—आहार करावयाचा तो नियमानें करावा. वाईट, कडक असा आहार असूं नये. केवळ स्निग्ध, मधुर, पुष्टिकर, व बुद्धिवर्धक असा

आहार घ्यावा. तोहि पण नियमित. म्हणजे दोन भाग अन्न, एक भाग पाणी, इतके ग्रहण करावे व एक भाग वायु खेळण्याकरितां रिकामा ठेवावा. नेमानें चोवीस घांस ग्रहण करावे. ते घांस कुक्कुटांडा एवढे असावे. अथवा मुखांत प्रवेश होईल एवढा घांस घ्यावा. ते चोवीस ग्रास एकत्र करून जितके तोळे गुरुत्व ( वजन ) येईल त्याच्या अर्धाभाग जळ घ्यावे. शास्त्रामध्यें असेंहि सांगितले आहे कीं संन्याशानें आठ ग्रास घ्यावे. वानप्रस्थानें सोळा घ्यावे. गृहस्थाश्रमीं असणाऱ्यानें बत्तीस घ्यावेत. योगामध्यें ब्रह्मचर्य साधावे लागते म्हणून येथें आपण चोवीसच ग्रहण करूं. ह्याहून योग्यानें अधिक भोजन करूं नये. हा मिताहार साधला असतां सर्व वात पित्त, कफादि व्याधि नाश पावतात, व योगाभ्यासाची शक्ति येते.

दया—सर्वाभूतीं दया असावी. कोणाचाहि द्वेष नसावा. ज्याप्रमाणें आपला प्राण आपल्यास अत्यंत प्रिय आहे त्याप्रमाणेंच सर्व जीवाला आपआपला प्राण प्रिय आहे. म्हणूनच कोणाचाहि द्रोह व घात करूं नये. व्याघ्र सर्प विंचु इत्यादिकांचा वध करूं नये. मनांत देखील त्यांच्या नाशाविषयीं इच्छा करूं नये. कदाचित् उठलीच तर मागें केलेल्या अहिंसेचा भंग होतो व मग योगसिद्धि होत नाहीं. महासंकटांतून शत्रुलाहि सोडवावे. मग तो आपला नाश करो वा न करो. ही भूतदया साधली म्हणजेच ईश्वरानुग्रह झाला. दानाहून दया विशेष आहे. कायावाचामनेंकरून सर्व प्राण्यांच्या रक्षणाचा उपाय करावा. म्हणजे कायेनें कोणास कांहीं नसले तें यथाशक्ति पुरवावे. कांहीं जवळ नसले तर हात जोडून वंदन तरी करावे. सर्व प्राण्यांना आपले शरीर झिजवून संकटांतून रक्षावे. दयेच्या ठिकाणीं जाति वर्ण पाहूं नये. दुष्टसुष्ट पाहूं नये. लहान मोठा पाहूं नये. शत्रु मित्र पाहूं नये. आपले परावे पाहूं नये. ज्या प्रमाणें गंगेवर गाय व व्याघ्र दोघेहि जातात व त्यादोघांचीहि गंगा सारखी तृप्ति

करिते त्याप्रमाणें सर्वांभूतीं समान दया असावी. हीच दया ज्ञानमार्गांतहि सांगितली आहे. इतर कर्मांचा ज्ञानाशीं व योगाशीं विरोध आहे परंतु दयेचा विरोध नाहीं. अर्थात दया ही श्रेष्ठ आहे. दयेपेक्षां श्रेष्ठ धर्म नाहीं. दया हीच साधारण लोकांस समाधि आहे. "सर्वभूतेषु दया ब्रह्म। एतद्ब्राह्मणलक्षणम्" असें श्रुतीचें वचन आहे. सर्वांभूतीं एक ब्रह्म आहे असें जाणून जो सर्व भूतांवर दया करितो तो कोणत्याहि जातीचा असला तरी खरोखर ब्राह्मण आहे असें सामवेदांत सांगितले आहे. यास आणखी पुष्कळ श्रुति प्रमाण आहेत. दया हें मुक्तीचें मूळ आहे. याविषयीं तुलसीदास एके ठिकाणी म्हणतात "दया मुकतका मूल है। नरकमूल अभिमान। तुलसी दया न छांडिये। जबलग घटमों प्राण" तसेंच दया भक्तीचेंहि मूळ आहे. एकनाथ महाराज म्हणतात– "ज्याचे अंगीं दया शांति। तया न लगे ईश्वरभक्ति" दया हें संतांचें गुह्य ठेवणें आहे. याविषयीं तुकाराम महाराज म्हणतात– "भूतां श्री दया हें भांडवल संता। आपल्याला ममता नाहीं देहीं॥" "तुका म्हणे सुख पराचिया सुखें। अमृत हें मुखें स्रवतसे॥" याप्रमाणें दया हें योगाचें मूळ आहे याविषयीं रामदास महाराज म्हणतात.

दया ज्याचे अंगीं बाणें। योग करूं नये तेणें।
जेथें दयेचा ओलावा। तेथें योग काय व्हावा॥
दया जयाचे अंतरीं। त्याला दूर नाहीं हरी।
हारवोनि सर्व धन। करा दया हे साधन॥
रामी रामदास म्हणे। दया सर्वत्र ठेवणें॥ (करूणा शतक)

फार काय सांगावे. श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं तर दयेस ब्रह्मच करून ठेविले आहे. ज्ञानेश्वरींत एके ठिकाणीं ते म्हणतात– गाईची तृषा हरूं। व्याघ्रा विष होवोनि मारूं। हे नेणेचि गा करूं। तोय जैसे॥ घरींचिया उजेड करावा। पराविया अंधार पाडावा। हे नेणें गा पांडवा। दिपु जैसा॥ जो सर्व भूतांचे

ठायीं। द्वेषातें नेणेचि कांहीं। आपपर जया नाहीं। चैतन्य जैसें" सज्जनहो। या दयेची प्रशंसा करावी तेवढी थोडीच. खरोखर दया नसती तर ईश्वरानें आम्हाला दुःखांतून कधीं सोडविलें नसतें. यावरुन दयेनेंच ईश्वराला ईश्वरत्व आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. एवढें वाक्य जरी माझ्या पदरीचें आहे तरी संत प्रमाण करतील अशी आशा जाणून मी हें लिहिण्याचें धाडस केलें. असो सर्वांभूतीं दया साधावी अशी मी प्रार्थना करतों. साधकाला योगाभ्यास करणें असल्यास या दहा लक्षणांतील एकहि लक्षण सोडतां कामा नये. इतकेंच नव्हे तर एका तासाची किंवा एका मिनिटाची जर चूक झाली तर मागें केलेलें व पुढें करावयाचें ते कांहींच सिद्ध होत नाहीं. मग पुनः पहिल्या अहिंसा लक्षणापासून चढावें लागतें. म्हणून योगाचा अभ्यास करणे असेल तर साधकानें क्षणभरहि चुकीचा अंश देखील लागूं देऊं नये. हीं दहा लक्षणें आंगीं परिपूर्ण ठसलीं म्हणजे साधक योगाची एक पायरी चढला. या पायरीसच यम म्हणतात. हें योगाचें प्रथम अंग आहे. आणखी जी नियमादि अंगे आहेत तीं पुढें सांगू.

हरिः ॐ तत्सत् इति योगभाषायां यमस्य दशप्रकारनिवेदनं नाम प्रथमः समासः

अपूर्ण

श्रीज्ञानेश्वर माऊली समर्थ

# दुर्मतहृदयभंजन

ॐ नमो ज्ञानेश्वर पवित्रा । स्वामी सद्गुरु राजीवनेत्रा । करीं धरुनि निगमांतशस्त्रा । दुर्मतगात्रा छेदावें ॥१॥ जिहीं वेदविरुद्ध केले बंड । उभारिले कुतर्कपाखंड । मोडोनि तयांचें वितंड । करावा दंड योग्यसा ॥२॥ महापुरुषाची दंडपरिपाटी । ती खलनिग्रहासाटीं । आणि तो निग्रहाचे शेवटीं । अनुग्रह होय खलाहि ॥३॥ म्हणूनी तुमचें चरण । आश्रय धरिले पूर्ण । कीं स्फूर्तिदाता तुम्हावांचून । दुसरा नाहीं ॥४॥ ती स्फूर्तिच प्रसाद मानोनी । प्रवर्तलें दुर्मतहृदयभंजनीं । तरी कृपेनें साह्य देवोनी । यश आपण स्वीकारा ॥५॥ जैसे राजपुत्र सेनापती । जिंकुनी दुर्जन नरपति । निजपितृराया यश देती । तैसीच स्थिति येथींची ॥६॥ यास्तव पुढती करोनी नमस्कार । ज्ञानेश्वरनामें शोभवोनी वक्त्र । स्फूर्ति प्रसादाज्ञा मानोनी पवित्र । युक्तिशस्त्रें दुर्मत छेदी ॥७॥ जें दुर्मत छेदणें । तयाचा जिज्ञासूप्रति उपयोग होणें । यास्तव गुरुशिष्यपणें । संवादु तोचि ॥८॥ म्हणूनी जिज्ञासु साक्षिस्थानीं । आणि ज्ञानेश्वरकन्या उत्तरदाणी । ऐसा संवाद करोनी । यश ज्ञानेश्वरचरणीं वाहूं ॥९॥

**सखी**—"दुर्मतहृदयभंजन" या वाक्यांतील "दुर्मत" या शब्दाचा स्पष्ट अर्थ काय ?

**उत्तर**–शांकरवेदान्तविरोधी जेवढीं मतें असतील तेवढ्यांचा समुदाय.

**प्रश्न**— शांकरवेदान्तविरोधी नास्तिक मत आहे म्हणून या ग्रंथाचें नांव नास्तिकमतभंजन असें ठेवण्याचें ऐवजीं दुर्मतहृदयभंजन असें ठेवण्याचें कारण काय ?

**उत्तर**— हे सखि "नास्तिकमतभंजन" एवढ्या शब्दानें निर्वाह होत नाहीं, कारण सांख्य, नैय्यायिक व मीमांसादिक आपल्याला आस्तिक मानून घेतात. परंतु त्यांचीं मतें शांकरवेदान्तविरोधी आहेत. म्हणून तीं खंडनीय आहेत. नास्तिकमत एवढ्या शब्दांत त्यांचा समावेश झाला नसता. यास्तव अद्वैतमतविरोधी दुर्मतहृदयभंजन असा शब्द घालणें भाग पडलें. हृदयभंजन या शब्दाची योजना अशी आहे कीं, शीर तोडण्यापेक्षां हृदय फोडण्याला जोर अधिक लागतो, आणि शीर तोडले तरी कबंध युद्ध करीत असतात, पण हृदयछेद झाला असता तत्कालच मृत्यु होतो. तद्वत् दुर्मतांचे सिद्धान्त खंडन केले असता त्यांचा नाश होतो. तथापि ते आपल्या कुतर्कांनीं जिज्ञासूला संशय उत्पन्न करीत असतात. म्हणून प्रतर्कासहित सिद्धान्त हे त्यांचें हृदय छिन्न भिन्न केलें असता पुनः त्यांत शक्ति उत्पन्न होत नाहीं, आणि ते अर्थशून्य शशशृंगवत् शब्दमात्र राहतात. यास्तव त्यांचें योग्य रितीनें खंडन करणें अवश्य आहे. अनपेक्षित विस्तार किंवा अनपेक्षित संक्षेप न करणें हा "योग्य रीति" शब्दाचा अर्थ आहे.

**प्रश्न**— या दुर्मतांत नास्तिक आणि आस्तिक म्हणवून घेणारीं दोन्हीं मतें येतात. त्यांचीं उत्पत्ति किमर्थ झाली आहे. कारण सर्वांना सुखाची इच्छा आहे; आणि अखंड सुखप्राप्ति हें मोक्षाचें लक्षण अद्वैतवादी सांगतात.

**उत्तर**— यद्यपि अद्वैतवादी आणि दुर्मतवादी ह्यामध्ये सुखेच्छासामान्यें करून एकताप्रसंग आहे तथापि सुखाचें साधन जें अद्वैत ज्ञान तें स्वीकारल्यामुळें आणि वैराग्य मालिन असल्यामुळें किंवा मुळींच नसल्यामुळें दुर्मताची उत्पत्ति झाली आहे.

**प्रश्न**— या दुर्मतांची उत्पत्ति, स्थिति आणि लय क्रमानें कसे होतात तें कृपा करून निवेदन करा.

**उत्तर**— ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितांच दुर्मतहृदयभंजन ग्रंथ मी रचित आहे तो श्रवण कर.

**प्रश्न**— स्वतःच्या युक्तीनेंच हा दुर्मतहृदयभंजन ग्रंथ तुम्हाला करणें आहे किंवा दुसऱ्या ग्रंथकारांच्या युक्ति घेऊन करावयाचा आहे.

**उत्तरः**— मनन स्वतःच्या बुद्धीच्या तर्कानें केलेले जितके चांगले तसें दुर्मतभंजन करण्यामध्यें अंतःकरण स्वतःच तर्करूप करणें चांगलें नाहीं. कारण एकवेळ शुष्कतर्कचिकित्सेनें खडक अंतःकरण बनले म्हणजे परमतखंडनाचीच त्याला संवय अधिक लागून स्वमतप्रतिष्ठापन करणें आणि निदिध्यासन करणें संभवत नाहीं, म्हणून पूर्वाचार्यांनीं ज्या युक्ती परमतखंडनार्थ बोलिल्या तयांचा संग्रह करून अपेक्षित स्थळीं स्वबुद्धीनें केलेले तर्कहि निवेशित करून दुर्मत निराकरणेंच योग्य आहे.

**प्रश्नः**— पूर्वाचार्यांनीं पूर्वीं केलेले असल्यामुळें आता त्याचे प्रयोजन काय ?

**उत्तरः**— पूर्वाचार्यांनीं केवळ कुतर्कखंडनरूप संग्रह असा फार केलेला नाहीं. यद्यपि चित्सुखीकार, उदयनाचार्य इत्यादिकांनीं कुतर्कखंडन-पर ग्रंथ लिहिले आहेत आणि भाष्यादिकांतहि कुतर्कखंडनपर तर्कवचनें पुष्कळ आहेत तथापि तें प्रसंगानुसार असल्यामुळें पंक्तिसंग्रहीत नाहींत आणि ते सर्व ग्रंथ संस्कृत भाषेंत असल्यामुळें प्राकृततर्कनिष्ठ जिज्ञासूंना शब्दाचाहि बोध करून घेणें अशक्य आहे म्हणून प्राकृतजनबोधार्थ ग्रंथारंभ सफल आहे.

**प्रश्न**— दुर्मतभंजन वाचून आत्मानुभवापर्यंत त्याचा उपयोग आहे किंवा नाहीं ?

**उत्तर**—राजाजवळ शस्त्रें ज्याप्रमाणें शत्रुनाशाकरितांच असतात, स्वतःचे दुसरें कार्य कोणतेच ती करीत नाहींत त्याप्रमाणें दुर्मतभंजना-

कारितांच तर्काचा उपयोग आहे. ब्रह्मानुभवाला त्याची आवश्यकता नाहीं. " तर्काऽप्रतिष्ठानादपि " इत्यादि सूत्रांत हाच अर्थ निरूपण केला आहे.

प्रश्न—पूर्वी सांगितल्याप्रमाणें ग्रंथश्रवण करण्याची माझी अभिलाषा आहे.

उत्तर—श्रवण कर. वैराग्याचा अंश ज्याच्या मनांत कांहींच नाहीं.

अपूर्ण

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# सिद्धिसार

नमस्ते करुणामूर्ते ज्ञानेश्वर जगद्गुरो ॥
हृदिस्थित्वा माहाराज योगस्फूर्तीमयो भव ॥

ज्या आपल्या तळीं आधार, व वर झांकण अशा विश्वमंदिर मालेंतील विवक्षित रेषासूत्रानें गोवल्या जाणाऱ्या शृंखला संबंधाचा सृष्टींतील प्रत्येक पदार्थ हा एक दुवा आहे, असें उघडपणानें वाटतें.

कारण प्रत्येक पदार्थ जेव्हां मूलरूपी असतो, म्हणजे आपले अभेकत्वच त्याला परिस्थिती असते, तेव्हा तो आपल्या खालच्याशीं विवक्षित समांतरानें असतो आणि जेव्हां त्याची उन्नत स्थिती होत जाते; तेव्हां तो आपल्या वरच्या पदार्थाशीं समांतर पावत जातो. अशी ही शृंखला कोठून सुरूं झाली ? आणि तिचा अंत कोठें होणार ? ह्या गोष्टीचा थांग लावणें, शृंखलेला चिकटून राहणाऱ्यांच्या हातून कधीहीं होणें शक्यच दिसत नाहीं, असें आजपर्यंतच्या शोधांती कळून आले आहे. अर्वाचीन उत्क्रांतवादी, त्यांनी अमीबापासून तो मनुष्यापर्यंत, साम्य दाखवीत आपल्या उत्क्रांति वादाची कशीबशी समाप्ती केली आहे, परंतु ती केवळ वरवर दिसणाऱ्या भेदसाम्यावरून असल्यामुळें नित्य अशी टिकणारी नव्हे. कारण पदार्थाचें बाह्य भेद सादृश्य, त्याच्या अंतर भेद सादृश्यांचे निश्चायक होईल किंवा नाहीं हा सिद्धांत मोठा वादग्रस्त आहे. आणि त्याचा निकाल कोणत्या बाजूनीं लाविला तरीही, जोपर्यंत पदार्थांच्या आंतरस्थितीचा शोध करण्याचे स्वतंत्र साधन मिळणार नाहीं, तोपर्यंत बाह्य भेद साम्यावरून

तो लागणें अशक्य आहे. अर्वाचीन उत्क्रांतीवादी अमीबाची एक सर्व साधारण परिस्थिती घेत असतात. तथापि त्या प्राण्यांच्या परमाणूंत, जी एक मनःप्रेरणा दृष्टीस पडते आणि तिच्या योगानें, जी एक यंत्र शक्ती बनते ती ज्ञानावांचून असणें शक्य नाहीं. म्हणून त्या आमीबाच्या पूर्वी, कोणत्यातरी एका स्थितींत ज्ञान मानिलें पाहिजे असें एका साहेबाचें म्हणणें आहे. तो म्हणतो. ' ज्ञानांवाचूनच प्राण्युत्पत्ति मानली तर, त्याला आपली गती काय हें कळणें शक्यच नाहीं, आणि तसें एकवेळ कबूल केले म्हणजे उत्क्रांतीच्या शृंखलेंत येणारा प्रत्येक प्राणि ज्ञानशून्यच झाला पाहिजे; म्हणून, बाह्यशरीरादि भेदसाम्यावरून पदार्थांतील आंतिर भेद-साम्याचा शोध लागणें अत्यंत कठीण आहे. तथापि ह्या सिद्धांताचें स्पष्टी-करण उत्क्रांतीवादाशिवाय आपापल्यापरी पुष्कळांनीं केलें आहे. दुसरें असें कांहीं म्हणतात कीं, मेंदू जसा मोठा होत जातो तस तसे, मनुष्यांतील मनोविचार ज्या प्रबल स्थितींत येत असतात त्या मेंदूचे न्यून असणें. इतर खालच्या प्राण्यांतील विचार नसण्याला कारण होईल. जस जसा विचार अधिक वाढतो, तसतसें शरीर हें दुर्बल होत जातें म्हणूनच सृष्टीआरंभी मनुष्यें अतिशय सुदृढ धिप्पाड व पाशवी वृत्तीचें असून, त्यांचा विचार वाढल्यामुळें, हल्लीं तें मनानें सुदृढ व शरीरानें नाजुकशी बनले आहेत.

परंतु विद्युन्मानसशास्त्रवेत्ते पुरुष असें प्रतिपादन करतात कीं, अशा प्रकारचें शरीर दौर्बल्य मानून विचारवृद्धी मानली तर, पुढें मोठाच अड-थळा येतो. कारण त्यांच्या मतें, धन विद्युत व ऋण विद्युत् हिच्या द्वारे मन शरीराशीं संबंध ठेवीत असून त्याचें मेंदूत मुख्य स्थान आहे. आणि मेंदूच्या इच्छित व अनीच्छित ज्ञान तंतुशीं, जाल समांतरानें एक पारिस्थिती आहे. म्हणून अनिच्छित शक्तीवर, इच्छित शक्तीचा तीस सोसेलसा पगडा बसवून, विचारवृद्धी झाली असतां, शरीर अधिक सुदृढ होईल, असें अनुमान त्यांच्या म्हणण्यावरुन काढणें अगदीं सुलभ आहे. तें आणखी

असें म्हणतात कीं ' पिंडीं ते ब्रह्मांडीं ' ह्या म्हणीप्रमाणे, प्रत्येक मनुष्याच्या शरीरांत सृष्टींतील प्रत्येक वस्तूचा अंश आहे, म्हणून त्याचाच विचार चांगला केला म्हणजे सर्व ब्रह्मांडाचा विचार होणें अवघड नाहीं.

ह्या वांचून इतर रितीनें सृष्ट पदार्थ विश्वशृंखलेंतील कोणता दुवा आहे, असें सांगणें अति कठीण आहे. व त्या प्रमाणें सर्व शास्त्रांची तारंबळ उडाली आहे. हें त्यांचे म्हणणें मानसिक विचारी पुरुषास तरी निदान अकिंचित्कर वाटणें शक्य नाही कारण साधारणानुभविक विचारानें, आढळून येणारा सृष्टींतील पदार्थांचा शृंखला संबंध ज्या दुव्याशीं येतो, त्याच्यावरील कीतीतरी दुवे सोडून एखाद्या दुव्याशी, पदार्थाचा संबंध विशेषानुभविक विचारानें दृग्गोचर होत नाहीं असें नाहीं. उदाहरणः—कांही वनस्पतीचा संबंध आकारानें व गुणानें बीजावस्थेंत जसा खनिज पदार्थाशीं असतो, तसाच व तेवढाच संबंध त्या वनस्पतीचा विकास झाल्यावर, प्राणीगणाशींही दृष्टीस पडतो. हें अर्वाचीन शास्त्रानेंही चांगलें सिद्ध झालें आहे. प्राणीगणांतील हें जे मध्यस्थानीय पशू व पक्षी, जरी ज्ञानप्रचुर आहेत, तथापि तें बाल्यावस्थेंत, आपल्या खालच्या प्राण्याशीं बरेंच साम्य पावत असतात, आणि त्यांचा वयोविकास झाल्यावर कोणत्या तरी वरच्या प्राण्याशी मानसगुणानें साम्य पावत असतात. सृष्टींतील, उत्क्रांतिवाद्यांनी मानलेला, जो शेवटला दुवा मनुष्य, त्याचीही अवस्था अशीच. मनुष्य आपल्या बाल्यदशेंत ज्या कांहीं चेष्टा करितो, त्या पशूशीं साम्य पावतात हें कोणालाही कळून येण्यासारखें आहे. परंतु वयोविकासावस्थेंत आला म्हणजे त्याचें पशुसाम्य दिसत नाही. ही साधारण विचाराची गोष्ट झाली. यांत मनुष्य हा अगदीं शेवटचा दुवा व खनिज पदार्थ खालचा दुवा हा सिद्धांत आयतांच सांपडतो; म्हणजे मनुष्यांच्या अप्रबुद्ध मनांतील संबंध जरी असला तरी तो उत्क्रांतिवादाप्रमाणें, आपल्या खालच्या दुव्याशींच साम्य पावणें योग्य आहे अतिशय खालचा पदार्थ जो खनिज पदार्थ,

तत्साम्य पावणें योग्य नाहीं आणि तद्वतच, प्रबुद्धावस्थेंत, खनिज पदार्थही आपल्या वरच्या पदार्थांशी समसंबंधी होणें युक्त आहे. मनुष्यापर्यंत सम-संबंधी होणें युक्त नाहीं.

✓ ह्या सिद्धांताच्या विद्युन्मानसशास्त्रवेत्ते चांगले विरुद्ध आहेत. त्याचा मुख्य प्रणेता जो डॉक्टर डाग्स, त्यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे, कीं, "मनुष्य शरीराचा ब्रम्हांडातील प्रत्येक वस्तूशीं अगदी समांतर संबंध आहे. तसें नसतें तर, मनुष्याच्या सवयीनें, मनुष्याच्या विरुद्ध पदार्थ कधींही शरीराला पोषक झाले नसते." जो मनुष्य थोडी थोडी आफू सेवन करून वाढवितो तो बारा मनुष्यास पाहिजे आहे इतकी सुद्धां भक्षण करूं शकेल. आमच्याकडील सोमलकल्पादिकांची उदाहरणें अशाविषयीं पुष्कळ आहेत. सवय केल्यावर चाकू भक्षण करून पचविणाऱ्या एका माणसाची गोष्ट, केरळ कोकिळमध्यें आलेली ती ह्याला चांगली साधक आहे. आमच्याकडेही कांहीं औषधी घेऊन मनाची दुर्बलता दूर करून, त्याला विचारबल देण्याचे उपाय, ग्रंथांत पुष्कळ लिहिले आहेत. खरोखर अशा रीतीनें पाहिलें असतां, दुर्बल मनाच्या खनिज पदार्थांतील औषधीच्या योगानें, सुमनस्कपूर्ण अशा मनुष्य प्राण्यांतील मनाला विचार बल यावे, हें उत्क्रांतिवादाच्या रीतीनें मोठें गूढ आहे; परंतु ह्याचा अनुभव कोणास नाहीं असें नाहीं. खनीज पदार्थांत, मनाला तरतरी देण्याची शक्ति असल्याशिवाय, त्याचे औषधरूपानें सेवन करून, मनुष्य प्राण्यांत ती येणें अगदीं अशक्य आहे. संयोगाचें कार्य मानाल तर अनुकूल कार्यसाधक शक्तिमान पदार्थांचाच संयोग कार्यकारी होतो. उष्णता व थंडी प्रमाणें, परस्परनाशक शक्तीमान पदार्थांचा संयोग कार्यकारी होत नाहीं. म्हणून अशांशी रूपानें तरी मनुष्य प्राण्याशीं, ब्रम्हांडांतील प्रत्येक पदार्थाचा असलेला संबंध, अदृश्य समांतरानें आहे. हें विद्युन्मानसशास्त्राचें शिकविणें पुष्कळ अंशीं सत्य व हितावह असूं शकते. मनुष्य हा सत्य सृष्टींत पूर्ण आहे. ही

गोष्ट आम्हांलाही कबूल नाहीं, असें नाहीं. परंतु, पुष्कळ मनुष्य जातींत, सध्या बीजभूत असलेल्या विपरीत वाटणाऱ्या कल्पना पुढें विकास पावल्यावर त्यांचें रूपांतर झालें म्हणजे उत्तम वाटतात.

असें नीतीतत्वानें सिद्ध होत असल्यामुळें मनुष्याची वरची स्थिति आहे हें अनुमान सहज निघते. उदाहरण, सामान्य मनुष्यांत असलेली मानाची कल्पना, जी आपल्या अर्भकदशेंत पुष्कळांच्या घातपातास कारण होऊन, हा जड देहच प्रिय वाटल्यामुळें, अत्यंत निंद्य अशी मानल्या जाते; तीच मानाची कल्पना विकास पावल्यावर, विश्वकुटुंबी होऊन, सर्व लोकांकडून, परोपकार बुद्धीपणाचा किताब मिळविल्याशिवाय राहत नाहीं. अशा एक का दोन कितीतरी कल्पना विकास पावून रूपांतर झाल्यावर, आपला निंद्यपणा टाकून, अलौकिक स्तुतीला पात्र होऊन, जगदनुकरणीय होतात. परंतु अशा स्थितींत देखील सूक्ष्मपदार्थ मनुष्याला कमी साह्य करितात असें नाहीं. एका सुभाषितकारानें असें म्हटलें आहे कीं, योग्य वेळीं जागणें हें कोंबड्यापासून शिकलें पाहिजे. शूरत्व हें सिंहापासून, ईमानीपणा कुत्र्यापासून आणि कितीही निच स्थितींत पडलें असतां संतोष न भंगूं देणें, हें मातींत लोळणाऱ्या गाढवा पासून शिकलें पाहिजे. म्हणजे त्या त्या कल्पना ह्या प्राण्यांना जशा स्वाभाविक आहेत, तशाच आपलें ज्ञान कायम राखून, मनुष्यांनीं त्या कल्पना आपल्यांत सांठविल्या पाहिजेत. कारण स्वाभाविक कल्पनांच्या मागें लागून, मनुष्यानें आपल्या ज्ञानाचा ऱ्हास केला तर तो पाशव कोटींत जाईल. परंतु मनुष्यपणाचें ज्ञान कायम राखून, पशूंतील कांहीं स्वाभाविक कल्पना आपल्यांत प्रविष्ट होऊं दिल्यास मनुष्य देव कोटींत जाईल असें म्हणणें वावगें होत नाहीं. सारांश, पशूंत नैतिक कल्पना जरी स्वाभाविक असल्या, आणि मनुष्यादिकांना त्या सारख्याच हितावह असल्या, तरी पशूंमध्यें नीतीविरुद्ध जें वर्तन त्याचा त्याग करण्याचें ज्ञान पशूंस नाहीं आणि मनुष्यांत ते स्वाभाविकपणें

नांत आहे. म्हणूनच ज्ञानयुक्त नैतिक बनणें हें मनुष्याला मुख्य भूषणावह होय. अनैतिक त्यागाचें ज्ञान पशूस नसल्यामुळें, त्यांच्यांतील नीति जशी भूषणास्पद होत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञान प्रचुर मनुष्यांत ही नीति नसली तर भूषणास्पद होत नाहीं. हे भूषण म्हणजे अलौकिक समाधन होय. ज्ञानपूर्वक नीति वृद्धी झाली असतां, मनुष्य अलौकिक होतो. आणि परोपकाराची कृत्यें त्याच्या हांतून पुढें पुढें तर ईश्वरासारखीच होऊं लागतात. एवं सृष्ट पदार्थांतील अतिक्षुल्लक पदार्थांपासून तर अति उंच ब्रह्मदेवापर्यंत सर्व पदार्थांत, परस्पर कोणता तरी समांतर संबंध असतो; म्हणूनच परमेश्वरानें हें जगत् मद्विभूतीमय आहे असें सांगितलें. त्या विभूतींत सर्व प्राण्यापेक्षां, मनुष्य प्राणी वरिष्ठ आहे असें जे म्हटले, तें ज्ञानपूर्वक नीतीमुळेंच. ह्या नीतीच्या कल्पना मनुष्यामध्यें नैमित्तिक संबंधानें जरी पशूपासून येत असल्या, तरी उपादान संबंधानें त्या बीजभूत मनुष्यांतच आहेत. मनुष्यांतील परिवृत्त आणि स्वाभाविक असें कल्पनांचे दोन वर्ग केले तर, परिवृत्त कल्पना पुष्कळच सांपडून, स्वाभाविक कल्पना फारच थोड्या सांपडतात आणि त्या कल्पनाला आश्रय जे आपलें मन, तें स्वाभाविक वर्गांतील कल्पना कालीं एकाग्र, व परिवृत्त कल्पना कालीं चंचल असें असतें. परंतु विचारानें परिवृत्त कल्पनेला स्वाभाविक रूप देतां येते, आणि स्वाभाविक कल्पनेला परिवृत्त-स्वरूप देतां येते. ज्याप्रमाणें आपल्या स्वाभाविक कल्पना असतील, त्याप्रमाणें आपलें शरीरही बनत असतें. मनाच्या तापानें शरीराचा ताप, आणि शरीराच्या तापानें मनाचा ताप असें सर्वांगसुंदराकार प्रथम श्लोकाच्या टीकेंत म्हणतात.

काम, शोक व भीति, ह्या पासून वायु व क्रोधापासून पित्त होते, असें आर्य वैद्यकांत पुष्कळ ठिकाणीं म्हटलें आहे. मनाच्या विकाराप्रमाणें शरीर रोगी किंवा निरोगी होत असतें असें अनंतार्शी साधर्म्य नांवाच्या पुस्तकांत वारंवार म्हटलें आहे, व मनुष्याची लाळ किंवा घाम घेऊन

त्याचें पृथःकरण केलें असता, त्या मनुष्याचें चित्त कोणत्या विकारानें व्याप्त होते, हें अचुक सांगता येणें आतां अर्वाचिन शास्त्रानें सिद्ध झालें आहे असें ट्राइन साहेब म्हणतात. संकल्पाप्रमाणेंच अगदी शरीर असतें, याविषयीं वेदांतांतील दृष्टिसृष्टिवाद, अर्वाचिन शास्त्राप्रमाणें प्रत्यक्ष प्रमाण होऊन बसला आहे. त्याचें निरुपण योगवासिष्ठांत सम्यक् प्रकारें केलें आहे. परंतु दृष्टिसृष्टिवाद इतक्यावरच थांबत नाहीं. तो म्हणतो कीं मनाच्या ताब्यांत शरीर जसें पूर्णपणें येऊं शकते, आणि त्यावर मन जशी सत्ता चालवूं शकते, तितकीच सत्ता ब्रह्मांडांतील सर्व पदार्थांवरही मनाला चालविणें अगदीं शक्य आहे. कांहीं पक्षी व जनावरें, प्रेम केलें असतां लवकर वश होतात, हें ट्राईन साहेबांचेच म्हणणें ह्याला उत्तम उदाहरण आहे. परंतु अशा प्रकारची सत्ता परिवृत्त कल्पनेंत मनाला कधींही चालवितां येणार नाहीं. म्हणून विचारानें स्वाभाविक नैतिक कल्पनेवर मनाची स्थिरता केली पाहिजे. आपल्यांतच बीजभूत व परिवृत्त असलेल्या नीतीच्या कल्पना, विचारानें एकाग्र मनावर स्थापन करून, त्यांना स्वाभाविक वर्गांत आणिलें पाहिजे व तशाच आपल्या मनुष्यपणाचा उपयोग न होऊं देतां पाशव वृत्ति दृढ करणाऱ्या ज्या कल्पना पूर्वीच्या स्वाभाविक असतील त्यांना विचारानें परिवृत्त केलें पाहिजे. असें झाल्यानें मनुष्य ज्ञानपूर्वक नैतिक होऊं लागला म्हणजे सृष्टीवर त्याला चांगली सत्ता चालवितां येते. ह्या सत्ता चालविणाऱ्यालाच, खालच्या कोटींतील मनुष्यें अलौकिक चमत्कार असें म्हणतात आणि योगी ह्यालाच सिद्धी, असें पारिभाषिक नांव देतात. योगी आणखी असें प्रतिपादन करतात कीं, ह्या सिद्धी खालचे लोक म्हणतात तशा अद्भुत नसून स्वाभाविक आहेत व त्या सर्व लोकांत बीजभूतही आहेत.

परंतु त्यांना अनुकूल आपल्या परिवृत्त कल्पना अभ्यासानें स्वाभाविक केल्या म्हणजे, मनुष्याला त्यांची प्राप्ति होणें अगदी साहाजिक आहे. त्यांचा

( स्वाभाविक कल्पनांचा ) यथायोग्य विकास झाला म्हणजे सिद्धी कशा प्राप्त होतात हें दाखविण्याकरिताच या सिद्धिसार नामक ग्रंथाचा आरंभ आहे. शम्—

ज्ञानेश्वर माउली

ज्ञानेश्वर चरणीं प्रणाम करून, विषयारंभ करितो. उपोद्धातांत सांगितल्या प्रमाणें परिवृत्त आणि स्वाभाविक असें कल्पनांचे दोन वर्ग करून त्यांचें निरीक्षण केलें तर मनुष्यांच्या प्रवृत्तीचा बराच भाग आवडत्या कल्पनांना स्वाभाविक करण्याकडे असतो. परंतु त्याविषयीं एक मार्ग असा ठरलेला नाहीं. एखादी कल्पना कोणत्या मार्गानें स्वाभाविक होऊन एखादी कल्पना कोणत्या मार्गानें परिवृत्त होईल हें आज सांगणें जरी कठीण आहे, तरी कल्पना धरून ठेवण्याचे जे आपल्याला स्पष्ट म्हणून मार्ग दिसतात, त्या मार्गांनीं कित्येक कल्पना स्वाभाविक होऊं शकतात, असें म्हणण्याला बिलकुल प्रत्यवाय नाहीं. आतां ते मार्ग काय आहेत हे आपण पाहूं:— प्रत्येक गोष्टीचें ज्ञान बाह्य पदार्थांकडून आलें असतां आपल्या जवळ तें कल्पनारूपच होऊन रहातें. एखादा इंद्रियगोचर असा आपण पदार्थ पाहिला म्हणजे त्या पदार्थाचें ज्ञान आपल्याला कल्पनारूपच होऊन बसतें. पदार्थाचा ज्ञानमय तरंगाकार प्रवाह जेव्हां आपल्या इंद्रियज्ञानांतून ज्ञानतंतूच्या द्वारानें मेंदूंत संस्काररूपानें स्थिर झाल्यावर त्या पदार्थाची आपल्याला चांगली कल्पना येते. पदार्थाचा ज्ञानमय तरंगाकार प्रवाह कसा उत्पन्न होतो, हें गूढ अजून जड शास्त्रांना चांगलें सुटलेसें दिसत नाहीं. कारण, पदार्थाचें ज्ञान होतांना त्या पदार्थापासून निघणाऱ्या तरंगप्रवाहानें इंद्रियज्ञानापर्यंत येऊन ज्ञानतंतूंत संचार केल्यावर त्याला ज्ञानमयत्व येतें, किंवा पदार्थापासून प्रवाह ज्ञानरूपानेंच निघतो ? पहिल्या पक्षीं, विजातीय पदार्थाला ज्ञानमय करून टाकण्याची

शक्ति दुसऱ्या एका जड पदार्थाला आहे असें मानावें लागेल. आणि दुसऱ्या पक्षीं जेवढें सारे पदार्थ तेवढें ज्ञानरूप आहेत असा निष्कर्ष निघूं पाहातो. परंतु विजातीय पदार्थाला ज्ञानरूप करून टाकण्याची शक्ति एखाद्या जड-पदार्थाच्या आंगीं मानण्यापेक्षां सर्व पदार्थ ज्ञानरूप आहेत असा निष्कर्ष काढून देणारा दुसरा पक्ष निव्वळ चुकीचाच होईल असें आपणास आज तरीं म्हणतां येणार नाहीं. मला तर असें वाटतें कीं, जड शास्त्रांना टिकाऊ करून, त्यांचा चैतन्य शास्त्रांत प्रवेश करून देण्याला हा दुसरा पक्ष कमी मदत करणारा नव्हे. मी आणखी आपल्या मनाच्या खात्रीनें असेंही सांगूं शकतो कीं, ही जड शास्त्ररूपी इमारत नित्य व बदलणाऱ्या पायावर जरी उभारलेली आहे तरी पूर्ण कळसाला येण्याच्या शेवटील वेळी, तिला भक्कम करून सोडण्याचें पूर्णपणें सामर्थ्य, दुसऱ्या पक्षाचें आंगीं आहे. आर्य वेदांताची पाया घालण्याची जागा हा दुसरा पक्ष जेथें पूर्ण होत असेल तेथें आहे; म्हणूनच वर फेकलेला दगड जसा पृथ्वीच्या आकर्षणानें खालीं आलाच पाहिजे, तद्वत् आपल्या उत्क्रांतिदर्शेत वेदांतावांचून गति नसण्यासारखी आज जडशास्त्राची स्थिती झाली आहे. वेदांताच्या विरोधी, आणि धर्मावर धाड घालणारें असें त्याचें स्वरूप आज आसन्नमरण झालें आहे. ह्याला कारण मनुष्याची आत्मप्रवृत्तीच होय. वर्तुल पृथ्वी सभोंवतीं प्रदक्षिणा केली असतां मनुष्याचें येणें जसें अचुक त्याच ठिकाणीं घडतें तद्वत् जड शास्त्रांत मनुष्याची प्रवृत्ति कितीही गढून गेली असली तरी ही जिवंतपणीं आणि मृत्यु पावल्यावर आपली गति काय होईल आणि कोणत्याहि स्थितींत ही जडशास्त्रें आपल्याला साह्य करूं शकतील कीं नाही हा एक प्रश्न चोहोंकडून दाब दिला असतां एखाद्या स्थलाहून जागा सांपडून जोरानें उसळी मारणाऱ्या पाण्याप्रमाणें तिच्यानें थांबवून धरवत नाहीं. मीठ तीखट घालून भाजी कशी तयार करावी ह्या स्वयंपाकांतील संयुक्त ज्ञानाप्रमाणें केवल संयोगमय प्रयोगदर्शेत असणारें जें जडशास्त्र त्याला

अनुमानादि तर्कांनीं मानसशास्त्रादि द्वारा उच्च प्रतीच्या स्वरूपाप्रत जाण्याविषयीं आपल्यातील उत्क्रमण सामर्थ्यानें तयार व्हावें लागतें, हा मनुष्याच्या प्रवृत्तींत असणाऱ्या वरील प्रश्नाचाच प्रताप होय. स्पष्ट अथवा अस्पष्ट व्यक्त केल्याप्रमाणें माझ्या मनात आली आहे अशा प्रकारची जडशास्त्ररूपी भव्य इमारत आपल्या उत्क्रमण सामर्थ्यानें वाढूं लागली असतां, जो वेदांत आज आम्हांला स्वप्नासारखा वाटत आहे त्याला जागृत करून आपल्या मध्य बिंदुस्थानीं बसण्यास जागा खचीत देईल, अशा प्रकारचा खात्रीलायक लेख आजच देण्यास मी नाहीं म्हणत नाहीं. परंतु चित्रकारांनीं आपले डोळे ह्या इमारतीला मातीनें रंगविण्याऐवजी, तेजानें रंगविण्याकडे लावले पाहिजेत. म्हणजे माझ्या म्हणण्याची साक्ष आतांच पटेल. आणि हें फारसें कठीण आहे असेही नाही. कारण प्रत्येक पदार्थाच्या संस्काराला ज्ञानरूपी तेजोमय रंग देणें, नव्हे रंगाचे बनविणेंच कां म्हणाना आपण करीतच आलों आहोत. म्हणून पदार्थाचें कल्पनारूपानें आपण ग्रहण केले म्हणजे त्या पदार्थाविषयींचा स्वाभाविकपणा स्पष्ट व्यक्त होतो. इंद्रियासमोर पदार्थ असला म्हणजे, पदार्थाचा तरंगाकार प्रवाह इंद्रिय ज्ञानापर्यंत येऊन ज्ञानतंतूच्या द्वारानें मेंदूत संचय झाल्यावर मनाच्याद्वारें त्याला एकत्र जुळवून पदार्थाचे अथवा पदार्थ कल्पनेचें स्वरूप आपणच देत असतो. मन हे जर दुसरीकडे लागून राहिले असेल तर पदार्थाचा तरंगाकार प्रवाह स्वाभाविक आकृष्ट गतीनें, मेंदूपर्यंत येऊन पोहोचला असतांही, पदार्थाचें ज्ञान आपणास होत नाहीं, असें विवेकानंद स्वामीनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे तें आपल्यावरील सिद्धांताला पुष्टिप्रद आहे. एवं, मनाच्या द्वारानें मेंदूतील पदार्थ तरंग प्रवाह संचयाला जुळवून आपण पदार्थाचें ग्रहण करीत असतो, म्हणजे त्याचें ज्ञान कल्पनारूपानें सांठवून ठेवितो, ही गोष्ट आर्य वेदांताकडूनही कबूल केल्या जाते. पण भेद इतकाच कीं, पदार्थाचा

तरंगाकार प्रवाह मनापर्यंत जाऊन पोहोचल्यावर त्याचा आपणास ज्ञानमय संस्कार होतो, असें जडशास्त्र म्हणतें; आणि मन आपला तरंगाकार प्रवाह पदार्थापर्यंत पाठवून त्या पदार्थाचा आकार ग्रहण केल्यावर परत येऊन ज्ञानमय संस्कार करुन देतें, असें वेदांत म्हणतो. तथापि, दोघांच्या सांगण्यांत फारसा भेद नाहीं. जसें नदीमध्यें मेघाचें पाणी पडत असतां कांहीं लोक नदीचें पाणी वरचें आहे असें म्हणतात, आणि पृथ्वींतील झऱ्यांतून येणारें पाणी पाहून कांहीं लोक नदीविषयीं तसेंच सांगतात. ह्या दोघां म्हणणाऱ्यांतील जितक्या प्रमाणानें आपणांस सत्यत्व निवडून घेतां येत असेल तितक्याच वरील निरूपणांतून निवडून घेतां येणें साहजिक आहे. अशा प्रमाणें पदार्थ कल्पनारूपांत आल्यावर कल्पना आणि तें एकच असतात. ही इंद्रियसन्निध पदार्थांची गोष्ट झाली. तेंच पदार्थ कांहीं जागामध्यें टाकून अंतरावर असलें म्हणजे आपण त्यांचे ग्रहण अनुमानानें करूं लागतो. इतकेंच नाहीं तर ह्या अनुमानापासून निर्माण झालेली एक तर्कपद्धति, तिच्या द्वारें, प्रत्येक पदार्थाची तुलना आपण क्षणोक्षणीं करीत असतो. परंतु ही तर्कपद्धति म्हणजे तरी काय? तर अनुमानाचेंच एक उत्क्रमणरेषात्मक स्वरूप आहे. अकस्मात् झालेलें ज्ञान, आपल्या अंतःकरणांत दृढ करून टिकाऊपणाचें त्याला स्वरूप देण्यास, ती नेहमी पूर्णपणें मदत करीत असते. पण प्रत्यक्ष ज्ञानास आपणांस तिची विशेष मदत लागत नाहीं; असें यद्यपि आहे, तथापि भ्रम, संशय, इत्यादिस्थानीं प्रत्यक्ष ज्ञानांत तिची मदत घेतल्यावांचून आपणांस कल्पनारूपाप्रत पोहोंचलेल्या ज्ञानाला, टिकाऊं करून सोडण्याविषयी, श्रद्धेपेक्षां ह्या तर्कपद्धतीची कुशलता अधिक आहे. तर्कपद्धतीनें टिकाऊ केलेल्या कल्पनेंविषयीं श्रद्धेला अनुमोदन द्यावेंच लागतें. क्वचित् प्रसंगी श्रद्धेनें तर्कपद्धतीला अनुमोदन न दिल्यास श्रद्धेला आग्रहाचें स्वरूप येऊन, सर्वतोपरी तिरस्कार्य व्हावें लागते. ह्या प्रमाणें कडक व्यवहार जरी चालला असतो तरी भ्रम नसतानां पदार्थाचें प्रत्यक्ष ज्ञान, किंवा

एखाद्या सत्य वक्त्यानें सांगितलेल्या गोष्टीचें ज्ञान आणि तर्कपद्धतीकडून टिकाऊं झालेलें ज्ञान, ह्या तीहींचेही शेवटी निश्चित दशेंत आल्यावर श्रद्धेच्याच हातून रक्षण होत असतें. ह्या श्रद्धेनीं रक्षिलेल्या कल्पनांचेच पुनः पुनः आपल्या पुढेंच मांडून ठेवीत जाणें, म्हणजे कल्पनांचा विस्मृतिरूप लय न होऊं देतां स्मृतिरूपानें त्यांना उद्बुद्ध करीत करीत दृढ करीत असणें, ह्या क्रियेलाच अभ्यास असें म्हणतात. हा अभ्यासच, पदार्थ बाह्य आहेत, अशा समजूतरूप कल्पनेला साह्य घेऊन बाह्य पदार्थांत फेरबदल करून आपल्यास उपयोग करून देण्याविषयीं जेव्हां प्रवृत्त होतो, तेव्हा तो शारिरीक क्रियारूपानें प्रकट होतो. त्यावेळीं ह्या अभ्यासाला विचारसाह्य असला आणि उत्साहहि साह्य असला तर नाना प्रकारचीं जडशास्त्रें तो आपणांस उपयोग करुन देण्यांकरीतां निर्माण करितो. परंतु तशाप्रकारच्या अभ्यासाचा आपणांस तादृश उपयोग नसल्यामुळें वर्णन वाढवून ग्रंथ विस्तार करीत बसण्यापेक्षां ज्या प्रकारच्या अभ्यासाचा येथें आपणांस उपयोग करावा लागतो, त्याचेंच वर्णन करणें योग्य असल्यामुळें तो अभ्यास कोणता, व आपलें कार्य त्याच्या हातून कसें होतें हे आतां पाहूं. पण तें पाहण्यापूर्वी कांहीं गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत. जगांतील पदार्थांचे कर्ता आणि क्रिया असे दोन वर्ग केले तर पहिला चेतन आणि दुसरा जड असा व्यवहार निष्पन्न होतो. हा कर्ता क्रियेपासून भिन्न आहे अशा समजुतीनेंच वेदकालापासून तो आजपर्यंत कायमचे वाद सुरू झाले आहेत. ह्या वादांचा आपआपल्यापरी निकाल लावण्याविषयीं पुष्कळ तत्ववेत्त्यांनीं खटपटही केली आहे. परंतु वादीजनाच्या आग्रहामुळें म्हणा किंवा त्यांच्या पद्धतींत कांहीं चूक असेल म्हणून म्हणा पूर्णपणें यश अजून एकाहि तत्ववेत्त्याला आलेलें दिसत नाहीं. म्हणून आम्हीं आतां त्या वादांत शिरण्यांत काही अर्थ नाहीं, हें जरी घटकाभर खरें धरलें तरी, पूर्वी सांगितलेल्या स्वाभाविक कल्पनाविषयीं यौक्तिक

साद्य देण्याला हा वाद कांहीं मागे घेणारा नव्हे. ह्याची शहानिशा न केली तर आमच्या विचारशृंखलेंतील एक मधलाच दुवा तुटल्यासारखा होतो की काय अशी भिती पडून आम्हीं आतां त्या वादांत शिरत आहो.

आस्तिक व नास्तिक लोकांचा कडाक्याचा वाद आजपर्यंत जरी अनेक वर्षे चालत आहे, आणि त्याचीं कारणें जरी अनेक असलीं, तथापि त्या दोन्ही वादांचे मूळ आपल्या अगदीं हातांतलें आहे. कर्तृप्रधानचेतन खरें धरून आस्तिक आपली प्रमाणें पुढें आणीत असतात आणि क्रिया-प्रधान जडवर्ग खरा धरून नास्तिकवादी आपली प्रमाणें पुढें आणीत असतात. ह्या दोघांमध्यें परस्परावर जोराचा प्रहार चालत असतो. सांप्रत शतकांत सुद्धां अशा एकाही वादाचा विजय झालेला नाहीं. जडवादाचा विजय होईल ह्यावरून नास्तिकवादियांची जितकी खात्री झाली होती अथवा झाली असेल, त्याच वादावरून चेतन वादाच्या विजयाविषयीं तितकीच तत् प्रतिपक्षीयांची झाली आहे. ह्या वादाचा कायमचा निकाल लावण्याकरितां पाश्चात्य बांधव वर्गानी देखील थोडी थोडकी खटपट केली आहे असें नाहीं. या वादांत सामान्य सिद्धांत किती आहेत आणि त्यांचा मेळ कसा पटतो ह्या विषयीं स्पेन्सर साहेबांनीं आपली बुद्धी होईल तितकी खर्ची घातली आहे. श्रीहर्ष मिश्रांच्या पद्धती सारखीच ह्याची कांहीं अंशी पद्धति जुळत आहे. स्पेन्सर साहेबांनीं सर्व शास्त्रावरून जगाच्या मुळाशीं कांहीं तरी अज्ञेय तत्व आहे आणि तें तत्वच कर्तृ क्रिया दोन्ही रूपानें प्रगट झालें आहे असें म्हटलें आहे. पण तें अज्ञेय तत्व काय आहे, ह्या विषयींचा खुलासा त्यांनीं पूर्वी सत्तारूपानें कबूल केल्यामुळें जरी केला नव्हता, तरी आपल्या शेवटल्या ग्रंथांत त्याचें चेत्येत्व त्यांनीं थोडें कबूल केलें आहे. स्पेन्सर साहेबांची पद्धति मोठी वजनदार आहे. त्यांनीं आपल्या पद्धतीनेंच ह्या अज्ञेय तत्वाची सत्ता कबूल केली आहे. स्पेन्सर साहेबांच्या पद्धतींत मनाला अनाकलनीय गोष्टींचा

मुळींच स्वीकार करावयाचा नाहीं, असा खडतर खाडा दिसतो. त्यांनीं धर्म व शास्त्रें ज्याच्या पायावर रचली आहेत असें, सामान्य सिद्धांत ग्रहण करून तें अज्ञेय तत्व आहे असें काढलें. आणि आपलें ज्ञान सापेक्ष असल्यामुळें त्याचें ज्ञान होणें आपल्याला शक्यच नाहीं असें सांगितलें. विश्व स्वयंभू असेल, तें स्वतः निर्माण झालें असेल, त्यांस कोणी निर्माण केलें असेल, विश्वाचें अधिकरण स्वतंत्र किंवा परतंत्र, ईश्वर दयाळू अथवा न्यायी, इत्यादि धर्मांचीं मूलतत्वें अगदी अगम्य ठरवून, द्रव्य, गति, शक्ति, मन आणि अहं इत्यादि शास्त्राचीं मूलतत्वें हीं अगदी अगम्य ठरविलीं आहेत. व ह्या अगम्य मूलतत्वावरच सर्वांची एकवाक्यता केली आहे. स्पेन्सर साहेब म्हणतात, ह्या अगम्य तत्वांचें ज्ञान आपणांस जरी होत नसलें तरी, ते नकारात्मक नसून, होकारात्मक आहे. पण त्याचे मनानें आकलन होणें मुळींच शक्य नाहीं. पण ज्यांचें मनानें आकलन होतें, तें तरी काय आहे ? तर अज्ञेय तत्वांचाच नानाविधरूपानें प्रादुर्भाव. परंतु स्पेन्सर साहेबांनीं मन व अहं हे अज्ञेयच ठरविल्यामुळें, अज्ञेयानें अज्ञेयाचें आकलन कसें काय करावयाचें ? म्हणून स्पेन्सर साहेब मनानें आकलन होत नाहीं, असें म्हणतात हें खरें. परंतु मनानें आकलन होणें म्हणजे काय ? मनानें आकलन होणें हे होकारात्मक आपल्याजवळ कांहीं तरी असल्याशिवाय, दुसऱ्या ठिकाणीं त्याची नकारात्मक साक्ष देणें, असें अज्ञापासून तो सर्वज्ञापर्यंत कोणाचेंच मन सांगत नाहीं, ही माझी खात्री आहे; म्हणून ह्या प्रश्नाचा निकाल लावणें अगदीं जरूरीचें होतें. परंतु तो लाविला आहे ह्या विषयीं स्पेन्सर साहेबांचें वाक्य माझ्या वाचण्यांत तरी निदान अजून आलें नाहीं, व तें कोठें असेल ह्याविषयीं मला कोणी बातमीही दिली नाहीं, म्हणून, तशा वाक्याचा शोध लागेपर्यंत तरी, आम्ही आपला मुद्दा घेऊन चालतो. शोध लागल्यावर आम्ही माघार घेण्यास कांहीं मागें पाहणार नाहीं. गृहीत धरण्यासारख्या खुळचट

पद्धति स्पेन्सर साहेबाला पसंत नाहींत. तरी, तर्कपद्धतीसारख्या ज्ञानाला टिकाऊ करून सोडणाऱ्या पद्धति स्पेन्सर साहेबाला पसंत आहेत. परंतु ह्यांत तरी, "मनानें आकलन होणें म्हणजे काय ?" ह्या प्रश्नाचा निकाल कोठें लागतो ? पण ह्यालाही अज्ञेयत्वच जर उत्तर आलें, तर मीमांसा करावयाचें संपलें. प्रत्येक मनुष्याचा विचार लंगडा पडला. पण स्पेन्सर साहेबानेच "प्रश्नाला कांहीं तरी उत्तर आल्यावांचून समाधानच होत नाहीं" असें जें म्हणून ठेविलें आहे, त्या वाक्याचा प्रयोग येथें कां लागू पडूं नये ? सर्व शास्त्रांचा सामान्य सिद्धांताचा जसा विचार केला आहे, त्याप्रमाणें हांही प्रश्न सर्व शास्त्रांत अगदी सामान्य असल्यामुळें त्याचा निकाल लावणें अगदीं जरूरीचें होतें. ह्याचा निकाल तर्कपद्धतीनें लागतो किंवा नाहीं, हा प्रश्न मध्ये उद्भूत होईल हें आम्हीं जाणून आहोत. परंतु अशाप्रकारचें ज्ञान आपणांस होऊं शकतें, अशा प्रकारचें ज्ञान आपणांस होऊं शकत नाहीं या उभय नियमावर तर्क पद्धतीवाचून या उभय नियमाचें मनानें कसें काय आकलन होतें ? ह्या प्रश्नाचा जोपर्यंत निकाल लागणार नाहीं, तोपर्यंत एतत् जातीयवरील प्रश्नाचा निकाल लावणें तिच्याकडून होणें संभवनीय नाहीं, असें आमचें स्पष्ट मत आहे. आतां तर्कपद्धतीचे नियमही अनाकलनीय आहेत, तर सर्व तर्क पद्धतीच अनाकलनीय ठरली. मग शून्याची बेरीज जशी शून्यच येते, तद्वत् अनाकलनीयापासून अनाकलनीयच जर उत्तर निघालें तर त्यांत मीमांसा ती कशी झाली ? अमुक गोष्टीचें मनानें आकलन होत नाहीं, असें जेव्हां आपण म्हणतो, तेव्हा ज्या गोष्टीचे मनानें आकलन होतें, त्या गोष्टीशी तुलना करून पाहतो आणि तशा तुलेमध्यें बरोबर न उतरलें म्हणजे त्याला आपण अनाकलनीय किंवा अज्ञेय असें नांव देतो. पण ही अनाकलनीयता तर्कपद्धतीच्याच द्वारानें निष्पन्न झाली असल्यामुळें आकलनीय वाटणाऱ्या व्यवहाराकडून तर्कपद्धतीला आपल्या विषयीं

कायमची तिलांजली घेण्याचा प्रसंग येतो. अज्ञेय शक्तीही ज्ञेय दशेंत कशी काय येते, या प्रश्नाचें उत्तर आपणांकडून देतां न आलें तर अज्ञेयाच्याच कोटींत त्याला ढकलण्यासारखें होत असल्यामुळें तर्क पद्धतीनें आपल्याला कळत नाहीं, असें एकवेळ ठरल्यावर कारणकार्यात्मक सर्व व्यवहार आपल्याला आंधळ्यासारखा करण्याची पाळी येते. म्हणून वरील प्रश्नाचा निकाल लागल्याशिवाय अशा प्रकारचा तात्विक सिद्धांत बांधणें, हें दुर्घट पणाचें खरें. तथापि कर्ता आणि क्रिया हें एकाच शक्तीचे परिणाम स्पेन्सर साहेबांनी सिद्ध करून दिले आहेत, ही गोष्ट त्यांच्या महत्तेला शोभा आणणारी होय. परंतु अज्ञेयत्वामुळें व्यक्तिशः एकत्व किंवा अनेकत्व सांगता येत नाहीं, म्हणून अज्ञेयता जातीमुळेंच एकत्व ग्रहण करून अशा प्रकारचें निरूपण स्पेन्सर साहेबांनीं निर्धास्तपणें पुढें आणिलें आहे. परंतु छायाचित्रयंत्रांत ( कॅमेरा ) उलट आकृतीरूप छाया आली नाही तर सुलट आकृति आपणाला पत्रावर काढतांच येत नाहीं. तद्वत् कोणत्याही रीतीनें कां म्हणाना, परंतु मनावर एक परिणामात्मक दशा आणतां आल्याशिवाय ती गोष्ट मनापुढें आणून निरूपण करतां येत नाहीं. ज्याची ती परिणामात्मक दशा तेंच मनाला अनाकलनीय, असें आपणाला म्हणतां येईल. म्हणून काय झालें ? वरील प्रश्न जशाचा तसाच राहतो. मेंदूंत आलेले तरंगाकार प्रवाह, एवढ्यापुरतेंच मनाचे आकलन ठरविले, तरी देखील मोठा घोटाळा होण्याचा संभव आहे, कारण, गृहीत धरण्यानें, किंवा भीति आदिक मनोविकारानें, अथवा इंद्रियाच्या बाह्य तरंगग्राहक ज्ञानानें, मेंदूंत ठसे उमटूं शकतात. अशा प्रकारचे मनाला आकलनीय म्हणून विश्वास ठेविला तर तर्कपद्धतीला बऱ्याच ठिकाणीं फाटा द्यावा लागेल. सारांश, वरील प्रश्नाचा निकाल लावणें हें बरेंचसें अवघड आहे. तरी त्याच्या विषयी अगदी उदासीन राहणें उपयोगाचें नाही. पदार्थांच्या जीवित क्रमांतील ज्या ज्या गोष्टींचें सामर्थ्य मनामध्ये आहे त्याच्या योगानेंच

तशा प्रकारच्या गोष्टीवर अवलंबून असणाऱ्या वस्तूचें मनाला आकलन होऊं शकते. मग त्या गोष्टी स्थूल असोत अथवा सूक्ष्म असोत. जगांत जेवढ्या कांहीं संस्कार्य गोष्टी असतील, तेवढ्या संस्कर्तृ सामर्थ्यांतील कोणत्याना कोणत्या तरी अंशामध्यें गुरफटलेल्याच आहेत. पण हें सामर्थ्य म्हणजे तरी तशा प्रकारच्या दशेंत येतां येणें, यांवांचून दुसरें कांहीं नाहीं. शक्ति आणि सामर्थ्य हे पर्याय आहेत. अमुक कार्य आपल्याला विद्युतच्या सामर्थ्यानें करतां येतें, म्हणजे काय? तर पूर्वी असलेल्या स्थितींतून तिला एका विवक्षित परिस्थितींत आणतां येतें हेंच होय. हाच नियम मनासही अगदीं तंतोतंत लागू आहे. तुमचें मन ज्यावेळीं विकाराचें बनलें असेल, त्या परिस्थित्यनुरूप जडशास्त्राप्रमाणें बाहेरून आलेल्या तरंगप्रवाहानें म्हणा, किंवा वेदांताप्रमाणें आंतून आलेल्या तरंगप्रवाहानें म्हणा, एखाद्या वस्तूची ओळख करून घेणें, हेंच त्याचें आकलन करणें होय. ही ओळख दुसऱ्या एखाद्या ओळखीनें नाहींशी होणारी असली, किंवा तुच्छ दशेंत जाणारी असली, म्हणजे ती आपल्याला निरुपयोगी अशी ठरली, तर त्या झालेल्या ओळखीला आपण भ्रांति म्हणतो व ती तशी नसली तर "ज्ञान" म्हणतो. बहुतेक ज्ञान हें टिकाऊ असते. मग ते आपल्यास अनुकूल असलें तर प्रियपणानें टिकाऊ होऊन राहाते. व प्रतिकूल असले तर तिरस्कार्य, पण टिकाऊ होऊन राहते. अशी ओळख ज्याची पटते त्यालाच आपण ज्ञेय म्हणतो. ही ज्ञेय ज्ञानाची निवड करण्यास देखील आपल्यास एक पद्धति पाहिजे असते. पण त्या पद्धतीला ज्ञेयाच्या कोटींत घालावें कीं, ज्ञानाच्या कोटींत घालावें ही बाब बरीच संशयाची आहे. तथापि हिला ज्ञानाच्या कोटींत घातलें असतां, घालणारी पद्धति पुनः कोणत्या कोटींत घालावयाची, अशा प्रकारानें परंपरा येऊन अनवस्था येते. आणि ज्ञेयाच्या कोटींत घातलें तर सर्वच पद्धति ज्ञेय झाल्यामुळें ज्ञानाची ओळख होण्यास कठीण पडेल, कारण पद्धति, मग ती, मनोवृत्तीरूपाच्या एकत्वामुळें आपल्या सजातीयासह

स्वकोटींतच समावेश करणार. तथापि, पहिल्या प्रश्नापैकीं दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तराला थोडीशी जागा आहे. ज्ञानाला शोधून काढण्याचें काम ज्ञेयाचा आश्रय करून होणें शक्य दिसत नाहीं, कारण ज्ञेय म्हणजे तें ज्ञानाच्या आटोक्यांत आले पाहिजे. म्हणून ज्ञानाचा शोध करून काढण्यास जी जी आपण पद्धति तयार करूं तिचा तिचा यत्न ज्ञानाला ज्ञेय ठरविण्याकडेच होणार आहे, म्हणून सर्व पद्धति ज्ञेयाच्या कोटींत घालून, ज्ञानाविषयींचा शोध केला पाहिजे. पण अशा शोधांतीं ज्ञान हें केवल ज्ञेयाला प्रकाशक रीतीनेंच उरतें. परंतु ज्ञेयाचा अभाव असतांही ज्ञानाचें अस्तित्व सिद्ध आहे, येथूनच आर्यतत्व पद्धतीला सुरवात होते. ज्ञेयाच्या भाव कालीं आणि अभाव कालीं ज्ञानाजें जे अविकार्य असणें, ह्यालाच आर्य वेदांतांत कूटस्थ किंवा आत्मा म्हणतात. तथापि, आर्य वेदांताच्या मतानें हा संपूर्ण आत्मपरिचय नव्हे. वरील ज्ञानच जेव्हां ज्ञेयानुसार आपले एकत्व सोडून नानात्व ग्रहण करिते, तेव्हा त्याला तें मन म्हणतात. सांख्य तत्ववेत्ते ज्ञेय ज्याअर्थी जाणल्या जातें, त्या अर्थी ज्ञान आहे असें आपल्याला अनुमानानेंच ग्रहण करावें लागतें; त्यांत ज्ञानाचा प्रत्यक्ष शोध लागणें अगदीं अशक्य आहे असें प्रतिपादन करितात. वेदांततत्ववेत्ते यांची पद्धति सांख्यासारखीच असून थोडीसी निराळी आहे. ते म्हणतात. कीं, ज्ञेयावरून ज्ञानाचें अनुमान करण्यापक्षीं विवेचन चांगलें होत नाहीं. कारण, ही अनुमापक पद्धति ध्यानाच्या आटोक्यांत येत असल्यामुळें ज्ञेयाच्या कोटींत जाऊं पाहातें. म्हणून त्या पद्धतीपूर्वीं ज्ञान आपल्याला स्वीकारले पाहिजे; आणि मग ज्ञेयाच्या अनुमानावरून ज्ञान काढावयाचे हा पक्षच उत्पन्न होणें संभवत नाहीं. येवढ्याकरितां, ज्ञेय सर्व काढून टाकून जे उरत असेल, तेंच ज्ञान असें तें प्रतिपादन करतात. हें ज्ञान सर्व ज्ञेय काढल्यामुळें आपल्या स्वरूपांवांचून दुसरें कोणत्याच रीतीनें राहात नाहीं व राहणें शक्यही नाहीं. कारण भाव व अभाव हे दोन्ही ज्ञेयाच्या कोटींत

असल्यामुळें ज्ञेय काढतांना ते दोन्ही निघून जातात. परंतु आपण आपणाला काढून टाकणें अशक्य असल्यामुळें, तें ज्ञान आपल्याहून भिन्न राहात नाहीं. ही गोष्ट गृहीत धरण्यासारखी कित्येकांना वाटेल, परंतु गृहीत धरलेली गोष्ट ज्ञेयाच्या कोटींत असून ती काल्पनिक असतें म्हणजे जशी गृहीत धरतां येते तशा ती सोडवल्याही जाते. परंतु हा नियम ज्ञानास लागूं नसल्यामुळें, तें गृहीत नाहीं, अशी कोणत्याही विचारी मनुष्याची खात्री होईल. ही दृश्यांतून ज्ञान निराळें काढण्याविषयींची पद्धति झाली. पण द्रष्टा म्हणजे अहम् ह्यांतून देखील हें ज्ञान निराळें काढतां येतें असें त्यांचें मत आहे, "मी अमुक आहे" अशा शब्दाच्या अर्थरूप प्रत्ययाला जेव्हां आपण ग्रहण करितो, तेव्हां ह्यांतील अमुकपणा सोडून देऊन बाकी राहिलेली आपली स्थिति व वरील दृश्यांतून काढलेलें ज्ञान, हें दोन्ही एकच आहेत. पण ह्या गोष्टी कल्पनेनें मात्र सिद्ध होत नसून ज्या ज्या कल्पना आपणांस येत असतील, त्या द्रष्टादृश्यात्मक औपाधिक कल्पनांचें तटस्थपणानें निरिक्षण केलें म्हणजे वरील सिद्धान्त कोणाच्याही ध्यानांत एकदम सहज येण्यासारखा आहे. आपलें व्यक्तीत्व तें हेंच. हें सांपडल्याशिवाय मरणानंतर आपण कसे राहतो हें समजणें शक्यच नाहीं. जिवंतपणीं शरीराहून निराळे राहण्याचा मार्ग हा आहे. मरणानंतर आपणांस राहतां येते किंवा नाहीं, या प्रश्नापेक्षीं आपणांला शरीराहून निराळे राहतां येते किंवा नाहीं, हा प्रश्न अधिक व्यापक व महत्वाचा आहे. हा प्रश्न सुटला म्हणजे पहिल्या प्रश्नाविषयीं वादही उपस्थित होत नाहीं. म्हणून तशी एक पद्धति वेदांतियांनी ग्रहण केली आहे. परंतु ती तर्कपद्धतीच्याच तोडीची असून आपलें स्वत्वनिश्चय करण्याची तिच्यांत सुधारणा असल्यामुळें कोणत्याहि विचारी मनुष्याला ती योग्य वाटणें साहजिक आहे. आणि ज्ञान वेगळे काढण्यास तिचीच बहुशः मदत होते. ज्ञेय आपल्याला जेव्हां स्पष्ट दिसूं लागते, तेव्हां आणि तें दिसत नाहीं तेव्हां,

ज्ञान हें प्रकाशक आहे, अशी खात्री करून देण्यास या पद्धतीचा हातखंडा आहे. जडशास्त्रवादी थोड्या बहुत प्रमाणानें या पद्धतीचेंच अनुसरण करितात. तरी, त्यांच्या हाताखालून ही महत्वाची गोष्ट सुटून जाते. संस्कार व विचार ह्या दोन्ही प्रकारच्या ज्ञानांत ज्ञेयाशिवाय दुसरें कांहींच भरलेले नसतें. हें आपल्याला जडवादाच्या रीतीनें सिद्ध करण्यास देखील कठीण पडत नाहीं. शब्दार्थप्रत्ययानें संस्कार किंवा विचार जेव्हां पुढें येतो, तेव्हां आपल्याला लक्षण किंवा स्वरूप असें काढतां येते. पैकीं, लक्षण हे आश्रित आणि स्वरूप हें आश्रय असतें. कसें आणि काय या प्रश्नार्थक दोन शब्दांच्या अर्थरूप उत्तरांत त्यांचें असणें निश्चित सांपडतें. हें लक्षण आणि स्वरूप, आश्रितआश्रयपणानें एकत्र होऊन ज्या नांवाखालीं मोडतें, तेच त्याला पदार्थत्व येते. अशा पदार्थांचें तरंगाकार प्रवाह ज्ञानतंतुद्वारा मेंदूत जाऊन ठशाच्या रूपानें पुढें येऊन राहिले म्हणजे संस्कारात्मक ज्ञान होते, आणि त्यालाच कांहीं विशेष चळवळ मिळून योग्य वाटेल तो ठसा मजबूत करून घेणें ह्याला विचारात्मक ज्ञान म्हणतां येईल.

( अपूर्ण )

श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ईशावास्योपनिषत्

## ( भाषाविवरण-स्फूट )

ईश्वरें आच्छादिले समस्त । जगतीवरी जे जगत ।
यालागीं न इच्छूनि कवणाचे वित्त। होऊनि विरक्त ब्रह्म रक्षण ॥१॥

भगवान् भाष्यकार म्हणतात, ईश धातु ऐश्वर्याविषयीं आहे. ह्याच्या क्विप् प्रत्ययाचा लोप झाल्यामुळें कृदंतिक रूप इट् असें झाले. त्याची तृतीया ईशा म्हणजे ईश्वरानें अशी होते. कोणी शंका करील कीं ईश्वर सर्वांचा नियामक म्हणजे स्वामी, ईशिता कसा होऊं शकेल? कारण नियमन करणें हा धर्म शुद्ध ब्रह्माचे ठिकाणीं संभवत नाहीं, व क्विप् प्रत्यय तर कर्तरि म्हणजे कर्त्याला ग्रहण करून होतो. त्याचा वास्तविक असा अर्थ आहे कीं, हा क्विप् प्रत्यय जेथें यत्नवान् क्रियेचे ग्रहण आहे तेथे होतो. अयत्नवान् क्रियेच्या ठिकाणीं होत नाहीं. उदाहरणार्थ, बीजापासून झाड होते पण येथे बीजाचे ठिकाणीं झाड उत्पन्न करण्याची यत्नवान् क्रिया नसल्यामुळें क्विप् प्रत्यय होत नाहीं. पण मनुष्य पश्वादिकांचे ठिकाणीं हा प्रयत्न असल्यामुळें त्याचें ठिकाणीं क्विप् प्रत्यय लावतात. पैकीं पश्वादिकांपेक्षां मनुष्याचें ठिकाणींच त्याचा जास्त उपयोग करतात. सारांश यत्नवान क्रिया आहे तेथेच क्विप् प्रत्यय होतो. शुद्ध ब्रह्माचें ठिकाणीं तर यत्न संभवत नाहीं. कारण जेथें निर्मातुरिच्छा संभवते तेथेच यत्नहि संभवतो व शुद्ध ब्रह्माचे ठिकाणीं तर इच्छा संभवत नाहीं, म्हणून त्याचें ठिकाणीं क्विप् प्रत्यय होत नाहीं; दुसरें कित्येक ब्रह्माचें ठिकाणीं स्पंद मानतात. त्यांचा स्पंद

प्रदीपिका नामक उत्पलाचार्यकृत ग्रंथ आहे त्यात ब्रह्म कंपनमात्र आहे असें सांगितलें आहे. थिऑसोफिस्ट (पारकीय) ब्रह्माचे ठिकाणीं थरथराट (Vibrations) मानतात. वरप्रमाणें हें ब्रह्म जर संकल्परूप किंवा कंपन मात्र मानलें तर समीचीन होणार नाहीं. कारण असें मानणाऱ्यांना आम्ही असा प्रश्न करितो कीं, ब्रह्म संकल्परूप आहे असें कोण जाणतो? त्याचें ठिकाणीं असणारा चलविचलपणा जाणतो? कीं स्थिरपणा जाणतो? प्रथम पक्षीं, चंचलपणाला जाणणारा दुसरा चंचलपणा मानला तर त्या दुसऱ्या चंचलपणाला जाणणारा तिसरा चंचलपणा मानावा लागेल व तिसऱ्यास जाणणारा चवथा मानावा लागेल. याप्रमाणें अनवस्था प्रसंग येतो. दुसऱ्यापक्षीं, चंचलपणाला जाणणारा स्थिरपणा मानला तर एक चंचलपणा व दुसरा स्थिरपणा असें दोन ब्रह्म मानावें लागल्यामुळें गौरव दोष येतो. ब्रह्म संकल्परूप नसून अक्रिय आहे. ज्याचें ठिकाणीं संकल्प नाहीं, तेथें क्रिया संभवत नाहीं. आतां कोणी असें म्हणतील कीं, चेतनाचें ठिकाणीं इच्छा वगैरे अवश्य असली पाहिजे; तर हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण सुषुप्तींत चेतन असतेंच पण तेथें इच्छा वगैरे कांहींच रहात नाहीं. इच्छा असली तर तेथें चेतन असूं शकेल. पण चेतनाचे ठिकाणीं इच्छा संभवत नाहीं. चेतन म्हणजे प्रकाशमात्र. जड हे प्रकाश्य आहे. जे स्वतःला किंवा दुसऱ्याला प्रकाशित करूं शकत नाहीं; तें चेतन होऊं शकत नाहीं. चेतन संकल्परूप नसल्यामुळें त्याचें ठिकाणीं इच्छा संभवत नाहीं; पण जेथे जेथे इच्छा आहे तेथे तेथे चेतनाचा आश्रय असला पाहिजे. हे अनुमान बहुतेक वेदांतियांना माहित नाहीं; हें अनुमान लक्षांत नसलें तर प्रस्थानत्रयपढलेल्या पुरुषास पुष्कळ प्रश्नांचा उलगडा करितां येत नाहीं.

ब्रह्मसूत्र अध्याय १, पाद १, सूत्र ५.

या सूत्राच्या भाष्यांत भाष्यकार म्हणतात कीं, इच्छा वगैरे चेतनांतच होतात, जडांत होत नाहींत. आतां वरील अनुमान माहीत नाहीं,

असेंच बहुतेक सर्व वेदांती सांपडतात. त्यांना मी असा प्रश्न करितो कीं, सर्व वासनांचा ज्याच्या योगानें क्षय होतो, अशा चेतनाचें ठिकाणीं इच्छा संभवतात हें कसे ? कारण सर्व वासनाचा क्षय झाल्याशिवाय मुक्ति होत नाही, व चेतनाचें ठिकाणीं इच्छा मानल्यास कोणीच मुक्त होऊं शकणार नाहीं; व जीवेश्वर ऐक्य होणार नाहीं, या प्रश्नांचें उत्तर हें वेदांती देऊं शकत नाहींत. सारांश जेथे चेतन आहे तेथे इच्छा नाहीं पण इच्छा मात्र चेतनाचा आश्रय करून असते. पुनः चेतन हेंच इच्छामय आहे, असें मानल्यास हेहि बरोबर नाहीं; कारण, जेव्हां आपणांस एखाद्या पदार्थाची इच्छा होते, तेव्हां मन त्या पदार्थाच्या आकाराचें होतें. उदा. आपल्याला साखर खावयाची इच्छा होते, तेव्हां साखर आपल्या मनांत येते, म्हणज मन त्या साखरेच्या आकाराचें होते. तेथें ही मानासिक साखर खावी असे आपण इच्छित नाहीं; यावरून साखरेला जाणणारा पृथक आहे. तो जाणणारा इच्छास्वरूप असता तर त्यानें इच्छेला जाणलें नसतें, याचा स्पष्टार्थ असा. इच्छा इदंप्रत्ययगोचर असून त्या इच्छेला जाणणारा अहं प्रत्ययगोचर आहे. अहं व इदं हे एक होऊं शकत नाहींत. म्हणून इच्छा चैतन्यरूप नाहीं. यामुळें ब्रह्म हें आक्रिय आहे हें सिद्ध आहे; व म्हणूनच त्याचें ठिकाणीं क्विप् प्रत्यय होऊं शकत नाहीं. कारण हा प्रत्यय कर्त्तेपणाला घेऊन असतो, हें मागें सांगितलें आहे. पण या शंकेचा आम्ही अंगीकार व तिरस्कार करतों. उदाहरणार्थः— एखाद्यानें स्त्रीसंगाचा अनुभव सांगितल्यास तो आम्हीं खरा मानूं. लहान पांच वर्षानें स्त्रीसंगाचा अनुभव सांगितल्यास त्याचा आम्ही तिरस्कार करून, त्याला आम्ही दोन थोबाडींत देऊन विचारूं कीं, कारे बेट्या ! इतक्या अल्पवयांत तूं स्त्रीसुख कसें अनुभवलेंस ? पण तोच अनुभव मोठ्या मनुष्यानें सांगितल्यास आम्ही त्याचा अंगीकार करूं. त्याप्रमाणें ब्रह्म अक्रिय आहे, असें जर एखाद्या सिद्ध पुरुषानें सांगितले तर त्याचें

म्हणणें अंगिकार्य आहे; कारण हा खरा सिद्धांतच आहे. व हाच सिद्धांत वेदांतशास्त्र शिकून काढावा लागतो. पण हाच सिद्धांत जर एखादा साधक प्रतिपादन करूं लागला तर त्याच्या म्हणण्याचा आम्ही तिरस्कार करूं. कारण स्वप्नांतील रोगाला स्वप्नांतील औषध देऊनच बरा करावा लागतो, त्याप्रमाणें जो पर्यंत अज्ञान आहे तो पर्यंत शुद्ध सत्वोपहित ईश्वरप्रणीत वेद ज्ञानानेंच त्या अज्ञानाची निवृत्ति करावी लागते; किंवा मिथ्या बंधन मिथ्या गुरु, वेदापासूनच निवृत्त होणें इष्ट आहे. शुद्ध चैतन्याचें ठिकाणीं व अत्यंत जडाचे ठिकाणीं इच्छा नाहीं, पण जेथें चैतन्याचा व जडाचा अभेद संभवतो तेथेंच इच्छा संभवतात, म्हणजे मनाचे ठिकाणींच इच्छा संभवते. योगवासिष्ठकार म्हणतात कीं, मन हें घड जडही नाहीं व चेतनही नाहीं. हा जडाचा व चेतनाचा मिश्रणरूप अध्यास आहे. उदाहरणार्थः—तापाच्या मनुष्याला साखर कडू लागते. वास्तविक साखर कांहीं कडू नसतें. तर पित्तदोषामुळें तापाच्या माणसाला त्या साखरेवर कडूपणाचा अध्यास होतो. दुसरें उदा० कावीळ झालेल्या माणसाला उन पिवळी दिसतें. त्याप्रमाणें चैतन्याच्या ठिकाणीं जडाच्या संसर्गामुळें अध्यास होतो. कारण चेतन स्वरूपतः उत्पन्न होत नाहीं. तर हा अध्यास अविद्या आणि आत्मा यांच्या संयोगानें संभवतो. ‘ ईक्षतेर्नाशब्दात् ’ या सूत्रांत चैतन्याचें ठिकाणीं इच्छा संभवतें असें जे भाष्यकारानें म्हटलें आहे, ते सिद्धाकरितां म्हटलें नसून जडकारणवादी जें सांख्यादिक त्यांच्याकरितां म्हटलें आहे; वास्तविक चेतनाचे ठिकाणीं इच्छा संभवत नाहीं असा या सूत्राचा अभिप्राय आहे. मायोपहित चैतन्याचे ठायीं कर्तृत्वादि संभवत असल्यामुळें त्याचें ठिकाणींच स्वामीपणा, इच्छा वगैरे संभवतात. याविषयीं “कंपनात्” अध्या० १ पाद० ३, सूत्र ३९ यांत सांगितलें आहे. **सूत्रार्थः**— ज्याच्या योगानें हे जगत् थरथर हालत असते तें चेतनच असलें पाहिजे. हा स्पंद ( कंप ) मायावी चेतनांतच घेतला

आहे. कंपवादी ईश्वरप्रत्यभिज्ञाशास्त्रवादी मायावी चेतनापर्यंतच गेलेले आहेत. शुद्ध चेतन त्यांना समजलें नाहीं. ते मायावी प्रभूच स्वामी होणें संभवनीय आहे. आतां कोणी शंका करतील कीं प्रभू स्वामी झाल्यावर सेवक जो जीव त्यांचें ईश्वरासी ऐक्य होणार नाहीं; तर ईश्वर व जीव यांचा नित्य भेद संभवेल. ही शंका बरोबर नाहीं. या ठिकाणीं पुष्कळ टिकाकारांना आनंदगिरीच्या म्हणण्याचा अर्थ बरोबर समजला नाहीं. आनंदगीरीची टिका मलाही संमत आहे. कारण त्यांनीं जीवेश्वराविषयीं बिंबप्रतिबिंबवाद स्विकारला आहे. जसे दर्पणांत पडलेल्या प्रतिबिंबाच्या अपेक्षेनें आपल्या मुखाकडे बिंबत्व येते. पण वास्तविक बिंबत्व शब्दानें आपल्या मुखांत कांहीं एक फरक होत नाही. दर्पणांतील प्रतिबिंब आपल्या बिंबत्वारोपावच्छिन्न मुखाच्या स्वाधीन आहे. आपण जसें तोंड हालवूं तसे दर्पणांतील प्रतिबिंबही हालते. आरशाप्रमाणें तें जडासारखें परतंत्र आहे. तात अमृतानुभवांत म्हणतात.

कां बिंब प्रतीबींबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक ।
तैसें द्वैत मिषें एक । बरवत असे ॥ अध्याय १ ओवी २५

**अर्थः**— बिंब प्रतिबिंबाचे प्रकाशक आहे, व प्रतिबिंब बिंबाचे अनुमापक आहे. असें द्वैतमिषानें एकच ब्रह्मस्वरूप सर्वत्र विलसत आहे. याठिकाणीं आनंदगिरीनें नानाजीववाद स्वीकारला आहे. व ओवींत एकवचन असल्यामुळें तातांनी एकजीववाद घेतला आहे. अविद्येंत पडलेलें प्रतिबिंब तो जीव; व त्याच्या अपेक्षेनें ब्रह्मावर ईश्वरत्व आलें आहे. ते ईश्वरत्व चेतनमय असल्यामुळेंच ब्रह्म हे नियमनकर्तें होऊं शकते हा जीवेश्वरभेद अविद्या कल्पित आहे. कल्पित भेदानें स्वामी सेवक संबंध जाणतो. आतां जीवाच्या अपेक्षेनें ब्रह्मावर ईश्वरत्व आलें आहे. पण ईश्वर ब्रह्मच आहे. बिंबत्व त्याच्यावर शद्बमात्र मिथ्यारोप आहे. कारण प्रतिबिंबाला

जशी मिथ्यासत्ता आहे तितकीही आपल्या ठिकाणीं नाहीं. आपल्या ठिकाणीं शद्बमात्र आरोप आहे. त्या प्रमाणें ईश्वरत्व जीवाच्या अपेक्षेनें शद्बमात्र आरोपित आहे; वास्तविक तें ब्रह्मच आहे व तो ईश्वरत्व धर्म मिथ्या आहे. कारण त्याठिकाणीं जीवाच्या अपेक्षेनें आलेला जो कल्पित धर्म त्याचा अध्यास आहे. तें ब्रह्म कल्पित धर्मानें ईशिता होऊं शकते. याठिकाणीं भाष्यकार, आनंदगिरी व श्री ज्ञानेश्वर महाराज प्रतिबिंबवाद स्वीकारतात. आनंदगीरी नानाजीववाद स्वीकारतात व तात एकजीववाद घेतात. नानाजीववादानेंही कांहीं हानी होत नाहीं. कारण ईश्वर एकच आहे. स्वामीविद्यारण्य ईश्वर व जीव दोन्ही प्रतिबिंब मानतात. असें म्हणणें मात्र बरोबर नाहीं; कारण येथें ईश्वराच्या व जीवाच्या अशा दोन उपाधीचा बाध करावा लागतो; आणि ईश्वराला प्रतिबिंब मानल्यास त्याला दुसऱ्या बिंबाच्या स्वाधीन राहावें लागेल. म्हणजे एक स्वतंत्र परमेश्वर मानावा लागेल. पण असें मानण्याची येथें गरज नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्म ईशिता म्हणजें स्वामी होऊं शकते. म्हणूनच आचार्यांनीं भाष्यांत् 'ईशिता' शद्ब घातला आहे. तरी तो ईशिता जीवरूपी प्रतिबिंबापेक्षीं बिंबत्वारोपावच्छिन्न आहे; म्हणजे वाच्यांश मात्र आहे. पण सिद्धदृष्टीनें म्हणजे लक्षांशानें पाहिले असतां सर्व एकच आहे. म्हणजे तो ईशिता अक्रियच आहे. म्हणूनच भाष्यांत परमात्मा शद्ब घातला आहे. तोच नियमनकर्त्ता असून सर्वांचा आत्मा आहे. त्यानें आपल्या लक्ष्यांश रूपी ब्रह्मस्वरुपानें हें जगत् आच्छादिलें आहे; म्हणजे हें जगत, जगत् रुपानें नसून ब्रह्मच आहे, असा भाव.

॥ श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

(अपूर्ण)

|| श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ||

# अथ वेदान्तप्रक्रिया समुच्चय

ॐ नमः श्री आळंदीपति । त्रैलोक्यव्यापी तुझी दीप्ती । आत्मा देऊनी दैवी संपत्ती । स्वपद प्रेमार्ती बाहवावी ॥१॥ तरी तुज जाणावया । ज्या ज्या उपयोगी प्रक्रिया । त्या वेदांतमात्राश्रयोनिया । प्रकटलिया कीं ॥२॥ तिया समस्तांचा । एकोपा करोनी साचा । यथानुभव यथावाचा । प्रकाशू इच्छीं ॥३॥ तरी तिया इच्छेचें फळ । माझीये मुखीं घालोनि तत्काळ । माउलीपणाचें यश सकळ । स्वीकारावें स्वामी ॥४॥ लोकांसी बोधू होवावा । ऐसा उत्तम ग्रंथ निफजावा । हा आडसू आघवा । चित्ती नाहीं ॥५॥ कीं होवावी आपुली ख्याति । यदर्थ नोहे ग्रंथप्रवृत्ती । स्वबोधशुद्धीची आर्ती । अत्यंत मनीं ॥६॥ म्हणोनी ब्रह्मविन्निकषाश्म । त्यांचें चरणी धरोनि प्रेम । स्वज्ञानशुद्धी परम । ज्ञातुमिच्छीं ॥७॥ अथवा जागृती पासूनी सुषुप्तीवरी । कीं जन्मलीयापासून मरणापूर्वी । तरी वेदांतचिंतनी कुसरी । घालावा काळ ॥८॥ ब्रह्मचिंतन ब्रह्मभावन । परस्पर ब्रह्मबोधकरण । ऐसें ब्रह्मपरत्व तें वेदांतचिंतन । बहुत प्रमाण येविषयीं ॥९॥ "आसुप्तेरामृतेः कालं नयेद्वेदांतचिंतया । तच्चिंतनं तत्कथनं तदन्योन्यप्रबोधनं । एतदेकपरत्वंच ब्रह्माभ्यासं विदुर्बुधाः" ॥१०॥ एवं परोक्षब्रह्मवेदांतचिंतन । श्रुति सांगे तच्छब्देंकरून । आतां अपरोक्षब्रह्मवेदांतचिंतन । कांतवचन प्रमाण येविषयीं ॥११॥

मच्चित्ता मद्गतःप्राणा बोधयन्तः परस्परम् ।
कथयंतश्चमांनित्यं तुष्यंति च रमंति च ॥

ऐसें जे अपरोक्षज्ञान । तयाचें एकपरत्वचिंतन । ते नोहे निष्प्रयोजन ।

सफलता आपण हरीचि करी ॥१२॥ भेदबाधक आणि अभेदसाधक । ऐसिया उपपत्तींनीं देख । जयांचे चित्त सम्यक । माझ्याचि ठायीं ॥१३॥ इया दृढ होवावया उपपत्ती । जयांनी धरीली जीवीतास्थिती । एवं तयांनें मजप्रती । आले प्राण ॥१४॥ सद्गुरूंचा निश्चयो जैसा । ब्रह्मनिश्चय करीती तैसा । पुढें तोचि निश्चयठसा । न सांडिती ॥१५॥ अज्ञानकालीं हाकां मारितां । मी मनुष्य ऐसी ओ दे तत्वतां । तयाहोनी ही अधिक सरता । "ब्रह्माहमस्मि" चित्ता बोधू जया ॥१६॥ आहे हे ऐसे भाषण । परस्पर करिती जेवी जन । तेंवी मी परमात्मा ऐसें बोधन । परस्पर चाले जयांचे ॥१७॥ अगा अर्जुना एवढा प्रसिद्ध । मज विषयीं जयांचा बोध । न जाणोनी कांहीं भेद । परस्पर शुद्ध उजळला ॥१८॥

अभंग

ऐसि माझी वाचा मज उपदेशी । आणिक लोकांशी हेंच सांगे ॥१॥
तुकारामवाणी श्रुतिसिद्ध साची । प्रमाणपणाची आकरतां ॥२॥
सकल संताचा एवं सदाचार । प्रभूज्ञानेश्वरमुखें कळे ॥३॥

एवं जयाची बुद्धी । मजसंगे झाली निरवधी । आणि वाणीची ही सिद्धी । तैसिच जया ॥१९॥ कीं मायबापाचे कुळीं जन्में । पतिकुळीं पडे येउनि प्रेमें । मग कवणें आडणांव पुसतां संभ्रमें । तरीं पतिकूळ सांगें ॥२०॥ तरी जयाच्या वाचें आंतू । वास करी अद्वैतग्रंथू । ब्रह्माहमस्मि हा सिद्धांतु । अनुभवें डोले ॥२१॥ कीं शुक्ति उकलोनि बाहेरी । मुक्त निघे जियापरी । तेवीं अनुभवची विश्वभरी । शद्वद्वारी पघळें ज्यांचा ॥२२॥ कामुकासी कामिनी । दिसे जाग्रतिस्वप्नीं । तिजसाठी ओ देवोनि मरो मरो जाय ॥२३॥ तेवी जाग्रत्स्वप्नसुषुप्ती । जे ब्रह्माहमस्मि ऐसे ओसणती । किंबहुना तूर्यास्थिती । तेहि आणिती शद्ववाटे ॥२४॥ कीं कुलीनांगनेची लाज वाढे । तंव तंव पातिव्रत्य जोडे । तेवीं दृढ व्हावया ब्रह्मत्व गाढें । शद्व सुरवाडे जयांचा ॥२५॥ नदी समुद्री जातां । खळाळ

राहे मागौता । तेवीं ब्रह्मीं मिळोनि शद्ववार्ता । लोकोपयोगार्थी जयांची ॥२६॥ समुद्रीं मिळालीं तरी । नदीपणा आहे जोंवरी । खळाळपणाची कुसरी चालेचि तंव ॥२७॥ तैसें मिळाले परब्रह्मीं । तथापि ब्रह्माहमस्मि । इया गंभीर शद्वोर्मि । जीवनवरी उठताती ॥२८॥ विदेहमुक्त जालियाहीवरी । मागें जें कोणी अधिकारी । तयासाठी भरोवरी । शद्व जयांचे ॥२९॥ ऐसे माझें नित्यकथन । माझे शद्व जे वेद जाण । तत्तुल्यता वचन । पावे जयांचे ॥३०॥ तया गंभीरवचननादे । मिळालेचि मिळती अनुभवानंदे । जेथ मी नाही हे भेदे । स्वये सांगिजे ॥३१॥ ऐसी अनुपम सांग्रोनि तुष्टि । तरी मद्भक्ती प्रेमपुष्टी । तेथे आंतर बाह्य मजाविण गोष्टी । दुसरी नाही ॥३२॥ मग मनो वाक्कर्मे । पतिव्रता पतिचोनि प्रेमें । राहे तेवी माझेनी रमे । स्वत्व जयांचे ॥३३॥ तें रमणे येवढें प्रकट । मी आणि तें एकचि स्पष्ट । एवढें ऐक्य जगीं सुघट । दुसरें नाही ॥३४॥ शरीरी ऐक्यत्वें वर्ते प्राण । परी उर्ध्वाधोगतित्वें भिन्न । हे मजासि अत्यंत अभिन्न तें अनिर्वचन जाणणें ॥३५॥ एरव्ही वर्णितां तया प्रेमळा । शद्व केवी पावेल कळा । येथ उदाहरण गोपबाळा । सर्वांशेसी ॥३६॥

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ गीता ॥

तरी समुद्रीं मिळालिया गंगा । कधीं करी न ओघत्यागा । तेवि माझीया अंगसंगा । कांटाळणें जया नोहे ॥३७॥ जीभेंने जिभेचें नांव सांगता । अभेदू न भंगे सर्वथा । तेवीं मज सौंदर्यें भजतां । ऐक्यचित्सत्ता-सुखरूप ॥३८॥ समुद्रगत गंगापूर्ती । जलमेघत्वें वर्षोनि करी पुरती । तेवीं निज प्रेम देउनी रती । मी तयांची पोशी ॥३९॥ तया प्रेमाचेनि पडिभरें । बुद्धीसी प्रेम बावरे । भरोनि ती मुरे । मज आत्मया आंत ॥४०॥ तो मी आत्मा आणि तया । मीपणेंची नांदवी आत्मया । शपथ वाहोनी धनंजया । निवटे भेदू ॥४१॥ एवं कांतवचन एकांती । तें आविष्करोनि

कांती
निजकीर्ती । होवावया तिमिरशांती । प्रमाणा आणिली ॥४२॥ की पती तो पती स्वांग भोगिता । अन्नादिपोषणे तोचि पिता । यः पातीति व्याकरण-सिद्धता । अन्नदाता पिता स्मृती ही वदे ॥४३॥ तेवीं गोपिकापती कांत । तोचि आळंदीश ज्ञानेश्वरतात । तुम्ही म्हणोनि विनवीत । येवढे स्वामी ॥४४॥ परोक्षवेदांताचिंतन । ते साक्षात्काराआधी करणें जाण । तेंवी अपरोक्षवेदांतचिंतन । जीवन्मुक्ति रक्षण करी ॥४५॥ अतः श्रीस्वामी सद्गुरुनाथा । स्ववेदांत चिंतनार्था । आविष्करोनि ममकरवी ग्रंथा । यशसमर्था तुम्हां असो ॥४६॥ तरी आपण होवोनी सद्गुरुनाथ । मज उपदेशिला परमार्थ । तेवीं होवोनी गणनाथ । निर्विघ्न आपण निरुपावा ॥४७॥ स्वामी आपण होवोनि शारदा । जिव्हा स्थापावी ब्रह्मबोधा । सद्गुरुत्वें प्रकटोनि परमानंदा । आत्महित शब्दा सांगावे ॥४८॥ न्यूनाचें करावया पूर्ण । जवळी आपणची होवावें सज्जन । गोपिसम प्रेम पातिव्रत्य-पूर्ण । आपण होऊन रक्षावे ॥४९॥ वरी माउलीपणाची गोडी । असो प्रेम पान्हा घ्यावया आवडी । आणि अनंत जन्म मम सेवाकावडी । निज चरणचावडी स्थापावी ॥५०॥ एवं स्तवीत करीतां ध्यान । प्रसादू मिळाले आज्ञा वचन । तरी आज्ञानुसार सेवानिधान । यथामतीं वाहतें चरणीं ॥५१॥ आतां होवावया स्पष्ट बोधू । घेवोनि गुरुशिष्यसंवादू । गद्यपद्या-न्वित प्रेम विनोदू । परब्रह्मवादू ऐसा हा ॥५२॥ साधनचतुष्टयसंपन्न । सद्गुरुसेवे अधिष्ठान । जयासि सद्गुरु कृपाळ होवोन । करी प्रश्न बोलिलें ॥५३॥ एवं कोणी सच्छिष्य केसरी । सप्रेम परिप्रश्न कुसरी । गुरुभक्तीची पावोनी सरी । गुरुपद शिरीं घेवोनि करितसे ॥५४॥

सत् शिष्य उवाचः—सम्यग्ब्रह्मविदे स्वामिन् दुःखनिवृत्तिहेतवे ।
श्रेयस्तद् व्यूहरूपेण कथ्यतां वदतां वर ॥५४॥

**टीकाः**— वदतां वर म्हणजे बोलणाऱ्यामध्यें वरिष्ठ, हे स्वामिन्, अज्ञ जीव शिष्यत्वेंकरुन प्राप्त सर्व सद्गुरुत्वाधिष्ठानरूप, कारण सहित

त्रिविध दुःखांची निवृत्ती होण्याकरितां, आणि अखंड परमानंदरूप ब्रह्मज्ञानप्राप्ती होण्याकरितां, जे कल्याणरूप असेल तें व्यूहरूपानें आपण मज दीनाप्रत कथन करा– इति सरलार्थ. ( सद्गुरुत्वाधिष्ठानरूप या शब्दावर टीप:– ईश्वरत्व व गुरुत्व इत्यादि उपास्यभाव जीवानेंच कल्पिले आहेत. ह्या विषयाचें निरूपण दृष्टिसृष्टिवाद निरूपण करितांना पुन्हा संपूर्ण येईल. परंतु येथें इतकेंच ध्यानांत टेविलें पाहिजे कीं, जीवकल्पित जे ईश्वराद्युपास्यभाव तें कल्पनेचा परिणाम नसून ब्रह्माचा विवर्तमात्र आहे. उदा:– जसें सुवर्णाचे अलंकार हे सुवर्णाचा विवर्त मात्र आहेत. परंतु कोणाच्याही कल्पनेचा परिणाम नाही. यद्यपि बाळी, बुगडी, इत्यादि नामरूपें अलंकारेच्छूच्याच बुद्धिंत राहतात, सुवर्णांत राहत नाहींत. तथापि संकल्पाप्रमाणें सुवर्णाला आकार देणें, म्हणजे आपल्या कल्पित अलंकाराचें लक्षण सुवर्णाला लागूं करणें आणि सुवर्णाचे त्याच आकारानें ग्रहण करणें हेंच अलंकाराचें लक्षण आहे. तद्वत्–सुखेच्छादि प्रवृत्तिप्रवाहामुळें, विवक्षित म्हणजे बोलण्याला योग्य जे 'सत्यसंकल्पादिक गुण,' तें ब्रह्माचेंच ठिकाणीं संभवनीय आहेत. "विवक्षित गुणोपपत्तेश्च" ह्या उपपत्तीनें ते गुण ब्रह्मास लागूं करून, त्या बुद्धिस्थ गुणासहित ब्रह्माचें ग्रहण म्हणजे भावनेंत अवधारण करणें, हेंच उपास्याचें लक्षण आहे. परंतु हें उपास्य अदृश्यादिधर्मविशिष्ट म्हणजे निराकार मानून उपासना करतात. कोणी मूर्तिमत्वादि साकार मानून उपासना करतात. परंतु ज्याप्रमाणें अलंकारलक्षण जरी सुवर्णाच्या ठिकाणीं आरोपित केलें तरी सुवर्णाचा लोप होत नाहीं; आणि सुवर्णज्ञानानेंहि अलंकाराचा लोप होत नाही, तसेंच अलंकारत्व हें सुवर्णज्ञानाच्या आडही येत नाहीं. तद्वत हें उपास्यही ब्रह्मविवर्त आहे. वरील दृष्टांतवत् याचे ठिकाणीं ब्रह्माचा लोप झाला नाहीं, व ब्रह्मावर हें आरोपित असले तरी ब्रह्माशी ह्याचा विरोध नाहीं. आणि हें ब्रह्मज्ञानाच्या आड येत नाहीं. इतकेंच नाहीं तर हें उलटें साधकच आहे. म्हणून

सुवर्णज्ञानानें जशी अलंकाराची निवृत्ति होत नाहीं, तशीच ब्रह्मज्ञानानें ह्या उपास्याची निवृत्ति होत नाही. संसार ही जीवकल्पित आहे, परंतु रज्जुस्थ सर्पाची ज्याप्रमाणें रज्जुज्ञानानें निवृत्ति होते, तद्वत् ब्रह्मज्ञानानें त्याची निवृत्ति होते असा आहे. म्हणून उपास्य हे कल्पनेचा परिणाम नाहीं. किंतु कल्पनाकृत आरोप आहे. आणि संसार हा कल्पनेचा परिणाम आहे. म्हणून उपास्य, हे कल्पनेचा आरोप व ब्रह्माचा अनध्यस्त विवर्त आहे. रूपांत विकार न पावून, दुसरें रूप होण्याला विवर्त म्हणतात. ह्याचें संपूर्ण लक्षण 'वेदांतपदार्थोद्देशदीपिकेंत' केले आहे तें पहावें.

अलंकार सोन्याचे आहेत असें सांगितल्यावरून त्याचें ठिकाणीं जी विश्वासानें प्रीति उत्पन्न होते, तद्वत् उपास्य हें ब्रह्म आहे अशा आप्त-कल्पित शब्दानें जी त्याचें ठायीं प्रीति उत्पन्न होणें तिलाच उपासना म्हणतात, आणि सुवर्णास कसोटी लावून आपली खात्री झाल्यावर कधींहि संशय उत्पन्न होण्याचा जो असंभवरूप दृढ निश्चय, त्याच्या योगानें अलंकाराच्या ठिकाणीं प्रीति होऊन जसें अंगभूषण करीतात, तद्वत् श्रवण, मनन, निदिध्यासनरूप कसोटी लावून, पुन्हा संशय, विपर्यय उत्पन्न होण्याचा जो असंभवरूप ज्ञाननिश्चय, त्याच्या योगानें अपरोक्षब्रह्म-साक्षात्कार झाल्यामुळे उपास्याच्या ठायीं जी निष्काम प्रीति उत्पन्न होते तिलाच भक्ति म्हणतात. सुवर्ण करून पाहात असतां जसा अलंकाराचा तिरस्कार करण्याचें कारण नाहीं त्या प्रमाणेंच अपरोक्षब्रह्मज्ञानकालीं ही उपास्याचा तिरस्कार करण्याचें कारण नाही सुवर्ण करून पाहात असतांना जसें ते त्या कसोटीचा, अलंकाराचा व भूषण घालणाऱ्याच्या आवडीचा विषय होऊन राहतें, तद्वत् श्रवण, मनन, निदिध्यासन करितांना बुद्धिवृत्तीचा, तत्स्थध्येयरूप उपास्याचा व भक्तीचा आश्रय होऊन ब्रह्म राहतें. परंतु अलंकार असून, सुवर्णज्ञान जसें स्पष्ट होऊं शकतें, तसें उपास्य असूनही ब्रह्मज्ञान स्पष्ट होऊं शकतें. सुवर्णज्ञान झाल्यावर जशी

अलंकार घालण्याची आवडी नष्ट होत नाही, तद्वत् ब्रह्मज्ञान झाल्यावर ही भगवद्भक्ती नष्ट होत नाही. उलट अधिकच राहते. आणि अपरोक्ष हेतूमुळें जीव ब्रह्मैक्यता भंग होत नाहीं; म्हणून दृष्टांतांतील ग्राह्य ग्राहक कल्पना घेऊन कोणी शंका करूं नये. कारण दृष्टांत कांहीं अंशानेंच लागू पडत असतो. सर्व अंशानें लागू करतो म्हटलें तर, दृष्टांतच सिद्धांत होत असल्या-मुळें त्याच्या सिद्धीला दुसऱ्या दृष्टांताची व दुसऱ्याला तिसऱ्या दृष्टांताची अपेक्षा लागून आत्माश्रय अथव अन्योन्याश्रय अथवा चक्रिकापत्ती अथवा अनवस्था या पैकीं कोणता तरी एक दोष निश्चयानें येईल. म्हणून ज्ञानियालाही भक्ती होऊं शकते हा सिद्धांत अबाधित आहे परंतु, भेद इतकाच कीं, शुद्ध ब्रह्म हें ज्ञानाचा विषय असून, चिदाभास त्याचा आश्रय आहे; व सगुण ब्रह्म हें भक्तीचा विषय असून, शुद्ध ब्रह्म हें तिचा आश्रय आहे. "आनंदो विषयानुभवो नित्यत्वं च संति धर्मा ब्रह्मणोऽ-पृथक्त्वेपि पृथगिवावभासंते." या वाक्याप्रमाणें हा विषयाश्रयादि भेद, ब्रह्म हें ज्ञानाचा विषयेत्यादि होत नसूनही जीवन्मुक्तिदशेंत बाधितानुरूप अंतःकरणवृत्तीमुळें असल्यासारखा वाटतो. विदेहमुक्तिदशेंत तो भासत नाहीं. परंतु हे भेदाचें भासणें व न भासणें सोडून दिलें म्हणून तरी, जिवन्मुक्तिदशेंत तो असतो असें नाहीं, असल्यासारखा वाटतो मात्र. परंतु मृगजलापासून जशी सूर्याची हानी नाहीं, तद्वत् ह्या मिथ्या भेदापासूनही स्वरूपाची हानी नाही. आणि ह्याच्यामध्यें ब्रह्माचा अन्वय स्पष्ट असल्यामुळें "भेद तंव तंव दुणे अभेदासी" ह्या श्रीगुरुवाक्यानुसारें भक्तीची व मुक्तीची हानी होत नाहीं. इतकेंच नाहीं तर श्री गुरु म्हणतात

"अहो ऐक्याचे मुद्दल न ढळे। आणि साजिरेपणाचा लाभ मिळे।
मग स्वतरंगाचें मुकुळें। तुरंबूका पाणी ॥१॥
देव देऊळ परिवारू। कीजे कोरुनि डोंगरू।
तैसा भक्तीचा व्यवहारू। कां न व्हावा ॥२॥

हेंच भक्तीचें मोठे रहस्य आहे. मग ती देवावर अथवा गुरूवर कोणा-वरहि असो.

" गुरु अथवा देव । कोणेंहि स्थळीं राहो भाव ॥ "

असें दासबोधांत रामदासस्वामी स्पष्ट म्हणतात. हें निरूपण संक्षेपानें व विस्तारानें पुढें बऱ्याच ठिकाणीं येईल.

**टिका:**–प्रश्नाभिप्राय–हे भगवान् ! वैद्यशास्त्रांत, रोगी, वैद्य, औषध आणि शुश्रूषक असा ज्याप्रमाणें व्यूह म्हणजें समूह सांगितला आहे, तद्वत् येथे ही जो व्यूह असेल तो कथन करावा. कारण आयुर्वेदीय व्यूह जसा दुःखनिवृत्तिहेतु आहे तसा येथेही असला पाहिजे.

**श्रीगुरुरुवाच:**—हेयं दुःखं हेयहेतुरविद्या परिकीर्तिता ॥
हानं मोक्षस्तदुपायो ज्ञानं व्यूहोऽयमुच्यते ॥५५॥

हे शिष्य, आयुर्वेदाप्रमाणें, वेदांत शास्त्रांतही व्यूह आहेत. हेय, हेयहेतु, हान, हानोपाय अशा स्वरूपानें तो प्रतित होतो. त्रिविध दुःख ते हेय समजावे, कारण, हेय म्हणजे त्याग करण्याला योग्य असें एक दुःखच आहे. पिपिलिकापासून ब्रह्मदेवापर्यंत जेवढे जीव आहेत, तेवढे सर्व दुःख-निवृत्तीची इच्छा करितात ते स्पष्ट करून सांगतो. कीटकांच्या विरुद्ध क्रिया झाली असतां ते पळून जातात व हातांत दंड पाहून पशूही मारण्याच्या भीतीनें पळून जातात. तसेंच बलवत्पक्षी ससाणा इत्यादिकांच्या योगानें काक इत्यादि पळून जातात. यावरून मनुष्येतर तिर्यक् प्राण्यांना दुःख-निवृत्ति इष्ट आहे हे अनुमान होते. मनुष्यांना दुःखनिवृत्तीची इच्छा प्रत्यक्ष आहे. दैत्यांनी आपल्यावर धाड घालूं नयें म्हणून देवांनी केलेली प्रार्थना पुराणांत आढळते, आणि हिरण्यगर्भाला भूक लागली असतां, तो विराट पुरुषाला खाण्याकरितां धांवला व नंतर क्षणमात्र विचारानें त्याला ब्रह्मज्ञान झालें. इत्यादि श्रुतिसिद्धांतावरून, तसेंच विष भक्षण करून सर्व जगाचा ईश्वर जो शंकर, त्याचा कंठ निळा झाला म्हणून त्यानें

श्रीविष्णुचें स्मरण केलें आणि विष्णुही शंकराचे पाय पाहावयाला गेला असतां दुःखित होऊन शेवटीं शरण आल्यावर, शिवानें त्यास ब्रह्मज्ञान सांगितलें. ब्रह्मदेव दुःखित झाल्यावर हंस रूपानें ब्रह्मदेवाला बोध केला, तसेंच विष्णुनेंहि शिवाला ब्रह्मज्ञान सांगितलें इत्यादि पुराण वाक्यावरूनही, ब्रह्मा विष्णु महेशादि देवांना सुद्धां दुःख निवृत्तीची अपेक्षा आहे. तशीच जड पदार्थांतून विद्युत्छक्तीचे आकर्षण करीत असतां जड पदार्थांच्या आतून प्रतिक्रिया सुरू होते. अनुकूल ज्ञानांवाचून प्रवृत्ति होत नाहीं, म्हणून पाषाणादि जड पदार्थांतही चैतन्य आहे असें जगदीशचंद्र म्हणतात. तस्मात् खनिज कोटींतील पदार्थांनाही दुःखनिवृत्तीची अपेक्षा आहे. परंतु खालच्या कोटींतील प्राण्यांना मनुष्यत्व आल्यावांचून वेदांत श्रवणाचा अधिकार येत नसल्यामुळें बहुशः* दुःख निवृत्ति उपाय मात्र समजत नाहीं.

* (**टीपः**— "पशवो हनुमत्प्रभृतयः" असें योगवासिष्ठाच्या टिकेंत म्हटलें असल्यामुळे आणि "अदेहा वा सदेहापि ते मुक्ता नात्र संशयः ॥ प्राप्ता ज्ञानदशामेतां पशुम्लेच्छादयोपि ये" असें मूळांतही म्हटलें असल्यावरुन आणि वृक्ष पाषाणादिकांना श्रवणाचा अधिकार "तस्माच्छृण्वन्ति पादपाः" इत्यादि श्लोकांनीं महाभारतमोक्षपर्वांत सांगितले आहे म्हणून, क्वचिदुःख निवृत्त्युपाय त्यांनाही कळण्याचा संभव आहे म्हणून, बहुशः हें पद ठेविलें आहे.)

आणि देवांनाही मृत्युलोकांत आल्यावांचून दुःख निवृत्त्युपायाचे ज्ञान होत नाहीं. ब्रह्मसूत्रांत जो देवतांना ज्ञानाचा अधिकार सांगितला आहे, तो उपासना करीत असतां प्राप्त झालेल्या परिक्षितविषयींचा आहे. अथवा देवलोकीं ज्यांना पूर्ण वैराग्य आहे, अशांचा आहे असें समजावें, आणि ब्रह्माविष्णुमहेश ह्यांना तर गुरुची अपेक्षा नसतानाच ज्ञानप्राप्ति आहे म्हणून त्यांच्याविषयीं प्रतिबंध नाहीं. परंतु देवलोकांचे ठायीं, ज्यांची चित्तशुद्धि झाली नाही अशा जीवांना मृत्युलोकांत येऊन कर्म-उपासना करून मलविक्षेपादिदोषनिवृत्ति झाल्यावर ज्ञानाचा अधिकार

येतो. म्हणून येथील मुमुक्षूंनीं मनुष्यलोकांतच ज्ञान संपादन केलें पाहिजे. अन्य लोकांत जाण्याची इच्छा करूं नये. एतदर्थच अधोगतीस नेणारे जे तिर्यगादिशरीरफलदायी पापरूप अदृष्ट तदुत्पादक निषिद्ध कर्मांचा त्याग करावा; आणि देवयोनीस नेणारें पुण्यरुप जें अदृष्ट तदुत्पादक विहित कर्मे, खडकावर बीज पेरल्याप्रमाणें निष्काम बुद्धीनें करून उपासना सिद्ध होण्याकरितां भगवदर्पण करीत जावींत. त्यायोगानें उत्पन्न झालेली जी भगवत्प्रीति तिच्या योगानें मलविक्षेप निवृत्त झाल्यावर, दुःखनिवृत्त्यर्थ आणि परमानंदप्राप्त्यर्थ ब्रह्मजिज्ञासा करावी. हे दुःख तीन प्रकारचें आहेः— आध्यात्मिक आधिभौतिक आणि आधिदैविक. स्वतःपासून उत्पन्न झालेलें आध्यात्मिक दुःख म्हणावें. दुसऱ्या भूतांपासून उत्पन्न झालेलें आधिभौतिक दुःख म्हणावें आणि देवांपासून उत्पन्न झालेलें आधिदैविक दुःख म्हणावें. त्यांत आध्यात्मिक दोन प्रकारचें आहे. शारीरिक आणि मानासिक. वात पित्त कफ यांच्या योगानें झालेली प्रतिकूल वेदना तें शारिरिक दुःख आणि अप्रियसंयोग व प्रियवियोगादिकांच्या योगानें झालेली प्रतिकूल वेदना तें मानसिक दुःख होय. चोर व्याघ्र सर्पादिकां-पासून झालेलें आधिभौतिक दुःख आणि जिवंतपणीं अशनिपातादिक व मेल्यावर नरकादिक आधिदैविक दुःख समजावें. तसेंच आध्यात्मिक आधिभौतिक व आधिदैविक हे आदि अंतीं दुःखमय असल्यामुळें दुःख-रुपच समजावे. ह्याविषयीं पतंजलीचें सूत्र प्रमाण आहे.

" परिणामतापसंस्कारदुःखैर्गुणवृत्तिविरोधाच्च दुःखमेव सर्वं विवेकिनः

**सूत्रार्थः**—यद्यपि आपल्या कर्मांनेंच तीन्ही प्रकारचें दुःख उत्पन्न होत असल्या-मुळें एक कार्मिक दुःखच संभवते, त्रिविध दुःख संभवत नाहीं, कारण "सुखस्य दुःखस्य न कोपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा। अहंकरोमीति वृथाभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः।"

एवं आध्यात्मरामायणांत म्हटलें आहे; तथापि स्वकर्मानुसार दुःख देण्याला आधिदैव आदिक निमित्त आहेत, असें स्थूलदृष्टीनें प्रतीत होत असल्यामुळें, स्थूलदृष्टीनेंच तीन प्रकारचे दुःख सांगितले, आणि वस्तुतः तर आधिदैवही दुःखदात्रें नाहीं आणि कर्मही दुःखदात्रें नाहीं. कारण, कारण कार्य कर्तृत्वादि असल्यावांचून भेद उत्पन्न होत नाहीं. म्हणून भेदच दुःखदाता आहे. तो भेद पांच प्रकारचा आहे. जीवेश्वरभेद जीवजीव भेद जीवजडभेद जडेश्वरभेद जडजडभेद. ईश्वर सर्वज्ञ आहे आणि जीव अल्पज्ञ आहे हा जीवेश्वर भेद होय. जीव ज्ञाता आहे आणि जड जाणत नाहीं हा जीवजडभेद होय. चैत्रशरीरस्थ जीव मैत्रशरीरस्थ जीवाहून भिन्न आहे हा जीवजीवभेद म्हणावा. पाषाण वृक्ष मृत्तिका पाणी इत्यादिस्थानीं जडजडभेद म्हणावा. जड जाणत नाहीं आणि ईश्वर सर्वज्ञ आहे हा जडेश्वर भेद होय. ह्याप्रमाणें अर्वाचीन भेदवादी भेदपंचक मानतात. वृक्षांच्या शाखापत्रामध्यें असणारा स्वगत भेद. दोन वृक्षांमध्ये असणारा सजातीय भेद आणि वृक्षपाषाणादिकांमध्यें असणारा विजातीय भेद असें त्रिक प्राचीन भेदवादी मानतात. हा भेदच परम दुःखदायी आहे. "द्वितीयाद्वै भयं भवति" "अनीशश्चात्मा बद्ध्यते भोक्तृभावात् ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः" "भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात्" इत्यादि श्रुतिस्मृति असें सांगतात. म्हणून हा भेदच निवृत्त करण्यास योग्य आहे. परंतु त्या भेदाचे कारण काय? भेद हा कार्यरूप असल्यामुळें त्याला कारण असलें पाहिजे. ते कारण अविद्या आहे. म्हणून तिलाच हेयहेतू असें म्हणतात.

॥ श्रीमत् सद्गुरू ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# वृत्तिक्षीरसागर

प्रणम्य परमानंदं पूर्णमेकं सनातनम् ।
जगतोऽनुग्रहार्थाय यदलंघ्यां विराजते ॥१॥

दोहाः–प्रणमुनि व्रजपतिपाऊलें प्राकृतजनउपकार ॥
करण्यासाठीं सुगम रचूं सुंदर वृत्तिविचार ॥२॥
ब्रह्मैवास्मीति सद्वृत्त्या सकार्याऽज्ञानसंहृतिः ।
परमानंदप्राप्तिश्च राद्धांतोऽयं हरेर्गिराम् ॥३॥

ज्याप्रमाणें घटपटादिक व्यावहारिक पदार्थांना पाहण्यांकरितां दिवा आणि डोळा पाहिजेत, परंतु दिवाच पाहवयाचा असल्यास एक डोळा असला म्हणजे पुरें, दुसऱ्या दिव्याची कांहीं आवश्यकता नाहीं; त्याप्रमाणें प्रपंच जाणण्याकरितां अंतःकरणाची वृत्ति व तिच्यामध्यें पडलेले प्रतिबिंब जो चिदाभास, या दोघांचीही अपेक्षा आहे. परंतु ब्रह्म स्वप्रकाश असल्यामुळें तें जाणण्याकरितां दुसऱ्या चैतन्याची आवश्यकता नाही. वृत्ति असली म्हणजे पुरें. म्हणून "मी ब्रह्म आहे" या वृत्तीनें कार्यसहित अज्ञानाचा नाश आणि अखंड परमानंदाची प्राप्ति होते, हा वेदांचा सिद्धांत आहे. त्या वृत्तीचें कारण स्वरूप आणि प्रयोजन जाणण्याची इच्छा मनुष्याला होणें साहजिक आहे. म्हणून महाराष्ट्रभाषेंत हा वृत्तिक्षीरसागर नांवाचा ग्रंथ रचतों.

यद्यपि तत्वानुसंधान अद्वैत कौस्तुभ वेदांत परिभाषा शिखामणि आदि संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत तथापि ते अत्यंत कठीण आहेत.

आणि त्यामध्यें दृष्टिसृष्टिवादानुसार आणि सृष्टिदृष्टिवादानुसार संपूर्ण वृत्तीचें निरूपण नाहीं. स्वामी निश्चलदासांनी उत्तर आर्यभाषेंत जो वृत्तिप्रभाकर नांवाचा ग्रंथ लिहिला आहे, तो वरील संस्कृत ग्रंथापेक्षाही गंभीर आहे आणि उत्तम आहे. तथापि त्यांत दादूपंथी सिद्धांतांचें कांहीं कांहीं मिश्रण झालें आहे, आणि वेदांत सिद्धांताचा संकोच झाला आहे. तदपि स्वामी निश्चलदासासारखा वृत्तीवर ग्रंथ अजून कोणत्याहि भाषेंत नाहीं हें खरें असलें तरी, तो ग्रंथ भाषेनें अत्यंत कठीण आहे आणि त्याची भाषा उत्तर आर्य असल्यामुळें संस्कृत वेत्त्यांनाहि तो समजत नाहीं; व संस्कृत ज्ञान पूर्ण नसल्यामुळें उत्तर आर्यवेत्त्यांनाहि तो समजत नाहीं. पंडित पीतांबरजींनीं वृत्तिप्रभाकर समजण्याकरितां वृत्तिरत्नावली नांवाची जी पुस्तिका लिहिली आहे, तींत वृत्तीविषयींचें संपूर्ण निरूपण आलेलें नाहीं. याप्रमाणें वर दिलेल्या कारणांमुळें आणि विशेष हा कीं वर नामनिर्देश केलेल्या सर्व ग्रंथांत सृष्टिदृष्टिवादानुसारच विचार केलेला आहे, दृष्टि-सृष्टिवादानुसार विचार केलेला नाहीं म्हणून महाराष्ट्रभाषेंत ग्रंथ करण्या-विषयीं माझी प्रतिज्ञा महत्कृपेनें सफल होवो.

यद्यपि वेद सूत्रकार आणि भाष्यकार प्रमाणादिकांना अनात्मपदार्थ समजून त्याविषयीं ते उदासीन राहिले आहेत, तथापि "व्यवहारे भाट्टनयो ह्यस्माकमपि संमतः" इत्यादि प्राचीनाचार्यांचीं वचनें आहेत. "मनसैवेदमाप्तव्यम्" अशी श्रुति आहे. "आवृत्तिरसकृदुपदेशात्" असें सूत्र आहे, आणि (ब्रह्मज्ञान शब्दप्रमाणजन्य आहे असें अनेक ठिकाणीं प्रतिपादन करणाऱ्या आचार्यभाष्याचाही आशय आहे) म्हणून हें वृत्ति-निरूपण अनवश्यक किंवा अप्रमाण नाहीं.

**शिष्यः**– भगवन्! वृत्तीचें लक्षण काय? कारण "कामःसंकल्पो विचिकित्सा श्रद्धा अश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एव" ह्या

श्रुतीनें जेवढें मनाचें लक्षण केलें आहे, तेवढ्या सर्वांना आपण वृत्तिच म्हणणार काय? तसें असेल तर मनोमयकोशाचें निराकारण झालें म्हणजे ह्या सर्व वृत्तींचें निराकारण होणार.

**श्रीगुरुः**– वत्सा! सम्यक् विचारलेंस. श्रुतींत जरी सर्वांना मनोरूपत्व सांगितलें आहे आणि ज्या ज्या कोशांचे निराकरण होते त्या त्या संपूर्ण कोशाचा परित्याग होतो हे खरें आहे तथापि विवेकाचे ठिकाणीं जो अंश ज्ञानाला विरुद्ध आहे त्याचाच परित्याग होऊं शकतो. जो अंश ज्ञानाला विरुद्ध नाही, त्याचा परित्याग होत नाहीं; आणि त्याचा परित्याग करण्याची आवश्यकता नसते. प्रकाशाला प्रतिबंध करणाऱ्या कपाटादिकांची जशी प्रातःकालीं दूर करण्याची आवश्यकता असते, तशी प्रकाशाकरितांच म्हणून कांचाना दूर करण्याची अवश्यकता नसते. कारण काच प्रकाशाला प्रतिबंध करीत नाहीं. पुनः तत्वानुसंधान अद्वैतकौस्तुभादि ग्रंथांत वृत्तींचें असें लक्षण केलें आहे. "विषयचैतन्याभिव्यंजकोंऽतःकरणाऽज्ञानयोः परिणामविशेषो वृत्तिः" प्रत्येक पदार्थाचे ठिकाणीं अस्ति भाति व प्रिय ह्या तीन रितीनें ब्रह्माची अभिव्यक्ति असल्यामुळें आणि "यस्य भासा सर्वमिदं विभाति" अशी प्रत्यक्ष श्रुति गर्जत असल्यामुळें, सर्व पदार्थांच्या ठिकाणीं असणाऱ्या भाति प्रत्ययाला अर्थात न चैतन्याचें स्वरूप म्हणावें लागतें. ज्याप्रमाणें उपाधीनें आकाशाचें घटाकाश मठाकाश महाकाश हृदयाकाश इत्यादि भेद झाले आहेत, त्याप्रमाणें चैतन्याचें प्रमातृचैतन्य प्रमाणचैतन्य प्रमेयचैतन्य प्रमाचैतन्य असे भेद झाले आहेत. प्रमेय ज्याला कळतें तो प्रमाता. तो चेतन असूनहि उपाधीनें संकोच पावला आहे. म्हणून त्याला प्रमातृचैतन्य म्हणतात. जड पदार्थ अत्यंत अलीक असल्यामुळें, व्यवहारांत त्याजकडून अर्थक्रियाकारित्व होत नाहीं. यद्यपि अचल अशा ब्रह्माचे ठिकाणींही अर्थक्रियाकारित्व मानणें उचित नाहीं; तथापि अज्ञानोपहित अशा त्याचे ठिकाणीं व्यावहारिक सत्तेनें अर्थक्रियाकारित्व मानल्यानें बाध

येत नाही, व पारमार्थिक सत्तेंत तर ब्रह्माचे ठिकाणीं अर्थक्रियाकारित्व नाहींच. परंतु अनुभवगोचर असल्यामुळें त्याचा बाध कल्पितां येत नाहीं व अनुभवविरुद्ध अशा जडाची सिद्धि अनुभवावरच अवलंबून असल्यामुळें परमार्थतः व व्यवहारतः जड अत्यंत अलीक आहे. म्हणून व्यवहारांत देखील जडाला स्वतंत्र अर्थक्रियाकारित्व नाहीं, असा वेदांताचा अति गूढ सिद्धांत आहे.

**शिष्यः**— महाराज! अशानें बौद्धांचा विज्ञानवाद होतो कीं नाहीं?

**गुरुः**— नाहीं. कारण बौद्ध विज्ञानावांचून दुसरा पदार्थच मानित नाहींत, आणि तें विज्ञानही क्षणिक मानतात. आम्ही तसें म्हणत नाहीं. आमचें म्हणणें असें आहे:—

चैतन्याचा आश्रय न घेतां अज्ञानाचें जर कार्य झालें असतें तर तद्विरुद्ध ज्ञानाला त्याची प्रतीतिच झाली नसती. म्हणून चैतन्याच्या आश्रयानेंच प्रवृत्त झालेल्या अज्ञानाचें कार्य प्रपंच विलसत आहे. ज्याप्रमाणें स्वप्नामध्यें विषय व अंतःकरणाच्या वृत्ती सर्व आत्मचैतन्यानें प्रकाशित असतात, त्याप्रमाणें जागृतींतही प्रमाता प्रमाण प्रमेय व प्रमा सर्व चैतन्याच्या आश्रित व चैतन्यानें प्रकाशित आहे. प्रमाण म्हणजे नेत्रादिक व प्रमेय म्हणजे विषय व विषयांचें ज्ञान म्हणजे प्रमा. प्रमाण चैतन्याचा व विषय चैतन्याचा जो अभेद त्याच्याच योगानें विषयाचें ज्ञान होतें, व त्याला प्रत्यक्ष प्रमाण म्हणतात. इत्यादि लक्षणें पुढें येतील म्हणूनच त्या लक्षणांत "विषयचैतन्याभिव्यंजक" असें पद घातलें आहे. अभिव्यंजकत्व म्हणजे अपरोक्षव्यवहारजनकत्व असें कोणी लक्षण करतात. पण तें बरोबर नाहीं. कारण प्रत्यक्ष प्रमा ह्याच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें विषय चैतन्याचा अपरोक्ष व्यवहार होतो, तसा अनुमानादिकांनीं झालेल्या ज्ञानाचें ठिकाणीं होत नाहीं; म्हणून आवरणभंगत्व विषयचैतन्याभिव्यंजकाचें स्वरूप आहे असें

कोणी म्हणतात; आणि हें लक्षण जिवाश्रित प्रमेयाविषयीं बरोबर आहे; कारण आवरण दोन प्रकारचें आहे. १ असत्वापादक २ अभानापादक. पदार्थ असून तो नाहीं असें वाटणें हे असत्वापादक व पदार्थ आहे परंतु तो भासत नाहीं असें वाटणें हें अभानापादक. पैकीं अभानापादक आवरण यद्यपि प्रत्यक्ष प्रमाणांवांचून निवृत्त होत नाहीं, तथापि असत्वापादक आवरण तर अनुमानादि परोक्ष ज्ञानानेंहि निवृत्त होतें, म्हणून या लक्षणांत अतिव्याप्ति नाहीं.

शिष्यः— महाराज ! मायावृत्तीच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या ईश्वराच्या ज्ञानाचें ठिकाणीं या लक्षणाची अव्याप्ति आहे किंवा नाहीं ?

गुरुः—या विषयींचा उहापोह असा आहे कीं, ज्याच्या मतांत परमेश्वराचें ज्ञान अप्रमा आहे, त्यांच्या मनांत प्रमेचें लक्षणाची अव्याप्ति नाहीं. आणि ज्यांच्या मतांत इश्वराचें ज्ञान प्रमा आहे, त्यांच्या मतांत लक्षण अव्याप्त असल्यामुळें "अस्तिव्यवहारजनकत्वं विषयाभिव्यंजकत्वम्" असें तें दुसरें लक्षण करितात. परमेश्वराचें ठिकाणीं कोणतेंही आवरण नसल्यामुळें त्याचें ठिकाणीं आवरणभंगाची अपेक्षा नाहीं. परंतु अस्तित्व मात्र आहे. हें लक्षण निर्दोष आहे. तात्पर्य मायासंज्ञक शुद्ध सात्विक अज्ञानाचा विषयाभिव्यंजक परिणाम ईश्वराश्रित वृत्ति व अंतःकरणाचा आणि अविद्येचा विषयाभिव्यंजक परिणामाविशेष जीवाश्रित वृत्ति आहे, हा निष्कर्ष आहे. यद्यपि वरील दाखविलेल्या श्रुतींत कामादिक अंतःकरणाचे परिणाम आहेत, आणखी दुसऱ्या श्रुत्यादि वचनांवरून आकाशादि अज्ञानाचे परिणाम आहेत, तथापि त्यांचें ठिकाणीं प्रकाशकत्व नाहीं; म्हणून वृत्ति शब्दानें त्यांचे ग्रहण आम्ही करीत नाहीं.

शिष्यः—महाराज ! पण वृत्तीमध्यें असलेल्या प्रमाण चैतन्याचा तुम्ही स्वीकार करीत असल्यामुळें, अंतःकरणाच्या परिणामाबरोबर त्या

चैतन्याचाही परिणाम होतो किंवा नाहीं ? होतो असें म्हणाल तर वेदांतांत परिणामवादाचा किंवा आरंभवादाचा स्वीकार नसून विवर्तवादाचा स्वीकार असल्यामुळें तुमचें हें म्हणणें वेदांतविरुद्ध ठरणार ?

**गुरुः**—तसें मुळींच नाहीं. "तन्मनोऽकुरुत" या श्रुतीनें अंतःकरणाला कार्यत्व सांगितलें असल्यामुळें, अर्थातच तें सावयव आहे. म्हणजे दुधापासून जसें दहीं होतें, तसा त्या अंतःकरणाचा परिणाम होणें शक्य आहे. न्यायमतांत मन निरवयव असल्यामुळें, त्यांच्या मतांत मात्र तो परिणाम होणें शक्य नाहीं. आतां चैतन्याचा आम्हांला परिणाम मानण्याची आवश्यकता नाहीं. कारण चेतनदृष्टीनें आम्ही वृत्तीला विवर्त समजतो. आत्म्याचें ठिकाणीं मी जाणतो हा अंतःकरणधर्माचा व अंतःकरणाचे ठिकाणीं मी चेतन आहे हा आत्मधर्माचा परस्पर अध्यास असल्यामुळें, आत्म्याला प्रमातृ–चैतन्यत्वादि संज्ञा प्राप्त होतात. मीपणावांचून कोणत्याहि वृत्तीचा त्याग किंवा ग्रहण होत नाही. म्हणून विवेकाचें ठिकाणींही मीपणाचा स्वीकार करावा लागतो. एवढ्यावरून अहंकार हा अध्यस्त नाहीं, असें मात्र कोणी म्हणूं नये. कारण अहंकाराचा प्रत्यय ज्ञेयाला जाणतांना विशेषकालीं येत असतो. पण साक्षीचा प्रत्यय तर विषेष व सामान्य कालीं सर्वत्र येत असतो. किंवा अहंमध्यें जे शुद्ध ज्ञान आहे, तें चैतन्याचें असून ज्ञातृत्वविशिष्ट जो अहंचा वाच्यार्थ, तो अंतःकरणधर्माच्या अध्यासानेंच चैतन्याचे ठिकाणीं आला आहे असें लक्षण सुलभ रितीनें करण्यासारखें आहे. याप्रमाणें चैतन्याचा विवर्त व अंतःकरण अज्ञानाचा विषयाभिव्यंजक परिणामविशेष वृत्ति आहे. ईश्वराश्रित जशी मायेची वृत्ति आहे, तशी जीवाश्रित ही अज्ञानाची वृत्ति आहे. तिचें निरूपण भ्रमवृत्तींचीं लक्षणें सांगतांना करीन.

ही वृत्ति दोन प्रकारची आहे. प्रमा व अप्रमा. प्रमाणांनीं उत्पन्न होणारी वृत्ति प्रमा असून दोषजन्य वृत्तीला अप्रमा म्हणतात. व्यवहारदशेंत

जिचा बाध होत नाहीं ती प्रमा होय, आणि ब्रह्मज्ञानावांचून जिचा व्यवहारदशेंत बाध होतो ती अप्रमा. प्रत्यक्ष अनुमान शब्द उपमान अर्थापत्ति व अनुपलब्धि या भेदानें सहा प्रकारची प्रमा आहे असें वेदांती म्हणतात. प्रमावृत्ति यथार्थ असते. अप्रमावृत्ति दोन प्रकारची आहे. यथार्थ आणि अयथार्थ. ईश्वरज्ञान व सुखदु:खाचें ज्ञान ही यथार्थ अप्रमा होय. आणि संशयज्ञान व भ्रमज्ञान अयथार्थ अप्रमा होय. ईश्वरज्ञानाला प्रमावृत्तींत प्राचीन तत्ववेत्ते घालतात, आणि निश्चलदासस्वामींनी त्याला अप्रमावृत्तींत घातले आहे. तरी प्राचीन मतच अधिक रुचिर आहे. अर्वाचिन मतांतही कांहीं हानि नाही. परंतु स्वामी निश्चलदास असें म्हणतात कीं, परमेश्वराचें ज्ञान इच्छा व प्रयत्न न्यायमतांत तर नित्य आहेत, आणि वेदांतमतांत जीवांच्या कर्मानुसार सर्गाच्या आदि त्यांची उत्पत्ति होते. त्यांत परमेश्वराचें ज्ञान इच्छा व प्रयत्न एक एक व्यक्ति असून प्रलयपर्यंत स्थायी आहेत. तें नाना व्यक्ती नाहींत. आतां अशी कोणी शंका करील कीं, परमेश्वराचें ज्ञान इच्छा प्रयत्न एक एक व्यक्ति असून स्थायी आहेत तर हींव ऊन पाऊस हे प्रलयपर्यंत समानच राहावेत. हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण या कल्पांत इतक्या वर्षीं इतकें उन पडावे, इतका पाऊस पडावा, इतकें हींव पडावें, हें परमेश्वराच्या ज्ञानादिकांनीं एकदमच विषय केले आहेत. म्हणून ऊन पाऊस हींव त्यांचे सांकर्य किंवा अनियतता उत्पन्न होणें शक्य नाहीं. जर परमेश्वराचें ज्ञानादिक नाना व्यक्ति असते, तर मात्र तुम्ही म्हणतां तसे दोष आलें असते खरें. हे परमेश्वराचे ज्ञानादिक जीवाच्या कर्मानुसार उत्पन्न होतात. अद्वैत कौस्तुभकारांनींही "तदैक्षत् बहु स्यां प्रजायेय" "ते इच्छा करते झालें मी बहुत होईल" ही श्रुति प्रमाण घेऊन परमेश्वराचे ज्ञान इच्छादिक सर्गारंभीं जीव कर्मानुसार उत्पन्न होतात, असें म्हटलें आहे. पण "तदैक्षत्" ही श्रुति इच्छेविषयीं लागूं केली असतां, जीवाच्या कर्मानुसार परमेश्वराला इच्छा होते

असें औपचारिकपणें स्वीकारतां येईल. पण ज्ञान जीवाच्या कर्मानुसार होते, असें मुळींच स्वीकारतां येणार नाहीं. कारण महाप्रलयाचें वेळीं-उत्पन्न झालेले ज्ञान नष्ट होते, असें स्वीकारावें लागेल व तसें मानले म्हणजे प्रलयाची जी कालगणना सांगितली आहे ती गणना करणारें कोणाचें ज्ञानच राहात नसल्यामुळें प्रलयामधील कालगणना सांगणारें शास्त्र निरर्थक होईल. बरें श्रुतींत तरी ज्ञान उत्पन्न होते असा स्पष्ट शब्द नाहीं. "मी बहुत होईल असा संकल्प मात्र तें ब्रह्म करितें झालें" येवढाच काय तो त्या श्रुतीचा अर्थ आहे. प्रलयांतील कालगणना जागृच्छ्रुतीनें सांगितली आहे.

सहस्रयुगपर्यंतमहर्यद् ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्रां तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ गीता: अ.८ श्लो. १७

सृष्टिकाल सहस्र युग असून प्रलयकाल सहस्र युगें पर्यंतच असतो, असें अहोरात्रवेत्ते म्हणतात. आतां या प्रलयवचनांत मायेमध्यें जगत् लीन होत नाहीं असें मात्र कोणी म्हणूं नये. कारण म्हटलें आहे कीं—

अव्यक्तात् व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाऽव्यक्तसंज्ञके ॥ गीता. अ. ८ श्लो. १८

तस्मात् परमेश्वराचें ज्ञान नित्य आहे असें म्हणावे लागतें. आतां एक वृत्ति उत्पन्न झाली असतांना दुसऱ्या वृत्तीचा नाश होतो म्हणून प्रलयकालीन् उत्पन्न होणाऱ्या ज्ञान इच्छादिकांच्या योगानें सर्गकालीन ज्ञान इच्छादिकांचा नाश मानला पाहिजे, हें म्हणणें समीचीन नाहीं. कारण जीव कर्मानुसार परमेश्वराला ज्ञान इच्छादिक उत्पन्न होतात, असें म्हणणाऱ्या तुमच्या मताप्रमाणें प्रलयकालीन् जीवांचें कर्म उद्भुत नसल्यामुळें त्या कालाची गणना करणारें परमेश्वराचे ज्ञानेच्छादिक जीवकर्मानुसार उत्पन्नच होणार नाहींत. दुसरें, आरूढ पुरुषाच्याच एका वृत्तीनें दुसऱ्या वृत्तीचा नाश

होतो. साक्षी तर जी वृत्ति उठेल तिला समान पाहूं शकतो. म्हणून परमेश्वराचें ज्ञानेच्छादिक नित्य आहेत, असें म्हटलें पाहिजें. विवरणकारांच्या मताप्रमाणें बिंबभूत परमेश्वराची प्राप्ति शुद्धाचीच प्राप्ति आहे, म्हणून प्रतिबिंबभूत जीवाचा बिंबभूत परमेश्वराशीच मुक्तीमध्यें अभेद होतो. यावरून ज्ञान झालें असतां जीवनिवृत्तीनें ईश्वरनिवृत्तीची अपेक्षा नसतांही परमेश्वराच्या ज्ञानेच्छादिकांना नित्यच म्हणावे लागते.

शिष्यः—महाराज ! पण आपण दृष्टिसृष्टिवादी असल्यामुळें व दृष्टिसृष्टिवाद निरूपण करणाऱ्या सिद्धांतमुक्तावलिकारांनी प्रमाणांचें खंडण केलें असल्यामुळें, ह्या वृत्तीचें निरूपण दृष्टिसृष्टिवादानुसार योग्य कसें ठरेल ?

गुरुः—वत्सा ! हे सर्व स्वप्नाप्रमाणें साक्षिभास्य आहे. तरी पण स्वप्नांतील पदार्थ स्वप्नांतील घ्राणानें दिसत नाहींत, चक्षूनेंच दिसतात. ही नियतीही साक्षीभास्य आहे, तथापि स्वप्नाची ज्ञातसत्ता असल्यामुळें तिच्याबरोबरच त्या नियतिचीही ज्ञातसत्ता आहे. त्याचप्रमाणें प्रमाणादिकांचीही ज्ञातसत्ता आहे व तशीच विषयांची ज्ञातसत्ता आहे. कांहीं विषयांची प्रत्यक्ष ज्ञातसत्ता आहे, कांहीं विषयांची इतरथा ज्ञातसत्ता आहे.

शिष्यः—मग ब्रह्माचीच कां ज्ञातसत्ता नाहीं ?

गुरुः—ब्रह्म स्वतः सिद्ध असल्यामुळें दुसरा कोणी त्याला जाणणारा नाही, म्हणून स्वतः ते ज्ञेय कोटींत प्रविष्ट होऊं शकत नाहीं व त्याचा स्वप्नांत जागृतीचा जसा बाध होतो, तसा कोणत्याही अवस्थेंत बाध होत नाहीं व प्रतिषेधही करतां येत नाही. म्हणून त्याचें ठिकाणीं दृष्टिसृष्टि स्वीकार नाहीं. आतां यद्यपि सर्व पदार्थ साक्षीभास्य आहेत, त्याठिकाणीं प्रमाणभेदादिव्यवहार योग्य नाही. तथापि मूढ पुरुषांना ब्रह्म प्रत्यक्षप्रमाणगम्य आहे किंवा अनुमानादिकानीं गम्य आहे किंवा श्रुतिप्रमाण गम्य आहे असा स्वप्नस्थवंचकपुरुषांनीं भ्रमविल्याप्रमाणें भेदवादी वंचकांच्या वचनावरून भ्रम होणें शक्य आहे. म्हणून विषयचैतन्याचे

व प्रमाणचैतन्याचें जें एकीकरण तीच प्रत्यक्ष प्रमा म्हणतात. विषय व प्रमाता हें चैतन्याचे विवर्तच आहेत. अर्थातच त्यांची साक्षीभास्यत्वास्तव ज्ञातसत्ता आहे, इत्यादि सर्व प्रमाणांना साक्षीभास्यता सिद्ध करून श्रुति-प्रमाण मात्र यावद्बोध स्थायी आहे. ज्याप्रमाणें अनादि षट् पदार्थांच्या ठिकाणीं दृष्टिसृष्टिवादाचा अद्वैतसिद्धींत मधुसूदनस्वामींनीं स्वीकार केला नाहीं, त्याप्रमाणें वेदांचे ठिकाणींही दृष्टिसृष्टिवादाचा स्वीकार यावद्बोध नाहीं आणि शिष्यमुक्ततानें कृपानिष्ठ झालेले ब्रह्मनिष्ठांचे भगवदधिष्ठान गुरुरूप शरीर ध्यानगम्याचे ठिकाणींही दृष्टिसृष्टिस्वीकार नाहीं. या रहस्याचें उद्घाटन ( उद्‌घाटन ) पुढें करीन. याप्रमाणे ईश्वराश्रित वृत्तीचें निरूपण झालें. आतां सुखदुःखाचें ज्ञानही अप्रमा आहे. कारण तें इंद्रियार्थ सन्निकर्षजन्य नाही म्हणून प्रत्यक्ष नाही. कारण ज्ञानाचे जे साक्षात् अर्थ सुख व दुःख ते इंद्रियाला गोचर होत नसल्यामुळें अर्थातच सुखदुःखाचें ज्ञान इंद्रियजन्य नाही व म्हणूनच प्रत्यक्ष नाहीं. अतिशय नैकस्यास्तव अनुमान नाहीं व अपरोक्षत्वास्तव शाब्द नाहीं. आतां सुखदुःखाचें ज्ञान भ्रम आहे म्हणावे तर तसेंहि नाही. कारण भ्रमदोषजन्य असावा लागतो, आणि सुखदुःखांच्या ज्ञानाचा व्यवहारदशेंत ब्रह्मज्ञानांवाचून बाध होत नाहीं; म्हणून ते यथार्थ आहे. परंतु प्रमाणजन्य नसल्यामुळे त्याला अप्रमा म्हणतात. आतां याचेच विशेष निरूपण करतों. विषय कठीण असल्यामुळें अभ्यासार्थ ग्रंथांतील पुनरुक्ति सूज्ञांनीं सहन करावी.

वंदु आलंदि सुपीठ निवासी । सत्पद निजजनमानसकाशी ॥
कडिये घेउनि मज गुरु आई । ठेवि कृपाकर शिरिं लवलाही ॥१॥
हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यरत्नान्विते देशभाषया विरचिते वृत्तिक्षीरसागरे प्रथमोल्लोले उपोद्घातो नाम प्रथमस्तरंगः ॥

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीमत् सद्गुरू ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# सुखपर्व (नाटक)

सर्वभूतगूहाध्यक्षमखंडानंदचिन्मयम् ।
आलंदिवल्लभं वंदे सद्गुरुं दासमानसम् ॥१॥
आख्यायिकाविनिर्मातुः सुखं प्रोक्तं भविष्यके ।
तस्मात्साधूपरागाय कुर्वे प्रकरणं शुभम् ॥२॥
शाकुंतले भारतोक्ते कल्पिता मुद्रिका यथा ।
कालिदासेन तद्वद्धि कल्पयामि सुभारतम् ॥३॥
अभिधानमतोऽस्यैतत् सुखपर्वमिति स्थितम् ।
भारताश्रयरूपेण क्रियते सुखबुद्धये ॥४॥
न कथा कल्पिता चात्र विषयोऽपि न कल्पितः ।
शास्त्रीयत्वात्किंतु चात्र कार्यमात्रं हि कल्पितम् ॥५॥
संस्कृतैः प्राकृतैः पद्यैः गद्येन च समान्वितम् ।
इदं चंपुमयं काव्यं विमृशंतु महाधियः ॥६॥
काव्यनाटकसाहित्यसंमिश्रं नूतनं हितम् ।
रंजकं मोक्षदं शुद्धं नित्यमेतदुपास्यताम् ॥७॥
गणेशं शारदां चैव गुरुमालंदिवल्लभम् ।
उमां सांबं हरिं गोप्यो प्रणमामि पुनः पुनः ॥८॥

अथ कस्मिंश्चित् समये कलंकितस्यापि शशांकस्य छाययैव निर्मलीकरणकारणे कालभयादभिसरणसंतारणे वैडूर्यादिमण्युपरंजिते सकलदेव गंधर्वमुनिपन्नागादिसेविते कोकिलकलरवकूजितमिव मानसमानविभावन घोपविरचिते कैलासशिखरे हिमनगजामातं सकललोककृपास्पदं विलोकयितुं वीणाधारी सुरर्षिर्भगवान् ब्रह्मनंदनः समागच्छति स्म । इदं पद्यमनुगायन् भगवंतं भवं स्तौति "जय शंकर उमानाथ"

भगवान् उमावल्लभस्तं दृष्ट्वा आसनदानपूजनादिसत्कारं कृत्वा कुशल-प्रश्नादिनाभिनंद्य च पुनराह—भो ब्रह्मन्! लोकत्रयगमनशीलेन भवता यदाश्चर्यं दृष्टं तदखिलमाख्याहि। भवति खलु भवादृशां वचनेनैव सर्वं पवित्र्य करम्। आह सुरर्षिः सर्वान्तर्यामिणि सर्ववेत्तरि त्वयि किं चित्रं करुणानिधान। तदप्याज्ञापालनाय यत् दृष्टं तदाख्यास्ये। पृथिव्यामटन्नहं भारतयुद्धनिर्गत कंटकं जगत्सुखरूपदृगपि निखिललोकपतिकृष्णसहायकस्यापि ब्रह्मविन्मणि भीष्मोपादिष्टस्यापि आचतुःसमुद्रसार्वभौमराज्यप्राप्तस्यापि निखिलधर्मवेत्तुः युधिष्ठिरस्य भीष्मद्रोणादिमहद्भ्योऽपि राधेयकर्णविषयकं मनस्तापमालोच्यापि विस्मितोऽहमिह समागतः। आह च भगवान् नैतच्चित्रम्। कर्णोऽयं सूतपुत्रः स्यात् यमपुत्रो युधिष्ठिरः। सूर्यपुत्रो यमस्तेन संबंधः पूर्वभागयम्। वैकृत-मानुषसंबंधात् दैवजन्यसंबंधोऽधिकं पुरुषं कर्षतीति जानास्येव भवान्। तेन युधिष्ठिरस्य मनस्तापं यथोपशमेत् तथाचरितव्यम् भवता वीणापाणिना। ब्रह्मर्षिराह। स्यात् भगवदाज्ञासाफल्यम्। तत्र च प्रथममवश्यं कलहोत्पादनं करणीयम्। शंकर उवाच "विकारोऽपि श्लाघ्यो भुवनभयभंगव्यसनिनः"। ते तत्र कलहेऽपि सतां कल्याणमेवेति निश्चयो मम। आह नारदः यथा ज्ञापयति परमेश्वरः।

## इति प्रथमः प्रवेशः

**विष्कंभः—** श्रृंगे! काल तूं कोठें गेला होतास? मी व महाराजांनीं तुझी अत्यंत आठवण केली, पण तूं दिसला नाहीस.

**श्रृंगीः—** मला तिकडून येण्याला वेळ लागला खरा. महाराजांनी मला श्रीकृष्णाकडे आपण सांगितल्याप्रमाणें युधिष्ठिराचा मनस्ताप दूर करण्याकरितां ब्रह्मकुमारास सांगून ठेविले होते, असा निरोप सांगण्यास सांगितलें होते. राजा युधिष्ठिराचा मनस्ताप दिवसेंदिवस वाढत असून कर्ण हाच त्याच्या मनाचा विषय झाला आहे. भीष्म द्रोण कृपाचार्य किंब-हुना साक्षात् कृष्णही शिकवित असतां त्याच्या मनाची समजूत होत नाहीं.

म्हणून भगवान् श्रीकृष्णानें आपल्या महाराजाकडे गोष्ट काढली होती व त्याविषयीं त्यांनी कालच ब्रह्मकुमारास सांगून व्यवस्था करून ठेवली आहे.

**उमाः—** तर ती व्यवस्था कलहमूलकच होणार असें वाटतें.

**शृंगीः—** तसें कांहीं नाहीं; पण त्या व्यवस्थेंत प्रथम कलह उत्पन्न करावा लागेल असें ब्रह्मकुमाराचें म्हणणें पडलें व त्याला महाराजांनी रुकारही दिला.

**उमाः—** तर मग तूं असें कर. युधिष्ठिराचा मनस्ताप कसा काय दूर करितो हे सर्व मला येऊन सांगत जा व प्रसंगीं ब्रह्मकुमारालाही साह्य करीत जा. पण आणिबाणीचा व पाहण्यासारखा प्रसंग असल्यास मला व महाराजास निमंत्रण करण्यास विसरूं नको हो.

**शृंगी:—** आज्ञा आई साहेब. (असें म्हणून नमस्कार करून जातो.)

नारायण नारायण जय गोविंद हरि इति गायन् भगवान् ब्रह्मनंदनः प्रविशति स्म । आह च **नारदः**—काय करावे. या स्वर्गपुरांत सर्व निश्चिंत बसले आहेत. वैराग्याची यांच्या मनावर झांक सुद्धां येत नाही. हां हां म्हणतां पुण्य संपून गेल्यानंतर यांना मृत्युलोकीं लवकरच जावे लागेल, याची यांना कांहीं तरी काळजी आहे काय? ब्रह्मज्ञानाकरितां उत्पन्न झालेल्या वेदामध्येंच चित्तशुद्धीकरितां निर्माण झालेल्या यज्ञामध्यें अनेक प्रकारच्या कामना घुसडून कामुकानींच हा लोक निर्माण केला आहे. एवढ्या तीव्र पुण्याचा समुदाय संपवून आतां लवकरच खाली पडणार. अरेरे! काय हा विष्णुमायेचा खेळ! श्रीकृष्णा! तुझी करणी अगाध आहे! बरे ते असो या विषयलोलुपस्वर्गामध्यें सहाय्यक कोणी मिळेल काय पहावे. मृतानंतर केवळ आश्रय शरीर घेऊन असणारें, जे लिंग शरीर ही नव्हे व स्थूल शरीरहि नव्हे अशा प्रकारचें एक भूतप्रधानशरीरधारी, देवतुल्यता वगैरे आपल्या कर्मानुसार पावलेले, याच मंडळींत शिरावे म्हणजे भारती युद्धांत मेलेली बरीच मंडळी आहेत, त्यांत कोणाचें मन कसें आहे

हें आपणांस पाहतां येईल. त्याकरितां भूताकाशाचा मार्ग सोडून हार्दाकाशांत गेले पाहिजे. पण तेथला स्वामी माझा पिताच असल्यामुळें तें कांहीं मोठेसें जड नाहीं. तर जावे तिकडेच.

### ब्रह्मलोक

**नारदः**—हेंच हार्दाकाश. हे माझे तात आपल्या सिंहासनावर बसले आहेत.

नमः सावित्रिकांताय ब्रह्मणे परमात्मने ॥
नमो वेदस्वरूपाय सर्वदेववराय च ॥१॥

**ब्रह्मदेवः**—नारदा यावे. आपण भगवद्भक्त असल्यामुळें पुत्र असला तरी मान देणें इष्ट आहे. "परमार्थी तो न म्हणावा आपुला" या उक्तीची सत्यता मी नाही केली तर कोण करणार ! आपले काय मी प्रिय करू.

**नारदः**—तात, आपल्या प्रसादानें माझें सर्वच प्रिय झाले आहे. त्रिभुवनांत आतां मला प्रिय व अप्रिय असें कांहींच उरलें नाही. परंतु शंकराच्या आज्ञेने युधिष्ठिराचा मनस्ताप दूर करण्याकरितां कांहीं उपाय योजावा म्हणून आपल्या दर्शनाकरितां आलों आहे.

**ब्रह्मदेवः**—अरे हो ! माझ्या कमलावल्लभ जनकानें देखील हीच गोष्ट सांगून ठेवली आहे. युधिष्ठिराचा कर्णविषयक मनस्ताप अधिकच वाढत असून खाणें पिणें यांतून कांहींच त्याला सुखकर वाटत नाहीं. काय करावे. वत्स ! आपण माझ्या प्रसादानें या हार्दाकाशांत त्यांचीं एकभूतप्रधान शरीरें पाहून त्यांतून योग्य वाटेल त्यांच्याशीं मंत्र करावा. राक्षस देव वगैरे, गौणविग्रहरूपानें जे मनुष्य योनींत जातात त्यांचीं हीं शरीरें वरींच दृढ असतात योग्याप्रमाणें मनोवृत्तीनें तीं दृढ होऊंही शकतात. तसें इतर योनींतून कर्मफळानें मनुष्ययोनींत जन्म

पावून मेल्यानंतरची त्यांचीं हीं एकभूतप्रधान शरीरें तितकीं दृढ नसतात. कारण त्यांत पारतंत्र्य अधिक असते. तथापि वैकारिक तीव्र वासनांनीं कधीं कधीं तीं दृढ होतात. म्हणून आपणांस वाटेल त्याच्याशीं या हार्दाकाशात संगनमत करावें.

**नारदः**— आपली आज्ञा मी शिरसा मान्य करीन. आपल्यास मी साष्टांग नमस्कार करितों. मला निरोप द्यावा.

**ब्रह्मदेवः**— आपलें सर्वकाल कल्याण असो. यावे.

**नारदः**— नारायण नारायण जय गोविंद हरे.

## प्रवेश चवथा

[हस्तिनापूर, प्रातिकामी, गांधारी आणि धृतराष्ट्र]

**प्रातिकामीः**— (अभिवादन करून) महाराज! आपण सर्व मऊ गाद्या, बिछाने वगैरे सोडून देऊन खालींच जमीनीवर शयन करिता, असें असे मी ऐकिले आहे; हे ठीक नाहीं. युधिष्ठिरास हे कळेल तर तो प्राणत्याग देखील करील.

**गांधारीः**— प्रातिकामे! मी यांना किती म्हणून सांगते. दुर्योधन आपल्या बुद्धिमांद्यानेंच मरण पावला. त्याच्या सल्ल्यानें जाऊन यांनी थोरांचे न ऐकिल्यामुळें सर्व कुलाचा फडशा पडला. क्षत्रियकुल बहुतेक नामशेष झाल्यासारखे आहे. आपण आतां जितके जितके शोक करूं तितकें तितकें अकल्याण होणार आहे. मी कितीही विचार करिते, वाटेल तेवढा खेद मला भरून येतो, परंतु त्या महात्म्या युधिष्ठिराचा अपराध कोणत्याच तऱ्हेने दिसत नसल्यामुळें, माझा क्रोध चमकणाऱ्या विजेप्रमाणें जागच्या जागींच नाहींसा होतो. युधिष्ठिराचा मनस्ताप राज्य मिळाल्यामुळें उलट तो वाढतच आहे, असें मी ऐकिले आहे.

प्रतिकामीः—आई साहेब! युधिष्ठिराचा मनस्ताप किती वाढत आहे हे कोणालाच सांगतां येणें शक्य नाही. पण आणखी त्याचे भाऊ तरी कांहीं सुखांत नाहींत. रणभूमीवर जाऊन पुत्रशोकाचे वेळीं, आमची एकही काठी शिल्लक ठेविली नाहींस, असें भीमाला आपण म्हणाला. तें वचन तो तारट आहे व सूड घेण्यास पटाईत आहे तरी त्याच्या काळजास फार लागलें आहे; व खरोखर आमच्याकडे लक्ष असणारा एकटा विकर्ण जरी जीवंत ठेवला असता तरी त्यांत गांधारीचें समाधान झालें असते, त्याला मारण्यांत माझ्या हातून मोठी चूक झाली आहे. भीष्म-द्रोणासारख्यांनीं जेथे धर्मनिर्णय केला नाहीं, तेथे बालमहात्म्यानेंच धर्माथाला धरून आमच्या बाजूनें मत सांगितलें. माझ्या तापट बुद्धीमुळें व केलेल्या घोर प्रतिज्ञेमुळें जी ही भयंकर चूक झाली, ती आतां भरून येणार नाहीं असें भीमाला वाटत आहे. त्याप्रमाणें भीष्म व द्रोण यांनांहि आपल्या हातानेंच मरण आल्यामुळें अर्जुनाचेंहि मानस स्वस्थ नाही. भगवंतानें उपदेश करण्यापूर्वी युद्धांतच जो शोक अर्जुनाला उत्पन्न झाला होता, त्यानें आयते वेळीं पुनः अर्जुनांस गांठून टाकले आहे; आणि या तिघांना समजावण्यामध्यें नकुल, सहदेव व कुंति या तिघांचाही मनस्ताप अधिक वाढत आहे. भगवान् श्रीकृष्णानें त्या संबंधानें युधिष्ठिरास म्हटलें असतां धर्मराज त्यांना फिरून म्हणाले, देवा! कालाच्या नियमान्वयें आपल्या एवढ्या कुलाचा फडशा पडला आहे, तर कालाच्या नियमान्वयेंच मला शोक होत आहे, तो दूर करण्याचे प्रयत्न सर्वांचे फुकट आहेत, असें म्हणून महाराज युधिष्ठिर पुनः शोकमग्न झाले. पांडवांना दिवस आणि रात्र शोकावांचून असा वेळ जात नाहीं. त्यांना सुखानें झोंप येत नाही. सर्व राज्यवैभवाकडे प्रथमच दोषदृष्टि असल्यामुळें व कर्णाच्या शोकानें त्याचें मन व्यग्र असल्यामुळें, राष्ट्रावर हे कृपासंकटच ओढवलें आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाही.

**धृतराष्ट्रः**– प्रातिकामे! असें असेल तर हा मी मंचकावर बसलोच पहा. युधिष्ठिराला कोणत्याहि प्रकारचा त्रास द्यावा असें माझ्या मनांत नाहीं. पशुपक्ष्यांकरितां देखील तीळ तीळ तुटणारें त्याचें अंतःकरण माझ्याविषयीं कसें आहे हें मी जाणत आहे. पुत्रशोकानें माझें हृदय जाग्याहून उडून जाऊन मला कांहीं बरें वाटत नाहींसें झाल्यामुळें आणि ब्रह्मकुमार महर्षि, विदुर, संजय प्रभृतींनीं मला योग्य सल्ला सांगितला असतां, त्याला न जुमानून मी त्या मूर्ख पोराच्या नादीं लागण्यानें रणांत काळालाही अजिंक्य अशा थोर क्षत्रिय कुलांचा माझ्यामुळें फडशा पडला आहे असें वाटून माझें काळीज चर्र होऊन जातें.

**विदुरः**– राजा धृतराष्ट्र! प्रातिकामीचें, गांधारीचें तसेंच तुझें भाषण मी संपूर्ण ऐकिलें. तूं आयत्या वेळीं आपला शोक आवरला नाहींस तर तुझ्याच अपराधानें पुढें याहीपेक्षां अधिक शोकांत पडावें लागेल. तुझ्या डोळ्यांतून पडलेले अश्रुबिंदु धर्मज्ञ युधिष्ठिराच्या अंतःकरणाला ब्रह्मास्त्रा-पेक्षां अधिक झोंबत आहेत. त्यामुळें त्याची काय दशा होईल इकडे लक्ष दे. कौरवानें जसें आपल्या बुद्धीनें आपल्यावर संकट ओढवून घेतलें, तसें पांडवावर त्याच्या बुद्धीनें येत नसून तुझ्या अतिशोकामुळें येईल कीं काय असा विचार करून खबरदारी घे. हे भाग्यशाली! तुला युधिष्ठिरच पुत्राचे ठिकाणीं असल्यामुळें, तूं जाऊन त्याचें सतत समाधान करीत जा. युधिष्ठिराच्या मनःस्तापामुळें कुंतीचाही मनस्ताप अधिक वाढत आहे. मी बाळपणापासून व्यर्थ मौन धरल्यामुळें त्रिभुवनाला हालवून सोडणाऱ्या एका मुलाला मी मुकलें असें वाटून तिच्या मनांत फार भडभडून येते. भगवान् व्यासांच्या हातून तुम्हां सर्वांना एकवेळ चांगले दिवस दिसणार आहेत असें मी भाकीत सांगतों. माझ्यावर विश्वास ठेवून तुम्ही आपला शोक आवरा. युधिष्ठिराकडे पहा. त्या महात्म्याचें कल्याण चिंतणें हेंच आतां तुमचें कर्तव्य उरलें आहे.

**धृतराष्ट्रः**— विदुरा! तूं माझ्यापेक्षां लहान असला तरी बुद्धीनें फार थोर आहेस हें मी जाणत आहे. तुझें हितवचन न ऐकिल्यामुळेंच आमचें सर्व कूळ धुळीस मिळालें आहे, हे मी जाणत असून आतां मला प्रत्यक्ष अनुभव येऊनहि तुझें वचन कसें ऐकणार नाही. गांधारी! विदुराच्या म्हणण्याप्रमाणेंच करणें व त्या महात्म्या युधिष्ठिराचें मन स्थिर करणें आपलें वडिलाचें काम तूं करावेस, असें मला वाटते.

**गांधारीः**— आज्ञा महाराज!

## प्रवेश पांचवा— द्वारका प्रकरण

**सात्यकीः**— महाराज! आपण सर्व शक्तिमान् व सर्वज्ञ असून आपल्या मनाला या लोकीं स्वस्थता कां वाटत नाहीं? आपल्याला कोणती गोष्ट ठाऊक नव्हती, किंवा ठाऊक नाहीं असें नाहीं. जगांतील कोणत्याही घोर किंवा हर्ष प्रसंगानें आपल्याला मोह उत्पन्न होत नसून स्थीर असणारें आपण परब्रह्म आहां; तर मग आम्हा मानवांना मोह पाडणारी आतां अशी ही माया कां दाखवित आहां! द्वारकेच्या या झगझगीत वैभवांत आपलें मन आतां लागत नसून पांडवांच्या चिंतेंतच सदा तें गढून राहिलेलें दिसत आहे. पांडवांचे जेवढें कल्याण करावयाला पाहिजें तेवढे आपण केलें आहे. आपल्याच प्रसादानें निर्भय अशा या निष्कंटक पृथ्वीचा उपभोग घेण्यास ते समर्थ झाले आहेत. रणांत भीष्म द्रोण व कर्ण यांच्याशी टक्कर देऊन आपल्याच प्रसादानें सर्व क्षत्रिय कुलाचा फडशा पाडला आहे. तेव्हां आतां पांडवाच्या पक्षाची कसली चिंता आपल्यास लागून राहिली आहे.

**भगवान्**—सात्यके! तू म्हणतोस खरें आहे. पांडवाचें पाहिजें तेवढें कल्याण केलें. पण पांडवांच्या दैवाचा नियमानियमच, त्यांनीं राज्य भोगूं नये, असा आहे कीं काय कोण जाणे! कारण त्या सर्वांनाच शोकानें घेरून टाकलें आहे. आपल्या वडिल भावाचा आपल्या हातून जाणून बुजून

वध झाला आहे असें वाटून युधिष्ठिर राज्यांत मन घालीत नाहीं. उद्धट व तापट स्वभावाचा असून वैऱ्यांचा सूड घेण्यामध्यें पटाईत असा भीमसेन देखील विकर्णाचा युद्धांत विनाकारण वध झाला आहे असें वाटून बिलकूल थिरल्यासारखा झाला आहे. युधिष्ठिरानें देखील सत्याचा आभास दाखवून माझ्या प्रिय गुरूला फसवून मारिलें त्यावेळीं मी त्याची उपेक्षा केली. तेव्हां श्रीकृष्णाच्या सांगितल्यानें मी घोर पातकच केलें असें अर्जुनाला वाटत आहे. तो शोकाकूल होऊन क्षात्र धर्माच्या वृत्तीला झुगारून देण्याकडेच त्याचा कल दिसत असतो. कुंती युधिष्ठिराच्या शोकानेंच शोकामध्यें गढलेली असते. हा असा भयंकर शोकसागर उचंबळल्यामुळें, बाळस्वभावामुळे नकुल सहदेव यांना कांहीं समजत नसल्यामुळें, यांच्याकडे पाहून तेही शोकाकूल होत असतात. द्रौपदी व सुभद्रा आपल्या आपल्या मुलांचे गुण आठवून युद्धाच्या गोष्टी काढीत काढीत शोकाग्नींत होरपळून जात आहेत. तेव्हा फिरून या क्षात्रकुलाचा कारुण्यप्रलय होणार कीं काय, अशी मला भीति वाटून राहिली आहे, आणि म्हणूनच मला चिंतेनें झोप येत नसते. माझी सर्वांच्या ठिकाणीं समबुद्धि असून कोणा-विषयीचाच मला मोह नाहीं. तथापि पांडव मला रात्रंदिवस भजत अस-ल्यामुळें त्यांच्याकडे रात्रंदिवस माझें लक्ष लागून राहिलें आहे.

**सात्यकी**:—महाराज ! आपण नको नको म्हणत असतां भूरि-श्रव्याचा मी जो वध केला, त्याबद्दल आतां मलाही पश्चात्ताप होत आहे. तें असो. पांडव आपल्या म्हणण्याच्या बाहेर नाहींत; तेव्हा आपण जाऊन शोकसागरांत बुडलेल्या त्यांना हात देऊन वर काढावें.

**भगवान्**:—सात्यके ! तूं फार चांगले बोललास. माझ्याही मनां-तून तसें करावयाचे आहे. तर तूंही माझ्याबरोबर निघण्याची तयारी कर. बरें आहे म्हणून नमस्कार करून सात्यकी आपल्या घरीं गेल्यावर तयारी-मध्यें ती रात्र निघून गेली. नंतर उजाडल्यावर भगवान्, सात्यकी, व निवडक शस्त्रें बरोबर घेऊन हस्तीनापुराकडे निघाले. पांडवाकडे सारखे लक्ष लागून राहिले असल्यामुळें फारसा कोठें मुक्काम न करितां हस्तिना-

पुरास येऊन पोहोंचले. भगवान् आले आहेत असें ऐकून युधिष्ठिरादि पांडव सर्व साहित्यानिशीं त्यांना सामोरे जाऊन सत्कारानिशीं त्यांना घरी घेऊन आले, आणि सर्व राज्य त्यांच्या पायावर समर्पण करून आपण हात जोडून त्यांच्या समोर उभे राहिले. तेव्हां त्यांना बसावयाला सांगून युधिष्ठिराला म्हणाले, पृथानंदना ! निष्कंटक अशा पृथ्वीचा तुला उपभोग तुझ्या पुण्यकर्मानेंच मिळाला आहे. तुझ्या राज्यांत सर्व प्रजा कुशल आहेत ना. ! दीन झालेल्या ह्या प्रजेला तुझ्यावांचून आतां कोणीही आधार नाहीं. शोकसागरामध्यें बुडालेल्यांना तूंच काय ती आतां नौका आहेस. अतिशय शोकानें होरपळून जाऊन तुझे लक्ष राज्याकडे लागत नाहीं, हे ऐकूनच चार गोष्टी सांगावयाला आलो आहे. तुझ्यासारख्या धर्मज्ञाला असा शोक करणें उचित नव्हे. जगांत कोणतीही गोष्ट शाश्वत अशी राहणारी नाहीं. परमेश्वर हा कोणाचा मित्र किंवा शत्रु नसून सर्वदा उदासीन आहे व त्याचे स्वरूप असणारा आत्माही तसाच आहे. परमेश्वराचे मायेनें मोहून जाऊन स्थूल देहाशीं जखडून आई बाप बंधु वगैरे माझे असून मी अमुक नामरूपाचा आहे अशा प्रकारचे मूर्ख लोक समजत असतात, व त्यामुळेंच त्यांना प्रतिदिवशीं हजारों हर्षाला व हजारो शोकाला कारणें होत असतात. तसेंच सर्व जग नाशिवंत असून विकारी आहे, व आत्मा अविकारी आहे असें जाणणाऱ्या शहाण्याला तीं होत नाहींत. तूं सर्व कांहीं जाणत आहेस. म्हणून तूं अशा प्रकारचा शोक करीत बसणें अनुचित वाटतें.

**युधिष्ठिरः**--वासुदेवा ! सर्व जगाच्या उत्पत्तिस्थितिलयाचा आधार तूं असून पांडवाला गति काय तों तूंच आहेस. वेदामध्यें प्रत्यहीं ज्याची स्तुति होत असते, अशा प्रकारचा भगवान् तूंच असून सुक्स्रुवा इत्यादि-कांतून अग्निला दिल्या जाणाऱ्या आहुतीच्या योगानें प्रसन्न होणारा विष्णु तूंच आहेस.तुला कोणी मित्र किंवा शत्रु नसून तुझ्याशीं शत्रूप्रमाणें वागणाऱ्या दैत्यां-नाही तूं सद्गति दिली आहेस. तूं सर्वज्ञ असल्यामुळें तुला काहीं ठाऊक नाहीं

असेंहि नाहीं, व सर्वशक्तिमान् असल्यामुळें तुझ्या हातून एकादी गोष्ट घडणार नाहीं असेहि नाहीं. युद्धांत आमचें हातून अनेक प्रकारचीं पातकें झालीं आहेत हें मला ठाऊक आहे. पण तुझ्या आश्रयामुळेंच आम्हाला सद्गतीची चिंता वाटत नाहीं. तरी पण केशवा! तूं स्वतः कोणाचा शत्रु मित्र नसून कर्माप्रमाणेंच फळ देणारा असल्यामुळें तुझ्याशीं कसें वागावें याविषयीं मला भीति पडली आहे. शिवाय माझें मन स्वतःच दुर्बल आहे म्हणून म्हण, किंवा त्यांत कांहीं दैविक गूढ आहे म्हणून म्हण, न कळून माझा वडील भाऊ कर्ण याचा वध झाला आहे. त्यामुळें माझ्या हृदयाला क्षत पडले असून कोणताही उपदेश त्यांत स्थिरावत नाहीं. भगवंता! असें मला कां होत आहे? सर्वांपेक्षां मला कर्णाच्या शोकानें अधिक कां पोळून घ्यावें? तूं सर्वसाक्षी असल्यामुळें कर्ण आमचा भाऊ आहे ही गोष्ट तुला ठाऊक असलीच पाहिजे. परंतु ती तूं युद्धाचे पूर्वीं आम्हांला कां सांगितली नाहींस? तेव्हां तुझ्याच मनांत या सर्व क्षत्रिय कुलाचा नाश करावयाचा होतां कीं काय असाहि मला संशय येतो. देवा! मला नाहीं तर कर्णाला तरी हे आमचे नातें उमगून देऊन त्याचें मन वळवावयाचें होतेस. याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण ऐकून भगवान् म्हणाले.–

**भगवानः**– अजात शत्रो! तूं मला ओळखले आहेस एवढ्यानेंच मी तुझ्यावर संतुष्ट आहे. कर्णाच्याच आज्ञेनें मी तुला ही सर्व पृथ्वी मिळवून दिली आहे, असें समज. शिष्टाईसाठीं जाऊन दुर्योधनानें माझें न ऐकिल्यामुळें मी जेव्हां परत आलो, तेव्हा कर्णाला आपल्या रथांत घेऊन कांहीं दूर आल्यावर त्याला मी ही सर्व गोष्ट समजावून दिली; आणि तूं पांडवांचा भाऊ आहेस म्हणून पांडवाला जाऊन मिळ व या मूर्ख दुर्योधनाची संगति सोडून दे असे मी त्याला सांगितलें. परंतु तो सत्यप्रतिज्ञ कर्ण आपल्या निश्चयापासून यत्किंचित्‌हि ढळला नाहीं. अनेक प्रकारच्या धर्मप्रचूर भाषणानें मला संतुष्ट करून शेवटीं तो मला म्हणाला कीं, मी

पांडवांचा भाऊ आहे ही गोष्ट युधिष्ठिराला कळवूं नकोस, कारण तसें करशील तर महात्मा युधिष्ठिर राज्य करणार नाहीं; व कसेहि झगझगीत राज्य मिळालें तरी तें मी दुर्योधनाचे पायावर ठेवणार. तेव्हां मलाहि नाहीं व पांडवांनाही नाहीं अशी राज्याची स्थिती होऊन जाणार आहे. परंतु पांडवानींच राज्य करावें असें माझ्या मनांत फार आहे. मी पांडवांना व द्रौपदीला जे सभेंत बोललों त्याचें मला वाईट वाटत नाहीं असें कां तूं समजतोस?

**ओव्या:**-कर्ण म्हणे भगवंता। जे तुम्ही मज विनविता। तरी तैसी मज योग्यता। साचाचि नाही॥१॥ साध्वी द्रौपदीची वेणी। दुःशासनादि ओढितां धरुनी। मी बोललों घोर वाणी। उद्देशूनी सतीते ॥२॥ तयाचे हेचि कारण। कीं खादले दुर्योधनाचें अन्न। सुमंत्र दाते असतां भीष्म द्रोण। मग म्यां सेवकें काय सांगावे ॥३॥ ज्यानें भीष्मद्रोणाचें कांहीं वचन सर्वदा ऐकिलें नाहीं। तो शठ माझे लवलाही। ऐकेल कैसा ॥४॥ आतां माझे पांडवाकडे मन। दृढ आहे म्हणूनी राज्य करावे युधिष्ठिरान। दुष्ट दुर्योधनास राज्य न मिळावे हे माझेहि मन। ऐसे कर्णवचन स्पष्ट करिती टीकेंत नीलकंठ ॥५॥ मजला त्यागोनि गेली कुंती। सुतपुत्रत्व कलंक लागला देहाप्रति। दुष्टान्न भक्षणें झालो दुर्मति। त्याचे प्रायश्चित्त पाहिजे मजला मरण ॥६॥ या उद्योग पर्वाच्या गोष्टी। तुज सांगितल्या अशत्रुदृष्टि। तें भाषण ऐकुनिया शेवटीं। युधिष्ठिर जगजेठीते विनवी ॥७॥

**युधिष्ठिर** म्हणालाः- गोविंदा! कर्णविषयीचे सत्यप्रतिज्ञातादि गुण तुलाही मान्य आहेत; परंतु तुम्हीं मला त्याचा यत्किंचित्‌ही मागमूस लागूं दिला नाहीं. आतां तरी त्या महात्म्याच्या सत्यसंधतेविषयी कांहीं गोष्टी सांगून माझा शोकपरिहार होईल असें कर.

**भगवान्** म्हणालेः- राजा! कर्णाच्या आणखी कांहीं गोष्टी सांगतों. हा तुझा तिसरा भाऊ इंद्रपुत्र-अर्जुन त्याच्या सत्यनिष्ठेविषयीं चांगला

जाणता आहे. एकेवेळीं कर्णाची दानाविषयीं सर्वत्र कीर्ति होऊन सर्व ब्राह्मण व ऋषी त्याची कीर्ति करीत आहेत असें पाहून हा माझा प्रिय सखा अर्जुन म्हणाला, देवा! आमच्यासारखे इंद्रप्रस्थाचे धर्मानें राज्य करणारे असून, लोक या सूतपुत्राचे काय म्हणून गोडवे गातात. दुसऱ्याच्या दिलेल्या धनावर हात मारून हा कर्ण आपली प्रशंसा करून घेत आहे, हे मला मुळींच आवडत नाहीं. यानें कांहीं पराक्रम करून कोठें मिळविलेले आहे काय? दुसऱ्याच्या पैशावर मजा मारणारे लोक जे धर्म करतात तो धर्म त्यांना कधींच मिळत नसतो. शिवाय युधिष्ठिरासारखा सत्यनिष्ठ राजा असतां याची काय म्हणून प्रशंसा व्हावी. आमच्या येथून कोणीही अतिथी विन्मुख गेलेला तुला ठाऊक आहे काय? तेव्हां मी म्हणालों, पार्था! सर्वच कर्मे कांहीं सर्वांना करिता येत नाहींत. रागद्वेष सोडून प्रत्येकानें आपल्या अंगीकृत कर्तव्याच्या योगानें माझें यजन केलें असतां मी संतुष्ट होत असतो. सर्वच कर्मे प्राधान्यानें सर्वांच्या हातून होत नसून, एक गौण व एक प्रधान अशींच कर्मे बहुधा सर्वांच्या हातून होत असतात. अहिंसा व सत्य हे दोन्ही धर्म पाळावयाचे असतात खरे! परंतु कित्येकांचें कर्म अहिंसाप्रधान घडत असतें व कित्येकांचें कर्म सत्यप्रधान घडत असतें. याचप्रमाणें कित्येकांचे कर्म त्या त्या रूपानें प्रधान होत असतें. महात्मा शिबीराजा आपल्या शरीराच्या दानानेंच ख्याति मिळवितां झाला. श्रीयाळानें आपल्या पुत्राचें मांस अतिथीला अर्पून ख्याति मिळविली. प्रल्हाद आपल्या सत्यानेंच स्वपुत्राचें शंभर वर्षे आयुष्य मिळवितां झाला. याप्रमाणें कांहीं मुनि तपानें, कांहीं मुनि योग अध्ययनादिकानें सिद्धीला गेले आहेत. कर्ण दानशूरही आहे व रणशूरही आहे. मी एखादे वेळीं आपल्या भक्ताचा जय किंवा पराजय जरी दाखवित असलों, तरी त्यांना मरण नाहीं हें जाणूनच दाखवीत असतो. माझा भक्त कधीं नाश पावत नाहीं हे तूं पक्कें समज. मी जसा तुझ्यावर प्रसन्न आहे,

तसाच त्या कर्णावरही आहे; म्हणून त्या महात्म्यासंबंधानें भलताच समज करून घेऊन उगाच चिडून जाऊं नकोस. प्रसंगीं त्याचेसारखे दानामध्यें तुझें धैर्य टिकणार नाहीं, असेंही मला वाटते. हें माझें भाषण तुझ्या शूर प्रकृतीच्या भावाला सहन न होऊन तो म्हणाला; कृष्णा ! आम्हांला तूंच काय तो आधार असून एखादें वेळीं तूंहि आम्हांला तुच्छ करतोस हें पाहून आश्चर्य वाटतें. तेव्हां मीहि कर्णाचें व्रत धरून तुला संतुष्ट करावे असें वाटतें, त्याला तूं अनुमोदन दे. मी म्हणालों—ठीक आहे. प्रतिज्ञा न करितां प्रयत्न मात्र कर व माझ्या म्हणण्याचा प्रत्ययहि मी तुला लवकरच दाखवीन. पुढे या तुझ्या भावानें अघटित दान करणें सुरू केले, व त्यामुळें याची सर्वत्र कीर्ति होऊं लागली. पुढें नुकताच पावसाळा लागणार अशा वेळीं एक ब्राह्मण येऊन चार महिन्याकरितां काष्ठें मागूं लागला. तेव्हां काष्ठाची आपणालाच चार महिन्याची व्यवस्था नाही, हें पाहून सर्व काष्ठांचा हिशोब त्या ब्राह्मणाला दाखवून अर्जुन त्याला म्हणाला, विप्रर्षे! हे पहा. माझ्या येथें स्वतःलाच पुरेलशी काष्ठें नाहींत, तेव्हां आपण आणखी काय पाहिजे ते मागा. तेव्हां तो ब्राह्मण म्हणाला मला दुसरें कांहीं नको. मी कांहीं तुला संकट घालीत नाहीं व तुझें सत्वहि नेत नाहीं. तुझ्या येथे काष्ठें पुरेल इतकीं नाहीत हें मी स्वतः पाहिलें आहे, म्हणून माझा रोष नाहीं. शिवाय इंधनाचें काम कोणा सामान्यहि मनुष्याकडून होण्यासारखे असल्यामुळें मी तें जुळवून घेईन. आज केलेल्या पूजनानें व भोजनानें मी संतुष्ट झालों आहे, तुझें क्षेम असो. असें म्हणून ब्राह्मणानें अर्जुनाचा निरोप घेतला, व पार्थानेंहि त्याच्या पायावर मस्तक ठेवून बरें आहे, मजवर कृपा असूं द्या असें म्हणून त्याला निरोप दिला. नंतर तो ब्राह्मण निघून कर्णाकडे चालला. तेव्हां मी अर्जुनाला घेऊन गुप्तरूपानें तेथें गेलों. नंतर कर्णाच्या जवळ येऊन माझ्या प्रेरणेनें तो ब्राह्मण म्हणाला, युधिष्ठिर या जगांत सत्यव्रत म्हणून प्रसिद्ध आहे व तूं दानव्रत म्हणून प्रसिद्ध आहेस. हरिश्चंद्र

सत्यव्रत म्हणून एक राजा होऊन गेला. तपोव्रत विश्वामित्र आपल्या सामर्थ्यानें मोठ्या पदास प्राप्त झाले. तेव्हां कर्ण त्यांना अभिवादन करून म्हणाला महाराज! आपलें स्वागत असो. आपले मी काय प्रिय करूं. त्यावेळीं त्या ब्राह्मणानें जी अडचण अर्जुनाला सांगितला होती, तीच कर्णाला सांगितली आणि माझा परिवारहि मोठा आहे असें सांगितलें. त्यावेळीं त्या ब्राह्मणानें अर्जुनाकडे मी गेलों होतों ही गोष्ट लव देखिल उच्चारली नाहीं. ब्राह्मणाचें भाषण ऐकून संतुष्ट होऊन कर्ण म्हणाला मज गरीबाला आपलें मागणें हें फारच थोडें आहे. तथापि आपली इच्छा. असें म्हणून इंधन देण्यास आपल्या सेवकाला आज्ञा केली. इंधनाचा तुटवडा आहे असें सेवकानें सांगताच कर्ण म्हणाला, माझे राहाण्याचे चंदनी महाल सर्व पाडून टाका, आणि तीं सर्व काष्ठें या ब्राह्मणाला देऊन त्याचे मनोरथ पूर्ण करा. झाडाच्या पानाचें छत्र करून त्याखालीं देखील माझें राहणें होऊं शकतें. ही कर्णाची आज्ञा ऐकून सेवकानें तसेंच करून ब्राह्मणाला पाहिजें होतीं तेवढीं काष्ठें दिलीं. उरलेल्या शेष मंदिरांत पुनः गोपुरें बांधेपर्यंत कर्णासह मंडळी राहिली. तेव्हां या अर्जुनाला त्याच्या दानशूरत्वाविषयीं खात्री वाटून त्याच्या विषयींचा अमर्ष कमी झाला. हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून युधिष्ठिराला व कुंतीला अत्यंत शोकाचें भरतें येऊन हे बाळा कर्णा! म्हणून बेशुद्ध पडली व युधिष्ठिराचीहि आपल्या वडिल भावाच्या विलापानें तीच स्थिति झाली. तेव्हा श्रीकृष्णानें त्या दोघांनाही सावध करून पुनः चार बोधाच्या गोष्टी सांगितल्या. युधिष्ठिर म्हणाला गोविंदा! तुला हे सर्व माहित असून त्वांच ज्या अर्थी माझ्या हातून त्याचा वध करविला आहेस, त्या अर्थी तुला कोणी व तूं कोणाचा नसून ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें तूंच फल देत असतोस. जो तुला भजतो तोच तुझा व तूं त्याचा हें मी पक्के समजलों. तूं सर्वज्ञ असल्यामुळें तुला कांहींच अवघड नाहीं; परंतु माझ्या आईनें आजपर्यंत ही गोष्ट झांकून ठेवून मला सांगितली नाहीं; व त्या महात्म्या कर्णाची

भेट घेतली नाहीं याचेंच मला मोठें आश्चर्य वाटतें. तेव्हा कुंती म्हणाली वत्सा ! तूं मला उगीच दोष देऊं नकोस. तुमचें व त्याचें सख्य व्हावें म्हणून मी कर्णाची भेट घेऊन पुष्कळ प्रयत्न केला पण तो महात्मा सूर्य-पुत्र तीळभर आपल्या सत्यापासून ढळला नाहीं. जें श्रीकृष्णाला त्यानें उत्तर दिलें तसेंच उत्तर मला दिलें आणि मला तूंच टाकून दिल्यामुळें मला क्षत्रिय संस्कार झाले नाहींत असें तो मला थोडेसें बोललाहि. पुढें म्हणाला, ज्यांना मला मारणें जड नाहीं अशा अर्जुनाखेरीज करून तुझ्या मुलांना मारणार नाहीं. शिवाय हे भाग्यशाली ! अर्जुन मिळून पांच किंवा कर्ण मिळून पांच असें पांचच्या पांच मुलें राहतील. असें तो बोलल्यावर मी त्याला प्रेमानें जवळ घेतले व एवढी तरी आठवण ठेव असें म्हणून निघून आले. युधिष्ठिर म्हणाला, म्हणूनच त्या महात्म्यानें मी सांपडलों असतांही जीवंत दुर्योधनाकडे धरून न नेतां मला सोडून दिलें. द्रोणानें देखील मला अर्जुन नसतां धरून देण्याची प्रतिज्ञा केली होती व कर्णाला ती, मी पकडलों गेल्यामुळें सहज साधतां आली असती; परंतु तों आंतून, त्यांच्या पक्षाचा नसल्यामुळें मला त्यानें दुर्योधनाकडे धरून नेलें नाहीं. कृष्णा ! प्राणत्याग करून त्या महात्म्याला भेटल्याशिवाय आतां मला चैन पडत नाहीं, असें म्हणून तो धर्मात्मा युधिष्ठिर पुन: अतिशय शोकांत मग्न झाला. तेव्हां त्याचें शांतवन करून भगवान् म्हणाले राजा ! तुझे व कर्णाची यात्र लोकीं सख्य करून देण्याचे मी प्रयत्न करीन; आणि हें तुझें कार्य भगवान् व्यास महामुनि शेवटास नेतील असें मी निश्चयानें सांगतो. धैर्य धरून ऐस. तुझ्याच कार्यासाठीं जाण्याकरितां मला आतां निरोप दे. या भगवंताच्या भाषणानें आनंद होऊन त्याच्या पायावर डोकें ठेऊन योग्य पाहुणचारादि केल्यानंतर आमचे इहपर कल्याण तूंच आहेस असें म्हणून प्रणाम करून युधिष्ठिरानें प्रभूस निरोप दिला.

## प्रवेश सहावा

## अर्जुन वाग्युद्ध

ऋषि म्हणाले सूता ! याप्रमाणें भगवान् युधिष्ठिराला आश्वासन देऊन निघून गेले असतां पुढें युधिष्ठिराचें वर्तन कशा प्रकारचें होतें ? सूत म्हणाले—या सुखपर्वाला आरंभ झाल्यापासून तुम्ही न विचारताही ज्या मी प्रेमानें कथा सांगितल्या त्याचा अवशेष सांगणें हें माझें कर्तव्यच आहे, म्हणून पुढें तुम्ही अवधान देऊन ऐका. ऋषी हो ! भगवान् श्रीकृष्ण आपल्या ठिकाणीं निघून गेल्यावर उत्पातसमयींच्या आनिश्चित ग्रहण समुच्चयाप्रमाणें अकाली चंद्र जसा राहू ग्रस्त होऊन निस्तेज होतो तसा तो महात्मा युधिष्ठिर, भगवान् श्रीकृष्णाच्या भाषणाचें विस्मरण होऊन पुनरपि शोकाच्या तडाक्यांत सांपडून निस्तेज झाला. मग तो आपल्याशींच पण मोठ्यानें बोलूं लागला. तो म्हणाला, मला हे काय आश्वासन दिलें आहे. तो परमात्मा असून ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें फल देणारा असल्यामुळें माझ्या चुकीचें परिमार्जन कसें करील. माझे प्रिय श्रीकृष्णाला करावयाचे होते तर तें पूर्वींच करतां आले असते. कर्णाचा व आमचा संबंध त्याला ठाऊक असूनही त्यानें मला कसा कळविला नाहीं. त्या प्रभूला कोण आप्रिय व कोण प्रिय असणार. बरें श्री महर्षी तरी आमच्या-वर काय म्हणून अनुग्रह करतील, कारण कौरव व आम्ही यांना सारखेच होतो. आतां कौरवांनी त्यांचे ऐकिले नाही म्हणावे तर मला तरी द्यूत खेळूं नकोस म्हणून त्यांनीं सांगितलें तरी मी त्यांचे कोठें ऐकिले ? म्हणून आपल्याच कर्मानें ठार झालेल्या मला कोणावरही विश्वास कसा टाकतां येईल ? रंभेचें सुंदर रूप पाहूनही षंढाला आनंद न होतां तापच होत असतो, त्याप्रमाणें हे सर्वांग सुंदर राज्य पाहूनहि मला तापच होत आहे; म्हणून आतां कोणाशीं अधिक न बोलावें हेंच बरें. या राज्येच्छू माझ्या

भावांना धोका देऊन मला कोठें तरी निघून गेलें पाहिजे. असें आपल्याशींच बोलून तो महात्मा धर्मपुत्र कपाळावर हात ठेवून स्वस्थ झाला. परंतु ते त्याचे आपल्याशींच मोठ्यानें चाललेलें भाषण ऐकून अर्जुन त्याच्याजवळ जाऊन म्हणाला, आपण हें काय मांडलें आहे. आपणाला राज्य करावयाचे नव्हते तर मला आज्ञा तरी कां दिली व एवढा कुलक्षय तरी कां करून घेतला? आपली आज्ञाच नसती तर मी दास होऊन आपल्या मागे वनांतच राहिलों असतों. आम्हांला कितीहि क्लेश आले तरी सहन केले असते, व मग एवढा कुलक्षयही झाला नसता. आपल्याला जर प्रायोपवेशनच करावयाचें होतें तर सभापर्वांत महर्षींनीं सर्वक्षत्रियनाशाला तूंच कारण आहेस असें सांगितलें, तेव्हांच कां केलें नाहीं. आम्हांला तोंडघशी पाडून आतां आपण गेला म्हणजे शत्रूपेक्षां आमचाच घात अधिक केला असें होईल. कर्णाकरितां आपणांला इतकें दुःख कां होते. कर्ण जसा आपला भाऊ आहे तसा तो माझाही आहे. परंतु युद्धांत कोणीही पुढें आला तरी त्याच्या हांतून मरणें किंवा मारणें हा क्षात्रधर्म असल्यामुळें न कळून माझ्या हांतून त्याचा वध झाला आहे. आपल्याला पृथ्वी आणि पुष्कळ पैसा मिळाला आहे. तेव्हां नाना प्रकारचे यज्ञ करून दानें देऊन आपल्या मनाची हुरहुर काढून टाका. जेथें पैसा आहे तेथेंच धर्म आहे. मनुष्य कुलीन असो किंवा नीच असो, गुणज्ञ असो किंवा मूर्ख असो, पैसा ज्याच्याजवळ आहे तोच मोठा ठरतो. पूर्ववयांत काम, मध्यवयांत अर्थ व अंत्यवयांत धर्मानें संपादन करावें असें म्हणतात. तेव्हां आपण शोक सोडून प्रजेचें पालन करा. वनांत जाणें ब्राह्मणाचा अत एव परधर्म आहे. न्यायानें द्रव्य संपादन करून यज्ञ दानें करणें हाच क्षत्रियाचा धर्म होय. याप्रमाणें अर्जुन बोलल्यावर, युधिष्ठिर म्हणाला, सर्व कल्याणाचे मार्ग एकीकडे सारून तूं पैसाच काय रे घेऊन बसला आहेस. तूं शूर व शहाणा आहेस तरी अजून तुझी पोरबुद्धि गेली नाहीं. न्यायानें पैसा

मिळवून यज्ञ केले असतां क्षत्रियांना उत्तम गति मिळते खरी, परंतु आमच्या हांतून अनेक अधर्म झाले आहेत. तुझ्या डोळ्यावर धुंदी आल्यामुळें तुला कार्याकार्य समजत नाहीं असें वाटतें. माझा व तुझा कर्ण हा सारखाच भाऊ असतां त्याच्याकरितां तुला यत्किंचित् देखील वाईट कसें वाटत नाहीं. तेव्हां तुझें हृदय दगडाप्रमाणें कठीण आहे, असें म्हटलें पाहिजे. या युधिष्ठिराच्या बोलण्यानें अर्जुन व्यथित होऊन म्हणाला, अशा वाग्बाणानें मला टोंचण्यानें आपणाला काय पुरुषार्थ मिळत आहे ? त्या अधमांनीं द्रौपदीला जेव्हा सभेंत ओढून आणले तेव्हां आपल्यामुळेंच आम्हांला ते सहन करावें लागलें; नाहींतर मत्कुणाप्रमाणें त्या मूढांना केव्हांच चिरडून टाकले असते. शकुनीचे कपटद्यूत ठाऊक असतांही आपण दुसऱ्यांदा द्यूत खेळावयास गेला. तेव्हा आपल्या सारखे भाऊ मिळणें म्हणजे आम्ही पूर्व पापाचेंच फळ समजतो. आपण मोटे धार्मिक म्हणून आपला डंका वाजत असतो. परंतु माझ्या प्रिय गुरुद्रोणाचार्याचा वध करतांना धर्माला झुगारून देऊन राज्याच्या लोभानें खोटे बोलल्यामुळें आकाशांत चालणारा आपला रथ जमीनीवर चालूं लागला हे अकीर्तिकर कर्म आपल्या शरीरास कसें जाळून काढीत नाहीं ? अहो ! गुरूपेक्षांहि भावाचा शोक आपल्याला ज्या अर्थी अधिक होत आहे त्या अर्थी हा आपला धर्मप्रेम आहे कीं मोह आहे समजत नाहीं. आतां आपल्याला जर राज्य नको असलें तर मलाहि तें नकोच आहे. मला माझ्या प्रिय गुरूचा वध झाल्यामुळें हें जग शून्य भासत आहे. तेव्हां गुरुपुत्र अश्वत्थामा जेथें असतील तेथें मी निघून जातो. मग ते पाहिजेत तर माझा वध करोत अथवा रक्षण करोत. मला आपलें अनुमोदन असावें. असें म्हणून युधिष्ठिराच्या पायावर डोकें ठेवून त्यांच्या बोलण्याची वाट न पाहतां अर्जुन तेथून वनांत जाण्याच्या तयारीस लागला. याप्रमाणें अर्जुन निघून गेलेला पाहून भीम युधिष्ठिरास म्हणाला, पांच वर्षें तीर्थयात्रा

करीत असतांना झुरून झुरून ज्याच्याकरितां आपण शोक करीत होतां तो हा धनंजय वनाला निघून चालला असता, आपण त्याची उपेक्षा करीत आहां. ज्याच्या सहाय्यानें आम्ही सर्व शत्रूचा काटा उपटून राज्याचे धनी झालो आहो, त्याला टाकून आपलें मन कर्णाकडे कां ओढीत आहे ! आपल्याला राज्य करावयाचें नाहीं असें जर तेव्हांच स्पष्ट सांगितलें असतें तर आम्ही या भानगडींत पडलोंच नसतों. खरें बोलणाऱ्या विकर्णाचा गांधारीचा मुलगा म्हणूनच अधमप्रतिज्ञेमुळें माझ्या हातून जो वध झाला आहे तो मलाहि आतां जाळून काढीत आहे. त्या धैर्यशाली विकर्णाला जर मी मारलें नसते तरी गांधारीचें मनःसमाधान झालें असतें. युद्ध संपल्यावर तिला भेटतांना आमची एकही काठी तूं शिल्लक ठेविली नाहींस असें जे गांधारीनें म्हटलें तें तिचें म्हणणें विकर्णा-वांचून इतरांविषयीं कांहीं वाटले नाहीं; पण विकर्णानें आमचा कांहींच अपराध केला नसता, भीष्मद्रोणादिक सर्व मुकाट्यानें बसलें असतां, ज्या बाल बहादरानें सभेंत मत दिलें, त्या पोरावर प्रतिज्ञेच्या घमेंडींत हात टाकून मी आपल्या बळाला कलंक लावून घेतला आहे असें वाटते. युयुत्सूचे जसें आपण रक्षण केलें तसें विकर्णाचे केलें असतें तर कौरवकुलांत आपली अधिकच ख्याति झाली असती. विकर्णाच्या मारण्याबद्दल काका धृतराष्ट्र जर सूड उगविणार असतील तर मी त्यांच्याकडे जातों व त्यांना तसें करावयास सांगतों. सूत म्हणाले, शौनका ! याप्रमाणें भीम भाषण करून शोकाचा हुंदका आल्यामुळें, तो मटकन् खालीं बसला. तेव्हां नकुल सहदेवानीं त्याला सांवरून धरलें आणि ते युधिष्ठिराच्या तोंडाकडे पाहूं लागले. नंतर धर्मराज भीमाला म्हणाले, महाबाहो ! क्षात्रधर्माच्या दृष्टीनें जरी मी दोषी नाहीं, तरी राज्याच्या लोभानें भीष्मादि चांगल्या वीरांचाही या युद्धांत फडशा पडला. या मूढबुद्धि दुर्योधनाच्या नादीं लागून मोठ्या पुरुषांनींही आपल्या प्राणांची आहुति दिली. यामुळे आश्चर्य, खेद, व

मनस्ताप यांनीं मी अगदीं गांगरून गेलों आहें. तुमचें समाधान करणें म्हणजे मला टोंचल्यासारखें होत आहे. तथापि तुमच्याकडे पाहून मला कसें बसें आवरलें पाहिजे. मला आतां वन काय व राज्य काय सारखेंच वाटत आहे. चित्रासारखा मी राज्यावर बसून तुमच्या हातांतील नाचणारें बाहुलें होऊन मी राहीन. तुम्ही माझ्याकरितां इतके श्रम केले आहे हे मी जाणून आहे; परंतु या युद्धांत मारावयाचे नसलेलेहि मारले गेले आहेत, यामुळें कोणीही केलेलें समाधान माझ्या मनाला वळण्याला समर्थ होत नाहीं. बरें ते असो. पार्थ वनाला चालला आहे म्हणतोस, तर त्याचें समाधान करवून त्याला वळवून आण. तो वीरवर माझी आज्ञा मोडणार नाहीं. लहानपणापासून त्यानीं माझ्या आज्ञेचा त्याग केला नाहीं. हे युधिष्ठिराचें भाषण ऐकून भीम अर्जुनाला शोधण्यास निघणार, इतक्यांत मरणोन्मुखाला अमृत, रातांधळ्याला प्रभात आणि कृपणाला चिंतामणी मिळाल्याप्रमाणें, जटावल्कलें धारण केलेले, दंड कमंडलुच्या योगानें ज्यांच्या अंतरंगांतील विरक्ति स्वर्गीय ऐरावतादि रत्नांना केवळ तुच्छ करित आहे, असे ते भगवान् लोमेश महामुनि युधिष्ठिराच्या स्नेहामुळें अकस्मात् त्याकडे आले. त्यांना पाहून उठून साष्टांग नमस्कार करून योग्य आसनावर बसवून पाद्यअर्घ्यपुष्पनैवेद्यादिकांनीं त्यांची पूजा केल्यावर त्यांनीं बैस म्हटल्यानंतर पांडव खालीं त्यांचेजवळ बसले. नंतर परस्परांची कुशल प्रश्नोत्तरें झाल्यावर भगवान् लोमेश म्हणाले, युधिष्ठिरा ! तुझें हें मुख म्लान कां दिसत आहे ? प्रत्यक्ष इंद्रासारखे तुझे हे चार भाऊ तुझ्या पाठीशी असतां व लक्ष्मीसारखी दासी ही द्रौपदी तुझ्या आज्ञांकित असतां तुला आतां चिंता कशाची आहे. सर्व आततायी बंधूंना मारून तुम्ही हे न्यायानेंच राज्य मिळविलें आहे. तेव्हां एखादी गोष्ट मनांत धरून शोक करीत बसणें तुला उचित नाहीं. अरे भीष्म द्रोण कर्णादिकांचा तुला शोक होत आहे; परंतु जेव्हां त्या नीचांनी भीमाला वीष दिलें, तुम्हांला लाक्षागृहांत

जाळून टाकण्याचा प्रयत्न केला, भर सभेंत द्रौपदीची विटंबना केली, वनांत असतांना दुर्वासादिकांकडून नाहीं नाहीं तो छळ करविला, उत्तर गोग्रहणाचे वेळीं एकट्या अर्जुनावर आजोबासुद्धां सर्व तुटून पडले, बाळ अभिमन्यूचा, गुरुपणा एकीकडे ठेवून कपट बेत करून द्रोणाचार्यांनीं घात करविला, अशा वेळीं त्याचा थोरपणा कोठें गेला होता ? आतां त्यांना त्यांच्या कर्मांचें प्रायश्चित्त मिळालें असल्यामुळें तुला अर्थातच शोकाचें कारण उरलें नाहीं. तुझ्याच अपराधामुळें पार्थ वनांत जात आहे आणि आतां तूं त्याला वळवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेस. परंतु माझे ऐकशील तर सध्या त्याला वनांत जाऊं दे. कारण अश्वत्थामे यांची भेट घेऊनच त्याचा शोकाचा वेग शांत होईल. तेव्हा युधिष्ठिर म्हणाला आपली आज्ञा मला शिरसा मान्य आहे. भगवन् माझ्या मनांत एक संशय आहे. त्याचें आपण निराकारण कराल अशी आशा धरून मी विनंती करीत आहे. आपण आतांच उच्चारलेला कौरवांकडून झालेला आमचा आततायीपणा त्यांत दुर्योधनच मुख्य असून भीष्म द्रोणांचे तर त्यांत कांहीं अंगच नव्हते असें माझें मत आहे. कारण युद्धांत त्यांनीं मला माझ्या तर्फेचीच सल्ला दिली. त्या कपटपटु शकुनीची व दुर्योधनाची त्यांनींच अनेक वेळ कान उघाडणी केली. परंतु त्यांच्या त्या वर्तनाला साजेलसें आमचें वर्तन घडलें नाहीं हें शल्य माझ्या मनास फार पीडा देत आहे. भीष्मानें मला आपल्या मरणाची सल्ला सांगितली व मी मूढानें ती ऐकून त्याचा वध केला. द्रोणाचार्यांना अश्वत्थामा मेल्याची खोटी बातमी मी सांगितली. यापेक्षां मज मूढाच्या हातून कोणतें पाप व्हावयाचें राहिलें आहे, आणि हजार अश्वमेध केले तरी या महात्म्यांच्या प्रेमळमूर्ती माझ्या डोळ्यापुढें दिसण्याजोग्या आहेत कां ? बरें, परंतु महात्म्या कर्णाला आमच्या विषयीं काय वाटत होतें हें मला चांगलें समजलें नाहीं. त्यानें सर्वदा दुर्योधनाला वाईट सल्ला दिली असें मी ऐकितों; पण तो केव्हांच

आमचे बाजूने बोलला नाहीं काय? त्या दानरणपटूच्या हातून द्रौपदीचा व्यर्थ छल खरोखर झाला असेल, असें मला वाटत नाहीं. कर्ण आमच्याच पक्षाचा असून त्याचें मन आमचेकडे कसें ओढलें नाहीं? आपल्याला अज्ञात असें कांहींच नसल्यामुळे, माझ्या प्रश्नाचें निराकरण करावे म्हणन मी आपल्या पायावर मस्तक ठेवितों. लोमेश म्हणाले, वत्सा उठ! स्वस्थ हो! तुझें कल्याण असो. कर्णाचें तुमच्या विषयीं काय मत होते व त्याची कशी स्थिति झाली हे मी आतां सर्व सांगतों. चांगलें अवधान देऊन ऐक.

(अपूर्ण)

श्री ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु

श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ

# सांख्यसूत्रावर कांहीं विचार

नूतनजलधररूचये गोपवधूटीदुकूलचौराय ॥ गोपवधूटी

तस्मै कृष्णाय नमः संसारमहिरुहस्य बीजाय ॥१॥

सूत्रः-१ अथ त्रिविधदुःखांत्यंतनिवृत्तिरत्यंतपुरुषार्थः ॥१॥

**भावार्थः**- अथ त्रिविध दुःखांची अत्यंत निवृत्ति, अत्यंत पुरुषार्थ आहे.

**भाष्यः**- अथ शब्द मंगलवाचक आहे. याविषयीं स्मृति प्रमाण असल्यामुळें आणि "अथातो" इत्यादि पदें श्रुतीचे ठायीं दृष्ट असल्यामुळें भगवान् कपिलाचार्य उत्तमाधिकारीनिरीक्षण करतांना अथ हा शब्द शास्त्रारंभी ठेविते झाले.

**स्मृतिः**-"ॐकारश्चाथशब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा। कंठं भित्वा विनिर्यातौ तस्मान्मांगलिकावुभौ ॥" **अर्थः**- पूर्वी ब्रह्मकंठस्फोट करून ॐ आणि अथ हे दोन शब्द प्रकट झाले म्हणून तें मंगलवाचक आहेत. अथवा 'अथ' शब्दानें अधिकारी दर्शविला आहे. पुढें अनुबंधत्रयांचा अध्याहार करावा लागतो. अधिकारी अथवा अध्याहार केलेलें अनुबंधत्रय मिळून चतुष्टय होतें. हें अनुबंध चतुष्टय ज्ञात असल्यावांचून जिज्ञासू जनांची शास्त्रांचे ठायीं प्रवृत्ति होत नाहीं; म्हणून तें सांगणें इष्ट आहे. संसारसुख अनित्य असल्यामुळें त्याचा ज्याला मनांतून वीट आला आहे, आणि संपूर्ण दुःखाचा नाश होऊन खरें सुख मिळावें अशी ज्याला इच्छा आहे, जो सर्व भोगांचा त्याग करून आत्मानात्मविवेक करण्याच्या इच्छेने

एकांतस्थित झाला, तोच या शास्त्राला अधिकारी आहे. तो अधिकारी प्रापक व मोक्ष पुरुषार्थ प्राप्य असा अधिकारी आणि मोक्षाचा प्राप्यप्रापकभाव संबंध जाणावा. अधिकाऱ्याला जें प्राप्य आहे, तेंच ह्या शास्त्रानें प्रतिपादन केलें म्हणून शास्त्राचा व मोक्षाचा प्रतिपाद्यप्रतिपादकभावसंबंध आहे. याप्रमाणें आणखीहि नाना संबंध जोडून घ्यावेत. पुरुष म्हणजे आत्मा, स्वभावानें अथवा कोणत्याहि योगानें बंधन पावला नाहीं. परंतु जगत्कारणरूप प्रकृतीच्या संनिधानसंबंधानें अविवेक प्राप्त झालेला तो आपणांस बंध मानतो. त्याची विवेकद्वारा निवृत्ति करून पुरुषाला म्हणजे आत्म्याला मुक्तिस्मृति राहील असें करणें हा ह्या शास्त्रचा विषय आहे. अथशब्दवर्णन करून ह्या सूत्रांत पुढें प्रयोजनवर्णन केलें आहे. तीन प्रकारच्या दुःखांचा जो अत्यंत नाश तोच अत्यंत पुरुषार्थ अर्थात् मोक्ष आहे. दुःखें तीन प्रकारचीं आहेत. आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. त्यांत आध्यात्मिक दोन प्रकारचें आहे–शारीरिक व मानसिक. वात पित्त कफ क्षुब्ध होऊन झालेले अनेक रोगजन्य व क्षुधाजन्य जें दुःख त्यास शारीराध्यात्मिक म्हणतात; आणि काम, क्रोध, लोभ, मोह, मद, भय, राग द्वेष चितादि प्रकारानें होणारें जे मनोमय दुःख तें मानसाध्यात्मिक होय. दुसरे आधिभौतिक दुःखही चोर, व्याघ्र, सर्प, कीटक इत्यादि भेदें करून अनंत प्रकारचें आहे. पूर्वजन्मकृतकर्मांनीं कर्माधिष्ठान देवता प्रक्षुब्ध होऊन आकस्मिक दुःखयोजना करतात, तें आधिदैविक दुःख होय. सारांश, स्वशरीरादिकांनी होणारें आध्यात्मिक व सर्वभूतांच्या योगानें होणारें आधिभौतिक आणि स्वकर्मयोगें देवताक्षुब्धतेनें होणारें आधिदैविक. या तीन प्रकारच्या दुःखांचा जो अत्यंत नाश म्हणजे पुनरुद्भव न होणें ह्याच पुरुषांना साधावयाचा मोक्षरूप मुख्य अर्थ आहे. आधीं प्रयोजन सांगून त्याविषयींच्या पूर्वपक्षांचें पुढें खंडण करतात. ।१।

न दृष्टात्तत्सिद्धिर्निवृत्तेऽप्यनुवृत्तिदर्शनात् ॥२॥

**सूत्रार्थः**-दृष्ट उपायापासून त्याची सिद्धि होत नाहीं, कारण निवृत्ति झाली असतांही पुनः अनुवृत्ति दिसते म्हणून.

**भाष्यः**-ननु त्रिविध दुःखाची निवृत्ति औषधादि दृष्ट उपायापासून होते, म्हणून शास्त्रारंभ निष्फळ आहे. कारण रोगजन्य दुःख औषधापासून दूर करावे व क्षुधादिजन्य दुःख अन्नापासून दूर करावें. तसेंच मानसिक दुःख प्रिय संयोग आणि अप्रिय वियोगादि उपायें करून निवृत्त होते. याप्रमाणें आध्यात्मिक दुःख निवृत्त झालें म्हणजे आधिभौतिक दुःखहि व्यावहारिक रक्षणानें निवृत्त होतें. राहिलेलें जिवंतपणीं येणारें आधिदैविक दुःख देवतांशांत्यादि मंगल कृत्यें केल्यानें निवृत्त होते. अशी त्रिविध दुःखनिवृत्तिरुप पुरुषार्थासीद्धि दृष्ट उपायेंकरून होत असल्यामुळें, शास्त्रारंभ निःष्फळ आहे. या पूर्व पक्षाचें भगवान् कपिलाचार्य खंडण करितात. दृष्ट उपाय जे औषधादिक त्यापासून दुःखनिवृति होत नाहीं. कारण त्यांची पुनरुत्पत्ति दृष्टीस पडतें. म्हणून रोगजन्य दुःखें औषधीनें दूर करीत असतांना प्रथम कडूम्लादि औषधी घेण्यानेंच दुःख होतें आणि रोगजन्य दुःखहि अत्यंत निवृत्त न होतां औषधाला नष्ट करणारें दुसरें अपथ्यकर पदार्थ मिळाले म्हणजे त्यांचा पुनः उद्भव होतो. क्षुधाजन्य दुःख तर नित्य निवृत्त व नित्य अनुवृत्त आहे. तसेंच मानसिक दुःखहि मन चंचल असल्यामुळें आजचा प्रियसंयोग उद्यां अप्रिय होऊं लागतो व दुसऱ्या प्रिय पदार्थांची चिंता उत्पन्न होते. याप्रमाणें शारीरिक व मानासिक दोन्ही प्रकारचें आध्यात्मिक दुःख दृष्ट उपायें करून निवृत्त होत नाहीं. व्यावहारिक रक्षणादि उपायही नानाविघ्नरूप आहेत. म्हणून त्यापासून आधिभौतिक दुःखांची अत्यंत निवृत्ति होत नाहीं. तिसरें आधिदैविक निवृत्त होत नाहीं. यद्यपि देवताशांत्यादिशुभकर्मे करून दुःख हें निवृत्त झाल्यासारखें वाटतें, तथापि तें आकस्मिक असल्यामुळे केव्हा उत्पन्न होईल याचा नेम नाहीं. कारण मनुष्य हा प्रमादशील आहे. ग्रहादिकांवर ममता

व देहादिकांवर अहंता ठेवणाऱ्या या मनुष्याकडून कांहीं प्रमाद झाला कीं पुनः देवता क्षुब्ध होऊन दुःख देतात. याप्रमाणें त्रिविध दुःखाची अत्यंत निवृत्ति दृष्ट उपायें करून होत नाहीं म्हणून ते त्याज्य आहेत. आतां अत्यंतदुःखनिवृत्ति न झाली तरी अल्पदुःखनिवृत्तिलाच आम्हीं पुरुषार्थ मानतो, असें म्हणणाऱ्यांचें पुढील सूत्रांत खंडण करतातः—

प्रात्याहिकक्षुत्प्रतीकारवत्तत्प्रतीकारचेष्टनात्पुरुषार्थत्वम् ॥३॥

**सूत्रार्थः**– प्रत्येक दिवशीं क्षुधाशांतीप्रमाणें त्याची प्रतीकारचेष्टा होते म्हणून पुरुषार्थत्व सिद्ध होत नाहीं.

**भाष्यः**– सिद्ध होत नाहीं हा भाव पूर्व सूत्रावरून ग्रहण केला जातो. अल्पदुःखनिवृत्तीला अत्यंत पुरुषार्थ म्हणतां येत नाहीं. जशी नित्यक्षुधेची निवृत्ति होते आणि प्राप्ति होते, त्याप्रमाणें कदाचित् दृष्ट उपायें करून दुःखाची निवृत्ति आणि पुनः प्राप्ति मानली तर मंदपुरुषार्थ संभवेल ही शंका योग्य होणार नाहीं. कारण शास्त्राचें प्रयोजन अत्यंत पुरुषार्थ हेंच आहे. शास्त्राचें खंडण न करितां जें आपल्या मनानेंच शंका काढितात तें मर्कटबुद्धिलोक त्याज्य आहेत. मंदपुरुषार्थफलविषयक धनादिकाचें ठिकाणींहि प्रवृत्ति करणें इष्ट नाहीं. कारण स्त्री, पुत्र व धन हें अत्यंत दुःखदायक आहेत. त्यांत प्रथम स्त्री दुःख सांगतो. मूत्रपात्ररूपयोनीचे ठिकाणीं दृष्टि देऊन मनुष्य मोहित होतो. सुंदर स्त्री असली तर तिचें माकड होऊन नाचावें लागतें. वाईट असली तर आगीप्रमाणें ती शब्दानें जाळते. ही स्वस्त्रीची गोष्ट झाली. परस्त्रीच्या म्हटल्यानें न ऐकिलें तर ती आपल्या आई बापाजवळ "मला हा एकांतीं वाईट बोलत होता." असें सांगून नाश करविते, आणि वेश्येविषयीं वाकडें आलें असतां ती स्वतःच विष देऊन अथवा अन्य उपायानें ठार करितें. हे स्त्रीदुःख झालें. आतां पुत्र दुःख सांगतो. पुत्र

गर्भांत असतां त्याच्या पतनादिकांची चिंता, प्रसूतकाळीं मरणादिकांची चिंता, बाल्यावस्थेंत रोगादिकांची चिंता, तरुणावस्थेंत स्नुषादिकांची चिंता व वृद्धावस्थेंत धन मिळेल कीं नाहीं अशी चिंता. येणेंकरून पुत्रहि दुःख हेतु प्रतीत होतो. तसेंच मिळवून आणतांना, रक्षण करतांना, खर्च करतांना धनहि दुःखमूलक आहे. याप्रमाणें दारा सुत धन दुःखामध्यें तद्भावानव काश असल्यामुळें, त्यापासून क्षुधानिवारणवत् मंद पुरुषार्थही संभवत नाहीं. म्हणून दृष्ट उपायांचे ठायीं प्रवृत्त असणें अयोग्य आहे. क्षुधा निवारणाप्रमाणे किंचितसें समाधान तर वाटतें, आम्हांला तितकेंच पुरें आहे, याप्रश्नाचें पुढील सूत्रानें निराकरण करतातः—

**सूत्रः— सर्वासंभवात्संभवेऽपि सत्तासंभवाद्धेय प्रमाणकुशलैः॥४॥**

**सूत्रार्थः**— सर्व असंभव असूनहि किंचित् संभव भासला तरीहि सत्ताऽसंभव असल्यामुळें प्रमाणकुशलांनी त्याग करण्याला योग्य आहे.

**भाष्यः**—सूत्रांतील पहिल्या पदानें सिद्धांत सांगून दुसऱ्या पदानें पूर्वपक्ष करितात, आणि पुढील दोन पदांनीं पूर्व पक्षाचा निरास करितात. ननु दृष्टद्वारा पुरुषार्थ कां होत नाहीं ? सर्वथा असंभव आहे म्हणून. दृष्ट उपायद्वारा पुरुषार्थासिद्धि होणें सर्वथा असंभवनीय आहे, अशाबद्दल पूर्वी दोन सूत्रांनीं प्रतिपादन केलें असल्यामुळें, पुनरुक्ति करीत नाहीं. पूर्वपक्षी-ननु दृष्ट उपायद्वारा, पुरुषार्थसिद्धि होत नाहीं असें जें दोन सूत्रांनें प्रतिपादन केलें आहे तें दृष्टविषयीं आहे. अदृष्ट पक्षें करून दृष्ट उपायद्वारा पुरुषार्थ सिद्धि प्रतीत होते. योगशास्त्रांत अनागत दुःख निराकरणीय बोलिलें आहे. नष्ट दुःख निराकरणार्थ उपाय बोलिलें नाहीत. वर्तमानदुःख द्वितीय क्षणानंतरानागत नष्ट निश्चयी आहे. तन्निराकरणार्थहि उपाय बोलिलें नाहींत. "यावच्चित्तसत्ता तावत् दुःखमनुमीयते" या सांख्यप्रवचनभाष्यकृदभिप्रायांतून असा भाव

निघतो कीं, यद्यपि चित्तसत्ता दुःखानुमापक प्रमाणावस्थायी आहे, तथापि भूतप्राप्त व अनागतनष्टनिश्चयीदुःखानुमापक नसून अनागत दुःखानुमापक आहे. भूतदुःख स्वनाशानंतर दृष्टस्वाभावें करून, अत्यंत निवृत्त आहे. म्हणूनच तन्निवृत्यर्थ उपाय संभवत नाहींत. वर्तमानदुःखाचीहि द्वितीय क्षणानंतर अनागत निवृत्ति आहे, म्हणून तेंहि दृष्टस्वाभावें करून अत्यंत निवृत्त होईल म्हणूनच तन्निवृत्तीविषयीं उपाय योजिले नाहींत. आतां अनागतदुःखाविषयीं जे उपाय कथन केले आहेत, तो भ्रम आहे. कारण अनागत दुःख झालेंच नसल्यामुळें त्याची निवृत्ति झाली असें अनुभवानें कळणार नाहीं, आणि निवृत्ति मानली तर तीहि अनागताच्या अनागतकालीं दृष्टस्वाभावें करून होते. "अनागत दुःख न येणें" हाच जर निवृत्तीचा अर्थ असेल तर तो प्रतिबंधपर्याय असल्यामुळें तत्साधक जे औषधादि दृष्टोपाय त्याहीं करून तन्निवृत्ति होण्यास प्रत्यवाय नाहीं. अतः अदृष्टपक्षेंकरून दृष्टोपायद्वारा अत्यंतदुःखनिवृत्ति संभवते, यांत संशय नाहीं. या पूर्वपक्षाचें भगवान् सूत्रकार निराकरण करतात.

**उत्तर पक्ष (सिद्धान्ती)**:—हे विमूढधी, तूं गुरुमुखाधीत नाहींस, त्यामुळेंच रहस्याज्ञानानें तुझ्या मनांत हा महान् प्रश्न उभा राहिला आहे; तो तूं पुढें मांडलास. आतां तदुत्तर श्रवण कर. सर्वथा असंभव असूनही तुला जो संभवाभास आहे, तो निश्चयेंकरून असत् आहे. ( सूत्रांत "अपि" शब्द पूर्वपक्षव्यावर्तक समजावा. ) कारण दुःखोपायाला दुःखाहून पृथक् सत्ता नाहीं; आणि दुःखच दुःखनिवर्तक होऊं शकत नाहीं. औषध घेत असतांना, प्रथम कट्वाम्लानें दुःख होतें. तसेंच बाह्य रक्षणाद्युपायही धनसाध्य असल्यामुळें, तत्प्रवृत्तिचिंतारूप प्रथम दुःख आहे, आणि शांत्यादिकांतहि मंत्रप्रमादभयादिजन्य दुःख आहे; म्हणून सर्व दुःखउपाय दुःखाहून पृथक्सत्तामंत नसल्यामुळें, तिहींकरून दुःखनिवृत्ति संभवत नाही. हें दृष्ट उपायानें दुःख निवृत्ति न होण्याबद्दलचें अनुमान

आहे. याविषयीं प्रत्यक्ष प्रमाण पूर्वसूत्रद्वयांत कथिलें आहे आणि शब्द प्रमाण सिद्ध आहे.

श्रुतिः– न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः ॥

श्रुत्यर्थः– पुत्रादिप्रजेनें, धनानें किंवा यज्ञादि कर्मानें दुःखनिवृत्ति होत नाहीं, (श्रुतींतील "धन" शब्दाच्या अजहल्लक्षणेनें दारादिकाचें ग्रहण होते,) तर एका त्यागानेंच मात्र अमृतत्वप्राप्ति होते इत्यादि. म्हणून सर्वथा असंभव असतांहि, जो दृष्टउपायविषयक दुःखनिवृत्तिसंभवाभास तो, प्रत्यक्षानुमान शब्द या तीन प्रमाणांमध्यें कुशल आहेत, त्यांनी तो टाकण्या योग्य आहे. आतां अवशिष्ट पूर्वपक्ष जो त्याचें उत्तर सांगतों. भूतदुःख दृष्टस्वाऽभावें करून अत्यंत निवृत्त मानलें तर प्रत्यक्ष चिंता उत्पन्न होते. ती अशी कीं, दृष्टस्वाऽभावें करून दुःखनिवृत्ति म्हणजे दुःखांचे ठायीं असलेला जो दुःखाभाव तो दुःखाला दृष्ट असला म्हणजे दृष्टस्वाऽभाव होईल. आपलें ठिकाणीं आपला अभाव दृष्ट मानणें शशशृंगवत् कल्पनागौरव आहे, आणि अन्यत्र जो आपला अभाव तोहि आपण पाहूं शकत नाहीं. कारण आपला अभाव पाहणारा आपणच नष्ट होतो. म्हणून तव प्रश्न व्याघातदुष्ट आहे, आणि दुःख अचेतन असल्यामुळें त्याला पाहण्याचीहि शक्ति नाहीं. हठें करून दृष्टस्वाऽभावानें दुःखनिवृत्ति मानित असशील तर, तुला आम्ही असें विचारतों कीं, दृष्टस्वाऽभाव, दुःख असतांना उत्पन्न होऊन दुःखांना नष्ट करितो, किंवा दुःखनाशानंतर उत्पन्न होऊन दुःखाला नष्ट करतो ? अथवा हा अभाव अनादिच असून दुःखाला नष्ट करितो ? किंवा दुःखनिवृत्तिक्षणाव-च्छिन्नोत्पन्न होऊन दुःखाला निवृत्त करतो ? यांत प्रथम पक्ष घटत नाहीं. हें आम्ही आतांच व्याघात दोष दाखवून वर सांगितलें, द्वितीयपक्षहि घटत नाहीं. कारण कर्ता उपादानगोचर असल्याशिवाय

कार्यकरणीं समर्थ होत नाहीं. जसें मृदगोचर कुलालाचें ठायीं, घटोत्पत्ति-करणीं सामर्थ्य दिसत नाहीं, तद्वत् दु:खनिवृत्त्यनंतरोत्पन्न होणाऱ्या अभावाहून प्राक् दु:खनिवृत्ति असल्यामुळें अनंतरोत्पन्न झालेला अभाव तत्साधक होत नाहीं. तृतीय पक्षहि घटत नाहीं. कारण अनादिच दु:खदृष्टस्वाभाव आणि अनादिच दु:ख हें दोन्हीं एकत्र झाल्यामुळें दु:ख अनादिच निवृत्त झालें पाहिजे, आणि तसें मानलें तर दु:खाची केव्हांच प्रतीति न झाली पाहिजे, परंतु आपणांस विशेषणतासंबंधेकरून वर्तमाना-वच्छिन्नदु:खाभावकालीं भूतदु:खाचा प्रत्यय असतो. म्हणून तसें मानणें योग्य नाहीं. चतुर्थ पक्षहि घटत नाहीं. कारण दु:खनिवृत्तिकालावच्छिन्न अभाव उत्पन्न होऊं शकत नाहीं. कारण, अभावाची प्रतीति दु:खसत्समयीं संभवतच नाहीं; आणि दु:खनिवृत्तिकालावच्छिन्नोत्पन्नाऽभाव प्रबळ असतो आणि दु:ख दुर्बल असते. म्हणून दोघे एके काळीं राहूं शकतात, हें म्हणणें सम्यक् नाहीं. कारण अभाव वस्तुविरोधी नसून वस्तुभावविरोधी असतो. म्हणून दु:खाभाव दु:खविरोधी नसून दु:खभावविरोधी असतो. वस्तु दुर्बल अथवा प्रबल कोणत्याहि अवस्थेंत असली, तथापि तद्भाव दुर्बळ किंवा प्रबल होत नसतो. म्हणून दु:खाभावोत्पत्तिसमयीं दु:ख कितीहि दुर्बल असलें तथापि तद्भाव दुर्बल होत नाहीं; आणि दु:खाभाव प्रबळ मानला तरी प्रबलाच्या शक्तीनें दुर्बलाचा नाशच झाला पाहिजे; येणें करूनही दु:खनिवृत्तिकालावच्छिन्नोत्पन्न दु:खाभाव राहूं शकत नाहीं. प्रबलालाही दुर्बलाचा नाश करण्याला कांहीं क्षण लागतो असें म्हटलें तर, त्याक्षणापुरतें तरी तें प्राबल्य दौर्बल्यावच्छिन्न आहे असें मानावें लागतें. अशा मानण्यालाच व्याघात म्हणतात. " नमे जिव्हाऽस्तीति सत्यं वच्मि " " मम माता वंध्या " इत्यादि व्याघाताची उदाहरणें आहेत, आणि दु:ख निवृत्तिकालावच्छिन्नोत्पन्नाभाव मानिला, तथापि तो दु:खनिवृत्ति करूं शकत नाहीं; कारण कीं, दु:खनिवृत्तिकालाहून पूर्वक्षणीं दु:खनिवृत्तीचा आरंभ

झाला आहे म्हणून. असो. दुसऱ्याच्या अभावानें दुःखाची निवृत्ति मानणें हेहि इष्ट नाहीं. कारण भावपदार्थाचा नाशक अभाव नसतो. ज्यांच्यामध्यें विषमसत्ता असते, त्यांच्यामध्यें साधकबाधकता घटत नाहीं. "भावाऽभाव" यांचेहिमध्यें विषमसत्ता असल्यामुळें तें परस्पर साधकबाधक नाहींत. जसें घटाचा ध्वंस घटनाशाला कारण नसून घटसमसत्तावान् जे दंड पाषाणादिक तें कपालवियोगावच्छिन्नघटध्वंसाला निमित्त होऊन घटध्वंसावच्छिन्नघटप्रा-भावाला उत्पन्न करितात; आणि पटाऽभावेंकरून घटाची उत्पत्ति किंवा नाश किंवा घटाऽभावाची उत्पत्ति किंवा नाश ज्याप्रमाणें होऊं शकत नाहीं, तद्वत् दुसऱ्याच्या अभावें करून दुःखाची उत्पत्ति किंवा नाश किंवा दुःखाभावाची उत्पत्ति किंवा नाश दोन्हीही होऊं शकत नाहीं. तस्मात् दुःख नाशार्थ दुःखसमानसत्तावान् भावरूपी बाधक अन्य कारण शोधिलें पाहिजे. तें एक ज्ञानच आहे, आणि तत्साधनें विवेकादिक आहेत. भूतदुःखांच्या निवृत्तीसाठीं जे उपाय सांगितले नाहींत, त्यांत हेतु निराळा आहे. भूतदुःख पुनः उद्भवत नाहीं असा कोणी त्यांतील हेतु समजूं नये. भूतदुःखाविषयीं त्याच्या अभावाची प्रतीति असल्यामुळें गेलेल्या दुःखाची निवृत्ति करावी असा व्यर्थ शब्दव्यवहार होईल. आतां वर्तमानदुःखनिवृत्त्यर्थ जे उपाय बोलिले नाहींत ते, दुःखी पुरुषाला तसें साधन करण्याइतकें बल नसल्यामुळें व वर्तमान दुःख हें द्वितीयक्षणानंतर स्वभावानेंच नाश पावणारें असल्यामुळें, वर्तमान दुःखाचा नाश करण्याला साधनें सांगणेंहि व्यर्थ म्हणून समीचीन आहे. कारण साधनाचें फल भविष्यत् असते, आणि वर्त-मान दुःखाची तात्कालिक उपायें करून निवृत्ति केली, तथापि भविष्यत् दुःखाकरितां उपाय शोधावे लागतील, आणि उपाय शोधण्यांत पुनः वर्तमान दुःखच प्राप्त होईल. तस्मात् तें सांगणेंच अयोग्य आहे. आतां भूत वर्तमान दुःखें पुनः उठतील असें अनुमान केलें तर त्या दुःखाचा काल अनागत झाला. अनागत दुःखनिवर्तक योगदर्शनादि

शास्त्रांत उपाय सांगितले आहेत. ते उपायही प्रथम आचरितांना दुःख स्वरूप आहेत, म्हणून दुःखाहून त्यांना पृथक्सत्ता नसल्यामुळें, त्यांचाहि त्याग करणें प्रमाणकुशलांना इष्ट आहे, ही शंका सम्यक् नाहीं. कारण उपाय स्वतः दुःखरूपच नाहींत. दुःखरूप असते तर त्यापासून चित्ताचा नाश झाला नसता. कार्य स्वकारणाचा नाश कधींही करूं शकत नाहीं, आणि चित्तसत्ता आहे तोपर्यंत दुःख आहे या वाक्यानें दुःखाचें कारण चित्त असल्यामुळें, त्याचा नाश करण्याला दुःखाहून पृथक् सत्ता नसलेले उपाय समर्थ होणार नाहींत. तसे उपाय आप्तांना सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. आप्तानांही भ्रम झाला असेल, असें म्हणशील तर, हे दुर्बुद्धि ! त्यांच्या भ्रमाची परीक्षा करण्याइतकें सामर्थ्य तुझ्या आंगीं नाहीं, आणि सभ्रम असणें हे आप्ताचें लक्षणहि नाहीं. किंतु निर्भ्रम असणें हें आहे. तत्कथित दुःखनिवृत्त्युपाय दुःखरूप नसून दुःखसत्वसमानसत्तामंत दुःख-भिन्न असे आहेत. परंतु दुःखमय जें वाटतात त्याचें कारण निराळें आहे. जसें जारिणी स्त्रियेला पतिव्रतेचें सत्व पाहून ते दुःखरूप वाटते, परंतु तें तसें नसते, तद्वत् अविवेकमूलक प्रकृत्यादि शरीरांत तादात्म्याध्यासें करून पुरुषाचें ठायीं असलेली जी भोक्तृप्रतीति आणि तन्मूलक जे ममत्व तें विवेक नसल्यामुळें व रागादि दोषामुळें निवृत्त करणें इष्ट वाटत नाहीं, आणि आप्तकथित उपाय तद्विरुद्ध आहेत म्हणून त्यांचें ठिकाणीं राग उत्पन्न होत नाहीं. त्या कारणानेंच ते बद्धांना दुःखरूप वाटतात. परंतु मुमुक्षूला वाटत नाहींत. म्हणून त्यांची शास्त्राचें ठिकाणीं प्रवृत्ति होते, आणि त्यांनाच आम्ही प्रमाणकुशल म्हणतो. अस्तु. या विवेचनावरून हें सिद्ध झालें कीं, अनादि सांत जो प्रकृतिपुरुषाऽविवेक तन्मूलक जें दुःख, तत्सामानाधिकरण्य, दृष्ट उपायांचे ठायीं असल्या कारणानें, त्या उपायांना दुःखाहून पृथक् किंवा मुळींच सत्ता नाहीं. म्हणून तत्साधित जो सर्वथा असंभूत पुरुषार्थसंभवाभास तो बद्धांना प्राप्त असो, परंतु प्रमाणकुशल जे मुमुक्षु

त्यांनी निश्चये करून त्यागण्या योग्य आहे असा सूत्रकृदभिप्राय सप्रमाण ज्ञानेश्वरोपदिष्ट आहे.

अहो ! दृष्टोपायाचा प्रतिबंध आपण केला आणि दुःखनिवृत्ति ज्ञानानें होते असें सांगितले, त्या ज्ञानासाठीं ज्ञानार्थी मुमुक्षूला जिज्ञासा कर्तव्य असते. तर याठिकाणीं काय जिज्ञासा आहे ? याविषयीं सांगतात.

[अपूर्ण]

श्रीमत्सद्‌गुरु सर्वत्रयशस्वी ज्ञानेश्वर माउली समर्थ

# एक निबंध

आर्या:-नारायण नामानें झाले ज्यांचे सदा पूर्ण वदन ॥
तो नर नारायणची होऊनि करि संसृतिरिपूकदन ॥१॥

सर्वांना मंगलदायक असून व्यष्टीरूप जीवाच्या समूहाला एक समयावच्छेदेंकरून बोध करणारा, निर्मलजलशायी भगवान् नारायणच सर्व वेदांचा द्रष्टा आणि वक्ता आहे. "अंतर्बहिर्जगत्सर्वं व्याप्य नारायण: स्थित:" "वेदांतकृद्वेदविदेव चाहम्" इत्यादि श्रुति ज्याविषयी प्रसिद्ध आहेत, तो प्रभु व्यष्ट्यंत:करणोपाधीनें गुरुरूप जरी भिन्न भासतो, तथापि त्याचें वैदिक स्वरूप एकच आहे. पुरुषसूक्ताच्या सायणभाष्यांत "हा नारायणच सर्व वेदांचा द्रष्टा आणि वक्ता आहे" असें उपलक्षण केलें आहे. असो, पण वेदानें प्रतिपाद्य कोण असा प्रश्न उत्पन्न झाला असतां, त्याचें उत्तर थोडक्यांत असें आहे. जसा एखादा मनुष्य आपलें नांव आपण उच्चारतो, तसें आपलें स्वरूपच नारायणानें जीवाला बोध होण्याकरितां वेदमय वाणीनें कथन केलें आहे. तें स्वरूप उपासनेमध्यें द्वैतोपलब्ध असून ज्ञानामध्यें अद्वैतोऽपलब्ध होते. सर्व जगतांना बोध करणारा सद्‌गुरुरूप पुराण पुरुष हाच गुरुसेवार्थच या पुरुषरूपाची स्तुति सूक्तें करतात; आणि स्वरूपज्ञानार्थ उपनिषद्द्वारा ब्रह्मबोध करितो. पण भक्तीमध्यें उपासना आणि ज्ञान, दोन्ही एक असल्यामुळें पुरुषत्वच वर्णनयोग्य असते. कारण तेथें सगुण निर्गुणाचा भेद नाहींसा होतो. ज्याला नारायण म्हणावयाचें त्यालाच नर म्हणावयाचें. त्या नर शब्दाचाच

पर्याय पुरुष शब्द आहे. या पुरुषाचें ज्ञान आणि ध्यान दोन्ही एकच मार्गानें होते. सांख्य, योग, वेदांत मिळून तो मार्ग तयार होतो. त्या मार्गानें जाणारेही पारमार्थिक मुमुक्षु असतात. त्यांचा हात धरून आपण चालूं लागलो म्हणजे आपले व्यावहारिक तर्कांचे पाय अगदीं गळून जातात. डोळयांस आंधारी येऊन मूर्छा येऊं पहाते. तदा तें महाजन आपल्या कडेवर घेऊन सरळ पंथानें चालवीत असतां महाघोर षोडश विकाररूप वन दृष्टीस पडतें. त्यांतील पहिला विकार पृथ्वी. हिचें ठिकाणीं शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध असें पांचही गुण राहतात. गंध गुण हा इच्यांत प्रधान असतो, व इतर चार भूतांचे असतात. सुगंध आणि दुर्गंध हे त्या गंध गुणाचे भेद आहेत. आपल्या स्थूल शरीराचा व हिचा अत्यंत संबंध असतो. नैय्यायिकही शरीर पार्थीव आहे असें म्हणतात. पृथ्वीवांचून शरीराचा एक क्षणाहि बाहेर राहतां येत नाहीं. शिवाय स्थूल शरीरांतील जेवढा कठीण भाग आहे तो वेगळा काढून बाहेर टाकला म्हणजे शब्द, स्पर्श, रूप, रस त्याच्याजवळ गेल्यानें कदाचित् कळतील. परंतु दुर्गंध हा फार दुरूहून येत असतो. मृत पशूच्या वासानें गृध्रादिक येतात हेंहीं आपण नित्य पहातच आहों. यावरून ही पृथ्वी गंधप्रधान आहे असें सिद्ध झालें. आतां पाषाणादिक पार्थिव विकार असूनही आपल्याला गंध प्रतीति होत नाहीं, ही शंका सम्यक् नाहीं. कारण कीं, गुण प्रतीति होण्याला वस्तु, परमाणू आणि इंद्रियें यांचा सामानाधिकरण्यसंयोग झाला पाहिजे, आणि पाषाणादिक पार्थिवाचें चूर्ण केलें असतां जी गंध प्रतीति होते त्यालाहि हाच हेतू आहे. असो. या पृथ्वीपासून पुढेंच गेले म्हणजे "जल" हा दुसरा विकार आहे. त्याचे ठिकाणीं शब्द, स्पर्श, रूप व रस हे चार गुण राहतात. रस हा जलाचा मुख्य गुण असून इतर तीन गुण अन्य भूताचे आहेत. केव्हां केव्हां जलाचे ठिकाणीं गंध प्रतीति होते. तेव्हां ती पृथ्वीच्या सामयिक संबंधानें झाली असें समजावें. कारण

जलाला सर्वत्र सर्वकाळीं गंध नसतो. म्हणून तो पृथ्वीनिमित्तक आहे. इतर भूतांचे तीन गुण तसे नाहीत. ते गौण पक्षानें नेहमींच जलाचे ठायीं राहतात. शरीरासी व जलासी आपला संबंध निकट आहे. ज्यांत द्रवत्व नाहीं अशा शुष्क पदार्थानें शरीरपोषण कधींहीं व्हावयाचें नाहीं; आणि ज्यांत प्रत्यक्ष अथवा मृदुगुणकार्यानुमेयद्रवत्वाधिष्ठित जलांश नाहीं, त्या वस्तूंत मधुराम्ल लवण कटु कषाय तिक्त या षड्रसांपैकीं कोणत्याहि रसाची उपलब्धि होणार नाहीं. अशा रसाभाववान् वस्तूंचे भक्षणादिक वैद्य शास्त्रांत वर्ज्य केलें आहे. तिसरा विकार वन्हि होय. ह्याचे ठिकाणीं शब्द स्पर्श आणि रूप हे तीनच गुण आहेत. त्यांतील रूप गुण स्वतःचा असून दुसरे दोन गुण आकाश व वायु या भूतांचें आहेत. त्याचा आणि शरीराचाही अत्यंत निकट संबंध आहे. ओज, अन्न, जळ-पाचन, रसादिकांचे विपाक यावरून त्याचें अधिक स्पष्टीकरण होतें. चवथा विकार वायु आहे. त्याचे ठिकाणीं शब्द आणि स्पर्श हे दोन गुण आहेत. पैकी स्पर्श स्वतःचा असून शब्द हा आकाशाचा आहे. त्यांचाहि शरीरासी निकट संबंध आहे. बाह्य वायूचा स्पर्श नाडीशीं संयुक्त होऊन जातो, आणि आंतरप्राणादि वायु आपापलीं कार्यें करितात. इतक्या उपाधी भेदानें हा एकच वायु शरीराचें पोषण करितो. वायूचें ठिकाणीं पुष्पादिसंयोगें करून गंध उत्पन्न होतो तो अकालिक आहे, असें समजावें. पांचवा विकार आकाश होय. त्याचा शब्द एक गुण आहे. यद्यपि शब्द वायूच्या आघाताशिवाय प्रतीत होत नाहीं, तथापि, त्याची व्यक्तता वायुव्याप्य नसून आकाशावच्छिन्न असते. तारत्वमंदत्वादिध्वनिव्यक्ततानिमित्तक मात्र वायु असतो. शब्द स्तब्ध वायुंतही निघत नाहीं, आणि तीव्र वायूचा अंगाला स्पर्श होत असतांहि शब्दाचा सर्वांगाला स्पर्श न होतां कर्ण शुष्कुलीस्थ आकाशांतच मात्र तदाघात होतो. या अनुमानानेंहि शब्द आकाशाचा गुण आहे, असें ठरते. हें आकाश चोहोंकडे व्यापलें आहे.

म्हणून शरीराचा व त्याचा अत्यंत निकट संबंध आहे हें निराळें सांगणें नको. याप्रमाणें वैदांतिक भूतांचें निरूपण केलें. ही अशींच भूतें घेतली म्हणजे सांख्यामध्यें तन्मात्रा होतात. पण ती सूक्ष्म मात्र असली पाहिजेत, आणि आतां निरूपणहि सूक्ष्म भूतांचेंच केलें. बालबोधार्थ शरीरसंबंध विषयक जी स्थूल भूतांचीं उदाहरणें घेतलीं, तीं सर्व पंचीकृत भूतांना लागू होतात, म्हणून प्रौढानें पूर्व निरूपणांत उदाहरण साम्य न पाहतां शरीरसंबंधी सूक्ष्म अपंचीकृत भूतांचें अनुमान करावें. या अपंचीकृतांना वेदांती विकार मानतात, आणि सांख्य प्रकृति विकृति मानतात. एवढाच काय तो दोहोमध्यें भेद आहे. परंतु अपंचीकृताला वेदांतानें विकार मानला म्हणजे पंचीकृतांचे ठायीं अतिव्याप्ति होते, अथवा पंचीकृत भूतें विकारजन्य विकृत आहेत, असा सांख्यागम होतो. सांख्यपंचीकृतांचे ठायीं अतिव्याप्ति होत नाहीं हें विशेष आहे. पण हा देखील सांख्यांचा भेद शांकरवेदांतासी आहे, वैय्यासिक वेदांतासी सर्वथा नाहीं, असें विज्ञानामृतभाष्यानें कळतें. वेदांतांत इंद्रियें आणि मन भूतकार्यच मानिलें असून सांख्यामध्यें त्यांना विकृति म्हटलें आहे. याचा आतां पंचीकरणपूर्वक विचार करूं. पूर्वकथित पांचाहि भूतांचे अंश न्यूनाधिक प्रकारानें परस्परांत मिश्रित करणें याला पंचीकरण म्हणतात. त्याच्या योगानेंच पिंड आणि ब्रम्हांड बनलें आहे. यद्यपि जगत् वेदांती कल्पित मानतात, तथापि त्याचा कल्पक ईश्वर असल्यामुळें, भूतांचे समष्टि व्यष्टि पंचीकरण यथायोग्य होते. त्याचें सुरेश्वराचार्यांनी चांगलें स्पष्टीकरण केलें आहे. प्रत्येक भूतांचे दोन दोन भाग करून त्यांतील एक एक भाग तसाच ठेवून पुनः त्या अर्ध्यांचें चार चार भाग करून प्रत्येक भूताच्या पहिल्या अर्ध्यांत मिळाविलें म्हणजे पंचीकरण होते, व त्या पंचीकृत भूतांचें सर्व ब्रह्मांड बनते, आणि तदारूढ जीव विश्व होतो. ही पंचीकृत सामग्री सर्वच दृश्य आहे. म्हणून ती जीवाच्या गमनागमनास कारण होत नाहीं,

आणि मरण काळीं म्हणूनच जीव स्थूल देहास सोडून सूक्ष्म शरीरानें गमन करितो. तेथें त्याच्या बरोबर इंद्रियेंही जातात. तर मग हीं इंद्रियें अपंचीकृतभूतांपासूनच झाली असली पाहिजेत. कारण पंचीकृतभूतांपासून झालेल्या पदार्थांचें जीवाबरोबर जाणें संभवत नाहीं. अशा अनुमितीनें अपंचीकृतभूतकार्य इंद्रियें आहेत असें वेदांती सांगतात, आणि त्यांची उत्पत्ति 'तत्वबोधांत' सांगितल्याप्रमाणें सर्व वेदांती देतात. पण निःपक्षपातानें शांकरवेदांताचें चांगलें आलोचन केलें म्हणजे सांख्य सोडून वेदांतानें सृष्टि सांगतां येत नाहीं, असें स्पष्ट कळतें. कारण आकाशादि पंचभूतांच्या व्यष्टि सत्वांशापासून ज्ञानेंद्रियें व समष्टिसत्वांशापासून मन आणि व्यष्टिरजांशापासून पंचकर्मेंद्रियें व समष्टिरजांशापासून पंचप्राण, आणि सर्व भूतांच्या तमांशाचें पंचीकरण होतें, अशी सृष्टीची वेदांतांत व्यवस्था आहे. या सृष्टीला कारण सत्वरजस्तमोगुणसाम्यावस्था मूल प्रकृति म्हणून विद्यारण्यादिक मानतात. शंकराचार्यही विवेकचूडामण्यादि ग्रंथांत सांख्याश्रयानें वेदांताचें विवेचन करितात. यद्यपि भाष्यादिकांत "एतस्माज्जायते प्राणोमनः सर्वेंद्रियाणिच" इत्यादि श्रुतींचा अर्थ करितांना चेतन ब्रह्मापासूनच प्रकृत्यपेक्षारहित सर्व पदार्थांची उत्पत्ति सांगतात. तथापि तेथें सांख्य सुटलें असें नाहीं. कारण चेतनब्रह्माला तटस्थलक्षणें करून जगजन्मादिहेतुता मानल्यामुळें ती सोपाधिक आहे असें सिद्ध होतें. कारण निरुपाधिक ब्रह्म जगत्कारण मानलें म्हणजे मुक्तांनाही बंध होईल आणि तसें झालें म्हणजे वेदांतारंभ निष्फल मानावा लागेल. यदर्थ ब्रह्माचें ठिकाणीं अनादि त्रिगुणात्मक कार्यानुमेयाज्ञानोपाधी आहे असें ते प्रतिपादन करितात. हेंच सांख्यांत प्रकृतीचें लक्षण आहे. "मायां तु प्रकृतिं विद्यात्" इत्यादि श्रुति, सांख्य आणि वेदांताच्या मूल कारणाचें ऐक्यच सांगतात. ही प्रकृति सामान्य म्हणजे सर्वदेशव्याप्त आहे, असें सांगितलें आहे, आणि वेदांतांत मायाही तशीच सांगितली आहे. त्या मायेपासून अव्यक्त,

अव्यक्तापासून अहंकार, अहंकारापासून पंचतन्मात्रा, पंचतन्मात्रापासून स्थूल भूतें आणि स्थूल भूतांपासून ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें इत्यादि पदार्थ पूर्वक सांख्यांत सृष्टि प्रपंचित केली आहे. इंद्रियांचे उत्पत्तिस्थान सांख्याचे आणि वेदांताचे किंचित् निराळे दिसल्यासारखें वाटते; पण विचारदृष्ट्या शीघ्र मतद्वयैक्य होते. वेदांतांत माया, अपंचीकृत सूक्ष्मभूतें आणि पंचीकृत स्थूलभूतें असे तीन प्रदेश मानले आहेत. सांख्यांत प्रकृति, प्रकृति विकृति आणि विकृति असें तीनच प्रदेश मानलें आहेत. वेदांतांत सूक्ष्म भूतांच्या सात्विकाद्यंशापासून व्यष्टि ज्ञानकर्मेंद्रियें सांगून तत्समष्ट्यंतःकरणप्राणाचें निरूपण केलें आहे. सांख्यांत अहंकारापर्यंत एकेक पदार्थापासून उद्भव सांगून पुढें अहंकारापासून उत्पन्न झालेल्या पदार्थांचे एकदम तीन भाग केले. त्यांतील सत्व गुणापासून देवता, रजोगुणापासून इंद्रियें आणि तमोगुणापासून स्थूलभूतें असा क्रम सांगितला आहे. यालाच सांख्यांत अध्यात्म अधिभूत आणि अधिदैवत म्हणतात. छांदोग्योपनिषदांत आणि सुरेश्वराचार्यकृत पंचीकरणवार्तिकांत या तिहींचें लक्षण चांगलें केलें आहे.

( अपूर्ण )

# बौद्ध निबंध

ज्ञानेश्वरं कृपामूर्ति विश्वात्मानं परेश्वरम् ।।
प्रणम्य बालबोधाय मधुरं किं च लिख्यते ।।१।।

प्रश्नः—मनुष्य स्वभावाला भूषणावह अशी गोष्ट कोणती ?

उत्तरः—धर्म. कारण त्याच्या योगानें अंतःकरण विस्तृत होते. सर्व प्राणिगणामध्यें अंतःकरणाच्या प्रगल्भतेमुळेंच मनुष्याची वरिष्ठता गणली गेली आहे.

प्रश्न—गीलेडा वगैरे वानरांचें अंतःकरणही मनुष्यासारखें असूं शकते ?

उत्तर—आमच्या प्रगल्भता शब्दाचा अर्थ तुला समजला नाहीं. गिलेडा वगैरेचें अंतःकरण यद्यपि मनुष्यासारखे असते, तथापि आहार विहाराच्या व कांहीं गोष्टींच्या चातूर्यावांचून विशेष नाही. दुसरें असें कीं, इतर प्राणी आपल्या प्राणीस्वभावाला बदलूं शकत नाहींत. परंतु मनुष्याची तर अशी स्थिति आहे कीं, त्यानें आपलें अंतःकरण प्रगल्भ करावें, असा निश्चय करून कोणत्याही स्वभावाप्रमाणें स्वभाव करून घेतां येतो. किंवा स्वतंत्रहि राहतां येते. हें अंतःकरण धर्मावांचून कोणत्याहि साधनानें प्रगल्भ होणें शक्य नाहीं. कारण धर्म हा मनुष्यामध्यें नैसर्गिक वास करीत असतो.

प्रश्न—धर्म व अधर्म मनुष्याचें ठिकाणीं दोन दिसतात, ते काय म्हणून ?

उत्तर—विचार व अविचाराच्या योगाने.

प्रश्न—ते स्पष्ट करून सांगा ?

उत्तर—मनुष्याचें अंतःकरण जसें जसें शरीराचा अभिमान सोडून या जड दृश्य जगाच्या पाठीमागें काय आहे असें पाहाण्याचा झटून प्रयत्न करूं लागतें, तेव्हां तें विचारात्मक बनतें, आणि ह्याच्या उलट तें शरीराला चिकटून दृश्य व जड जगांत जसा जसा प्रवेश करितें, तसें तसें तें अविचारप्रधान बनतें.

प्रश्न—ही गोष्ट केवळ गृहीत धरून चालावयाचें किंवा ती कोणत्या नियमानें प्रतिबद्ध आहे ?

उत्तर—दृश्य शास्त्रांत जसें अनंत गोळ किंवा नाना सृष्टींतील पदार्थ, ज्या एका नियत्यात्मक नियमानें बद्ध आहेत, त्याच नियमानें ही गोष्ट प्रतिबद्ध आहे. परंतु येथें हा एक विशेष आहे कीं, दृश्य शास्त्रांतील पदार्थघटना पाहिलेल्या वस्तूविषयीं खात्री दिल्याप्रमाणें शाबीत करतां येते आणि आमची वरील गोष्ट स्वतःच्या खात्रीप्रमाणें शाबीत करतां येते. प्रत्येक प्राणी आपणाला सृष्टींत असा दिसून येतो कीं, सुखाकरितां ज्याची सर्व धडपड चालली आहे. परंतु त्याचें स्वरूप म्हणजे काय हे कोणत्याच प्राण्याला कळलेलें आपण पाहात नाहीं. परंतु मनुष्य प्राण्याची गोष्ट ह्याच्या अगदीं उलट आहे. कितीही पशूप्रमाणें आचरण करणारा मनुष्य असला तरी त्याच्या दुःखित स्थितींत, "आज माझें मन स्थीर नाहीं" असें उद्गार काढतांना आपण पहातों. ही गोष्ट अज्ञानापासून तो मोठ्या विद्वानापर्यंत सारखीच लागूं पडते. हिच्यावरून आपल्याला पक्कें असें अनुमान काढतां येतें कीं, मनाची बेचैन स्थिति म्हणजे दुःख, आणि त्याची शांतता व समाधान स्थिति म्हणजे सुख. "ज्याला समाधान आहे तो देवाच्या बरोबरीचा सुखी" असें सॉक्रेटिसनें म्हटलें आहे. "न संतोषात्परम सुखम्" असें सॉक्रेटिसच्या पूर्वीही महाभारतकारांनी आमचे कडे सिद्धांतानें म्हणून ठोविलें आहे. "संतोषो जनयेत्प्राज्ञस्तदेवेश्वर पूजनम्" इत्यादि वचनें श्रीमद्भागवतांत प्रसिद्धच आहेत. परंतु हा संतोष म्हणजे

काय? तर आपल्या मनाची समाधान स्थितिच होय. हें समाधान ह्या दृश्य जगांतच आहे कीं त्याच्या पलीकडे आहे असा विचार होणें कोणत्या मनुष्य प्राण्यास शक्य नाहीं? जगाच्या उर्ध्वाधो बाजूकडे अवलोकन केलें असतां निश्चयानें हें कोणासही कळून येण्यासारखें आहे कीं, चिरस्थायी समाधान म्हणून या दृश्य जगांत नाहीं. दृश्य जगांतील कितीही संपन्न पुरुष असला अथवा पालखीपदस्थ महंत असला, आणि तेवढ्यानेंच आपलें समाधान मानून घेणारा असला. तरी क्षणेक गोड लागणाऱ्या वचनागाप्रमाणें, त्याचें तें समाधान तुच्छ व भ्रांतिमूलक असतें. उदा० एखाद्या मोठ्या राजाचें वैभव जरी झालें, तरी तें अनंत दुःखी प्राण्यावरच अवलंबून असतें. राजेही ज्यांच्या स्वाधीन राहतात अशा पालखीपदस्थ महंतांची गोष्ट त्याहूनही विचित्र. महंतांनी आपली पालखी सवारली कीं मग माध्यान्हसूर्य तापत असलेला दिवस असो, किंवा अत्यंत रक्त थिजवून टाकणारी शीतकालांतील रात्र असो, खांद्यावर देणाऱ्या पुरुषांना तिच्यांतून गेलेच पाहिजे. महंताला ऊन लागूं नये म्हणून त्यांच्यावर छत्री धरणाऱ्या पुरुषाला छत्री धरून उन्हांत चाललें पाहिजें. अशा व अनेकरीतीनें जें वैभव महंताला सुख देण्याला कारण होतें तें वैभव अनेक अनाथ प्राण्यांच्या दुःखानें बनलेलें असतें. पोटासाठीं रात्रीं दिवसाची नोकरी पत्करणाऱ्या मनुष्यसमुदायांतील स्वामीवैभवाचीहि स्थिति अशीच. स्वतःच्या इंद्रियाकडे जरी पाहूं लागले तरी हीच गोष्ट आढळून येते. जन्मापासून संपादलेल्या बलांतील वीर्य पातनद्वारा खर्च करून मग स्त्रीसुखापासून क्षणेक कांहीं तरी समाधान मिळवायाचें. एवं दृश्य जगांतील सर्व समाधान केवळ दुसऱ्याच्या असमाधानावरच बनलेलें असतें. हजारो पुरुष जेव्हां भूकेनें काकुळतात, किंवा लाखो मनुष्यांची जेव्हां कत्तल उडते, तेव्हां एखाद्या पुरुषालाच उदारपणाची किंवा शूरपणाची जयश्री माळ घालते. असें क्षणेक समाधान तरी आहे किंवा नाहीं, ह्याचाही निश्चय करतां येत नाही.

कारण अनाथ प्राण्यांचा पोटमारा होऊन, प्राप्त झालेलें क्षणिक समाधान पुरें आहे असें कधीं कोणास वाटलेलें आपण पहात नाहीं. कारण तें समाधान वृद्धि करण्याची प्रत्येकाची तृष्णा वाढतच असते, आणि त्यापासून दुसऱ्या पुष्कळ अनाथ प्राण्यांना इच्छा नसतांही दुःखी होण्याची पाळी येते. पण ईश्वरीसंकेताप्रमाणें असेंच ठरलें आहे असें जर कोणी म्हणेल, तर हे स्वार्थी पुरुषास बोलण्यास फार सोपें आहे. परंतु ज्याच्या अंतः-करणांत थोडा तरी दयेचा अंश आहे, अशा परोपकारी पुरुषास हें कसें वाटणार ? म्हणूनच दुसऱ्याच्या दुःखीत्वावरच जडलेलें जें समाधान, त्याची तृष्णा बाळगणाऱ्या मनुष्यास पशूहून उंचपणा देतां येत नाहीं. कारण असें क्षणिक समाधान किंवा आदि अंतीं दुःख, दुःखरूपच. पशुहि तें संपादन करूं शकतात. कितीहि जगांतील वैभवानें पाशवृत्ती मनुष्य झालेला असला तरी एका अपरिहार्य गोष्टीमुळे, त्याच्या मनांत धडकी भरते. ती अपरिहार्य गोष्ट म्हणजे मृत्यु होय. बरे अशा दुःखरूपी जगतांत पडून, नुसतें उदासिन राहिलें तरी, सुखचिरस्थायित्वाची इच्छा कमी होते असें नाहीं. कारण इच्छेचा स्वभावच असा आहे कीं, निरुपायानें तिला कितीही दाबून रहावे लागले, तरी तिचा नाश न होतां, मला डोकें वर करण्याची संधी केव्हां मिळेल असें ती आपणाशीच म्हणत असते. म्हणून कोणत्याहि समंजस मनुष्याला समाधान, चिरस्थायित्व हें ह्या दृश्य जगाच्या पाठीमागें असणाऱ्या कोणत्या तरी तत्वांत असलें पाहिजें असें स्वाभाविक वाटते. मग तें क्षणभर वाटो किंवा कोणी जन्मभर तीच गोष्ट आपल्या मनावर स्थापित करीत असो. परंतु सृष्टिनियमानुसार दृश्यशास्त्राप्रमाणेंच मनुष्य प्राण्यांतही ही गोष्ट खात्रीची आहे. ह्या अदृश्य तत्वाकडे मनुष्याच्या अंतःकर-णाचा प्रवाह एक वेळ जाऊं लागला म्हणजे त्याच्या अंतःकरणांत दया वृद्धिंगत होऊं लागते. अनेक अन्नावर व अनेक प्राण्यांच्या सुश्रुषेवर निर्माण झालेले शरीरसुद्धां त्याला नकोसें वाटतें. तो ह्या सुखदुःखाचें कारण शोधूं लागतो.

अनेक प्राण्याच्या दुखःरूपी स्थितींतून व तसेच स्वतःच्या दुःखरूपी स्थितींतून वर म्हणजे क्षणेक सुखत्वाच्या स्थितींतून वर येऊन, पुनः तेथेंच लय पावणारे, जें हें क्षणिक समाधान, तें देखील आपल्या तृष्णेच्या वाढीमुळें जोत धरीत नाहीं, तर ती आहे तोपर्यंत प्रखर सूर्यामारखें चिरस्थायी समाधान कसें उदय पावणार? म्हणजे आपली तृष्णा जोपर्यंत आहे, तोपर्यंत आपल्यासहित सर्व जगाला दुःखबेडींतून, मनुष्य किंवा मनुष्येतर प्राण्यांतून कोणालाहि, मुक्त करतां येणें शक्य नाहीं, असा सिद्धांत निष्पन्न होतो.

आणि त्याच्या उर्ध्वस्थानीं तृष्णेच्या शमनद्वारा समाधानचिरस्थायित्वाचा सिद्धांत आयताच सांपडतो. तर मग ब्रह्मांडाएवढ्या सुखदुःखरूप फळांचीं बीजें तळहातांतील आवळ्याप्रमाणें आपल्याजवळ जर आहेत, तर मग दुसऱ्यांनी तीं फळें जबरीनें मला चारलीं असें म्हणण्यांत तरी अर्थ कोणता? अप्रिय बीजाचा प्रतिकार व प्रिय बीजाचें ग्रहण, माझें मला जर करतां आलें नाहीं, तर दुसऱ्यावर त्याचा शब्द काय म्हणून? आतां ह्या प्रियाप्रियात्मक बीजाला मी कारण असल्यामुळें, मीच नाहींसा व्हावा अशी जर मी इच्छा केली, तर तें घडणार कसें? आणि घडलें तरी त्याचें मला काय होय? किंवा मी पुन्हा अशा स्थितींत येणार नाहीं, असें मानण्याला, मी नाहींसा झाल्यावर मला काय अधिकार आहे! आणि तसा अधिकार नसला तर पुन्हा मी त्या स्थितींत येईन, म्हणून मला क्षणिक, समाधानाहून नाहींसा होण्यांत तरी लाभ कोणता? अथवा असलेली वस्तू नाहींशी झाल्यावर ती पुन्हा अस्तित्वांत येत नाही, असा मी अस्तित्वकाळीं सिद्धांत बांधल्यामुळें, तो खरा आहे असें मानण्याला मला नास्तित्वकालीं काय अनुयोगिता आहे. अथवा मी नसलेलाच, ह्या स्थितींत आलो असेन, तर मग दुःखरूपस्थितीला माझें नसणेंच कारण आहे. म्हणून दुःख नसावें अशी इच्छा धरणाऱ्यानें मी, त्या नसण्याची इच्छा काय म्हणून करावी? आणि ही दुःखनिवृत्ति इच्छा सोडून, नसण्याची इच्छा करावी तर

त्याप्रमाणें असण्याची इच्छा करण्यांत मला काय तोटा? आणि समाधान चिरस्थायित्वाच्या माझ्या इच्छेचा प्रतिबंध, माझ्याकडून किंवा कोणाकडून होत नाही, तर मग मी असलो पाहिजे ही इच्छा करणें मला उचित नाही काय? आणि मी न केली तर ती होणार नाही काय?

कोणतीहि वस्तु आपण मिळवीत नाही, किंवा तिचा नाश करीत नाही, या पदार्थ विज्ञानांतील तत्वांप्रमाणें इच्छा ही एक जगांतील शक्ति असल्यामुळें, इतर वस्तूप्रमाणें तीहि जर अनादि राहील तर तीही ज्या माझ्यांत आहे किंवा माझी आहे, त्या माझें नसणें कोणत्याच कालीं नव्हते असें मला स्पष्ट व सप्रमाण विधान करण्याला कोणती अडचण आहे? मी अपूनच जर मला समाधानचिरस्थायित्व मिळविणें इच्छित आहे, तर मग माझ्या देखतांच उत्पत्ति नाश होताना दिसत असणाऱ्या दृश्य जगांत, अटकून कुजत मला कशाला पडले पाहिजे? तसेंच सर्व दुःखाचें बीज मजजवळ आहे हें मला कळते, तर तें निःशेष घालवून देण्याचा यत्न करण्याविषयीं मला पूर्णपणें हक्क पोहोंचत नाहीं काय? आणि तो पोहोचतो असा जर माझा निश्चय आहे, तर अमलबारी न केली तर मी आत्मघातकी होणार नाही काय? याप्रमाणें विचारी मनुष्याचा निर्धार हा नेहमीं रहात असेल, तर अंतःकरणाच्या विचारकारीस्वभावानें, व मनुष्य जातीच्या प्रतिबद्धत्वानें, कितीहि पाशवत्तींतील मनुष्याच्या अंतःकरणांतहि तो क्षणभरहि येत नसेल, असें मानणें समंजसपणाचें कसें होईल? म्हणून इतर प्राण्यापेक्षां अंतःकरणप्रबलता मनुष्य प्राण्यांत, धर्म प्राधान्ये करून नैसर्गिक राहते असें आम्ही म्हटले, त्यांत अनुचित कांहीं नाहीं.

"आहार निद्रा भय मैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ॥
धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण हीनः पशुभिः समानः" ॥

ही योग्य कव्युक्ति अस्मत्पक्षपुष्टिदात्री आहे. /

प्रश्न–आपण केलेल्या विवेचनावरून आध्यात्मविद्या नैसर्गिक पुरुषाचें ठिकाणीं संभवनीय आहे, परंतु धर्म संभवनीय कसा ?

उत्तर– मला वाटले होतेच कीं, तूं अशी कांहीं तरी खुळी कल्पना काढशील. अरे फलाचा विचार मनुष्याच्या मनांत दृढ झाल्यावर साधना-विषयीं विचार दृढ होणार नाहीं, असा कोण पुरुष आहे ? आणि वर जी आध्यात्मविद्या मनुष्याच्या मनांत उत्पन्न होणार म्हणून आम्ही सांगितले, त्यांत सर्व धर्माचें बीज आहे असें तुझ्या ध्यानांत आलें नाहीं. ब्रह्म हे सच्चिदानंदरूप आहे, त्यांतील सत्तांशच सर्वांच्या मनांत विचारानें येणें शक्य आहे; आणि चित् व आनंदांशाचें पूर्ण ज्ञान होण्याकरितां, साधन अवश्य केलें पाहिजे.

( अपूर्ण )

श्रीज्ञानराज माउली समर्थ

महाराजांनीं स्वतः निवेदन केलेलें

# आत्मचरित्र

मी हें लहानसें पुस्तक अशाकरितां लिहीत आहे कीं, पुस्तकांत पुढें येणाऱ्या हकिकतीनें माझें आयुष्य जिवंत नरकरूप झालें आहे, व साधूलाहि कशा प्रकारच्या अडचणी येत असतात, ह्याच या पुस्तकांतून खऱ्या वागणाऱ्यानें बोध घ्यावा. माझी जी प्रकृती बिघडली आहे, त्यांत अर्धी प्रकृति बिघडण्याला पुस्तकांतील पुढील विषय कारण झाला आहे, म्हणूनच मला तो लिहून ठेवावासा वाटतो.

भावार्थदीपिकेची आवडी मला असून त्यासंबंधांत जितके मला श्रद्धायुक्तिपूर्वक सांगतां येईल तितके सांगण्याचा माझा क्रम आहे. त्यामुळें मजजवळ चार लोकहि येत असतात. तसाच धर्माविषयीं ग्रंथ लिहिण्याचा क्रम आहे व त्यामुळें दहा पांच मंडळी मला ठेवावी लागते. पूर्वी जेव्हां मी माधानाहून उमरावतीस आलों तेव्हां मला फार मंडळीची जरूर नव्हती. मी आणि माझी पत्नि असे दोघेंच आम्ही होतो. परंतु ग्रंथ लिहिणें सुरू झाल्यापासून मंडळी ठेवणें मला भाग पडले. कांहीं नव जिज्ञासू लोक माझ्या युक्तीला भाळल्यासारखे होऊन मजजवळ येऊन राहूं लागले आणि माझा त्यांचा प्रेमही चांगला जमला. असे जे साधारणतः राहणारे लोक हेच माझे अनुयायी शिष्य, किंवा मंडळी म्हणून लोकांत समजले गेले. यांतील कित्येक लोकांनी मला मंत्र मागितला पण मी शूद्र असल्यामुळें तंत्रांत ब्राह्मणाला शूद्रापासून मंत्र घेण्याचें काम

पडल्यास ब्राह्मणाचें हातून पिंपळाचें पानावर मंत्र लिहून घ्यावा. हा जो विधी आहे, तसा मी करूं लागलों. माझ्या निरूपणाचा कोणाच्या मनावर कमी व कोणाच्या मनावर अधिक ठसा बसत चालला व त्यामुळें कांहीं माणसें सतत मजजवळ राहूं लागलीं. त्या मंडळीच्या खाण्यापिण्याची व्यवस्था जमविण्याकरितां, आणि माझ्या कात्यायनी, अष्टमी, शिवरात्री, या व्रताकरितां व पुस्तकांकरितां मला जी पैशाची गरज पडली. ते पैसे मिळविण्याकरितां मला थोड्याशा असत्याभासरूपी वाणीचा आश्रय करणें भाग पडले. जेव्हां मी एकटा माधानकडे रहात असे तेव्हा खोटें बोलण्याचें काम मुळींच पडत नसे. परंतु उमरावतीपासूनच एक पक्षीं उन्नतीला व द्वितीय पक्षीं माझ्या अवनतीला सुरुवात झाली. उमरावतींत केलेल्या निरूपणानें बऱ्याच लोकांत माझ्याविषयीं माहिती होऊन माझें लौकिक वैभव साधारणतः वाढत चाललें, आणि माझी विद्या जितकी आहे, त्यामानानें जवळच्या लोकांवर परिणामहि बराच झाला. हा माझ्या उन्नतीचा पाया होय. आतां अवनतीचा पाया असा कीं, पैशाकरितां जो मला असत्याभास करावा लागला त्या आचरणाचाही मंडळीच्या मनावर परिणाम झाला. शाळेंतील विद्या येण्यापूर्वी तेथील मुलांचे गुण जसे लौकर अंगीं येतात, अशीच कांहीं अंशीं मंडळीची स्थिति झाली. मला मंडळीनें महाराज हें नांव उमरावतीपासूनच दिलें. लोणींत व माधानांत असतांना मला प्रथम गुल्ल्या व मग गुलाबराव म्हणत असत. मी शिरसगांवास असतांना गुलाबराव महाराज म्हणत असत व उमरावतीस आल्यापासून लोक मला केवळ महाराजच म्हणूं लागले. महाराजहि प्रसंगीं असत्याभास करतात, तर मग आपल्याला करावयास काय हरकत आहे, असा मंडळीचा समज माझ्या या दोषामुळेंच झाला व याप्रमाणें उमरावतीपासून माझ्या अवनतीचाहि पाया बसला. माझ्यांत थोडेसे दोष असले तरी, मी मोठा भगवद्भक्त, विद्वान असा मंडळीला वाटू लागल्यामुळें, मला

त्यांना सोडवेना व माझ्या प्रमाणें त्यांच्याच्यानें वागवेहिना, अशी स्थिति होती. तथापि मला धर्मग्रंथ लिहिण्याची अपेक्षा असल्यामुळें, मंडळीला दूर पाठविण्याचें माझेंही धैर्य झालें नाहीं.

## प्रकरण दुसरें

## उमरावतीस कां आलों ?

उमरावतीच्या पूर्वी एकांतांत राहण्याची मला अत्यंत संवय होती. व अजूनही पुष्कळ लोक मजकडे येऊनहि असेंच माझें वर्तन आहे. आळंदीसारख्या तीर्थाला देखील मी उत्सवाचें वेळीं जात नाहीं. अशा स्थितींत उमरावतीला येण्याला असें कारण झालें कीं, शिरसगांवास मी नारायणजी तडस राशीमाळी याचें येथें असताना ब्राह्मणाच्या विरुद्ध नारोबा व धर्माजी या दोघा मराठे सत्यशोधकांनी सभा केली, त्याच्यापूर्वी हे दोघे मला सोनोरीस भेटले होते. करजगांवचा अमृतराव माझा नातलग असल्यामुळें तो त्यांच्या मंडळींत होता व त्यामुळेंच नारोबा व धर्माजी यांची माझी गांठ पडली. त्यांनीं तुम्ही सत्यशोधक होता काय असें विचारलें. परंतु मी ब्राह्मणाच्या विरुद्ध नाहीं असें सांगितलें. आम्ही खऱ्या ब्राह्मणाच्या विरुद्ध नाहीं पण जे मूर्ख आहेत व आपली सुधारणा करीत नाहींत त्या ब्राह्मणांनी आपली वेद विद्या शिकावी म्हणून आम्ही यत्न करीत असतों, असें त्यांनी मला सांगितलें. तेव्हां धर्मस्थापन व्हावा अशी माझी मूळची वृत्ति असल्यामुळें ठीक आहे असें मी त्यांना म्हणालो. मग त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रावर मला सही करतां येत नाहीं म्हणून आंगठा मागितला, पण तो मात्र मी दिला नाहीं. तथापि "वडोदें वत्सल" या पत्रामध्यें पंडित गुलाबराव असें त्यांनी माझें नांव छापून पाठविलें. त्याचें मला विशेषसें वाटलें नाहीं. पुढें शिरसगांवास जेव्हां सभा झाली, तेव्हां सरसकट ब्राह्मण जातीच्या विरुद्ध सत्यशोधकांनी प्रतिपादन केलें. हें

प्रतिपादन सर्व कुणब्यामाळ्यांस मानवलें. त्या सभेंत हल्ली उमरावतीस असलेले उद्धवराव बंदे मास्तर, बळवंतराव सहस्रबुद्धे हे हाजर होते. त्या सभेंत मीच एकटा विरुद्ध उठून माझ्याशीं पूर्वी कबूल केल्याप्रमाणें तुमचे उद्देश नाहींत, असें म्हणून त्यांच्या मतांना खोडून त्यांच्यावर उलट प्रश्न टाकले. परंतु त्यांनी कांहीं उत्तर न देतां, याला ब्राह्मणांनी शिकवून ठेवले आहे, या पोराचें ऐकून आपल्या जातीचे काय पुरे पडणार, इतकें ते दोघे म्हणाले. तेव्हां सर्व मंडळींनी टाळ्या पिटल्या. ही गोष्ट विचारावयाची असल्यास उद्धवराव सध्या उमरावतीस आहेत. मी राजाराम देशमुखाचें येथें शिरसगांवास उतरलों होतों. तोहि मला म्हणाला कीं, या सभा करणाराचें चांगलें चाललें आहे, तें चालू द्यावें. त्यांना अडथळा करणें योग्य नाहीं. तेव्हां मोठ्या शहरांत जाऊन आपल्या वाणीचा परिणाम दाखविल्याशिवाय या नीच लोकांवर आपलें वजन बसणार नाहीं, असें मला वाटलें. असें न केलें तर फुकट माझें नांव सत्यशोधकांत गणलें जाईल, अशीहि मला भीति वाटली. नंतर मी खराळ्यास येऊन जमनाबाईचे ओळखीनें उमरावतीस आलों. मला योग येतों असें स्पष्ट सांगून गंगाराम व गंगाधरपंत कास्त यांची ओळख करून घेतली. पुढें एक दिवस हायस्कूलमध्यें जाऊन श्रीनिवास शास्त्री यांचीही भेट घेतली. नंतर हंसस्वरूपानें घातलेल्या योगशाळेचा कार्यक्रम जाऊन पाहिला. शास्त्री महाराजांनी याच वेळीं मला एक घालायला कुडतें दिलें, पण तें मी घेतलें नाहीं. पुढें माधानास तसाच मी निघून आलों. नंतर दुसऱ्यांदा पुन्हा मी उमरावतीस आलों. तेव्हां हरीभाऊची व माझी गांठ पडली. त्यानंतर पुन्हा मी माधानास गेलों. पुढें पाटीलबुवाची व माझी किटकिट होऊन, माझ्या पत्नीसुद्धा मी घरांतून बाहेर निघालों. इतक्यांत यावलीच्या आकाजीबापूकडून मला नेण्यास गाडी आली. कारण उमरावतीस पूर्वींच त्यांचा माझा परिचय झाला होता. नंतर मी पत्नीसुद्धा यावलीस येऊन जो उमरावतीस आलों

तो पक्काच आलों. पुढें हरीभाऊची व माझी भेट झाली, त्यानंतर माझ्याकडे तळवलकर मास्तर व डोळे येऊं लागले. त्यानंतर शास्त्रीबुवा येऊं लागले. त्यानंतर मुळे मास्तर व माझी हायस्कूलमध्यें भेट झाली. पूर्वी पुस्तकें विकणाऱ्याचें दुकानावर एकदा मुळे मास्तर व माझी भेट झाली होती परंतु ते दिवशीं टिळक–केस पाहण्याची मुळे मास्तरला घाई असल्यामुळें माझें त्यांचें चांगलें बोलणें झालें नाहीं. परंतु हायस्कूलमध्यें बोलणें झाल्यावर पाहतों तो दुसराच प्रकार. आगींतून निघून फुफाट्यांत पडल्यासारखी स्थिति झाली. सत्यशोधकांच्या भीतीने मी उमरावतीस आलों तर येथें मला लोक थियॉसफीचे प्रश्न करूं लागले. त्यामुळें थियॉसफीवर ढळढळींत टीका करणें भाग पडले. खापर्डेसाहेब थियासॉफिस्ट म्हणून अप्रत्यक्षपणें त्यांच्यावरही कधीं कधीं माझा अत्याक्ष होत असे. त्यामुळें उमरावतीस कांहीं मंडळी माझ्या विरुद्ध राहिली, व कांहीं माझ्याकडे येऊं लागली. शास्त्रीबुवा, मुळे, भालेराव वगैरेंचें माझ्यावर विलक्षण प्रेम बसलें. माझ्या भाषणाच्या प्रेमामुळें शास्त्रीबुवा मजकडे येत असत व नोकरीकरितां त्याना थियॉसफिस्ट लोकांचें ऐकावें लागे. थियॉसफिस्ट लोकांचा व शास्त्रीबुवांचा संबंध तुटावा याकरितां शास्त्रीबुवानी माझीं पुस्तकें विहिरींत टाकलीं असें मी भक्ताकडून थियॉसफिस्ट लोकांना सांगितलें. तेव्हां शास्त्रीबुवाचें मनावर मी खोटें बोलणारा आहे असा विलक्षण परिणाम झाला. परंतु माझी भावार्थदीपिका त्यांना फार आवडत असे. पुढें कांहीं कारणाकरितां माझे पांच रुपये शास्त्रीबुवानी उसने घेतले. नंतर एकेदिवशीं माझे पुस्तकांचें पार्सल आल्यामुळें शास्त्रीबुवांना न कळता शास्त्रीबुवाच्या पगारांतून भालेरावानी मला काढून दिलें. तेव्हां शास्त्रीबुवाच्या मनावर, हा नुसता साधु नसून याच्यांत व्यवहारिक ढंगहि आहेत असा विचित्र परिणाम झाला. याचवेळीं दहावर्षें थियॉसफीचें आयुष्य आहे असें भविष्य मी मुळयाना सांगितलें होतें. पुढें रामकृष्णाविषयीं माझा व

मुळेचा विवाद होऊन शेवटीं मुळ्यांचें समाधान झालें व त्यांची थिऑसॉफी शिथील पडली. माझ्याकडे अनेक लोक येत असत, त्यांना मी माझ्या एकांतिक स्वभावामुळें टाळत असे. पुढें डोळ्यांचे येथें जाऊन ग्रंथवाचन करीत असे. परंतु तेथें वैद्यकीचीच विशेष चर्चा होत असे, वेदांत विषयाची होत नसे. यामुळें मला कंटाळा येऊन तेथें न जाण्याची युक्ति केली. त्यामुळें डोळ्याचे व माझ्यामध्यें थोडीशी अढी आली. नंतर कांहीं दिवसांनी ती मी काढून टाकली. भालेराव व गोविंदराव यांच्या मनांत पंचदशीमुळें ज्या निर्गुणविषयक कल्पना होत्या त्या काढून सगुण विषयक कल्पना भरविण्यास प्रथम बराच त्रास पडला. बुद्धीनें पटवून देण्याविषयीं मी बाणा धारण केला होता. थिऑसॉफिक ब्राह्मणांना मी शिव्या देत असल्यामुळें माझ्याकडे येणारे लोक पुढें पुढें कमी झाले. शास्त्रीबुवाचें मनावर माझ्याविषयीं जो द्विविध परिणाम झाला होता, तो मात्र तसाच राहिला. पुढें कितीं सांगितलें तरी, महाराज सरळ बोलत नाहीत, असा त्यांचा समज झाला व अजूनही तो तसाच आहे. पुढें तो दूर होईल किंवा नाहीं, सांगवत नाहीं.

## प्रकरण तिसरें

### मुळ्यांची फूट व जूट

याच वेळीं गंगाधर व भक्त माझ्याजवळ येऊं लागले होते. त्यांनी माझ्या निरूपणामुळें आपल्या शाळेंत जाण्याकडे दुर्लक्ष केलें. त्यामुळें जीजीबाईच्या मनावर, गंगाधर महाराजांच्यामुळें आमचें ऐकत नाहीं, अशा भ्रांति येऊं लागल्या. अशानें गंगाधर लग्नहि कदाचित् करणार नाहीं, असेंहि त्यांना वाटलें आणि मुळेआहि तसेंच वाटलें. त्यामुळें त्यांनी दादास तेथें बोलावलें, परंतु यांचे ज्ञान आपणास पाहिजे, याकरितां मुळ्याकडून किंवा कोणाकडून मला स्पष्ट म्हणाविलें जात नसे. पुढें मुळे नागपूरला गेले

व गंगाधर उमरावतीसच राहून, मी यावलीला गेलों तेव्हां जीजीबाईनें गंगाधरला माझ्या मागेंच हरद्याला पाठविलें. पुढें गंगाधरला बरें न वाटून कोठें त्यानी नोकरी धरिली.

## प्रकरण चवथें

### समजूत

उमरावतीस आल्यावर वर्णाश्रम धर्मावर अतीशय जोर देऊन मी साधारणतः वागूं लागलों. परंतु वेदाचीं उदाहरणें कांहीं कारणाकरितां द्यावीं लागत असत, त्यामुळें कित्येकांच्या मनांत संशय येत असे. यावेळीं मजजवळ फारशीं पुस्तकें नव्हतीं. एक लहानशी पेटी मात्र होती. निरनिराळ्या पुस्तकांतील मी उदाहरणें सांगत असे. तेव्हां त्याचा मंडळींना चमत्कार वाटत असे. शेवटीं शास्त्रीबुवांनी व मुळ्यांनी मीड खर्चून मोठ्याकडून मला प्रस्थानत्रयी आणून देवविली. हे ग्रंथ संस्कृत होते. तथापि भक्त, गंगाधर जो जसा सांपडे तसा त्याकडून मी वांचून घेत असे. पुढें येथें हरीभाऊ मराठे, शिरसगांवापैकी माझ्याकडे असलेली बारा रुपये बाकी मागण्याकरितां आले. तेव्हां शिरसगावास हे मला कांहीं ग्रंथ वाचून दाखवीत असत, असें मी मंडळीस सांगितलें. आम्ही नुसते ग्रंथ वाचून दाखवीत होतों, अर्थ मात्र त्यांनी निवडून घ्यावा असें हरीभाऊ म्हणाले. पुढें कांहीं दिवसांनी रामचंद्रा व गणपतराव तेथें आले. हेच मला माधानांत ग्रंथ वाचून दाखविणारे होत, असे मी मंडळींना सांगितलें. तुम्हाला जर हे ग्रंथ वाचून दाखवित असत तर ते शिष्य कसे ? असें शास्त्रीबुवांनी मला विचारलें. परंतु त्याचें मी कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्यामुळें माझें ज्ञान स्वयंभू आहे कीं वाचून मिळविलेलें आहे याविषयीं सर्वांना संशय राहिला. महाराजांची वागणूक श्रीकृष्णासारखी आहे असा मुळ्याच्या मनावर परिणाम झाला.

महाराज हे अलौकिक बुद्धिमान आहेत, परंतु त्यांच्यांत कांहीं व्यावहारिक दोषहि आहेत असा शास्त्रीबुवांचा समज झाला. तथापि मला वृत्तिविद्या जशी अवगत होती, तशी भाषाविद्या अवगत नव्हती. म्हणून मी शास्त्रीबुवांना गुरु समजून सदैव त्यांची स्तुति करीत असे. ती कांहीं कारणामुळें मुळयांना व जीजीबाईंना आवडत नसे. गंगाधरची भर पडल्यामुळें महाराजांकडे मुलें जाऊं देणें वाईट आहे, असें जीजीबाईच्या मनाला शिवलें. परंतु इतकें झालें तरी, महाराज हे अलौकिक आहेत. असें त्यांना वाटत होतेच, त्यामुळें किती झालें तरी माझ्याकडून प्रेम काढून घेण्याचा त्यांनीं विचार केला नाहीं. यावेळीं शास्त्रीबुवाचें माझेंच मुळयापेक्षां अधिक जुळलेलें होतें.

## प्रकरण पांचवें

### स्वभाव विवेचन–मुख्य व कृत्रिम स्वभाव

सर्वदा ग्रंथ विवेचन करणें, होईल तितकें युक्तीनें पटवून देण्याची खटपट करणें, वैदिकेतर धर्माला न जुमानणें, कोणाला रहा म्हणण्याची किंवा जा म्हणण्याची प्रवृत्ति किंवा निवृत्ति न करणें, रात्रीं जागणें व दिवसा निजणें, लोक आले असतां त्रासानें दुसऱ्या ठिकाणीं निघून जाणें, किंवा त्यांना शिव्या देणें, मी अंधळा असल्यामुळें जवळच्या मंडळीला घरीं जाऊं न देतां रोकून ठेवणें, त्यानें आपण होऊन जातो म्हटल्यास न रोकणें, कोणाला चांगलें वागतां यावें म्हणून भलतेच खेळ करणें आणि बालवृत्तीनें राहणें, कधीं कोणास प्रेमानें मांडीवर घेणें व कधीं अतिशय जोरानें रागावणें, थिऑसफीस्टची सरसकट निंदा करणें, वस्तुतः वैराग्य शिकविणें आणि पुस्तकें मागण्याकरितां माझ्यामध्यें थोडासा चमत्कार आहे असें सांगणें, असा माझा मुख्य व कृत्रिम उमरावतीस स्वभाव होता.

## प्रकरण सहावें

### उपद्व्याप व गैरसमज

भालेरावाच्या घरीं कोणी ऐकत नाहीं, म्हणून त्यांना मी एके दिवशीं खाणावळींत पाठविलें व भालेराव मांत्रिक आहेत असें कांहीं बायाचें सांगण्यावरून भालेरावाच्या घरांत भांडण लागेल तर बरें असें सुचविलें. उमरावतीस झालेल्या शौचे यांच्या पशुयज्ञांत गंगाधरला जाऊं नको असें सांगितलें. कांहीं लोकांचीं बुकें पैसे नसल्यामुळें जवळ ठेवलीं. मुळे, भालेराव शास्त्रीबुवा नोकरींत गुंतले असल्यामुळें, भक्त वगैरे जी तरुण मुलें, त्यांच्या हातूनच पुस्तकें वाचून थिऑसफिस्टांमध्यें इकडच्या तिकडे करविलें. मुळ्याजवळ शास्त्रीबुवाची स्तुति करावी, शास्त्रीबुवाजवळ मुळ्याची स्तुति करावी, याचें कारण सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून थिआसॉफीवर फटका झाडावा हे होतें, आणि मला पुस्तकें मिळवून द्यावीं हेंही होतें.

## प्रकरण सातवें

### परीक्षा

पुढें कुंभारे बुवा नांवाचें एक साधु उमरावतीस आलें. तेव्हां मी मुद्दामच त्यांची सेवा करूं लागलों. त्यामुळें पुष्कळ मंडळीला ते माझ्या पेक्षां विदेही आहेत असेंहि वाटलें. पुढें कुंभारे बुवांनीं तातांना सोडून द्या असें मला सांगितलें. त्यामुळें मंडळी बिथरून कुंभारे बुवांना तेथून निघून जावें लागलें. महाराज ब्रह्मनिष्ठ असल्यामुळें, हे कसेहि वागतात असा या मुळें जवळच्या मंडळीचा समज झाला.

## प्रकरण आठवें

### बापूची भेट व शास्त्रीबुवांचा संशय

पुढें कात्यायनीव्रतांत बापू मला भेटला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं पुन्हा मला भेटला व तो कांहीं दिवस मजजवळ राहिला. त्याला मी

पाटण्याला शिकावयास जाऊं नको असें म्हटलें. त्यामुळें शास्त्रीबुवांचा समज महाराज मुलांना संसार करूं देत नाहींत, असा झाला. पुढें बापू पाटण्याला गेला. कांहीं दिवसांनी त्याच्या लग्नाबद्दल शास्त्रीबुवांनी मजला विचारले. परंतु मी करूं नका असें सांगितलें. तथापि त्यांनी कोणत्या तरी रीतीनें माझ्या तोंडांतून ठीक आहे असें ह्मणवून घेऊन बापूचें लग्न केलें. पुढें बापू पुन्हा पाटण्याला गेला. लगेच त्याला क्षय झाला, व तो पुढें कांहीं दिवस नागपुरास राहून मजजवळ राहावयास आला. मी त्याला प्रकृती सुधरेपर्यंत राहा असें म्हटलें. परंतु पैशाच्या टंचाईमुळें आणि कोणी कांहीं माझ्या मंडळीस बोलला म्हणजे मी रागावत असे त्यामुळें, बापूचें मन किंचित उद्विग्न होऊं लागलें.

## प्रकरण नववें

### मुळ्यांची सामाजिक कृपा

गंगाधर प्रकरणांत मुळ्याचें मत चांगले नव्हते, तरी आपल्याला महाराजच आधार आहेत असें वाटून त्यांनी आपले मित्र विठ्ठलराव, भैयासाहेब भगाडे, हळवे, बापुराव जोशी, वगैरेंना माझी माहिती सांगून माझ्याकडे आणलें. विठ्ठलरावाच्या ओळखीनें विष्णुपंत धामापूरकर माझ्याकडे आले. त्यांनी मला योग सांगा म्हणून म्हटलें. त्यावर मी त्यांना प्राणायाम सांगितला व हा माझा पूर्व जन्मीचा स्नेही आहे असें मी लोकांस सांगितलें. विठ्ठलराव, हरिभाऊ वगैरेंनाही योग सांगितले. तसेंच मुळे, बापू शास्त्रीबुवा याना सांगितले. खापरे व पंडित याच वेळीं मला भेटले. खापऱ्यांना माझें निरूपण आवडून तो मजजवळ येऊं जाऊं लागला. पंडित कांहीं दिवसांनी नंतर आला. परंतु बापू, महाराजामुळें शास्त्रीबुवांचे ऐकत नाहीं व गंगाधर, महाराजामुळे मुळ्याचें ऐकत नाहीं, नाना महाराजामुळे तात्यांचें ऐकत नाहीं, इत्यादि उद्गार साधारण लोकांत पसरलें. पूर्व

जन्मीचा जो मी संबंध सांगितला तो कांहीं खोटा सांगितला नाहीं, आणि जोपर्यंत पूर्व जन्माची स्मृति नाहीं तोपर्यंत तो खोटा वाटणें साहजिक आहे. शिवाय पूर्व जन्मीचा स्नेह असला ह्मणजे तो या जन्मांतही आपल्या अनुरोधानें वागला पाहिजे असा शास्त्रनियम नाहीं. शिवाय विष्णुपंताचे मीठ, तिखट मी वर्ज्य केलें होते ते त्यांनी सुरू करून प्राणायाम सोडून दिला. याचा परिणाम वाईट होईल हें मी जाणून होतो.

## प्रकरण दहावें

## आळंदी मुंबई व पुणें

या सुमारास मी एक दोन वेळ आळंदी, पुणें व मुंबईला जाऊन आलो होतो. तेव्हां माझ्याविषयीं बऱ्याच लोकांचा चांगला समज झाला होता, परंतु पुण्याच्या लोकांना कांहीं तरी विलक्षण चमत्कार पाहिजे होता. त्याचा मी निषेध करित असे. शिवाय अशावेळी पुण्यांतील एका प्रतिष्ठित ह्मणवणाऱ्यांचें मत मी खोडून काढलें होतें. त्यामुळे पेंडशाना एके दिवशीं त्यांनी आणलें. मी त्याना "बन्धुनि बहुव्रीहौ" हें सूत्र विचारलें. त्यानी सांगितलें, ते कौमुदींत नाहीं. परंतु तुम्हाला सर्व ग्रंथ पाठ येतात असें तुम्ही म्हणतां तर आम्हाला भारताचे नऊ पर्व पाठ म्हणून दाखवा असें ते म्हणाले. या पूर्वी उमरावतीस एका स्त्रीनें माझ्याशीं दुर्वर्तन करण्याची खटपट केली होती व ती मी त्याचवेळीं खापरे शास्त्रीबुवा वगैरेंच्या समक्ष बाहेर काढली. ही इतकी गोष्ट सत्य घेऊन मी परस्त्रीगामि आहे असें त्या लोकांना सांगून मी पुण्यांतील खटखट टाळली. त्यामुळें महाराज कांहींहि बोलतात असा उमरावतींतील सर्व मंडळींचा समज झाला. इकडे आपली पोरें आपले महाराजामुळें ऐकत नाहीं, असा कांहीं लोकांनीं माझ्याविषयी गैरसमज करून घेतला. मी जरी पुस्तकें वाचण्याकरितां किंवा लिहिण्याकरितां रहा म्हणून म्हणत असे, तरी घरचा कोणाचा तगादा असला किंवा

त्यांनी आपण होऊन जातो म्हटल्यास मी कोणाला रोकलें नाहीं. गंगाधरला लग्नाला मी स्वतः होऊन संमती दिली. बापूच्याहि लग्नाला किटकिटीमुळें संमती दिली. परंतु त्याचें परिणाम ठीक झाले नाहींत. तथापि हे चमत्कार क्षुल्लक समजून मी बहुधा सरळ बोलतच नाहीं, असा शास्त्रीबुवांचा वगैरे समज झाला. पुढें ही पोर मंडळी घरच्यानी बोलाविलें असतांहि जाईनात व मी जा म्हटलें असतांना आपण मला गोटे मारून घालवून दिल्यावांचून आम्ही जाणार नाहीं असें मला म्हणूं लागले. यांत नाना गंगाधर वगैरे पुढें असत. पंडित मजजवळ अजिबातच घर सोडून राहूं लागला. तेव्हां त्याच्याहि बापाचा असाच समज होऊन त्याचाहि हाच परिणाम झाला.

## प्रकरण अकरावें

### शोक

पुढें माझी पत्नी मरण पावली. त्यामुळे मी बराच शोक केला. शोकांतही वेदांतनिरूपण चालत असे. येथून माझ्या प्रकृतीवर विलक्षण परिणाम होऊं लागला. माझें परस्त्रीवर मन जाऊं नये, परस्त्रीगमन माझ्याकडून घडूं नये हें मला पत्नीच्या मरणामुळें फार वाटूं लागलें, व आपण माधानास असल्याप्रमाणे पूर्वीचा योगाभ्यास धारण करावा असा मी निश्चय केला. त्यामुळें माधानाप्रमाणें निद्रेमध्ये सर्व कांही करण्याचा क्रम ठेवला. मला लहानपणापासून योगाभ्यासाचा नाद होता, परंतु तो कोणास ठाऊक नव्हता. मी लहानपणीं धौती बस्ती पुर्णेवर जाऊन करत असे. हा योगाभ्यास माधानांतील लोकांना ठाऊक आहे. त्रिपुरवारनें मिळविलेल्या माहितीवरून हे विशेष समजले. त्यामुळें लहानपणी जेवण्याचा माझा प्रकार हल्ली सारखाच असे. शारदाताई नेहमी मला पोटपाप्या म्हणत असे. शारदाताई मरण पावल्यावर तर मी एकसांजीच (एक वेळचें) भोजन

सुरू केलें, व पुढें मी आपला योगाभ्यासाचा क्रम स्वतः चालविला. मी जरी त्यावेळीं चांगला जेवीत होतो, तरी माझें शरीर रोडच होतें. शिरसगांवास मी असतांना माझे शरीर किती रोड होते हे ताईस ठाऊक आहे. यावेळींहि मला शौचाला तीन तीन तास बस्तीकरितां लागत असत. हें त्रिपुरबारनें लिहिलेल्या माहितीवरून समजेल. एव्हां मी बस्ति अंगुलीनेच करीत असे. परंतु सत्यशोधकांशीं भांडण झाल्यापासून व अमरावतीस आल्यापासून खाण्यापिण्याच्या नियमांकडे फारसे लक्ष दिलें नाहीं. त्यामुळें मध्ये माझें शरीर फारच चांगलें झालें होतें. उमरावतीच्या पूर्वी कोणी मला जेव म्हणणारा नसल्यामुळें, ज्यावेळीं व ज्यादिवशीं मला भूक लागेल तेंव्हां मी जेवीत असे. मी आपला योगाभ्यास मात्र कोणाला कधींच कळूं दिला नाहीं. विष्णुपंताला देखील जो प्राणायाम सांगितला तो ग्रंथाप्रमाणें सांगितला. मी जसा करीत होतो तसा सांगितला नाहीं. यामुळें मला योग येतो हे उमरावती नंतरच्या मंडळीस फारसे माहित नाहीं. मनकार्णिका संपल्यानंतर शोकाच्या बळानें व माझ्या श्रमानें मला अजीर्ण होऊं लागलें व व्यायामहि वर्ज झाला. पोटांतील पित्त, श्लेष्म मिश्रित होऊं लागलें. त्यामुळें मी पुन्हा भूक नाहीं म्हणून जेवीत नसें. माझ्या वर्तनाचा मंडळीच्या मनावर अधिक परिणाम झाल्यामुळें मी, मुद्दाम जेवीत नाहीं असें नाना वगैरेना वाटून त्यांनी मला वाटेल तसें बोलावें, व कोणी कांहीं बोललें कीं एकदम अन्नाचा त्याग करण्याची मला माधानपासूनच संवय असल्यामुळें, नुसता जेव म्हणणारा मनुष्य मला शत्रु वाटूं लागला. माझा समज आहे, मी आपल्या मताप्रमाणें वागलो म्हणूनच आतांपर्यंत वाचलो व दुसऱ्या वैद्यादिकांच्या म्हणण्याप्रमाणें मी वागलों असतो तर आतांपर्यंत माझीं कित्येक श्राद्धें होऊन गेलीं असतीं. असो. येथून जितक्या मंडळीशीं व माझ्याशीं किटकिटी झाल्या त्या सर्व कोणत्याना कोणत्या तरी जेवणाच्या संबंधानेंच झाल्या. माझ्या जेवणांत ज्यांच्याशीं संबंध नसे त्यांच्याशीं चांगले व जेवणाशीं ज्यांचा संबंध असे त्यांच्याशीं वाईट अशी माझी स्थिति झाली.

॥ श्री ज्ञानेश्वर माऊली ॥

# नविन भाषा–नावंग

१ विभक्तीप्रत्ययखेरीज करून स्वरादि प्रत्यय लावतांना, ज्याला प्रत्यय लावावयाचा असेल, त्याचे अंती स्वर असल्यास त्या स्वराचा लोप होतो. अंज प्रत्यय लावतांना अथवा धातूहून नामें अथवा विशेषणें साधवितांना धातूचें अंत्य व्यंजनाचा लोप होतो.

२ स्वरान्त नामापुढें ज्या विभक्तीप्रत्ययाच्या आदि अ किंवा आ आहे, असा प्रत्यय लावतांना त्या आदि स्वराचा लोप होतो.

३ नपुंसक नामाची प्रथमा व संबोधन खेरीज करून बाकीच्या विभक्तीचे प्रत्यय लावतांना अंत्य स्वर निघून जातो व लागणाऱ्या प्रत्ययांतील आदि स्वराचा लोप होत नाहीं. नामास षष्ठीचा प्रत्यय लावून मग शब्दयोगी अव्यय लावावें.

४ कोणत्याहि शब्दाचे अंतीं दोन व्यंजनें असल्यास व यापुढें त्याच शब्दांत स्वर नसल्यास व्यंजनाचा लोप होतो. प्रथम

५ प्रत्येक अंक व्यंजनान्त समजावा. पण त्याचा कोणत्या दुसऱ्या शब्दाशीं अथवा प्रत्ययाशी संधी न झाल्यास उच्चार करितांना स्वरान्त मानावा.

६ आज्ञार्थ एकवचनांत धातूचें मूळचेंच रूप कायम राहतें व बहुवचनांत धातूला ‘ए’ प्रत्यय लागतो.

७ विध्यर्थांतील कर्ता तृतीयांत असतो. तसेंच प्रत्ययांतील आदि स्वराचे ठिकाणीं ‘ए’ आगम होतो.

८ रिती काळांत प्रत्यय लागण्यापूर्वी " ओ " आगम होतो.

९ संस्कृतांत ज्या अर्थी "त्वा" प्रत्यय लागतो त्याच अर्थी येथे "अय" प्रत्यय लागतो.

१० 'की' प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाचा अन्त्य स्वर ऱ्हस्व होतो.

११ अकारान्त किंवा आकारान्त सर्व नामें पुल्लिंगी, इकारान्त किंवा उकारान्त नामें स्त्रीलिंगी व त्याच प्रमाणें एकारान्त किंवा ऐकारान्त नामें नपुंसकलिंगी असतात. वरील नियमांस नावंगादि सिद्ध शब्द अपवाद आहेत.

१२ पुरुषवाचक नामें पुल्लिंगी, स्त्रीवाचक स्त्रीलिंगी व निर्जीव पदार्थवाचक नपुंसकलिंगी असतात. परंतु ज्या निर्जीव पदार्थाची देवता पुरुष किंवा स्त्री असेल ते पदार्थ त्या लिंगाचे समजावेत.

१३ इलेंत, इसनीत्, इलेंट्, इसमिंट हे प्रत्यय मूळ धातु तशीच ठेवून लावावेत.

१४ आपण " अना " ह्यास नेहमी तृतीय पुरुषी बहुवचनी प्रत्यय लावावेत.

## नावंगादि सिद्ध शब्द

| | | |
|---|---|---|
| नावंग–गजानन | मंच–कृष्ण | कांजेयस्–मनुष्य |
| नावंगा–सरस्वती | मंचा–राधा | कांजेयसी–स्त्री |
| कंज–शंकर | नांचेनी–गुरु | सोनाची–यति |
| कंजा–उमा | मांचेनी–शिष्य | |

॥ श्री ज्ञानेश्वर माऊली ॥

# शब्द-कोश

**मराठी-नावंग**

प्रेरणें-वंदन्
प्रेरण-वंदे
प्रेरक-वंदल
प्रेर्य-वंदेय
प्रेरित-वंदंज
दिसणें-नस्तन्
दर्शन--नस्ते
द्रष्टा-नस्तल
दृश्य-नस्तेय
दृष्ट-नस्तज
कीर्तणें-व्रजन्
कीर्तन-व्रजे
हरिदास-व्रजल
सद्गुण-व्रजेय
कीर्तित-व्रजंज
जन्मणें-स्पंदन
जन्म-स्पंदे
पिता-स्पंदल

**मराठी-नावंग**

निवणें,शांत होणें--सनातन्
शांतवन-सनाते
होणें-कदंबन्
भवन-कदंबे
भूत-कदंबज
भावी-कदंबंद
भाव-कदंबस्
सोडणें-मुनस्नन्
मोक्ष-मुनस्न
मुमुक्षु-मुनस्नेय
मुक्त-मुनस्वंज
दोहणे-यल्लपन्
दोहना-यल्लपे
दोग्धा-यल्लपल
दूध-यल्लपेय
मागणें-तल्लपन्
भिक्षा-तल्लपे
याचक-तल्लपल

**मराठी-नावंग**

देय-अमंवेय
दत्त-असंवेज
घेणें-अरस्तन्
प्रतिग्रह-अरस्ते
घेणारा-अरस्तळ
मोजणें-अंचान्
माप-अंचे
मापक, तराजू-अंचाळ
माप्य-अंचेय
जेवणें-अनुषन्
भोजन-अनुषे
भोक्ता-अनुषल
भोग्य-अनुषेय
भुक्त-अनुषंज
पिणे-अरव्हन्
पान-अरव्हे
पिणारा-अरव्हल
पाणी स्वार्थ-अरव्हेय

| | | |
|---|---|---|
| माता–स्पदली | श्रीमंत–इतह्लपल | जाणे–अनपूट |
| गर्भ–स्पंदेय | देणें–असंबर | गमन–असंट |
| तान्हेबाळ–स्पंदंज | दान–असंबे | खेळणें–अमुवद् |
| भाऊ–गरस्पंदेय | दाता–असंबल | क्रिडा–अमुवो |
| बहिण–गरस्पंदेयी | दात्री–असंबली | हासणें–अरावन् |
| रडणें–अंजतन् | बोलणें–मंचूष | हास्य–अरावे |
| रूदन–अजंते | उगे राहणें–अरूहेनन् | वादकरणें–जिंतन् |
| रडका–अजंतल | मौन–अरूहेने | वाद–जिंत |
| शोच्य–अजंतेय | मुनी–अरूहेनल | वादी–जिंतल |
| बोलणें–अमेषन् | शत्रु–मोबदेय | वादग्रस्त–जिंतेय |
| भाषण–अमेषे | वमन करणें–उंदन् | प्रतिवादी–इजिंतल |
| वक्ता–अमेषल | वमन--उन्दे | निर्विवाद–इजिंतेय |
| भाष्य–अमेषेय | चोरणें--उलालन् | व्यापणें–अलंदन् |
| मरणें--अजीदन् | चोरी--उलोउ | व्यापक–अलंदल |
| मरण--अजीदे | चोर--उलालल | व्याप्त–अलंदंज |
| मरणारा--अजीदल | पिणे–उलोदन् | मुतणें--ढन् |
| मृत--अजीदेय | पान्--उलोदे | लघ्वी--ढे |
| विसरणें--अनश्नन् | पिणारा--उलोदल | शिश्न--ढल |
| विसर--अनश्ने | पाणी--उलोदेय | मूत्र--ढेय |
| विसराळू--अनश्नल | मोडणें--उशंदन् | हागणे--ठन् |
| उपेक्ष्य--अनश्नेय | मोड--उशंदे | शौच--ठे |
| निजणें--लहोऊन् | उभे राहणें--उरंचन् | गांड--ठली |
| झोंप--लहोऊे | चढणें--अएरन् | गू--ठेय |
| झोपाळू--लहोलल | चढ--अएरे | जप करणें-संबोधन् |
| कपट करणें-अरंचन् | फिरणें--अंकंचन् | जप--संबोध |

| | | |
|---|---|---|
| कपट--अरंचे | फेरी, भ्रम--अंकंचे | जापक--संबोधळ |
| कपटी--अरंचीळ | दुराचरणरण करणें--अरोईषन् | मंत्र--संबोधेय |
| गारुड--अरंचेय | पाप--अरोईषे | ध्यानकरणे--धेन् |
| आपटणें--अन्सादन् | पापी--अरोईषल | ध्यान--धे |
| वर फेंकणें--मुळतह्ळ | धरणें--अदस्तन् | ध्याता--धळ |
| खाली फेकणें--इमुळतह्ळ | धारक, खांब-अदस्ते | ध्येय--धेय |
| उडी घालणें--अरूसन् | धारक--अदस्तळ | समाधी लावणे--परोल्न् |
| उडी--अरूसे | आधेय--अदस्तेय | समाधी--परोळ |
| खेळणें--अंचावन् | न्हाणें--ओंनगदन् | योगी--परोल्ळ |
| क्रीडा--अंचावी | हांक--अपिते | नियमणें--पसंदन् |
| खेळाडी--अंचावळ | रागावणें--उलावस्तन् | नियम--पसंद |
| खेळ--अंचावेय | बसणें--उंतन् | नियंता--पसंदल |
| मारणें--मोबदन् | धांवणें--उलोतन् | नियम--पसंदेय |
| मरण--मोबदे | नसणें- इसनोवन् | प्राणणें--एनन् |
| मारक--मोबदल | संधी--हिते | सख्य करणें-सुरजन् |
| प्रीती करणें--पएलन् | अवसान--सिने | फूट--दोभे |
| वरणें--उपेळन् | भवन, कर्म--कदंवे | फंदी--दोभल |
| रचणें--मंतन् | होणे--कदंबन् | युद्ध--नुमट्टेय |
| व्रत करणे--समाहन् | असणें--सनोवन् | योद्धा--नुमट्टल |
| तप करणे--सुसमाहन् | गुंफणे--इनोयन | फूट पाडण्यास योग्य-दोभेय |
| भजणें--युंजन् | गुफा--इनोये | शोभणे--उजेलन् |
| अवतरणें--संतरन् | वेणी--इनोयेय | राखणें--करंछन् |
| रुचणें--सनीदन् | अडसणें--नुसंदन् | रक्षण--करंछे |
| यात्रा करणें--गंगोलन् | तान--नुसंदे | रक्षक--करंछल |
| वेडे होणे, भ्रष्टणे--कनिष्कन् | विंचरणें--जुसंदन् | रक्ष्य--करंछेय |

| | | |
|---|---|---|
| राहणें--फ्रनोदन् | फणी–जुसंदेल | विचार करणें--उल्लसन् |
| जिणें-गंम्रोलन् | केस--जुसंदेय | विचार–उल्लस |
| वंचणें--थिंकन् | सुधारणें--मिसंजन् | मन--उल्लसेल |
| लुचणें, बोकडणें--पुरन् | बागाईतकरणें–निकुंजन् | शास्त्र--उल्लसेय |
| जिंकणें-कविंदन् | त्यालसणें किंवा हेत्वाभासणें-दिमाष्तन् | मठ्ठ,श्रद्धाळु-इसुत्रुंदल |
| धर्म करणें–संजियन् | तर्क करणें--सुत्रुंदन् | अंधःकार--इचन्दे |
| अभ्यसणें-संततन् | तर्क–सुत्रुंदे | राजा क्षत्रिय-उजालावत् |
| सांपडणें--सुफ्रचन् | तार्किक-सुत्रुंदल | राज्ञी--उजालावती |
| हरपणें--निकंचन | वाटणें--त्रन् | कळणें--स्नदंशन् |
| उलटणें--फ्रगंजन् | यत्नकरणें–सनोचन् | अनुभव–स्नदंशे |
| घोरणें--इसल्चन् | लढणें--नुमट्टन् | स्नदंशल–अनुभवी |
| सहानुभूतीने देणे–भिसल्चन् | फूट पाडणें } दोभन् | अनुभाव्य–स्नदंशेय |
| मैथुन करणे--बिर्मनन् | विद्वेषणें | जाणणें--प्लदूवन् |
| मैथुन–वियोले | प्रकाशणें--चन्दन् | ज्ञान–प्लदूवे |
| जार--वियोठल | रमणें–अल्मन् | ज्ञाता--प्लदूवल |
| मोकळे करणे--मुषीदन् | सोडणें--कुलंचन | ज्ञेय–प्लदूवेय |
| घालणें--नुबेनन् | त्याग--कुलंचे | वाचणें--मिलावन् |
| गाडणें--मुदेनन् | गाणें–इमोदन् | वाचन–मिलावे |
| टोचणे-रुदेनन् | गाणं--इमोदे | वक्ता--मिलावल |
| शिकणें--लोलन् | गवई--इमोदल | वाक्य--मिलावेय |
| जोडणें–हितन् | गेय–इमोदेय | लिहिणें--मियोन् |
| थांबणें–सीनन् | प्रकाश–चन्दे | लेखन--मियवे |
| होणें–कदंबन् | प्रकाशक--चन्दल | लेखक–मियवल |
| असणें-सनोवन् | प्रकाश्य--चन्देय | लेख–मियवेय |
| स्तविणें–किजल्कन् | सुखदेणें--नन्दन् | करणें--दिलावन् |

| | | |
|---|---|---|
| स्तुति–किंजल्की | सुख--नन्दे | करण–दिलावे |
| स्तावक–किंजल्कनवल | चालणें--इन्चेरर्ण | कर्ता–दिलावल |
| चिंतणें--उल्लसन् | चाल–इन्चेरे | कार्य, काम–दिलावेय |
| मंत्रणें–पनीयन् | शिजणें–इमन्शन् | उगाळ--चिशंते |
| वाहणे--उपन्शन् | पाक--इमन्शे | वाढणें-गिरंनोज |
| नेणें–उलन्दन् | स्वयंपाकी--इमन्शल | वाढ–गिरंनवे |
| मुका घेणें–लोलोअन् | पक्वान्न--इमन्शेय | वाढपी–गिरंनवल |
| मुका–लोलोए | सरकणें–केन् | मोकळें करणें--मुषीदन |
| ठेवणें–मुनाल्वन् | सर्प--के | झटकणें–किरंनोन् |
| ठेव–मुनाल्वे | शिवणें--मेन् | झटका--किरंनवे |
| कृपण--मुनाल्वल | शिवण--मे | उकरणें--विरंनोन् |
| लोटणें--असंशन् | शिंपी–मेल | स्मरणें–शिरंनोन् |
| लोट–अशंशि | स्पर्शणे--सेन् | स्मरण--शिरंनोने |
| ओढणें--करुंछन् | स्पर्श--से | नमणें--पल्कन् |
| ओढ, ताण–करुछे | घुसळणे--सुमन्तन् | नमस्कार--पलंके |
| फाडणें--मुरोजोएन् | घुसळण--सुमन्ते | वंद्य–पलंकेय |
| भोग, चीर--मुरोजे | रवी--सुमन्तले | दास्य करणें--ऐनन् |
| गुरगुरणे--मुकंटन् | दही–सुमन्तेय | दास्य--ऐने |
| गुरगुर--मुकंटे | तापणें--इसन्नतन् | सेवक--ऐनल |
| धुंगारणे–नश्नन् | ताप--इसन्नते | सेव्य–ऐनेय |
| पुजा करणे--कामलन् | तापट--इसन्नतल | अर्पण करणे--सन्तन् |
| पूजा--कामले | हलणें--बुलन्दन् | निवेदन--सन्ते |
| पूजक--कामलल | चलन--बुलन्दे | नैवेद्य–सन्तेय |
| पूज्य--कामलेय | चंचल, चालक--बुलंदल | खासणें--इंगदन् |
| आलिंगन देणें--पिलेशनन् | सांगणें--इलादन् | कास--इंगदे |

अलिंगन, भेट--पिलोएर्ने
वाजणें--वुएचन्
वाजा--वुएचे
वाजंत्री--वुएचल
कांडणें--ओपन्दन्
तोडणें--किरोईतन्
तोड--किरोईते
आणणें--लेन्
बोलावणें--चक्रन्
हळू बोलणें--मोपन्
लावणें--तुफन्
खलणें--गुरंतन्
लाग--तुफे
खल--गुरंतल
औषध--गुरंतेय
उघडणें--जुरंतन्
उघाड--जुरंते
शिंकणें--तुरंदन्
शिंक--तुरंदे
नाक--तुरंदल
शेंबुड--तुरंदेय
थुंकणें--इरंदन्
भुलणें, विसरणें--गुनासन्
थुंका--इरंदे

कथा--इलादेय
झाडणें--किपन्सन्
फडा--किपन्सले
उगाळणें--चिशन्तन्
छाया करणें--नुनंदन्
छाया--नुनंदे
छत्र--नुनंदले
सार्वभौम--नुनंदेय
अन्याय--इगिंत
अपराधी--इगिंतल
अन्याय्य, अयोग्य } इगिंतेय
इच्छिणें--कलंदन्
मदन, काम--कलंद
इच्छा--कलंदे
कामी--कलंदल
काम्य--कलंदेय

———————

१ -- इद्
२ -- तद्
३ -- तवद्
४ -- नुजेद्
५ -- संदेद्
६ -- इरेद

कला करणें--कदंगन्
कला आरोळी--इदंगे
दळणें--कुरंजन्
दळण--कुरंजे
जात--कुरंजले
धान्य--कुरंजेय
गिळणें--निपंशन्
अजगर--निपंशल
रुळणें--मिदंशन्
पोळणें--लुदंशन्
चटका--लुदंशे
जार--लुदंशल
जळणें--नुदंशन्
आग--नुदंशे
अग्नि--नुदंशल
इंधन्--नुदंशेय
वळणें--सदंशन्
वळसा, भोवरा--सदंशे
नदी--सदंशली
गळणें--अदंशन्
गाळण--अदंशे
पातळ--अदंशेय
चळणें--लपंशन्
चंचल--लपंशल
धातु--तुल

| | | |
|---|---|---|
| भाजणें–पसेरन् | ७ – अरमेद् | मूळरूपभेद–सिकोश |
| पात्र, भांडे–पसेरे | ८ – निवद् | प्रयोजक भेद–तुवस |
| भरडभुंजा–पसेरल | ९ – उद् | शक्य भेद–हेनस |
| वाळणें–नसेरन् | १० – किम् | स्वार्थ–सन्नद |
| भिजणें–दरीयन् | ११ – किमेद् | विध्यर्थ–मुनद |
| पाउस–दरीयल | २० – तेम् | आज्ञार्थ–एनद |
| ऐकणें–मुवोदन् | ३० – तवेम् | संशयार्थ–परन्नद |
| श्रवण–मुवोदे | ४० – नुजेन् | संकेतार्थ–जुशन्नद |
| श्रोता–मुवोदल | ५० – संदन् | विशेषण–मतिन्नद |
| श्राव्य–मुवोदेय | ६० – एरन् | अव्यय–चुवर्स |
| पाहणें–पेशन् | ७० – अरम् | गुणविशेषण–लूदस |
| दर्शन–पेशे | ८० – निवेन् | क्रिया विशेषण–नूवन्स |
| द्रष्टा–पेशल | ९० – उन् | कालवाचक } केनुवन्स |
| दृश्य–पेशेय | १०० – केम् | क्रिया विशेषण |
| धुणें–लोदन् | २०० – तदकेम् | स्थलवाचक } कोनुवन्स |
| धुण–लोदे | हजार–कमेम् | क्रिया विशेषण |
| धोबी–लोदल | लक्ष–तमेम् | उभयान्वयी अव्यय–सिचुवर्स |
| वस्त्र–लोदेय | कोटी–समेम् | केवलप्रयोगी अव्यय–रिचुवर्स |
| पिडणें–तोदन् | अब्ज–नुमेम् | शब्दयोगी अव्यय–निचुवर्स |
| पिडा–तोदे | पहिला–इदाव | शुद्ध शब्दयोगी अव्यय–दिचुवर्स |
| उपकार करणें–सोदन् | पहिली–इदावी | क्रियापद–रोमर्स |
| उपकार–सोदे | पहिले–इदावे एकदां–इदबल | सर्वनाम–नोमर्स |
| उपकारी–सोदल | दोनदा–तदबल | प्रयोग–कुजन्स |
| उपकारार्थ–सोदेय | अधिक–नथनी | कर्तरि प्रयोग–कस्कुजन्स् |
| न्याय करणें–गिंतन् | कमी–इनथनी | कर्मणी प्रयोग–दस् कुजन्स |

न्याय--गिंत
न्यायाधीश--गिंतल
न्याय्य--गिंतिल
विष्णु--मुनंत
रमा--मुनंती
ब्रह्मा--नावन
सावित्री--नावनी
मुलगा--कांजंत
मुलगी--कांजंती
गाय--किंदपी
बैल--किंदप
म्हैस--दिंकानी
रेडा--दिंकान्
गरुड--कुरंद
घोडी--कौरंदी
घोडा--कौरंद
हरीण--कवान्
हरणी--कवानी
सर्व--नोम
आज--एद
काल--केद उद्यां--वेद
परवां--पेद
महिना--एमर
ऋतु--केमर
अयन--वेमर

एवढा--दंब
जेवढा--वंब
तेवढा--संब
केवढा--वेंब
इतका--दल्ल
जितका--वल्ल
तितका--सल्ल
कितका--वेमल्ल
किती--वेन्नी
मोठा--तरव
लहान--इतरव
अन्य--जम
गोड--तोबल
कडू--इतोबल
चांगला--सुरंच
वाईट--इसुरंच
तुरट--निरस
आंबट--तौरस
खारट--चौरस
तिखट--विनोन
पांढरा--सुकर्भ
काळा--इसुकर्म
हिरवा--सेसुकर्म
लाल--इनेसुकर्म
निळा--लनीयनकर्म

भावी प्रयोग--मत् कुजन्स्
कर्ता--कसा
कर्म--दस्
काळ--इल
वर्तमान काळ--कुलिल
भूतकाळ--तालिळ
भविष्यकाळ--वेलिल
दर्शक सर्वनाम--वेननोमर्स
पुरुषवाचक सर्वनाम-हेननोमर्स
संबंधी सर्वनाम--अनीननोमर्स
आगम--इनस
आदेश--इलिनस
मात्र--हंस
जर--वली
तर--सली
एव्हां--दतोम्
जेव्हां--वतोम्
तेव्हां--सतोम्
केव्हां--वेन्तोम्
च--ह
जवळ--परवल
दूर--इपरवल
आणि--लबल
परंतु--निलन्
वर--उदल

| | | |
|---|---|---|
| वर्ष–पेमर | पिवळा–मोबतकर्म | खाली--इलुदल |
| युग--मेमर | कोण--ओम् | कडे–सुल |
| कल्प--तेमर | कोणता–ओम्स | पुढे--एदल |
| घटका–रस्ते | कोणती--ओम्सी | मागे--इलेदल |
| प्रहर--केस्ते | कोणते–ओम्से | इकडे–अन्सुल |
| दिवस--वेस्ते | कसा--वेंक | तिकडे--इलन्सुल |
| रात्र–पेस्ती | कसी–वेंकी | जिकडे–विसुल |
| आदि--सिर्मी | कसें–वेंके | कोठे–ओंछ |
| अंत--इसिर्मी | जसा--वक | तेथे–संछ |
| आपण–अना | जशी–वकी | जेथें--वंछ |
| तो–स | जसें–वके | येथे--दंछ |
| ती–सी | पाहिजे--ललित् | होय–एम |
| तें--से | नको–इललित् | नाही--इलेम |
| तूं--यू | आहे--सनी | नाही--इसनी |
| तुम्ही–सुकी | अपि--पनी | आतां--नहून |
| आम्ही--समकी | वाहवा--छन्छन् | मग--इनेहून |
| जो--व | अरेरे–इछन्छन् | नये– इलेंत / इसनीत |
| जी--वी | केवल–सरी | |
| जे--वे | पिवळारंग--मोबतकर्म | नको– इलेंट / इसनीट |
| मी–स्वयम् | जाती--पाजी | |
| आवश्यक--अलत् | व्यक्ति--इपाजी | कां–म्रा |
| अनावश्यक--इलॅलत् | कोण–सम् | निष्कारण--इलुंज |
| लिंग--वम | क्रायवेम् | म्हणून–ललुम् |

प्रयोजक भेदांत धातूला लागणारा प्रत्यय–अवत्

शक्य भेदांत धातूला लागणारा प्रत्यय–अयत्

| | |
|---|---|
| भूतकाळीं प्रत्यांतील स्वराला आगम--ई | भविष्यकाळीं प्रत्ययांतील स्वराला आगम-ऊ |

क्रियापदाला लागणारे वर्तमानादि कालाचे प्रत्यय

| | ए. व. | ब. व. | |
|---|---|---|---|
| प्र. पु. | अन् | अम् | तरप प्रत्यय-य |
| द्वि. पु. | अंस | अंथ | + करवी--चिन्नी |
| तृ. पु. | अत् | अतान् | तमप प्रत्यय--श |

भाववाचक प्रत्यय--अस भविष्यकाल वाचक धातुसाधित प्रत्यय-अंद

सारखा—गम विना—चम

मतुप प्रत्यय-नम् नामाला लागणारे प्रथमादिचे प्रत्यय—

| | ए. व. | ब. व. | | ए. व. | ब. व. |
|---|---|---|---|---|---|
| प्र. | ... | की | प. | अम् | उम् |
| द्वि. | अद् | एद् | ष. | अर | ईर |
| तृ. | अन् | ईन् | स. | ई. | ए. |
| च. | ... | ... | सं. | ची (हे) | चावन् (अहो) |

नञ प्रत्यय (व्यंजन पूर्व) इ नञ प्रत्यय (स्वर पूर्व) इल

विध्यार्थी आगम-ए

| | | |
|---|---|---|
| पुल्लिंग--परवम | स्त्रीलिंग--परिवम | नपुसकलींग-इपरन्वम् |
| नाम--अर्स | विभक्ती-इत | वचन--नून |
| अंक--अंक | बहु--कुन् | एकवचन--इन्नून (इदनून) |
| बहुवचन-कुन्नून | संधि-न्हिते | स्वर--आम |
| व्यंजन-कह | विसर्ग-इन्द | अनुस्वार-मुन्द |
| धातुप्रत्यय-पल्वस | विभक्ती प्रत्यय-पल्वम | समास-मोन्सम |
| उत्तम पुरुष-सुरंचशपर | मध्यम पुरुष-दंकावपर | प्रथम पुरुष-इदावपर |

तत्पुरुष समास-इत्परमोन्सम नञतत्पुरुष समास-इलेत्परमोन्सम

कर्मधारय समास--दसादस्तमोन्सम द्विगु समास–गमोनन्स
द्वंद्व समास--तदसमोनन्स बहुव्रीहि समास–चमोनन्स
हा–दा ही--दी हें–दे
रंग–कर्म पांढरा रंग--सुकर्म काळा रंग--इसुकर्म
हिरवा रंग–सेसुकर्म लाल रंग--इनेसुकर्म निळा रंग--लनीयनकर्म
पति–मौनंत पत्नी--मौनंती उपाध्याय–मुनान
गुरुपत्नी–मुनानी गुरुबंधु–मुनानेय कारण–लुंज
मध्य--दंक पृथ्वी--उज्जी देव–कनुवान्
देवी–कनुवानी ब्रह्म–चन्नोन माया–इचन्नोन
ब्राम्हण--चन्नावन ब्राम्हणी–चन्नावनी राजा–उजालावत्
राज्ञी--उजालावती असा--दक अशी–दकी
असें--दके तसा--सक तशी–सकी
तसें--सके बहु--कुन
मध्यम्–दंकाव, दंकावी, दंकावे अपत्यार्थी प्रत्यय–उस

## उंतन्-बसणें

मी बसतो......उंतनन् मी बसलो......उंतनीन्
मी बसेन......उंतनून् मी बसत असतो--उंतनवन्
मी बसत असे–उंतनवीन् मी बसत असेन–उंतनवून्
मी बसत आहे--उंतनो ( सनी ) सनोवनन्. मी बसत होतो--उंतनो सनोवनीन्. मी बसत असेन--उंतनो सनोवनून्. मी बसलो आहे--उंतनीन् ( सनी ) सनोवनन् अथवा उंतनेज ( सनी ) सनोवनन्
मी बसलो होतो--उंतनीन् सनोवनीन् अथवा उंतंज सनोवनीन्
मी बसलो असेल--उंतनीन् सनोवनून् अथवा उंतंज सनोवनून्
मी बसणार आहे--उतंनून ( सनी ) सनोवनन् अथवा उंतंद सनोवनन्
मी बसणार होतो--उंतनून सनोवनीन अथवा उंतंद सनोवनीन्

मी बसणार असेन--उंतनून सनोवनून अथवा उंतंद सनोवनून्

**मराठी प्रमाणें केलें आहे**

१) समन् अरंचेय लोलनीत् २) समन् अरंचेय लोलनीत् सनोवनत्
३) ,, ,, ,, सनोवनीत् ४) ,, ,, ,, सनोवनूत्

संस्कृताप्रमाणें कर्मणी प्रयोग सर्व काळीं ठेवून त्याला स्वतंत्र प्रत्यय ठेवावा अथवा मराठी प्रमाणें भूत काळींच ठेवून तृतीयांत कर्ता प्रथमान्त कर्म व भूतकाळाचे कर्माप्रमाणें क्रियापद त्या पुरुषी ठेवावे. येथे मराठी प्रमाणें केलें आहे.

शक्य भेद:—

मी गारुड शिकू शकतो—सम अरंचेय लोलनयतन्
,, ,, ,, शकलो— ,, ,, लोलनयतीन्
,, ,, ,, शकेन— ,, ,, लोलनयतून्
,, ,, ,, शकत असतो— ,, ,, लोलनयतवन्
,, ,, ,, असे— ,, ,, लोलनयतवीन्
,, ,, ,, असेन— ,, ,, लोलनयतवून
,, ,, ,, आहे— ,, ,, लोलनयतो (सनी) सनोवनन्
मी गारुड शिकतो–सम अरंचय लोलनन
मी गारुड शिकलो सम अरंचेय लोलनीन्

* १) समन् अरंचेय लोलनयतीत्
* २) ,, ,, लोलनयतीत् सनोवनत्
* ३) ,, ,, ,, सनोवनीत्
* ४) ,, ,, ,, सनोवन्त

मी गारूड शिकूं शिकत होतो सम अरंचेय सनोवनीन्
,, ,, ,, ,, असेन ,, ,, सनोवनून्

१)*मी गारुड शिकूं शकणार आहे. सम अरंचेय लोलनयतून (सनी) सनोवनन
,, ,, ,, ,, होतो ,, ,, ,, ,, सनोवनीन
,, ,, ,, ,, असेन ,, ,, ,, ,, सनोवनून
लोलनयंद (सनी) सनोवनन्, लोलनयंद (सनी) सनोवनीन् लोलनयंद (सनी) सनोवनून्

२)* मी गारुड शिकूं शकलो आहे. सम अरंचेय लोलनयतीन् ( सनी ) सनोवनन् । लोलनयंज (सनी) सनोवनन्

३)* मी गारुड शिकूं शकलो होतो. सम अरंचेय लोलनयतीन (सनी) सनोवनीन् । लोलनयंज (सनी) सनोवनीन्

४)* मी गारुड शिकूं शकलो असेन. सम अरंचेय लोलनयतान (सनी) सनोवनून । लोलनयंज (सनी) सनोवनून

प्रयोजक शक्य भेदः—

शिकवूं शकतो-लोलनवतयतन्. शिकवूं शकत असतो-लोलनवतयतवत्

प्रयोजक शक्य विध्यर्थ भेदः—

शिकवूं शकावे-लोलनवतयतेत्. शिकवूं शकत असावे-लोलनवतयतवेत

मी गारुड शिकावे-समन् अरंचेय लोलनेत अरंचेयकी लोलनेतान्
आम्ही ,, ,, समक्यन् ,, ,, ,, ,,
तूं ,, ,, स्वन् ,, ,, ,, ,,
तुम्ही ,, ,, सुक्यन ,, ,, ,, ,, विध्यर्थ
त्याने ,, ,, सन् ,, ,, ,, ,,
त्यांनी ,, ,, सक्यन ,, ,, ,, ,,

मी त्याला गारुड शिकवावे-समन् सद अरंचेय लोलनवेतेत्
आम्ही ,, ,, ,, समक्यन् ,, ,, ,,
तूं ,, ,, ,, स्वन् ,, ,, ,,
तुम्ही ,, ,, ,, सुक्यन् ,, ,, ,,

त्याने त्याला गारुड शिकवावें–सन् सद अरंचेय लोलनवतेत्
त्यांनी ,, ,, ,, सक्यन ,, ,, ,,
अरंचेयकी लोलनवतेतान् – प्रयोजक विध्यर्थ

| | |
|---|---|
| मी शिकत असावे – समन् अरंचेय लोलनवेत | अरंचेयकी रीती |
| आम्ही ,, ,, समक्यन् ,, ,, | लोलनवतेतान विध्यर्थ |

मी शिकवीत असावे–समन् अरंचेय लोलनवतवेत्
आम्ही ,, ,, –समक्यन् ,, ,,

| | |
|---|---|
| अरंचेयकी | प्रयोजक |
| लोलनवतवेतान् | रितीविध्यर्थ |

मी त्याला गारुड शिकावितो–सम सद अरंचेय लोलनवतन्
,, ,, ,, शिकविले- ,, ,, ,, लोलनवतीन्
,, ,, ,, शिकाविन- ,, ,, ,, लोलनवतून
,, ,, ,, शिकवित असतो- ,, ,, ,, लोलनवतवन्–प्रयोजक भेद
,, ,, ,, ,, असे- ,, ,, ,, लोलनवतवीन्
,, ,, ,, ,, असेन- ,, ,, ,, लोलनवतवून्
,, ,, ,, ,, आहे- ,, ,, ,, लोलनवतो (सनी)सनोवन्
,, ,, ,, ,, होतो- ,, ,, ,, लोलनवतो सनोवनीन्
,, ,, ,, ,, असेन- ,, ,, ,, ,, ,, सनोवनून्
,, ,, ,, शिकाविले आहे- ,, ,, ,, लोलनवतीन् (सनी) सनोवनन्
,, ,, ,, ,, होते- ,, ,, ,, ,, सनोवनीन्
,, ,, ,, ,, असेल- ,, ,, ,, ,, सनोवनून्

× २ (लोलनवंज) × ३ (लोलनवंज) × ४ (लोलनवंज)

मी त्याला गारुड शिकविणार आहे- सम सद अरंचेय लोलनवतून्(सनी)सनोवनन्
,, ,, ,, ,, होतो- ,, ,, ,, ,, ,, सनोवनीन्
,, ,, ,, ,, असेन- ,, ,, ,, ,, ,, सनोवनून्

लोलन वंद, लोलन वंद, लोलन वंद

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | समन् सद अरंचेय लोलनवतत् | | | | |
| २ | ,, ,, ,, | लोलनवतीत (सनी) | | सनोवनत् | |
| ३ | ,, ,, ,, | ,, | | सनोवर्नात् | |
| ४ | ,, ,, ,, | ,, | | सनोवनूत | |

मराठी प्रमाणें रूपें बनविली आहेत. संस्कृत प्रमाणें केल्यास कर्मणीचा सर्वकाळीं उपयोग होईल व स्वतंत्र प्रत्यय लागेल.

श्री ज्ञानेश्वरार्पणमस्तु

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलींसमर्थ ॥

# प्रश्नोत्तरें

श्री गणेशायनमः

**ओवीः-** ॐ नमः श्रीज्ञानेश्वरा । निर्गुणानिजार्थवृताकारा ॥ ममशरीरीं ठेवोनि कृपा करा ॥ प्रश्नोत्तरा वदवावे ॥१॥

**प्रश्नः-** मनुष्यानें काय केले पाहिजे ?

**उत्तरः-** स्वतःची उन्नति.

प्र० कशाच्या योगाने ?

उ० धर्मच एक उन्नतीचे साधन आहे.

प्र० धर्माचे लक्षण सांगा ?

उ० निती; गुप्तविद्या, व तत्वविद्या इतके अंग मिळून धर्म होतों.

प्र० नीति म्हणजे काय ?

उ० आपल्याला दुःख नको तसें सर्वांनांच नको म्हणून ज्या रितीनें सर्वांना दुःख हटवितां येईल अशा आचरणाला नीति म्हणतात. परिणामी ज्यात दुःख उत्पन्न होत नाही असे आचरणही नीतींत मोडते. ही नीति इहलोका पुरती असली म्हणजे शरीर आहे तो पर्यंतच दुःख. परिणामी गोष्ट न व्हावी इतकाच त्या नीतीचा जेव्हां संकोच होतो तेव्हां तिच्यातून सामाजिक नीति, राजनीति वगैरे उत्पन्न होतात आणि बहूपयोगिता वगैरे वादही इहलोकींच्या नीतींतच उपस्थित होतात. मेल्यावर आपल्याला दुःख होऊं नये इतका वरील परिणाम शद्बाचा अर्थ केला कीं मग या लोकाला व परलोकाला उपयोगी पडणारे आचरण करावें लागते. या

आचरणालाच धर्म म्हटले आहे. पुनर्जन्म आणि शरीररहित सुख हे दोन्ही परलोक शद्बाचे अर्थ समजावेत

प्र० धर्माला आधार काय ?

उ० ईश्वरानें व महात्म्यांनी सांगितलेली वचनें.

प्र० ती कोणती ?

उ० श्रुति व स्मृति.

प्र० ईश्वर कोण ?

उ० जी शक्ती मनुष्य क्रियेला व जड पदार्थाला अपेक्षीत आहे. तिचे चालक चैतन्य.

प्र० ईश्वर कसा आहे ?

उ० सर्वज्ञ, सर्वकर्ता व सत्यसंकल्प.

प्र० सर्वज्ञ म्हणजे ?

उ० तिन्ही काळाचे ज्ञान ज्याला वर्तमान असते तो.

प्र० सर्वकर्ता म्हणजे ?

उ० देश, काल, वस्तु ज्याला उत्पन्न करतां येतात तो.

प्र० सत्यसंकल्प म्हणजे ?

उ० इतर सामग्री न लागता ज्याच्या इच्छेनेंच सर्व कांहीं होते.

प्र० महात्म्ये म्हणजे कोण ?

उ० परमेश्वराच्या उपदेशानें सदाचरण करून परमेश्वर कोटींत गेलेले.

प्र० परमेश्वर कोटी म्हणजे काय ?

उ० ज्या स्थितींत संकल्पज्ञान, कर्तृता व भोग ईश्वरावांचून दुसऱ्या कोणत्याच पदार्थावर अवलंबून नसतात ती स्थिती. भोग म्हणजे सुख प्राप्ती.

प्र० ईश्वर कोटींत कसें जाता येतें ?

उ० गुप्त विद्येच्या योगानं.

प्र० गुप्तविद्या म्हणजे काय ?

उ० आपल्या इच्छेनें शरीराबाहेर निघून शरीर न घेतां राहतां येऊन शुद्ध सत्वरूप जिच्या योगानें होतां येते ती.

प्र० तिचे दुसरे कांहीं नांव आहे काय ?

उ० होय तिला योग म्हणतात.

[ अपूर्ण ]

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

## श्री भाऊसाहेब खापरे यांस पाठविलेले

# पत्र

तीर्थस्वरूप व चिरंजीव रा. रा. खापरे यांस सा. न. व आशीर्वाद. आपले कृपापत्र पावलें. वाचून समाधानापेक्षां खेदच अधिक उत्पन्न झाला; म्हणून मी कांहीं तरी लिहून पाठवीत आहे. हे वाचून मनाची स्थिति कळवावी .

आपलें पत्र वाचून आपल्या मनाविषयीं जो माझा समज झाला आहे तोच माझ्या खेदाचें कारण आहे. आपलें पत्र वाचून आपली Suicidal tendency वाढत चालली असावी असें मला वाटते. पण हें खरें असेल तर असें आपण करूं नये, अशी मी जोरानें आज्ञा करतो; कारण माझ्या संप्रदायासंबंधांत आपण पंडित आदि मंडळीवर माझा भरंवसा आहे. आपण भलतेंच केल्यानें माझा विश्वास हिरावून नेल्या सारखे होईल. आपल्या चित्ताविषयीं मी शंका घेतली असेल. पण त्या शंकेनें प्रेम कमी होण्याचें कारण नाहीं. कारण व्युत्थानवृत्तींत माझ्या-विषयींहि मला शंका येतात. म्हणून आत्मप्रेम कमी झालें आहे काय ? व्युत्थानवृत्ति जो जो आहे त्याविषयीं शंका येणें उचित आहे असें मी समजतो. तथापि तुमच्याविषयीं खरोखर प्रबल शंका आल्या नाहींत. आपण माझ्या विरुद्ध असाल अशी शंका तर कधींच आली नाहीं. परंतु शंका आली ती एवढीच कीं माझ्या करण्यांतील उद्देश आपणांस समजत नाहींत. दुसरें माझें अनुमान असें झालें कीं आपल्या मनोवृत्तीस मी पापी आहे असें

वाटत असावें. कारण या बाबतीचा विचार केल्यास आपण दोघेहि समदुःखी आहोत. आपल्याला स्त्रीच्या अभावीं कामवृत्ति उत्पन्न होत असतील तर त्या मलाहि उत्पन्न होतात. Ford साहेबानें आपल्या Sexual Question मध्यें असें म्हटले आहे कीं ज्याला स्वप्नामध्यें शुक्रपात होतो किंवा जो स्त्री नसल्यामुळें Onanist (ओन्यानिष्ट) असतो त्याला मी पापी आहे असें वाटत असते व त्यामुळें ते कधीं कधीं आत्मघातहि करून घेतात. आतां आपण Onanist असाल असा संशयहि नाहीं. व मी तो कधीं घेणारहि नाहीं. बाकीच्या स्थितींत माझा व आपला सारखेपणा आहे. उत्तर—रामचरित्र समदुःखी म्हणूनच आपण दोघांनीं एकान्तीं वाचलें होतें. तेव्हां आपण जर पापी असले तर त्या दुर्व्यांत मी हि एक आहे यांत कांहीं संशय नाहीं. आतां पत्नीच्या बाबतींत जो आपणाला झटका बसला आहे तसा मला नसला तरी आईच्या बाबतींत आहे यांत शंका नाहीं. उमरावतींत एका स्त्रीनें माझ्याशी विपरीत वर्तन केलें ते आपणाला ठाऊक आहेच. तेव्हां "समानशीले व्यसनेषुसख्यम्" या न्यायाने माझ्यापुढें आपणाला लाजण्याचे हें कांहीं मोठेसे कारण नव्हे. अमुकानें पाप होते व अमुक कर्मानें तें दूर होतें या दोनहि गोष्टी अदृष्ट असल्यामुळें याचें प्रकाशक शास्त्र आहे. परंतु कित्येकांचा पापावर विश्वास असतो व पाप दूर करणाऱ्या शास्त्रावर नसतो, अशी मी पुष्कळांची मनोवृत्ति पाहिली आहे. याचें कारण दुर्दैवापेक्षां दुर्बुद्धिच अधिक असते असें मला वाटते. आम्ही जन्माचे पापी तर आमचे भगवन्नामानें काय होणार असें व्यंकटरावचेहि एके काळीं उद्‌गार होते. शिव शिव! जे शास्त्र पाप होते म्हणते त्यावर विश्वास ठेवावयाचा व जे शास्त्र पाप दूर होते म्हणते त्यावर विश्वास ठेवावयाचा नाहीं. हें वेड नव्हे तर काय? एखाद्या गोष्टीवर कारणावांचून विश्वास न ठेवणें हें वेड नव्हे काय? शास्त्रांत भगवन्नामावर किंवा गंगेवर विश्वास न ठेवणारा सर्व पाप्यामध्यें श्रेष्ठ सांगितला आहे.

तेव्हां यावर विश्वास टेवणें आपल्या हातीं असून न ठेवून दुसरें पाप कां करून घ्यावें? आतां यावर विश्वास बसत नसेल तर पापशास्त्रांवर तरी विश्वास कां बसावा? मी आपल्या(स) पापी म्हणणारा मनुष्य Christian व मुसलमान धर्मांतचा चांगला गणला गेला आहे. हिंदु धर्मांत नाहीं. आमच्या पापापुढें लहानसें प्रायश्चित काय करणार असेंहि पुष्कळांना वाटत असतें. पण अशानें बिचाऱ्या प्रायश्चित शास्त्रालाच वैय्यर्थ्य येईल. कारण प्रायश्चित करणाऱ्याहून शेतकींचे काम करणारे अधिक श्रम करणारे असतात. मरण हेंच जर सर्व पापांचे प्रायश्चित असते, तर आत्महत्त्या नांवाचा जो शास्त्रांत दोष सांगितला आहे, तो सांगितला नसता. आपण स्वतःला "नीच", "विषयी," असें पत्रांत लिहिलें आहे व तसें कदाचित् आपण असालहि. पण आपण माझ्यापेक्षा अधिक दूषित आहा काय असें मी आपणास विचारतो. कारण "प्रभाते स्नातीनां नृपति रमणीनां कुचतटी। गतो यावन्मातर्मिलतितव तोयैर्मृगमदः॥ मृगास्तावद्वैमानिक शतसहस्त्रैः परवृताः। विशंति स्वच्छंदं विमलवपुषो नंदनवनम्॥ एवढी जी समर्थ तिच्या अंकावर आपण विराजमान आहांत. मी मात्र एका खेडेगावांत पडलेलो आहे. आपल्याला विश्वेश्वराचे दर्शन नित्य आहे. तेव्हां असें असूनहि आपण पापी राहिला आहा काय? आणि इतक्या वरहि आपण स्वतःला पापी वाटत असल्यास त्याचें निराकरण कोण करणार? आपल्यास पापी म्हणवून घेणारा मनुष्य मोठा चांगलाहि असेल परंतु आपल्यास क्षमा करणारा कोणीतरी आहे असा भरंवसा जर त्याजवळ नसेल तर तो नास्तिक नव्हे काय? आतां वारंवार पाप करून वारंवार क्षमा मागणें म्हणजे " हम तो तुम्हारेहि है" या कोटींत जाण्यासारखे आहे. तथापि क्षमेचा काळ वाढवीत जाऊन पापाचा काळ कमी करणें हाच याला उत्तम उपाय आहे असा करणारा प्रथम प्रत्यक्ष केल्यावर क्षमा मागतो. पुढें मनांत आल्यावर देखील मागतो यांतच यमनियमाच्या अभ्यासाचें बीज आहे. "रात्रंदिवस आम्हां युद्धाचा

प्रसंग" अंतर्बाह्य जग आणि मन" असें तुकाराम महाराजांनीं सुद्धां म्हटलें आहे. मन चाकर करून ठेविल्याशिवाय तें आपलें ऐकत नाहीं. म्हणून रडत बसण्यांत काय अर्थ आहे ? मुलें रडत बसतात; परंतु त्यांचा देखील आपल्या आईवर भरंवसा असतो व रडण्याचा ते बलानें प्रयत्न करीत असतात. "बालानां रोदनं बलम्" असें म्हटलें आहे. ज्याच्या मनांत जोम नाहीं अशा मुळमुळ रडणाऱ्याचीं आंसु पुसणारे जगांत कोणी नाहीं. अपय्या दीक्षिताचा व जगन्नाथ पंडिताचा प्रत्यक्ष विरोध इतिहासप्रसिद्ध आहे. लवंगीमुळें जगन्नाथ पंडितास बहिष्कार घालण्यास अपय्या दीक्षित पुढें होते; व चित्रमीमांसा खण्डनांत "अपय्या दिक्षितस्य लंब कर्णस्य" इत्यादि उद्गार जगन्नाथ पंडितानें दीक्षिताविषयीं द्वेष मूलक काढलेले आहेत. परंतु लवंगीला घेऊन एकवेळ जगन्नाथ पंडित गंगेच्या कांठावर उघड्या मैदानांत बेशरम निजले असतां सूर्योदयानंतर दीक्षितांनीं तेथें तसेंच पाहिले तेव्हां "किं निःशंकं शेसे शेषे वयसः समागतो मृत्युः" असें वाक्य उच्चारलें. वाक्य ऐकून पंडितानें तोंड उघडून पाहिल्यावर दीक्षित पुनः म्हणाले "अथवा सुखं शयीथाः निकटे जागर्ति जान्हवी जननी" दीक्षित हे पंडिताचे शत्रु होते तरी पण त्या शत्रुत्वाला आपला गंगेवरील विश्वास हिरावून नेऊं दिला काय? इतरत्र केलेलें पाप गंगेमध्यें नाश पावते व गंगेमध्यें केलेलें पाप गंगेमध्येंच नाश पावते; असें शास्त्र आहे. आतां दुसरें एक वाक्य याच्या विरुद्ध आहे खरें. परंतु तें विस्तृत असल्यामुळें येथें त्याचा विचार करीत नाहीं. सुरतरुमध्यें अग्निर्णयांत केला जाईल. बरें मी पापी आहे असें समजण्यांत तरी तुमची सुधारणा काय होणार? पुढें जो मजर धरला नाहीं तर तुम्ही पापी जसेच्या तसेंच राहणार व मी पापी आहे या समजुतीवर तुम्हांला दुसऱ्याला उपदेशहि करतां येणार नाहीं. म्हणून पुढील वाट न चालतां आपल्यास पापी मानून बसणें शहाणपणास शोभत नाहीं. विश्वामित्रांना

भूक लागल्यामुळें कुत्र्याचें मांस खाण्याकरितां गेले. त्यांना एका चांडालानें म्हटलें कीं आपल्याला हें मांस भक्ष्य नाहीं. तेव्हां त्यांनीं मला हें खावूं तर दे. मग मी आपल्या तपानें हें पाप भस्म करीन असें त्याला खणखणीत उत्तर दिले भगवत्स्मृति काय म्हणते इकडे लक्ष्य द्या.

" कर्मणा येन केनापि मृदुना दारुणेन वा उद्धरेद्दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् " हेंच माझ्या वर्तनांतील सूत्र आहे. येथें संक्षेप लिहून तुम्हाला फाजील शंका घेण्याला अवकाश देत नाहीं. शंका निराकरणच पाहिजे असल्यास मनुस्मृति अ. २ श्लो. १४ पहावा. विष्णुपंत जेव्हां आळंदीस गेले तेव्हां बापूने असाच एक आक्षेप मजवर केला होता, कीं तो आळंदीस अभिषेक करण्याला अधिकारी नाहीं कदाचित् तसें असेलहि. परंतु तातांच्या पापनिराकरण सामर्थ्यावर मी अविश्वास करावा काय ? आतां तो वाईट असेल तर नुसते दूर केले म्हणजे झाले. द्वेष कां करावा असें मी बापुला म्हटलें. पण ते त्याला पटलें नाहीं. तातांच्या पाप निराकरण सामर्थ्यावर विश्वास न ठेवणें म्हणजे मी अधिक पाप करीत आहे असें मला वाटते.

तिसरें माझें अनुमान असें झालें कीं बापु प्रमाणेंच मी आपल्याला समजत असेल. पण तसें मुळींच नाहीं. बापुविषयीं तरी कांहीं माझा द्वेष नाहीं. मला काय करावयाचे आहे. शिवाय मला संस्कृत येत नाहीं हें मी तोंडानेंच म्हणत असून आपण कांहीं मला वाचून दाखवीत असतां हेहि सर्वांना माहित आहे. मग तेंच लोकांजवळ सांगून क्षणोक्षणीं माझा तेजोभंग करण्यांत कोणता विकार समजावा. बापुचें म्हणणें असें आहे कीं महाराज म्हणतात तुम्हांला कांहीं समजलें नाहीं तर त्यांचे पाशीं कां राहा ? जितके आम्हांला समजले तितके आम्हीहि वाचून मिळविले असते. पण हें म्हणणें थोडासा मोठा झाल्यावर वडिलांनीं माझ्यासाठीं काय केले ? मींहि मिळवून खाण्याला समर्थ आहे, असें म्हणण्यासारखे हास्यास्पद

आहे. कारण आतांपर्यंत वडिलांनी पोसलें नसतें तर अशी बोलण्याची शक्तिहि आली नसती. तेव्हां अशा माणसांच्या संबंधाची मला इच्छा नाहीं. पण तसें आपणाला समजत नाहीं हें पक्के लक्षांत असूं द्या. स्वतः जे बोलणें ज्याच्यानें आचरत नाहीं त्याचें मन त्याचें त्याच्यानें काय आचरेल. तेव्हां त्यांची सुधारणा पुढें कशी व्हावयाची याबद्दल माझा निश्चय होऊन चुकला आहे. त्यांना असें वाटते कीं आम्ही पुढच्या जन्मांत तरी महाराजांना मिळवूं पण या जन्मांतच जर आपण आपल्याला प्रतिबंध करून घेत आहोंत तर पुढच्या जन्मांत प्रेमाचा तीव्र संवेग कसा होईल हें त्यांना समजत नाहीं. विकारांच्या झपाट्यांत कांहीं तरी बकावे या शिवाय दुसरें कांहीं तथ्य असेल असें मला वाटत नाहीं. त्यांच्या विकारामुळेंच माझेहि वर्तन विकारी होणें न्यायाला धरून आहे. माझ्या प्रकृतीची खबर दाखविणें हें मात्र मी अत्यंत गैर समजतो. कारण प्रकृतीची काळजी असणाऱ्याला खबर पुढें करून लोकांना फसविण्यांत काय अर्थ आहे?

चवथें माझें अनुमान असें होतें कीं आपलें मन फार दुर्बल असावे. व असें साधारण मनुष्याला असणें कांहीं आश्चर्य नाहीं. साधारण मनुष्याला शंका घेण्याची हौस वाटत असते व विशिष्ट माणसाला उत्तरें देण्याची हौस वाटत असते. शंका घेणें हें जरी तीव्र बुद्धीचे काम समजल्या जाते तथापि एखाद्या ठिकाणीं स्थिर न राहतां येणेंहि तिची कमकुवत नव्हे काय? एखादा इकडे तिकडे फिरणारा मनुष्य जरी शक्तिमान समजल्या जात असला तरी त्याला घटकाभर एके ठिकाणीं तरी स्थिर न राहतां आले तरी तो वाताचा झटका आहे असें कोण म्हणणार नाहीं. तेव्हां असें दुर्बल मन करून घेणें सूज्ञास शोभत नाहीं.

पांचवें अनुमान माझें असें निघालें. आपण जरी Greek, German Philosophy चा उलथा केला आहे. तरी Hume च्या Philosophy नें आपल्या आपल्या मनावर पगडा बसविला असावा.

चार्वाकानें आपल्याकडे देहात्मवाद उभारला आहे. पण खरें पाहिलें असतां साधारण कोण मनुष्य देहात्मवादी नाहीं. चार्वाकाने तो बोलून दाखविलें, इतकेंच व म्हणूनच त्यांना लोकायत असें म्हणत असत. खाऊन पिऊन तर घ्या, मेल्यावर कोण पाहतो काय होतें ते असें उद्गार बायकाहि आपसांत काढत असतात. हीच गोष्ट English Philosophy सहि लागूं आहे. बहुतेक अधीर लोकांच्या मनावर Hume च्या Philosophy चाच पगडा असतो. Hume चे म्हणणें कीं पुढें अमुक निश्चयानें होईल असें सांगता येत नाहीं. असें म्हणणें जबाबदारीचे आहे कारण त्यांच्या विरुद्ध दुसरी गोष्ट होणारच नाहीं असें कांहीं आपल्याला सांगता येत नाहीं. मागून दिसत आलेल्या गोष्टी पुढें तशाच चालतील हें अनुमान करणें चुकीचें होय. पण यांत Hume नें अधिक काय सांगितलें. जीवाची शक्ति इतकी अल्प आहे हें कोणाला ठाऊक नाहीं? तथापि कांहीं त्रिकालाबाधित नियमाविषयीं Hume काय म्हणतो. दोन आणि दोन मिळून कदाचित् पांचहि होतील असें Hume चें म्हणणें आहे काय? व ते तुम्हाला पटतें काय? आतां Hume कदाचित् म्हणेल कीं दोन व दोन मिळून चार होतात हें आपल्या बुद्धीनेच ग्रहण केलें आहे. तर ह्या म्हणण्याचा कोणाला हांसा येणार नाहीं? हें काय एकाच्या बुद्धीनें गृहीत केलें आहे कीं सर्वांच्या बुद्धीनें गृहीत केलें आहे? प्रथमपक्षीं एक झक् मारतो म्हणून सर्वांनीच तसें कां करावें? दुसऱ्याला दोन आणि दोन मिळून पांच होतात असें म्हणण्याला कोणती हरकत होती? द्वितीय पक्षीं सर्व शब्दानें त्रैकालिक सत्य कबूल केल्यासारखेंच आहे. कार्याविषयीं भविष्य बिनचूक करणें ही सर्वज्ञता परमेश्वरासच आहे. शिवाय आपल्या बुद्धीवरच आपण विश्वास ठेविल्यामुळें Hume च्या हातूनही चूक झाली आहे. कित्येक प्राण्यांना पाणी कधीं येईल हें शास्त्रवेत्त्यापेक्षां अधिक कळत असते. गिलेडा वगैरे

वानरांना अनेक बिनचूक गोष्टी कळतात. यांच्या अनुभवाचा फायदा घेण्याइतकीहि Hume ची बुद्धि विस्तृत नव्हती. बुद्धीचा अभिमान असणाऱ्यांच्या हातून अशा चुका होणें कांहीं आश्चर्य नव्हे. शिवाय सर्वच संशय असेल तर Hume च्या म्हणण्याचा तरी अर्थ आम्हाला बरोबर कां समजावा ? अमुक गोष्ट अशा प्रकारची आहे हें म्हणण्यांत जर सर्वज्ञता लागत असेल तर अमुक गोष्ट अशा प्रकारची असणेंच शक्य नाहीं हें म्हणण्याला सर्वज्ञता कां नको. तात्पर्य Hume च्या Philosophy ला तुमच्या सारख्यानें जबरदस्तीनें मनांतून हुसकून लाविले पाहिजे.

सहावें माझे अनुमान असें निघालें कीं दैवयत्नवादांत अजून आपलें मन गोंधळत असावें. पण आपणांकडील हा दैववाद व पाश्चात्य fatalism दोन्ही एक नसून अगदीं निरनिराळे आहेत. आपल्याकडील दैव म्हणजे पूर्व जन्मात्रा आपणच केलेला प्रयत्न होय. व पाश्चात्य fatalism म्हणजे आपल्या जीविताची ईश्वरानें जशा प्रकारची किल्ली फिरविली असेल तसें वागणें भाग पडतें असें सांगतो. दैववाद व यत्नवाद आस्तिक व नास्तिक या दोघांतहि आहे. आस्तिकांचा दैववाद म्हणजे पूर्व जन्मांचें केलेले कर्म आपण भोगले पाहिजे असा असतो. आणि आस्तिकांचा यत्नवाद आपलें शुभकर्म व्यर्थ जाणार नाहीं असा असतो. नास्तिकांमध्यें दैववाद वास्तविक नाहीं. परंतु पाश्चात्य ज्याला fatalism म्हणतात तसा नास्तिकांचा असतो. जड अशा कालाच्या किंवा Surroundings म्हणजे परिस्थितीच्या अधीन चेतनाला करून घेणें हा नास्तिकांचा Fatalism होय. त्यामुळें त्यांच्या सर्व कांहीं नीतीच्या कल्पना दबून जातात. आतां नास्तिकांमध्यें Freesm म्हणजे प्रयत्नवादहि आहे. पण तो इतका भयंकर आहे कीं त्याच्याहि योगाने नीति नाहींशी होते. पूर्वीच्या जन्माचें कांहीच नसल्यामुळें सर्व कांहीं याच जन्मांत मिळाले पाहिजे व आम्ही ते मिळवितो. पुढे मेल्यावर या प्रयत्नाचें सार्थक होईल

असें कां मानावे ? हाच नास्तिकांचा प्रयत्नवाद " वळी तो कान पिळी " ही म्हण या वादामुळेंच निघाली आहे. हा उतावीळपणा आहे. शुद्ध वेड आहे. अशा प्रकारचा प्रयत्नवाद आस्तिकांनाहि कबूल आहे पण त्यासाठी सत्यसंकल्प झाले पाहिजे. पण जितका फळाविषयीं उतावेळपणा तितका साधनांविषयीं शिथीलपणा असतो. आपल्याच अशुभ कर्मानें जर आपण पतन पावत आहो तर त्या करितां रडत बसण्यांत काय अर्थ आहे ? आपले हात पाय आपण हालवूं नयेत काय ? रडत बसण्यानें काय आपलें पतन चुकणार आहे ? शिवाय पूर्व जन्मींच्या अशुभ कर्माचें फळ कां बरें मिळणार नाहीं ? आतां पाश्चात्य आस्तिकांत जो Fatalism आहे त्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. कारण प्रत्येक मनुष्य जर ईश्वर परतंत्र आहे तर Bible मध्यें ईश्वर नको म्हणत असतां Adam नें ज्ञानाची फळें का खाल्लीं बरें. जीव स्वतंत्र नसेल तर अमुक करावे व अमुक करूं नये अशा प्रकारचा विधिनिषेधच संभवत नाहीं. आपला दैववाद याहून थोडासा निराळा आहे. आपण अत्यंत परतंत्र आहो असा आपल्या दैववादांत नेहमी अभिप्राय असतो, पण असें जरी घेऊन चाललें तरी आपल्याला किती गोष्टी गृहीत धराव्या लागतात बरें ? तुम्ही जर अत्यंत परतंत्र आहां तर तुम्हांला दुसऱ्या कोणाचे तरी स्वातंत्र्य कबूलच केलें पाहिजे. शिवाय अत्यंत परतंत्र अशी कोणतीच वस्तु राहूं शकत नाहीं. अर्ध स्वतंत्र व अर्ध परतंत्र अशाच जगांतील सर्व वस्तु आहेत. अर्थात् परतंत्र वस्तु नष्टच झाली पाहिजे. जडाला देखील हा नियम लागूं आहे. ज्या काचांतून सर्व किरणें पार निघून जातात तो कांच पृथक आपल्याला दिसत नाहीं. तेव्हां दिसणाऱ्या कांचांत प्रकाशाला अडथळा करण्याची थोडीशी शक्ति आहे असें मानले पाहिजे. दगड जड आहे म्हणून आपण त्याला उचलतो. परंतु त्या

उचलण्यामध्यें तोहि आपली शक्ति घेतो. विजेसारख्या मोठ्या शक्तीला देखील Resistance करणारे पदार्थ आहेत; म्हणून तिचा वेग आपल्याला मोजतां येतो. एखाद्या पदार्थाचा विवक्षित आकार जेव्हां आपण पाहतो तेव्हां त्या पदार्थाचे स्वातंत्र्य व पारतंत्र्य आपल्या अनुभवास येत नाहीं काय ? पदार्थ अत्यंत परतंत्र असेल तर स्नेहाकर्षणामुळे Cohesive force एका Atom मध्यें सामावल्या गेला पाहिजे. बरे तो अत्यंत स्वतंत्र असेल तर Cohesive force न राहिल्यामुळें त्याचा चुराडा झाला पाहिजे. तेव्हां ईश्वरावांचून सर्व अल्पपदार्थास अर्ध स्वातंत्र्य व अर्ध पारतंत्र्य मानल्या वांचून गत्यांतर नाहीं. हीच गोष्ट तुम्हाआम्हांसहि लागू आहे. जड पदार्थांचें स्वातंत्र्य त्यांच्या आंगच्या शक्तींत व सजीवांचें स्वातंत्र्य त्यांच्या मनांत असते. जर तुम्ही केवळ परतंत्र असाल तर मी अति परतंत्र आहे अशी जाणीव तुम्हाला होईल कशी ? तुमचे अस्तित्व तरी कसें राहील ? बरें तुम्ही अति परतंत्र आहां तर एकाचें ऐकत नाहीं व एकाचें ऐकतां असें कां ? दोन्ही प्रकारचे जर पारतंत्र्यच असेल तर एका पारतंत्र्यांत सुख मानणें व एका पारतंत्र्यांत सुख न मानणें एवढें तरी स्वातंत्र्य आहे किंवा नाहीं ? मी चार्वाकासारखा प्रयत्न उर्फ उतावेळ वादी नाहीं व बौद्धासारखा निराशवादी नाहीं. कोणतेहि कर्म फुकट जात नाहीं. हाच माझा दैवयत्नवाद आहे. आपल्या इच्छेस वाटल्या तशा व्याख्या करून मग माझ्यावर दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तेव्हां जागृत व्हा आणि जितकें तुम्हाला स्वातंत्र असेल तितक्याचा फायदा करून घ्या. आळस सोडा. हातापायानें काम करा. व दैवानें तुमचे हात पाय बांधले तर वाणीनें काम करा. व दैवानें तोंड बांधल्यास मनानें काम करा बरें दैवानें तुमचें मन वेडे केलें, तर तेव्हां देखील तुमचे स्वातंत्र्य दैव नेऊं शकत नाहीं. कारण वेड म्हणजे ज्या स्थितींत जाल ती स्थिति स्वतंत्र वाटते. शिवाय जें चिंतन असेल त्यानींच मनुष्य वेडा होईल.

त्याच्या विरुद्धगोष्टीनें वेडा होत नाहीं. म्हणूनच दैविक शारीरिक आपत्ति असल्यास मानसिक धर्म पूर्ण होतो, असें शास्त्रात सांगितलें आहे. माझें हें पत्र फुरसतीअंतीं नेहमीं वाचीत जावें. शंभर वेळ तरी मनन करावें. झाडें जरी स्वत: लोकांना सावली देतात तरी छत्री धरणाऱ्यांचें पुण्य त्यांना होत नाहीं; म्हणून स्वाभाविक सत्वगुणापेक्षां प्रायत्निक सत्वगुणाची किंमत मनुष्यजन्मांत अधिक आहे. इतकें सुचवून हा दीर्घ लेख श्री ज्ञानेश्वर महाराजांचे चरणीं समर्पण करतो.

ता. १-१२-१९१३

आपला- गुलाबराव

मुक्काम-हरदा

ता. क.-कात्यायनीव्रत काल सुरु झालें आहे. आपण फुरसतीअंतीं अवश्य यावें. पत्राचें उत्तर आळस न करतां द्यावें. व मनाची स्थिति कळवावी. पत्रांत कमी जास्त लिहिलें असल्यास भेटीअंतीं खुलासा होईल. सुरतरु ग्रंथ आपणाला सांगावयाचा आहे. तर आपली फुरसत केव्हां होईल. प्रकृति कळवावी. तेथें चांगला शास्त्रज्ञ पंडित कोणी आहे काय कळवावें.

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# मानसायुर्वेद

## लेखांक १ ला

श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यं सच्चिदानंदविग्रहम्
कारुण्यं कमलाकान्तं वंदे भगवदागदम् ॥

मी आजपर्यंत कोणत्याहि पत्रांत विशेष लेख दिले नाहींत. याचें कारण मी चक्षुहीन असल्यामुळें माझें ज्ञान इकडम तिकडम चार मंडळींनें वाचून दाखविलेल्या ग्रंथावरूनच आहे असें मला वाटणें हें होय. परंतु " शलभ त्याचि नभीं उडतां न भी " या काव्युक्तिप्रमाणें आपलें मत कठिण करून मी पुढील लेख लिहित आहे.

नुकत्याच मनन करीत असलेल्या विषयावर मला कांहीं लेख लिहावयाचे आहेत. म्हणूनच मी आपणास पुनः विनंती करीत आहे. सध्यां मनन करण्याचा माझा विषय आयुर्वेद हा असून त्यासंबंधी हकीकत इकडम तिकडम संपादिलेलें ज्ञान मी या लेखांत लिहिणार आहे.

आमच्या आर्यधर्मांतील मुख्य समजूत अशी आहे कीं व्यवहारास व परमार्थास उपयोगी पडणारे सर्वच ज्ञान परमेश्वरापासून आले आहे. धर्मज्ञान तेवढेंच परमेश्वरापासून येतें अशी इतर देशांतील लोकांप्रमाणें आमची समजूत नाहीं. त्यामुळेंच एखाद्या गोष्टीला शास्त्रीयपणा देण्यामध्यें इतर देशांतील लोकांच्या विचारांत व आमच्या विचारांत सकृद्दर्शनीं भेद होतो असें दिसतें. परंतु त्या भेदाचे पर्यवसान शेवटीं एकच आहे असें दिसून येतें. मनुष्याला पुष्कळ कारणांमुळें येणाऱ्या पुष्कळ अनुभवांची कारणें थोडी असावीत व त्यामुळें होतील तेवढें परिश्रम कमी पडावेत अशी मनाची धांवच व्यवहारिक विषयाला शास्त्रीयत्व आणते. या दृष्टीनें

विचार केला असतां सध्याचें आंग्लवैद्यक ऐतिहासिक असून त्याला शास्त्रीयत्व येण्याकरितां आर्यवैद्यकाचा आश्रय केला पाहिजे, किंवा पुष्कळ वर्षें अव्याहत श्रम तरी केले पाहिजेत असें वाटते. आम्हा लोकांची शास्त्रीयत्व देण्याची पद्धतिहि अशाच प्रकारची आहे. पण कांहींशी उलट आहे. सर्वच गोष्टींचे ज्ञान मूळ एकाच कारणांत भरलें असून समयानुसार व विशिष्टबुद्धयनुसार प्रगट होत असते. म्हणूनच आम्ही त्या ज्ञानाला वेद असें म्हणत असतो. विद्– जाणणें याच धातूपासून वेद हे नांव झालें आहे. तें जाणणेंच अनेक प्रकारानें प्रकट होऊन शास्त्रीयस्वरुपानें व्यक्त होत असतें. म्हणूनच ईश्वरप्रणीत न समजूनहि ऋषिप्रणीत अशा वैद्यशास्त्राला परंपरेनें आम्ही आयुर्वेद असें म्हणत आलो आहो. आमच्या सध्यां तरी उच्च ठरलेल्या वेदान्तांतील अद्वैतवादाप्रमाणें निमित्तउपादान कारण परमेश्वरच ठरला असल्यामुळें प्रत्येकाच्या अंतःकरणांत इष्टस्फूर्ति तोच देत असतो. म्हणूनच थोड्या थोड्या अनुभवानें संचय होत जाणाऱ्या व प्रसंगीं ढासळून पडणाऱ्या ऐतिहासिक गोष्टींना शास्त्रीयत्व देण्याची संवय आम्हांला मुळींपासून लागलेली नाहीं. तात्पर्य, अनेक शतकांपासून बनलेल्या दुःखद परिस्थितींतून देखील एकदम कसें वर यावें हें दाखवून देणाऱ्या एखाद्या विशिष्ट स्फूर्तिलाच आम्ही शास्त्रीयत्व म्हणत आलो आहो. व यामुळेंच आमच्या शास्त्रावरील ग्रंथ समजणें परकीयांस फार कठीण झालें आहे. तें कठिणत्व थोडेसे कमी करून पाश्चात्य वैद्यकाच्या तोडीचें आपलें वैद्यशास्त्र आहे किंवा नाहीं हें पाहणें मी आपलें कर्तव्य समजतो.

रोगाची कारणें भूत भविष्य वर्तमान काळीं ठरविक आहेतच व त्याप्रमाणें औषधिहि निश्चितच आहेत, अशी आयुर्वेदाची पक्की समजूत असून अमुककाळीं अमक्याला अमक्यापासून रोग झाला होता म्हणून तेंच बहुत करून त्या रोगाचें कारण असावें अशी संदिग्ध समजूत पाश्चात्य वैद्यशास्त्राची झाली आहे. त्यामुळेंच एका रोगावर एका कालीं निश्चित ठरलेलीं

औषधें दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं व्यर्थ झाल्याचीं उदाहरणें सांपडतात. एका कारणानें रोग होऊन तो दुसऱ्या कारणानें होतच नाहीं अशी समजूत वैद्यशास्त्राच्या वृद्धीस प्रतिबंधक आहे. हा अनिष्ट प्रसंग कितीहि अंधारांत पडून असला तरी आयुर्वेदाला आलेला नाहीं व पुढे येणारहि नाहीं. कारण आयुर्वेदानें आम्हांला असें सांगणें आहे; बाबानों! रोग म्हणजे कांहीं नसून तुमचे प्रमादच स्थूल दशेला आले म्हणजे रोग ही संज्ञा धारण करितात. तुमचा सावधपणा हेंच तुमचें आरोग्य आहे. पारकीय वैद्यशास्त्रांतील जन्तुवादाचा विचार केला म्हणजे घाटसर्प (Dypthería) या रोगाचे जंतु नेहमीं तोंडांत रहात असतां किंवा सर्व बाजुनेंच रोगाच्या जंतुची उपलब्धि होत असतां सर्वथा सावधपणा टेवणें अशक्य आहे असें वाटूं लागतें. पण आयुर्वेद असें म्हणतो कीं कितीहि विषारी जंतु तुमच्या जवळ येऊं द्या पण तुम्ही खंबीर असला कीं तुमच्यावर त्या विषारी वातावरणाचा मुळींच जोर चालणार नाहीं. आम्हांला खंबीर करण्याकरितांच आयुर्वेदानें स्वतंत्र रसायन हें अंग प्रकट केलें आहे. आयुर्वेदांत मुख्यतः असें सांगितलें आहे कीं मनुष्याचें रोग चार प्रकारचे आहेत. शारीरिक, मानसिक, स्वाभाविक आणि आगंतुक. ज्वर, अतिसार इत्यादि रोग शारीरिक असून काम, क्रोध, इत्यादि मानासिक रोग आहेत. क्षुधा, तृषा, निद्रा, इत्यादि स्वाभाविक रोग असून अभिघातापासून किंवा विषापासून होणारे रोग आगंतुक समजावें. आयुर्वेदाचे सांग अध्ययन केलें असतां असें दिसून येतें कीं सुश्रुताचार्यांनीं सांगितलेलें रोगाचे चार भेद संकर पावून अनेक स्थूल रोगांना उत्पन्न करतात. म्हणजे कोणताहि रोग असो, तो या चार प्रकारापैकीं एखाद्या प्रकारानें उत्पन्न होतो. काम या मानासिक रोगापासून ज्वर हा शारीरिक रोग उत्पन्न होतो. व त्याचप्रमाणें क्षय या शारीरिक रोगाच्या पूर्वरूपांत स्त्रियांची अतिशय इच्छा होते; म्हणून काम हा मानासिक रोग शारीरिक क्षयापासून होतो असें म्हणावें लागते. त्याचप्रमाणें स्वाभाविक रोग

जी भूक ती वाढली असतां शारीरिक भस्मक रोग उत्पन्न होतो. अनेक जंतुपासून उत्पन्न होणारें विष पोटांत गेलें असतां जे रोग उत्पन्न होतात, तसेच किंबहुना तेच रोग विष न जातां शरीरांतच संचय होणाऱ्या आमविषानेंहि उत्पन्न होतात. म्हणून या चारहि रोगांचा परस्पर संकर आहे असें आयुर्वेद शिकवितो. या चारहि प्रकारांमध्यें ज्या तीन सामान्य गोष्टी आढळतात त्यालाच आयुर्वेदांत त्रिदोष म्हणतात. हा त्रिदोषवादच आयुर्वेदांतील मुख्य आहे, अशी साधारणतः सर्व आर्यवैद्य म्हणवून घेणाऱ्याची समजूत झाली आहे परंतु यांत कांहीं विशेष नाहीं. आर्यवैद्यकांत त्रिदोषवाद मुख्य गणलेला नसून मनोविकारवादच मुख्य गणलेला आहे. हें तर्कपद्धतीनें आयुर्वेदाचें अध्ययन केलें असतां ढळढळीत दिसून पडतें. तर्कशास्त्रांतील अन्वयव्यतिरेकदृष्टि घेऊन पाहिल्यास मनोविकारांपासून जशी त्रिदोष उत्पत्ति सांगितलेली आहे तशी त्रिदोषापासून मनोविकाराची उत्पत्ति सांगितलेली दिसत नाहीं. "कामशोकभयाद्वायुः क्रोधात्पित्तत्रयो मताः" असें माधवानें स्पष्ट म्हटलें आहे. पुनः "निदानं पूर्वरूपाणि रूपाण्युपशयस्तथा ॥ संप्राप्तिश्चेति विज्ञानं रोगाणां पंचधा स्मृतम्" ॥४॥ असें माधवानेंच आपल्या निदानग्रंथांत म्हणून ठेविलें आहे. वाग्भटः–रागादि रोगान् सततानुषक्तानशेषकायप्रसृतानशेषान् ॥ औत्सुक्यमोहारतिदाञ्जघान योऽपूर्ववैद्याय नमोऽस्तु तस्मै" या आपल्या अष्टांगहृदयाच्या मंगलाचरणानें मनोविकारच सर्व रोगाचें कारण आहे, असें स्पष्ट कबूल केलें आहे. करितां त्रिदोषानें होणाऱ्या उन्मादादि रोगांत जरी मन विकृत होतें असें सांगितलें आहे, तरी तेथें मानसिक उपचार विशेष करावे असा उपशय सांगितला आहे. त्यावरून केवळ वातादिकांपासून उन्माद होत नसून वातादि दोषाबरोबरच मनहि विकृत होत होत मानसिक चिन्हें मनाच्या विकृतीपासून व शारीरिक चिन्हें दोषाच्या विकृतीपासून होतात असें रोगांचें निदान ठरतें; व हर्षादि मानसिक उपायानें मनाची विकृती

शमली असतां उन्मादाचें कारण जें वातादिदोष ते आपोआपच शमन पावत असल्यामुळेंच या रोगांतहि मनाच्याच योगानें वातादिदोष कुपित होतात असें म्हणावें लागतें. ज्वर प्रकरणांत ज्याला ज्वराची आठवण होते त्याला ती आठवण होऊं देऊं नये असें स्पष्ट म्हटलें आहे. आयुर्वेदांत रसायन हे सर्व रोगशमक असें म्हटलें आहे. वाग्भटानें सर्व रसायनशास्त्रां-मध्यें "सत्यवादिनमक्रोधमध्यात्मप्रवणेंद्रियम् । सद्वृत्त निरतं शान्तं विद्यान्नित्यं रसायनम्" विद्यादि मानसिक सद्वर्तनालाच श्रेष्ठ रसायन गणलें आहे. एखाद्या मनुष्याला सर्प दंश झाला तरी मला कांटा बोचला अशा समजुतीनें तो पुष्कळ दिवस वाचूं शकतो. हें एकनाथ आपल्या अकराव्या स्कंधाच्या तेवीसाव्या अध्यायाच्या श्लोकांवर टीका करतांना म्हणतातः- "एकासी सर्प झोंबला पाठीसी । काय रुतले म्हणे सांगा तियासी । ते म्हणे कांटी लागली होती । ते मी अनायासे उपटली ॥ तो नव्हेचि सर्पा सांशक । यालागीं त्यासी न चढे विख । निजव्यापारीं देख । यथा सुखें वर्तती ॥" सुश्रुतसंहितेवर टीका करतांना डल्हनाचार्यांनींहि शंकाविषाचा स्विकार केला आहे. आणि हल्लींहि तशीं घडलेलीं उदाहरणें मागें कांहीं वर्तमानपत्रांत लिहून आलीं होतीं. याप्रमाणें शारीरिक, मानसिक, व आगन्तुक रोगाचें कारण जसें मन आहे तसें ते स्वाभाविक रोगाचें कारण आहे, हें आयुर्वेदांतील सात्म्यासात्म्यप्रमाण वाचलें असतां स्पष्ट कळतें. सात्म्य म्हणजे एखाद्या गोष्टीची आपणांस संवय लागणें. म्हणजे तरी काय ? मनानें धैर्य धरून शरीराला पुष्टि देत देत विरुद्धप्रकारचें खाणें, पिणें, आपल्या ताब्यांत घेणें हेंच आहे. म्हणून ज्याचें ज्यास सात्म्य असेल तेंच त्याच्या उपयोगाचें आहे. यावरून स्वाभाविक रोगाचें कारण मनच आहे, दुसरें कांहीं नाहीं. आयुर्वेदांत तीन दोष बहुत रोगांचें कारण सांगितलें आहे. सर्व रोगांचें कारण सांगितलें नाहीं. आणि मनोविकृति तर सर्व

रोगाचें कारण सांगितले आहे. आयुर्वेदांत जसें रोगाचे चार भाग केले आहेत तसें पुन: कर्मज, दोषज व उभयज असे तीन भाग केले आहेत. आणि त्या तीन भागाचें वर्णन करतांना दोष कर्माचें ताब्यांत आहेत असें म्हटलें असून कर्माला कारण प्रज्ञापराध आहे असें वृद्धवाग्भटांत भूतोन्मादांत म्हटलें आहे. चरकाचार्यांनीं जनपदोध्वंसनीय नामक तीसऱ्या अध्यायांत हाच ध्वनि दर्शविला आहे. ह्या एकंदर प्रमाणावरून रजस्तम या दोन मानसिक दोषांपासून जी शरीरामध्यें विशेष प्रकारची चळवळ उत्पन्न होते तिचें नांव त्रिदोष व प्रतिकूल असें तिचें व्यक्त होणें याचें नांव रोग अशी आयुर्वेदांतील कारण परंपरा दिसते. व म्हणूनच आयुर्वेदांत चिकित्सेंताहि कांहीं विशेष प्रकार मानला गेला आहे. आयुर्वेदांत औषधाची शारीरिक क्रिया कशी होते या गोष्टीकडे बेतापुरतेंच लक्ष्य देऊन औषधीचा मनावर कसा परिणाम होतो यावर विशेष लक्ष्य दिलें आहे. मनाच्या योगाने हृदयाची क्रिया बंद करणें हें मी स्वतः पाहिले आहे; असें जे. सी. बोस साहेबांनीं आपल्या ग्रंथात ( Comparative Electro Physiology ) या पुस्तकांत म्हणून टोंविले आहे. पाश्चात्य वैद्यकांत औषधांचा शरीरावर कसा परिणाम होतो इतकेंच विशेषेंकरून लक्ष्य दिलें आहे. त्यामुळें आमच्याकडें बरें होणारे कांहीं वात रोग "Nervous Diseases" incurable म्हणून त्यांनी सोडून दिले. पुष्कळशा उन्मादाची मेंदूंत कारणें स्पष्ट सांपडत नाहींत असें क्लस्टन (Cluston) प्रभृत्ति म्हणतात. परंतु तशा उन्मादावरहि एखाद्या विशिष्ट स्थितींत आमचे ब्राम्हीघृत कां लागूं पडतें बरें ? आमच्या ऋषिवर्यांनीं औषधींचा मनोविकृति

नाश करण्यास कसा उपयोग होतो इकडेंच लक्ष्य दिलें आहे हेंच या प्रश्नाचें उत्तर आहे. पाश्चात्य वैद्यांना पुष्कळ औषधाची शारीरिक क्रिया समजली असूनहि रोगनिवर्तक क्रिया अजून समजली नाहीं. पण आयुर्वेदांतील औषधाची तशी गोष्ट नाहीं. त्याच्या ठिकाणीं मनाचे रज, तम नाहींसे करणारे सत्ववर्धक प्रभावसंज्ञक मानसिकगुण राहतात असें ऋषींनीं पूर्वीच सांगून ठेविले आहे. रविवारीं पुष्य नक्षत्रावर आणलेली सहदेवी शेंडीला बांधली असतां ज्वराचा नाश होतो हें प्रभावाचें उदाहरण होय. अशा प्रकारची प्रभावशील औषधि शोधून काढणें केवळ पचेंद्रियानें येणाऱ्या अनुभवाचे काम नसून विशिष्ट ईश्वरी सामर्थ्याचें तें काम आहे, असें म्हणावे लागतें. अशा प्रकारची विशिष्ट शक्ति असणें कांहीं मोठे आश्चर्य नाहीं. मांजराचें व कुत्र्याचें पोट दुखलें असतां ते गवत खातात. मुंगुस हा प्राणि सर्पदंश झाला असतां पृथ्वी हुंगतो व त्यामुळें त्याचें विष उतरतें असें आपण पाहतो. शस्त्रक्रिया एका वानरापासून प्रचारांत आली असें एक ग्रंथकार (प्लीनी) म्हणतो. तेव्हां परमेश्वरी स्फूर्तीनीं त्या त्या लोकांना उपयोगी अशा प्रभावशील औषधि माहात्म्यांनीं सांगून ठेवल्या तर त्यावर अविश्वास करणें असंमजसपणाचें होईल. अशा दिव्य औषधीचा शोध लावण्याचाहि मार्ग आपल्या ग्रंथांतून महर्षिनीं सांगून ठेविला आहे.

सारांश आपल्या आयुर्वेदाचेंच आपण उत्तम प्रकारें अध्ययन करून त्यांत सांगितलेल्या मार्गानें आपण निरोगी बनण्याचा प्रयत्न करणेंच आपलें कर्त्तव्य आहे असें मला वाटतें. आजचा लेख मीं येथेंच पुरा करतो. हे लेख मी आपल्या ज्ञानाचें प्रदर्शन करावे म्हणून लिहित नसून मला आयुर्वेदाच्या अभ्यासाची इच्छा आहे ती हे लेख वाचून कोणीतरी

पूर्ण करावी अशा उद्देशाने लिहित आहे. माझें वर्त्तमानपत्रांत लिहिणें पहिलेंच असल्यामुळें भाषा वगैरे विषयींच्या चुका अनेक माझ्या हातून झाल्या आहेत त्याविषयीं गुणग्राहक व सूज्ञ क्षमा करतील अशी आशा करून हा लेख श्रीज्ञानेश्वरचरणीं समर्पण करतो.

आपला—

गुलाबराव गुंडोजी मोहोड

माधानकर हल्लीं मुक्काम हर्दा.

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# मानसायुर्वेद

## लेखांक २ रा

मागच्या लेखावरून आयुर्वेदानें त्रिदोषांला मनाच्या व रोगाच्या मध्यस्थितींत मानलें आहे हें मी दाखविलें आहे. आजच्याहि लेखांत त्याचाच विचार करावयाचा आहे. सर्व रोगांवर एक औषध निघावें म्हणून पाश्चिमात्य राष्ट्रांत व पौर्वात्य राष्ट्रांत सारखाच प्रयत्न झालेला आहे. पाश्चिमात्य वैद्यशास्त्राच्या अॅलोपॅथी Allopathy, होमिओपॅथी Homeopathy, क्रोमोपॅथी Chromopathy, इलेक्ट्रोपॅथी Electropathy, हैड्रोपॅथी Hydropathy, इत्यादि अनेक शाखा आहेत. या सर्व शाखांचा विचार आर्यवैद्यकांतहि कोणत्या ना कोणत्यातरी दृष्टीनें झालाच आहे. परंतु पाश्चिमात्य वैद्यकांत सर्व रोगांवर एकच पद्धत लागूं पडेल असा प्रयत्न केला आहे. तो आर्यवैद्यकांत केलेला नाहीं. "हेतुव्याधिविपर्यस्त विपर्यस्तार्थकारिणाम्। औषधान्नविहाराणामुपयोगं सुखावहम्" ह्या माधवाच्या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं उपशय म्हणजे चिकित्सा ही चार प्रकारची असूं शकते. औषधें, अन्न किंवा विहार याला चिकित्सा म्हणतात. ती सुखावह अशीच असली पाहिजे म्हणजे तिच्या योगानें मनाला पुष्टि येईल अशी ती असली पाहिजे. तिचे चार प्रकार आहेत. रोगाच्या कारणाच्या विरुद्ध चिकित्सा, प्रत्यक्ष रोगाच्या विरुद्ध चिकित्सा आणि रोगाच्या कारणाच्या विरुद्ध किंवा रोगाच्या विरुद्ध नसतांहि तिचा परिणाम मात्र रोगाच्या विरुद्ध होणें. या चिकित्सेंत विशेषे करून Homeopathy चा विचार झाला आहे

असें वाटतें. परंतु Chromopathy वगैरे सर्व Allopathy तच मोडत असल्यामुळें अॅलोपॅथींचेच ते विशेष प्रकार आहेत Allopathy म्हणजे रोगाच्या विरूद्ध औषध देणें .आणि होमिओपॅथी म्हणजे ज्या कारणानें रोग होतो त्याच कारणानें तो बरा करणें. क्रोमोपॅथींत अमुक एक रंग शरीरामध्ये अधिक झाला असतां विरूद्ध रंगानें त्याचे शमन करण्यास सांगितले आहे. म्हणून ही शाखा अॅलोपॅथींतच मोडते. अलीकडे निघालेले सिरम् थेराप्युटिक्स Serum Therapeutics रोग्याला रोगाच्या कारणाची संवय लावून रोग बरें करण्याची असल्यामुळें त्याचा अंतर्भाव थोडासा होमिओपॅथींतच करता येईल. त्याच प्रमाणें एकानें Bio-chemic System म्हणून काढली आहे. हींत बारा मिठें Twelve Salts सांगितली असून एखादें मीठ कमी जास्त झालें असतां तें समान करण्यानें रोगाची निवृत्ति सांगितली आहे. ही पद्धति आमच्याकडील कांहींशीं लवणरसाचा समयोग करण्यासारखी असल्यामुळें तिचा अंतर्भाव अॅलोपॅथींतच करतां येईल. नुकतीच अमेरिकेंत निघालेली लंघनाची पद्धति Fasting treatment माझ्या वाचनांत आली आहे. परंतु तीहि आम्हा लोकांस नवी नाहीं. "ज्वरादौ लंघनं कुर्यात्" इत्यादि स्पष्ट वचने आमच्या आयुर्वेदांत उपलब्ध आहेत. इतके असूनहि आयुर्वेदांत व पाश्चिमात्य वैद्यशास्त्रांत माझ्या मतानें मोठें अंतर आहे. ते हें कीं पाश्चिमात्य शास्त्रीय प्रयत्न सर्व रोगांवर एक प्रक्रिया काढावी हा आहे, आणि आमच्या आयुर्वेदाचा तसा नाहीं. आयुर्वेदीय निघंटाचे अवलोकन केलें म्हणजे कांहीं औषधें त्रिदोषनाशक आढळतात खरें; परंतु क्रिया करतांना व संशोधन देण्या योग्य दोष वाढले असतां कफावर वमन, पित्तावर विरेचन, वातावर बस्ति इत्यादि भिन्न भिन्न दोषावर भिन्न भिन्न उपाय सांगितले आहेत. आयुर्वेदाचे म्हणणें असें आहे कीं दुष्ट मनोविकार जितके अधिक तितके रोग अधिक. मग त्यावर एकाच प्रकारची क्रिया कशी लागूं पडणार? सर्व रोगांवर जर

एकाच प्रकारची क्रिया लागू करावयाची असेल तर मनाची शुद्धता ही क्रिया मात्र लागू पडेल असें आयुर्वेदाचे स्पष्ट म्हणणे आहे. मनाची शुद्धता आयुर्वेदांत धर्म प्रशंसेकरितां सांगितली नसून ज्वरचिकित्सेंत वाग्भटानें तिला मुख्य गणलें आहे हें या लेखांत पुढें सांगण्यांत येईल. वाग्भटानें "अनुपक्रमणीय" म्हणजे चिकित्सेला अयोग्य अशा असाध्य व्याधीचें लक्षण सांगतांना "औत्सुक्यमोहारतिकृत्" असें म्हटलें आहे. विषयोत्कंठा, कार्याकार्य न समजणें, आणि उठतां, बसतां, निजतां कोठेंहि बरें न वाटणें हे असाध्य व्याधीचे मुख्य लक्षण आहे; असा त्याचा अर्थ आहे. याच वाग्भटाच्या "सर्वांगसुंदरा" नामक टीकेंत अरुणदत्त म्हणतात कीं रागादिक रोग मानसिक असले तरी देहाला व मनाला संताप देणारे असून पशु, पक्षी, मनुष्यें इत्यादिकांच्या शरीरांत ते नेहमीं पसरलेले असतात. आणि ते असाध्यहि आहेत. अशा असाध्य व्याधींचा नाश करणारा वैद्य परमात्माच आहे. "औत्सुक्यमोहारतिकृत्" हें जें असाध्य व्याधीचें लक्षण वाग्भटांनीं दिले आहे तें अर्थवादरूप दिसत नाहीं. म्हणजे या लक्षणाच्या द्वारानें धर्माची स्तुति केलेली नसून खरोखरच तें मुख्य व्याधीचें लक्षण आहे असें वाग्भटांच्या ज्वरचिकित्सेवरून दिसते. ज्वरावर अनेक प्रकारचे उपाय सांगून शेवटीं वाग्भटाचार्य म्हणतातः–" ज्वरकालस्मृतिं चास्यहारिभिर्विषयैर्हरेत् ॥ करुणार्द्रं मनः शुद्धं सर्वज्वरविनाशनम्" अष्टांगहृदय चिकित्सा स्थान अ १ श्लोक १७१ पूर्वार्ध व १७२ उत्तरार्ध.

ज्वर येण्याचे वेळेची रोग्याची आठवण मनोहर विषयांत त्याच्या मनाला गुंतवून नाहींशी करावी. कृपाळू आणि शुद्ध अंतःकरण सर्व ज्वराचे नाशक आहे. याचा भावार्थ असा कीं, ज्याचें प्रथमपासून कृपाळु अंतःकरण आहे त्याला ज्वर येत नाहीं. आणि ज्वराच्या शेवटीं एखाद्याचें अंतःकरण शुद्ध झालें तर ज्वर नष्ट होतो. याचप्रमाणें क्षयचिकित्सा व रसायनअध्यायांतहि मानसिक उपाय वाग्भटांनीं सांगितलें आहेत.

माधवाचार्यांनीं जे पांच प्रकारचे जे रोगाचें ज्ञान सांगितलें आहे त्यांत उपशया-नेंहि रोगाचें ज्ञान करून घेतां येते असा एक प्रकार दाखविला आहे. आतां मानसिक उपायानें रोग जातात आणि रोगाच्या असाध्य दशेंत मानसविकारांचे प्राबल्य हे रोगाचें लक्षण होतें तर विकृत मनाकडेच रोगाचें कारणत्व व वातादि दोषाकडे गौण कारणत्व हा आयुर्वेदाचा सिद्धान्त निश्चित ठरतो. असाध्य व्याधींचा रसायनानें नाश होतो असें सुश्रुताचार्य व टीका-कार डल्लनाचार्य दोघेंहि म्हणतात. वाग्भटाचार्यांनीं आपल्या रसायन अध्यायांत अनेक प्रकारची औषधिरसायनें सांगून शेवटीं " सत्यवादिन मक्रोधमध्यात्मप्रवणेंद्रियम् ॥ सद्वृत्तनिरतं शातं विद्यान्नित्यं रसायनम् " " असें स्पष्ट सांगितलें आहे. सत्पुरुषांच्या संगतीनें रोग जातो अशी आपल्याकडील लोकांची समजूत याच चिकित्सानियमास धरून आहे. तात्पर्यः— सर्व रोगांवर एखादे औषध काढावयाचे असेल तर वाग्भटांच्या मताप्रमाणें शुद्ध अंतःकरण हेच होय. परंतु आम्ही अनेक प्रकारच्या आपल्या वासना व नित्य नित्य नव्या विषयाचें चिंतन वाढवीत जाऊन रोगाचें बहुत्व दिवसानुदिवस वाढविणार आणि मग सर्व रोगांवर एखादे औषध शोधण्याचें मार्गे लागणार हें आमचें करणें स्वतःच्या एका हातानें आग लावून दुसऱ्या हातानें ती मृगजळानें विझवूं पहाण्याइतके हास्यास्पद होणार नाहीं काय? Hysteria मध्येंच बहुतेक सर्व रोगांचा समावेश झाला आहे. Hysteria त ज्या रोगाचा भास होत नाहीं असा रोग क्वचि-तच असें पाश्चिमात्य वैद्य आतां म्हणत आहेत. मला असें निश्चयानें वाटतें कीं प्रत्येक मनुष्याला कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचा Hysteria अवश्य असतो. कोणाला आपल्या बायकोचें वेड तर कोणाला आपल्या मुलाचें वेड याप्रमाणें हें सर्व जगत् वेड्याचें Hospital आहे असें भगवान् रामकृष्ण म्हणत असत हें कांहीं खोटें नाहीं. लंडनमध्यें दर आठवड्यास Hysteria रोगानें ७० वेडे होतात असें मी एका वर्तमान

पत्रांत वाचलें आहे. मायर आपल्या Human Personal ty त असें म्हणतो कीं कांहीं सुखवस्तु स्त्रियांना लहान लहान वस्तुंच्या चोरीचाच रोग लागला आहे. तिकडील बहुतेक स्त्रियांना एखाद्या दिवशीं घालावयास नवा पोषाख किंवा वाचावयास नवें पुस्तक न मिळल्यामुळें त्यांना डोकें दुखण्याचा रोग होतो असें माझ्या ऐकिवांत आहे. अशी स्थिति म्हणजे आमच्या वाग्भटाचार्यांनीं सांगितलेल्या लक्षणांतील अरतिच होय. जेथें धर्माला झुगारून देऊन इहलोकापुरतेंच आपलें जीवित आहे अशा समजुतीनें रागद्वेषात्मक जीवनार्थकलह नित्य चालतो तेथें औत्सुक्य, मोह व अरति हें असाध्य व्याधींचें लक्षण जोरानें वाढत जाऊन अनेक प्रकारच्या विकारास प्रकट करितें. जितके मनोविकार अधिक तितके रोगहि अधिक म्हणूनच

विकारनामा कुशलो न जिह्रीयात्कदाचन ॥
न हि सर्वविकाराणां नामतोऽस्ति ध्रुवा स्थितिः ॥

असें आमच्या आयुर्वेदाचार्यांचें सांगणें आहे. सृष्टीच्या प्रथम कालांत मनुष्याचें मन स्वस्थ असल्यामुळें त्यांची शरीरें बळकट असून रोगांचा प्रादुर्भाव कमी असल्यामुळें आयुष्यहि पुष्कळ होतें. पुढे लोकांच्या खाण्यापिण्याचें व वागण्याचें नानाप्रकार झाल्यामुळें हळु हळु रोगांचा प्रादुर्भाव झाला असें चरकाचार्य निक्षून सांगतात. चरकाचार्यांनीं ज्वर, अतिसार इत्यादि रोगांचा जो इतिहास दिला आहे त्यावरून मनाची विकृतिच प्रथम सर्व रोगांचे कारण आहे असें दिसतें. तेव्हां वासनांच्या वृद्धीमुळें रोगांची अनेक प्रकारची वृद्धि झाल्यास त्याची बारीक सारीक लक्षणें सांगून कपाळपिटी करण्याची आयुर्वेद जबाबदारी घेत नाहीं. आयुर्वेदांत दोन प्रकारची चिकित्सा सांगितली आहे. रोगानुत्पादनीय आणि रोगनिवर्तनीय पैकीं पहिल्या प्रकारची चिकित्सा श्रेष्ठ आहे. आयुर्वेदाचें पुन: असें सांगणें

आहे कीं तुम्ही धर्माचरणादिकानें आपल्या मनानें खंबीर होऊन स्वतः सर्व रोगांचा प्रतिकार करा. धर्म, अर्थ व काम यांचें योग्य प्रकारानें सेवन केल्यास मुलांनो ! रोग तुमच्या वाऱ्यास देखील उभे राहणार नाहींत. रागद्वेषादिक रोगांचें बीज काढलें कीं वातादि दोषहि आपोआप शमन पावलेच समजा. पण अलिकडील पाश्चिमात्य चिकित्सापद्धति ह्या आमच्या पद्धतीच्या अगदीं उलट जात आहे. एखाद्या रोगाच्या कारणाची आपल्याला संवय लावून घेतली म्हणजे किंबहुना एखाद्या रोगाच्या कारणाचें बिढारच आपलें शरीर बनलें म्हणजे जोपर्यंत ती संवय आहे तोपर्यंत तो रोग होत नाहीं. अनेक प्रकारच्या सूक्ष्म जंतूंचा शोध आम्हांस कांहीं नवा नाहीं. आमच्या विष्णुपुराणांत असें म्हटलें आहे कीं"

> अंगुष्ठस्याष्टभागोऽपि न सोऽस्ति मुनिसत्तम ॥
> न सन्ति प्राणिनो यत्र कर्मबंधनिबंधनाः ॥१॥

कर्मांनीं बद्ध झालेल्या जंतुरहित अशी आंगठ्याच्या अष्टभागाइतकी देखील पोकळी सांपडत नाहीं. परंतु ते जंतूच सर्व रोगांचीं कारणें आहेत असें आमचा आयुर्वेद सांगत नाहीं. युरोपियन पॅथॉलॉजींत जरी सर्व रोगांचीं कारणें जंतु आहेत हे अद्यून सिद्ध झाले नाहीं तरी त्या दिशेनें तिकडील पुष्कळ लोकांचा प्रयत्न आहे. आणि तितके तितके रोग स्पर्शजन्य मानल्या जात असून रोग्याविषयींची दया आप्तइष्टांच्या मनांतूनहि काढून टाकल्या जाऊन क्षणोक्षणीं भीति मात्र त्यांच्या मनांत घातल्या जाते. ह्याचा परिणाम असा होतो कीं अनेक लोकांना त्याच रोगाची चिन्हें हिस्टेरियांत दिसूं लागतात. Cholera चे जंतु तादृश पोटांत न जाऊनहि कॉलऱ्याच्या भितीमुळेंच रोग झालेली कांहीं माणसे स्वत: मी पाहिली आहेत. व त्याच प्रमाणें प्रत्यक्ष क्षयाचे जंतु अंगांत असूनहि कांहीं आपल्याकडील मानसिक

प्रयत्नानें मी एखादा दुसरा रोगी कसा बसा तरी सुधरविला आहे. दयार्द्र मन 'सर्व ज्वराचें नाशक आहे असें आमचे वाग्भटाचार्य म्हणत आहेत आणि भय, शोक इत्यादिकांनीं ज्वर येतो असेहि म्हणत आहेत. पण पाश्चिमात्य वैद्यशास्त्राचा परिणाम तर आमच्या मनांतील दया आदिक उच्चधर्म काढून टाकीत असून तुम्ही खंबीर नाहीं, तुम्हांला नित्य भ्याले पाहिजे, ज्यांनीं तुम्हांला लहानाचे मोठे केले अशा आईबापालादेखील रोगीदशेंत तुम्ही दूर झुगारून द्या, असें शिकवीत आहे. तेव्हां शहाण्यांनीं कोणाची कास धरावी या प्रश्नाचा निवाडा मी वाचकांकडेच सोपवितो. आयुर्वेदांत शुद्ध मन हें सर्व रोगाचे औषध आहे हे ऐकून पाश्चात्य हिप्नाटिझमचा पुष्कळ लोकांना भ्रम होण्याचा संभव आहे. पण त्याविषयी सावध राहिले पाहिजे. कारण हिप्नाटिझम आणि आमच्या आयुर्वेदांतील मानसिक उपाय यांत महदंतर आहे. हिप्नाटिझम मध्यें केवळ Concentraion चा आमच्या कडील राजस, तामस मनोवृत्तींत अंतर्भाव होतो. आमची सात्विकएकाग्रता निराळी व हिप्नाटिझम मधलें Concentration निराळें म्हणून हिप्नाटिझर्स लोकांना ताब्यांत घेण्याकरितां जसा पश्चिमेकडे कायदा झाला आहे तसा योगियांना ताब्यांत घेण्यांकरितां आमच्याकडे कायदा केला नव्हता. चित्तांतील विकार दूर न करितां त्याला एकाग्र करणें गढूळ पाणी सांचवून ठेवण्यासारखें आहे. एवढ्या करितां रोगानुत्पादनीय चिकित्सा धर्ममार्गानें मन खंबीर केल्यानेंच होणार आहे, असें आमचा आयुर्वेद म्हणतो. योगवासिष्ठांत असें एक आख्यान आहे कीं दाम, व्याल, कट व भीम, भास, दृढ यांच्या मनांत मरणाचा संकल्प नसल्यामुळें देवांनीं त्यांच्यांशीं अनेक युद्धें केलीं तरी ते मेले नाहींत, म्हणून रोग न होऊं देणें, आमच्या मनाच्या खंबीरपणावरच खरें खरें अवलंबून आहे. कित्येक लोक अज्ञून निश्चित न ठरलेलें हिप्नाटिझम्, थिऑसफी वगैरे वाचून उद्भवलेल्या साथीच्या रोगांशीं दांडगाई

करून मानसचिकित्सेचा आव घालीत असतात. आणि त्यायोगानें शेवटीं ते त्याच रोगानें पछाडल्या जातात. रोगाला केवळ न भिणें किंवा मला रोग होणार नाहीं अशा प्रकारचें ध्यान करणेंच कांहीं रोगाची मानसिक चिकित्सा नव्हे. तर ज्या मनोविकारापासून रोग झाले असतील त्याच्या उत्कटभावरूपमनोवृत्तीनीं त्या विकारांचा नाश केला पाहिजे. वेळेच्या वेळेवर निजलें नाहीं तर डोकें दुखतें. भूक, तहान रोखली असतां थोड्याच वेळांत मळमळ वाटते. कोणी एवढा देखील अपराध केला असतां सहन होत नाहीं. इतकी मनाची दुर्बलता असून, केवळ चार पुस्तकें वाचून रोग आम्हांला होणार नाहीं अशा प्रकारचें ध्यान करून त्यांच्याशीं नुसती दांडगाई केल्यानें रोगापासून बचाव होणें अशक्य आहे. उमरावतींत अंबादास पंचभाई या नांवाचा माझा एक स्नेही होता. त्यानें आपले मनोविकार विशेषेंकरून ताब्यांत न ठेवतां प्लेगशीं तो प्रतिवर्षी दांडगाई करीत असे. प्लेगमध्यें बाहेर न जाण्याचें त्यानें व्रतच घेतले होतें. परंतु शेवटीं तो त्याच रोगानें पछाडला जाऊन मृत्युमुखीं पडला. रोगाचें बीज जें मनाचें दुर्विकार तें कायम ठेऊन मग रोगाला न भिणें हें समंजसपणाचें नाहीं. प्लेगला बळेंकरून न भिणारे लोक प्लेगनें पछाडल्या गेलेले मी पुष्कळ पाहिले आहेत. आणि दयानिष्ठ व भक्तिनिष्ठ लोकांना खरोखर प्लेगच्या रोगाशीं अति संघटन होऊनहि कांहीं झाले नाहीं असेंहि मी पाहिले आहे. किल्ल्याची तटबंदी चांगली नसतां व सैन्याची व्यवस्था उत्तम नसतां प्रबल शत्रुला तोंड देणाऱ्या प्रमाणेंच दुर्मनोविकार कायम ठेवून रोगाशीं दांडगाई करणाऱ्यांची अवस्था होते. म्हणून एकतर योग मार्गानें मन खंबीर केलें पाहिजे, किंवा मनावर उत्तम परिणाम करून देणाऱ्या महौषधींचें तरी सेवन केलें पाहिजे. यालाच रोगानुत्पादनीय चिकित्सा म्हणतात. पाश्चिमात्य वैद्यशास्त्रांतहि ज्याची Vitality strong आहे त्याच्यावर एकाएकीं रोगजंतूंचा परिणाम होत नाहीं असें म्हटलें आहे. परंतु

J. C. Bose नीं Material science जड शास्त्राचा शोध करून जी नवीन पुस्तकें लिहिली आहेत त्यांत त्यांनीं या Vitality चें चांगलें विवेचन करून Will मनाची प्रबल इच्छा हेंच एक मुख्य तत्व आहे, असें ठरावेलें आहे. तेव्हां Vitality म्हणजे मनाची खंबीरता असें म्हणण्यास हरकत नाहीं. या विषयीं बोस साहेबाच्या शेवटीं प्रसिद्ध झालेल्या Comparative Electro Physiology नामक पुस्तकाचा Will संबंधीं Chapter वाचून पहाण्याची शिफारस करतो. या प्रमाणें आयुर्वेदांतील रोगनिवर्तनीय म्हणून जो आयुर्वेदांतील चिकित्सेचा भाग आहे, त्यांतहि मानसिक अंश पुष्कळच आहे. " मंत्रे तीर्थे द्विजे देवे मुहूर्ते भेषजे गुरौ। यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥१॥ असें एका सुभाषितकाराचें म्हणणें आहे. आतां वस्तूंत गुण असल्यावर श्रद्धा कशाला पाहिजे अशी शंका नव्या लोकांना सहजच येते. परंतु एका परब्रह्मावांचून बाकी सर्व पदार्थ स्वप्नाप्रमाणें भावनेचे आहेत असा आमच्या वेदान्ताचा सिद्धान्त असल्यामुळें भावनेनें त्यांच्यांत फेरबदल होणें कांहीं आश्चर्य नव्हे. पण अशा प्रकारची तीव्र भावना करून रोग दूर करणें सामान्य लोकांचें काम नाहीं. रोग्याचें अंतःकरण अनेक प्रकारच्या वासनांनीं चंचल आणि वैद्याचें अंतःकरण पैशा करितां हपापलेलें. अशा स्थितींत केवळ मानसिक उपायानें रोगनिवृत्ति करण्याचा यत्न मृगजळ पिऊन तहान भागविण्यासारखा हास्यास्पद आहे. चरकाचार्य एके ठिकाणीं म्हणतात. "आम्ही निश्चायानेंच कोणाचा कोणताहि रोग बरा करूं शकतो, परंतु पुढें तसें कोण करणार आहे ? म्हणून आम्ही जे कांहीं उपाय सांगून ठेवतो त्याच मार्गानें पुढील लोकांनीं चिकित्सा करावी. औषधींत मनोविकार

निर्मळ करण्याचे जे गुण आहेत त्यालाच प्रभाव म्हणतात." अशा प्रभावशील अनेक औषधी महात्म्यांनीं आयुर्वेदांत आम्हांकरितां संग्रहित करून ठेविल्या आहेत. त्यांचा आम्ही योग्य उपयोग करून न घेतल्यास आमच्या सारखे आत्मघातकी आम्हीच. औषधींचा मनावर त्रिदोषाच्या द्वारानें कसा परिणाम होतो त्याचा विचार सवडीनें करीन. सध्यां एवढाच लेख श्रीं ज्ञानेश्वरचरणीं समर्पण करतो.

आपला,

**गुलाबराव गुंडोजी मोहोड**

माधानकर, हल्लीं मुक्काम हरदा.

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ६ | १६ | अन्न मिळवी | धन मिळवी |
| ९ | १३ | रजः प्रसन्ना | रजः प्रपन्नाः |
| १० | १२ | मुका घ्यावया | मग मुका घ्यावया |
| १८ | १७ | नाहीं जीवी | जीवीं नाहीं. |
| ,, | २४ | प्रेम गुणे | प्रेमगुण |
| ,, | २५ | भगवंत | भगवत् |
| २३ | १ | बिंदु | बिंदुले |
| ,, | २० | प्रणाम | प्रमाण |
| २४ | १५ | फळातूनि | परी फळातूनि |
| २५ | ५ | योगीनाम | योगीनां |
| २६ | ८ | नागवि | न गणि |
| ,, | १३ | सूत्र ३, ४ | सूत्र ३, ४, ५ |
| ,, | १५ | सावडती | सावदती |
| २७ | २ | असमत | असंमत |
| २८ | २ | निजपे | निपजे |
| २९ | ४ | परमात्मा | परमात्माहि |
| ३१ | १५ | इंद्र | इंद्र |
| ३२ | ५ | कौशितक्युपतिषदांव | कौशितक्युपनिषदांत |
| ,, | १० | प्राणधर्मउपहित किंवा | प्राणधर्मउपहित, प्रज्ञाधर्म उपहित किंवा |
| ,, | १३ | वागादीयाश्रय | वागादींद्रियाश्रय |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३४ | ३ | पल्लवनाम्री | पल्लवनाम्नी |
| ,, | ८ | कैवल्यैंदिरेशा | जय कैवल्यैंदिरेशा |
| ३५ | १३ | प्रियबालकाका | प्रियबालकांका |
| ,, | १५ | निजजनपद | विजन जनपद |
| ,, | १७ | नृपत्वसोपरस्कारा | नृपत्वसोपस्कारा |
| ३७ | ८ | ब्रह्मज्ञानो पाव | ब्रह्मज्ञानोपाव |
| ,, | १३ | घेवोनी कालवस्तु | घेवोनी देशकालवस्तु |
| ३८ | ९ | ईश्वरा | ईश्वर |
| ३९ | ११ | भगवान् द्वैपायन | भगवान् कृष्ण द्वैपायन |
| ,, | ,, | तेयोनी | तेथोनी |
| ४० | १० | गोभटी | गोमटी |
| ४१ | १३ | ध्यावया | घ्यावया |
| ,, | १९ | शाङग | शार्ङ्ग |
| ४२ | १३ | प्रणामी | प्रणमी |
| ,, | १५ | उ । या | उपाया |
| ४३ | २४ | चलिलें | चालिलें |
| ४४ | १० | चितीं | चित्तीं |
| ,, | २३ | तुमचिया | वरि तुमाचिया |
| ४६ | ७ | लोक | लोके |
| ,, | १२ | चरणा | चरणीं |
| ५० | १६ | बाय प्रेमाची | बाळ प्रेमाची |
| ,, | २२ | कश्चिदात्मासच | कश्चिदात्मा च |
| ५१ | १६ | हें काय | हें बहु काय |
| ७४ | ८ | हो सद्गुरु | ते सद्गुरु |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ७५ | १७ | अधिकारी श्रवणीं | अधिकारी या श्रवणीं |
| ७६ | १९ | योगाधारा | योगधारा |
| ७९ | १ | श्वेताश्वतरापनिषत् | श्वेताश्वतरोपनिषत् |
| ,, | ५ | सूत्रकारा | सूत्रकार |
| ,, | १५ | जे तो | तो |
| ८० | ४ | शनैः जाईल | शनैः शनैः जाईल |
| ,, | ,, | सात्विक | तरी सात्विक |
| ,, | १० | योगाच | योगाचि |
| ,, | १५ | आवधान | अवधान |
| ,, | २३ | चुकावती | चुकविती |
| ८५ | २ | शुद्धचित्ता | अल्पशुद्धचित्ता |
| ,, | ,, | शुद्धचित्ता उठता | शुद्धचित्ता सद्वृत्ति उठता |
| ८६ | २० | आत्मभिन्न | आत्माभिन्न |
| ८७ | २ | स्वभिन्न सुखें | स्वभिन्न देवाविषयीं अप्रधान। आणि विधिमुखें जें श्रुति वर्णन। तें स्वभिन्न सुखें. |
| ,, | १० | तदादृष्ट्र्स्वरूपे | तदादृष्टुःस्वरूपे |
| ,, | १४ | म्हणजे स्वरूपाहूनि | म्हणजे स्वस्वरूपाहूनि |
| ,, | १५ | सूत्रभाष्याकारा | सूत्रभाष्यकारा |
| ,, | १७ | जीवन्मुक्त | जीव मुक्त |
| ८८ | १ | तेथ | तेणें |
| ,, | १३ | निगुणीं | निर्गुणीं |
| ,, | १८ | योगलक्षण | विषयलक्षण |
| ९१ | २२ | प्रारब्धांत | प्रारब्धाघात |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९४ | १९ | नयेचि | नये उगाचि |
| ९८ | १६ | रजरत्तम | रजस्तम |
| ९९ | १९ | याज्ञवल्क्यसहितेचा | ऐसा याज्ञवल्क्यसंहितेचा |
| १०० | ३ | भगवभ्द्रीता | भगवत् गीता |
| ,, | १० | यद्यापि | यद्यपि |
| ,, | ,, | अविद्यातमाचे | अविद्यातमोंश |
| ,, | ११ | ते नाशे | तो नाशे |
| ,, | १३ | निराधे | निरोध |
| ,, | २२ | द्वया | इया |
| ,, | २३ | पाडे | पडे |
| १०१ | १८ | तव्रिवेगात्त | तीव्रवेगात्त |
| १०२ | ४ | वृद्धयै: | वृद्धयै |
| १०३ | २२ | इत्यादि | त्वित्यादि |
| १०४ | ८ | बंध्या | वंध्या |
| १०६ | १७ | मनोनी | मानोनी |
| ,, | २४ | स्वप्रज्ञानलंबन | स्वप्रज्ञानावलंबन |
| १०७ | २३ | वेदान्तसमवन्यो | वेदान्तसमन्वयो |
| ११० | १२ | असत्यासत्यासी | सत्याअसत्यासी |
| ,, | १८ | सो. न जाने | सो जाने |
| ,, | २४ | गिरिधारन | गिरिधरन |
| १११ | १ | परात्मदर्शन | परमात्मदर्शन |
| ११७ | २१ | लगे | लगे |
| ११९ | ३ | वरें | वदे |
| ,, | १६ | गंगेंदगी | गंगेंदाणी |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२२ | २२ | उत्तर | उत्तम |
| १२३ | १० | निश्वपते | विश्वपते |
| १२८ | ६ | भव विलासह्य | जय भव विलासह्य |
| ,, | १० | भव ऽ भया | भवा ऽ भया |
| ,, | १४ | गुणगमंडित | गुणगणमंडित |
| ,, | १८ | आजे | आजि |
| ,, | २१ | गुरु । मग | गुरु प्रकटती । मग |
| ,, | २२ | प्रकटती । तेवीं | तेवीं |
| १२९ | १७ | अवतरली | अवतरती |
| ,, | ,, | धर्मार्थ | धर्माधर्म |
| १३० | १ | परी मी | परी मीहि |
| १३२ | ५ | दहरीदवी | दहरदिवी |
| १३४ | २१ | आहे | लाहे |
| ,, | २२ | तर | तरी |
| १३५ | २ | वाहिला | वहिला |
| १३६ | १३ | विश्वा हंकार | विश्वाहंकार |
| १४१ | १ | झाझ्या | माझ्या |
| १४९ | १७ | भविष्यद्द्ययवहारापे देशकान् | भविष्यद्व्ययवहारोप देशकान् |
| ,, | १९ | बहुविद्यवा | बहुविद्यया वा |
| १५१ | २४ | दुदव | दुर्दैव |
| १७३ | ३० | आचार्यहीनं व | आचार्यहीनं न |
| १८९ | २१ | श्रुत्योरभेमदम | श्रुत्योरभेदम |
| १९० | १८ | श्रुतिस्वरयो | श्रुतिस्वरयो |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १९७ | २१ | निनाद | निषाद |
| २०५ | १६ | मग हिंसा | मग अहिंसा |
| २११ | ५ | वित्तंड | वितंड |
| ,, | १२ | वकूत्र | वक्त्र |
| २१५ | २१ | स्ततंत्र | स्वतंत्र |
| २३७ | २५ | सिंह | सिद्ध |
| २४१ | ३ | आत्मा | आम्हां |
| ,, | १३ | मरणापूर्वी | मरणावरी |
| २४२ | ७ | आहे हे | मी आहे हे |
| ,, | १८ | तरी | तेविं |
| ,, | २१ | ओ देवोनि | ओसणोनि |
| ,, | २५ | नदी | कां नदी |
| २४३ | ८ | सांगोनि | पावोनि |
| ,, | ११ | रमण | रमणें |
| २४४ | १ | निजकीर्ती | निजकांति |
| २४४ | १५ | स्थापाया | स्थापाव्या |
| २४४ | १६ | यथामतीं वाहते | यथामतीं मिळवोन वाहतें |
| २४५ | १५ | गुणोपपंत्तेश्च | गुणोपपत्तेश्च |
| ,, | १८ | धर्मविविष्ट | धर्मविशिष्ट |
| ,, | ,, | मूर्तिमत्वदि | मूर्तिमत्वादि |
| २४६ | ३ | परंतु रज्जुस्थ | परंतु तो रज्जुस्थ |
| २४७ | २ | अपरोक्ष | अपरोक्षत्व |
| २५१ | १० | मत्तिका | मृत्तिका |
| ,, | १८ | म्हणून हा | म्हणून दु:खरूप हा भेदच |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| | | | आहे. पंतजलीनीं सांगितलेले क्लेशपंचक दुःखरूपच आहे. तेति भदोनच उत्पन्न होते. म्हणून हा. |
| २७० | २ | पटाईट | पटाईत |
| २८५ | २ | गापेवधूटी | गोपवधूटी |
| २८७ | १४ | कट्म्लादि | कट्वाम्लादि |
| २९३ | ६ | घटध्वंसावछिन्न | घटध्वंसावच्छिन्नघटा |
| ३०० | १५ | श्राणामजः | प्राणामनः |
| ,, | २० | येदां तारंभ | वेदान्तारंभ |
| ३२२ | १४ | नसल्यास | नसल्यास प्रथम |
| ३२३ | १२ | इर्सनिट | इसनिट |
| ३२४ | १४ | मुनस्वंज | मुनस्नंज |
| ,, | २१ | पाणी, खाद्य | पाणी |
| ३२५ | २ | असंट | असंटे |
| ,, | १७ | अर्जीदग्न | अजीदंजन |
| ,, | २१ | ठ | टें |
| ३२६ | २ | अरंची | अरंचल |
| ,, | ३ | धेन् | धन् |
| ,, | ४ | अरोईबल | अरोइपल |
| ,, | १७ | उपलन् | उपेलन् |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३२७ | २ | गंगोलन् | गंनोलन् |
| ,, | ५ | मठ | मड्ठ |
| ,, | १० | स्नदंश | स्नदंशे |
| ,, | ११ | इसल्चन | इसल्चन |
| ,, | १३ | वियानेन् | वियोलन् |
| ,, | १५ | अल्मन | अल्मन् |
| ,, | १६ | प्लदुवषे | प्लदुषेय |
| ,, | २१ | मियान् | मियोन् |
| ३२८ | २ | किंजल्क नवल | किंजल्कनवल |
| ,, | ३ | इन्नेरण | इन्नेरन् |
| ,, | ५ | उपनशन् | उपन्शन् |
| ३२८ | १३ | असंशे | असंशे |
| ,, | १४ | पलकन् | पलंकन् |
| ,, | १५ | आढ | ओढ |
| ,, | १७ | भोग | भेग |
| ,, | ,, | सुमन्तल | सुमन्तले |
| ,, | १८ | ऐन | ऐने |
| ,, | २४ | स्वासणें | रवासणें |
| ,, | २५ | पिलायेनन् | पिलएनन् |
| ३२९ | ९ | इगित | इंगित |
| ,, | ११ | ज्वार | ज्वर |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३३० | २२ | इदबल | इदवल |
| ,, | २४ | उपकारार्थ | उपकारार्ह |
| ३३१ | ३ | न्याय | न्याय्य |
| 332 | २२ | इलंलत् | इललत् |
| ३३२ | २३ | कायवेम् | काय – वेम् |
| ३३३ | १८ | इपरन्वेम् | इपरन्वम् |
| ३३४ | १ | दसादस्तमोन्सम | दसादस्तलमोन्सम |
| ,, | ५ | इने सुकर्म | इवे सुकर्म |
| ,, | ९ | इचनोन | इचन्नोन |
| ,, | २१ | उंतंनेंज | उंतंज |
| ३३६ | १३ | लोलनवतयतवत् | लोलनवतयतवन् |
| ,, | २२ | लोलनवेतत् | लोलनवतेत् |
| ३३७ | ६ | लोलनंवतवेत् | लोलनवतवेत् |
| ३३९ | १३ | दुःख परिणामी | दुःखपरिणामी |
| ३४४ | ३ | आपल्या | आपल्याला |
| ३४५ | २२ | जो मजर | जोम जर |
| ३४७ | १३ | असणाऱ्याला सवत्र | असणाऱ्याला दुसऱ्या ठिकाणीं कसा आनंद वाटतो आणि ही सवत्र |
| ३४९ | १ | फायदा | आनुमानिक फायदा |
| ,, | १९ | काळाचा | काळाच्या |
| ३५० | ९ | फल कां वरें | फळ जर मिळाले आहे तर या |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| | | | जन्मीच्या शुभ कर्मांचे फळ कां बरे |
| ,, | २० | अर्थात् | अत्यंत |
| २५३ | २२ | कारणमुळें | कारणामुळें |
| ३६६ | ६ | ह्त्रा | ह्या |